
# पं. जवाहरलाल नेहरू

## व्यक्ति आणि कार्य



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# पंडित जवाहरलाल नेहरू : व्यक्ती आणि कार्य

संपादक

प्रा. बा. ह. कल्याणकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथम आवृत्ती : मे, २००२

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४.

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड स्टेशनजवळ,
मुंबई ४०० ००४.

किंमत : रु. १४०

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकांची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

" पंडित जवाहरलाल नेहरू : व्यक्ती आणि कार्य " या ग्रंथाचे प्रकाशन पंडित जवाहरलालजी नेहरू यांच्या स्मृतिदिनी दिनांक २७ मे १९९३ रोजी करण्याचे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने ठरविले होते. प्रत्यक्षात हे पुस्तक दिनांक २७ मे २००२ रोजी प्रसिद्ध होत आहे. तब्बल ९ वर्षे या ना त्या कारणांमुळे रेंगाळत राहिलेले हे पुस्तक प्रसिद्ध करण्याचा योग लाभत आहे, याचा आम्हाला विशेष आनंद होत आहे.

या ग्रंथात एकूण २५ लेख व एक कविता समाविष्ट करण्यात आली आहे. हे लेख विविध क्षेत्रांतल्या अभ्यासू व मान्यवर व्यक्तींनी लिहिले आहेत. हे अभ्यासक राजकारण, समाजकारण, पत्रकारिता, साहित्य आदि क्षेत्रांतील जाणकार आहेत. त्यामुळे पंडित जवाहरलालजी नेहरू यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू या ग्रंथातून साकार झालेले आहेत. या मान्यवर अभ्यासकांनी जवाहरलालजींच्या व्यक्तिमत्त्वाचा व कार्याचा मोकळेपणाने घेतलेला वेध हा या ग्रंथाचा विशेष आहे.

पंडित जवाहरलालजींच्या जीवनाचा व कार्याचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या अभ्यासकांना हा ग्रंथ मार्गदर्शक ठरेल, असा मला विश्वास आहे.

**रा. रं. बोराडे,**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

मुंबई,

दिनांक २७ मे २००२.

# अनुक्रमणिका



| अ. क्र. | विषय | लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | जवाहरलाल नेहरू यांचा जीवनपट | डॉ. चंद्रकांत देऊळगावकर | ३ |
| २ | पं. नेहरू : काळ आणि कार्य | श्री. रा. ना. चव्हाण | १३ |
| ३ | पं. नेहरू : मुक्तचिंतन | श्री. मोहन धारिया | २६ |
| ४ | पं. नेहरूंची इतिहासविषयक भूमिका | डॉ. स. मा. गर्गे | ३८ |
| ५ | पं. नेहरू यांनी घेतलेला भारताचा शोध | श्री. प्र. श्री. नेरुरकर | ४३ |
| ६ | पं. नेहरू आणि समाजवाद | श्री. शांताराम गरुड | ८० |
| ७ | पं. नेहरू आणि संसद | श्री. पन्नालाल सुराणा | ९० |
| ८ | पं. नेहरू आणि अमेरिका | डॉ. सदा कऱ्हाडे | ९६ |
| ९ | पं. नेहरू आणि रशिया | श्री. पी. व्ही. अराणके | १०९ |
| १० | पं. नेहरू : विज्ञान आणि तंत्रज्ञान | डॉ. वसंतराव गोवारीकर<br>अनुवाद—दीपा गोवारीकर | १३६ |
| ११ | पं. नेहरू : भारतीय राष्ट्रवाद आणि धर्मनिरपेक्षता | डॉ. ज. रा. शिन्दे | १३९ |
| १२ | पत्रकार पं. नेहरू आणि पत्रकारिता | प्रा. सुधीर वा. गव्हाणे | १४६ |
| १३ | पं. नेहरू आणि धर्मनिरपेक्षता | डॉ. सत्यरंजन साठे | १५४ |
| १४ | पत्ररूप नेहरू | श्री. गोविंद तळवळकर | १६१ |
| १५ | पं. नेहरूंचा अलिप्ततावाद : तेव्हा आणि आता | डॉ. भा. ल. भोळे | १६८ |
| १६ | पं. नेहरूंचे यशापयश | श्री. अनंतराव भालेराव | १७४ |
| १७ | पं. नेहरूंच्या कवीमनाचे रंग | डॉ. निर्मलकुमार फडकुले | १८२ |
| १८ | पं. नेहरूंचे व्यक्तीमत्त्व | प्रा. ग. प्र. प्रधान | १८८ |
| १९ | जवाहरलाल नेहरू आणि महात्मा गांधी | श्री. यदुनाथ थत्ते | १९४ |
| २० | पं. नेहरू आणि मुस्लिम अल्पसंख्यांक | प्रा. फ. ह. बेन्नूर | २०० |
| २१ | नेहरू आणि राष्ट्रवाद | डॉ. सूर्यनारायण रणसुभे | २१२ |
| २२ | साहित्यिक नेहरू | श्री. रविंद्र स. किंबहुने | २१७ |
| २३ | राष्ट्रवादावर नेहरू | डॉ. एम्. एस्. गोरे<br>(अनुवाद- प्र. श्री. नेरुरकर) | २२३ |
| २४ | जवाहर नेहरू आणि भारतीय स्त्रियांचे स्थान | डॉ. श्रीमती नवाझ बी. मोदी<br>(अनुवाद—प्र. श्री. नेरुरकर) | २४२ |
| २५ | पं. जवाहरलाल नेहरू आणि हैदराबाद मुक्तीसंग्राम | श्री. वि. पां. देऊळगावकर | २५४ |

# पंडित नेहरू

□ फ. मुं. शिंदे

लहानशा खेड्यात
होतो मीही लहान
दोन डोळे भिंगावर
काळा पडदा डोक्यावर
पाहात होतो खटक्यानं
पुढं सरकणारी फिलिम–
'अपने पोते संजय, राजीव के साथ
देखो चाचा नेहरू की तस्वीर !'
सेनुमा दाखवणा सूर
जवळून नेत होता लांब दूर !

पंडितजी,
प्रियदर्शनी गेली
संजय गेला
राजीवलाही लोकांनी विश्वास दिला
स्वातंत्र्याला स्वतःचा श्वास दिला
आणि अचानक त्याचाही प्राण
होत्याचा नव्हता झाला !

आजोबापेक्षाही मुलीला
मुलीपेक्षाही नातवाला
लोकशाहीनं नाव दिलं
सुकाळात दुष्काळात अवकाळात
छातीवरच्या गुलाबाला
गोरगरिबांचं गाव दिलं !

प्रिय नेहरूजी,
रखरखत्या उन्हात
तुम्ही गेलात आणि काय हरवलं
देशालाही कळलं नाही
त्यानंर पहाटेचं आकाश
पुन्हा मात्र उजळलं नाही !

आजचं काय सांगावं
कुणाला सांगावं
जे आहे ते छान म्हणावं
ज्याला सापडेल ते ते
त्याच्या मालकीचं रान म्हणावं
काळ असा चालू आहे
पंडितजी, कुणाच्याही वावरात
कुणाचाही
फाळ जसा चालू आहे !
आक्रमणाच्या धक्क्यानं तुम्ही खचला
गुलाबाच्या पाकळीला
नाही संवेदनांचा घाव पचला
त्याच संरक्षणाच्या कुंपणानं
फस्त शेत करण्याचा
होता डाव रचला

कोणत्या हिंमतीनं सांगायचं हे,
चाचाजी?
कोवळ्या मनालाही
आज इथं मोल नाही
ओरडून सांगण्यासाठी
सत्वाला ढोल नाही !

अंतःकरणातल्या परिमलानं
कमळासाठी झुरायचं
ते दिवस निघून गेले
पायाची चाळणी करणारे
काटे बाळगणारे
चिवट चिखलाचं
वैभव बघून गेले !

कशासाठी आजचं स्वातंत्र्य
तेव्हा तुम्हाला हवं होतं
खऱ्याखुऱ्या समाजवादाचं
उत्थानाचं
तुमचं संजीवन स्वप्न
गोरगरिबांनाही नवं होतं !

गरिबाच्या श्रीमंतीला
श्रीमंताच्या गरिबीला
होती तशीच अजूनही
आहे भरघोस किंमत
कदाचित म्हणूनच
आहे निवडणुकांना हिंमत !

पंडितजी,
प्लीज त्यांना आवरा
जे म्हणताहेत, हा कोण लागून गेला
आमची काळझोप मोडू नये म्हणून
हा वेडा माणूस का जागून गेला ?

तुम्हीच सांगा नेहरूजी
सवयच ज्यांना जागायची
त्यांनी हा देश सोडून
कोणती नवीन माती बघायची ?

तुमच्या नायानंच गोंजारताहेत सत्ता
त्यांच्या प्रत्येक दारावर
हिऱ्याच्या बोटानं वाजवणारी बेल आहे
तुमच्या नायानंच फुली मारताहेत
त्यांच्या प्रत्येकाचं जीवन म्हणजे
अेक जेल आहे !

दारिद्रय गेलं नाही
गरिबी हटली नाही
पाच वर्षातून अेकदा
सवय, प्रेम ' वाटायची '
अजूनही सुटली नाही !

तोफेच्या तोंडाशी
कबूतर फडफडते आहे
दंगलीतले प्रेत
घरातल्या जिवांसाठी
नाल्यात तडफडते आहे !

प्रिय नेहरूजी,
हे सर्व तुम्हाला अप्रिय वाटेल
कुणाच्या सांगण्यामुळं कदाचित
खोटं वाटेल
कदाचित् इतकं खरं वाटेल की
लढ्याचा पश्चाताप होईल

सांगता येत नाही
मिळालेल्या वराचाही
कधी काळी शाप होईल !

अजूनही चाचाजी,
तसं फारसं बिघडलं नाही
जगाला वाटतं तसं
घडू नये ते घडलं नाही.

प्रत्येक क्षितिजावर संधी आहे
नव्या मुक्तीचा म्होरक्या
स्वातंत्र्याचा जरि बंदी आहे
धावत सुटेल
आक्रमणाच्या विषालाच
चावत सुटेल !

नेहरूजी, तुमचीच ही नेकी आहे
म्हणूनच प्रसंगी बेकीतही एकी आहे !

□ □ □

# जवाहरलाल नेहरू यांचा जीवनपट

□ डॉ. चंद्रकांत देऊळगावकर

### १४ नोव्हेंबर १८८९–जन्म प्रयाग येथे

"मी जिवंत असताना माझ्या मोटारीचा राष्ट्रीय झेंडा कोण काढतो मला पाहू दे." असे जळजळीत शब्द मोटारीतून खाली उतरून तो निर्भय पुरुष बोलला. पोलीस बघतच राहिले. संस्थांनी हद्दीतून हा महापुरुष तिरंगी झेंडा लावलेली मोटार घेऊन गेला. त्या डोळ्यात सूर्याचे तेज होते. वाणीत वज्राचा निश्चय होता. ज्याने आपल्या गंभीर वाणीने, दिलदारीने, मोकळेपणाने, ध्येयनिष्ठेने जगातल्या सर्व प्रमुख राष्ट्रांना वेध नि वेड लावले, जो साऱ्या जगाच्या आशा आकांक्षांचा केंद्रबिंदू बनला, अशा पं. जवाहरलाल नेहरूंचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी प्रयाग येथे झाला.

### १९०५ मे–हॅरोस शिक्षणासाठी प्रयाण

जवाहरलालजींना बालपणी शिक्षण देण्यासाठी पं. मोतीलालजींनी निरनिराळ्या विषयाचे शिक्षक नियुक्त केले. जवाहरलालजी त्यामुळे अनेक विषयांत पारंगत झाले. चौदा वर्षांच्या आत त्यांनी अनेक सुंदर कविता पाठ केल्या. आत्मचरित्रातही त्यांनी अनेक सुंदर कवितांची अवतरणे दिली आहेत. अशी तयारी करून जवाहरलालजी १९०५ मध्ये १३ मे रोजी हॅरोला रवाना झाले.

### १९०७ ऑक्टोबर–केंब्रिज विश्वविद्यालयात प्रवेश

हॅरो येथे माध्यमिक शिक्षण संपविल्यावर जवाहरलालजींनी केंब्रिज विश्वविद्यालयाच्या ट्रिनिटी महाविद्यालयात प्रवेश घेतला. इथे त्यांनी विस्तृत व अफाट विश्वाचे अवलोकन केले. अर्थशास्त्र,राज्यशास्त्र, इतिहास, साहित्य या विषयांवर चर्चा करण्यासाठी विद्वान मित्रमंडळी त्यांना भेटली. इथेच त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास झाला.

### १९०९–बर्लिन व इतर देश पर्यटन

पं. मोतीलालजींच्या समवेत जवाहरलालजींनी बर्लिन यात्रा केली. सुट्टीत फ्रान्स व जर्मनी या देशांचा प्रवास केला.

### १९१०–पदवी प्राप्त केली. जीवावरचे मोठे संकट टळले.

वयाच्या विसाव्या वर्षी जवाहरलालजींनी केंब्रिजची विज्ञान शाखेची पदवी प्राप्त केली. याच वर्षात त्यांच्या जीवावरील फार मोठे संकट टळले. हे भारताचे फार मोठे सुदैव म्हणावे लागेल. त्यांचा जणू पुनर्जन्मच झाला. नॉर्वेच्या प्रवासात एकदा जवाहरलालजी स्नान करीत असताना त्या नदीतील थंडगार पाण्याने त्यांचे हातपाय बधीर झाले. व ते घसरून पडले व पाण्याच्या प्रवाहात वहात चालले. त्यांच्या बरोबर असलेल्या एका इंग्रज मित्राने पळत जाऊन त्यांचे

दोन्ही पाय धरून नदीतून ओढून काढले. थोड्याशा उपचारानंतर त्यांना शुद्ध आली. पुढे थोड्याच अंतरावर खोल दरी होती व प्रचंड धबधबा होता, व ते एक प्रेक्षणीय स्थळ होते. पंडितजी त्या दरीत कोसळले असते. त्या इंग्रज माणसाने प्रसंगावधान ओळखून पंडितजींना बाहेर काढले नसते तर? कल्पनाच करवत नाही. त्या अनाम इंग्रजी माणसाने भारतीय जनतेवर अनंत उपकार करून ठेवले आहेत.

### १९१२–बॅरिस्टर झाले.

१९१० ते १९१२ या दोन वर्षांत बॅरिस्टरचा अभ्यास करून जवाहरलालजी बॅरिस्टर झाले. या दोन वर्षांतही त्यांनी बराच प्रवास केला. जवाहरलालजी बॅरिस्टर होऊन भारतात परतले व वडिलांसमवेत त्यांनी वकीलीस प्रारंभ केला.

डिसेंबर महिन्यात जवाहरलालजी पं. मोतीलालजींसमवेत बांकीपूर काँग्रेसच्या अधिवेशनास गेले होते. या अधिवेशनास ना. गोपाळ कृष्ण गोखलेही उपस्थित होते. ते प्रमुख पाहुणे या नात्याने अधिवेशनास आले होते. त्यांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव पंडितजींवर पडला. पण हे काँग्रेसचे अधिवेशन आहे की सामाजिक समारंभ आहे असा संभ्रम मात्र पंडितजींच्या मनात निर्माण झाला. सारे कामकाज इंग्रजी भाषेतून चालले होते, याचे पंडितजींना आश्चर्य वाटले. ना. गोखल्यांच्या मवाळ धोरणामुळे पंडितजी " भारत सेवक समाजाचे " सदस्य मात्र झाले नाहीत. १९१५ पर्यंत जवाहरलालजी जाहीर भाषण करण्याचे टाळत होते. याचे प्रमुख कारण म्हणजे भारतीय जनतेसमोर बोलावयाचे तर ते हिंदी भाषेतच बोलले पाहिजे असे त्यांचे दृढ मत होते. पण १९१५ मध्ये लेखन स्वातंत्र्यावर बंदी घालणारा जाचक नियम इंग्रजांनी चालू केला. त्यावेळी पंडितजींनी प्रथमच या नियमाविरुद्ध छोटे असे जाहीर भाषण केले. सर तेजबहादूर सप्रु या भाषणास उपस्थित होते. त्यांनी या छोटेखानी भाषणाचे कौतुक केले व जवाहरलालजींना भर सभेत छातीस लावले. एक नवे नेतृत्व पुढे येत आहे याचा आनंद त्यांना झाला.

### १९१६–जवाहरलालजींचा विवाह

देशाच्या स्वातंत्र्य युद्धाशी जवाहरलालजींचे लग्न लागण्या आधी त्यांचा विवाह ८ फेब्रुवारी १९१६ वसंत पंचमी रोजी कमलाशी झाला. (कमलाचा जन्म १ ऑगस्ट १८९९) आनंदवनात कितीतरी दिवसांपासून या विवाहाची तयारी चालू होती. शिंपी, जवाहिऱ्याचे सराफ, सर्वांची सारखी ये जा चालू होती. अलाहाबादहून खास शृंगारलेली खास लगीन गाडी सुटली. कितीतरी बंगले भाड्याने घेतले होते, पण अपुरे पडले म्हणून तंबू ठोकण्यात आले. संस्थानाधिपतीला शोभेल असा विवाह समारंभ झाला.

### १९१७–होमरूल आंदोलनात सहभाग–इंदिरेचा जन्म

१९१६ मध्ये लखनौला अ. भा. काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात म. गांधीजींशी जवाहरलालजींची भेट झाली. पंडितजी गांधीजींच्या राजनीतीने प्रभावित झाले होते. पंडितजींना वाटले या उघड्या नागड्या काटकोळ्या शरीरात प्रचंड शक्ति साठवलेली आहे. मोडेल, पण वाकणार नाही असे सामर्थ्य आहे.

२२ जून १९१७ रोजी प्रचंड सभा झाली. पं. मोतीलाल व जवाहरलाल यांनी होमरूल चळवळीस सामर्थ्य दिले. जवाहरलालजी वडिलांप्रमाणेच राजकारणात सक्रीय भाग घेऊ लागले. सुदैवाने कमला पण पंडितजींच्या विचाराशी सहमत होती. तिने जवाहरलालजींना उत्तम साथ दिली. १९ नोव्हेंबर १९१७ रोजी या दांपत्याच्या पोटी इंदिरा-प्रियदर्शनीचा जन्म झाला.

### १९१९–पंजाबचे हत्याकांड व चित्तरंजनदास यांना सहकार्य

९ मे १९१९ रोजी दिल्लीला जात असताना म. गांधींना पकडण्यात आले. गांधीजींनी तीन दिवस उपोषण केले. ९ एप्रिल रामनवमीच्या दिवशी अमृतसरला हिंदू मुसलमान प्रेमाचे एक विलक्षण दृष्य पहावयास मिळाले. पण १३ एप्रिल रोजी जालीयनवाला बागेतील जाहीर सभेवर ज. डायरने बेछूट गोळीबार करावयास लावला. देशबंधुदासांनी अमृतसरच्या कामाची जबाबदारी उचलली व पंडितजींनी त्यांना मदतनीस म्हणून सर्व सहकार्य देऊ केले.

### १९२१–प्रिन्स ऑफ वेल्सचे भारतात आगमन व पंडितजींना अटक

प्रिन्स ऑफ वेल्सचे उत्तर भारतात आगमन होण्यापूर्वीच अटकेचे सत्र चालू झाले होते. ६ डिसेंबर रोजी पंडितजी व मोतीलालजी कार्यालयात काम करीत बसले होते. पोलीस वॉरंट घेऊन आल्याची बातमी पं. मोतीलालजींना सांगितली गेली. कार्यालयाची झडती घेतली. पितापुत्राचे वॉरंट पोलिसांनी दाखविले. मोतीलाल म्हणाले, " जनतेची सेवा केल्यानंतर आपल्या मातृभूमिच्या स्वातंत्र्यासाठी मला व माझ्या एकुलत्या एक मुलासह अटक होत आहे याचा मला मोठा आनंद वाटतो. " असे म्हणून पोलीस व्हॅनमध्ये बसून पितापुत्र रवाना झाले.

पंडितजींना सहा महिन्यांची शिक्षा व ५०० रुपयाचा दंड ठोठाविण्यात आला. ३ मार्च १९२२ रोजी त्यांची मुक्तता करण्यात आली.

### १९२२–परदेशी कपड्यांवर बहिष्कार व पंडितजींना अटक

पंडितजी कारागृहातून बाहेर पडले व परदेशी कपड्यावर बहिष्काराचा कार्यक्रम सुरू झाला. पंडितजींना स्वस्थ कसे बसवणार ? अलाहाबादच्या काही व्यापाऱ्यांनी परदेशी कपडे न विकण्याचे आश्वासन पंडितजींना दिले. पण काहींनी वचनभंग केला, त्यांच्याकडून दंड वसूल केला. पंडितजींवर जबरदस्तीने पैसे वसूल करणे, धमक्या देणे व राजद्रोह असे आरोप लावून ११ मे रोजी एकवीस महिन्यांची शिक्षा देण्यात आली. या शिक्षेपैकी अर्धी शिक्षा भोगल्यानंतर ३१ जून १९२३ रोजी पंडितजींना सोडण्यात आले. तत्पूर्वी पतियाळा व नाभा नरेशांमध्ये संघर्ष चालू असता, ब्रिटिशांनी नाभा नरेशास पदच्युत करून इंग्रज प्रतिनिधी नियुक्त केला. अकाली लोकांनी या कृत्याचा निषेध करून आंदोलन छेडले. पंडितजी, डॉ. गिडवानी व कै. संतानम् हे नाभा संस्थानाच्या सरहद्दीवर पोचले. नाभा संस्थानात प्रवेश करण्यास बंदी होती. पोलीस अधिकाऱ्यांना त्यांनी सांगितले की त्यांचा नियमभंग करण्याचा विचार नाही, त्यांना येथून दुसऱ्या रेल्वेने पुढचा प्रवास करावयाचा आहे ". तरीही पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांचे म्हणणे न ऐकून घेता त्यांना पकडून जेलमध्ये घातले. त्यांच्यावर खटला सुरू केला. त्यांना अडीच वर्षांची शिक्षा ठोठाविण्यात आली. पण सुदैवाने त्यांना ती शिक्षा भोगावी लागली नाही. ज्या दिवशी त्यांना शिक्षा झाली, त्याच दिवशी सायंकाळी बिनशर्त मुक्त केले गेले. पण नाभाच्या जेलमध्ये त्यांना जो त्रास भोगावा लागला त्यामुळे पुढे टॉयफाइड झाला. व बरेच दिवस त्यांचे प्रकृतीस्वास्थ्य ठीक नव्हते.

### १९२४-२५–अलाहाबाद म्युनिसीपालिटीचे अध्यक्ष

१९२२ च्या काँग्रेस अधिवेशनानंतर काँग्रेसमध्ये दोन गट पडले. पडितजींनी या दोन्ही गटात समझोता करण्याचा प्रयत्न केला पण त्यांना यश आले नाही. या संघर्षामुळे पंडितजींना क्लेश झाले. याच काळात जवाहरलालजी अलाहाबाद म्युनिसीपालिटीचे अध्यक्ष झाले. याच सुमारास विठ्ठलभाई पटेल मुंबई कॉर्पोरेशनचे व चित्तरंजनदास कलकत्त्याचे मेयर झाले होते. बहुतेक

मोठ्या शहराच्या नगरपरिषदा काँगेसने हस्तगत केल्या होत्या. १९२७ ते १९२९ याही काळात पंडितजी म्युनिसीपालिटीचे अध्यक्ष होते. १९२५ मध्ये त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामाही दिला होता. याच काळात देशबंधू चित्तरंजनदासांचा मृत्यू झाला. पंडितजी म्हणतात "देशबंधूंच्या मृत्यूने वडिलांवर प्रचंड आघात झाला. त्यांच्या तोंडून एक शब्द निघत नव्हता. इतके दु:खी मी त्यांना कधी पाहिले नव्हते." ते दोघे मिळून कलकत्त्यास निघाले. कमला नेहरूंची प्रकृती बरी नसावयाची. त्या लखनौच्या रुग्णालयात उपचारासाठी होत्या. तरीही पंडितजींचा प्रवास चालूच होता.

**१९२७–ब्रूसेल्स व बेल्जीयमचा प्रवास, परतंत्र राष्ट्रातील जनतेच्या कॉंग्रेसमध्ये भारताचे प्रतिनिधित्व. परत आल्यावर मद्रास कॉंग्रेसमध्ये भारताच्या स्वातंत्र्याचा ठराव.**

उन्हाळ्यात युरोपातील अनेक विद्यार्थी जिनीव्हाला जमत. हिंदी, चिनी, सिलोनी, अमेरिकन, फ्रेंच, जर्मन, वगैरे. प्रख्यात फ्रेंच साहित्यिक रोमोरोलाँ यांचीही भेट जवाहरलालजींनी घेतली. इटली, नेपल्सलाही ते जाऊन आले. ब्रूसेल्स येथे साम्राज्य विरोधी संघाची स्थापना करण्यात येत होती. जवाहरलालजींना भारताचे प्रतिनिधी म्हणून आमंत्रण देण्यात आले. जावा हिंदचीन, फिलीस्तान, सिरीया, उत्तर आफ्रिका, अरब देश व निग्रो या देशांचे प्रतिनिधी तेथे उपस्थित होते. जवाहरलालजींनी या सभेत ब्रिटिश शासनावर कठोर टीका केली. भारतीय स्वातंत्र्य संग्रामास तेथे त्यांनी पाठिंबा मिळवला. जवाहरलालजींना कार्यकारिणीवर घेतले. या परिषदेमुळे अनेक परतंत्र राष्ट्रांतील समस्यांचे ज्ञान त्यांना झाले. भारतात आर्थिक व सामाजिक परिवर्तन झाले पाहिजे हे त्यांना समजून आले. त्यामुळे या दोन्ही गोष्टींवर त्यांनी भर देण्यास प्रारंभ केला. त्याही काळात सांप्रदायिकता व भ्रष्टाचार यांना ऊत आला होता, असा उल्लेख पं. मोतीलालजींनी केला आहे.

**१९२८–सायमन कमिशनचे आगमन व बहिष्कार**

याकाळात बारडोली येथे मालगुजारी विरुद्ध आंदोलन सुरू झाले. शेतकरीवर्ग जागा झाला. भारताचे सचिव लॉर्ड बरकिन यांनी नियुक्त केलेल्या सायमन कमिशन विरुद्धही आंदोलन छेडले गेले. ज्या ज्या ठिकाणी सायमन कमिशन गेले त्या त्या ठिकाणी "सायमन कमिशन गो बॅक" च्या घोषणा देऊन कमिशनचे स्वागत झाले. काळे झेंडे दाखविण्यात आले. प्रदर्शने झाली. लोकांवर लाठीमार झाला. गोळीबार झाला. श्री लाला लजपतराय जखमी झाले. जवाहरलालजींना पण लाठ्यांचा प्रसाद मिळाला. काही स्वयंसेवकांनी त्यांना तेथून दूर नेले.

**१९२९–लाहोर कॉंग्रेसचे अध्यक्ष, संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी, बंदिस्त पत्रे या पुस्तकाचे प्रकाशन, ऑल इंडिया ट्रेड युनियनच्या नागपूर कॉंग्रेसचे अध्यक्ष.**

१९२८ च्या डिसेंबर महिन्यात कलकत्ता कॉंग्रेस झाली. पं. मोतीलालजी अध्यक्ष होते. वसाहतीच्या स्वराज्याचा ठराव मंजूर झाला. जवाहरलालजींचा विरोध होता. महात्माजींनी शासनाला एक वर्षाची मुदत दिली. देशभर युवक चळवळी उभ्या राहिल्या. उत्तर प्रदेश युवक चळवळीचे पंडितजी अध्यक्ष होते. १९२९ मध्ये लाहोर कॉंग्रेस झाली. जवाहरलालजी अध्यक्ष झाले. गांधीजी म्हणाले "तो स्फटिकाप्रमाणे निर्मळ आहे. शूर आहे. त्याचा उतावीळपणाही त्याला शोभतो. राष्ट्र त्याच्या हाती सुरक्षित आहे." ३१ डिसेंबर १९२९ रोजी स्वातंत्र्याचा ठराव मंजूर झाला. रावी नदीच्या तीरावर रात्री १२ वा. जवाहरलालजींनी स्वातंत्र्याची प्रतिज्ञा दिली. लाखोंनी ती उच्चारली. २६ जानेवारी हा स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्याचा आदेश देशभर गेला.

### १९३०–मिठाचा सत्याग्रह

६ एप्रिल १९३० रोजी गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला. इंग्रज शासनाला या मिठाच्या सत्याग्रहातील दाहकता कळून आली होती. हे आंदोलन अत्यंत क्रूर पद्धतीने निपटून काढण्याचा शासनाने निर्धार केला. १४ एप्रिल रोजी जवाहरलालजींना शासनाने अटक केली. सहा महिन्यांची शिक्षा त्यांना झाली व नैनी जेलमध्ये त्यांची रवानगी केली. कमला नेहरू, विजयालक्ष्मी पंडित, कृष्णा, रुपमती स्वरुप यांनी सर्वांनीच या लढ्यात उडी घेतली होती. या घटनेचा पंडितजींना अतिशय आनंद झाला. याच काळात पं. मोतीलालजींची प्रकृती बरीच चिंताजनक होती. २७ जुलै रोजी पितापुत्राची भेट नैनी जेलमध्ये झाली. जवाहरलालजी वडिलांच्या सेवेत गुंतले. ११ सप्टेंबर रोजी प्रकृतीच्या कारणावरून मोतीलालजींना मुक्त केले. ११ ऑक्टोबर रोजी पंडितजींना मुक्त केले. पं. मोतीलाल घरी जवाहरलालजींची वाट पाहात होते पण त्यांना वाटेतच अटक झाली व सहा महिन्यांची शिक्षा आणि ५०० रु. दंड करण्यात आला. पं. मोतीलालजींनी औषध न घेण्याचा निर्णय घेतला.

### १९३१

२६ जानेवारी १९३१ रोजी गांधीजींसहित अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांना सोडून देण्यात आले. पंडितजी सरळ घरी आले. मुलगा भेटला म्हणून मोतीलालांचे मुख फुलले. जवाहरलालजींच्या डोळ्यात करुणा व वेदना होती. गांधीजी पण सुटल्यानंतर अलाहाबादला आले. पं. मोतीलालजींना ४ फेब्रुवारीस लखनौला नेण्यात आले. ५ फेब्रुवारीला त्यांची प्रकृती अधिकच बिघडली. ते महात्माजींना म्हणाले, " मी स्वराज्य पाहावयास नाही पण तुम्ही ते आणणारच आहात " मुखावर शांती पसरली. गायत्री मंत्राचा जप करीत मोतीलालजींनी ६ फेब्रुवारी १९३१ रोजी इहलोकीचा निरोप घेतला. ५ मार्च १९३१ रोजी " गांधी-डार्विन " करार झाला. पंडितजींना त्या करारातील क्रमांक दोनचे कलम पाहून धक्काच बसला. पण ते काही बोलले नाहीत. कारण गांधीजींनी तो मसुदा मान्य केला होता. या समझोत्यामुळे स्वातंत्र्याचा प्रश्न पुन्हा दूर गेला होता. २६ जानेवारीच्या स्वातंत्र्याच्या ठरावाला काही अर्थ उरला नव्हता. पंडितजी बंगालच्या दौऱ्यावर जाऊ लागले होते. संयुक्त प्रांतात काँग्रेस नेत्यांची धरपकड चालू होती. गांधीजी २६ डिसेंबर रोजी लंडनहून मुंबईला येणार होते. पंडितजी गांधीजींशी विचारविनीमय करण्यासाठी मुंबईला निघणार होते. तोच त्यांना अटक करून नैनीच्या जेलमध्ये पाठविण्यात आले. या काळात कमला नेहरूंवर मुंबईत उपचार चालू होते. जवाहरलालजींना दोन वर्षांची सजा व पाचशे रुपयांचा दंड झाला. तेथून त्यांना बरेलीच्या जेलमध्ये हलवले, त्यानंतर डेहराडूनच्या जेलमध्ये हलवले.

### १९३२–हरिजनांसाठी स्वतंत्र मतदार संघ

रॅम्से मॅक्डोनल्डने हरिजनांना स्वतंत्र मतदार संघ देण्याचे ठरवले. या निर्णयाविरुद्ध गांधीजींनी आमरण उपोषण करण्याचा निश्चय केला. या गोष्टींचा जवाहरलालजींच्या मनावर खूप ताण आला. संपूर्ण भविष्यकाळ अंधकारमय दिसू लागला. पण सुदैवाने पुणे करार झाला व गांधीजींचे उपोषण सुटले.

### १९३३

जवाहरलालजींची आई श्रीमती स्वरुपराणी अत्यावस्थ असल्याने जवाहरलालजींना ३० ऑगस्ट रोजी सोडण्यात आले. जवाहरलाल आईला भेटण्यासाठी लखनौला पोचले. म. गांधीजींचीही

त्यांनी भेट घेतली. श्रीमती स्वरुपजींची प्रकृती ठीक नसल्याने कृष्णाचा विवाह लवकर उरकून घेण्याचे ठरले. कृष्णाचा विवाह आंतर्जातीय विवाह होता. या दोन्ही कारणांनी हा विवाह अत्यंत साध्या पद्धतीने झाला. कमलाचीही प्रकृती दिवसेंदिवस ढासळत चालली होती. तिची प्रकृती दाखविण्यासाठी ते कमलासह कलकत्त्याला गेले. त्याचवेळी कलकत्त्याच्या भूकंपपीडीत भागांना ते भेट देण्यास विसरले नाहीत. कमलाच्या प्रकृतीबद्दल डॉक्टरांशी विचारविनिमय करुन सार्वजनिक सभांतून त्यांनी भाषणेही केली. कलकत्त्याहून परतताना वाटेत पाटण्यास उतरून भूकंपाबद्दल श्री. राजेंद्रबाबूंशी त्यांनी चर्चा केली.

१९३४

११ फेब्रुवारीपर्यंत कलकत्त्याच्या भूकंप प्रदेशाचा दहा दिवस दौरा जवाहरलालजींनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केला. १२ फेब्रुवारीस, श्री. पुरुषोत्तमदास टंडन चहा पीत बसले असता वॉरंट घेऊन पोलीस आले. पंडितजी म्हणाले " फार दिवसांपासून तुमची वाट पाहात होतो. पंडितजींना अटक करण्यात आली. १६ फेब्रुवारीस त्यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली . ही त्यांची सातवी जेलयात्रा होती. अलीपूर जेलमध्ये दहा फूट बाय नऊ फूट खोलीत पंडितजींना ठेवण्यात आले. अलीपूर जेलमध्ये त्यांचे स्वास्थ्य बिघडल्यावर त्यांना डेहराडून जेलमध्ये पाठविण्यात आले. इथे त्यांना थोडेसे स्वास्थ्य मिळाले. त्यांनी आत्मचरित्र लिहिण्यास प्रारंभ केला. अचानक ११ ऑगस्ट रोजी त्यांना पोलिसांच्या संरक्षणाखाली अलाहाबादला नेण्यात आले. अलाहाबादला पोचल्यावर त्यांना सांगण्यात आले की कमला आजारी असल्यामुळे काही दिवसांसाठी त्यांना मुक्त करण्यात आले होते. इंदिरा पण शांतिनिकेतनहून आली होती. कमलास युरोपात पाठवायचे ठरले. तिला निरोप देऊन जड मनाने ते पुन्हा तुरुंगात गेले. कमलेची प्रकृती सुधारेना.

१९३५

जवाहरलालना पुन्हा सोडण्यात आले. ते युरोपाला गले. ते कमलाजवळ बसायचे, वाचून दाखवायचे, फुले आणून द्यावयाचे. पतीचा आत्मा त्यावेळी त्यांना समजला.

१९३६

परंतु १८ फेब्रुवारी १९३६ रोजी कमला देवाघरी गेली. " नसलेल्या कमलेला " अशी अर्पण पत्रिका त्यांनी आत्मचरित्राला दिली. १९३६ मध्ये लाहोर कॉंग्रेसचे पंडितजी अध्यक्ष झाले. फैजपूर कॉंग्रेसचेही तेच अध्यक्ष झाले. १९३६ च्या त्यांच्या भाषणात भर होता समाजवादावर, लाहोरच्या भाषणापेक्षा हे प्रभावी व विचारपद्धतीने परिपक्व होते. त्यांनी कॉंग्रेस कार्यकारिणीत आचार्य नरेंद्रदेव, जयप्रकाश नारायण व अच्युत पटवर्धन यांना स्थान देऊन सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. या त्यांच्या कृत्यावर वरिष्ठ कॉंग्रेस नेते नाराज झाले. याचा परिणाम तिसऱ्या वेळी त्यांनी अध्यक्षपदास नकार दिला. हारपुरा कॉंग्रेसचे अध्यक्ष सुभाषचंद्र बोस झाले.

१९३८

श्रीमती स्वरुपराणीचे निधन झाले. रात्री बोलता बोलता त्यांना वाताचा झटका आला व त्या निवर्तल्या, आईच्या मृत्यूनंतर पंडितजी प्रवासाला निघाले. ब्रह्मदेश, जावा या देशांना त्यांनी भेटी दिल्या. युरोपमध्ये तर ते कॉंग्रेसचे प्रतिनिधी म्हणून बोलले. ते म्हणाले " हिंदुस्थानात ब्रिटिश राजवटीत आम्ही फॅसिझम रोज अनुभवत आहोत." स्पेनमध्ये विद्रोह भडकला होता.

**१९३९**

स्पेनहून परतल्यावर पंडितजी चीनला गेले. १९३९ ला दुसरे महायुद्ध सुरू झाले व युद्धविरोधासाठी गांधीजींनी पुन्हा वैयक्तिक सत्याग्रहास प्रारंभ केला. ज्यांचे नावही कुणाला माहीत नव्हते असे विनोबाजी पहिले सत्याग्रही निवडले गेले. जवाहरलाल नेहरूंनी गोरखपूर येथे विरोधी भाषण दिले. त्यांना चार वर्षांची सजा झाली. परिस्थिती झपाट्याने बदलत होती. जपान युद्धात जिंकत जिंकत ब्रह्मदेशापर्यंत आला होता.

**१९४१**

ब्रिटिश सरकारने भारतीय नेत्यांचे सहकार्य मिळविण्यासाठी आणखी एक प्रयत्न केला. सर सँपर्ड क्रिप्स कमिशन भारतात पाठविण्याचे ठरवले. गांधीजी व पंडितजी व अन्य पुढाऱ्यांना मुक्त केले. चर्चा झाली पण निर्णय होऊ शकला नाही. क्रिप्स हात हालवीत परत गेला.

**१९४२–भारत छोडो आंदोलन**

ऑगस्ट १९४२ मध्ये झालेले काँग्रेस अधिवेशन अत्यंत तणावपूर्ण वातावरणात झाले. म. गांधीनी ऐतिहासिक शब्द उच्चारला " चलेजाव " मुंबईस ८ ऑगस्ट १९४२ रोजी " चलेजाव " चा ठराव मंजूर झाला. " करेंगे या मरेंगे " हा संदेश म. गांधींनी दिला. पं. नेहरू व इतर सर्व नेत्यांना आठ ऑगस्ट रोजी पकडण्यात आले. महादेवभाई देसाई, कस्तुरबा व म. गांधींना पुण्यास आगाखान पॅलेसमध्ये ठेवण्यात आले. पंडितजींसह इतरांना अहमदनगर जेलमध्ये स्थानबद्ध केले. महादेवभाई व कस्तुरबा दोघांचेही आगाखान पॅलेसमध्ये निधन झाले.

**१९४४**

नगरच्या जेलमध्ये असताना जवाहरलालजींनी " डिस्कव्हरी ऑफ इंडिया " हा ग्रंथ पूर्ण केला.

**१९४५**

१५ जानेवारी १९४५ रोजी पंडितजींना मुक्त केले. इकडे हिटलरचा पाडाव झाला होता. ॲटमबाँबने जपान शरण आला. २५ जून रोजी ब्रिटिश सरकारच्या निमंत्रणावरून सिमला वाटाघाटीत सामील. आझाद हिंद सेनेचे अधिकारी व सैनिकांची वकिली करण्याची व्यवस्था केली व स्वतःही काम करण्याचे ठरवले. १७ ऑगस्ट १९४५ रोजी त्यावेळच्या व्हॉइसरायचे अंतरीम सरकार बनविण्यासाठीच्या निमंत्रणाचा स्वीकार.

**१९४६**–कॅबिनेट मिशन प्लॅनच्या संदर्भात स्पष्टीकरणासाठी ब्रिटिश शासनाशी चर्चा करण्यासाठी लंडनला प्रयाण. ६ डिसेंबर १९४६ रोजी स्वतंत्र भारताची लोकशाही घटना तयार करण्यास प्रारंभ. घटनेचा मूलभूत व मार्गदर्शक ठराव नेहरूनीच मांडला. २६ नोव्हेंबर १९४९ ला ते महान कार्य पूर्ण झाले. १९५० च्या २६ जानेवारीला ती लोकशाही घटना देशभर लागू झाली.

**१९४७–भारत स्वतंत्र झाला**

१९४७ मधील १५ ऑगस्ट उजाडला. ज्याच्या राज्यावरील सूर्य कधीही मावळणार नाही; असे वर्णन केले जात असे, ते इंग्रज भारत सोडून गेले. भारत स्वतंत्र झाला. अशोक चक्रांकित तिरंगा ध्वज लाल किल्ल्यावर फडकला. भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू झाले. महात्माजींचे " वारस " असलेले " जवाहर ! " माझा " वारस " जवाहरच आहे असे म. गांधीजींनी जाहीर केले होते. जवाहरच्या हाती भारत सुरक्षित असे त्यांना वाटायचे. पंडितजी केवळ भारताच्याच स्वातंत्र्याचे कैवारी नव्हते, तर जे जे गुलाम, त्यांचे ते कैवारी होते. त्यांनी १९ आशियायी

राष्ट्रांची परिषद बोलावली होती. डच सत्ता सोडून गेले, हा नेहरूंच्याच धीरोदात्त नीतीचाच विजय होता. स्वातंत्र्याबरोबरच दंगलीचा आगडोंब उसळला. पंडितजींनी वल्लभभाई पटेल व लियाकतअलींच्या समवेत पंजाबच्या दंगलग्रस्त भागाचा दौरा केला.

**१९४९–राष्ट्रपिता महात्मा गांधींची हत्या**

भारत स्वतंत्र झाला पण देशाची फाळणी होऊन दोन्हीकडे प्रचंड प्रमाणात दंगली सुरू झाल्या. भारतात निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे येऊ लागले. अश्रू व रक्त यांची किंमत स्वातंत्र्यासाठी निरपराध जनता देत होती. म. गांधींनी उपवास करून कलकत्त्यास शांती आणली. दिल्लीलाही दंगलीच्या ज्वाला भडकल्याच होत्या. काश्मिरवर पाकिस्तानने आक्रमण केले होते. दिल्लीत फौजा पाठविल्या. महात्माजींनी दिल्लीत पुन्हा उपवासास प्रारंभ केला. एकदा त्यांच्या प्रार्थना सभेत बॉंब टाकला. अखेर ३० जानेवारी १९४८ रोजी एक तरुण गांधींना नमस्कार करण्याच्या निमित्ताने पुढे आला व त्याने गांधींवर गोळ्या झाडल्या. " हे राम " म्हणून महात्माजी रामात विलीन झाले. त्या रात्री सकंप आवाजात पंडितजी राष्ट्राला उद्देशून म्हणाले " सभोवताली अंधार आहे परंतु प्रकाश नाही " तो प्रकाश आहे. गांधीजींनी दिलेला प्रकाश या देशाला, मानवजातीला हजारो वर्षे पुरेल " राष्ट्राला पंडितजींनी धीर दिला. " हे राष्ट्र सर्व धर्मांसाठी आहे. ज्यांना ज्यांना इथे प्रामाणिकपणे रहावयाचे असेल त्या सर्वांसाठी आहे " अशी घोषणा पंडितजींनी केली. १७ फेब्रुवारी १९४८ रोजी भारताच्या तटस्थ परराष्ट्र कारणांची घोषणा व समर्थन संयुक्त राष्ट्राच्या पंतप्रधानांच्या कॉन्फरन्समध्येही त्यांनी ही घोषणा केली. नोव्हेंबरमध्ये पॅरिस येथे सं. राष्ट्रसभेत पंडितजींचे भाषण झाले. कॅनडातही ते जाऊन आले. भारताच्या या सुपुत्राने देशोदेशी जाऊन " भारत तटस्थ राहील " अशी घोषणा केली.

**१९५०**

नियोजन मंडळाची स्थापना व उदघाटन नेहरू लियाकतअली समझोता.

**१९५१**

कायरो, जिनेवा, लंडन, पॅरिस, नेपाळ या देशांचा दौरा. कॉंग्रेसच्या ५७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष.

**१९५२**

भारत सिरीया करारावर सह्या.

**१९५३**

हैद्राबाद कॉंग्रेसचे अध्यक्ष. महाराणी एलिझाबेथ हिच्या राज्यरोहण प्रसंगी उपस्थिती. पाकिस्तान सरकारच्या निमंत्रणावरून कराची दौरा.

**१९५४**

पंडिजींच्या भेटीसाठी पंतप्रधान सर जॉन कोटलेवाला यांचे भारतात आगमन. पंडितजींचा लंकेचा दौरा. २५ जून रोजी चीनचे पंतप्रधान चौ एन लाओ यांचे पंडितजींच्या भेटीसाठी भारतात आगमन. या काळात दिल्ली जणू जगाची राजधानी बनली होती. अनेक देशांचे राजे, अध्यक्ष, पंतप्रधान, मंत्री सारे लोक पंडितजींना भेटण्यासाठी येत. जागतिक प्रश्नांवर चर्चा करीत. याप्रमाणे चौ एन लाओ आले. राष्ट्राराष्ट्रातून परस्परांशी कसे वागावे या संदर्भात पाच नियम बनवले गेले. हे नियम पुढे " पंचशील " म्हणून ओळखले जाऊ लागले. ते नियम असे–

(१) प्रत्येक राष्ट्राने दुसऱ्याचे सार्वभौमत्व मान्य करावे.

(२) प्रत्येक राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा व प्रादेशिक एकात्मतेचा आदर राखावा.

(३) कोणत्याही राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात दुसऱ्या राष्ट्राने ढवळाढवळ करू नये.

(४) दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करू नये.

(५) सर्वांनी शांततापूर्ण सहजीवन उपभोगावे.

या तत्त्वांना रशिया, चीन, ब्रह्मदेश या राष्ट्रांनी पाठिंबा दिला.

१८ एप्रिल १९५५ रोजी बांडुंग परिषद झाली. या परिषदेत वसाहतवाद व साम्राज्यवादाचा धिक्कार करण्यात आला. अणुबॉंबचा वापर बड्या राष्ट्रांनी करू नये, सर्व परतंत्र राष्ट्रे स्वतंत्र व्हावीत असे ठराव पास झाले. हा पंडितजींचा विजय होता. या शांतिकार्याबद्दल राष्ट्राध्यक्षांनी ज़वाहरलालजींना "भारतरत्न" ही सर्वोच्च मानाची पदवी अर्पण केली. डिसेंबर १९५४ मध्ये मा. टिटो यांचे भारतात आगमन.

**१९५५**

इंडोनेशियाचे राष्ट्रपती सुकर्णो यांचे भारतात आगमन. लाओसचे राजकुमार व प्रधानमंत्री यांच्याबरोबर जिनेव्हा समझोत्यावर हस्ताक्षर. १८ सप्टेंबर रोजी मार्शल बुल्गानिन व खुश्चेव्ह यांचे भारतात स्वागत. इजिप्तच्या पंतप्रधान नासेरची भेट व वार्तालाप.

**१९५६–२७**

जून रोजी राष्ट्रमंडल परिषदेतील प्रधानमंत्र्यांच्या संमेलनात भाषण. या काळात काही काळ अर्थमंत्रीपद जवाहरलालजींकडे होते. चौ एन लाओशी भारत-चीन सीमावादावर बैठक.

अमेरिका, कॅनडा व युरोपचा दौरा आणि संयुक्त राष्ट्र संघात भाषण.

**१९५७**

जानेवारी दोन १९५७ रोजी दिल्लीत चौ एन लायशी चर्चा. पंचनलामा व दलाईलामा यांच्यासमवेत म. बुद्धाच्या १५०० व्या जयंतीत सहभाग.

निवडणुकीनंतर १७ एप्रिल रोजी नव्या मंत्रिमंडळाची स्थापना. पुनःश्च पंतप्रधान.

**१९५८**

झेकोस्लावाकियाच्या पंतप्रधानांशी वार्तालाप. पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याची इच्छा पंडितजींनी प्रदर्शित केली. पण सर्वांच्या आग्रहाखातर राजीनामा न देण्याचा निर्णय.

**१९५९**

युगोस्लाव्हियाचे राष्ट्रपती व पंतप्रधान मार्शल टिटो यांच्याशी चर्चा.

**१९६०**

पुनःश्च चौ एन् लायशी दिल्ली येथे भेट. १ मे रोजी 'महाराष्ट्र राज्या'ची स्थापना.

**१९६१**

कॉमनवेल्थच्या पंतप्रधानांच्या संमेलनात सहभाग. रशियाचे अध्यक्ष खुश्चेव्ह यांच्याशी मुलाखात. गोवा स्वतंत्र झाला.

**१९६२**

निवडणुकीनंतर नवे मंत्रिडळ स्थापन. पुनःश्च पंतप्रधान.

ऑक्टोबरमध्ये चीनचे आक्रमण. चीन आक्रमणाचा पंडितजींवर परिणाम झाला. चीनचा विश्वासघात. येथून त्यांची प्रकृती खालावत गेली. चीनशी लढण्याचा दृढ संकल्प. भारत-पाकिस्तान संघर्ष मिटविण्यासाठी राष्ट्रपती जनरल आयुब यांच्याशी चर्चा व संयुक्त निवेदन प्रसिद्ध.

१९६३

श्रीलंका, संयुक्त अरब गणराज्य व घाना या देशाच्या प्रतिनिधींशी चीन या देशा संदर्भात कोलंबो प्रस्ताव व चर्चा. लाओसच्या पंतप्रधानांशी भेट. आफ्रिका देशातील प्रतिनिधींच्या संमेलनाचे उद्‌घाटन.

१९६४

२७ मे १९६४ हा दिवस भारताच्या इतिहासातील एक दुर्दैवी दिवस ठरला. या दिवशी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आपल्याला सोडून गेले. " माझ्या मृत्यूनंतर कोणतेही धार्मिक विधी करू नयेत " असे त्यांनी आपल्या मृत्यूपत्रात लिहून ठेवले होते. आपल्या देहाची राख विमानातून खूप ऊंचीवरून देशात पसरवून टाकावी. अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. त्यांच्या मृत्यूचे वृत्त आकाशवाणीने देशाला दिले. सर्व देश शोकमग्न झाला. त्यांच्यानंतर कोण ? असा प्रश्न निर्माण झाला होता. " तुम्हीच वारसा नेमून ठेवा " असे लोक त्यांना सांगत, पण पंडितजींचा लोकशाहीवर दृढ विश्वास होता. वारसा नेमण्याची राजेशाही प्रथा त्यांना मान्य नव्हती. ते म्हणत " भारतातील जनता सूज्ञ आहे. पंतप्रधान कोण, ते ती ठरवेल." पंडितजी असे निखालस लोकशाहीवादी होते

□ □ □

# पं. नेहरू–काळ व कार्य

□ रा. ना. चव्हाण

स्वातंत्र्यपूर्व काळातील राष्ट्रीय सभा लोकांची स्वराज्याची तहान भागविणारी ठरली. १८८५ साली स्थापन झालेल्या कॉंग्रेसला एका चढीत एक, त्यागी पुढारी लाभले. दादाभाई नवरोजी, गोखले, टिळक, बॅनर्जी , सुरेंद्रनाथ, लजपतराय, फिरोजशाह मेहता, आनंदमोहन घोष, नबाब सय्यद महंमद, पाल बिपिनचंद्र, दत्त रमेशचंद्र वगैरेंची फार मोठी मालिका आपल्या देशाला प्राप्त झाली. या मालिकेत म. गांधींच्या जवळ जवळ समकाळात होऊन गेलेले पं. जवाहरलाल हे आलेले स्वातंत्र्य पाहाणारे व चालविणारे फार मोठे पंतप्रधान ठरतात. नेहरू स्वातंत्र्य सैनिकांचे नेते म. गांधी; यांचे नेतृत्व मानणारे होते. गांधी यांच्या त्यागातून व उदाहरणापासून पं. नेहरूंसारखे व इतर असंख्य लहान-मोठे, सामान्य व असामान्य पुढारी–कार्यकर्ते स्वयंसेवक बुद्धीने पुढे आले. कॉंग्रेसचा हा इतिहास मोठा चित्तवेधक आहे. कॉंग्रेसला ब्रिटिश मित्रही लाभले. विराट भारतीय जनतेचे कोटकल्याण व्हावे, असा ह्या थोरा-मोठ्यांचा उद्देश होता. ए. ओ. ह्यूम, वेडर बर्न, जनरल बूथ व विशेषतः 'ॲनी बेझंट' वगैरेंचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. हा सर्व जो पाया उपलब्ध झाला, त्यावर पंडित नेहरूंच्या हस्ते शिखर चढविले गेले. नेहरू कळसाप्रमाणे शोभले व शोभतात. राष्ट्रीय सभेची पाचपन्नास वर्षांची संघर्षशील परंपरा जवाहरलाल यांना उपलब्ध होती हे तर खरेच; पण खुद्द त्यांचे वडील मोतीलाल नेहरू यांचे घरचे उदाहरण पं. जवाहरलाल यांच्यापुढे जागते व जवळचे होते.

कॉंग्रेसला; कॉंग्रेसपूर्व काळातही तिचा जन्म प्रत्यक्षाप्रत्यक्ष होण्यास ते कारणीभूत होणारी पार्श्वभूमी होती. बंगाल, मद्रास व मुंबई येथे इंडियन असोसिएशन्स् होत्या. राजा राममोहन राय, केशवचंद्र सेन यांनी परदेशात, स्वदेशात हिंदी जनतेच्या गाऱ्हाण्याना पहिले तोंड फोडले.जवाहरलाल यांनी स्वतःच "डिस्कव्हरी ऑफ इंडिया" या पुस्तकात ह्या आद्य राजकीय अवस्थेचे महत्त्व व वर्णन सांगितले आहे. राममोहन राय यांचे अनेक उदार दृष्टिकोन गांधी-नेहरूंमध्ये सापडतात. आधुनिक-अर्वाचीन इतिहासाला राममोहन पासून सुरुवात होते व मध्ययुगाचा शेवट होतो. नवयुग चालू होते.

### पं. मोतीलाल नेहरू

पारतंत्र्याच्या बेड्या काढून टाकणारी फार मोठी चळवळ झाली हे खरे. व ही पाहण्याचे भाग्यही प्रस्तुत लेखकाला मिळाले, म्हणून सांगता येते. वडिलांच्यापेक्षा थोर होण्याचे परमभाग्य जवाहरलाल यांनी मिळविले. परंतु जवाहिरलाल यांच्यात मोतीलाल होतेच. महापुरुष अभावानेच प्राप्त होतात. मोतीलाल व जवाहरलाल यांना वरील सर्व राष्ट्रीय जागृतीची तयार भूमी उपलब्ध होती. याचा

लाभ त्यांना व सर्वच थोर थोर पुढाऱ्यांना झाला; टिळक व गांधीनाही झाला. पंडित नेहरू यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात परकीयांच्या विरुद्ध तीव्र लढा म. गांधी यांच्या समवेत दिला. एवढेच नव्हे, तर भारत स्वतंत्र झाल्यावर स्वतंत्र भारताचे जवाहरलाल शिल्पकार देखील ठरले. नवी ध्येय-धोरणे त्यांनी नवभारताला दिली. या सर्व विजयाची पूर्वचिन्हे त्यांच्या कौटुंबिक इतिहसात शोधता येतात. निसर्ग सौंदर्य लाभलेल्या काश्मीरात जवाहरलाल जन्मले. त्यांच्यात जे काही सत्यम्, शिवम्, अमृतम्, होते. याचे श्रेय भौगोलिक परिस्थितीलाही द्यावे लागते. इतिहासाला भूगोलाचा पाया असतो. या घराण्याने पूर्वी काश्मीरात एक कालवा (मोठा पाट) काढला होता यावरून यांना नहर-नेहरू म्हणू लागले.

कौल नावाचे महाविद्वान पंडित घराणे मूळचे काश्मीरातले. सन १७१६ मध्ये फरुखसियर नामक दिल्लीचा बादशहा काश्मीरात गेला होता. कौल घराण्याची कीर्ती ऐकून त्याने त्यावेळच्या कौलांचा सत्कार केला. राजाश्रय देऊन दिल्लीला नेले ; व एका कालव्याजवळ जहागिरी दिली. (कालव्या काठचे) नहराकाठचे जहागीरदार असे त्यांना नाव प्राप्त झाले ; व पुढे फक्त या घराण्याला नेहरू म्हणू लागले. पुढे १८५७ मध्ये हे नेहरू अलाहाबादला राहाण्यास गेले. याप्रमाणे नेहरू घराणे प्रथमपासून श्रीमंतच होते. स्थलांतराने एकूण जीवनात परिवर्तन घडले. या प्रतिष्ठित घराण्यात जन्मलेले मोतीलाल उत्तम वकील म्हणून पुढे आले. कीर्ती-मान-संपत्ती व सर्व प्रकारची श्रीमंती याना प्राप्त झाली होती. स्वरुपाराणी म्हणून काश्मीरी रुपवान पत्नी मोतीलाल याना योगायोगाने प्राप्त झाली होती. या दांपत्यांच्या पोटी १८८९ सालात १४ नोव्हेंबर रोजी जवाहरलालजी जन्मले. १८८९ साल हे त्यांच्या जन्मशताब्दीचे साल होय. यांचे पिताजी मोतीलाल यांचे कपडे विलायतेहून भट्टी व इस्त्री करून येत असत, याच्याबद्दल मी विद्यार्थी असताना ऐकत होतो. श्रीमंत घराण्यात जन्मलेल्या मुलाचे नाव ओघाने जवाहरलाल ठेविले गेले. यांचे अत्युच्च शिक्षण विलायतेस झाले.

मोतीलाल व जवाहरलाल केवळ नावाने पंडित नव्हते, प्रयत्न करून ते विद्वान झाले होते. महात्मा गांधी यांच्या असहकारितेच्या उदयानंतर मोतीलाल व नंतर जवाहरलाल स्वराज्याच्या लढ्यातून पुढे आले. जवाहरलाल याना राजकारणाचे धडे घरीच मिळाले. मोतीलाल यांच्यावेळचे राजकारण सहकारिता का असहकारिता ? असे द्विविध राजकारण चालत असे. सहकारवादी व असहकारवादी यांच्यामध्ये संघर्ष चाले. १९२५ च्या काळात प्रतियोगी सहकार हा नवा पक्ष केळकर-केसरी यांचेद्वारे पुढे आला होता; मुंबई कौन्सिल तर प्रतियोगी सहकारवादी बनले होते. पं. मोतीलाल नेहरू यांनी १९२६ सालच्या जानेवारीत व्हाइसरॉयची भेट घेतली. हिंदी राजकारणाच्या दृष्टीने व्हाइसरॉयला फार मोठे प्रतिनिधित्व होते.ते चर्चा आणि कारवाई करीत असत.

परराष्ट्रीय प्रचार हा काँग्रेसचा एक विषय म्हणून पुढे येत होता. स्क्रीन कमेटीच्या संदर्भात मोतीलाल नेहरू १९२६ साली इंग्लंडला गेले. आंतरराष्ट्रीय राजकारणात पुढे जवाहरलाल यांनी असामान्य यश मिळविले. त्याचे प्राथमिक धडे त्यांना मोतीलाल यांच्याकडून मिळाले. आणि १९१६ पासून ते १९४८ पर्यंत गांधीजींच्या समवेत त्यानी भारताची सेवा केली. तो काळ पारतंत्र्याचा होता. राजकारणाला परकीय सरकारच्या कायद्यांच्या मर्यादा असत. कायद्याने कारवाई केली जाई. पण १९४७ साली दुसऱ्या महायुद्धानंतर देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यातही जवाहरलालजींनी देशाची सेवा केली. नेहरू घराण्याचा एकूण इतिहास फार मोठा व हृदयंगम आहे. तो पाहू या.

**घरचा व देशाचा प्रपंच**

अठराव्या शतकात, नेहरू कुटुंब हिंदुस्थानात उत्तरेत मोठमोठ्या सपाट्या आहेत, तिकडून काश्मीरातून खाली आले. मोतीलाल हे स्वत: वकील झाल्यानंतर अलाहाबादला स्थायिक झाले. पत्नी स्वरुपाराणी व पती मोतीलाल याना १४ नोव्हेंबर १८८९ साली पुत्ररत्न झाले; ते जवाहरलाल होत. यांचे बालपण श्रीमंतीत व ख्यालीखुशालीत गेले. पण पुढे म. गांधी यांचा सहवास प्राप्त झाल्यावर मोतीलाल व जवाहरलाल यानी देशासाठी फकिरी पत्करिली. देशातील प्रांतोप्रांतातील अनेक श्रीमंत व ऐषारामी कार्यकर्त्यांनी भारी कपडे परिधान करण्याचे सोडून देऊन, खादी व्रत घेतले. महाराष्ट्रात लो. टिळकानुयायी, विशेषत: शहरात, फार असत. त्यांच्यापैकी अनेक म. गांधींच्या निशाणाखाली गेले. इतरही प्रांतात गांधीवाद्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली. मोतीलाल सनदशीर राजकारणाच्या काळात प्रथम वावरले. पण उदारमतवादी असूनही गांधीवादी जहाल बनले. जवाहरलाल यांना एखाद्या इंग्रज मुलाप्रमाणे त्यानी पाश्चात्यधर्तीने वाढविले होते. इतर देशी भाषांच्या शाळेत न पाठविता जवाहरलाल यांना प्रथमपासून इंग्रजी शिकविण्यात आले. शिवाय विजयालक्ष्मी आणि कृष्णा अशा दोन बहिणी जवाहरलाल यांना होत्या. अलाहाबादचे त्यांचे **आनंद भुवन** राजवाड्यासारखे होते. या वाड्यात नेहरू वाढले. त्यांचे स्वदेशातील व परदेशातील शिक्षण घेत असताना एकूण जीवन आनंदाचे गेले.

सन १९१६ साली जवाहरलाल यांचे लग्न झाले तेव्हा त्या दिवशी **वसंतपंचमी** होती. या पतीपत्नीने देशासाठी फार सोसले, त्यांचा देश सदैव ऋणी राहिला आहे. याच साली जवाहरलाल व म. गांधी यांची लखनौ काँग्रेसमध्ये भेट झाली. साऊथ आफ्रिकेत म. गांधी यांनी अहिंसावादी असहकारितेचे प्रयोग केले होते. म्हणून त्यांची कीर्ती सर्वत्र झाली होती. या पद्धतीतून भारतास स्वराज्यप्राप्ती होईल अशी जवाहरलाल यांची मनोधारणा झाली व ह्या दिशेने ते पुढे वाटचाल करीत राहिले. इंग्रज सरकार म्हणत असे की, त्यांचे राज्य कायद्यावर अधिष्ठित आहे. हेच कायदे मोडण्याची चळवळ म. गांधी यांनी चालू केली. सन १९३० सालापासून गांधींच्या लढ्यांना सुरुवात पुढे उत्तरोत्तर झाली, हे खरे. या लढ्यातून पूर्वी प्रागतिक मताचे असलेले मोतीलाल यांनीही भाग घेतला. जवाहरलाल तर आघाडीवर राहिले. ' गांधी-नेहरू ' अशी परिभाषा पडली. स्वातंत्र्य मिळेपर्यंत तरी हा समास होता. कारण मतभेदाचे प्रसंग आले नाहीत. म. गांधी यांच्याकडे आकृष्ट होण्याचे पूर्वी आणखी एक कारण झाले. ते म्हणजे जालियनवाला बागेत झालेले हिंसक अत्याचार हे होय. मोतीलाल यांच्यावरही जालियनवाला येथील लाठीमार व हत्याकाण्ड यांचा फार मोठा परिणाम झाला. त्यांनी वकिली सोडली व खादी परिधान करू लागले.

भारताने १९१० सालच्या मोर्ले-मिंटो सुधारणा राबविल्या होत्या व सन १९१८/१९ च्या सुमारास ' मौंटफर्ड ' सुधारणा आल्या. स्वराज्याचे राजकीय हप्ते राबविण्याकडे पुष्कळांचा कल होता. पं. मोतीलाल प्रथम स्वराजिस्ट पक्षाचे असेंब्लीमधील नेते होते. वै. पटेल अध्यक्ष होते. काँग्रेसतर्फे राजकारण करता करता त्यांचा वकिली व्यवसायही चालू होता. नाभाच्या महाराजांचेही वकीलपत्रं त्यांनी घेतले होते. पुढे १९२७ साली सायमन कमिशन आले. जवाहरलालांच्या घरी असे राजकीय वातावरण होते.

**जवाहरलालजींचा राजकारणात प्रवेश**

१९१२ साली जवाहरलाल बॅरिस्टर होऊन तेथील सात वर्षांच्या अभ्यासानंतर मायदेशी आले होते. हॅरो येथील पब्लीक स्कूलमध्ये अवघ्या दहाव्या वर्षी जवाहरना, मोतीलाल व त्यांच्या

पत्नी स्वरुपाराणी यांनी १९०५ साली विलायतेत समक्ष जाऊन तेथे शिक्षणार्थ ठेविले. तेथे त्यांचे वाचन फार वाढले. रुसो-जपानी प्रश्न, गॅरीबाल्डीचे स्वातंत्र्य प्रेम, भारतातील जहाल-मवाळ प्रश्न वगैरे अनेक विषय तरुण जवाहरलाल यांनी पूर्ववयात आत्मसात केले. मोतीलाल मवाळ राजकारणाच्या काळातील होते. टिळकानंतर गांधींनी जहाल राजकारण वाढविले.

मोतीलाल यांच्याप्रमाणे जवाहरलाल कायदे निष्णात होते तरी त्यांचे लक्ष वकिलीकडे लागेना. अतिशय निष्णात युरोपियन शिक्षकांच्या हाताखाली त्यांना शिक्षण प्राप्त झाले होते. पहिल्या महायुद्धात ब्रिटिश सरकारास भारताने मोठी मदत केली. पण प्रेस ॲक्ट, व पुढे रौलट ॲक्ट नंतर जालियन बागेतील अत्याचार वगैरेंच्याद्वारे हिंदी प्रजेवर जुलूमच होत असे. स्वातंत्र्यवादी जवाहरलाल याना याची उत्तरोत्तर चीड येऊ लागली.मोतीलाल मवाळ होते, तरी त्याना इंग्रजांचे हिंदी लोकांशी वागणे ठीक वाटेनासे झाले व बापलेकानी म. गांधी यांच्या सत्याग्रही लढ्याचा मार्ग धरिला. देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे यासाठी जवाहरलाल यानी बलिदान केले पाहिजे, असे मवाळ मोतीलाल याना वाटू लागले. लोकमान्य १९१५ पर्यंत जवळ जवळ मवाळ होते पण नंतर उत्तरोत्तर जहाल झाले. याचप्रमाणे मोतीलाल हे सनदशीर व प्रागतिक मवाळ राजकारणाचा मार्ग सोडते झाले. यावेळी भारतीय कॉंग्रेसमध्ये टिळक व बेझंटबाई यांचा प्रभाव होता. याच काळात मोतीलाल व पुढे जवाहरलाल भारतीय राजकारणात उत्तरोत्तर चमकू लागले. व शेवटी तर राष्ट्रीय कॉंग्रेस गांधी-नेहरूंची झाली. या आधीची कॉंग्रेस व तिचे पुढारी कोण कोण होते, हे पाहाण्यासारखे आहे. सन १९१५ सालात विलायतेहून जवाहरलाल येथे भारतात येऊन वकिली करू लागले. त्यांची बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण झाली होती. तरी ते व त्यांचे वडील अनुक्रमे जवाहरलाल व पंडित मोतीलाल नेहरू म्हणूनच ओळखले जात. १९३५ नंतर राजकीय चळवळीला वेगळाच जोर आला. पण ह्या अगोदर निदान कॉंग्रेसचे अध्यक्ष कोणकोणते होते, हे जाणून घेणे राजकीय दृष्ट्या बोधपर ठरेल. कॉंग्रेसचा इतिहास लागू पुरता तरी पाहिला पाहिजे. एस. पी. सिंह (मुंबई १९१५), ना. अंबिकाचरण मुजुमदार (लखनौ १९१६), बेझंट (कलकत्ता १९१७), हसन इमाम (मुंबई १९१८), मदन मोहन मालवीय नंतर मोतीलाल नेहरू (दिल्ली १९१८), लाला लजपतराय (अमृतसर १९१९), सी. आर. दास (गया १९२२), पुढे मौलाना आझाद, मौलाना महंमद अल्ली अध्यक्ष होते. म. गांधी (बेळगाव १९२४), यावेळी जवाहरलाल कॉंग्रेसचे जोड सेक्रेटरी होते. पुढे १९२८ साली कलकत्त्याला पं. मोतीलाल नेहरू अध्यक्ष होते. त्यांचे सुपुत्र जवाहरलाल १९२९ साली लाहोरच्या कॉंग्रेस अधिवेशनचे अध्यक्ष झाले. याप्रमाणे १९२८ नंतर भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर जवाहरलाल चमकू लागले. १९२८ साली कलकत्ता येथे भरलेल्या अधिवेशनात जवाहरलाल संयुक्त चिटणीस म्हणून होते. पितापुत्रानी याप्रमाणे कॉंग्रेसची वरिष्ठ स्थाने पत्करून देशाची सेवा करण्याचे कंकण बांधिले. सरोजिनी नायडू देखील याच काळात व पुढेही प्रसिद्ध होत्या. म. गांधी यांचे नेतृत्व लाभल्यानंतर प्रांतोप्रांती भारतातून नवे देशभक्त, नवे त्यागी व सत्याग्रही नेते निर्माण झाले. ब्रिटिश साम्राज्यकाळात कॉंग्रेस स्वातंत्र्यासाठी इंग्रजाबरोबर संघर्ष करीत होती. वरील १९१५ पासून ते पुढे स्वातंत्र्य येईपर्यंत विद्वान-विचारवंत आणि क्रियावंत देशभक्त, कार्यकर्ते, पुढारी यांची मालिका कॉंग्रेसच्या मौलिक इतिहासातून लागून राहिलेली दिसली. मोतीलाल तर लाहोर कॉंग्रेसचे १९०९ साली अध्यक्ष झाले होते. सन १८८५ ते १९१४ हा एक कालखंड पहिला; म्हणून राष्ट्रीय सभेच्या इतिहासात प्रमुख मानावा लागतो.

सनदशीर व प्रागतिक राजकारणाचा हा प्रथमचा टप्पा ठरतो. नेमस्तांच्या देशसेवेचे स्मरण आज नाही. पण ते त्यागी नेते विद्वान होते. कित्येक तर धर्म व समाजसुधारक होते. उदा. सर चंदावरकर व आनंदमोहन घोष हे विद्वान पुढारी धर्मसुधारक व राष्ट्रीय चळवळीच्या त्यावेळच्या प्रवाहात प्रामुख्याने भाग घेणारे होते. मोतीलाल व जवाहरलाल हे दोन " लाल " देशाच्या भाग्येकरून पुढे प्राप्त झाले. पण १८८५ ते १९१५ पर्यंत कॉंग्रेसचा पाया ज्या नेमस्तानी भरला, ते प्रागतिक परंतु ' मवाळ ' म्हणून हेटाळले गेलेले महत्त्वाचे व पायाभूत होते. हा कालखंड आज फार उपेक्षित आहे.

सन १९२२ पासून बाबू राजेंद्रप्रसाद, वल्लभभाई पटेल, अन्सारी, सुभाषबाबू वगैरे एका चढीत एकांची एकसारखी अतूट मालिका लागून राहिली. एवढे त्यागी विचारवंत आणि आचारवंत सुपुत्र देशात आज स्वातंत्र्यात असते, तर भारताचे सोने झाले असते. या आणखी अनेक प्रसिद्ध अप्रसिद्ध लहान थोर खऱ्या स्वातंत्र्य सैनिक देशभक्तांचे वर्तुळात मोतीलाल व नंतर जवाहरलाल यांना कार्य करण्याचे परमभाग्य लाभले. स्वातंत्र्य येईपर्यंत सर्वथा मंतरलेले दिवस होते. जास्तीत जास्त लोक देशभक्तीने व स्वातंत्र्याच्या प्रेमाने झपाटले गेले होते. मोतीलाल यांचे चिरंजीव जवाहरलाल हे यात अग्रेसर होते. उंचपुरे, देखणे, आणि जाकीट व नेहरू शर्ट परिधान केलेला हा महापुरुष ज्यांनी पाहिला, ते भाग्यवानच मानावे लागतात. यांच्यामुळे कायदेभंगाची चळवळ वाढतच गेली. १९३० नंतर या देशातील विविध प्रागतिक पक्ष व त्यांचे मवाळ राजकारण मावळत गेले. जवाहरलाल यांना पूर्वीच १९२१ साली पहिला तुरुंगवास प्राप्त झाला होता. १९२३ सालात पुढे ते भारतीय राष्ट्रीय सभेचे जनरल सेक्रेटरी झाले. सन १९२७ सालात राष्ट्रीय सभेने त्याना अंकीत राष्ट्रांची परिषद (कॉंग्रेस ऑफ ऑप्रेस्ड् नॅशनॅलिटीज्) ब्रुसेल्स येथे भरली होती; त्या परिषदेला प्रतिनिधी म्हणून पाठविले. येताना युरोप आणि रशिया याना भेट देऊन जवाहरलाल परत आले. ' **सोशॅलिझम्** ' चा नवा विचार घेऊन नेहरू जवाहरलाल मायदेशी आले. स्वातंत्र्यापलीकडे ते पाहू लागले. याच समयाला मद्रास येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन झाले व त्यात सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. तरी देशात सायमन कमिशनचे स्वागत करून त्यांच्यापुढे त्यांच्या मागण्या मागण्यासाठी कैफियती सादर करीत कित्येक पक्ष होते. त्यात जातीधर्माधिष्ठित पक्ष देखील होते. ते सहकारवादी असत.

सायमन कमिशन १९२८ साली देशात आले. पण जवाहरलाल यांनी ' गो बॅक सायमन ' असा आवाज उठविला. लखनौ येथील याच काळातील सभेत खुद्द जवाहरलाल यांना पोलिसाकडून मारहाण झाली, ती त्यांनी सोसली. डरले नाहीत. स्वराज्यविषयक लढा पुढे चालला, १९२९ साली तर लाहोर येथे झालेल्या राष्ट्रीय सभेचे जवाहरलाल अध्यक्ष झाले. रावी नदीच्या काठी भरलेल्या वरील ऐतिहासिक अधिवेशनात पूर्ण स्वातंत्र्याचा क्रांतिकारक ठराव पास करण्यात आला. जवाहरलाल यांना लोक देशाचे रत्न समजू लागले, मोतीलाल यांनी तर याच वेळी " **आनंदभुवन** " हा त्यांचा प्रासाद देशाला देऊन टाकला ; आणि शेजारीच लहान घरात राहू लागले. असा त्यावेळच्या पुढाऱ्यांचा देशाप्रित्यर्थ चालू असलेला त्याग व देशाभिमान अभ्यासल्यावर आज आश्चर्य वाटते ; व भ्रष्टाचाराचा उलटा आलेला काळ पाहून त्यावेळची हयात मंडळी दुःखी झाल्याशिवाय राहात नाहीत. केवढे दुःख वाटते, कल्पना करा.

गांधीजींनी मिठावरील कर रद्द करण्यासाठी साबरमती जवळ असलेल्या 'दांडी' गावी मोर्चा नेला व सत्याग्रह केला. असे त्यावेळचे देशातील दिवस मंतरलेले होते. जवाहरलाल यांनी अलाहाबाद येथे मिठासंबंधीच्या कायद्याचा भंग केला, म्हणून त्यांना अटक झाली; व त्यांना नैनी तुरुंगात ठेविले. गांधीजींना अटक झाली; मोतीलाल यांनीही मिठाचा सत्याग्रह केला. जवाहरलाल यांनी मिठाच्या सत्याग्रहात भाग घेऊन तुरुंगवास अगोदरच पत्करला, याबद्दल मोतीलाल यांना आनंदच झाला. मिठाचा सत्याग्रह सामान्य जनतेची मने काबीज करता झाला. काँग्रेसची लोकमान्यता वाढली; व गांधी व नेहरू यांचे नेतृत्व १९३० नंतर उत्तरोत्तर पुढे येत गेले.

काँगेस पक्ष खेड्यापाड्यापर्यंत लोकप्रिय होत होता. या लोकप्रियतेमुळे व हिंदी जनतेची मने जाणून भारताला मर्यादित का होईना; स्वराज्याचे आणखी हक्क देण्याच्या विचारार्थ १९३१ साली सर्वपक्षीय गोलमेज परिषद लंडन येथे भरविण्यात आली. गांधी दुसऱ्या अधिवेशनाला उपस्थित राहिले. पण ही योजना फलद्रुप झाली नाही. इंग्रजांचे धरपकडीचे सत्र चालूच होते. डिसेंबर २६ सन १९३१ रोजी पंडित जवाहरलाल यांना सहाव्यांदा तुरुंगात घातले गेले. गांधीना ४ जानेवारी १९३२ ला तुरुंगात घातले. ह्या प्रकारे भारतीय जनतेचा असंतोष १९३० नंतर वाढतच गेला. १९३२ साली इंग्रज सरकारने काँग्रेसला बेकायदा ठरविले ! नेहरूंचा इतिहास-नेहरू चरित्रे म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याचा प्रमुख भाग ठरतो. १९३२ साली तर ऐंशी हजार माणसे (स्त्री पुरुष) तुरुंगात घातले होते. नेहरूंच्या दोन्ही बहिणींनीही स्वातंत्र्यार्थ तुरुंगवास पत्करला होता. इंग्रज म्हणत असे की– त्यांचे राज्य कायद्याचे होते. कायद्यावर अधिष्ठित होते. पण सविनय-शांततापूर्ण कायदेभंगाच्या पद्धतीमुळे इंग्रजांच्या कायद्यावरच घाला आला. इंग्रजांच्या मर्मस्थानावर अपूर्वपणे चाल केली गेली. हिंदी देशभक्त जनतेने आणि नेहरू-घराण्याने अपूर्व त्याग केला. अलाहाबाद येथे निघालेल्या काँग्रेसच्या एका मिरवणुकीत सामील झाल्यामुळे पंडित जवाहरलाल यांची मातोश्री स्वरुपाराणी यांनाही पोलिसांनी मारहाण केली; व रक्तबंबाळ होऊन त्या रस्त्याच्या कडेस पडल्या. सर्वच नेहरू घराण्याने स्वातंत्र्यासाठी गांधींच्या लढ्यात झोकून घेतले. प्राणाची पर्वा केली नाही. गांधी व नेहरू असा 'समास' झाला. सगळ्या देशातील वातावरण 'न भूतो न भविष्यति' असे भारावून गेले होते. मवाळ जे होते ते जहाल होत होते. लो. टिळकांचे भक्त गांधी-नेहरूंचे भक्त होत होते. फार काय जेधे-मोरे-जवळकर-बागडे वगैरे ब्राह्मणेतर पूर्वी महाराष्ट्रात मवाळ होते. महर्षि शिंदे पूर्वीपासून एकाकीपणाने काँग्रेसमध्ये होते, ते प्रथम गांधी यांनी चालू केलेल्या लढ्यात उतरले व स्वतः वृद्धपणी तुरुंगात गेले. त्यांचे उदाहरण सर्व महाराष्ट्रातील बहुजन समाजाने अनुसरले. भारतीय स्तरावरून काम करणारा मवाळ शहरी सुशिक्षितांचा प्रागतिक पक्ष निस्तेज होत गेला. फक्त 'सप्रू-जयकर' ही विद्वान जोडी राहिली. हा जो सर्वांगीण बदल होत होता तो १९३० नंतर भूमितीश्रेणीने वाढू लागला. मी विद्यार्थी दशेत हायस्कूलात शिकत होतो. गांधी लढे–नेहरू गांधींची व्याख्याने ऐकावयास मिळाली. विद्यार्थी देखील असंख्यपणे चळवळीत उतरले. ग्रामीण व शहरी स्त्रियांनी महत्त्वाचा भाग घेतला. मुस्लीम देश बांधव व दलित वर्ग स्वातंत्र्य लढ्यात भाग घेता झाला. हे सर्व त्याकाळी पाहता व वाचता आले. रोजच्या वृत्तपत्रांना जीवनात स्थान प्राप्त होऊ लागले. स्वातंत्र्याच्या आगमनापूर्वीचा काळ आज मोठा कुतूहलजनक वाटतो. जवाहरलाल हे अग्रेसर स्वातंत्र्यसैनिक होते. एवढेच नव्हे तर नेते होते. म. गांधीनाही स्वातंत्र्य लढा पुढे नेता आला; याचे कारण म. गांधीना नेहरू कुटुंबाचा एकूण पाठिंबा हे एक होय.

### जवाहरलाल लोकमान्यतेच्या लाटेवर (आठवणी)

The congress had last touch with masses and he thought taking part in the election would be way of reaching the masses. Hence during 1936-37, he toured the length and breadth of India ; spoke to millions of people. He was begining to understand the masses and their many sided culture.

—Light of Asia.

कौन्सिलवरील बहिष्कार मी मी म्हणणाऱ्या पुढाऱ्यांना झेपेना. शेवटी काँग्रेसने निवडणुकीत भाग घेण्याचे ठरविले. अनुयायांची मते व मगदूर ही देखील मानावी लागतात. नेहरूनी ती मानले. १९३५ चा राजकीय सुधारणांचा हप्ता आला होता. नव्या निवडणुका होणार होत्या. म्हणून त्याच्या प्रचारार्थ जवाहरलाल यांनी अगोदर देशभर दौरा केला. पुण्याला देखील व्याख्यान झाले. यावेळी मी पुण्यात आलो. नव्या पुलाच्या पश्चिमेस असलेल्या मोठ्या मैदानात विराट सभा झाली. सर्व पुणे शहर लोटले. नेहरूंच्या भाषणाला चिक्कार गर्दी होई. उंच व्यासपीठ केले जाई. नेहरू लाँग कोट घालीत. पुढे नेहरू सदरा व जाकीट अनुकरणीय ठरले. नेहरू उंचपुरे देखणे-गोरे गृहस्थ होते. हात जोडून श्रोत्यांना विनम्र- भावाने नमस्कार करीत. हिंदीत बोलत. शनिवारवाड्यापुढेही स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांची व्याख्याने झाली. शेवटी व्याख्यान संपविताना जयहिंद म्हणत. नम्रता, सोपे हिंदी, निश्चित विचार, व ओघवते वक्तृत्व ज्यांनी अनेकानी ऐकले ते भाग्यवानच म्हणावे लागतात. नेहरू सदरा-नेहरू जाकीट प्रसिद्ध आहे. पुष्कळानी याचे अनुकरण केले. पंडित नेहरू गांधी टोपी धारण करीत. तसे ते शरीराने जाडजूड नसत. मर्यादित बांधा असलेले आकर्षक असे लोभस नेतृत्व होते. असंख्यांची मने जिंकली गेली.

### कमला नेहरू

विद्याभ्यास करून नेहरू १९१२ साली भारतात परत आले. अलाहाबाद हायकोर्टात त्यांनी वकिलीचा व्यवसाय चालू केला. वकीलीत त्यांना रस नव्हता. ते राजकारणाकडे वळले. १९१२ डिसेंबर मध्ये जे बांकीपूर येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन झाले, त्याला ते उपस्थित राहिले. प्रेक्षक संख्या ४५,००० होती. के. आर. एन. मुधोळकर अध्यक्ष होते. पुढे १९१६ साली कमला नेहरू ह्यांच्याशी त्यांचे लग्न झाले. जवाहरलाल यांचे सार्वजनिक आयुष्यही चालू झाले होते. कमला नेहरू यांची त्यांना सल्ला मसलत मिळे. प्रिय पत्नी कमला यांनी देशासाठी जवाहरलाल यांच्याबरोबर खूप सोसले. पण शेवटची कित्येक वर्षे कमला नेहरू ह्या क्षयाने आजारी असत. देशात व परदेशात त्यांच्यावर खूप औषधोपचार करण्यात आले. शेवटी शेवटी त्यांना पांचगणी येथे सॅनिटोरीयम् मध्ये ठेविण्यात आले. नेहरू त्यांना भेटावयास जात. जाताजाता त्यांनी एक व्याख्यान वाई येथील मामलेदार कचेरीच्या मागील पटांगणात दिले. मी एक श्रोता होतो. हिंदीत दिलेल्या व्याख्यानात काय सांगितले ते आता आठवत नाही. पण ऐनवेळी ठरलेल्या या सकाळी १० च्या सुमारास झालेल्या व्याख्यानास गर्दी होती.

पांचगणी येथे ठेवूनही कमला नेहरू यांना गुण आला नाही. शेवटी त्यांचा अंत क्षयाने झाला. आजची क्षयावरील गुणकारी औषधे त्याकाळी नव्हती. कमला नेहरू एक रत्न होते. सर्वच नेहरू कुटुंब फार महत्त्वाचे ठरले.



एन ४३१४-३

## प्रतापगडावर नेहरू

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या लढ्याच्या काळात श्री शिवाजी छत्रपती महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे उद्‌घाटन दि. ३० नोव्हेंबर १९५८ रोजी पंडित नेहरू यांच्या शुभ हस्ते करण्याचे यशवंतराव चव्हाणांनी नक्की केले होते. पूर्वी शिवाजी अफझुलखान भेटीच्या अगोदर वाई (जि. सातारा) येथे सैन्याचे मोठे तळ पडले होते. तसाच काही वेगळ्या अर्थाचा प्रकार पांचगणी घाटाकडे जाणाऱ्या पसरणीच्या घाटाच्या खाली झाला होता. सं. म. समितीमधील सर्व घटकपक्ष आदले दिवसापासून घाटाच्या पायथ्याशी तळ देऊन राहिले होते. पंडित नेहरू पुणे-वाई मार्गे प्रतापगडावर चालले होते. मोटारीत कै. यशवंतराव व जवाहरलाल मागे बसले होते. घाटाकडे जाणाऱ्या वाई-पांचगणी-महाबळेश्वर रस्त्यावर वाईपासून पश्चिमेकडे समितीची बाजू घेणारे उभे राहिले होते. पूर्व बाजूस यशवंतराव यांच्या बाजूची मंडळी उभी राहिली होती. या दोन्ही रांगातून 'नेहरू-चव्हाण' यांची मोटार प्रतापगडाकडे पोचविण्यासाठी सकाळी रवाना होत होती. 'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' अशा घोषणा चालू होत्या. समितीचे लोक गडावर गेले नाहीत.पण शांतता राखण्यात वाई मुक्कामी उभय पक्षांना यश आले. अगोदर तर्कतीर्थ जोशी वाई पोष्टाच्या पुढे कै. एस. एम. जोशी यांना पळत पळत जाऊन भेटले. हे मी पाहिले. मी समितीच्या रांगेत उभा राहिलो होतो. नेहरू-चव्हाण यांची मोटार जात असताना ती शांतपणे गेली. समितीच्या घोषणा होतच होत्या. नेहरू हे सर्व ऐकत व पहात होते. तर्कतीर्थांची लगबग अजून आठवते !

गडावर उत्तम व्यवस्था व बंदोबस्त होता. आसमंतात असंख्य माणसांनी गच्च भरून गेले होते. सनई चौघडा वाजत होता. नेहरू शिवपुतळ्यापुढे नतमस्तक झाले. ते भारावून गेले. यशवंतराव चतुर मुत्सद्दी होते. राजर्षि शाहू महाराज यांनी स्थापन केलेल्या मौनी महाराज पिठावरील क्षात्रजगत्‌गुरू यांची स्वारी उपस्थित होती. जवाहरलाल यांना फेटा परिधान करिता येत नव्हता. क्षात्रजगत्‌गुरू श्री. बेनाडीकर पाटील यांनी त्यांच्या डोक्यावर स्वतःचा त्याचा फेटा ठेविला. व नेहरू यांचे महाराष्ट्रीकरण केले. नेहरू एकूण वातावरणामुळे व जमलेल्या विराट जनसमुदायाच्या उपस्थितीमुळे भारावून गेले. पूर्वी त्यांनी शिवरायावर इंग्रजीत काही विधाने केली होती. पण पुढे मला तुरुंगात साधने प्राप्त व्हावयास पाहिजे होती तितकी प्राप्त झाली नव्हती, असाही खुलासा केला होता. पण शिवरायाबद्दल जो नितांत आदर त्यांच्याकडून दाखविला गेला त्यामुळे मागील सर्व विसरले गेले. शिवराय म्हणजे सर्वांगिण स्वातंत्र्य. यशवंतरावांचे मुत्सद्दीपण देखील निदर्शनास आले. ना. यशवंतराव यांची थोरवी पंडित नेहरूंना समजून आली. पुढे त्यांना त्यांनी संरक्षण मंत्री केले; याचे एक 'बीज' चव्हाणांच्या पराक्रमात दिसू शकले. 'महाराष्ट्रापेक्षा नेहरू श्रेष्ठ' असा चव्हाणांचा पवित्रा होता. फलटणचे राजे कै. मालोजीराव निंबाळकर मंत्री होते. तर्कतीर्थ व चव्हाण द्वैभाषिकवादी होते. पण सर्वच पुढे महाराष्ट्रवादी झाले.

## प्रतापगडावरून परत

शिवाजी पुतळ्याचे अनावरण करून नेहरू-चव्हाण, गडावरून महाबळेश्वर-पांचगणीमार्गे वाईहून पुण्याकडे मोटारीतून रवाना होताना उभयताना पाहाता आले. वाईजवळ पसरणी घाटाच्या पायथ्यालगत संयुक्त महाराष्ट्र समितीचा फार मोठा तळ पडला होता. डांगे-अत्रे-एस.एम. वगैरे बहुतेक सर्व उपस्थित होते. थंडी होती तरी स्त्री-पुरुष-मुले वगैरे सर्व सोय-गैरसोय सोशित

होते. वाई भागात माजी आमदार दादासाहेब जगताप केंजळकर हे समितीचे एक प्रसिद्ध नेते होते. त्यांनी चोख व्यवस्था ठेविली होती. वाईच्या सर्वच क्षेत्रस्थानी समितीच्या तळाची चांगली व्यवस्था ठेविली होती. निदर्शने शांततेने पार पडली. समितीचे लोक व पुढारी प्रतापगडावर गेले नव्हते. शिवाजी-अफजुलखान भेटीच्या वेळी वाईस असेच मागे महत्त्व आले होते. मने भयभीत होती.

मुंबईहून कम्युनिस्ट कार्यकर्ते व बरेच तरुण आले होते. विशेषतः या तरुणमंडळींनी नेहरू-चव्हाण यांची मोटार परत जात असताना वाई -सातारा रस्त्यालगत उभे राहून बऱ्याच घोषणा दिल्या. पण मोटारी पुढे निघून गेल्या ! दोन एक फर्लांगपर्यंत घोषणा होऊ शकल्या. नेहरू परत गेल्यावर वाई येथे पडलेला तळ ओसरत गेला.

नेहरूंना संयुक्त महाराष्ट्राची ताकद समजली. विरोध जाणवला. द्विभाषिक अशक्त ठरत गेले व संपुष्टात आले. महाराष्ट्र देशापेक्षा नेहरू थोर ही चव्हाणांची भूमिका होती. सातारा जिल्ह्यात प्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक कै. किसनवीर व तर्कतीर्थ हे मुख्यतः द्विभाषिकांचे सहाय्यक व प्रवक्ते होते. त्यांचा नामदार चव्हाणांना पाठिंबा होता. संयुक्त महाराष्ट्राच्या सुरुवातीस बाळासाहेब देसाई वगैरेंनी कौन्सिलचे राजीनामे दिले होते. हे सर्व परत घ्यावेत असा तर्कतीर्थांचा सल्ला होता. प्रथम द्विभाषिकांचे प्रमुख मंत्री मोरारजी होते. लढा पेटतच गेला. अखेर महाराष्ट्र देण्याचे नेहरू व दिल्ली सरकारने मान्य केले. नेहरूंच्या समजुतदारपणाला व शहाण्या दृष्टीला श्रेय आहे. संयुक्त महाराष्ट्र समितीला पर्यायाने यश मिळाले. तिचा इतिहास मोठा घडला. आज महाराष्ट्र हा एक प्रगत प्रांत आहे. प्रतापगडावर नेहरूंना आणून त्याना द्विभाषिक महाराष्ट्राला मंजूर नाही असे समक्ष दाखविण्यात आले. त्याचाही परिणाम नेहरूंवर झाला. महाराष्ट्र १९६० साली याप्रकारे मिळाल्यावर काँग्रेस पुन्हा सावरली गेली ; व संयुक्त महाराष्ट्र समितीचे काम संपले.

भक्कम संरक्षण मंत्री असावा म्हणून चव्हाणाना दिल्ली येथे त्यानीच नेले व दिल्ली हे पुढे पंचवीस-सव्वीस वर्षे चव्हाणांचे कार्यस्थान झाले म्हणजे चव्हाण दिल्लीकर झाले. ' नेहरू-चव्हाण ' सहकार्य महत्त्वाचे ठरते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात काँग्रेसचे सोनपत-पानिपत झाले. हे नेहरूंना समजले. प्रत्यक्ष पाहिले. महाराष्ट्रापेक्षा नेहरू श्रेष्ठ याचा अर्थ भारत श्रेष्ठ होय. नेहरू म्हणजे भारत असा अर्थ होता व असू शकतो.

नेहरू उमदे राजकारणी गृहस्थ होते. कॉ. रॉय यांच्याशी त्यांचे मतभेद झाले होते. तरी रॉय साहेबांवर त्यानी शेवटी मैत्रीच्या प्रेमाचा बंदोबस्त केला. तर्कतीर्थांची भूमिका मध्यस्थाची ठरते. रॅडिकल पार्टीच्या काळात नेहरूंबरोबर कॉ. रॉय यांच्याप्रमाणे पं. लक्ष्मणशास्त्री यांचेही मतभेद होते. पण हे सर्व सर्व विसरले. महाराष्ट्राचा प्रश्न सुटला. मराठीचे राज्य झाले.

इंदिरा गांधी यांचे महाराष्ट्रावर प्रेम होते. त्यांचे शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसनमध्ये झाले. त्यामुळे पुणे व महाराष्ट्र या संबंधाने त्याना जिव्हाळा अर्थात होता.

नेहरू-चव्हाण, एस. एम. वगैरे तत्सम विवेकशील नेते उपलब्ध होते, नाहीतर पंजाबसारखे हिंसक वळण महाराष्ट्र निर्मितीच्या प्रश्नास लागले असते. अत्यंत अल्प हिंसा झाली. अत्रे यांचा ' मराठा ' लेखणीने लढला.

नेहरू तसे रागीट देखील होते. म. गांधी; प्रत्यक्ष राष्ट्रपिता देशाला अकाली सोडून गेला. नेहरू अत्यंत दुःखी झाले. त्यावेळी त्यांनी आकाशवाणीवरून व्याख्यान केले. ज्या प्रवृत्तीने म. गांधी यांचा प्राण घेतला त्या प्रवृत्तीची पाळे-मुळे खणून काढा. "Root and Branch" नाहिशी करा असे राष्ट्राला उद्देशून नेहरू बोलले. स्थितप्रज्ञ मनुष्य असला तरी तोही विचलित होतो. पुढाऱ्यांची जहाल भाषणे देखील फार मोठ्या गंभीर प्रतिक्रियेला कारणीभूत होतात. असा अनुभव १९४८ साली आला.

काही आठवणींच्या स्वरूपात पंडितजीना पाहिल्यानंतर त्यांच्या काळाकडे व कार्याकडे पुनः जाऊ या.

## सन १९३२ नंतरचे राजकारण

१९३२ ते १९३५ अखेरपर्यंत नेहरूना तुरुंगाच्या बाहेरचे सार्वजनिक जीवन प्राप्त झाले. ते जीवन अवघ्या नऊ महिन्यांचे होते ! एकाच वेळी त्यांना एका ठिकाणच्या तुरुंगात ठेविले जात नव्हते, तर ठिकठिकाणी हलवले जात होते. ब्रिटिश राज्यकर्ते धूर्त होते. त्यांना यामुळे तुरुंगात एकाकी वाटे. घरी त्यांच्या प्रिय पत्नी कमला नेहरू या क्षयाने उत्तरोत्तर जास्तीच पछाडल्या गेल्या. काळजीचे दिवस होते. जवाहरलाल यांच्या वृद्ध आई देखील आजारी असत. या सर्वांचे दडपण जवाहरलाल यांच्या मनावर होते. याच काळात जगाच्या इतिहासावर एक व आत्मचरित्रपर त्यानी दोन महत्त्वाची पुस्तके (ग्रंथ) त्यानी लिहून पुरे केले. ही त्यांची दोन महत्त्वाची पुस्तके मानिली जातात.

औषधोपचारार्थ सौ. कमला नेहरूना जर्मनीमध्ये नेले होते. उपयोग झाला नाही. सौ. कमला नेहरू २८ फेब्रुवारी १९३६ रोजी निधन पावल्या. पंडितजींची आई दोन वर्षांनी वारली. ह्या प्रकारे त्यांचा पेला त्या काळात घरच्या दुःखाने भरलेला होता.

हा लेख म्हणजे सर्वसामान्य वाचकासाठी एक आढावा आहे. त्यांनी तरी राष्ट्रसेवा चालूच ठेविली. १९३६ साली ते लखनौ कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. कॉंग्रेसला समाजवादी बनविण्याचे त्यांचे ध्येय होते.तसा फार प्रयत्न त्यांनी केला. रशियाशी मागे पुढे त्यांचा फार संबंध आला. नेहरू आंतरराष्ट्रीय राजकारणात दर्दी होते. अनेक देशांना पुढे देश स्वतंत्र झाल्यावर त्यांनी भेटी दिल्या. व स्वदेशाला परदेशी पाहुण्यांच्या भेटीगाठी घडवून आणल्या. अहिंसेने प्रश्न सुटावेत असे त्यांचे मत होते. नेहरू कॉम्रेड म्हणजे प्रत्यक्ष मार्क्सवादी नव्हते. तरी लोकशाही समाजवादी होते. गोरगरीब पुढे येण्यासाठी या देशात समाजवादी लोकशाहीची त्यांना फार गरज भासली. म. गांधींचा त्याना फार जवळून सहवास लाभला. गांधी अध्यात्मवादी म्हणजे प्रार्थनावादी होते. त्यांच्या प्रार्थना उपनिषदे व साधुसंतांची वचने यांच्या पार्श्वभूमीवर चालत. गांधी प्रवचने करीत. पंडित जवाहरलालनी ही कित्येक प्रवचने ऐकिली होती. जवाहरलाल धर्मनिरपेक्ष असत. ' अध्यात्म ' हा त्यांचा विषय झाला नाही. पण ते सहिष्णु व उदार स्वभावाचे होते. जवाहरलालजींच्या आयुष्यात विविध असा काळ आला व गेला.

## दुसरे महायुद्ध

तुरुंगात वर्षानुवर्षे राहणे हे पुष्कळ कॉंग्रेसवाल्यांना झेपेनासे झाले. १९३५ च्या कायद्याने जे नवे हक्क प्राप्त झाले व पुढे निवडणुका झाल्या, त्यात कॉंग्रेसने भाग घेतला. जवाहरलालजींचा दौरा मोठा फलद्रुप झाला. कॉंग्रेसने निवडणूक जिंकली व ती सत्तेवर आली. १९३५ च्या

उन्हाळ्यात सिंहगडावर डॉ आंबेडकर शारीरिक विश्रांतीसाठी येऊन राहिले होते. त्यावेळी त्याना भेटण्याचा असामान्य योग आला. खाली जेधे-गाडगीळांची निवडणुकीची धामधूम चालली होती. निवडणूक संबंधाने डॉ. आंबेडकर यांनी विचारणा केली. जेधे निवडून येतीलच असे काही बाबासाहेबांना वाटत नसावे. त्यांच्या बोलण्यावरून समजले पण पंडित नेहरूंचा दौरा व प्रचार यामुळे सनसनाटी वेग आला. व गाडगिळांसहित जेधे प्रचंड मतानी निवडून आले. याकाळी काँग्रेसने ज्या निवडणुका जिंकल्या, त्याचे श्रेय जवाहरलाल यांच्या देशव्यापी दौऱ्याला द्यावे लागते. 'गांधी व नेहरू' यांच्याकडे पाहून मते काँग्रेसला देशभर मिळत. असंख्य अनुयायी तिला प्राप्त झाले. अनुयायी व नेते यांत अंतर पडते!

नेहरू व सुभाष बोस यांच्यामताने काँग्रेसने अधिकारपदे घेऊ नयेत असे होते. परंतु सहा प्रांतात काँग्रेसची मंत्रीमंडळे बनली; व बहुमत प्राप्त झाले. अधिकारग्रहणाच्या बाजूने नेहरू व सुभाष यांचे अनुयायानी कौल दिला, असे चित्र प्रत्यक्ष ते व्यावहारिक राजकारणात दिसले. ज्या प्रांतात काँग्रेस अल्पमतात होती, तेथे जिना यांच्या मुस्लीम लीगशी काँग्रेसने हातमिळवणी केली नाही. यामुळे जिना यांचा गैरसमज वाढला व त्यांना वाटले की, काँग्रेस ही प्रत्यक्षात फक्त हिंदूंचीच आहे. ती मुस्लीमांचे कधीच प्रतिनिधीत्व करणार नाही. हा विचार जिनाना प्राप्त झाला व पुढे १९४७ मध्ये देश स्वतंत्र होताना 'पाकिस्तान' वेगळे झाले. देशाची दुर्दैवी फाळणी झाली. फाळणीला ह्याप्रकारे वरील उभय पक्ष कारणीभूत झाले. मुस्लीम राष्ट्र स्वतंत्र बनल्यामुळे स्वातंत्र्य काळात हिंदुत्ववाद एक प्रतिक्रिया म्हणून धर्मभावनेवर उत्तरोत्तर पुढे येत आहे.

## युरोपमधील अशांतता

भारतात 'गांधी-नेहरू' यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यार्थ लढे चालले असताना युरोपमध्ये सर्व काही ठीक नव्हते. जर्मनीचा हिटलर व इटलीचा मुसोलीनी हे दोन हुकूमशहा मोठे प्रभावी बनत होते. आजुबाजूच्या राष्ट्रांना आपल्यावर स्वारी होईल किंवा काय अशी भिती निर्माण झाली. स्पेनमध्ये यादवी चालू झाली होती. ह्या सर्वांचा परिणाम म्हणून दुसरे महायुद्ध जाहीर झाले. जवाहरलाल नेहरू यांच्या मते भारताने युरोपकडे जर्मनीबरोबर होणाऱ्या युद्धाला भारताने मदत करावी. काँग्रेस वर्कींग कमेटीने जवाहरलाल यांच्या धोरणाला पाठिंबा दिला. त्यावेळच्या भारताच्या व्हाईसरॉय यांच्या मताप्रमाणे महायुद्ध काळ हा भारताला स्वातंत्र्य मागण्याच्या दृष्टीने योग्य नाही. 'हिंदु-मुसलमान' यांच्यामधील जातीय तणावदेखील आडवा येई. जिना यांनी काँग्रेसविरोधी पवित्रा घेतला. मुस्लीम संस्थानिक व मुस्लीम लोकसंख्येत जास्त असलेले प्रांत जिना यांच्या नेतृत्वाखाली गेले. ज्या ज्या प्रांतात काँग्रेसने सत्ता मिळवली होती ती सोडण्याचा निर्णय घेतला. मुस्लीम नेते म्हणू लागले की-भारतात हिंदु व मुस्लीम अशी दोन राष्ट्रे आहेत. म्हणून देशाची फाळणी झाली पाहिजे. ज्यांनी काँग्रेस स्थापन केली; त्या विद्वान व समंजस लोकांनी काँग्रेसमध्ये सर्वधर्म व सर्वजाती यांना सामावून घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला. पण प्रत्यक्ष वरील धर्मभेद हे ऐतिहासिकपणे चालत आल्यामुळे मुस्लीमबंधू फुटून निघाले.

पंडित जवाहरलाल यांच्या जीवन कार्याचा ओझरता व धावता आढावा वाचकापुढे ठेवताना भारताचा १९३० पासूनचा इतिहास नेहरू यांच्याशी निगडीत आहे, असे दिसेल.

पंडित नेहरू यांनी १९३८ सालात पश्चिम जगतात-युरोपात-मोठा प्रवास केला. स्पेन, इंग्लंड व फ्रान्स या देशांना भेटी दिल्या. भारताचे भवितव्य इंग्लंड अगर जर्मनी यांच्या हातात नाही.

भारताने त्याचा निर्णय त्याने स्वतः केला पाहिजे. हा निष्कर्ष त्यांनी काढला. हिटलरची शक्ती व पराक्रम वाढत होता. कॉंग्रेसने भारताच्या व्हॉईसरॉयबरोबर दुसऱ्यांदा बोलणी केली. व्हाईसरॉयसाहेबांनी हिंदुस्थानला स्वातंत्र्य नाकारले.

गांधीजी सावधपणे विवेक करीत होते. सामुदायिक कायदेभंग व सत्याग्रह हा मार्ग त्यांनी महायुद्ध काळात सुचविला नाही. वैयक्तिक सत्याग्रह व कायदेभंग यांचा नवा मार्ग त्यांनी सांगितला. त्यांना ब्रिटिश सरकारला अडचणीत आणावयाचे नव्हते. वैयक्तिक सत्याग्रहाचा मार्ग गांधींनी देशाला दाखवला. याप्रमाणे पहिले सत्याग्रही विनोबा भावे झाले. जवाहरलाल दुसरे सत्याग्रही म्हणून अग्रेसर झाले व वर्किंग कमेटीच्या सभासदांनी त्यांना अनुसरले.

ब्रिटिशांना महायुद्ध फार कठीण गेले. जपानची हिंदुस्थानावर स्वारी होण्याचा संभव होता. १९४१ साली सर्व सत्याग्रहींना सोडून दिले. १९४२ साली जपानने बर्मावर स्वारी केली. भारताच्या पूर्व दरवाजा- शेजारी महायुद्ध येऊन ठेपले. यावेळी स्टॅफर्ड क्रीप्स नवा स्वराज्याचा आराखडा घेऊन आले. कोणत्याही भारतीय पक्षाचे स्टॅफर्ड योजनेमुळे समाधान झाले नाही. गांधीजींनी अहिंसात्मक नवे आंदोलन चालू केले. व ' चले जाव ' चळवळ चालू केली. ब्रिटिशांनी भारतीय सत्ता सोडून चालते व्हावे, असा एकमुखी आवाज भारतातून उठला. गांधीजींना शिक्षा ठोठावून पुण्यात आगाखान पॅलेसमध्ये ठेविले. वर्कींग कमेटी व त्यातील जवाहरलाल आदिकरून पुढाऱ्यांना अहमदनगर येथे तुरुंगात डांबले. ' दि डिस्कव्हरी ऑफ इंडिया ' हा ग्रंथ अहमदनगर किल्ल्यात लिहिला गेला. ब्रिटिशांचा पोलीसी जुलूम मुंबई वगैरे ठिकाणी वाढतच चालला. गोळीबाराला हजारो लोक बळी पडले. सन १९४३ च्या फेब्रुवारीत म. गांधी यांनी एकवीस दिवसांचा मोठा उपवास केला. १९४५ सालात दुसरे महायुद्ध संपले. ब्रिटनमध्ये लेबर पार्टी अधिकारावर आली. भारताच्या हातात सत्ता देण्यसाठी एक कॅबिनेट मिशन भारतात पाठविले गेले. यामुळे मुस्लिम लीग आणि कॉंग्रेस यांचे किंवा अन्य कोणत्याही पक्षाचे समाधान झाले नाही. मुस्लीम लीगने फाळणीचा आग्रह धरिला व यावेळी कॉंग्रेसला फाळणी नको होती. १९४६ सालात जिनानी जास्तीच हट्ट धरला. फाळणीमुळे हिंदु-मुसलमान दंगे झाले. असंख्यांना प्राणास मुकावे लागले व नवनिर्मित पाकिस्तानातील हिंदूंना त्यांची मातृभूमी सोडून देऊन भारतात यावे लागले.

फाळणी झाली तरी प्रश्न मिटले नाहीत; उलटे वाढले आहेत आता. फाळणी संबंधाने उलटसुलट चर्चा व कार्यवाही चालली असतानाच सार्वत्रिक निवडणुका झाल्या. कॉंग्रेस व लीग यांचे उमेदवार निवडून आले. इंटिरिअम् सरकार बनविण्यात आले. नेहरू, पटेल, राजेंद्रप्रसाद व राजाजी यांचा सरकारात समावेश झाला. जिना प्रथम ह्या सरकारात येण्यास तयार नव्हते. पण सरकारात जाऊन विरोध करण्यासाठी नंतर त्यांनी सरकारात प्रवेश केला. हिंदु व मुस्लीम दोन भिन्न असल्यामुळे तेथे एकत्र सरकार चालवू शकणार नाहीत. फाळणी होणेच अटळ आहे. मजूर सरकारने शेवटी हिंदी लोकांच्या हातात सत्ता देण्याचे जून १९४८ मध्ये ठरविले. माऊंटबॅटन ह्यांना हस्तांतर करण्याच्या कामगिरीवर नेमिले. ' नेहरू व पटेल ' यांनी अखेर फाळणी पत्करली ! पंजाब व बंगाल ह्या प्रांतांचे दोन-दोन तुकडे झाले ; व पाकिस्तानचा बनाव करण्यात बॅ. जिना यशस्वी ठरले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी द्विखंड होऊन भारत स्वतंत्र झाला. म. गांधीनादेखील ह्या दुर्दैवी घटनेला प्रत्यक्ष पाठिंबा द्यावा लागला.

समाजवादी धर्तीचे लोक कल्याणकारी राज्य निर्माण व्हावे अशी नेहरूंची इच्छा होती ; व त्यांनी ह्या दिशेने १९४८ साली " आराम हराम है " हा संदेश सर्व देशाला दिला. सर्वसाधारण माणूस सुखी झाला पाहिजे, ही त्यांची इच्छा होती.

भारतामध्ये लोकशाहीने पूर्ण मूळ धरले, असे त्यांच्या काळातील त्यांच्या निवडणुकानंतर सिद्ध झाले. पण सभोवतालच्या देशातून लोकशाही नष्ट झाली. स्वातंत्र्यपूर्वकाळात व नंतरही नेहरूनी देशाची एकात्मता व प्रगतीसाठी खस्ता खाल्ल्या. नेहरू भारताचे अभिमानी होते तरी ते एक महान मानवतावादी पुरुषोत्तम झाले. सर्व जग युद्धमुक्त होईल कसे ? हा त्यांचा ध्यास होता. त्यादृष्टीने प्रयत्नही पुष्कळ केले. केनेडी व खुश्चोव्ह यांच्याशी सलोख्याचे संबंध राखून नेहरूनी जगात शांतता राखण्याचा प्रयत्न केला. आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांनी जगभर नाव मिळविले; हे सर्व खरे. नेहरू देशाचे पहिले मोठे पंतप्रधान हीही बाब भूषणास्पद होती.

दोन दुःखद घटनांमुळे नेहरू दुःखी झाले. ३० जानेवारी १९४८ रोजी ते स्वतः पंतप्रधान असताना राष्ट्रपिता म. गांधी यांची हत्या भरदिवसा दिल्लीत झाली. दुसरी म्हणजे त्यांनी पंचशीलाचा पुरस्कार करून चीनबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. तरी चीन ह्या शेजाऱ्याने विश्वासघात करून भारतावर स्वारी केली. सर्वांत मोठे आघात नेहरूना सहन करावे लागले.

२७ मे १९६४ रोजी पंडित जवाहरलाल यांचे निधन झाले. स्वातंत्र्य-वीर व स्वतंत्र भारताचे एक जनक म्हणून व पहिले मोठे जाणते-ज्ञानी-पंतप्रधान म्हणून ते भारताच्या आधुनिक इतिहासाला कायमचे भूषणभूत आहेत.

**नेहरूंची योग्यता**

नेहरूना धार्मिक थातूर-मातूर ठाऊक नव्हते. त्यांच्यावर हिंदू-बुद्ध, मुस्लीम व खिस्ती म्हणजे आधुनिक पाश्चात्य संस्कृतीचा व धर्मतत्त्वाचा परिणाम झाला होता. यादृष्टीने ते निधर्मी म्हणजे सर्वधर्मी होते. म्हणजे त्यांना कर्मकाण्ड मान्य नव्हते. देशाच्या भक्तीला ते उच्चस्थानी मानीत. परदेशात त्यांचे अनेक सत्कार झाले. मान-सन्मान-ऐश्वर्य-सत्ता-विद्वता वगैरेनी ते संपन्न होते. म. गांधीचे ते वारसदार, असे त्यांचे मानवतावादी वर्तन असे. हिंदु शब्दापेक्षा त्यांना " जय हिंद " ही नमस्कार पद्धती आवडे. ' जय-हिंद ' असा घोष करून त्यांचे भाषण संपे. विराट जनसमुदायाची मने त्यांनी जिंकली. राजा राममोहन राय यांच्यानंतर महापंडित द्रष्टे-विवेकशील व क्रियावंत जवाहरलाल झाले. पंडित ही केवळ पदवी नव्हती

Tagore says of him" He never fought shy of truth when it was dangerous nor made alliance with falsehood when it would be convenient ".

नव्या भारताची घटना ही म. गांधी-नेहरू-आंबेडकर यांच्या विचारांची परिणती होय. घटनेच्या मागे भारताला मध्ययुगात कोणी नेऊ नये. हेच पंडित जवाहरलाल यांचे खरे स्मारक होय.

□ □ □

# पं. जवाहरलाल नेहरू–मुक्त चिंतन

□ मोहन धारिया

## प्रमुख सुत्रे व मानवतेचे पुजारी

भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांना १४ नोव्हेंबर १९८९ रोजी १०० वर्षे पूर्ण होत असून त्यांचा जन्मशताब्दी महोत्सव सर्व देशभर सुरू आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात म. गांधींच्या नेतृत्वाखालील शांततामय संग्रामामध्ये जवाहरलालजी अग्रेसर राहिले आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आधुनिक भारताचा पाया रचण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पंडितजींनी केले. लोकशाही, नियोजित अर्थव्यवस्था, प्रगत होणाऱ्या नवीन शास्त्र व तंत्रज्ञानाचे स्वागत, धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्था व सर्वधर्म समभाव आणि जागतिक शांतता व सहयोग ही पाडितजींच्या नीतीची प्रमुख सूत्रे होती. पंडितजी मानवतेचे आणि मानवतावादाचे पुरस्कर्ते होते; थोर पुजारी होते.

## समाजवादी विचार पण निर्धाराचा अभाव

पं. नेहरूंचा जन्म खानदानी व श्रीमंत घराण्यामध्ये झाला. पं. मोतीलाल नेहरू हे जवाहरलालजींचे पिता अव्वल दर्जाचे कायदेतज्ज्ञ होते. त्यांनी पाश्चिमात्य संस्कृतीचा स्वीकार आपल्या घरामध्ये केला होता. साहजिकच बालपणापासूनच पंडितजींच्या जीवनावर पाश्चिमात्य संस्कृतीचे संस्कार होण्यास सुरुवात झाली.त्या काळामध्ये पंडितजींना व त्यांच्या बहिणींना इंग्रजी भाषा शिकविण्यासाठी आंग्ल शिक्षिका त्यांच्या घरी येत असत. ह्यावरूनच जवाहरलालजींचे शिक्षण कशा प्रकारे झाले असेल त्याची कल्पना येऊ शकते. पं. नेहरूंचे उच्च शिक्षण इंग्लंडला झाले आणि त्या काळात ब्रिटिश संसदीय लोकशाहीचा प्रच्छन्न प्रभाव यांच्या मनावर पडला. रशियन राज्यक्रांतीनंतर काही वर्षातच रशियाला जाण्याची संधी पंडितजींना मिळाली. भाई मानवेंद्रनाथ रॉय यांच्यासारख्या साम्यवादी विचारांच्या नेत्याबरोबर त्यांचा संपर्क आला. समाजवादी विचारांनी पंडितजी भारावून गेले. भारतातील दारिद्र्य, अज्ञान, रोगराई, मागासलेपणा यापासून जनतेला मुक्त करावयाचे असेल तर समाजवादी तत्त्वज्ञान आणि नियोजित अर्थव्यवस्था, याशिवाय ते केव्हाही शक्य होणार नाही अशी त्यांची दृढभावना झाली. आधुनिक भारताच्या मंदिराची उभारणी करताना हे सर्व विचार नजरेसमोर ठेवूनच कारभार करण्यास पंडितजींनी सुरुवात केली. मात्र आव्हानाच्या मानाने कृती व संघटन खूपच अपुरे ठरले. गरिबांविषयी पंडितजींच्या मनात कणव होती; पण गरिबीविरोधी क्रांती पुकारण्यासाठी लागणारी तीव्र चीड त्यांच्या मनात केव्हाही निर्माण झाली नाही. तशा स्वरूपाचे कडवे संघर्ष पंडितजींनी केव्हाही केले नाहीत. उदार समाजवादी विचाराचा परिणाम राज्यकारभारातही झाला. समाजवादी तत्त्वज्ञानाबद्दल पं. नेहरूंच्या मनात आकर्षण होते. परंतु त्या तत्त्वज्ञानाच्या अंमलबजावणीसाठी लागणारा कठोर निर्धार त्यांचेजवळ नव्हता. कोणत्याही प्रकारे वर्ग आणि वर्णकलह करण्यास पंडितजी तयार नव्हते.

## नेतृत्वाच्या नादात देशाची मानहानी

सत्ता सोडण्यापूर्वी भारताची फाळणी करण्याचा विषारी डाव ब्रिटिश राजसत्तेने आखला. दुर्दैवाने पं. जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, आदी नेत्यांनी भारताच्या फाळणीला मान्यता दिली आणि हजारो नागरिकांवर प्राणार्पण करण्याचा दुर्धर प्रसंग ओढवला. लक्षावधी भारतवासियांचे संसार उध्वस्त झाले आणि निर्वासित होण्याचा कठीण प्रसंग त्यांच्यावर ओढवला. केवळ कमकुवत नेतृत्वामुळेच भारताची फाळणी स्वीकारण्याची पाळी देशावर आली. स्वातंत्र्यानंतर पाकिस्तानने उघड उघड आक्रमण करून काश्मिरचा भाग बळकावला. त्यावेळी त्यांना हुसकावून देणे शक्य असतानाही, जागतिक शांततावादी तत्त्वज्ञानाला आणि आपल्या आंतरराष्ट्रीय नेतृत्त्वाला धक्का बसू नये म्हणून तो प्रश्न पं. नेहरू यांनी युनोकडे पाठविला आणि अद्यापही ते प्रकरण तसेच चिघळत राहिले आहे. भारत व चीन या लोकसंख्येच्या दृष्टीने मोठ्या असलेल्या दोन राष्ट्रांनी एकत्र यावे व शांततावादी बलाढ्य अलिप्त शक्ती निर्माण करावी, ही पंडितजींची कल्पना रम्य असली तरी वास्तववादापासून खूप दूर होती. एक तर त्यावेळी चीन एका गटाचा घटक होता आणि चीनचे हेतू केव्हाही चांगले नव्हते. तिबेटवर केलेले आक्रमण, अकसाई चीनमध्ये भारतीय हद्दीत बांधलेला रस्ता, 'हिंदी चिनी भाई भाई' मानणाऱ्या पंडितजींना त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी दिलेली चौदा जवानांच्या प्रेतांची भेट, ही सर्व याचीच प्रतिके होती. तरीही आम्ही शहाणे झालो नाही. सरहद्दीवर योग्य अशी संरक्षणाची व माहितीची व्यवस्था केली नाही. ताकद व तयारी नसताना अवेळी आक्रमक पवित्रा घेतला, आणि १९६२ साली पराभव पत्करण्याची नामुष्की भारताला स्वीकारावी लागली. आर्थिक आत्मनिर्भरता व संरक्षणाची सर्वसिद्धता असल्याशिवाय शांततेचा मंत्र असफल ठरतो हे तत्त्व, अद्यापही आपले बुद्धीवादी परराष्ट्रनीती तज्ज्ञ आणि जागतिक नेतृत्वाचा ध्यास घेतलेले नेते पत्करण्यास तयार नाहीत. तशी तयारी होईपर्यंत काही काळ गप्प राहून सामर्थ्यवान होण्यावर सर्व लक्ष केंद्रीभूत केले पाहिजे, हा सिद्धांत त्यांना अद्यापही मंजूर नाही. त्यामुळेच कित्येक वेळी-मानहानीचे प्रसंग सहन करण्याची पाळी आपल्या देशावर आली.

## तटस्थ प्रभावी शक्ती आणि भारत

तटस्थ राष्ट्रांनी आपली शक्ती निर्माण करावी म्हणून पं. जवाहरलाल नेहरू, मार्शल टिटो आणि इजिप्तचे हुकूमशहा नासर यांनी केलेले प्रयत्न काही प्रमाणात साकार झालेले दिसत असले, तरी खरोखरच या गटात सहभागी झालेली राष्ट्रे तटस्थ आहेत का किंवा तटस्थ राहू शकतील का, याचा मागोवा घेतल्यास नकारार्थी उत्तरच द्यावे लागेल. आर्थिक व अन्य परावलंबत्वामुळे ही शक्यता अथवा अलिप्त राष्ट्रांचे संघटन यशस्वी होण्याची शक्यता आज तरी नाही. दुर्दैवाने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात नेतृत्व गाजविण्यासाठी या चळवळीचा फायदा काही नेत्यांनी यशस्वीपणे घेतला आहे. तटस्थ शक्ती उभारण्याचे प्रयत्न आणि शांततामय सहकाराचा आग्रह भारताने चालविला असला, तरी भारताच्या शेजारची राष्ट्रे भारताच्या विरोधात का जातात याचा खोलवर विचार केल्यास, मोठ्या जागतिक शक्तींचा प्रभाव किती वरचढ आहे याची कल्पना येऊ शकते. या पार्श्वभूमीवर चीनने केलेली प्रगती आणि पराक्रम अधिकच बोलका आहे. काही वर्षांपूर्वीच चीन संयुक्त राष्ट्र संघटनेत सहभागी झाला. त्यापूर्वी शांत राहून सर्व क्षेत्रात चीनने नेत्रदीपक प्रगती केली आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेबरोबरच सुरक्षा समितीचेही कायम सदस्यत्व मिळविले. अलिप्त राष्ट्रांच्या चळवळीचे नेतृत्व करणारा आपला ८५ कोटींचा देश, अद्याप कायम सदस्यही नाही आणि हिंदी राष्ट्रभाषाही तेथे मान्य झालेली नाही. पोकळ पुढारीपणाचा नाद भारताने सोडणे भारताच्या हिताचे ठरेल. काळाच्या ओघात विकसनशील

देशाचे नेतृत्व आपण केले पाहिजे. परंतु त्यासाठीही प्रथम आर्थिक व संरक्षण क्षेत्रात सामर्थ्यवान व आत्मनिर्भर होणे आवश्यक आहे.

## संसदीय लोकशाही

संसदीय लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार देशाने करावा म्हणून पं. नेहरू यांनी धरलेला आग्रह; आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील नेते व तज्ज्ञ यांना एकत्र आणून निर्माण केलेले संविधान हा पंडितजींनी देशाला दिलेला महान ठेवा आहे. बहिष्काराची निष्क्रिय भूमिका घेण्याऐवजी जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, राम मनोहर लोहिया, आचार्य नरेंद्र देव आदी नेते घटना समितीमध्ये समाविष्ट झाले असते तर अधिक योग्य ठरले असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना साथ देऊन आपल्या समाजवादी विचारांचा प्रभाव भारतीय संविधानवर निश्चितपणे ते पाडू शकले असते, असे मला राहून राहून वाटते. स्वीकृत संसदीय लोकशाही व्यवस्था देशाला योग्य नाही आणि अध्यक्षीय पद्धतीचा विचार केला पाहिजे, अशा स्वरूपाचे विचार आजकाल पुन्हा व्यक्त होऊ लागले आहेत. प्रचलित संसदीय लोकशाहीवर अपयशाची जबाबदारी लादणे योग्य ठरणार नाही. लोकशाही संस्थांना येणारे सध्याचे अपयश भारतीय घटनेमुळे अथवा संसदीय लोकशाहीमुळे येत नसून, घटना व लोकशाही यंत्रणा राबविण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती अथवा आहे, त्यांच्या चुकीमुळे ते अपयश आले आहे. अर्थात ही सर्व जबाबदारी राजकीय धुरीण, सत्ताधारी पक्ष, विरोधी पक्ष व संबंधित विविध संस्थांची आहे. संसदीय लोकशाही आम्ही स्वीकारली. परंतु तिच्या यशासाठी ज्या तऱ्हेने अनुशासन व आचारसंहिता निर्माण करणे आवश्यक होते, त्याचा विचारही केला नाही. लोकशाहीच्या स्वीकाराबरोबरच संबंधित राजकीय पक्ष, विविध स्तरावरील लोकप्रतिनिधी, अधिकारातील व्यक्ती, कामगार आणि मालक संघटना, सहकारी चळवळ, शिक्षण, न्यायालय, संसद व शासन यांचे संबंध याविषयी काही मार्गदर्शक तत्त्वे आणि बंधने मान्य करणे क्रमप्राप्त होते. लोकशाही व्यवस्था राबवताना निर्माण होणारे संभाव्य धोके लक्षात घेऊन, मूलभूत मूल्यांना आणि व्यवस्थेला केव्हाही धोका पोहचणार नाही अशी खबरदारी घेणारी योग्य आचारसंहिता भारतीय स्वातंत्र्याबरोबर निर्माण केली असती व तिचे चोख पालन केले असते, तर भारतीय लोकशाहीस कोणतेही अपयश निश्चित आले नसते. ही चूक संसदीय लोकशाही व्यवस्थेची नसून ती राबविणाऱ्यांची आहे हे सर्वांनाच मान्य करावे लागेल.

## राष्ट्रीय शासन

स्वातंत्र्यानंतर निर्वासितांचे पुनर्वसन आणि हजारो वर्षांपासून चालत आलेल्या सामाजिक विषमतेमुळे व आर्थिक अन्यायामुळे निर्माण झालेल्या असंख्य समस्या तातडीने सोडवणे महत्त्वाचे होते. लोकशाही व्यवस्था राबवून, सामाजिक, आर्थिक व असंख्य जटील समस्या सोडविण्याचे कार्य मामुली स्वरूपाचे नव्हते. म्हणूनच सुरुवातीच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्यामाप्रसाद मुखर्जी, चिंतामणराव देशमुख आदी काँग्रेस पक्षाबाहेरील नेत्यांना बरोबर घेऊन आपले शासन म्हणजे जवळ जवळ राष्ट्रीय शासन (नॅशनल गव्हर्मेंट) आहे असे समजून पं. नेहरूंनी आपला कारभार सुरू केला. पंडितजींचा हा उपक्रम ह्या परिस्थितीचा विचार केल्यास योग्यच होता. इतकेच नव्हे तर किमान १५ वर्षे तो प्रयोग यशस्वी झाला असता तर लोकशाहीच्या माध्यमामार्फत कित्येक समस्या सोडवणे निश्चित शक्य झाले असते. दुर्दैवाने तसे घडले नाही.

## जनतेचा सहभाग नाही

सर्वसामान्य गरीब जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आवाडीच्या अधिवेशनापासून काँग्रेसने समाजवादी विचारावर शिक्कामोर्तब करण्यास सुरुवात केली असली, तरी लोकशाही समाजवादाचा स्वीकार १९६४

साली भुवनेश्वर येथे झालेल्या अधिवेशनामध्येच काँग्रेस पक्षाने उघडपणे केला. समाजवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार याप्रमाणे झाला असला तरी या तत्त्वज्ञानाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असे संघटन केव्हाही निर्माण झाले नाही. काही मातब्बर सहकाऱ्यांना हटविण्यासाठी कामराज योजनेचा वापर पंडितजींनी केला. परंतु अशा वरकरणी उपायांनी गुणात्मकतेवर आधारित संघटन उभारण्याची शक्यता नव्हती. भारतातील सर्वसामान्य जनतेला आणि तरुणांना विश्वासात घेऊन नवा समाज निर्माण करणारी यंत्रणा पंडितजींनी निर्माण केली नाही. शासकीय यंत्रणेमार्फतच नवसमाज उभारणीचा प्रयत्न होता आणि तेथेच त्यांना अपयश पत्करावे लागले. हुकूमशाहीच्या बळावर सर्वसामान्य जनतेला वेठीस धरून विकासाचे कार्य साम्यवादी देशात होऊ शकले. लोकशाही व्यवस्थेत ते शक्य नाही. ह्यासाठी जनजागरण करून आणि जनतेच्या मनामध्ये नवे चैतन्य आणि राष्ट्रप्रेम निर्माण करूनच त्यांचा सहभाग मिळविणे आवश्यक असते. पं. नेहरूंनी जनतेतील आपल्या अनन्यसाधारण स्थानाचा उपयोग, स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच जनतेचे व तरुणांचे सहकार्य मिळविण्यासाठी केला असता तर भारतीय भवितव्याला वेगळे वळण लागले असते. जनतेला सामाजिक न्याय देण्याचे काम नियोजनबद्ध अर्थव्यवस्था करू शकेल, हे खरे असले तरी जनतेमार्फत जनतेच्या सहभागामधून व श्रमातूनच नियोजनाचे उद्दिष्ट साधता येईल, हा मूलभूत मंत्र केव्हाही विसरता येणार नाही. आम्ही स्वीकारलेली नियोजित अर्थव्यवस्था परिपूर्ण नव्हती. शिवाय नियोजन ज्या जनतेसाठी केले, ती जनता नियोजनापासून नेहमीच दूर राहिली. राजकीय सत्तेचे व आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करून जनतेचा सहयोग मिळविण्यच्या कामात, जनतेच्या ह्रदयावर स्वार झालेले पंडितजी यशस्वी ठरले नाहीत आणि तशी जाणीवपूर्वक दिशाही त्यांनी दिली नाही. हे सत्य दुर्दैवी असले तरी खरे आहे.

## ग्रामीण आणि विकेंद्रीत अर्थव्यवस्थेची उपेक्षा

नियोजित अर्थव्यवस्थेमार्फत मूलभूत उद्योगधंद्यांची उभारणी करण्यासाठी आणि नवीन तंत्रज्ञान हस्तगत करण्यासाठी पं. नेहरूंनी केलेले प्रयत्न निश्चितच मोलाचे आहेत. हे झाले नसते तर भारतीय उद्योग आणि कृषी विस्तारासाठी आवश्यक असणारा आधुनिक पाया केव्हाही उभा राहिला नसता. मूलभूत उद्योग उभारणीबरोबरच भारत हा कृषिप्रधान देश आहे. ७० टक्के भारतीय जनता ग्रामीण भागात राहते. तेथील जनतेचा जलद विकास साधण्यासाठी उद्योगाप्रमाणेच ग्रामीण व कृषी क्षेत्रावरही तेवढाच भर देणे आवश्यक होते. गुंतवणूक करण्यासाठी पैसा अपुरा पडतो हे कारण दाखवून पंडितजींच्या नेतृत्वाखालील नियोजनकारांनी ग्रामीण कृषी विस्ताराला योग्य महत्त्व दिले नाही. आणि त्याची परिणती श्रीमंत व गरीब यांची दरी अधिक मोठी होण्यामध्ये व जनतेचे दारिद्र्य वाढविण्यामध्ये झाली. जीवनभर म. गांधीनी विकेंद्रित कारखानदारी तसेच आर्थिक विकेंद्रीकरणावर आणि ग्रामोद्योग व कुटिरोद्योगांवर भर दिला. प्रत्येक गाव स्वावलंबी असावे असा त्यांचा आग्रह होता. पुरातन भारतीय परंपरा त्याच विचाराशी मिळती जुळती होती.हे सर्व लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञान, भारतातील मानवी शक्ती, नैसर्गिक संपत्ती यांचा सुयोग्य संगम साधण्यामध्ये योजनाकार अपयशी ठरले आणि त्यातूनच कित्येक नवीन समस्या निर्माण झाल्या. शेतीकडे दुर्लक्ष झाले, गावे ओस पडली, शहरामधील झोपडपट्ट्या बेसुमार वाढल्या आणि बेरोजगारांची प्रचंड फौज निर्माण झाली. विशेषतः गरीब व मागासलेल्या देशामध्ये मानवीबळ हे महत्वाचे भांडवल असते. आणि त्या श्रमशक्तीमधूनच नवीन भांडवलाची निर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ शकते, हे मूलभूत तत्त्वज्ञान पंडितजींच्या नेतृत्वाखालील योजनाकारांनी केव्हाही मान्य केले नाही. त्यामुळे अफाट मनुष्यशक्ती निष्क्रिय राहिली व भांडवल निर्मितीऐवजी दारिद्र्य आणि बेकारांची संख्या वाढत गेली.

## स्फोटक समस्या

पं. नेहरूंची लोकशाहीची कल्पना इंग्लंडमधील लोकशाही परंपरांवर पोसलेली होती. किंबहुना तेच त्यांचे प्रेरणास्थान होते. भारतीय समस्या, अफाट लोकसंख्या, विविध भाषा, सामाजिक व धार्मिक परंपरा, नजरेसमोर ठेवून सर्वसामान्य जनतेला व तरुणांना उपक्रमशील करून अधिक उत्पादनक्षम बनवण्यासाठी, तसेच सर्वसामान्य जनतेच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करणे आणि रीतसर कायदे करून सर्व समाजावर काही बंधने टाकणे अपरिहार्य होते. स्वातंत्र्याबरोबर ते शक्यही होते. परंतु तसे घडले नाही. लोकशाही व शिस्तबद्ध समाज परस्पर विरोधी आहेत असा समज दृढ होऊ लागला. स्वराज्याचे रुपांतर स्वैराचारात होऊ लागले आणि जबाबदार नवीन समाजाची निर्मिती होण्याऐवजी बेशिस्त व बेजबाबदार समाज फार मोठ्या प्रमाणात निर्माण झाला. स्वैराचार हाच मान्यवर शिष्टाचार बनला. दिशाहीन शिक्षण पद्धतीमुळे असंख्य तंत्रज्ञ व शास्त्रज्ञ होत असताना ४२ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर ४५ कोटीपेक्षा अधिक नागरिक आज निरक्षर आहेत. त्यांना विशिष्ट मुदतीत साक्षर बनविण्यासाठी एखादा ठोस कार्यक्रम आम्ही स्वीकारू शकत नाही, दोन लाख खेडेगावांना साधा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करू शकत नाही, लोकसंख्येवर नियंत्रण आणू शकत नाही, बेकारी हटवू शकत नाही, अशा कित्येक समस्या गंभीर झाल्या आहेत.

## महत्त्वाचे राष्ट्रीय कार्यक्रम

१९४७ साली आपण स्वतंत्र झालो तेव्हा भारतीय एकात्मता, लोकशाही व सामाजिक न्याय यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय राष्ट्रीय स्तरावर घेणे आवश्यक होते. हिंदी ही राष्ट्रभाषा, विशिष्ट तत्त्वावर भाषावार प्रांतरचना, सर्वांसाठी समान नागरिक कायदा, किंमती-पगार-उत्पन्न यासंबंधी राष्ट्रीय धोरण, प्रभावी कुटुंब नियोजन व लोकसंख्येवर नियंत्रण, आदर्श पक्षव्यवस्था, जात-पात-भ्रष्टाचार-विरहित निवडणूक पद्धती, प्रखर राष्ट्रवाद, आदर्श मूल्ये यांचे संस्कार करणारी व तरुणांना आत्मनिर्भर बनविणारी अणि शिस्तबद्ध समाज निर्माण करणारी शिक्षणव्यवस्था, यासारखे कितीतरी मूलभूत निर्णय स्वातंत्र्यप्राप्तीबरोबर घेणे आवश्यक होते. तसे झाले असते तर देशाला व भारतीय समाजाला वेगळे वळण लागले असते. वास्तविक अन्न-पाण्यासारख्या जीवनावश्यक मूलभूत गरजा, शिक्षण व आरोग्य सुविधा, कुटुंब नियोजन, पर्यावरण, राज्या-राज्यामधील मध्यवर्ती शासन आणि राज्यांमधील संबंध, सामाजिक व राष्ट्रीय एकता आदी विषय राष्ट्रीय स्वरूपाचे आहेत. त्यासाठी सर्वांना विश्वासात घेऊन कार्यक्रम आखणे व राबविणे महत्त्वाचे आहे. अशा प्रकारचे कार्यक्रम राबविण्याऐवजी आज लोकशाही व्यवस्थेला आणि विकासाला चर्चात्मक, शिस्तहीन, भोंगळ व विकृत स्वरूप प्राप्त झाले आहे. जगाच्या इतिहासाचे ज्ञान, पुरोगामी विचार व दूरदृष्टी असूनही, या कामी आवश्यक तो पुढाकार पंडितजी देऊ शकले नाही; ही दुःखद वस्तुस्थिती अमान्य करता येणार नाही.

## स्वातंत्र्यानंतर काँग्रेसचे स्वरूप

काँग्रेस पक्ष म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात विविध विचारांच्या शक्तींनी एकत्र येऊन निर्माण केलेली राष्ट्रीय आघाडी होती. त्या अर्थाने तो केव्हाही समाजवादी विचारांचा संघटित पक्ष नव्हता. स्वातंत्र्यानंतर अशा स्वरूपाचा भोंगळ पक्ष उपयुक्त ठरणार नाही हे म. गांधींसारख्या नेत्यांनी उत्तम प्रकारे हेरले होते. म्हणूनच स्वातंत्र्य-संपादनाचे ऐतिहासिक कार्य झाल्यानंतर काँग्रेस पक्ष विसर्जित करण्याचा बहुमोल सल्ला महात्माजींनी दिला होता. तसे झाले असते तर ठोस आर्थिक कार्यक्रम व वेगवेगळ्या विचारांचा तात्विक वारसा घेऊन नवे पक्ष उदयाला आले असते, तसे घडले नाही. समाजवादी तत्त्वज्ञानाबद्दल प्रेम असणारे पंतप्रधान व विरोधी दिशेने खेचणारी काँग्रेस संघटना असा आंतरीक

संघर्ष निर्माण झाला. त्यामुळे देशाचे जबरदस्त नुकसान झाले. पुरोगामी तत्त्वज्ञानाची आणि सामाजिक न्यायावर आधारित विकासाची अपरिमित हानी झाली. पं. नेहरू यांनी स्वातंत्र्यासाठी आणि नवभारताच्या उभारणीसाठी केलेले अव्याहत परिश्रम, आधुनिक तंत्रज्ञान व शास्त्र अवगत व्हावे म्हणून हाती घेतलेले उपक्रम, नियोजित अर्थव्यवस्थेवर दिलेला भर, संसदीय लोकशाहीच्या स्थापनेमध्ये घेतलेला पुढाकार आणि समाजवादी विचारांना दिलेले प्रोत्साहन हा सर्व अनमोल ठेवा आणि पंडितजींचे ऋण मान्य करूनही ज्या वेगाने चौफेर प्रगती करणे शक्य होते ते साध्य झाले नाही. ४२ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही एक द्वितीयांश नागरिक अस्तित्वाच्या रेषेखाली तर दोन तृतीयांश नागरिक दारिद्र्यावस्थेतील लाचार जिणे जगत आहेत.

### संसदेची प्रतिष्ठा

पं. नेहरूंचे लोकशाहीवर आणि लोकशाही संस्थांवर नितांत प्रेम होते. त्यांच्या कारकीर्दीत संसदेची उपेक्षा त्यांनी केव्हाही केली नाही. संसदेची प्रतिष्ठा आणि शान कायम रहावी म्हणून पंडितजींनी ठेवलेली उदार आणि विशाल दृष्टी पंडितजींनंतर झालेले पंतप्रधान त्या अर्थाने ठेऊ शकले नाहीत. उलट लोकसभेची उपेक्षा करण्याची वृत्तीच सातत्याने वाढत आहे. या निमित्ताने बिहारचे नेते व माजी केंद्रीय मंत्री बाबू रामसुभग सिंग यांनी सांगितलेली आठवण येथे नमूद करावीशी वाटते.१९६२ साली चीनने आक्रमण केल्यानंतर भारताची ज्या पद्धतीने पिछेहाट झाली त्यासंबंधी रामसुभग सिंग यांनी कडवट प्रकारची टीका पंडितजींच्या उपस्थितीत लोकसभेमध्ये केली. पंडितजींना हे सहन झाले नाही आणि तत्काळ उठून ' माझ्या पक्षाचा खासदार ह्या कडवट भाषेमध्ये कसे बोलू शकतात ? हे योग्य नाही ' अशा प्रकारचा इशाराही त्यावेळी पंडितजींनी लोकसभेमध्ये दिला. वास्तविक खासदार या नात्याने आपली स्पष्ट मते मांडण्याचा प्रत्येक खासदाराला पूर्ण अधिकार असतो. वास्तविक ही माहिती पंडितजींना होती परंतु रागावलेल्या अवस्थेत त्याचे भान राहिले नाही. काही वेळाने तेही संसदेतून आपल्या चेंबरमध्ये गेले. रामसुभग सिंग त्यावेळी तरुण होते. काही ज्येष्ठ नेते ' असं कशाला बोलला ? जा पंडितजींची माफी मागा ' असा सल्ला संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात त्यांनी दिला. इतक्यात पंडितजींचा माणूस रामसुभग सिंग यांना बोलवण्यासाठी तेथे आला. रामसुभग सिंग पंडितजींच्याकडे गेले. पंडितजींकडे जाताक्षणीच पंडितजींनी त्यांना बसवून घेतले आणि रामसुभग सिंग, मला क्षमा करा . . . तुम्ही बोलत असताना मी ज्या प्रकारचे उद्‌गार काढले ते योग्य नव्हते. परंतु केवळ रागाच्या भरातच ही चूक झाली असे म्हणून रामसुभग सिंग यांची त्यांनी समजूत काढली. हे वृत्त सर्वत्र पसरले. आणि पंडितजी लोकशाही प्रथांची ज्या प्रकारची इज्जत करतात ते पाहून त्यांच्या विषयीचा आदर अधिक वाढला. प्रचलित जमान्यात असे काही घडले होते आणि पंडितजींनी एका तरुण खासदाराची माफी मागितली होती ; यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही. त्या काळातील सभापती कै. दादासाहेब मावळणकर यांना संसदीय कामासाठी पंडितजींनी आपल्या कार्यालयात बोलावले होते. कै. मावळणकरांनी ते नाकारले आणि पंडितजींनाच आपल्याकडे बोलावून घेतले. आपली चूक पंडितजींच्या लक्षात आली आणि दिलगिरी प्रदर्शित करून ते सभापतींकडे गेले. हे सर्व योगदान मान्य करूनही पं. नेहरूंनी निर्माण केलेला लोकशाहीचा उज्ज्वल पाया, भावी भवितव्याचा भार सांभाळण्यामध्ये कमकुवत ठरला हे ऐतिहासिक सत्य आहे.

### भारतीय लोकशाहीचे स्वरूप

भारतामध्ये लोकशाही व्यवस्था असली तरी अल्पसंख्य लोकमताचा पाठिंबा असणाऱ्या राष्ट्रीय पक्षाच्या हातीच सत्ता असते, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. आजपर्यंत ५०-५१ टक्यांपेक्षा अधिक

मते दिल्लीत सत्ता गाजविणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाला मिळालेली नाही. सर्वसाधारण लोकसंख्येच्या ५०% मतदार असतात आणि त्यापैकी सर्वसाधारण ५०% मतदान करतात. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या १२ ते १३ टक्यांच्या पाठिंब्यावर अथवा एकूण मतदारांच्या २५% पाठिंब्यावर राजकीय पक्ष सत्ताधारी बनतो. ७५% मतदार विरोधात अथवा मुग्ध असतात. म्हणूनच विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन व त्यांचेबरोबर सतत सुसंवाद ठेवून कारभार करण्याची सत्ताधारी पक्षाची जबाबदारी अटळ ठरते. त्याचबरोबर निवडणुका झाल्यानंतर जनतेने ज्यांच्या हाती सत्ता सुपूर्त केली त्या पक्षाला ठरलेली मुदत संपेपर्यंत शांतपणे कारभाराची संधी मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय समस्यांवर सुसंवादाची आणि राष्ट्रीय निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू झाली तरच आपली लोकशाही यशस्वी होऊ शकेल.

## नवी दिशा

हे सर्व विवेचन करीत असताना पं नेहरूंनी देशाला दिलेल्या महान नेतृत्वाची कोणत्याही प्रकारे अवहेलना करण्याचा माझा हेतू नाही. संसदीय लोकशाही, सर्वधर्मसमभाव, आणि धर्म निरपेक्ष राज्य व्यवस्था, नियोजित अर्थव्यवस्था, भारताबरोबरच पारतंत्र्यात खितपत पडलेली राष्ट्रे स्वतंत्र करण्यासाठी केलेली धडपड आणि शांततामय राष्ट्रांना एकत्र आणून अलिप्तता चळवळ प्रभावी करण्यासाठी केलेले प्रयत्न, याची उपेक्षा केव्हाही करता येणार नाही. स्वातंत्र्य-संघर्षाच्या काळात, पंडितजींनी केलेले नेतृत्व तितकेच मोलाचे आहे. पंडितजी राजकीय नेते होते. त्याचप्रमाणे अव्वल दर्जाचे साहित्यिक आणि रसिक होते. त्यांनी निर्माण केलेले साहित्य कित्येक भावी पिढ्यांना मार्गदर्शन करू शकेल. हे सर्व खरे असले तरी त्यांच्या ऐतिहासिक कारकीर्दीचा मागोवा घेत असताना सर्व महत्त्वपूर्ण घटनांचा उल्लेख करणे अपरिहार्य ठरते. म्हणून हा प्रपंच! सत्ता, स्वार्थ, भ्रष्टाचार आणि निवडणुका यांच्या भोवती केंद्रीभूत झालेल्या राजनीतीला नवी दिशा देण्याची आज गरज आहे. सबळ सत्ताधारी व खंबीर विरोधी पक्ष लोकशाहीच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी अपरिहार्य आहेत हे मान्य करूनही देशापुढील भयावह राष्ट्रीय समस्या सोडविण्यासाठी आणि जलदगतीने विकास साधण्यासाठी विधायक वृत्तीचे प्रमुख नेते व यांना बरोबर घेऊनच राष्ट्रीय एकमत तयार करणे तितकेच महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्यानंतर बेचाळीस वर्षात कित्येक मूलभूत समस्या सोडविण्यास आमची लोकशाही असमर्थ ठरली. याचा गंभीरपणे विचार होण्याची व त्यावर घटनात्मक फेरबदलासह योग्य उपाय करण्याची आज नितांत आवश्यकता आहे.

## काही ठोस उपाय

(१) नियोजन पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करण्यात यावा. खेडेगाव व माणूस घटक मानून आणि सर्वसामान्य जनतेला विश्वासात घेऊन नियोजन करण्यात यावे. माणूस सर्वात महत्त्वाचे भांडवल असून, त्याला उत्पादनक्षम करणे आणि कोट्यवधी जनतेच्या श्रमशक्तीचा सुयोग्य वापर करणे यावर खास भर देण्यात यावा. कर्जाऐवजी काटकसर, श्रमशक्ती, कमी गुंतवणुकीमध्ये अधिक उत्पादन व रोजगार देणाऱ्या उद्योग व्यवसायाचा आणि त्याला अनुसरून आवश्यक त्या योग्य तंत्रज्ञानाचा अंगिकार करण्यात यावा.

(२) अन्नधान्य, कपडा, निवारा, शिक्षण, आरोग्य सुविधा, रस्ते, दळणवळण, ऊर्जा, पिण्याचे पाणी, आदी जीवनावश्यक मूलभूत गरजा रास्त दरात उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली पाहिजे. त्यासाठी नियोजनामध्ये खास अग्रक्रम देण्यात यावा.

(३) निम्मा भारत देश उजाड अथवा पडिक अवस्थेमध्ये असून, जेमतेम ९-१० टक्के क्षेत्र वनश्रीखाली राहिले आहे. हे उजाड क्षेत्र उत्पादनक्षम करण्याचाही व आवश्यक वनराईसाठी ग्रामीण भागाच्या

सर्वांगीण विकासावर आणि खेडेगाव आत्मनिर्भर करण्यावर खास प्राधान्य देण्यात यावे. यामुळे कोट्यवधी अथवा अर्धबेकारांना रोजगार अथवा उत्पन्न मिळू शकेल आणि पर्यावरणाचा तोलही राखता येईल.

(४) आर्थिक व राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण केवळ घोषणेत न ठेवता, प्रत्यक्ष कृतीमध्ये आणावे. शहरांची अनिर्बंध वाढ थांबविण्यात यावी. गावातच व्यवसाय आणि जीवनावश्यक गरजा उपलब्ध झाल्या ; तरच शहराकडे येणारा जनतेचा लोंढा थांबविता येईल. सर्वच नागरिकांना गावामध्ये सामाविता येणार नाही. त्यांचेसाठी ग्रामीण भागातच उद्योग काढून नवीन विकास केंद्रे म्हणजेच नवीन नियोजित शहरे स्थापन करण्यात यावीत.

(५) आर्थिक आणि सामाजिक विषमता घालवून सामाजिक न्याय देण्यासाठी, जगातील साम्यवादी आणि वेगवेगळ्या राष्ट्रांचा अनुभव लक्षात घेऊन, वेगळे धोरण ठरविणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये मूठभर मंडळींचा श्रीमंत भारत : आणि बहुसंख्य कोट्यवधी जनतेचा गरीब भारत हे आज दिसणारे चित्र नाहीसे करून समतेवर आधारित भारत निर्माण करणे आवश्यक आहे.

(६) शेतमालाला किफायतशीर अधिक भाव दिल्यास महागाई वाढेल हे तथाकथित अर्थशास्त्रज्ञांचे मत झिडकारून शेतमालाला शेतावरच रास्त भाव देण्याची व्यवस्था निर्माण करण्यात यावी. त्यामुळे ग्रामीण भागातील ७०% जनतेच्या हातामध्ये पैसा येईल, मागणी वाढेल आणि आर्थिक विकासाला खूपच मोठ्या प्रमाणात वेग येईल. गेल्या ४० वर्षांत पोलाद, सिमेंट, कागद आदी औद्योगिक मालाच्या किमती १५-२० पटीने वाढल्या परंतु शेतमालाच्या किंमती ४ ते ५ पटीनेही वाढल्या नाहीत. हा अन्याय दूर झाला तर शेती, फलोद्याने, वनशेती आदी क्षेत्रामध्ये भारतीय शेतकरी नवा पराक्रम गाजवू शकेल. शेतमालाची आधार किंमत चांगल्या प्रकारची ठेवावी आणि महागाई निर्देशांकानुसार संघटित वर्गाला देण्यात येणाऱ्या महागाई भत्त्याप्रमाणे शेतमालाची आधार किंमत आपोआप वाढवून देण्याचा निर्णय घेण्यात यावा. शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगावर खास भर देण्यात यावा.

(७) जात, धर्म आणि मतांचा विचार कटाक्षाने दूर ठेवून लोकसंख्या वाढीवर कठोर बंधने घालणे अपरिहार्य झाले आहे. दोन मुलांनंतर सक्तीचे ऑपरेशन करणारा निर्णय घेणे अवघड असले तरी कडक आर्थिक बंधने व एक मूल मान्य करणाऱ्यांना भरपूर सुविधा देणे शक्य आहे. लोकसंख्यावाढीवर नियंत्रण ठेवले नाहीतर देशाची प्रगती सोडा परंतु अधोगतीच होईल. दुर्दैवाने हा विचार बोलून दाखविण्यास सुद्धा कोणताही राजकीय पक्ष तयार नाही. येत्या निवडणुकीसाठी जे जाहिरनामे प्रसिद्ध झाले आहेत त्यामध्ये सर्वांनीच कुटुंब नियोजनाचा विषय कटाक्षाने टाळला आहे.

(८) सध्याच्या निवडणूक पद्धतीमध्ये पैशांची उधळण, भ्रष्टाचार, जातीयवाद व गुंडगिरी यांचे उघडे प्रदर्शन पाहण्याचा दुर्धर प्रसंग आपल्या गरीब देशावर ओढवला आहे. काळ्या पैशाच्या संवर्धनाचे मूळ आजच्या निवडणूक पद्धतीमध्ये असून, पैसेवाल्यांच्या मगरमिठीमध्ये सर्व शासन पकडले गेले आहे. यामधून मुक्तता करण्यासाठी पश्चिम जर्मनीप्रमाणे निवडणुकीसाठी योग्य प्रमाणात लागणारा खर्च शासकीय तिजोरीमधून देण्याची व्यवस्था केली पाहिजे. तसेच योग्य घटना दुरुस्ती करून संसदेतील आणि विधानसभामधील ५०% उमेदवार प्रत्यक्ष निवडणुकीमधून आणि उरलेले उमेदवार लिस्ट पद्धतीने पक्षांना मिळणाऱ्या मतांच्या प्रमाणात नेमण्याची प्रथा सुरू करावी. त्यामुळे असंख्य गुणी व कर्तबगार व्यक्ती संसदेमध्ये जाऊ शकतील आणि संसदेचा गुणात्मक दर्जा खूपच उंचावेल. पक्षातील उमेदवार प्रत्यक्ष निवडणुकातूनच निवडून आल्यानंतर त्यांचेमार्फत होणाऱ्या अप्रत्यक्ष निवडणुकीचे मतदान उघडपणे करण्याची प्रथा सुरू करावी. त्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल. आणि पक्षीय पद्धतीला सामर्थ्य मिळू शकेल. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारावर, उमेदवारीचे अर्ज भरताना स्वतः

आणि त्याच्या समवेत राहणाऱ्या नातेवाईकांच्या प्रॉपर्टीचा तपशील देण्याचे बंधन असले पाहिजे. महानगरपालिका, जिल्हा परिषदा, संसद समित्या, नगरपरिषदा आदी सर्वच क्षेत्रांसाठी अशा स्वरूपाची आचार संहिता निर्माण झाली पाहिजे. वास्तविक आपल्या घटनेमध्ये मूलभूत हक्कांबरोबर, सर्व क्षेत्रांमध्ये मूलभूत जबाबदारीची जाणीव देणाऱ्या आचार संहितेच्या प्रकरणाचा अंतर्भाव करणे आवश्यक होते.

(९) सहकार व शिक्षण क्षेत्र राजकारणापासून पूर्णपणे मुक्त करण्यात यावे. सहकारी व शिक्षण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना तसेच संचालकांना राजकीय निवडणूक लढविता येणार नाही आणि या संस्थांच्या पैशाचा अथवा साधनांचा वापर राजकीय कारणांसाठी करता येणार नाही अशी कायदेशीर व्यवस्था करण्यात यावी. धर्म आणि राजकारण यांची फारकत करण्यासाठीही अशाच स्वरूपाचे निर्णय घेण्यात यावे.

(१०) संप, टाळेबंदी, घेराव, रस्तारोको, रेलरोको यासारखी उत्पादन आणि आवश्यक सेवा रोखणारी आंदोलने भारतासारख्या गरीब राष्ट्राला पुढील किमान १५-२० वर्षे मानवणारी नाहीत. औद्योगिक अथवा अन्य प्रकारचे तंटे निर्माण झाल्यास ६ महिन्याचे आत न्याय देणारी अवस्था संबंधितांना विश्वासात घेऊन सत्वर उभारण्यात यावी. त्याचबरोबर किमान पगार, अन्य आवश्यक सुविधा, रजा, भत्ते आदी देण्याची व्यवस्था झाल्यानंतर कोणासही टाळेबंदी, संप व हळू कामे करता येणार नाहीत असा राष्ट्रीय निर्णय घेण्यात यावा. देशातील भयावह दारिद्र्य लक्षात घेता ज्यांना दरमहा रुपये ३,००० पेक्षा अधिक पगार मिळतो अशा कर्मचाऱ्यांचे वर्तन व्यवस्थापनाला पसंत नसल्यास अमेरिकेप्रमाणे रितसर भरपाई देऊन त्याला नोकरीतून कमी करण्याचा हक्क मान्य करण्यात यावा. हे सर्व निर्णय कठोर असले तरी देश हितासाठी ते अपरिहार्य झाले आहेत. लोकशाही आणि शिस्त एकत्र नांदू शकत नाहीत हे खरे नाही. लोकशाहीच्या नावाखाली मतांच्या लाचारीसाठी निर्माण झालेली आणि क्षणाक्षणाला वाढणारी बेशिस्त नाहीशी करण्याचे व्रत देशाने स्वीकारले पाहिजे.

(११) काळाबाजार आणि भ्रष्टाचार यामुळे देशात समांतर पद्धतीची अर्थव्यवस्था चालू आहे. सुमारे ६०,००० ते ७०,००० कोटी रुपये अनधिकृत स्वरूपात असून, दरसाल त्यामध्ये वाढ होत आहे. कॅन्सरसारखे वाढणारे हे दुष्टचक्र सर्व देशालाच खाऊन टाकील. त्यासाठीच खंबीर व ठोस उपाय करणे आवश्यक आहे. वारंवार तंबी व इशारे देण्याऐवजी अखेरची एकच मुदत देऊन सर्व काळी, गोरी स्थावर आणि जंगम संपत्ती प्रतिज्ञेसह जाहीर करण्याची सक्ती करण्यात यावी. खोटी माहिती देणाऱ्यांना किमान दहा वर्षे सक्त मजुरीची शिक्षा आणि त्यांच्या नावावरील सर्व संपत्ती जप्त करण्याची कायदेशीर तरतूद करण्यात यावी. तांत्रिक शाळा, महाविद्यालये, ग्रामीण भागात सुविधायुक्त छोटी इस्पितळे, उद्याने, छोटे मोठे बंधारे व धरणे, वाचनालये, रस्ते यासारखे शासकीय योजनेशी सुसंगत असणारे सार्वजनिक उपक्रम अथवा गरीब समाजासाठी स्वस्त भाड्यामध्ये घरे, उजाड जमिनीवर वनशेती किंवा ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नोकरी देणारे व्यवसाय दोन वर्षांच्या विशिष्ट कालावधीत सुरू केल्यास, सदर रक्कम कोठून आली ही चौकशी होणार नाही अशी स्पष्ट ग्वाही देण्यात यावी. इंदिरा विकास पत्रासारख्या शासकीय रोख्यामध्ये तीन महिन्याचे आत रक्कम गुंतविण्याचीही संधी देण्यात यावी. प्रत्येक कुटुंबासाठी फक्त दहा तोळे सोन्याचे अथवा तितक्याच रकमेचे दागिने ठेवता येतील, बाकी दागिने राष्ट्रीय बँकेच्या लॉकसमध्ये ठेवावे लागतील, त्यांचा सर्व तपशील बँकेला द्यावा लागेल, असे बंधन घालण्यात यावे ; आणि दागिन्याच्या एकूण रकमेवर किमान ५% संपत्तीकर दरवर्षी आकारण्यात यावा. अशा बंधनांमुळे दागिन्यात होणारी गुंतवणूक ठेवींच्या रूपाने कोठेतरी जमा होईल

अथवा व्यवसायाकडे वळेल आणि चोरट्या आयातीवरही बंधने येतील. दरसाल सुमारे ३००० कोटी रुपयांच्या सोन्याची भारतात चोरटी आयात होते. याप्रकारे जवळ जवळ एक लाख कोटी रुपयांचे सोने स्वातंत्र्यानंतर भारतात आले आहे. त्याशिवाय परंपरागत जे सोने होते तेही कोणत्यातरी स्वरूपात आहेच. कोट्यवधी लोक गरिबीचे जिणे जगत असताना अब्जावधी रुपयांचा निरनिराळ्या स्वरूपात दडलेला पैसा, देशासाठी बाहेर काढला आणि या दुष्टचक्राचा कायमचा छेद केला तर विकासासाठी आवश्यक असणारा पैसा देशातच उपलब्ध होईल. विशिष्ट वर्ग तुफान संपत्तीत मढलेला आणि देश मात्र कर्जबाजारी व मेलेला; हे सहन करणार नाही, अशी स्वच्छ भूमिका देशाने घेतली पाहिजे. त्याचबरोबर जाचक कर पद्धती दूर करून भ्रष्टाचार व काळ्या पैशाला मिळणारे प्रोत्साहनही थांबविले पाहिजे. रुपयाची घसरलेली किंमत पहाता दरसाल रु. ३६,००० पर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना उत्पन्न करातून वगळले आणि एक लाख रुपये उत्पन्नापर्यंत अगदी साधी कर पद्धती स्वीकारली तर इन्कमटॅक्स खालील ९५ टक्यापेक्षा अधिक प्रकरणे आपोआप निकाली निघतील. त्याप्रमाणात भ्रष्टाचारही नाहीसा होईल. प्रामाणिक प्रवृत्तींना प्रेरणा मिळेल.

(१२) नागरी जमिनीवर बंधने आणताना जादा जमिनी विविध सामाजिक उपक्रमासाठी अथवा जास्त घरासाठी उपलब्ध करण्याची कल्पना होती. दुर्दैवाने तसे घडले नाही. असे भूखंड हे भ्रष्टाचाराचे आगर ठरले. या सर्व प्रकरणांचा व कायद्यांचा फेरविचार करणे आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणात काळे पैसे गुंतविण्यासाठी ज्यांनी जमिनींचे व्यवहार केले आहेत आणि त्या पडिक अवस्थेमध्ये अनुत्पादित ठेवल्या आहेत, त्यांचा योग्य वापर करण्यासाठी करासह कडक बंधने त्वरित घालण्यात यावी. ब्रिटिशांच्या कारकिर्दीतसुद्धा त्या काळात लागू केलेल्या भाडे नियंत्रण कायद्याचे गैरफायदे घेण्याचे प्रकार सध्या सर्रास सुरू आहेत. त्यामुळे घर बांधणीचे काम जवळ जवळ थंडावले आहे. गरीबांना न्याय देण्याची दृष्टी ठेवून भाडे नियंत्रण कायदा बदलणे आवश्यक आहे. शेतजमिनीचे तुकडे पाडण्याचा वेग खूपच वाढला असून, छोट्या क्षेत्रात किफायतशीर शेती करणे केवळ अशक्य झाले आहे. असंख्य मालकीच्या आणि वारसदारांच्या नोंदीमुळे कोकणात वनशेती अथवा फळशेती करणेही अवघड झाले आहे. म्हणूनच शेतीविषयक कायद्यांची फेररचना करणे क्रमप्राप्त आहे. तसेच पडिक शेतजमिनी उत्पादनाखाली आणण्यासाठी सर्व सवलती द्याव्या आणि त्या पडिक ठेवणे हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा मानून अशा पडिक जमिनीवर ठणठणीत कर आकारण्यात यावा.

(१३) जातीयवाद, प्रांतीयवाद आणि मध्यवर्ती शासनाचे अविवेकी, एकांगी निर्णय यामुळे देशाच्या ऐक्याला आणि एकात्मतेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. धर्म आणि राजकारण यांची संपूर्ण फारकत करणे, घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकाराविरुद्ध स्त्री व पुरुष यांच्या समानतेविरुद्ध अथवा कुटुंबनियोजनासारख्या कार्यक्रमाविरुद्ध कोणत्याही धर्माची अथवा धार्मिक प्रश्नांची शिकवण जात असल्यास ती शिकवण घटनाबाह्य ठरविण्यात यावी. कोणत्याही प्रार्थना मंदिरामध्ये, मशिदीमध्ये, गुरुद्वारामध्ये अथवा चर्चमध्ये हत्यारे, स्फोटक पदार्थ अथवा गुन्हेगारांना आश्रय देणे हा गुन्हा मानून त्याविरुद्ध सक्त कायदेशीर कारवाई करण्यात यावी. धार्मिक अथवा जातीय भावना भडकावून द्वेष पसरणाऱ्याविरुद्धही अशाच स्वरूपाची कारवाई करण्यात यावी. मध्यवर्ती शासन आणि राज्यामधील तसेच राज्याराज्यामधील संबंध सलोख्याचे राहण्यासाठी घटनेत इंटर-स्टेट कौन्सिल स्थापन करण्याची व्यवस्था आहे. परंतु ती पुरेशी नाही. यासाठी खास अधिकारयुक्त यंत्रणा निर्माण करणे व अशा यंत्रणेमार्फत मिळणारा निर्णय सर्वांनी मान्य करणे आवश्यक आहे. सध्या वेगवेगळ्या राज्यामध्ये खदखदणारा असंतोष आणि जातीजमातीमध्ये वाढणारा द्वेष वेळीच रोखण्यासाठी प्रखर राष्ट्रवादाचे संगोपन व संवर्धन करणे आणि सुसंवादातून निर्णय घेणारी प्रक्रिया गतीमान करणे सर्वार्थाने महत्त्वाचे आहे.

(१४) व्यक्ती स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य आणि वृत्तपत्रीय स्वातंत्र्य निरनिराळ्या कारणांमुळे संकुचित होत आहे. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचाराचा परवाना नाही; हे नजरेसमोर ठेवून व्यक्तीचे, संघटनांचे आणि वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले पाहिजे. तसे झाले नाही ; तर भारतीय लोकशाहीच संपुष्टात येईल. टी.व्ही. व आकाशवाणीमार्फत शासनाच्या गैरकृत्याचे होणारे समर्थन, अथवा वृत्तपत्रातील मक्तेदारीमुळे दबला जाणारा मुक्त आवाज, भारतीय लोकशाहीला घातक आहे. म्हणूनच संबंधित सर्वांसाठी आचारसंहिता तयार करून तिची पामाणिकपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासन, विरोधीपक्ष, संघटनाप्रमुख, पत्रकार आणि वृत्पत्रांचे मालक यांनी स्वखुषीने पत्करली पाहिजे.

(१५) देशातील ४५ कोटी पेक्षा अधिक नागरिक निरक्षर असून, २००० साली जगातील एकूण निरक्षर व्यक्तींपेक्षा सुमारे ५४ टक्के निरक्षर एकट्या भारतामध्येच असतील. भारतीय स्वातंत्र्यानंतर सर्वांना साक्षर करण्याच्या कार्याकडे केवढे दुर्लक्ष झाले आहे, याची कल्पना यावरून येऊ शकते. सन २००० सालापूर्वी प्रत्येक भारतीय साक्षर करण्याचा निर्धार देशाने केला पाहिजे. कॉम्पुटर व आधुनिक तंत्रज्ञानाची भाषा बोलत असताना या भयावह परिस्थितीकडे दुर्लक्ष करणे म्हणजे जनतेची क्रूर फसवणूक ठरेल. यासाठी विद्यालये, महाविद्यालये आणि विद्यापीठे एक वर्ष बंद ठेवावी लागली तरी चालतील. सर्व प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या; म्हणजे शिकलेल्या सर्वांच्या सहयोगाने हा कलंक दूर केलाच पाहिजे. देशातील दारिद्र्य व मागासपणाचा विचार करता दरसाल तीनचार महिने सुट्ट्या देण्याऐवजी सर्व तरुण वर्गाला आणि शिक्षक वर्गाला " कमवा आणि शिका " ही योजना लागू करून विकासाच्या कार्यात सहभागी करुन घेतले तर विद्यार्थ्यांवर अधिक चांगले संस्कार होतील ते आत्मनिर्भर होतील आणि विकासाच्या कार्याला वेगळीच गती येईल. यामधूनच असंख्य बेकारांना व्यवसाय देणेही शक्य होईल. तरुणांच्या मनातील नैराश्य घालविण्यासाठी आणि राष्ट्रीय विकासाच्या कार्यात सक्रीयपणे सहभागी करून घेण्यासाठी प्रत्येक व्यक्तीच्या कामाचा अधिकार, हा मूलभूत अधिकार असला पाहिजे. व्यवसाय करावयाचा असेल तर पतपुरवठा करताना गरीबीची अथवा जाती-जमातीची अडचण त्याच्या मार्गात येता कामा नये. नवराष्ट्र उभारणीसाठी तरुण पिढीमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण करणे आणि प्रचंड जनआंदोलन उभे करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

वरील स्वरूपाची कठोर उपाययोजना करण्यासाठी सर्व राष्ट्रप्रेमी धुरीण, समाजसुधारक, राज्यकर्ता पक्ष, विरोधी पक्ष आदींनी एकत्र येणे आणि संकुचित पक्षीय कक्षा ओलांडून व्यापक देशहितासाठी सुसंवाद साधून एक ठोस राष्ट्रीय कार्यक्रम स्वीकारणे आवश्यक आहे. या कामी पुढाकार घेण्याची जबाबदारी प्रामुख्याने राज्यकर्त्या पक्षाची असून, विरोधी पक्षांनी तितक्याच समंजसपणे या उपक्रमाला प्रतिसाद दिला पाहिजे. राष्ट्रहितासाठी याप्रकारे घेतलेले निर्णय आमचे सर्वांचे आहेत आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये पक्षीय स्वार्थासाठी त्याविरूद्ध जाऊन गैर फायदा घेणार नाही; अशी ग्वाही सर्वांनी दिली तरच योग्य सुसंवाद साधून आवश्यक ते खंबीर निर्णय घेणे आणि तितक्याच कठोरपणे ते राबविणे शक्य होईल. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी व लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्यामध्ये सुसंवाद व्हावा म्हणून जो आग्रह मी केला होता त्यामागे हीच माझी भूमिका होती. मी आज व्यक्त करीत असलेल्या मुक्त चिंतनामुळे माझ्यावर कडवट टीका होईल याची मला जाणीव आहे. परंतु सर्वच क्षेत्रात वेगाने घसरणारा व देशाचा गाडा परत मार्गावर आणण्यासाठी आणि मूल्यावर आधारित राजकारण व समाजकारण निर्माण करण्यासाठी या भूमिकेची नितांत आवश्यकता आहे, असे एक स्वातंत्र्यसैनिक म्हणून माझे आग्रहाचे प्रतिपादन आहे.

पं. नेहरू यांची जन्मशताब्दी साजरी करत असताना भारतीय स्वातंत्र्यानंतर गेल्या बेचाळीस वर्षात आलेले बरेवाईट अनुभव लक्षात घेऊन, भावी प्रगतीसाठी सर्वांनीच अंतर्मुख होऊन प्रांजळपणे विचार करणे आणि देश व लोकशाहीला पोषक असे खंबीर निर्णय घेणे हीच पंडितजींना उचित आदरांजली ठरेल. पंडितजींच्या संबंधी हे मुक्त चिंतन करीत असताना पंडितजींनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि स्वातंत्र्यानंतर देश उभारणीसाठी केलेले योगदान उत्तुंग पर्वतासारखे आहे. ह्याविषयी मला रास्त कदर व अभिमान आहे. परंतु मुक्त चिंतन करीत असताना गुणांबरोबरच उणेपणाचा परामर्ष घेणे अपरिहार्य ठरते. हे सर्व विवेचन करीत असताना भारतीय स्वातंत्र्याला, देशाच्या ऐक्याला, लोकशाहीला आणि सामाजिक व आर्थिक समानतेसाठी मान्य केलेल्या मूलभूत उद्दीष्टांना आव्हान देणाऱ्या धोकादायक परिस्थितीवर कशाप्रकारे यशस्वी मात करता येईल, हा राष्ट्रीय विचार नजरेसमोर ठेवूनच हे मुक्त चिंतन मी केले आहे. मानवतेवर व समतेवर आधारित सामर्थ्यवान भारत निर्माण करण्यासाठी तोच योग्य मार्ग आहे.

□ □ □

# पं. नेहरूंची इतिहासविषयक भूमिका

□ स. मा. गर्गे

### जीवनाचे विविध पैलू

पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनाला अनेक पैलू होते, तशीच त्यांच्या विचाराला तात्त्विक बैठकही होती. ते स्वातंत्र्यसंग्रामाचे नेते, राज्यकर्ते आणि मुत्सद्दी होते, त्याचप्रमाणे तत्त्वचिंतक, लेखक आणि उदारमतवादी मूल्यांची जाण असणारे विचारवंतही होते. इतिहासाचा त्यांचा व्यासंगही दांडगा होता. त्यांनी ' Glimpses of world history ' आणि ' Discovery of India ' हे दोन इतिहासविषयक ग्रंथ लिहिले. या ग्रंथातील विवेचनाच्या आधारेच त्यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन समजून घेता येईल.

पं. नेहरूंनी इतिहासशास्त्र विशद करण्यासाठी प्रबंध लिहिलेला नाही. ऐतिहासिक घटनेचे विश्लेषण करण्यासाठी संशोधन केलेले नाही किंवा इतिहासाची तात्त्विक बाजू स्पष्ट करण्यासाठीही ग्रंथलेखन केलेले नाही. जगातील संघर्ष आणि समन्वय यांचा शोध घेण्यासाठी त्यांनी जगाच्या इतिहासाचा ओघवत्या भाषेत अर्थ निवेदन केला आहे. त्यातूनच त्यांचा पहिला ग्रंथ निर्माण झाला. दुसऱ्या ग्रंथात त्यांनी प्राचीन काळापासून भारताला जो वैचारिक वारसा लाभला, त्याचे संगतवार कालक्रमाने विवेचन केले आहे. या दोन्ही ग्रंथाची रचना, उद्दिष्ट आणि शैली अशा स्वरूपाची आहे की, त्यातून पं. नेहरूंची इतिहसविषयक दृष्टी लक्षात यावी. अर्थात् त्यासाठी त्यांनी लिहिलेल्या या ग्रंथातून त्यांच्या इतिहासविषयक तत्त्वांचे आणि भूमिकेचे कण वेचून काढावे लागतात.

### मानवी प्रेरणांचा शोध

पं. नेहरूंनी स्वतःच म्हटले आहे की ' मी इतिहासाकडे फार उशीरा वळलो. ', आणि त्याचे कारणही लगेच स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, ' शालेय अभ्यासक्रमात तारखा आणि सनावळ्यांचा इतिहास शिकविला जातो. अशा इतिहासात माझे मन कधीच रमले नाही. नंतरच्या काळातही जीवनाशी संबंध नसलेल्या भूतकालीन कथा मन रमवू शकल्या नाहीत.' त्यांनीच एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे, ' देशात मी अनेक ठिकाणी फिरलो. लोकांची परिस्थिती पाहिली. त्यांचे दारिद्र्य आणि विषमता यांचेही मला अनेक ठिकाणी दर्शन घडले. आणि मग माझ्या मनात असा विचार आला की, हे कोट्यवधी लोक कोणत्या प्रेरणेने एकत्र राहिले, कष्टाचे जीवन जगले ? हजारो वर्षे एवढा जीवनस्त्रोत त्यांना कोठून मिळाला ? त्यांचा भूतकाळ हालअपेष्टांचा, वर्तमानकाळ पारतंत्र्याचा, आणि भविष्यकाळात अंधकार. अशी सर्व परिस्थिती असताना त्यांच्या विचारांची, श्रद्धांची, जीवनमूल्यांची पाळेमुळे कोठे असतील ? भूतकाळातून ते जीवनरस मिळवितात का ? ' असे अनेक प्रश्न पं. नेहरूंच्या मनात खळबळ माजवू लागले. त्यांच्यासारख्या बुद्धिमान व संवेदनाशील व्यक्तीच्या मनात उद्भवलेल्या अशा प्रश्नांची उत्तरे त्यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन उलगडण्यासाठी उपयोगी पडतात. या प्रश्नांच्या संदर्भातच त्यांनी

म्हटले आहे, ' अशा अनेक प्रश्नांनी मी बेचैन झालो आणि इतिहासाच्या अभ्यासाकडे वळलो.' माणसाचे जीवन आणि प्रेरणा यांचे उत्तर शोधण्यासाठी पंडितजींनी इतिहासाचा अभ्यास केला. यातच त्यांच्या इतिहासविषयक तात्विक बैठकीची व्यापकता समजून घेता येते.

### इतिहास घडतो कसा ?

इतिहास घडतो कसा ? पं. नेहरूंनी हा मूलभूत प्रश्न उपस्थित करून त्याचे उत्तर प्रथम मार्क्स-लेनिन यांच्या विरोधविकासवादी विवेचनात शोधण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्यांना उत्तर सापडले नाही. ते म्हणतात, ' वर्गीय संघर्ष हीच केवळ या इतिहासाला चालना देणारी शक्ती आहे, असे मानणे संयुक्तिक वाटत नाही. ते एक अर्धसत्य आहे. कारण एकदा वर्गीय संघर्षाच्या मार्गाने मानवी विकासाचा आपण शोध घेऊ लागलो, तर माणसाच्या मनातील विविध प्रेरणांचे स्थान काय ? ' वर्गीय हिताची प्रेरणा, हे त्याचे संपूर्ण उत्तर होऊ शकत नाही. शिवाय, या सर्व प्रेरणा सारख्याच असतात काय ? मानवी जीवन गुंतागुंतीचे आहे. ते अशा साचेबंद ठोकळ्यात बसू शकत नाही. ' पण एवढे सांगूनही इतिहास घडतो कसा ? याचे उत्तर मिळालेच नाही.ते म्हणतात, ' या उत्तरासाठी मी शब्दांचे कीस पाडू इच्छित नाही. घटपटादी शब्दच्छलही करू इच्छित नाही.'

### इतिहासविषयक महत्त्वाचे सूत्र

असे सर्व विवेचन केल्यानंतर पं. नेहरूंनी इतिहासविषयक एक महत्त्वाचे सूत्र सांगितले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, ' वर्तमानकाळाशी संबद्ध अशा भूतकालीन घटनांचा मी शोध घेतो. वर्तमानकाळाची मुळे भूतकाळात असतात. ही मुळे शोधणे हा इतिहासाचा हेतू ' पण असा भूतकाळ तरी स्वतंत्र आणि वेगळा असतो काय ? भूतकाळही वर्तमानकाळाशी स्पर्श करणारा असावा.' याचे स्पष्टीकरण करताना पं. नेहरू म्हणतात, ' विद्वान पंडितांप्रमाणे समाजजीवन निरपेक्ष असा इतिहास मी लिहू शकत नाही. तिथ्यामिथ्यांच्या वादात मी जाऊ इच्छित नाही. वर्तमानकालीन घटनांच्या संदर्भाशी न जुळणारा इतिहास पाहिला, तर भूतकाळ केवळ थंड गोळ्याप्रमाणे निर्जीव आणि नीरस होईल. इतिहास सजीव व्हायचा असेल, तर त्यासाठी भूतकाळातील समाजजीवन आणि वर्तमानकाळातील समाजजीवन यांचा कोठेतरी अनुबंध शोधला पाहिजे. '

इतिहासविषयक वरील दृष्टिकोन अधिक स्पष्ट करताना पं. नेहरूंनी काळाला प्रवाहाची अतिशय चपलख उपमा दिली आहे. ते म्हणतात, ' भूतकाळ, वर्तमानकाळ हे शब्दसापेक्ष आहेत. काळाचा प्रवाह सलग वाहात असतो. त्यातील जीवन एकच आहे. ते खंडित करून काळाचा शोध घेता येणार नाही. आपल्या समकालीन जीवनाचा आणि शेकडो मैलांवरून वाहात आलेल्या जीवनाचा अनुबंध एकच आहे. त्यांची सांधेजोड समजून घेतली तरच कालप्रवाहाशी असलेले माणसाचे नाते स्पष्ट होईल.' हे सर्व निवेदन करण्यामागे पं. नेहरूंचा उद्देश स्पष्ट आहे. इतिहासाचा वेध घेताना वर्तमानकाळाचे भान सुटता कामा नये. भूतकाळ समृद्ध होता, सुवर्णमय होता असे स्वप्न रंगविणाऱ्यांना वर्तमानकालीन जीवनाचा वास्तव बोध होऊ शकणार नाही. भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांचे संदर्भ जुळविणारा इतिहास पाहण्याची गरज असते. खरे तर, माणसाने काळाचा वेध घेण्यासाठी विविध कालखंडांना नावे दिलेली असतात. पण अशा सर्व कालखंडांचे सूत्र एकच असते. जीवनप्रवाहाचे वेगवेगळे भाग कल्पिण्यामागे त्यात विवेचनाची सोय पाहिलेली असते एवढेच.

### ह्या संचिताचा वारसदार

माझा वारसा कोणता ? असा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न पं. नेहरूंनी ' Discovery of India ' या ग्रंथाच्या आरंभीच केलेला आहे. त्याचे उत्तर देताना ते म्हणतात, ' हजारो वर्षांत मानवाने जे

मिळविले त्याचा मी वारसदार आहे. त्या प्रदीर्घ काळातील मानवाची सुखदुःखे, त्याचे यशापयश, त्याने मिळविलेले वैभव आणि त्याला आलेले वैफल्य, त्याने केलेली सकृत्ये, आणि त्याच्याकडून घडलेली दुष्कृत्ये, या सर्वांचा मी वारसदार आहे. ' माणसांच्या भावना, त्यांच्या भाषा, त्यांची संस्कृती, त्यांच्या मनावर झालेले संस्कार या सर्वांचा मी वारसदार आहे. मानवाचे साहस आणि शोध, विज्ञान आणि अज्ञान यांचाही मी वारसदार आहे.' पं. नेहरू अशा वैचारिक आणि भावनात्मक सर्वच गुणदोषांचा वारसदार असल्याचे सांगतात. त्याचबरोबर त्यांनी भारताच्या भूमीचे ऋणही मान्य करून कृतज्ञतापूर्वक या भूमीचा वारसा मान्य केला आहे. असे ऋण मान्य करण्याची भारताची जी परंपरा आहे, तिचाही वारसा ते सांगतात आणि पुढे त्यावरून त्यांनी काढलेला निष्कर्ष विशेष महत्त्वाचा आहे. ' या ऋणाचे आकलन होणे म्हणजेच इतिहासाचे आकलन होणे. याच भावनेतून आणि याच प्रेरणेने मी भारताचा शोध घेत आहे. येथील संस्कृतीचा आणि संचिताचाही मला शोध घ्यावयाचा आहे.'

भारताचा शोध म्हणजे तरी काय ? पंडितजींच्याच शब्दात सांगायचे तर, ' येथील संस्कृतीचा आणि संचिताचा शोध घेणे '. पण ही संस्कृती आणि असे संचित दृश्य स्वरूपात किती आणि त्यामागच्या तत्त्वस्वरूपात किती आणि कसे असू शकेल ?

## संस्कृतीचा अखंड प्रवाह

पं. नेहरूंनी या प्रश्नांच्या उत्तरासाठी मोहेंजोदारोच्या इतिहासापासून अगदी अलिकडच्या इतिहासकाळापर्यंत धावता मागोवा घेतला आहे. त्यावरून त्यांच्या संस्कृतीविषयक विचारांचा उद्बोधक परिचय होतो. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, या देशाला हजारो वर्षांचा भरगच्च इतिहास आहे. मोहेंजोदारोचा प्राचीन काळ, वैदिक काळ, उपनिषदांचा कालखंड, रामायण, महाभारत, पुराणे, विविध प्रकारचे साहित्य, नाटके-महाकाव्ये, यांच्या निर्मितीचा काळ. हे सर्व निर्माण करणारा भूप्रदेशही विशाल आहे. भारत म्हटल्यावर आपल्या डोळ्यापुढे कोणत्या गोष्टी येतात ? येथील तत्त्वज्ञान, वास्तुकलांचे नमुने, येथील समाजरचना, त्यातील चढ-उतार, उत्तरेकडील हिमालय, देशातील अनेक पर्वतराजी, नद्या, निसर्गाने नटलेले प्रदेश, त्याबरोबरच या देशातील रसिकता, बुद्धिवैभव, व्यापक दृष्टी या सर्वांनी संस्कृतीचा एक प्रवाह निर्माण केला. त्याचा शोध हाच इतिहासाचा शोध होय. हे सांगत असतांना इतिहासकाळातील विषमता, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था यांचा निषेध करण्यास ते विसरले नाहीत आणि हे सर्व लक्षात घेऊन ते म्हणतात, ' इजिप्त आणि ग्रीक या संस्कृती लोप पावल्या. पण भारताची संस्कृती आजवर टिकून राहिली. कारण या संस्कृतीचा पाया अभंग होता म्हणून ती अखंडितपणे प्रवाहित राहिली. '

संस्कृती, व्यापक दृष्टी, इतिहासवैभव, संचित यासारख्या संज्ञांचा गौरवपूर्ण उल्लेख करताना पं. नेहरूंनी या देशातील वर्णव्यवस्थेचे आणि जातिव्यवस्थेचे कोठेही समर्थन केलेले नाही. एवढेच नव्हे, तर अशा विषमतेवर आधारलेल्या समाजव्यवस्थेमुळे ज्या रूढी निर्माण झाल्या, परंपरा आणि प्रथा चालू झाल्या; त्यांची भलामण करण्यासाठी ज्या कथा, दंतकथा आणि कल्पित कथा सांगितल्या जाऊ लागल्या, त्या सर्वांबद्दल ' घृणा वाटते ' असेच म्हटले आहे.

## वायव्येकडील वादळ

' आठव्या-दहाव्या शतकापासून भारताची भाग्यरेषा मंदावत गेली. भूतकाळाची आंधळेपणाने पूजा होऊ लागली. कर्मकांडावर भर देण्यात येऊ लागला. व्यक्तीच्या आणि समाजाच्या सर्व व्यवहारांना रुढींनी बांधले. विधिनिषेधांची अनेक बंधने वाढत गेली. अशा सर्व ओझ्याखाली समाजमन चिरडून गेले.' हे सांगत असताना पं. नेहरूंच्या दृष्टीसमोर अकराव्या शतकापासून वायव्येकडून मुसलमानांच्या ज्या स्वाऱ्या झाल्या, त्याचे परिणाम दिसत असले पाहिजेत. त्यासंबंधी वर्णन करताना ते म्हणतात, ' अकराव्या

शतकापासून वायव्येकडून एक प्रचंड वादळ घोंघावत आले. आणि त्याने या देशातील परंपरागत संस्कृतीचा तोंडवळा बदलून टाकला.' या आक्रमणाला पं. नेहरू ' इस्लामी आक्रमण ' म्हणत नाहीत. त्यासाठी ते पठाण, तुर्क इत्यादी शब्द उपयोगात आणतात. आणि त्या आक्रमणाचे अनेक बरे-वाईट परिणामही विस्ताराने सांगतात. पुढच्या काळात त्यातून एक संमिश्र संस्कृती निर्माण झाली, असा त्यांनी निष्कर्ष काढला आहे.

### धर्मश्रद्धा आणि अंधश्रद्धा

इतिहास घडतो कसा ? याचे उत्तर शोधताना पं. नेहरूंनी मार्क्सच्या विरोध-विकासवादी मार्गाची चिकित्सा केली. पण त्यात त्यांना संपूर्ण सत्य सापडले नाही त्यासंबंधीचा उल्लेख वर आलाच आहे. धर्माच्या मार्गाने तरी ऐतिहासिक घटनांच्या निर्मितीचा शोध घेता येईल काय ? वर्गीय संकल्पनेप्रमाणे इतिहास घडत नाही, तर मग धर्माने तरी तो घडतो काय ? असा हा प्रश्न आहे धर्माच्या अनुषंगाने इतिहासाचा अर्थ आणि मार्ग समजून घेता येईल काय ? असा त्या प्रश्नातून आणखी एक प्रश्न विचारता येतो. पण या बाबतीत त्यांनी स्पष्ट शब्दात नकार दर्शविला आहे. धर्मासंबंधी ते म्हणतात, ' समाजाचे जे धार्मिक व्यवहार मी पाहतो आणि विचारवंतांनी जो धर्म मानला आहे, त्यातील धर्माचे तत्त्व आणि व्यवहार मला आकर्षित करू शकत नाहीत. मग तो धर्म हिंदूचा असो, इस्लाम असो किंवा बौद्ध वा ख्रिश्चन धर्म असो. हे धर्म अंधश्रद्धेवर आणि धर्मभोळ्या कल्पनांवर उभारलेले असतात ; तसेच ते हटवादी श्रद्धांच्या आहारी गेलेले असतात. अशा धार्मिक विचारांची बैठक आणि जीवनाच्या समस्यांकडे पाहण्याची दृष्टी वैज्ञानिक नसते. अशा विचारात आणि श्रद्धेत चिकित्सक वृत्तीला वाव नसतो. सर्व विचार अलौकिक, अद्‌भुत आणि अतिमानवी श्रद्धांवर आधारलेले असतात.

### प्रगतीच्या मार्गावरील अडथळा

पण धर्मातील हे दोष लक्षात घेऊनही पं. नेहरूंच्या मते, प्राचीन परंपरा एकदम फेकून देता येत नाहीत. जुन्याचा सांधा नव्या विचारांशी जोडावा लागतो आणि त्यातून नवा विचार अधिक प्रभावी बनवावा लागतो. स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात त्यांनी व्यक्त केलेली अशी समन्वयवादी दृष्टी हिंदू आणि मुसलमान यांच्या ऐक्याच्या संदर्भातही दिसून येते. धर्माचा कर्मठपणा त्यांना मान्य नाही. धार्मिक रूढीबद्ध विचार ते त्याज्य ठरवितात. ईश्वरासंबंधीची कल्पना त्यांना अमान्य आहेत आणि पारलौकिक विचारांना तर ते असंबद्ध कल्पनांचा खेळ मानतात. म्हणून सामान्य माणसाच्या मनावरील धर्मकल्पनांचे सावट दूर होणे आवश्यक आहे. तसे झाल्याशिवाय प्रगतीपर विचारांचा मार्ग मोकळा होणार नाही, असेही ते आग्रहाने प्रतिपादन करतात. त्यासाठी ते युरोपच्या इतिहासाचा मागोवा घेतात. युरोपमध्ये तेराव्या-चौदाव्या शतकापासून विचारप्रबोधनाचे युग सुरू झाले. त्यामुळे अनेक धार्मिक रूढी आणि बंधने तुटत गेली. आणि त्यातूनच युरोपचा कायापालट झाला, असा ऐतिहासिक दाखला ते देतात. यासंबंधीच्या विवेचनात ते म्हणतात, ' जुनी बंधने नाहीशी होणे याचा अर्थ समाजाची अनेक दिशांनी प्रगतीचे मार्ग मोकळे होणे असाच होतो. विज्ञान, कला, साहित्य, वास्तुशिल्प, नवे शोध यासारख्या अनेक क्षेत्रात भारताला प्रगती करण्यासाठी समाजाची जुनी बंधने तुटली पाहिजेत. तरच येथील माणसाच्या बौद्धिक शक्ती मुक्त होतील, विशाल होतील आणि विस्तारतील.' हे सर्व सांगून पंडित नेहरूंनी म्हटले आहे, आपल्या देशाला ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळाल्यावर येथील लोकांची बुद्धी अनेक क्षेत्रात आणि अनेक दिशांनी विस्तारत जाईल, विकसित होत जाईल.

### मनाचे भान विज्ञानाची जाण

पं. नेहरूंचा हा आशावाद स्वातंत्र्यानंतर फलद्रूप झाला की नाही ? झाला नसल्यास का झाला नाही ? झाला असल्यास किती प्रमाणात ? किती क्षेत्रात ? या अणि अशाच प्रश्नांची उत्तरे

शोधणे हा स्वतंत्र विवेचनाचा विषय होऊ शकतो. त्यासाठी पं. नेहरूंचे राजकारण, समाजवादी विचार, राष्ट्रीय ऐक्याची कल्पना, परराष्ट्र धोरण इत्यादी विषयांची चिकित्सा करावी लागेल. येथे ते अभिप्रेत नाही. येथे फक्त त्यांच्या इतिहासविषयक भूमिकेसंबंधी विचार करावयाचा आहे. त्याविषयी एवढेच सांगता येईल की पं. नेहरूंनी आपल्या आशावादाच्या फलनिष्पत्तीसाठी इतिहासविषयक जे दोन निकष मानले होते ते आजही दुर्लक्षित आहेत. भूतकालीन घटनांचा अर्थ शोधताना वर्तमानाचे भान सुटता कामा नये आणि भविष्याची स्वप्ने रंगविताना विज्ञानाची जाण निसटू नये. पंडितजींनी मानलेल्या या दोन कसोट्या. पण आजतरी सर्वच धर्मांचे मुखंड, पुरस्कर्ते आणि अनुयायी, समाजाच्या भूतकाळाचा अर्थ आपापल्या धर्मग्रंथात शोधण्यात गुंतलेले दिसतात. त्यामुळे त्यांना वर्तमानकालीन वास्तवाचे विस्मरण होत असल्याचे दिसते. याचीच स्वाभाविक परिणती म्हणून, विज्ञानाऐवजी अज्ञानजन्य कर्मठ कल्पनांच्या भराऱ्यांनी भविष्याचा वेध घेण्याची ते खटपट करीत असल्याचेही लक्षात येते. अशावेळी पंडित नेहरूंच्या इतिहासविषयक भूमिकेचे मर्म समजून घेणे अधिकच अगत्याचे ठरते.

□ □ □

# पंडित जवाहरलाल नेहरू यांनी घेतलेला भारताचा शोध

□ प्र. श्री. नेरूरकर

पंडित जवाहरलाल नेहरू यांचं; त्यांच्या प्रिय भारत देशातील उण्यापुऱ्या पंचाहत्तर वर्षांच्या काळात व्यतीत झालेले जीवन समग्र आणि संपूर्ण भारतमय होतं. त्यांच्या प्रत्येक श्वासा-उच्छवासात, त्यांच्या चिंतनात आणि कृतीत, त्यांच्या जाणीवेत आणि जागृतीत, त्यांच्या वाणीत आणि त्यांच्या लेखणीत त्यांचा प्यारा महान भारत देश ओतप्रोत भरून राहिलेला होता. तसे त्यांचे अवघे घर सारे विश्व हेच होते आणि ज्ञानेश्वरी संकल्पनेप्रमाणे ते विश्वमय व्यक्तिमत्व धारण करणारे व जोपासणारे विसाव्या शतकातील महान विश्वपुरुष होते. ' चिंता करितो विश्वाची ' या उक्तीचा प्रत्यय त्यांच्या ऐहिक अस्तित्वाचा प्रत्येक क्षण व्यापणाऱ्या स्पंदनातून व संवेदनशीलतेतून नेहरूचिंतकाला उफाळून आणि भरभरून येत राहतो. म्हणूनच विसाव्या शतकातील भारताच्या इतिहास-वाटचालीचा विचार करताना त्या संदर्भात भारत म्हणजे नेहरू व नेहरू म्हणजेच भारत असे लक्षणार्थी कुणाला म्हणावेसे वाटले; तर त्यात कुणा ऐतिहासिक सत्याचा अपलाप किंवा अवमान होतो असे म्हणता येणार नाही, असे मला मनोमन वाटते. भारताच्या भूतकाळाची, वर्तमानकाळाची, भविष्यकाळाची ओढ नेहरूंना किती चिरंतन स्वरूपाची, त्यांचे जाणीवेनेणीवेतील संपूर्ण अंतर्याम व्यापून राहिली होती; याचा पुनःप्रत्यय त्यांनी लिहिलेल्या अक्षर मृत्युपत्रातूनही येत राहतो. नेहरू भारतमय होत जातात त्या कालखंडात भारतही नेहरूमय होत जाताना आता सत्तरीत आलेल्या माझ्या पिढीने डोळसपणे अंतःकरण भरून पाहिला आहे. त्यामुळे नेहरू भारताचा शोध घेतात, त्याचा पुनः शोध घेताना; तो शोध घेणाऱ्याच्या धारणा, प्रेरणा व विचारप्रक्रिया जशा वस्तुनिष्ठ होत राहतात तशाच त्या व्यक्तिनिष्ठ व आत्मनिष्ठही होत राहतात. नेहरू भारताचा शोध घेतात तेव्हा ते स्वतःचाच शोध घेतात; हे जाणीवेत अविरत गुंगत, गुंजत रहाते.

१३ एप्रिल १९४४ रोजी पं. नेहरू अहमदनगर किल्ल्यातील आपल्या तुरुंगवासात ' भारताचा शोध ' या आपल्या आत्मपर इतिहासग्रंथ लेखनाचा आरंभ करतात. त्या दिवशी तुरुंगात येऊन त्यांना वीस महिन्यांहूनही अधिक काळ झालेला असतो. ' भारत छोडो 'ची घोषणा ब्रिटिश सत्तेला उद्देशून ९ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधी यांनी मुंबईत गवालिया टँक येथे भरलेल्या ऐतिहासिक काँग्रेस अधिवेशनात केली होती; आणि इंग्रज सरकारने तातडीने योजनापूर्वक भारताच्या सर्व काँग्रेसनिष्ठ ज्येष्ठ पुढाऱ्यांना अटक करून अज्ञातस्थळी रवाना केलेले असते व तुरुंगात डांबलेले असते. आपल्या उत्कट काव्यमय व चिंतनशील भाववृत्तीत पं. नेहरू आपल्या ग्रंथाची सुरुवात करतात, ती वाङ्मयीनरीत्या आपल्या संवेदनेला मोरपिशी हळुवारपणाने पण खिन्नपणे तरल स्पर्श करीत रहाते व आपल्यालाही लेखकाबरोबरच अंतर्मुख करते. ते लिहितात.' "आम्हाला इथे आणल्यापासून वीस महिन्यांहून अधिक काळ झाला

आहे. माझ्या नवव्या तुरुंगवासाच्या मुदतीचा २० महिन्याहून अधिक काळ प्रतिपच्चंद्र, काळोखी आकाशात धूसरपणे झळाळणारी कोर, तिने आमच्या येथील आगमनाचं स्वागत केलं. वृद्धींगत होत जाणाऱ्या चंद्राचा द्युतिमान पंधरवडा सुरू झाला होता. . . . चंद्र, तुरुंगातील माझा निरंतर सोबती, निकटतर ओळखीने अधिकच मैत्रीपूर्ण झाला आहे. स्मरण करून देणारा, या जगाच्या रमणीयतेचे, जीवनाच्या वृद्धीचे आणि लयाचे, काळोखामागून येणाऱ्या प्रकाशाचे, असमाप्य क्रमाने एकमेकामागून जाणाऱ्या मृत्यूचे आणि पुनरूत्थानाचे-निरंतर बदलत रहाणारा, तरीही निरंतर तसाच. रात्रीच्या शांत प्रहरांमध्ये, सावल्या जसजशा लांब होत जातात आणि उषःकालचा श्वास आणि कुजबूज; येणाऱ्या दिवसाचे अभिवचन घेऊन येतो, अशा संध्याकाळी त्यांच्या निरनिराळ्या कलांमध्ये आणि त्याच्या अनेक भाववृत्तींमध्ये मी त्याला निरखून पाहिलेले आहे. दिवस आणि महिने मोजण्यात चंद्र किती उपयोगी पडतो, कारण चंद्राचे आकारमान आणि डौल, जेव्हा तो दृश्य असतो; महिन्याचा दिवस उचित तंतोतंतपणे निर्देशित करतो."

तुरूंगवास भोगण्यासाठी अहमदनगरच्या किल्ल्यात प्रवेश केल्यानंतर पं. नेहरू आणि त्यांच्या किल्ल्यात आणलेल्या सहकारी राष्ट्रनेत्यांची जगापासून व त्यांच्या निकटवर्ती कुटुंबीय जनांपासून पूर्णपणे ताटातूट करण्यात आली होती. तीन आठवड्यानंतर हळूहळू त्यांना पत्रे, वर्तमानपत्रे मिळू लागली पण भेटीगाठी मात्र बंद झाल्या होत्या. अशा मनोवस्थेत पं. नेहरू आत्मचिंतनपर लेखनप्रवृत्तीतून भारताचा शोध घेऊ लागतात; तेव्हा ते आपल्या या ग्रंथाची दहा दीर्घ प्रकरणांमध्ये नीट विभागणी करतात आणि पुन्हा प्रत्येक प्रकरणामध्ये विषयवार टिपणवजा लेखनखंड लिहून आपले प्रकरण पूर्ण करतात. अहमदनगर किल्ल्यातील वास्तव्यानेच ते लेखनाचा आरंभ १३ एप्रिल १९४४ रोजी करतात व अहमदनगर किल्ल्यातील वास्तव्यातच १३ ऑगस्ट १९४४ रोजी आपल्या ग्रंथाच्या अखेरीकडे आत्मचिंतनात्मकतेने येत राहतात. दरम्यान, भारत देशात आणि जगात खूप काही घडलेले व घडत असते. मलबार, विजापूर, ओरिसा, आणि सर्वात जास्त म्हणजे अत्यंत सुपीक व समृद्ध अशा ' सोनार बंगाल ' मध्ये मनुष्यनिर्मित भीषण दुष्काळ पडलेला असतो. लाखो मुले, स्त्री-पुरुष अन्नाविना मरण पावतात. अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांनी चार स्वातंत्र्ये सादर केलेली असतात. त्यापैकी मोठे स्वातंत्र्य म्हणजे गरजेपासून स्वातंत्र्य आणि तरीही धनाढ्य इंग्लंड, अमेरिका भारतातील दुष्काळाकडे उपेक्षेने पाहतात. आशिया, युरोप, आफ्रिका, पॅसिफिक, ॲटलांटिक आणि हिंदी महासागर या भू व जल भागावर जहरी युद्ध पेटलेले असते. संपूर्ण जगावर स्वामित्व प्रस्थापित करू पाहणाऱ्या फाशीवाद व नाझीवादाविरुद्ध हे युद्ध, मित्र राष्ट्रांनी पुकारलेले असते. या महायुद्धवर्षांपैकी जवळ जवळ तीन वर्षे पं. नेहरूंनी अहमदनगर व अन्यत्र तुरुंगवासात घालविलेली असतात. पहिल्या ' अहमदनगर किल्ला ' या प्रकरणातील चौथ्या लेखनखंडाला " तुरुंगातील काल : कृतीची निकड " असे शीर्षक देऊन पं. नेहरू लिहितात,[२] " तुरुंगामध्ये काळ आपला स्वभाव बदलतोसे वाटते. वर्तमानकाळ क्वचितच अस्तित्वात असतो. कारण तिथे भावना व संवेदनाचा अभाव आहे; ज्या त्याला मृत भूतकाळापासून विभक्त करू शकतील. ऑगस्ट कॉम्टे म्हणतो त्याप्रमाणे, आमच्या भूतकाळात बंदिस्त झालेली मृत माणसांची जीवने आपण जगत असतो आणि विशेषतः तुरुंगामध्ये असे आहे जिथे भूतकाळाच्या स्मरणार्थ किंवा भविष्यकाळाच्या तरल कल्पनाविलासार्थ आमच्या भुकेलेल्या आणि कुलुपबंद भावनांसाठी काही पालनपोषण शोधण्याचा आम्ही प्रयत्न करतो. तरीही भूतकाळ निरंतर आपल्याबरोबर असतो आणि आपण सगळे जे काही आहोत, व आपल्याकडे आहे ते भूतकाळातून येते. आपण त्याच्या उत्पादित वस्तू आहोत आणि आपण त्यात गढून रहातो. ते काहीतरी आपल्या अंतर्यामी जगत आहे हे न ओळखणे आणि न जाणणे; वर्तमान काळ न समजणे आहे. त्याचा वर्तमानकाळाशी संयोग करणे आणि ते भविष्यकाळापर्यंत लांबविणे,

जिथे ते असे जोडणे शक्य असणार नाही त्यापासून तुटून जाणे, हे सर्व विचाराचे आणि कृतीचे स्पंदनशील व कंपनशील साहित्य तयार करणे– ते आहे जीवन. . . . तत्त्वज्ञानात्मक अर्थाने मानवी स्वातंत्र्य अशी कोणती वस्तू आहे किंवा फक्त स्वयंचलित निर्णायकता आहे की काय हे मला ठाऊक नाही. . . अशा तत्त्वज्ञानात्मक किंवा आध्यात्मिक समस्यांचे ओझे सहसा मी माझ्या मनावर लादत नाही; ज्या उकल टाळतात. . . कृतीची हाक दीर्घ काळापासून माझ्याबरोबर आहे, विचारापासून फारकत केलेली कृती नव्हे, परंतु काहीशी त्यातूनच संतत क्रमाने वाहत राहणारी. . . आणि तरीही, आता सुद्धा, कृतीची हाक माझ्या अंतर्यामीचे विचित्र तळ ढवळून काढते आणि वारंवार विचाराशी त्रोटक झोंबाझोंबी. . . ही कृतीची निकड ही कृतीतून जीवन अनुभवण्याची इच्छा, हिने माझ्या सर्व विचारावर व कृतीवर प्रभाव पाडलेला आहे. . . जेव्हा प्रत्यक्ष कृती मला नाकारण्यात आली आहे तेव्हा भूतकाळाकडे आणि इतिहासाकडे जाणारा असा काही प्रवेशमार्ग मी शोधलेला आहे. कारण माझ्या स्वतःच्या व्यक्तीगत अनुभवांनी वारंवार ऐतिहासिक घटनांना स्पर्श केलेला आहे आणि कधी कधी माझ्या स्वतःच्या क्षेत्रामध्ये अशा घटनांवर प्रभाव पाडण्यासाठी मला सुद्धा काहीतरी करावे लागले आहे, त्यामुळे इतिहास एक जिवंत प्रक्रिया आहे हे दृष्टीपुढे ठेवणे मला कठीण गेलेले नाही, ज्याच्या काही मर्यादेपर्यंत मी स्वतः तादात्म्य होऊ शकलो.''

पं. नेहरू पुढे लिहितात,[३] "मी इतिहासाकडे उशीरा आलो आणि तेव्हा सुद्धा, माझ्या जीवनक्रमाशी असंबद्ध असलेल्या वस्तुस्थिती आणि तारखा शिकण्याच्या आणि त्यावरून निष्कर्ष आणि अनुमाने काढण्याच्या नेहमीच्या सरळ मार्गाने नव्हे. जोंवर मी हे केले, माझ्यासाठी इतिहासाला फारच थोडा अर्थ होता. तशातही निसर्गातील गोष्टी किंवा भावी जीवनाच्या समस्यांमध्ये मला कमी रूची होती. विज्ञान आणि आजच्या आमच्या वर्तमानकालीन जीवनाच्या समस्यांनी मला कितीतरी अधिक आकर्षित केले होते. त्या वर्तमानकाळाची मूळे भूतकाळात रहातात आणि म्हणून मी भूतकाळामध्ये शोधयात्रा केल्या, वर्तमानकाळ समजण्यासाठी त्यात निरंतर एखादा धागा शोधीत, जर कोणता तसा अस्तित्वात असलाच तर. . . जर मला प्रसंगवशात वाटले की, मी भूतकाळाच्या मालकीचा आहे तर मला असेही वाटले की, वर्तमानकाळामध्ये संपूर्ण भूतकाळ माझ्या मालकीचा होता. गत इतिहास समकालीन इतिहासामध्ये विलीन झाला; वेदना आणि सौख्य यांच्या संवेदनांशी निगडीत अशी ती जिवंत वस्तुस्थिती झाली. वर्तमानकाळाच्या संबंधात भूतकाळ शोधणे हा तो प्रयत्न होता. ज्याने मला बारा वर्षांपूर्वी माझ्या मुलीला पत्रांच्या स्वरूपात 'जगाच्या इतिहासाची ओझरती दर्शने' लिहावयाला प्रवृत्त केले. मी काहीसे वरवर लिहिले आणि मला शक्य होईल तितक्या सोपेपणाने, कारण अल्पवयीन असलेल्या एका मुलीसाठी मी लिहित होतो परंतु त्या लेखनामागे होता तो शोध आणि शोधयात्रा. एका साहसाच्या जाणीवेने मला भारून टाकले आणि मी क्रमशः निरनिराळी युगे आणि कालखंड जगलो आणि सोबती म्हणून माझ्याजवळ पुरुष आणि स्त्रिया होत्या; ज्या फार पूर्वी जगल्या होत्या. . . तो तसाच एक शोध होता, जरी तो अलिकडचा आणि अधिक निकट काळांशी आणि माणसांशी मर्यादित होता, ज्याने मला माझे आत्मचरित्र लिहायला प्रवृत्त केले. . . . मला वाटते या बारा वर्षांत मी बराच बदललो आहे आणि अधिक चिंतनशील झालो आहे. . . . जीवनाचे माझे तत्त्वज्ञान कोणते होते ? काही वर्षांपूर्वी मी इतका डळमळीत राहिलो नसतो. तेव्हा माझ्या विचारक्रियेत आणि उद्दिष्टांमध्ये निश्चितपणा होता जो त्यानंतर मावळला आहे. गेल्या काही वर्षांतील भारत, चीन, युरोप, आणि जगभरच्या घटना गोंधळून टाकणाऱ्या, अस्वस्थ करणाऱ्या आणि निराशाजनक आहेत आणि भविष्यकाळ अंधुक आणि धूसर झाला आहे आणि रूपरेखेचा स्वच्छपणा त्याने गमावलेला आहे जो तिने एकदा माझ्या मनात धारण केला होता. . . . कालची ध्येये आणि उद्दिष्टे अजूनही आजची

ध्येये होती परंतु त्यानी आपल्या तेजाचा काही भाग गमावला होता. . . जीवनाच्या समस्यांबद्दल माझा पूर्वीचा दृष्टिकोन कमी अधिक वैज्ञानिक होता. एकोणिसाव्या आणि पूर्व विसाव्या शतकातील सोप्या आशावादाच्या कशाने तरी भरलेला सुरक्षित आणि आरामशीर अस्तित्व आणि आत्मविश्वास जो माझ्याजवळ होता, त्याने ती आशावादाची भावना वाढीला लावली. एक प्रकारचा अस्पष्ट मानवतावाद मला भावत होता. . . धर्म, जो विचारी मनानी आचरणात आणलेला आणि स्वीकारलेला मी पाहिला, मग तो हिंदू किंवा इस्लाम किंवा बुद्ध किंवा ख्रिश्चन असो, त्याने मला आकर्षित केले नाही. तो अंधश्रद्धाळू रिवाजांशी आणि मताभिनिवेशी समजुतींशी जवळून संबंधित होता आणि त्याच्या मागे जीवनसमस्यांची, दृष्टीकोनाची अशी पद्धती होती जी निश्चितपणेच विज्ञानाची नव्हती. . . मूलतः मला या जगामध्ये, या जीवनामध्ये, रस आहे, कोणत्या इतर दुसऱ्या जगात किंवा भावी जीवनात नाही. . . पुष्कळदा, जेव्हा मी या जगाकडे पहातो, मला गूढांची, अज्ञात सखोलतांची जाणीव होते. गूढ म्हणजे काय हे मला ठाऊक नाही. मी त्याला ईश्वर म्हणत नाही. कारण ईश्वराला कितीतरी अर्थ प्राप्त झाले आहेत ज्यांवर मी विश्वास ठेवीत नाही व बौद्धिक दृष्ट्या एकतत्त्ववादाची (Monism) संकल्पना काही मर्यादेपर्यंत आकलन करू शकतो आणि मी वेदान्ताच्या अद्वैत तत्त्वज्ञानाकडे आकर्षित झालेलो आहे; जरी त्याच्या सखोलतेमध्ये आणि गुंतागुंतीमध्ये ते मला समजले आहे असे मी गृहीत धरीत नाही. . . जीवनाकडे कोणत्यातरी नैतिक दृष्टीकोनाचे मला प्रबळ आवाहन वाटते, जरी तर्कशास्त्रदृष्ट्या त्याचे समर्थन करणे मला कठीण होईल. गांधीजींचा उचित साधनांवरचा जोर मला आकर्षित करीत आला आहे; आणि मला वाटते हा जोर हे त्यांचे आमच्या सार्वजनिक जीवनाला सर्वात मोठे अंशदान राहिले आहे. . या जगामध्ये जे प्रायः केवळ साध्यांचा विचार करते आणि साधनांना दुर्लक्षिते, हा साधनांवरचा जोर विजोड आणि लक्षणीय वाटतो. भारतात तो कितपत यशस्वी झाला आहे हे मला सांगता येणार नाही.''

पं. नेहरू जो भारताचा शोध घेतात त्या मागील त्यांची मनोभूमिका त्यांच्या संवेदनक्षम, भावतरल व विचारगत आत्मकथनातून ग्रंथाच्या प्रारंभीच व्यक्त होत राहते; ती त्यांचा भारताचा शोध नीट आकलन करण्यासाठी नीट समजावून घेणे आवश्यक आहे ! पं. नेहरू लिहितात," " मार्क्स आणि लेनिन यांच्या अभ्यासाने माझ्या मनावर प्रबळ परिणाम घडवून आणला आणि त्याने मला इतिहास आणि चालू घडामोडींकडे नव्या प्रकाशात पहावयाला मदत केली. . . मी कितीतरी अतिशय व्यक्तिवादी आहे आणि आत्यंतिक बराकीकरण न आवडण्याइतका मी व्यक्तीगत स्वातंत्र्यावर विश्वास ठेवणारा माणूस आहे. . . मार्क्सवादी तत्त्वज्ञानात्मक दृष्टीकोनातील कितीतरी मी अडचणींशिवाय स्वीकारू शकतो. . . आणि म्हणून, समाजवादी सिध्दांताची मूलभूत तत्त्वे मी स्वीकारली तरी त्याच्या पुष्कळ आंतरिक वादांचा मी स्वतःला उपद्रव होऊ दिला नाही. . . जीवन हे कितीतरी गुंतागुंतीचे आहे आणि आमच्या विद्यमान ज्ञानावस्थेमध्ये आम्ही ते जेवढे काही समजू शकतो, त्याला एका ठराविक सिध्दांताच्या चार भिंतीत परिरूद्ध करून ठेवण्यापलिकडे ते कितीतरी अतार्किक आहे. . . म्हणून, आपण अंतःप्रेरणेला आणि सत्य आणि वस्तुस्थिती जाणण्याच्या इतर पद्धतींना बाहेर ठेवूया नको. विज्ञानाच्या कारणांसाठी सुद्धा त्यांची आवश्यकता आहे. . . . माणसाची चेतना किती आश्चर्यकारक आहे ! असंख्य दुर्बलता असूनही माणसाने, युगायुगांतून, जे त्याने प्राणप्रिय मानलेल्या आपल्या जीवनाच्या ध्येयासाठी, सत्यासाठी, श्रद्धेसाठी, देशासाठी आणि सन्मानासाठी त्याग केला आहे. ते ध्येय बदलेल, परंतु आत्मत्याग करण्याची समर्थता चालूच रहाते आणि त्यामुळेच, माणसाला खूप काही क्षम्य मानता येईल आणि त्याच्यासाठी आशा गमाविता येणार नाही." आपण कुणासाठी आणि केव्हासाठी लिहित आहोत असा स्वतःच स्वतःला प्रश्न करून कदाचित आपण जे काही लिहिले ते कधीच प्रकाशित

होणार नाही असेही पं. नेहरूंना वाटते. युद्धवर्षात झाली नाही एवढ्या फार मोठ्या वावटळी आणि संघर्ष आपल्याला आपण तुरुंगात जी वर्षे घालविणार आहोत त्यातून पहावी लागतील आणि कदाचित खुद्द भारत देश हीच त्याची युद्धभूमी झालेली असेल व तिथे नागरी विक्षोभ निर्माण होईल असेही त्याना वाटते. जागतिक युद्धाकडे केवळ ते दुसरे फार मोठे व फार विशाल युद्ध म्हणून पहात नाहीत. ह्यातून कदाचित एक भले बुरे किंवा अतिशय वाईट व नवे जग उदयाला येईल असे त्याना वाटते आणि म्हणून मग भूतकाळ आणि अदृश्य युगाबद्दलच्या आपल्या दरिद्री लेखनास काय किंमत रहाणार आहे, अशी शंकाही त्यांच्या मनात येते. जर्मन कवी गोअेथेने एकदा म्हटले होते त्याप्रमाणे, पं. नेहरूंना वाटते की, इतिहास लेखन हे भूतकाळाचे वजन व ओझे जे मनावर असते. ह्याचा परिहार करते. त्याना असेही वाटते की ही लेखनप्रक्रिया मनोविश्लेषणाजवळ येणारी आहे. मात्र इथे व्यक्तिऐवजी वंशाचे व मानवतेचे मनोविश्लेषण करावे लागते. पं. नेहरू लिहितात,[५] माझा वारसा कोणता आहे? कुणाला मी वारस आहे? सहस्त्र, दशसहस्त्र वर्षांमध्ये मानवतेने जे काही संपादन केले आहे त्या सर्वाला, तिने जो काही विचार केला आणि तिला जे काही जाणवले आणि सोसले आणि ज्यामध्ये तिने आनंद घेतला त्या सर्वाला, तिच्या विजयाच्या आरोळ्यांना आणि तिच्या पराभवाच्या कटुतम वेदनेला, त्या आश्चर्यकारण साहसाला माणसाच्या जे इतक्या दूरदूरच्या काळात सुरू झाले आणि अजूनही चालू राहिलेय आणि आम्हाला खुणावतेय. या सर्वाला आणि अधिकाला, सर्व माणसांना समान असलेल्या, परंतु भारतीय माणसांसाठी एक विशेष वारस आहे—एक वेगळा असा नव्हे, कारण कुणीही वेगळा नसतो आणि मानववंशाला सगळेच समान आहेत—एक अधिकच विशेषकरून आम्हाला लागू होणारा, काहीतरी जे आमच्या मांसात, रक्तात आणि हाडांमध्ये आहे, ज्याने जे काही आम्ही आहोत आणि आम्ही असण्याचा संभव आहे ते केलेले आहे. . . तर माझ्या मनाचा चित्रसज्जा मी भरून टाकला आहे. अशा काही तसबिरी आहेत, चैतन्यमय, जीवन सदृश्य ज्या माझ्याकडे पहाताहेत आणि जीवनाच्या काही उच्चबिंदूंची मला आठवण करून देत आहेत—आणि तरीसुद्धा ते इतके दूरदूरच्या काळातील वाटते आहे आणि मी वाचलेल्या एखाद्या गोष्टीसारखं." ८ ऑगस्ट १९४२ च्या त्या भाग्य निर्णायकदिनी गांधीजी जे काही म्हणाले होते; ते पं. नेहरू मनात जपून ठेवतात. दुसरे महायुद्ध सुरू होते तो काळ. गांधीजी म्हणाले होते,[६] " जगाचे डोळे जरी आज रक्ताळलेले झाले असले तरी आपण शांत आणि स्वच्छ डोळ्यांनी जगाच्या चेहऱ्यात पाहिले पाहिजे."

अहमदनगरमधील तुरुंगकाळात आपलं मन भारताच्या विचारांनी पूर्ण भरून गेलं होतं, असं पं. नेहरू लिहितात आणि लेखणीतून भारताचा शोध कागदावर उतरवतात. हा शोध घेताना त्यांचे ह्रदय अभिमानाने हेलावून जाते तसेच आपल्या भोवती त्यांनी पाहिलेल्या कितीतरी गोष्टींची त्यांना शरम वाटू लागते. अंधश्रद्धाळू प्रथा, जीर्ण समजुती, आणि सर्वात म्हणजे आपली गुलाम आणि दारिद्र्यग्रस्त अवस्था. एका अर्थाने भारताकडे आपण पश्चिमेच्या मार्गाने आलो आणि तिच्याकडे एखाद्या स्नेहशील पाश्चात्यप्रमाणे पाहिलं असंही ते लिहितात. त्यांची भारतासंबंधी प्रतिक्रिया भावनाशी आणि अनेक अंगानी व्यक्तिकेंद्रित आणि मर्यादित होती. तिने राष्ट्रवादाचे स्वरूप घेतले. आपल्या काळातील भारताला राष्ट्रवाद अपरिहार्य आणि स्वाभाविक होता, ते म्हणतात; मात्र या राष्ट्रवादाच्या पुनरूत्थानाने काही नवे प्रश्न निर्माण झालेत व जुन्या प्रश्नांचे स्वरूप पालटलेय, याची जाणीव ते देतात. त्यांच्या मते राष्ट्रवाद हा सखोल आणि सबळ असतो आणि ती एक कोणती भूतकालीन गोष्ट भविष्यकालीन अर्थ नसलेली असत नाही. परंतु आजच्या न टाळता येणाऱ्या वस्तुस्थितीला, आधारलेली नवी ध्येये निर्माण झाली आहेत, ती म्हणजे आंतरराष्ट्रीय ध्येय आणि श्रमिकवर्गीय ध्येय. जगामध्ये समतोल

साधण्यासाठी व संघर्ष कमी करण्यासाठी त्यांच्यामध्ये कोणते तरी एकजीवीकरण झाले पाहिजे. तांत्रिक ज्ञानाच्या शर्यतीत भारतापेक्षा एकेकाळी मागे असलेला युरोप पुढे गेला. या तांत्रिक प्रगतीमागे विज्ञानाची चेतना होती. नव्या तांत्रिक विद्येने पश्चिम युरोपातील देशाना लष्करी ताकद दिली आणि तिच्या बळावर पूर्वेवर, केवळ भारतावरच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडावर, पाश्चात्यानी स्वामित्व प्रस्थापित केले. उलट भारताबाहेरही आपल्या संस्कृतीचा फैलाव आपल्या साहित्यातून आणि ज्ञानातून करणारा भारत आपली तर्कसंगत जिज्ञासू वृत्ती गमावून बसला. अतर्कवादात आणि भूतकाळाच्या आंधळ्या मूर्तीपूजनात तो अडकून पडला. भारताचा प्रत्यक्ष शोध घेण्याच्या हेतूने आपण भारतात दौरे काढले, 'भारतमाता की जय' च्या घोषणा दिल्या, तेव्हा ज्याची व्याख्या करता येणार नाही असे कोणते तरी चैतन्य आपल्या भारताच्या ग्रामीण जनतेमध्ये आपल्याला आढळले; मात्र त्या चैतन्याचा मध्यमवर्गामध्ये अभाव असल्याचेही आपल्याला जाणवले; असे पं. नेहरू सांगतात. भारताची जी एकता त्यांनी अनुभवली ती केवळ एक बौद्धिक संकल्पना नव्हती. तो त्यांना भारून टाकणारा भावनात्मक अनुभव होता, संस्कृतीच्या उदयकाळापासून कोणते तरी एकतेचे स्वप्न भारतीय मनाला व्यापीत होते आणि ते कुणी बाहेरून त्याच्यावर लादलेले नव्हते. लोकाचारात असलेल्या समजुती, चालिरीती आपल्या पोटात तिने घेतल्या होत्या आणि त्याना मान्यता व उत्तेजनही दिलेले होते. सिंधु संस्कृतीचे मूळ स्थान; मोहोंजोदारोला, १९३१ आणि १९३६ या काळात पं. नेहरू दोनदा भेट देतात. हजारो वर्षे विकसित होत सिंधु संस्कृती उच्चत्वाला पोचलेली होती; आश्चर्य म्हणजे ती निधर्मीय संस्कृती होती आणि तिच्यात धार्मिक घटक असले तरी त्यानी तिच्यावर प्रभुत्व ठेवलेले नव्हते. भावी भारतीय संस्कृतीची ती पूर्वप्रवर्तक होती असं त्याना वाटते. त्या अतिप्राचीन काळात कापूस वापरात होता. भारतातच केवळ सुती कपडे वापरात होते. पाश्चात्य जगात त्यांचा वापर व्हावयास दोन ते तीन हजार वर्षे लागली. पर्शिया, मेसापोटेमिया, इजिप्त या समान सुसंस्कृत देशांशी सिंधु खोऱ्याची संस्कृती व्यापारी संबंध ठेवत होती. धनसंपन्न व्यापारी वर्ग जिच्यात महत्वाची भूमिका पार पाडीत होता अशी ती नागरी संस्कृती होती. सिंधु संस्कृती आणि नंतरच्या काळात उदयाला आलेल्या संस्कृती यांमध्ये एक सातत्य हजारो वर्षे राहिले; तरी मग त्यामध्ये काळाचे व संस्कृतीचेही खंड पडलेले दिसतात नंतरची संस्कृती ही बहुधा कृषि संस्कृती होती आणि नवे लोक जे आर्य, या देशात झुंडीझुंडीने येत राहिले; त्यानी ती आणली असावी. सिंधू संस्कृतीतील जीवनाचे भारत देशातील मूळ द्रविड वंशांशी आणि दाक्षिणात्य संस्कृतीशी खूप साम्य आढळते असे काही इतिहास पंडिताना वाटते. आणि पं. नेहरूंना म्हणावेसे वाटते की, सिंधु संस्कृतीच्या कालखंडानंतर हजार वर्षांनी भारतात आलेले आर्य आणि सिंधु संस्कृतीचे प्रतिनिधी असलेले द्रविड यांच्यामध्ये फार मोठा सांस्कृतिक समन्वय व एकजीवीकरण घडून आले. त्यानंतरच्या कालखंडातून या देशात अनेक इतर वंशाचे लोक आले. इराणी, ग्रीक, पर्शियन, बॅक्ट्रिअन, स्कायथिअन, हूण, तुर्क (इस्लाम येण्यापूर्वी), प्रारंभ काळातले ख्रिश्चन, ज्यू, झोरोस्ट्रिअन! इंग्रज इतिहासकार डॉडवेल म्हणतो त्याप्रमाणे या सर्व वंशांना आपल्यामध्ये सामावून घेणारा भारत 'महासागरासारखा अमर्याद सामावून घेणारा' देश होता. म्हणून भारत आपली जीवनशक्ती सचेतन ठेवू शकला व वेळोवेळी पुनरूज्जीवित होत राहिला. व्हिन्सेंट स्मिथ या इतिहासकाराचा दाखला पं. नेहरू देतात. स्मिथ म्हणतो,* "त्यांच्यापूर्वी आलेल्या शक आणि यूहेशी लोकांप्रमाणेच परदेशी (मुस्लिम तुर्क) लोक सार्वत्रिकरीत्या हिंदुत्वाच्या आत्मसात करणाऱ्या विलक्षण शक्तीला शरण गेले आणि त्वरेने हिंदुत्वमय झाले." मात्र व्हिन्सेंट स्मिथ ज्या अर्थाने 'हिंदुत्व' आणि 'हिंदुत्वकृत' हे शब्द वापरतो त्याच्याशी पं. नेहरू सहमत होत नाहीत. त्याहीपेक्षा अधिक व्यापक अर्थाने ते वापरले पाहिजेत असे त्याना वाटते. आपल्या प्राचीन साहित्यात 'हिंदू' हा शब्द आढळत नाही. वैदिक

आणि अवेदिक सर्व श्रद्धांना समाविष्ट करून घेणारा आर्यधर्म भारतात निर्माण झाला होता. आपल्या मुक्तीपथाला भगवान बुद्ध नेहमी ' आर्य पथ ' म्हणत असे. आपला मुद्दा स्पष्ट करण्यासाठी पं. नेहरू, महात्मा गांधी हिंदुधर्माची व्याख्या करण्याचा जो प्रयत्न करतात; त्याचे उदाहरण देतात. गांधीजी म्हणतात,[६] " हिंदू ब्रीदवाक्याची व्याख्या माझ्याकडे कुणी मागितली तर मला एवढेच म्हणावे लागेल : अहिंसात्मक साधनांमधून सत्याचा शोध. एखादा मनुष्य ईश्वरावर विश्वास ठेवणार नाही पण तरीही तो स्वतःला हिंदू म्हणवील. हिंदुत्व म्हणजे कठोर असा सत्याचा पाठलाग. ... हिंदुत्व म्हणजे सत्यधर्म, सत्य देव आहे. देवाला नकार आपण जाणलेला आहे पण सत्याला नकार आपण जाणलेला नाही." संपूर्ण जगभर ' हिंद ' या शब्दाने भारत देश ओळखला गेला व भारतीय माणूस ' हिंदी ' या बिरूदाने ओळखणे उचित आहे कारण ' हिंदी ' या शब्दाची धर्माशी गुंतागुंत नसते.

प्रा. विंटरनित्झचा दाखला देऊन पं. नेहरू म्हणतात की, सिंधु संस्कृतीच्याही अगोदर ख्रिस्तपूर्व २००० ते २५०० या काळी वेदवाङ्मयाचा प्रारंभ झाला असावा. तो काळ मोहेन-जो-दारो कालखंडाकडे आपल्याला नेतो.बहुतेक विद्वान ऋग्वेदातील ऋचांचा काळ ख्रिस्तपूर्व १५०० हा मानतात. पं. नेहरू लिहितात,[७] " धार्मिक ग्रंथ वाचण्यात मी नेहमीच कां कू केले आहे. त्यांच्यातर्फे करण्यात आलेले सर्वकष सत्ताधारी दावे मला भावले नाहीत ! अंतिम आज्ञालेख, ते ग्रंथ जे काही समाविष्ट करतात, त्याकडे जाण्याचे दरवाजे बंद करतात असे माझ्या मनाला वाटले. ते मनुष्य प्राण्यांनी लिहिले आहेत असा जेव्हा मी विचार करतो तेव्हा मी मित्रत्वाने त्यांच्या खूप जवळ जातो व त्याना मोकळा होतो." पंडितजी सांगतात की ; पूर्वकाळातील वेदिक आर्य जीवनाच्या जोमाने सळसळत होते आणि आत्म्याकडे ते फारच थोडे वळले होते. मात्र अस्पष्टपणे मृत्यूनंतर कोणते तरी जीवन अस्तित्व असावे; यावर त्यांचा विश्वास होता. हळूहळू ईश्वराची संकल्पना विकसित होत त्यातून एकेश्वर वाद आणि कांहीसे त्याच्यात सरमिसळ होत, अद्वैत वादाची संकल्पना निर्माण झाली. भारतीय विचारधारेत जीवनाचा स्वीकार करणे आणि जीवनापासून दूर जाणे हे प्रवाह प्रारंभकाळापासून आपल्याला कसे आढळतात याचा समग्र ऊहापोह पंडितजी करतात. जीवनाचा अंतिम हेतू काय असावा यावर भारतीय विचाराने जो जोर दिला ; त्या वस्तुस्थितीतून गोंधळ निर्माण झाला असे पं. नेहरूना वाटते. त्यांच्यामते त्या विचाराने भारतीय मनाला अलिप्तता शिकविली. परंतु पलायनवाद व जीवनवर्धन नाही शिकविले. भारतातील जातिव्यवस्थेच्या उगमाची कारणेही आर्यांचे भारतात आगमन सुरू झाले त्या काळात पं. नेहरू शोधतात ... आर्यांच्या आगमनाने या देशात नव्या समस्या निर्माण केल्या. प्रामुख्याने वांशिक आणि राजकीय. प्रदीर्घ काळ संस्कृतीचा वारसा असलेल्या द्रविडांना त्यांनी जिंकले आणि वांशिक दृष्ट्या आपण त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहोत असे मानले. स्वाभाविकच त्या दोन वंशांमध्ये सांस्कृतिक दरी निर्माण झाली.तत्पूर्वीही या देशामध्ये मागास आदिवासी जनजाती होत्या. भटके लोक वा गिरीजन या वांशिक संघर्षातून आणि परस्पर संबंधातून हळूहळू जातिव्यवस्था उदयाला आली आणि नंतरची शेकडो वर्षे भारताला तिची सखोल बाधा झाली. जितांनी जेत्याना एकतर समूळ नष्ट करावे किंवा त्याला गुलाम करावे अशी प्रथा प्राचीन काळापासून पडलेली असल्यामुळे या देशातील जेत्यांच्या उपयोगाला, जातीची निर्मिती ही उपकारक ठरली. तिच्यामुळे मानवी कामकाजांचे त्याना वाढते विशिष्टकरण करता आले आणि मग त्यातूनच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या वर्णांची उत्पत्ती झाली. ब्राह्मणवर्गाबद्दल पं. नेहरू म्हणतात की, त्या वर्गाने विशेषाधिकार प्राप्त झालेल्या व भूतकाळाशी बंदिस्त राहिलेल्या वर्गाचे सगळे दुर्गुण प्रकट केले आणि त्यांच्यापैकी बहुसंख्यांकडे शिक्षणही नव्हते वा सद्गुणही नव्हते. कोणता तरी आंतरिक ज़ोम व जीवनाची समज असल्यामुळे मूलतः भारतीय संस्कृती टिकून राहिली असे पं. नेहरूंना वाटते. विसाव्या शतकातील महान फ्रेंच विचारवंत रोमाँ रोलाँ भारताबद्दल जे म्हणतात;

ते उधृत करून पंडितजी आपला मुद्दा पटवितात. रोलाँ म्हणतात, " अत्यंत प्रारंभकाळातील दिवसांपासून जेव्हा माणसाने अस्तित्वाचे स्वप्न पहायला सुरुवात केली, जिथे सर्व जिवंत माणसांच्या स्वप्नांना घर सापडले असेल, अशी या पृथ्वीतलावर एकच जागा आहे–ती आहे भारत."

खिस्तपूर्व ८०० वर्षांपासून उपनिषदांचा कालखंड सुरू होतो आणि हिंद आर्य लोक आपल्या वैचारिक विकासात फार पुढे जातात. वेदिक देवकल्पना त्यांना असमाधानकारक वाटतात व पुरोहितांनी आचारलेले कर्मकांड त्याना थट्टेचा विषय वाटतो, पं. नेहरू म्हणतात. तथापि भूतकाळाची नाळ न जोडता तिथपासून नव्या विचारांचा हा नवा प्रवास सुरू होतो; मूलतः तो विचार आत्मज्ञानावर भर देतो. परंतु त्या विचारात व्यक्तीच्या पूर्णत्वावर जो अती भर देण्यात आला त्यामुळे सामाजिक दृष्टिने दुर्लक्षित झाला. त्यातून जो एक आत्यंतिक व्यक्तीवाद व अलिप्ततावाद निर्माण झाला आणि त्याने सर्व विचारप्रणालींना आपल्यात समाविष्ट केले. जातींच्या आणि वर्गांच्या तटबंदीही कोसळल्या आणि मतभेदांच्या दऱ्या दूर झाल्या. एकप्रकारची अध्यात्मिक लोकशाही या विचारमंथनामध्ये प्रत्ययाला येते. उपनिषद कर्त्यांचे विचार मात्र काही निवडक सुसंस्कृतांपुरतेच परिरूद्ध राहिले. विशाल अशा बहुजनसमाजाच्या आकलनापलिकडे ते पूर्णपणे गेले. सर्जनक्षम अल्पसंख्याक आपल्या विचारांचा सूरवलय बहुसंख्याकांना साधून, त्यांचेही उन्नयन व प्रगती करण्याचा प्रयत्न करतील तेव्हा त्यांच्यामधील दरी दूर होईल व स्थिर आणि प्रगतिशील संस्कृती जन्माला येईल व उलट तसे झाले नाही तर अपरिहार्यपणे संस्कृतीचा ऱ्हास सुरू होतो. उपनिषदांची विचारसरणी बहुजनसमाजात न झिरपल्यामुळे समाजात विभागणी झाली आणि खिस्तोत्तर १००० वर्षांच्या सुमारास भारताच्या अंतर्गत ऱ्हासाची चिन्हे दिसू लागली. या परिस्थितीचा वाढत्या पुरोहितशाहीने आपल्या हितासाठी पुरेपुर फायदा करून घेतला आणि बहुजनसमाजाच्या अंधश्रद्धांवर आधारून आपले शक्तीमान हितसंबंध उभारले व ते भक्कम दृढमूल केले. काळाच्या उदरात अनेक भारतीय ग्रंथ नष्ट झाले.; त्यात प्रारंभिक उपनिषद काळानंतर जडवादाचा विचार करणारे साहित्य नष्ट झाले याची पं. नेहरूना खंत वाटते. जडवादी सिद्धांताना प्रतिकार केल्याचे आणि त्यावर टीका केल्याचे उल्लेख तेवढे त्यानंतरच्या साहित्यात आढळतात. तत्पूर्वी कित्येक शतके या देशात जडवादी तत्त्वज्ञानाचा ऊहापोह होत होता आणि त्याचा जनमनांवर प्रभाव पडला होता याबद्दल पंडितजींना संदेह वाटत नाही. खिस्तपूर्व चौथ्या शतकात राजकीय आणि आर्थिक रचनेवर लिहिलेल्या कौटिल्याच्या ' अर्थशास्त्रा ' चा उल्लेख पं. नेहरू या संदर्भात करतात आणि भारतीय तत्त्वज्ञानातील ते प्रमुख तत्त्वज्ञान म्हणून उल्लेखिल्याचा निर्वाळा देतात. जडवादानी प्राधिकरणावर आणि सर्व प्रकारच्या हितसंबंधांवर, धर्म व धर्मशास्त्रावर हल्ला केला. वेद, पुरोहितशाही आणि पारंपरिक समजुती यांचा त्यानी आवेशपूर्ण निषेध केला. या काळात अंतःप्रेरणात्मक अशा उपनिषदाच्या दृष्टीकोनाव्यतिरिक्त संघटीत तर्कवादावर व युक्तीवादावर आधारलेले क्रमबद्ध तत्त्वज्ञान अनेक स्वरूपात प्रकट होऊ लागले. जैन, बुद्धधर्मीय, हिंदू (दुसऱ्या अधिक चांगल्या शब्दाअभावी हा शब्द) तत्त्वज्ञान आले. खिस्तपूर्व सहाव्या शतकात बुद्धागमन झालेल्या ॲलेक्झांडरच्या मृत्यूनंतर चंद्रगुप्ताने मौर्य साम्राज्य उभारले. ऐतिहासिक दृष्ट्या भारतातील ते पहिले प्रबळ, विस्तारीत आणि केंद्रीभूत राज्य होते. तत्पूर्वी बहुधा प्राचीन भारतात प्राचीन ग्रीस देशाप्रमाणे, लहान लहान राज्यांचे समूह अस्तित्वात होते. विशाल क्षेत्र व्यापणारी जनजातींची प्रजासत्ताके होती. नगर राज्ये होती व त्यांवर व्यापारी संघाचे प्रभुत्व होते. बुद्ध काळामध्ये अशी कितीतरी जनजाती प्रजासत्ताक राज्ये होती आणि गांधार किंवा अफगाणिस्थानचा भाग जमेला धरून मध्य आणि उत्तर भारतामध्ये चार प्रमुख राज्ये होती. ग्रीस देशासारखी तिथे आदिम लोकशाही होती आणि कदाचित ती उच्च वर्गांपुरतीच परिरूद्ध होती. पं. नेहरू प्राचीन भारतीय महाकाव्ये, त्यांचा इतिहास, परंपरा, मिथ्यके यांचा सखोल व विस्तृत ऊहापोह करतात. रामायण,

महाभारत, पंचतंत्र, आणि पुराणकथांचा ते मागोवा घेतात. त्यावर भारतीय कवी, नाटककार, नृत्यकार व कलाकालावर आधारलेल्या साहित्यकृतींचाही ते आस्वादक व चिकित्सक परामर्श घेतात. परंतु ग्रीक, चिनी व अरब लोकांप्रमाणे भूतकाळातील भारतीय इतिहासकार नव्हते याची खंतही पंडितजींना वाटते. ख्रिस्तोत्तर बाराव्या शतकात लिहिलेला, कल्हाण रचित ' राजतरंगिणी ', ज्यात काश्मीरचा इतिहास आहे, खरोखर एकमेव प्राचीन ग्रंथ आहे असे पं. नेहरूंना वाटते. अर्थातच भारतात कालांतराने आलेल्या ग्रीक, चिनी आणि अरब प्रवाशांनी लिहून ठेवलेल्या इतिहासाचे किंवा बखरीचे मोल त्याना खूप मोठे वाटते. त्यांच्या मते इतिहासजाणीवेच्या अभावी जनता चिकित्सक दृष्टीला पारखी झाली. भूतकालीन परंपरांवर व पौराणिक कथांवरच पिढ्यामागून वैचारिक दृष्ट्या पोसल्या गेल्या. इतिहासाकडे दुर्लक्ष झाल्याचे परिणाम तेव्हापासून तो आजतागायत भारताला भोगावे लागत आहेत. नंतर समर्थ इतिहासकारांनी जे इतिहास लिहिले ते सुद्धा एकांगीच राहिले. महाकाव्यांचा काळ कोणता हे निश्चित करता येत नसले तरी आर्य लोक या देशात येऊन वस्ताहती करीत होते व स्थिरस्थावर होत होते, हे त्यांच्यावरून जाणता येते. महाभारतावरून आढळते की, त्या काळात वेदांचा बहुईश्वरवाद होता. उपनिषदांचा, अद्वैतवाद होता, देववाद, द्वैतवाद आणि एकेश्वरवाद होते. जातिव्यवस्था चिवट नव्हती. आत्मविश्वासाची भावना होती. परंतु परकीयांची देशावर आक्रमणे होत गेली तसा तो आत्मविश्वास काहीसा ओसरला आणि अंतर्गत ऐक्याची, बळाची, एकरूपतेची गरज त्यांना वाटू लागली. महाभारतांतर्गत असलेली भगवद्‌गीता कालौघाबरोबर कालबाह्य झाली आहे असे पंडितजीना वाटत नाही. तिच्यामध्ये अंतर्विरोध, संघर्ष बिंदू असले तरी तिच्यामध्ये सत्यशोधनाची व चौकशीची कळकळ, चिंतनीयता आणि कृतिशीलतेचा समतोल आणि संतुलन आहे असे पं. नेहरूंना वाटते. त्यांच्या मते ती जीवनापासून पलायन करीत नाही. ती जीवनात पलायन करते. कालानुक्रमाने विकसित होत गेलेल्या भारतीय विचाराला कोणतीतरी चैतन्यमय बैठक व आधार भगवद्‌गीतेत सापडत आला आहे. तेव्हा प्राचीन भारतातील लोकजीवनाच्या सामाजिक व आर्थिक जीवनव्यवहाराचे कोणतेच स्पष्ट चित्र नजरेसमोर उभे रहात नाही याची खंत पं. नेहरू प्रकट करताना, महाभारत हा ग्रंथ मात्र त्याना समाजशास्त्रीय आणि इतर बाबींच्या प्रत्यक्ष आधारसामुग्रीचे भांडार वाटते. कौटिल्याचे ' अर्थशास्त्र ' त्याना मौर्य साम्राज्यातील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सैनिकी समाज रचनेचा ख्रिस्तपूर्व चारशे वर्षांपूर्वीचा तपशील पुरविते. जातक कथांतून बुद्धपूर्व प्रारंभकाळातील हकीगत मिळते. त्या काळात ग्रामसभा एका प्रमाणात स्वायतता उपभोगित होत्या. महसुलाचे मुख्य उगमस्थान जमीन होती. उत्पन्नाचा राजाचा हिस्सा भूमीकर मानला जात होता आणि तो बहुधा नेहमीच नव्हे-वस्तूच्या रूपात दिला जात होता. बहुधा हा कर उत्पन्नाच्या एकषष्टांश असावा. बाहुल्याने ती कृषिप्रधान संस्कृती होती व तिचा स्वयंशासित खेडे हा पायाभूत घटक होता. या ग्रामजमातींतून त्याची दशसहस्त्रांमध्ये गटवारी केली होती, राजकीय आणि आर्थिक संरचना उभारण्यात आली होती. बनारस आणि तक्षशिला किंवा तक्षिला ही वायव्य सरहद्द प्रांतातील पेशावरजवळील बुद्धपूर्व ज्ञानपीठे व विद्यापीठे होती आणि ब्राह्मणी व बुद्धीष्ट ज्ञानाची ती केंद्रे होती. त्यांची कहाणी सांगून मनुस्मृतीची चिकित्सा पं. नेहरू विशेषतः स्त्रियांना वैधरीत्या जे गौण दिले होते त्या संदर्भात करतात. ग्रीक राजदूत मेगॅस्थिनीस याने ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकात भारतात गुलामगिरीची प्रथा प्रचलित नव्हती असे जे म्हटले, ते खरे नव्हते; तर आर्यसमाजांतर्गत शूद्रासह सर्व पायाभूत जाती गुलामगिरीचाच अस्पष्ट प्रकार होता हे पंडितजी दाखवून देतात. मात्र अस्पृश्यांचा त्यात समावेश नव्हता. अशा त्या काळातील भारतीय लोक होते तरी कसे, याचा अंदाज पं. नेहरू घेतात व लिहितात,[११] " ते हलक्याफुलक्या हृदयाचा एक वंश होते, आपल्या परंपराबद्दल विश्वासी व अभिमानी, गूढाच्या शोधासाठी धुडबुड करणारे, निसर्ग आणि मानवी जीवन यांना अनुलक्षून प्रश्नांनी भारलेले, त्यानी निर्माण केलेल्या मूल्यांना आणि मानकाना महत्त्व देणारे, परंतु

जीवन सहजपणाने आणि आनंदाने घेणारे आणि विशेष चिंता न करता मृत्यूला सामोरा जाणारे : ॲलेक्झांडरच्या स्वारीबरोबर आले ग्रीक इतिहासकार, आरिअन, या वंशाच्या हृदयाचा हलकेफुलकेपणा पाहून अचंबित झाला होता. भारतापेक्षा, तो लिहितो, ' कोणतेही राष्ट्र गाण्यानाचण्याचे अधिक शौकीन नाही.''

महावीर आणि बुद्धाचा ऊहापोह करताना पंडितजी जात, प्रथा विचारात घेतात. क्षत्रिय लढाऊ वर्गातून आलेले जैनधर्म संस्थापक व बुद्धधर्म प्रणेते बुद्ध हे समकालीन होते. वैदिक धर्मापासून तुटलेल्या तरीही त्यातूनच वाढीस लागलेल्या त्या ज्ञानशाखा होत्या. अहिंसेवर भर देऊन ब्रह्मचारी संन्यासी व पुरोहितांची संघटना ते बांधतात. आपल्या दृष्टीकोनाशी सत्य हे सापेक्ष असते हा त्यांचा एक मूलभूत सिद्धांत आहे. बुद्धधर्माने प्रत्यक्ष जातप्रथेवर हल्ला केला नाही. परंतु आपल्या सुव्यवस्थेमध्ये त्याने तिला मान्यता दिली नाही. त्यांच्या या दृष्टीकोनामुळे आणि कृतीशीलतेमुळे जातिव्यवस्था खिळखिळी झाली यात संशय नाही. ॲलेक्झांडरच्या सैन्याला त्याच्या मृत्यूनंतर दोन वर्षांतच पिटाळून लावून चंद्रगुप्ताने तक्षिला काबीज केली व उत्तर हिंदुस्थानात पाटलीपुत्र नगरीपर्यंत त्याने कूच केले. मौर्य साम्राज्य स्थापन केले व पाटलीपुत्रनगरी त्या साम्राज्याची राजधानी केली. त्या साम्राज्याचे स्वरूप कसे होते याचा सुदैवाने भारतीय व ग्रीक लोकांनी लिहिलेल्या हकीगतींवरून आपल्याला पत्ता लागतो. त्या दृष्टीने पंडितजी कौटिल्याच्या अर्थशास्त्राला सर्वोच्च महत्त्व देतात आणि कौटिल्य ऊर्फ चाणक्य याचा गौरव करतात. क्लॉसविट्झ या राज्यनीतीशास्त्रज्ञाअगोदर, राज्य धोरणाचे सूत्र इतर साधनांनी, युद्ध हे फक्त चालू असणे होय, हा विचार चाणक्याने मांडला, परंतु त्या धोरणाची महानतर साध्येसुद्धा युद्धाने सिद्ध झाली पाहिजेत आणि युद्ध हेच साध्य होता कामा नये असा इशाराही तो देतो. मौर्य साम्राज्याने ग्रीक जगाशी परस्पर व्यापारी हितसंबंधांवर आधारून राजनैतिक संबंध ठेवले. कॅस्पियन आणि काळ्या समुद्रातून भारतीय माल युरोपला जात होता. खिस्तपूर्व तिसऱ्या शतकातही हा जलमार्ग लोकप्रिय होता. मध्य आशिया तेव्हा सुपीक होता. एक हजार वर्षांनंतर तो शुष्क झाला. राजाचे अश्वधर अरेबियन घोड्यांचे होते असा उल्लेख 'अर्थशास्त्रा'तही सापडतो. आपली शिकवण देताना बुद्ध विवेकबुद्धी, तर्कशास्त्र आणि अनुभव यावर अवलंबून राहतो. आपल्या स्वतःच्या मनातच सत्याचा शोध घ्यायला तो लोकांना सांगतो. माझा कायदा तुम्ही भक्तीभावाने मुळीच स्वीकारता कामा नये. आगीत सोने पारखून घ्यावे त्याप्रमाणे तो पारखून घ्यायला हवा ' बुद्ध सांगतो. प्रत्येक गोष्ट सातत्याने बदलत असते आणि जीवन हे त्याच्या सर्व स्वरूपात नित्य घडत जाण्याची प्रवाही क्रिया असते. सगळेच अभिवाह, स्थलांतर, बदल आहे. बुद्धाचे हे तत्त्वज्ञान आपल्याला आधुनिक पदार्थविज्ञान शास्त्राच्या आणि आधुनिक तत्त्वज्ञान विचाराच्या किती जवळ आणते याचा विचार पंडितजींना आश्चर्यचकित करतो. आत्मरतता आणि आत्मक्लेश या दोन आत्यंतिक टोकांमधील बुद्धाचा मार्ग हा मध्यम मार्ग आहे. बालपणातच बुद्ध कहाणीने आपल्याला किती आकर्षित केले आणि तरुण सिद्धार्थाकडे आपण किती ओढलो गेलो होतो, जो उत्तरकाळात आपल्या अंतर्यामी बुद्ध म्हणून वस्तीला आला; ती कहाणी पं. नेहरू भावोत्कटतेने सांगतात. युगामागून युगे निघून जाताहेत आणि तरीही बुद्ध पार दूर नसल्याचा भास होत रहातो ; त्याचा आवाज आमच्या कानात कुजबुजतो आणि आम्हाला सांगतो, संघर्षापासून दूर पळून जाऊ नका. स्थिर दृष्टी ठेवून त्याला सामोरे जा. विकासासाठी आणि प्रगतीसाठी नित्य महत्तर संधी जीवनात धुंडाळीत रहा. सम्राट अशोक खिस्तपूर्व २७३ साली आपल्या आजोबांच्या गादीवर आला व त्याच्या कारकिर्दीत बुद्धधर्माचा भारताबाहेर फैलाव होऊन भारत हा देश बुद्धधर्माचे व तत्त्वज्ञानाचे आंतरराष्ट्रीय केंद्र कसा बनला, याचा अशोक जीवनावर आधारलेला आढावाही पंडितजी घेतात.

खिस्तोतर ३२० पासून गुप्त साम्राज्याचे युग सुरू झाले. वारंवार होणाऱ्या या देशावरील परकीयांच्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी आणि मातृभूमीच्या रक्षणासाठी जुना ब्राह्मण क्षत्रिय घटक ज्या देशाला ते आर्यावर्त किंवा भारतवर्ष म्हणत होते, त्या देशात आलेल्या आर्यांच्या व एतद्देशीय लोकांच्या ' हिंद आर्य ' संस्कृतीचा समन्वय कसा होईल व संरक्षण फळी कशी उभारता येईल याचा विवाद करू लागला व एकत्र आला. याची प्रतिक्रीया राष्ट्रवाद निर्माण करणारी ठरली. असा राष्ट्रवाद, जो सशक्त होता तसा संकुचितही होता; त्यात धर्म आणि तत्त्वज्ञान, इतिहास आणि परंपरा, रूढी आणि सामाजिक संरचना, यांचे संमिश्रण भारतीय जीवनाचा जवळजवळ प्रत्येक पैलू समाविष्ट करीत झाले होते. त्यालाच ब्राह्मणीधर्म किंवा नंतर प्रचारात आलेला, ' हिंदू ' म्हणण्यात आले व ते राष्ट्रवादाचे प्रतीक ठरले. हिंदूधर्म हा मूलतः राष्ट्रीय होता तर बुद्धधर्म हा आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा, विश्वधर्म होता. राष्ट्रवादी चेतनेतूनच साम्राज्यवादी चेतना निर्माण होते व गुप्त युगामध्ये, ' भारतीय नेपोलियन ' म्हटल्या जाणाऱ्या समुद्रगुप्ताच्या कारकीर्दीत त्याचा गौरवदायी प्रत्यय आपल्याला येतो. कुशाण युगात बुद्धधर्मामध्ये फाटाफूट पडून महायान आणि हीनयान हे पंथ निर्माण झाले. कनोजच्या राजाने हूण लोकांना उत्तर हिंदुस्थानातून पिटाळून लावले. त्याच्यानंतर हर्षवर्धन याने उत्तर व मध्य भारतामध्ये प्रबळ राज्य स्थापन केले. हिंदुत्वाशी जवळिक करणारा ' महायान ' पंथ त्याने स्वीकारला व हिंदू व बोद्ध या दोन्ही धर्मांना त्याने उत्तेजन दिले. खिस्तोत्तर ६४८ साली हर्ष मरण पावला. त्याचकाळी अरबस्तानच्या वाळवंटात इस्लामधर्म उदयाला आला आणि लवकरच आफ्रिका आणि आशिया खंडात पसरला. अरब लोक सिंधु नदीजवळ थांबले. तुर्की आणि अफगाण लोक मात्र हळू हळू देशात पसरले. तरीसुद्धा दिल्लीच्या सिंहासनावर बसेपर्यंत त्याना कित्येक शतके घालवावी लागली. त्या प्रक्रियेत त्यांचे भारतीयकरणही होत गेले. भारतातील विविध घटकांचा समाज करण्याचे ध्येय जवळ बाळगणारा सम्राट अकबर या प्राचीन भारतीय आदर्शाचा प्रतीक ठरला. पंडित नेहरू विशद करतात की, भारतीय तत्त्वज्ञान हे बहुशः व्यक्तिवादी आहे आणि भारतीय सामाजिक संरचना ही जातीयवादी आहे. ती फक्त गटांकडेच लक्ष देते. व्यक्तीला विचार करण्याचे व श्रद्धाधारणेचे स्वातंत्र्य देण्यात येऊनही तिला मात्र सामाजिक व जातीय परिपाटातच जुळवून घ्यावे.

सिंधु संस्कृतीचा, समकालीन इराण आणि मेसोपोटेमिया संस्कृतीशी संपर्क होता. अदेस्त्रामध्ये भारताचा उल्लेख आहे आणि ऋग्वेदामध्ये पर्शियन लोकांचा ' पार्श्वव ' आणि ' पारसिक ' असा उल्लेख आहे. भारतीय इतिहासातील या झोरोष्ट्रीयन कालखंडात सूर्योपासनेला उत्तेजन देण्यात आले. ग्रिको-बुद्धीस्ट कलाशैलीचा प्रभावही इराणच्या कलेवर पडला. तुर्क, अफगाण आणि मोघल लोकांच्या भारत विजयाने मध्य आणि पाश्चिम आशिया खंडाशी भारताचा संपर्क आला. पंधराव्या शतकामध्ये (जेव्हा युरोप खंडात पुनरुत्थानाचा कालखंड सुरू झाला होता) समरकंद आणि बोखारा येथे इराणचा प्रबळ प्रभाव पडलेला तिमुरिद पुनरुत्थानाचा कालखंड विकसत होता. तिमुरिद वंशातील राजपुत्र बाबर दिल्लीच्या तक्तावर आरूढ झाला होता. पंडित नेहरू भारत आणि ग्रीस देशाचा विचार करतात; तेव्हा पूर्व आणि पश्चिम हा शब्दप्रयोग फक्त अत्यंत औद्योगिकरण झालेली युरोप व अमेरिका ही खंडे व त्याबाबतीत मागास राहिलेले आशिया खंड एवढ्याच अर्थाने आपल्याला कळतो, असे म्हणतात. ग्रीक संस्कृती, युरोपीय व अमेरिकन संस्कृती यांच्यामध्ये त्यांना कोणताही मूलभूत सांधा असल्याचे आढळत नाही. ग्रीक लोक एक वंश म्हणून वर्तमानकाळातच जगले. त्यांनी भोवतालच्या वातावरणाशी व सौंदर्याशी नव्याने निर्माण केलेल्या जीवन पद्धतीचा स्वानंदाचा सुसंवाद साधला आणि तरीही त्यांची दृष्टी सखोलतर ज्ञानाकडे वळली होती. भारत व ग्रीसमध्ये, जीवन जसं होतं तसंच स्वीकारण्यात आलेले होतं. कोणत्यातरी आंतरिक जीवनाच्या श्रेष्ठत्वावर विश्वास होता. त्यातून जिज्ञासा आणि

तर्कवाद निर्माण झाला. आता आहे त्याचप्रमाणे भारतात तेव्हाही जातीयवादी जीवन होते. विशेषतः ग्रामीण क्षेत्रातून. ग्रीक संस्कृतीने प्रायोगिक विज्ञानयुगाचा प्रारंभ केला तो अपूर्व होता. युरोपमध्ये जेव्हा अभिजात संस्कृती कोसळून पडत होती व विनाशाकडे जात होती त्याच काळात मध्य युगातून अरबांनी वैज्ञानिक ज्ञानाची ज्योत तेवत ठेवली होती. प्राचीन भारतामध्ये काही राज व सरदार घराणी सोडून दिली तर स्त्रिया पडदानशीन नव्हत्या. ग्रीक साहित्यावरून दिसून येते की समलिंगी संबंधाकडे तुच्छतेने पाहिले जात नसे. मूर्तीपूजा ग्रीसमधून भारतात आली.

पं. जवाहरलाल नेहरू प्राचीन भारतीय रंगभूमीचा विस्तृत व सखोल विचार करतात. भारतीय रंगभूमी पूर्णपणे स्वतंत्र होती व रंगभूमीबद्दलच्या तिच्या संकल्पना व विचार मूलभूतपणे तिच्या स्वतःच्या होत्या. युरोपखंडाला एकोणिसाव्या शतकापर्यंत जे कळले नव्हते ते पाचव्या शतकात कालिदासाला कळले होते. ते म्हणजे हे जग माणसासाठी केलेले नव्हते. जे मानवी नाही अशा जीवनाची प्रतिष्ठा आणि योग्यता माणूस जसजसा ओळखत जातो तेव्हाच फक्त तो आपली पूर्ण उंची गाठतो. कालिदासापूर्वी सुद्धा शूद्रकाचे ' मृच्छकटिक ' नाटक आणि ख्रिस्तीपूर्व ४०० च्या सुमारास दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीत विशाखादत्ताचे ' मुद्राराक्षस ', नाटक भारतीय रंगभूमीवर आले होते. सातव्या शतकात आपले साम्राज्य स्थापन करणारा हर्षवर्धन देखील स्वतः नाटककार होता आणि त्याच काळात भवभूती हा नाटककार संस्कृत नाटके लिहित होता. ' आर्यशास्त्र ' कर्ता चाणक्य हा ' मुद्राराक्षस ' या नाटकाचा नायक आहे व चंद्रगुप्त मौर्य कालखंडाचे प्रतिबिंब त्या नाटकात उतरले आहे. नाट्यलेखनासाठी घालून दिलेले नियम कडक होते व ते सहज मोडता येत नव्हते. तरीसुद्धा त्यात दुबळी दैवशरणता नव्हती. नायक हा नेहमीच सर्व संकटाना तोंड देणारा धीरोदात्त पुरुष असतो. या नाटकांतून ग्रीक शोकांतिकेसारखी भीषण वादळे नसतात. ती अधिक मानवी व सौंदर्यात्मक सुसंवाद साधणारी असतात. ती तर्कसंगत एकात्मता साधतात. युरोपियन प्रेरणेखाली या देशामध्ये नवी विद्याव्यासंग पद्धती आली.वुईल्यम जोन्स आणि इतर इंग्रज, फ्रेंच, जर्मन विद्वानांनी संस्कृत भाषेचा अभ्यास करून तुलनात्मक भाषाशास्त्राच्या नव्या विज्ञानाचा पाया घातला. संस्कृत भाषेचा जोम व तिची उभारणी करण्यासाठी एक प्रकारच्या स्वच्छंद व काव्यात्मक दृष्टीकोनाची आवश्यकता आहे, असे पंडितजीना वाटते. तेराव्या शतकाच्या आरंभाला अफगाण राज्यकर्ते दिल्लीच्या सिंहासनावर स्थानापन्न झाले तेव्हा पर्शियन ही राजदरबारी भाषा झाली व पुष्कळ सुशिक्षित लोक संस्कृत ऐवजी पर्शियन भाषेकडे वळले. इतर लोकप्रिय भाषांचाही विकास झाला व त्यातून साहित्यनिर्मित विविध रूपे प्रकट होऊ लागली. नंतर भारतातील खरा भाषेचा प्रश्न हिन्दी-उर्दू व जिला नंतर हिंदुस्थानी संबोधिले गेलेल्या, भाषेपुरताच परिरुद्ध राहिला. सरहद्द प्रांतातही पर्शियन बरोबर संस्कृत भाषेचे पंडित संशोधक व व्याकरणकार निर्माण झाले.

पंडित नेहरू बुद्ध तत्त्वज्ञानाचा विचार व्यापक व सखोल करतात. गौतम बुद्ध ज्या भागात रहात होते त्या भागात संस्कृतपासून निघालेली प्राकृत भाषा बोलली जात होती व त्या भाषेतूनच पाली भाषा विकसत झाली. त्याच भाषेत बुद्ध धर्मग्रंथ लिहिले गेले. जुन्या श्रद्धाविषयापासून बुद्ध तत्त्वज्ञान तुटून निघत होते व बुद्धनिर्वाणानंतर हा दुरावा वाढतच गेला. त्याच सुमारास ब्राह्मण्याचे आणि संस्कृत विद्याव्यासंगाचे पुनरुज्जीवन होत होते. हीनयान आणि महायान पंथामध्ये वाद सुरू होते.नागार्जुनासारखे काही महान बुद्ध तत्त्वज्ञानी; बुद्धाने आत्मा पूर्णपणे नाकारीत स्वीकारलेल्या अज्ञेयवादी दृष्टीकोनापासून दूर जात होते. आपल्या चिंतनाच्या अंतिम टप्प्यात नागार्जुनाने माध्यमिका किंवा मध्यमपथ तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला. मन हेच केवळ विचारांमध्ये विसर्जन पावते. ते आपल्या हातात विचारघटकांचे काही सैल धागे सोडते आणि त्यांचे दर्शन आपल्याला कोणतेच निश्चित विधान करणे अशक्य करते, जिला विज्ञान म्हणता येईल अशी काहीशी ही जाणीव असते. बुद्ध तत्त्वज्ञानाचा धार्मिक

व राष्ट्रीय जीवनावर अनेकांगी चिरंतन प्रभाव पडला. या देशात दृढमूल झालेल्या पुरोहितवादावर व त्यात निर्माण झालेल्या सामाजिक व धार्मिक लोकाचारांवर गतिमान आणि प्रभावी बुद्धविचाराने हल्ला चढविला. त्या दृष्टिकोनातून पहाता बुद्ध हा केवळ सामाजिक सुधारक न ठरता सामाजिक क्रांतिकारक ठरतो. अर्थातच ब्राह्मणवर्ग चवताळून त्याच्याविरूद्ध उठला. जिथे ब्राह्मण्यवाद दुबळा होता त्या मगध देशात आपली पाळेमुळे रोवणारी बुद्ध तत्त्वज्ञानाची चळवळ ही मूलतः क्षत्रिय चळवळ होती व तिच्यात पुष्कळ ब्राह्मणही सामील झाले होते. बुद्ध तत्त्वज्ञान हे सद्वर्तनी जीवनाला साद घालणारे विश्वव्यापी तत्त्वज्ञान होते. ते वर्ग किंवा जात किंवा राष्ट्र याच्या पलिकडे जात होते. त्या काळातील भारतासाठी तो एक नवा अभिनव दृष्टीकोन होता. सम्राट अशोक याने तो बौद्ध धर्म प्रथम कृतिशीलतेने स्वीकारला. आपले राजदूत व धर्मप्रचारक त्याने जगभर पाठविले. खिस्ती युगाच्या प्रारंभकाळातील शतकांमध्ये विशाल वासाहतिक साहसी उपक्रम हाती घ्यावयाला अशोक काळात निर्माण झालेल्या या वैश्विक दृष्टीकोनानेच बहुधा हिंदू राजांना प्रवृत्त केले. ब्राह्मणवादी संस्था व आर्य संस्कृती त्यानी तिकडे नेली व त्यातूनच परस्पर वेगळेचार करणारी जातीव्यवस्था निर्माण झाली; असे नेहरू विशद करतात. वेद आणि उपनिषदांमध्ये अगोदरच अंतर्भूत असणाऱ्या अहिंसेच्या विचारावर बुद्ध धर्माने जोर दिला व जैन धर्माने तो अधिकच दिला, परंतु बुद्धाच्या विचारसरणीचा संपूर्ण परिणाम जीवनाकडे निराशावादातून पाहणारा असा ठरला. उलट प्राचीन आर्यांचे ध्येय जीवनाच्या संपूर्ण व सर्वव्यापी अंगाचा वेध घेणारे होते. बुद्धधर्माला, हिंदूधर्माला कधीच पूर्णपणे स्थानच्युत करता आले नाही. बुद्धधर्म स्वाभाविकपणेच लोप पावत गेला. ब्राह्मणीधर्म व बुद्धधर्म हळू हळू ऱ्हास पावत गेले व त्या दोघांतही इतक्या अनिष्ट प्रथा व रूढी शिरल्या की बुद्धधर्म कोणता व हिंदूधर्म कोणता हे ओळखता येणे कठीण झाले. भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रारंभकाळ आपल्याला बुद्धपूर्व काळात घेऊन जातो. ब्राह्मण्यवादी तत्त्वज्ञानसंस्था हळू हळू विकसित होत नंतर ती बुद्धवादी तत्त्वज्ञानाशी समांतर होत जाते व एकमेकावर टीका करीत असताही एकमेकापासून खूप काही ती घेत रहाते. खिस्ती युग निर्मितीपूर्वी सहा ' ब्राह्मणी दर्शने ' आकार पावली होती. प्रत्येक दर्शन वेगवेगळा स्वतंत्र विचार व युक्तिवाद करते आणि तरीही त्यांची एकमेकापासून फारकत होत नाही. सांख्यदर्शन; बुद्धवादी तत्त्वज्ञानाप्रमाणेच तर्कवाद व बुद्धिप्रामाण्यवादाच्या मार्गानेच, त्याच्याच आधारावर बुद्धवादी तत्त्वज्ञानाला आव्हान देते. वेदान्त पद्धती ही या दर्शनांमध्ये शेवटची व सहावी. प्रारंभकालीन वेदान्तावर शंकराचार्यांनी आपले अद्वैत वेदान्ताचे तत्त्वज्ञान उभारले. जातीय आधारावर शंकराचार्यांनी ब्राह्मण्यवादी सामाजिक संघटन स्वीकारले. परंतु कोणत्याही जातीतील कोणताही मनुष्य अत्युच्च ज्ञान संपादन करू शकतो असेही त्यानी मानले. उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम अशा भारताच्या प्रदेशांत त्यानी चार महान मठ स्थापन केले. त्या सांस्कृतिक दृष्ट्या एकात्म भारताची दृष्टी व संकल्पना त्याना राबवायची होती. शंकराचार्यांनी या देशात बुद्धधर्माच्या प्रसारास पायबंद घातला असे मानले जाते. परंतु बुद्धतत्त्वज्ञानाने शंकराचार्य प्रभावित झाले होते व म्हणूनच त्यांचे ब्राह्मण विरोधक त्याना ' प्रच्छन्न बुद्ध ' (छुपे बुद्ध) म्हणत असत, याचाही उल्लेख पंडीतजी निक्षून करतात.

भारत आणि चीन यांची जवळीक बुद्धधर्मामुळेच झाली. व या दोन महान देशांमधील परस्पर संबंधाचा पंडीतजी विशेष आस्थेने ऊहापोह करतात. मोठ मोठे चिनी तत्त्वज्ञानी व विद्वान भारतात आले. त्यांच्यामध्ये सातव्या शतकात भारतात आलेला चिनी तत्त्वज्ञ हुएनत्सँग प्रसिद्ध आहे. त्याच्या भेटीने भारत व चीन देशामध्ये राजकीय संबंध प्रस्थापित झाले. मध्य आशिया मार्गाने परत चीनला जाताना हुएनत्सँग बुद्ध व आर्य धर्मग्रंथांची हस्तलिखिते बरोबर घेऊन गेला. त्यातील अनेक सूत्रांचे व शास्त्रांचे चिनी अनुवाद त्याने केले. त्याने भारताबद्दल लिहिलेल्या वृत्तांतातूनच नालंदा विद्यापीठाची

माहिती आपल्याला होते. त्याच्यानंतर भारतात आलेला चिनी प्रवासी इत्सिंग, याने लिहिलेल्या वृत्तावरून आपल्याला कळते की भारतातून पर्शिया (इराण), मलाया, सुमात्रा, चीन या देशात नियमित नौकानयन चालू होते. ' हिंदू ' (Hsin-Ty) या शब्दाचा ऊहापोह इत्सिंग विशेषत्वाने करतो. दहाव्या शतकात चीनमध्ये मुद्रणकला विकसित झाली. हिंद-अफगाण आणि मोगल कालखंडामध्ये भारत-चीनमधील व्यापार वाढला. शैलेन्द्र; ज्याचे इंग्रज इतिहासकार एच. जी. वेल्स महान विजेता म्हणून वर्णन करतात, त्याने नौदल सामुद्रिक विशाल साम्राज्य स्थापन केले व त्यामुळे जावा व कम्बोडीयाशी पाच शतकापर्यंत भारताचे निकट संबंध प्रस्थापित झाले व त्या देशांमध्ये भारतीय कलेचा महान अविष्कार घडवून आला. पर्शियापासून चीनपर्यंत त्याची कीर्ती पसरलेली होती. आशियाच्या या भागाला ' बृहत भारत ' म्हणूनही ओळखले जात होते. दक्षिण भारतातील समुद्रावर प्रभुत्व गाजविणाऱ्या चोला राज्याने शैलेन्द्र साम्राजाचा विस्तार रोखला व दक्षिणेकडे हिंदू पल्लव राज्याने वसाहत विस्ताराची संघटित योजना आखली. शैलेन्द्र राजवंश ओरिसातून आला. जिथे बुद्ध धर्माचा प्रभाव होता व तरीही ब्राह्मण्यप्रधान राजवंश तिथे राज्य करीत होता. खिस्तोत्तर पहिल्या दुसऱ्या शतकापासून तो पंधराव्या शतकापर्यंत भारतीय वसाहतवादाचा कालखंड सुमारे तेरा शतकांचा आहे. नंतर इस्लामधर्माने पूर्व समुद्रावर आपले प्रभुत्व पंधराव्या शतकाच्या अखेरीला स्थापन केले. लवकरच इ. स. १५११ च्या सुमारास अलबुकर्कच्या अधिपत्याखाली पोर्तुगीज आले. अतिपूर्वेला युरोप आला. भारतीय कलेचा विचार करताना ती धार्मिक निकड म्हणून निर्माण झाली असे पंडितजी विशद करतात. आत्मनिष्ठेतून सौंदर्य कल्पिले गेले, वस्तुनिष्ठेतून नव्हे. ती संकल्पना चेतनागर्भ आहे. गुप्तांच्या सुवर्णकाळात अजिंठा वेल्लोर कलाकृती निर्माण झाल्या तो संदर्भही पंडित नेहरू देतात. परदेशाशी भारतीय व्यापार चालू होता त्याचप्रमाणे विज्ञानाचा विकासही भारतात होत होता. रसायनशास्त्र, खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र, गणित, भूमिती, बीजगणीत आणि ' शून्या 'ची संकल्पना व आठव्या शतकात भारतीय विद्वानांचा बगदाद संपर्क व अरबांशी नव्या गणितशास्त्राबाबत झालेली देवाण घेवाण याचा ऊहापोह नेहरू करतात. तो करतानाच विकासाबरोबरच भारतीय ज्ञान व कालापरंपरेचा ऱ्हासकाळ सुरू झाला; तो टिकून त्याची कारणमीमांही पंडितजी बुद्धिनिष्ठतेने करतात. ब्राह्मणधर्म व बुद्धधर्म दोघांचीही अवनती सुरू होते. पूजाविधीचे तांत्रिक मांत्रिक भ्रष्ट प्रकार व योगशास्त्राचे विकृतीकरण या धर्मपद्धतीमध्ये दृढमूल होत जाते. सोळाव्या शतकापासून सृजनशीलता क्षीण होत जाते. भारताने राजकीय स्वातंत्र्य गमाविल्यानंतर भारताच्या वैचारिकतेचा व निर्मितीक्षमतेचा जोम नष्ट झाला, हे तत्त्वज्ञ राधाकृष्णन यांचे मत नेहरू उधृत करतात. मात्र भारत हा प्राचीन काळापासून एक पुराणमतवादाचे व स्फोटक विचाराचे विचित्र मिश्रण ठरलेला आहे असेही पंडितजी म्हणतात. भारतातील उद्योगक्षेत्रात काही व्यवसाय करण्याची काही श्रमिकांच्या गटाला मनाई करण्यात आली होती आणि त्यातूनच जातींचा उगम झाला. कुणबी भूदास बनले. आर्थिक वा औद्योगिक प्रगती होऊनही राज्य संरचना सरंजामदारी राहिली. त्यातून निर्माण झालेली जातीव्यवस्था परिवर्तनाच्या मार्गातील अडथळा बनून राहिली. तरीही नंतरच्या काही कालखंडांनी दाखवून दिले की ; प्राचीन भारतीय समाजरचनेतील जोम आणि चिवटपणा, तिच्यातील लवचिकपणा व जुळवून घेण्याची क्षमता टिकून राहिली होती. त्यामुळे नवे संपर्क व नवविचारांच्या प्रवाहात टिकून रहात तिने काही प्रगतीही केली परंतु ही प्रगती भूतकाळांच्या अवशेषाशी निगडीत राहिली व प्रतिबंधित झाली.

अरब लोक आणि मोगल यांचा या देशाशी संबंध आला आणि त्यातून काही नव्या समस्या निर्माण झाल्या. अरब संस्कृतीचा ऱ्हास होत असताना मध्य व पश्चिम आशियामध्ये वेगवेगळ्या तुर्की टोळ्यांना प्रभुत्व प्राप्त झाले. या तुर्की व अफगाण टोळ्यांनी भारतीय सरहद्दीवरून एक राजकीय

शक्ती म्हणून इस्लामधर्म भारतात आणला. अरबी आणि इराणी संस्कृतीतून प्रेरणा घेत पश्चिम व मध्य आशियामध्ये अरबी संस्कृती विकास पावली. परंतु बगदाद हे अरब संस्कृती केंद्र लोप पावले आणि चेंगीझखान व मोंगल लोकांनी या संस्कृतीचा अंत केला. मध्य आशियातील या मोंगल लोकांनी मुस्लीम धर्म स्वीकारला आणि मधल्या पट्ट्यातील बऱ्याच लोकांनी बुद्धधर्म स्वीकारला. आठव्या शतकाच्या प्रारंभी (इ. स. ७१२) अरबांनी सिंध प्रांत व्यापिला. दक्षिण भारतात त्याचवेळी शक्तीमान चोला साम्राज्य अस्तित्वात होते. सुमारे तीनशे वर्षानंतर खिस्तोत्तर एक हजार साली अफगाणस्तानातील गझनीचा सुलतान महमूद याने भारतावर डाके घालावयाला सुरूवात केली. पंजाब, सिंध त्याने आपल्या राज्याला जोडले. महमूद हा कलासंस्कृतीचा चहाता होता व त्याच्या दरबारात ' शहानामा ' हे महाकाव्य लिहिणारा फिर्दोसी हा महाकवी व अल्बेरूणी हा विद्वान पंडित होता. तो प्रवासी म्हणून भारतात आला. तत्कालिन भारताची बरीच माहिती त्याच्या ग्रंथातून मिळते. भारतीयांचे वर्णन करताना तो लिहितो " ते उद्धट, मूर्ख, गर्विष्ट, आत्मसंतुष्ट आणि भावनाशून्य आहेत. त्याना वाटते की, त्यांच्या देशासारखा दुसरा देश नाही. त्यांच्या राष्ट्रासारखे दुसरे राष्ट्र नाही. त्यांच्या राजांसारखे दुसरे राजे नाहीत. त्यांच्या विज्ञानासारखे दुसरे विज्ञान नाही. त्या काळात भारत हा बहुधर्मीय देश होता. जैन व बुद्ध धर्माला हिंदू धर्माने आपल्या पोटात घातले होते. ख्रिश्चन व हिंदू धर्म खिस्तानंतर पहिल्या शतकात भारतात आले होते. ज्यू होते. इराणातून आलेला लहानसा झोरोष्ट्रीयन समाज होता. पश्चिम किनाऱ्यावर व वायव्येकडे पुष्कळ मुस्लीम धर्मीय रहात होते. इ. स. १०३० साली महमूद मृत्यू पावल्यानंतर १६० वर्षानंतर, गझनीचा अफगाण सुलतान शहाबुद्दीन घोरीने पृथ्वीराज चव्हाणाचा पराभव करून दिल्ली काबीज केली. परंतु उत्तरेकडून दक्षिणेपर्यंत भारतात अफगाण राज्य प्रस्थापित व्हायला आणखी शंभर वर्षे लागली. मात्र दिल्ली; या नव्या व्यवस्थेचे प्रतिकात्मक केंद्र बनले. बाराव्या शतकाच्या अखेरीला भारतात आलेले अफगाण हे हिंद-आर्य वंशाला जवळचे होते. त्यांची पुश्तु भाषा संस्कृत भाषेतून निर्माण झाली होती. विशेषतः बुद्धकालीन प्राचीन शिल्पे जेवढी अफगाणिस्तानात पहावयास मिळतात; तशी फारच थोड्या ठिकाणी भारतात सापडतात. म्हणूनच त्याना हिंद-अफगाण म्हणणे अधिक योग्य होईल असे पंडितजींना वाटते. त्यांनी भारत हेच आपले घर व दिल्ली आपली राजधानी केली. दिल्लीचा सुलतान वंश दक्षिणेकडे पसरला. चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धात तुर्की-मोंगलवंशीय तैमुरने दिल्लीवर स्वारी केली व सुलतान वंश नष्ट केला. दिल्लीला मृत्यूच्या विळख्यातून पुनः वर उठायला कित्येक वर्षे लागली. अफगाण साम्राज्याच्या विध्वंसातून दक्षिणेत अनेक स्वतंत्र राज्ये निर्माण झाली. तत्पूर्वीही चौदाव्या शतकात गुलबर्गा येथे बहामनी राज्य व विजयनगरचे हिंदू राज्य, ही मोठी राज्ये निर्माण झाली होती. इ. स. १५२६ मध्ये तिमूर देशाचा राजपुत्र बाबर, याने भारतावर स्वारी केली व पानिपतावर दिल्लीच्या सुलतानाचा पराभव करून दिल्ली जिंकली. त्याच्या आगमनाबरोबर भारतात मोंगल साम्राज्याचा प्रारंभ झाला. त्याने नवी युद्धसामुग्री आणली. परंतु त्यानंतर भारत विज्ञानात मागासलेला राहिला. संपूर्ण आशिया खंड ' जैसे थे ' राहिले. त्याच काळात (सतरावे शतक) युरोपात विज्ञानाचा विकास होत होता. युरोपियन सत्ताधीश समुद्रावर प्रभुत्व प्रस्थापित करीत होते. भारताची समुद्रसत्ता दक्षिणेकडे संपुष्टात येत होती. पंधराव्या शतकापासूनच अरब व पोर्तुगीज लोक भारतीय समुद्रसत्तेला आवाहने देत होते व त्यांची समुद्र आक्रमणे सुरू झाली होती.

पंडितजी सांगतात की, अफगाण आक्रमणाचे भारतावर व हिंदुत्वावर दोन प्रकारचे, परस्पर विरोधी विकास साधणारे परिणाम झाले. अफगाण राजवटीखालील लोक दक्षिणेकडे पळाले व जातीव्यवस्था अधिकच खडतर करीत कोषबद्ध झाले. परंतु वास्तुशास्त्र, खाद्य व पोषाख, संगीत व पर्शियन भाषेसह इतर भाषांचा विकास, यात एक प्रकारचा समन्वयही घडून आला. मात्र त्यातली एक दुर्दैवी घडामोड

होती. स्त्रियांना वेगळ्या आचारात ठेवणारी पडदा-पद्धती ! मुस्लिम काळात ही पडदा पद्धती विकसत गेली. हिंदू मुस्लिम घराण्यांमध्ये ती प्रतिष्ठेची बाब झाली. ही रानटी पडदा पद्धती भारताच्या न्हासाचे एक कारण आहे व ती केवळ स्त्रियांनाच नव्हे, तर पुरुषानाही अवनत करते; असे पं. नेहरू निक्षून सांगतात. मात्र दक्षिणेकडे व पश्चिमेकडे ही पद्धती, मुस्लिम समाज सोडून गेली नाही व हिंदु समाजातून हळूहळू ती नष्ट झाली. आर्यसंस्कृतीचे वहन दक्षिणेकडे झाले व कट्टर सनातन हिंदुधर्माचा बालेकिल्ला दक्षिणेत स्थापन झाला. संयुक्त प्रांतात जैनपूरसारख्या छोट्या मुस्लिम राजवटीत हिंदु-मुस्लिम संस्कृतीचा समन्वय घडविणारी प्रक्रिया सुरू झाली. हिंदी भाषा उदयाला आली व मुस्लिम राजेसुद्धा दूरवरच्या काश्मीर प्रांतात संस्कृत भाषेला व प्राचीन भारतीय संस्कृती मूल्यांना उत्तेजन देऊ लागले. जुन्या नव्या विचारांची एक नवी घुसळण जनमने व्यापू लागली व त्यातूनच रामानंद, कबीर, गुरू नानक यासारखे सुधारक जातीव्यवस्थेचा निषेध करू लागले. हिंदुत्वावरही या नव्या विचारांचा परिणाम होऊ लागला व भारतातील मुस्लिम धर्मही अन्यत्र अस्तित्वात असलेल्या मुस्लिम धर्मापेक्षा निराळा होत गेला. मुस्लिमांचा सुफीवाद या मातीतूनच जन्म पावला. हिंदी भाषेत अमीर खुश्रूसारख्या तुर्काने व अन्य मुस्लिम लेखकांनी ग्रंथ लिहिले. हिंदी खडी बोलीतील खुश्रूची गीते लोकप्रिय झाली.

व्यापक हिंदू समाजरचनेचा जाती व्यवस्था एक भाग म्हणून त्याचे विश्लेषण करताना त्या समाजरचनेमध्ये ज्या संकटाना अधिष्ठित झाल्या त्यांचे तीन घटक पंडितजी नमूद करतात. (१) स्वयंपूर्ण ग्रामीण जमात, (२) जात, (३) संयुक्त कुटुंब पद्धती. मध्ययुगीन काळात एक प्रकारचा आदिम साम्यवादही प्रचलित होता व मध्ययुगीन युरोपमधील व्यापारी संघासारखी जात मूलतः कार्यात्मक होती असे पंडितजीना वाटते. मात्र आर्थिक बदलाबरोबर संपूर्ण भारतीय समाजरचनेला तडे जाऊ लागले आणि प्रचलित पारंपरिक जातीव्यवस्था टिकून रहाणे अशक्य झाले. सेवा आणि कार्य यावर आधारलेली जात ही एक समूहव्यवस्था होती. व्यक्ती ही त्या समूहाची केवळ एक सदस्य होती व त्याला बांधील होती परंतु धार्मिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने व्यक्ती व्यक्तीवादी बनून वेगळा अध्यात्मिक विचार व आचार स्वीकारू शकत होती. यामुळेच सामाजिक सुधारक निर्माण झाले व आध्यात्मिक विकासास अडथळा निर्माण करणाऱ्या व व्यक्तींमध्ये विभाजन पाडणाऱ्या जातीव्यवस्थेविरुद्ध त्यानी उठाव केला. समूहात्मक जातीव्यवस्थेपासून बुद्धधर्म अलग झाला. त्याने एक प्रकारचा व्यक्तीवाद व विश्वात्मकता आणली. परंतु असामान्य सामाजिक क्रियाशीलतेकडे त्याने पाठ फिरविली. त्याने जातीव्यवस्थेला दुसरा प्रभावी पर्याय दिला नाही व त्यामुळे जातीव्यवस्था चालू राहिली. मग दलित वर्ग आणि अस्पृश्य कोण होते हा प्रश्न विचारून पं. नेहरू लिहितात की, तळागाळातील बहुसंख्य जातींना उद्देशून 'दलित वर्ग' हे नवे नामाभिधान काहीसे अस्पष्टतेने उपयोगात आणले जाते. अस्पृश्यांबद्दल अधिक ठामपणे बोलता येते. हिंदू समाजामध्ये विधिविशिष्ट शुचितेला असामान्य महत्त्व प्राप्त झाले व त्यातूनच अलिप्तता आणि अस्पर्शता निर्माण झाली. अन्य जातींच्या लोकांबरोबर न खाण्याची प्रथा चालू झाली. विशेषतः उच्चतर जातींनी आपली तथाकथित वांशिक अस्मिता या जातीप्रथेला अनन्यतेने जोपासली. यातून निर्माण झालेल्या शक्तिमान हितसंबंधियांनी मूलभूत सामाजिक परिवर्तनाला प्रतिबंध केला व इतर जातीपर्यंत शिक्षणाचा झरा झिरपणार नाही याची कडेकोट काळजी घेतली. वरिष्ठ वर्गांमध्ये प्रचलित असलेल्या रूढींमध्ये नव्या रूढींची भर घालून व त्या चालू ठेवून त्यानी राष्ट्रीय अर्थव्यवस्था अचल, गतिहीन, पारंपरिक, साचेबंद, अप्रसरणशील व प्रगतीशून्य केली.

अफगाण लोक भारतात स्थिरावल्यावर त्यांच्या भारतीयीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. बाबर भारतात एक नेता म्हणून आल्यावर उत्तर हिंदुस्थानात त्याच्या दृष्टीला पडलेले सांस्कृतिक दारिद्र्य त्याने

आपल्या आत्मचरित्रात टिपून ठेवले. कुशल कामगार व कारागिरांची भारतात उणीव नसूनही त्यांच्याजवळ नवे यांत्रिक शोध लावण्याची कल्पकता नव्हती. बाबर म्हणजे त्याचे एक कारण तैमूरने केलेला विध्वंस व कुशल कारागिरांचे दक्षिण भारतात झालेले स्थलांतर मात्र मोगलांच्या आगमनाने भारतीय कलेत, वास्तुशास्त्रात आणि इतर सांस्कृतिक स्वरूपात नवे सचेतन बदल घडून आले. बाबराचा नातू अकबर याने इ.स. १५५६ पासून पन्नास वर्षे सम्राट म्हणून दिल्लीवर राज्य करीत असतना केवळ भौगोलिक दृष्ट्या नव्हे तर मानसिक व आत्मिक दृष्ट्याही एकात्म भारताची संकल्पना त्याने केली; व ती मूर्त स्वरूपात आणण्यासाठी तो झटला. पोर्तुगीज जेझुइट लोक त्याच्या दरबारात आले तेव्हा त्यांची सर्वांगीण ज्ञानपिपासा पाहून ते भारावले. भूसत्ता घेऊन त्याचे अबाधित साम्राज्य चालू असताही समुद्रसत्तेकडे मात्र त्याचे लक्ष गेले नाही. इ.स. १४९८ साली ' केप ऑफ गुड होप ' वरून वास्को ड-गामा कालिकतला आला होता आणि इ.स. १५११ मध्ये अल्बुकर्क याने भारतीय महासागरात समुद्रसत्ता स्थापन केली होती. मोगल राजवटीतच पाश्चात्यांकडून पौर्वात्यांकडे घड्याळ, मुद्रणयंत्र, मुद्रित ग्रंथ, होकायंत्र या स्वरूपात विज्ञान येत होते. हे नवे वास्तूशास्त्र व यांत्रिकीकरण, नौकानयन आत्मसात करण्यात भारतीय कारागीर उदासीन राहिले. पंडितजी म्हणतात की, पंधराव्या शतकात आशिया खंड सुप्त, निद्रिस्त असताना कित्येक शतके मागास राहिलेले युरोप आपल्यामध्ये विविध आणि विशाल बदल घडवून आणीत होते. पुनरूत्थानाचे पर्व तेथे सुरू झाले आणि युरोपियन माणूस मानसिक व आत्मिक गुलामगिरीतून मुक्त झाला. सोळाव्या शतकात अकबराचे साम्राज्य चालू होते तेव्हा भारत युरोपियन अर्थाने सरंजामदारी नसूनही, भारताचा कणा ठरलेला रजपूत वंश आपली वंशराज्ये भारतीय एकात्मितेची पुरेशी बौद्धिक जाणीव न ठेवता चालवित होता. सम्राट अकबर इस्लामधर्मीय असूनही व इस्लाम धर्म व सत्ता धर्मांतरावर भर देत असतानाही राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना तर्कवाद व बुद्धिवाद स्वीकारून कृतीत आणणारा पहिलाच भारताचा द्रष्टा राज्यकर्ता होता. पंडित नेहरू; भारत-मोघल कलेचा नंतर भारतात कसा समन्वय घडून आला व तिचा अविष्कार शतकानुशतके कसा होत राहिला याचे समग्र व सुंदर चित्र रेखाटतात.

मुस्लिम कालखंडात हिंदू लोकांनी सामूहिकरीत्या मुस्लिम धर्म स्वीकारला व धर्मांतर केले; तरी हिंदू धर्मावर वरिष्ठ उच्च वर्गाचे प्रभुत्व अबाधित राहिले. काश्मीरमध्ये तर पंच्याण्णव टक्के हिंदूनी मुस्लिम धर्म स्वीकारला. मात्र तरीही आपल्या पारंपरिक प्राचीन रूढी व प्रथा त्यानी टिकवून ठेवल्या. मुस्लिम कालखंडात स्त्रियांची स्थिती त्याना अवनत करणारी व पडदानशीन गृहव्यवस्थेत त्याना डांबून ठेवणारी अशी होती. उच्च वर्णीय हिंदू समाजानेही तिचे अनुकरण केले. त्यामुळे सामाजिक जीवन अविकसित राहिले. राजकीय, राष्ट्रीय, सांस्कृतिक व सामूहिक जीवनाची सम्राट अकबर यानी सुरू केलेली आगेकूच थोपविण्याचा व घड्याळ पुनः मागे नेण्याचा उपक्रम औरंगजेब बादशहाच्या कारकीर्दीत झाला; तरी या मोगल अमदानीतच धर्मवाद आणि राष्ट्रीयता यांचे एक वेगळेच मिश्रण भावनिक व देशीय पातळीवर होऊ लागले होते. याची जाणीव पंडितजी करून देतात. हिंदू राष्ट्रीयता हा भारतीय भूमीतून निर्माण होणारा स्वाभाविक अविष्कार होता. तरीही एक व्यापक राष्ट्रीयता, विविध धर्मगट या देशात स्थिरावून जी निर्माण होत होती; तिच्या आड अर्थातच तो अपरिहार्यपणे येऊ लागला. त्या दृष्टीने मराठा समाजाकडे राष्ट्रीयतेची व्यापक धारणा कशी होती व राष्ट्रनिष्ठेला ते कसे दृढबद्ध राहिले याचा संदर्भ शिवाजी महाराजांचे उदाहरण देऊन पंडितजी विशद करतात. आणि तरीही औरंगजेबाशी लढा देणारे शिवाजी राजे आपल्या दिमतीला मुस्लीम माणसेही कशी घेत; तेही ते निर्देशित करतात. इ.स. १७०७ मध्ये औरंगजेब मृत्यू पावल्यानंतर पुढील शंभर वर्षे ' ईस्ट इंडिया कंपनी ' ची भारतात स्थापना करणाऱ्या इंग्रज लोकांशी मराठा राज्यकर्त्यांनी जो संघर्ष

केला, त्यात गेली. मोगल साम्राज्य विलयाला जाऊन महाराज्यपाल व राज्यपालांची अधिसत्ता या देशात सुरू झाली होती. हैद्राबादचा निजाम याला मराठ्यांनी आपला मांडलिक करून ठेवला होता तोही इंग्रजांच्या आश्रयाला गेला. भारतात सत्तेचे खरेखुरे सूत्रधार म्हणता येतील असे चौघेजणच अठराव्या शतकात होते. ते होते (१) मराठा राज्यकर्ते, (२) हैदर अली व त्याचा पुत्र टिपू, (३) इंग्रज आणि (४) फ्रेंच. इ.स. १७३९ मध्ये पर्शियामधून नादिरशहाने दिल्लीवर स्वारी केली. त्याचा परिणाम अफगणिस्तान भारतापासून विभक्त होण्यात झाला. मोगल साम्राज्याची क्षीण छाप फक्त दिल्लीच्या तक्तावर राहिली. मात्र नादिरशहाच्या आक्रमणाने मराठा सत्ता खचली नव्हती उलट तिने पंजाब पर्यंत मुसंडी मारली होती. पानिपतच्या युद्धात नामोहरम होऊन ती क्षीण होत गेली व इ.स. १८१८ साली ब्रिटिशाना शरण गेली. तेव्हापासून ब्रिटिश साम्राज्याची भारतात झालेली प्रतिष्ठापना ही ऐतिहासिक घटना ठरली. असे असूनही मराठ्यांकडे जी समर्थ माणसे होती त्यांचा उल्लेख पंडितजी आवर्जून करतात व त्यातही इ.स. १७६५ ते १७९५ या कालखंडात इंदूरची राज्यकर्ती स्त्री राणी अहिल्याबाई हिचा विशेष गौरव करतात. मराठ्यांचे भोवतालच्या जगाचे व स्वदेशाच्या भूगोलाविषयी अज्ञान केवढे प्रचंड होते हेही ते निक्षून सांगतात. त्यामुळे जुन्या शस्त्रांचा वापर करीत, ते आदर्श गनिमी योद्धे ठरले आणि त्या पलिकडे ते जाऊ शकले नाहीत याची खंतही ते व्यक्त करतात. राणी अहिल्याबाई तिच्या जीवनकाळातच कशी एक मोठी आख्यायिका झाली होती हे सांगताना नेहरू लिहितात, "[३] ती एक फार समर्थ अशी राज्यकर्ती व संघटक होती. लोकांकडून महनीयतेने आदरणीय ठरलेली आणि लोकांकडून जिवंतपणी व मृत्यूनंतरही संत म्हणून मानली गेलेली." इंग्रज या देशात स्थिरावल्यावर त्यानी दिवाणी प्रशासन व एक प्रकारची सुव्यवस्था आणली. पंजाबापासून ते काश्मीरपर्यंत आपले राज्य स्थापन करणारा जाट शिख महाराजा रणजितसिंग हा शूर मानवतावादी राज्यकर्ता होता. राजस्थानातील जयपूरचा राजा सवाई जयसिंग शूर, मुत्सद्दी असूनही विज्ञानप्रेमी होता. त्याने जयपूर, दिल्ली, उज्जैन, बनारस, मथुरा येथे वेधशाळा बांधल्या व पोर्तुगीज धर्मोपदेशांकडून पोर्तुगालमध्ये खगोलशास्त्राची झालेली प्रगती ऐकून त्याने त्या शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी स्वतःची माणसे पोर्तुगालच्या राजा इम्यॅनुएलच्या दरबारात पाठविली. नेहरू म्हणतात, त्या काळातही भारतातील वैज्ञानिक चेतना नष्ट झाली नव्हती.

पाश्चात्य संस्कृतीचा भारतावर जो आघात प्रभावीपणे झाला, त्यातून मध्ययुगीन मानसिकतेमध्ये गंजत पडलेल्या भारतीय मनामध्ये 'आधुनिकते' ची जाणीव निर्माण झाली. मात्र ब्रिटिशांनी भारतातील सामाजिकदृष्ट्या प्रतिगामी असलेल्या उच्चभ्रू वर्गाला हाताशी धरले. भारतामध्ये ब्रिटिश राजवटीचा पहिला संपूर्ण अनुभव बंगालने घेतला. इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीला इंग्रजांनी केलेली बंगालची लूट कारणीभूत ठरली; असे ब्रूक ॲडमसारख्या अमेरिकन इतिहासकाराचेही म्हणणे आहे. इ.स. १७६० पासून १७६८ पर्यंत वाफेचे इंजिन आणि कापडनिर्मितीची यंत्रे निर्माण होण्याची जी वैज्ञानिक प्रगती झाली, तिच्यातून इंग्लंडमध्ये एक नवा औद्योगिक भांडवलदारांचा वर्ग उदयाला आला. भारत ही इंग्लाडला कच्चा माल पुरविणारी औद्योगिक इंग्लंडची कृषी वसाहत बनली. भारतातील विणकर व अन्य कारागीरांचे धंदे बसले. भारतीय कारागीर शेतीकडे वळला आणि मग शेतीकडून उद्योगधंद्याकडे वळणारा ग्रामीण समाज हळू हळू तयार झाला. त्यातूनच दारिद्याचा भीषण उद्रेक या देशात सुरू झाला. इ.स. १७७० साली बंगाल व बिहारमध्ये दुष्काळ पडला व त्यातून एकतृतीयांश प्रजा नष्ट झाली. भारततही आधुनिक उद्योगधंद्याची मागणी होऊ लागली आणि जे नवे उद्योगधंदे उदयाला आले त्यानी आपण ब्रिटिश उद्योगपतींच्या तोडीचे होऊ शकतो हे दाखवून दिले. उद्योग आणि कृषी यामधील संतुलन बिघडून तोपर्यंत एकात्मिकृत असलेल्या ग्रामीण समाजव्यवस्थेचे

विकेंद्रीकरण या देशात सुरू झाले. इंग्लीश पद्धतीची नवी बड्या जमिनदारीची व जमिनदारांची निर्मिती ब्रिटिशांनी केली. यासंबंधी लिहिताना नेहरू म्हणतात, " "साम्राज्यवादाला याच मार्गाने कार्य करावे लागते नाही तर तो साम्राज्यवाद रहात नाही. आधुनिक पद्धतीच्या भांडवलदारी साम्राज्यवादाने नव्या प्रकारच्या आर्थिक पिळवणुकीमध्ये भर घातली; जी पूर्वकाळामध्ये ठाऊक नव्हती. एकोणिसाव्या शतकातील भारतातील ब्रिटिश राजवटीचा अभिलेख भारतीय माणसाला खिन्न करतो तसा रागही आणतोच आणि तरीही अनेक क्षेत्रातील ब्रिटिशांचे श्रेष्ठत्वही तो स्पष्ट करतो. त्यातही आमच्या दुभंगलेपणाचा व दुबळेपणाचा फायदा घेण्याचे आपले सामर्थ्यही तो प्रकट करतो."

पंडितजीना ' ब्रिटिशर ' हा शब्द आवडत नाही. त्याऐवजी ते ' इंग्लिशमन ' हा शब्द पसंत करतात. भारतीय लोकांना इंग्रजी भाषा शिकवू नये असे इंग्लिश लोकांना वाटत असताही बंगालमध्ये बाबू लोक (कारकून) कचेऱ्यांतून काम करण्यासाठी इंग्रजी शिक्षण देऊनच त्यानी निर्माण केले. खाजगी मुद्रणयंत्राला त्यानी प्रतिबंध केला. ब्रिटिश मिशनरी लोकांनी कलकत्ता येथे श्रीरामपूरहून इ.स. १७८० साली पहिले वर्तमान पत्र सुरू केले. ब्रिटिश राजवट संपूर्ण भारतभर पसरण्यापूर्वी तिने बंगालवर पन्नास वर्षे राज्य केले होते त्यामुळे कृषि भूमीविषयक, तांत्रिक, शैक्षणिक आणि बौद्धिक बदल बंगालमध्ये घडून आले. मोठा बदल घडून आला तो म्हणजे कृषि भूमिविषयक पद्धतीची विभागणी झाली. खाजगी मालमत्ता व जमिनदारीची संकल्पना पुर्नस्थापित झाली. धन अर्थव्यवस्था आली आणि जमीन ही बाजार विक्रेय वस्तू झाली. अठराव्या शतकाचा उत्तरार्ध व एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध बंगालच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक इतिहासात महत्त्वाचा ठरला. विलक्षण तोलामोलाची व प्रतिभेची माणसे बंगालमध्ये उदयाला आली. उच्च श्रेणीची बुद्धिमत्ता, तितकीच उत्कट भावनाशीलता हे बंगाली माणसाचे वैशिष्ट्य ठरले, एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात रामकृष्ण परमहंस आणि त्यांच्या अगोदर अठराव्या शतकात राजा राममोहन रॉय यानी नवा बंगाल घडविला. भारतात राजा राममोहन रॉय यानी मुद्रण संस्थेची स्थापना केली व बंगाली, इंग्लीश, पर्शियन भाषेत नियतकालिके सुरू केली. १८२३ साली भारतीय वृत्तपत्रांवर व मुद्रणालयांवर नियंत्रण उपाय अधिनियमित करण्यात आला व त्याला राजा राममोहन रॉय यानी कडवा विरोध केला व इंग्लंडमध्ये ' किंग-इन-कौन्सिल ' पर्यंत ते प्रकरण नेले. इ.स. १८३९, फेब्रुवारीमध्ये मेकॉलेने काढलेल्या शिक्षण फतव्याने भारतात इंग्रजी शिक्षण रीतसर सुरू झाले व इ.स. १८५७ मध्ये कलकत्ता, मद्रास व मुंबईमध्ये विश्वविद्यालये सुरू झाली. इंग्रजी शिक्षणाने एक नवी राजकीय आंदोलनाची दृष्टी मिळाली व इंग्रजी शिक्षण घेतलेला एक नवा धंदेवाईक व कर्मचारी वर्ग निर्माण झाला. इ.स. १८५२ साली कलकत्ता येथे ' ब्रिटिश इंडियन असोसिएशन ' स्थापन झाली. पंडितजी म्हणतात, १८८५ साली स्थापन झालेल्या ' भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ' ची ती अग्रदूत होती. पाश्चात्य विचाराने प्रभावित झालेला नवा सुशिक्षित वर्ग हिंदू समाजातील साचेबंद प्रथा, धर्मसंकेत व सामाजिक चौकटीविरुद्ध विद्रोह करावयाला तयार झाला. इंग्लीश उदारमतवादी संस्थांकडून त्यानी प्रेरणा घेतली. मात्र ही नवी चेतना उच्चभ्रू वरीष्ठ हिंदूवर्गापुरतीच मर्यादित होती. हिंदू जनता त्यापासून अलिप्त होती. मुस्लिमांनी तर स्वतःला कटाक्षाने इंग्रजी शिक्षणापासून दूर ठेवले होते. १८५७-५८ च्या बंडाची झळ बंगालला क्वचितच पोचली होती. इ.स. १८५७ च्या मे मध्ये भारतीय सैन्याने बंड केले. मूलतः तो सरंजामदारी उद्रेक होता. ह्या बंडाचे नेतृत्व करणारे फेरोज शहा, तात्या टोपे, झाशीची राणी लक्ष्मीबाई (सर्वांत श्रेष्ठ व सर्वांत शूर) यांचा उल्लेख नेहरू आवर्जून करतात. इंग्रजांनी या देशात वंशवाद आणला याची चीडही नेहरू व्यक्त करतात. अर्थात या बंडाने संपूर्ण भारताला व विशेषतः ब्रिटिश प्रशासनाला हादरा दिला होता.

भारतात उद्योगधंद्याची वाढ झाली व ग्रामीण कृषिवर्गापैकी दारिद्याने गांजलेले हजारो, कामगार उद्योगधंद्यात मजूर म्हणून लागले तरी दारिद्य व बेकारी बेसुमार प्रमाणात भारतात वाढतच गेली. त्यातूनच हजारो लाखो भारतीयांनी मजूर म्हणून परदेशात स्थलांतर केले. दक्षिण आफ्रिका, फिजी, त्रिनिदाद, जमेका, गिआना, मॉरिशस, सिलोन, ब्रह्मदेश, मलाया या देशांमध्ये ते गेले व अत्यंत लाचारीचे जीवन त्यांच्या वाट्याला आले. एकोणिसाव्या शतकात राजा राममोहन रॉय यानी स्थापन केलेला ब्राह्मो समाज, स्वामी दयानंद सरस्वतीनी स्थापन केलेला आर्य समाज, स्वामी विवेकानंद यानी स्थापन केलेले रामकृष्ण मिशन यानी हिंदू धर्मांतर्गत रूढी व जातीप्रथेविरुद्ध परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य केले. या सामाजिक सुधारणा घडवून आणण्यात गुरूदेव रविंद्रनाथ टागोर जन्मले, त्या टागोर कुटुंबाने फार मोठी कामगिरी पार पाडली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात रवीन्द्रनाथ टागोर व महात्मा गांधी या लोकोत्तर पुरुषांनी भारतीय जनतेला आजच्या आपल्या युगात आणले आणि विशेषतः हिंदूंना आपल्या भूतकालीन मोठेपणाच्या धुंदीतून वर्तमानकालीन वास्तव्याच्या ताळ्यावर आणले. नव्या हिंदू मध्यमवर्गामध्ये श्रीमती ॲनी बेझंट यानी एक नवी चेतना व आत्मविश्वास निर्माण केला. राष्ट्रवादाचा देशात उदय होत होता व भूतकाळाकडे वळून पाहण्याची प्रकृती प्रत्येक देशामध्ये वाढत होती. पंडित नेहरू या पार्श्वभूमीवर हिंदू-मुस्लिम मानसिकतेचे सखोल व सर्वांगीण विश्लेषण करतात. मुसलमानांमध्ये अजूनही नवा मध्यमवर्ग निर्माण झाला नव्हता. सर सय्यद अहमद खान यानी अलिगढ विद्यापीठ स्थापन करून मुस्लिमांची मने इंग्लीश शिक्षणाकडे वळविली. तरीही वरिष्ठ मुस्लिमवर्गीयांना, हे शिक्षण लोकांना इस्लाम धर्माविरुद्ध नेणारे ठरेल असे वाटत होते. हा मुस्लिमवर्ग भारताबाहेर आपल्या राष्ट्रीयत्वाची पाळेमुळे धुंडाळीत होता. सर सय्यद अहमद यानी मुसलमानांमधील ब्रिटिश विरोधी भावना सौम्य केली व त्याना राष्ट्रीय काँग्रेसपासून दूर नेले. काँग्रेसला त्यांचा विरोध नव्हता तरीही ती संघटना प्रामुख्याने हिंदूंची आहे असे त्याचे मत होते. त्यांचे कार्य वरिष्ठ मुस्लिमवर्गापुरतेच मर्यादित राहिले. नागरी वा ग्रामीण मुस्लिम जनतेला त्यांचा स्पर्श झाला नाही. विसाव्या शतकाच्या प्रारंभी मुस्लिम बुद्धिजीवी वर्गांमध्ये दोन कल दिसून येतात. (१) मुख्यतः तरुण मुस्लिमवर्गांमध्ये राष्ट्रीयत्वाचा व (२) भारताच्या भूतकालीन घटनांपासून खिलाफत चळवळीची भूमी असलेल्या तुर्कस्तानसारख्या इस्लामी देशांकडे वळून पाहणे. मुस्लिम मन घडविण्यात इ.स. १९१२ साली निघालेल्या (१) अल् हिलाल आणि (२) धी कॉम्रेड या उर्दू व इंग्रजी साप्ताहिकांनी फार मोठा हातभार लावला 'अल् हिलाल' ची सुरुवात अबूल कलाम आझाद या चौवीस वर्षीय बुद्धिमान तरुणाने केली होती. कैरोच्या, अल् अझगर विद्यापीठातून अरेबी पर्शियन व इस्लाम धर्मग्रंथाचे शिक्षण घेऊन ते भारतात आले होते. धर्मग्रंथाचा बुद्धिवादी अर्थ त्यानी विशद केला. आपल्या साप्ताहिकातून एका नव्या भाषेतून, नव्या शब्दसंहितेतून, नव्या शैलीतून व नव्या दृष्टीकोनातून ते लिहू लागले. अलिगढ महाविद्यालय गटाने मुस्लिम बुद्धिवादी तरुणांचे नेतृत्व केले व त्यातूनच 'मुस्लिम लीगचा जन्म झाला. इस्लाम, इस्लामिक राष्ट्रे व भारतीय राष्ट्रवाद यांच्यामध्ये कोणताही संघर्ष नाही, हे आझाद यानी जोरदारपणे मांडले व पोरवयातच ज्या 'मुस्लिम लीग' मध्ये ते गेले होते तिला त्याना काँग्रेसच्या जवळ यावयाला मदत केली ; ब्रिटिशांच्या कटकारस्थान व वर्चस्वापासून तुर्कस्तानला सुरक्षित ठेवणारा महान नेता म्हणून केमाल पाशा मुसलमान व हिंदूंमध्ये लोकप्रिय होता. मुसलमान मनामध्ये जी पोकळी निर्माण झाली होती व नवा मुस्लिम मध्यवर्ग तयार होत होता; त्याना राष्ट्रवादी आकार देण्यात सर महंमद इक्बाल यानी महत्त्वाची भूमिका स्वीकारली तरीही त्यांच्या उर्दू व पर्शियन कवितेतून व तात्त्विक लेखनातून मुस्लिम मनामध्ये विभक्ततेची भावना निर्माण झाली. अनेक मुसलमान काँग्रेसमध्ये आले व त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला. तरी भारतीय राष्ट्रवादावर हिंदू धर्मीयांची

पकड त्याना जाणवत होती. यातून भारताच्या फाळणीची ओरड कालांतराने सुरू झाली. पाकिस्तानची निर्मिती हा मुस्लिम धर्मीयांच्या मागासलेपणावर उपाय ठरणार नाही, असे नेहरूना ठाम वाटत होते. १९११ साली जमशेटजी टाटा यानी अवजड उद्योगधंद्याचा भारतात पाया घातला. या धंद्यातून पुढे औद्योगिक श्रमिक वर्ग वाढला. १९२० पहिली ' ट्रेड युनियन काँग्रेस ' भरली. रशियन राज्यक्रांतीचाही कामगार वर्गावर प्रभाव पडला. मात्र ग्रामीण कुणबी या काळात उपेक्षित राहिला आणि पुढाऱ्यांनी व शासनानेही त्याच्याकडे लक्ष दिले नाही; असे नेहरू ठासून सांगतात. बंगालच्या फाळणीविरुद्ध जनतेने लढा दिला व महाराष्ट्रातून बाळ गंगाधर टिळक, गोपाळकृष्ण गोखले हे नेते काँग्रेस पक्षात जहालांचे व मवाळांचे नेतृत्व करीत असताना काँग्रेस कशी दुभंगली, तेही नेहरू सांगतात. पितामह दादाभाई नौरोजी यांना १९०७ साली मध्यस्थी करावी लागली. आयरिश व रशियनधर्मीचा दहशतवाद बंगालमध्ये डोके वर काढू लागला. मुस्लिम लीगने विभक्त मतदार संघाची मागणी केली. नेहरू अत्यंत व्यथित होऊन लिहितात, " " जे अगोदर दुबळे किंवा मागासलेले होते त्या गटांना विभक्त मतदारसंघांनी अशारीतीने दुबळे केले, त्यानी विभक्त मनोवृत्तीला उत्तेजन दिले आणि राष्ट्रीय एकतेच्या वाढत्या भावनेला प्रतिबंध केला. ते लोकशाहीला नकार होते. अत्यंत प्रतिगामी तऱ्हेचे नवे हितसंबंध त्यानी निर्माण केले. . . . शेवटी त्यातूनच भारताचे तुकडे करण्याची मागणी होऊ लागली."

पहिले महायुद्ध आले तेव्हा काँग्रेसची जहाल आणि नेमस्त अशा गटांमध्ये फाळणी झाली होती. युद्धकाळात उद्योगधंद्याची प्रचंड भरभराट झाली. बंगालमधील ज्यूट गिरण्यांनी आणि मुंबई, अहमदाबाद आणि अन्यत्र असलेल्या कापड गिरण्यांनी भाडवलदारांना शंभर ते दोनशे टक्क्यांहूनही लाभांश मिळवून दिला. मात्र कामगार वर्ग हलाखीच्या अवस्थेत राहिला. पहिले महायुद्ध संपले आणि भारतावर ब्रिटिश सत्तेचे अधिकच निष्ठुर असे दमनचक्र सुरू झाले. दमनकारी विधिविधानाचा आणि लष्करी कायद्याचा अंमल पंजाबमध्ये सुरू झाला. भारत हे एक सोडराष्ट्र बनले आणि अशावेळी गांधी आले. निर्भयपणा आणि सत्य हे त्यांच्या शिकवणुकीचे मर्म होते. त्यांचा शांत पण खंबीर आवाज भारतात सर्वत्र पसरत गेला. भारतातील लक्षावधी लोकांवर त्यांचा विविध अंगानी प्रभाव पडत गेला. पहिल्यांदाच गांधीजीनी काँग्रसमध्ये प्रवेश केला. कृतीचे एक नवे तंत्र त्यानी आणले. दोन प्रकारची हाक त्यानी राष्ट्राला दिली. (१) परदेशी सत्तेला आव्हान देणे व तिचा प्रतिकार करणे. (२) आमच्या स्वतःच्या सामाजिक दुष्कृतींविरुद्ध लढणे. त्यातूनच दलित वर्गांचे जीवनमान उंचावणे व अस्पृश्यतेचा शाप समाजातून समूळ उपटून काढणे हा संदेश राष्ट्रला त्यानी दिला. लढ्याची नवी मानके व नवी मूल्ये त्यानी जनतेसमोर ठेवली. जनतेचा बहुमुखी उठाव काँग्रेसमधील जुन्या नेतृत्वाला मानवला नाही. काँग्रेसमधून काहीजण बाहेर पडले त्यात महंमद अली जिना हे एक होते. हिंदू-मुस्लिम प्रश्नावर कोणते मतभेद होते म्हणून जिना यानी काँग्रेस सोडली नाही ? त्याना बेढब पोषाखातील व हिंदुस्थानी भाषेत बोलणाऱ्या जनसमूहाची नफरत होती. उच्चभ्रू वर्गांपुरतीच मर्यादित राहणारी अशी त्यांची राजकारणी दृष्टी होती. काही बरीच वर्षे भारत देश सोडून ते इंग्लंडमध्ये राहिले. गांधी मूलतः धार्मिक प्रवृत्तीचे माणूस होते. नैतिक नियमनावर त्यांचा भर होता. हिंदुत्वाचा त्याना अभिमान असूनही त्या धर्मावर त्यानी वैश्विकतेचा पोषाख चढविला आणि त्याच्या सत्यनिष्ठ अंतर्यामी सर्व धर्मांचे अधिष्ठान त्यानी निर्माण केले. अध्यात्मिक एकतेमध्ये लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी ते पुढे सरसावले. आपले गुरू गोपाल कृष्ण गोखले यांचा संदेश कृतिबद्ध करण्याचे व्रत त्यानी स्वीकारले. त्यानी एक विशाल मानसिक शांती घडवून आणली. काँग्रेसवर गांधीजींचे वर्चस्व होते आणि १९२० साली राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सत्तेविरुद्ध एकापाठोपाठ एक सविनय कायदेभंगाची आणि असहकाराची चळवळ

या देशात सुरू झाली. इ.स. १९३५ साली ब्रिटिश संसदेने ' भारत शासन अधिनियम, १९३५ ' संमत केला. या कायद्याने शासनाला पूर्णपणे जबाबदार असणाऱ्या शासनांगाची शक्ती दृढ व व्यापक केली. संघीय संरचना अशा रीतीने करण्याची दृष्टी ठेवली होती की; त्यामुळे कोणतीही खरी प्रगती करणे अशक्य व्हावे. या अधिनियमाने ब्रिटिश शासन आणि संस्थानिक, जमीनदार आणि इतर भारतातील प्रतिगामी गटांचे सख्यसंबंध बळकट केले. याच सुमारास ब्रह्मदेश भारतापासून वेगळा करण्यात आला होता. भारतातील सर्व विभागातून ' अधिनियम ३५ ' कडवा विरोध झाला. त्यातील प्रांतिक स्वायत्ततेचा भाग विचारात घेऊन काँग्रेसने निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला आणि १९३७ साली जुलै महिन्यात अकरा प्रांतांपैकी आठ प्रांतांमध्ये काँग्रेस शासने प्रस्थापित झाली. भारतीय समस्येवर तात्पुरता उपाय म्हणूनही ' अधिनियम ३५ ' काँग्रेसने स्वीकारला नसता. तर स्वातंत्र्यासाठी आणि त्या अधिनियमाविरुद्ध लढण्याची काँग्रेसने प्रतिज्ञा केली होती. तरीसुद्धा काँग्रेसमधील बहुसंख्याकांनी प्रांतिक स्वायत्तता राबविण्याचे ठरविले त्यामागे दुहेरी धोरण होते. (१) स्वातंत्र्य लढा पुढे चालू ठेवणे (२) विधिविधानांमधून सुधारणेचे रचनात्मक उपाय चालू ठेवणे. विशेषतः कृषिविषयक प्रश्नांकडे तत्काळ लक्ष देणे. पंडितजी म्हणतात की, कितीही मर्यादित व निर्बंधित अशी ही प्रांतीय शासने असली तरी त्याचा संपूर्ण फायदा त्यांना घ्यावयाचा होता. काँग्रेस कार्यकारिणी प्रांतीय शासनांच्या कारभारात हस्तक्षेप करते असा आरोप जो करण्यात आला होता त्याला उत्तर देताना ते म्हणतात " केंद्रिय शासनामध्ये कोणताही बदल न करता जे शासन पूर्णपणे जबाबदार आणि सत्तावादी होते, प्रांतीय स्वायत्ततेची पुनःस्थापना प्रांतवादाच्या आणि वेगवेगळेपणाच्या वाढीकडे नेणारी ठरेल आणि अशा रीतीने भारतीय एकात्मतेची भावना क्षीण करील " म्हणूनच काँग्रेस कार्यकारिणीने, प्रांतिक शासने तयार होताच ऑगस्ट १९३७ मध्ये एक ठराव संमत केला आणि आर्थिक व औद्योगिक क्षेत्रांमध्ये सर्वांना सहकार्याची हाक त्याने दिली. काँग्रेसने व्यापक प्रमाणावर राज्य नियोजनाला त्या ठरावात महत्त्व दिले होते. १९३८ साली ' राष्ट्रीय नियोजन समिती ' घटित होऊन पंडित नेहरू तिचे अध्यक्ष झाले होते. काँग्रेसच्या या राजवटीत शेतकरी वर्ग व औद्योगिक कामगार यांचा फायदा झाला व तो सबळ झाला हे सांगताना पं. नेहरू म्हणतात की, जनता शिक्षण व मूलोद्योग शिक्षणाची पुनःस्थापना ही काँग्रेस राज्यांची सर्वात महत्त्वाची आणि दूरगामी कामगिरी होती. १९३९ साली नोव्हेंबर महिन्यात काँग्रेस शासनांनी राजीनामा दिला तेव्हा युरोपमध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले होते. हिटलरचे सैन्य पोलंडमध्ये घुसले होते. या अल्पकालीन राज्यकारभारातून ब्रिटिश सत्तेने भारतावर लादलेली राजकीय आणि आर्थिक संरचना हीच भारताच्या प्रगतीच्या मार्गावरील मोठी धोंड आहे, याची प्रचीती काँग्रेसला आली.

अल्पसंख्याकांचा या देशातील प्रश्न; विशेषतः मुस्लीम लीगचे वाढते प्रस्थ व महंमद अलि जिना यांचे आडमुठे अडवणुकीचे नकारात्मक व फुटीरपणाचे जातीयवादी व राष्ट्रविघातक राजकारण या अंगाने पंडित नेहरू आवर्जून विचारात घेतात. मुस्लीम समाजातील वाढता नवा मध्यम वर्ग काँग्रेसकडे वळत होता. तुर्कस्तानातील खिलाफत चळवळ समाप्त झाली होती. १९२०-२३ च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत जेवढे मुसलमान सामील झाले होते त्याहीपेक्षा अधिक मुसलमान १९३० च्या सविनय कायदेभंगात सामील झाले. वायव्य सरहद्द प्रांतामध्ये तर खान अब्दुल गफार खान यानी पठाणासारख्या भांडखोर व विक्षुब्ध मुसलमान समाजाला गांधीजींच्या शांततामय चळवळीत सहभागी करणयात यश मिळविले होते. तरीसुद्धा हिंदू लोक आणि इतरेजनांच्या विरुद्ध अल्पसंख्य मुस्लिम जनतेचा कल स्वहितासाठी जुनाट स्थानिक व सरंजामी नेतृत्वाकडे वळत होता. भारतातील अल्पसंख्याक हे युरोपमधील अल्पसंख्याकांप्रमाणे वांशिक किंवा राष्ट्रीय अल्पसंख्याक नव्हते, नेहरू सांगतात ते धार्मिक अल्पसंख्याक

होते. धर्माच्या नावाखाली त्या धर्मातील विशिष्ट हितसंबंधी गट आपली शक्ती व आपला ज्येष्ठपणा टिकविण्यासाठी एरवी परस्परांशी सहिष्णु वृत्तीने आजवर वागत आलेल्या जातीजमातींना भडकावीत होते त्यातून जातीयवादी राजकारणाचा उद्रेक होत होता. जातीय समस्या सोडविण्याचा इतर काही संघटनांसह काँग्रेस आटोकाट प्रयत्न करीत होती परंतु ब्रिटिश शासनाची उपस्थिती आणि धोरण ही त्यातील, मूलभूत अडचण होती. मुस्लिमांसाठी विभक्त मतदार संघ पुनःस्थापित झाले (नंतर इतर लहान लहान गटांसाठी) आणि त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणाबाहेर त्याना अधिक जागा देण्यात आल्या. काँग्रेसने खूप चुका केल्या पण त्या दृष्टीकोन किंवा डावपेच याबाबत गौण स्वरुपाच्या होत्या. काँग्रेसला एकता हवी होती व दोन मूलभूत प्रश्नांबाबत काँग्रेस अढळ राहिली. (१) राष्ट्रीय ऐक्य, (२) लोकशाही. १९४० च्या ऑगस्ट महिन्यात काँग्रेस कार्यकारिणीला जाहीर करणे भाग पडले की, ब्रिटिश शासनाचे भारतातील धोरण नागरी बेबनाव व कलह याना उत्तेजन व चेतावणी देत आहे. ब्रिटिश शासनातील जबाबदार प्रवक्ते भारतीय नेत्यांना उघडपणे सांगत होते की; भारताला लोकशाही ही परवडण्यासारखी नाही आणि दुसरी कोणती नवी व्यवस्था-निर्माण करण्यासाठी त्याना भारतीय ऐक्याचा बळी द्यावा लागेल. मुस्लिम लीगखेरीज मुसलमानांमध्ये जुनी व अधिक महत्त्वाची जमाईत-उल्-उलेमा ही संघटना काम करीत होती. मुल्लामौलवी व जुन्या धाटणीचे विद्वज्जन त्या संघटनेचे अध्वर्यु होते. नंतर **अहरार** ही संघटना स्थापन झाली व पंजाबमध्ये तिने जोर धरला. शिआ मुस्लिमांनी वेगळी संघटना स्थापन केली व ते मुस्लिम लीगपासून अलग राहिले. सर्वांसाठी संयुक्त मतदारसंघाची मागणी त्यांनी केली. पुष्कळ प्रमुख शिआ मुस्लिम लीगमध्ये होते. १९४० साली दिल्लीमध्ये मुस्लिम लीगला विरोध करणारी, या सर्व मुस्लिम संघटना एकत्र येऊन पुरस्कृत झालेली, **आझाद मुस्लिम परिषद** भरली. प्रमुख हिंदू जातीय संघटना होती हिंदू महासभा. १९३७ च्या भारतातील सार्वत्रिक निवडणुकांमध्ये हिंदू महासभा पूर्णपणे अयशस्वी झाली होती. नंतर मुस्लिम लीगने प्रांतातील काँग्रेस शासन व प्रत्यक्ष काँग्रेस संघटनेविरुद्ध मोहीम सुरू केली. मुसलमानांवर दिवसागणिक काँग्रेस राजवटीत अत्याचार होत असल्याची आरडाओरड (पंडित नेहरूंच्या भाषेत नाझी पद्धतीचे) तिने सुरू केली. पोट निवडणुकांमध्ये ' इस्लाम धोक्यात आहे ' या घोषणा देऊन लीगने बहुतेक निवडणुका जिंकल्या. भारतीय इतिहासामध्ये प्रथमच मुस्लिम लीगला जनतेचा पाठिंबा मिळाला. त्याचे कारण प्रतिगामी वृत्तीच्या मुस्लिम नेत्यांकडून आपले शोषण होऊ देण्याइतका मुस्लिम जनतेमध्ये असलेला राजकीय आणि सामाजिक मागासलेपणा. या काळातील महंमद अली जिनाचे नेतृत्व विचारात घेताना पंडितजी लिहितात की, तो स्वतः होऊन, शिक्षणाने इतर मुसलमानांपेक्षा अतिशय प्रगत असूनही, प्रतिगामी विचारसरणींचा कैदी झाला होता. काँग्रेस प्रगतीवर पावले टाकीत असता त्याने काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली. पहिल्या युद्धानंतर झालेल्या अर्थशास्त्रीय घडामोडींबद्दल तो अज्ञानी व उदासीन होता. तो पुढे जाण्याऐवजी मागे मागे जात होता व भारतीय ऐक्याचा व लोकशाहीचा तो निषेध करीत होता. ' नकार ' हे ज्याचे प्रतिक मानता येईल असा तो विचित्रपणे अनास्तीवादी माणूस होता. भारतात ब्रिटिश राजवट आल्यापासून मुस्लिम समाजात आधुनिक पद्धतीची फार थोडी लक्षणीय माणसे निर्माण केली. बंगालमधील मुस्लिम समाजाचा मागासलेपणा ठळकपणे नजरेत भरणारा होता. त्याची दोन कारणे पंडितजी देतात : (१) ब्रिटिश राजवटीमध्ये त्यांच्या वरीष्ठ वर्गाचे हनन झाले. (२) त्यांची विशाल बहुसंख्या हिंदू लोकांमधील नीचतम वर्गाचे धर्मांतर होऊन झालेली होती. नवा भारतीय मुस्लिम मध्यम वर्ग उदयाला आला तरी तो विज्ञान आणि उद्योगधंद्यामध्ये हिंदू व इतर जमातीपेक्षा मागासलेलाच राहिला. बुद्धिमान मुस्लिम व हिंदू लोकही सरकारी नोकऱ्या स्वीकारीत होते. त्यांच्यापेक्षा श्री. जिना वेगळा होता. तो म्हणजेच ' मुस्लिम लीग ' असे समीकरण! आपण काँग्रेसचा अध्यक्ष असताना जिनाला अनेक पत्रे लिहिली

व काँग्रेसने काय करावे ते नेमके आम्हाला सांग, अशी विनंती केली असे पंडितजी लिहितात. जिनाची उत्तरादाखल लिहिलेली पत्रे दीर्घ असायची पण त्यातून काहीच बोध होत नसे. गांधीजी व अन्य पुढाऱ्यांनी जिनाची पुष्कळदा भेट घेतली. तासन् तास बोलणी होऊनही काहीच निष्पन्न होत नसे. काँग्रेसमधून जुन्या मुसलमानांना घालवून देण्याची मागणी करून जिना, काँग्रेस ही एक जातीय संघटना बनवू पहात होता. एखादा विषय तसाच रेंगाळत ठेवून ब्रिटिश शासनाकडून जास्तीत जास्त फायदे उपटण्याची त्याची रीत होती. भारत हे एक राष्ट्र नसून तो हिंदू व मुस्लिम या दोन राष्ट्रांचा मिळून झालेला देश आहे हा नवा सिद्धांत त्याने मांडला आणि त्यातूनच पाकिस्तानची संकल्पना निर्माण झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीला काँग्रेसने जिनाशी पुनः बोलणी केली. जिना अढळ राहिला व काँग्रेसविरूद्ध आपल्या अनुयायांना त्याने ' जिहाद ' ची हाक दिली. काँग्रेस मुस्लीम पुढाऱ्यांविषयी अनुदार उद्‌गार काढले.

१९३८ सालच्या अखेरीला काँग्रेस प्रेरणेने ' राष्ट्रीय नियोजन समिती ' घटित झाली आणि आपण तिचे अध्यक्षपद न डळमळता व कोणतीही कुशंका मनात न घेता स्वीकारले, नेहरू लिहितात. अर्थातच व्यापक स्वरूपाचे नियोजन स्वतंत्र राष्ट्रीय शासनातच शक्य होतं, हेही नेहरू सांगतात. आमचा सामाजिक मागासलेपणा, रूढी, पारंपारिक दृष्टिकोन या त्यातील अडचणी होत्या. हे नियोजन वर्तमानकाळासाठी नसून भविष्यकाळासाठीच अधिक होते असेही नेहरू सांगतात. ' नियोजन समिती ' ची मूळ कल्पना औद्योगिकरणाला चालना देण्याची होती. त्यामुळे दारिद्र्य, बेकारी, राष्ट्रीय सुरक्षितता आणि आर्थिक पुनर्निर्मितीच्या समस्या सोडविण्यात आल्या असत्या. या समितीसमोर व्यापकपणे दोन दृष्टिकोन होते : (१) नफ्याचा हेतू दूर करणारी आणि समन्यायी वाटणीवर भर देणारी समाजवादी दृष्टी, (२) आणि मुक्त साहसी उपक्रमशीलता व शक्य तेवढा नफ्याचा हेतू टिकवून ठेवणारी आणि उत्पादनावर फार मोठा भर देणारी बड्या धंदेवाल्यांची दृष्टी. अवजड भारी उद्योगधंद्यात वाढ व ग्रामीण व कुटीर-उद्योग यांचा विकास; या दोन दृष्टींमध्ये उघडपणेच विरोध होता, मतभेद होते. विकासासाठी आपण दहा वर्षांचा अवधी निश्चित केला, नेहरू लिहितात. समितीला पुढील वस्तुनिष्ठ कसोट्याही सुचविण्यात आल्या :–

(१) आहारामध्ये सुधारणा–समतोल आहार ज्यामध्ये प्रत्येक प्रौढ कामगाराला २४०० ते २८०० ऊष्मीय मूल्याची (Calorific Value) ची एकके (Units) प्राप्त होतील.

(२) वस्त्रप्रावरणामध्ये सुधारणा–दरवर्षी दरडोई पंधरा यार्ड वापराऐवजी कमीत कमी तीस यार्ड वस्त्राचा वापर.

(३) गृहमान दर्जा : परडोई निदान १०० चौरस फूट.

प्रग़तीच्या पुढील काही निर्देश सूचीही समोर ठेवण्यात आल्या :–

(१) कृषी उत्पादनामध्ये वाढ.

(२) औद्योगिक उत्पन्नामध्ये वाढ.

(३) बेकारीमध्ये घट.

(४) दरडोई उत्पन्नात वाढ.

(५) निरक्षरतेचे निर्मूलन.

(६) लोकोपयोगी सेवांमध्ये वाढ.

(७) १००० लोकसंस्थेला एक एकक या आधारावर वैद्यकीय मदतीची तरतूद.

(८) सरासरी जीवन अपेक्षेमध्ये वाढ.

समितीसमोर राष्ट्रीय स्वयंपूर्णता हे उद्दिष्ट होते तरी आर्थिक साम्राज्यवादाच्या भोवऱ्यात न गुंतण्याचे समितीने निश्चित केले होते. शिक्षणाबाबत दोन वेधक निर्णय घेण्यात आले. (१) शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर मुलामुलींसाठी शारीरिक पात्रतेची काही निश्चित प्रमाणके घालून देण्यात यावी. (२) सक्ती समाज किंवा श्रमसेवेची पद्धती स्थापन करण्यात यावी; ज्यामुळे प्रत्येक तरुण व तरुणी, अठरा ते वीस वर्षांमधील आपल्या जीवनाचे एक वर्ष कृषी, उद्योग, लोकोपयोगी सेवा व सार्वजनिक कार्याला देईल. परंतु १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. निरनिराळ्या प्रांतातील काँग्रेस राज्यांनी राजीनामे दिले. युद्धकाळामध्ये, (पंडितजी त्या काळाला ' फसवा काळ ' म्हणतात.) इंग्रज सरकारचे धोरण भारतीय उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याचे नव्हते. १९४० च्या ऑक्टोबर महिन्यात पंडितजीना अटक करण्यात आली. १९४१ च्या डिसेंबरमध्ये त्यांची थोडा वेळ सुटका झाली तेव्हा सगळीकडेच परिस्थिती बदलली. युद्ध चालू होते, भारतावर आक्रमण होण्याची भीती निर्माण झाली होती. नियोजन समितीचे अपुरे राहिलेले काम पुनः हाती घेणे नेहरूंना शक्य झाले नव्हते आणि पुनः त्याना तुरुंगात जावे लागले होते.

मोठे उद्योगधंदे विरुद्ध कुटीरोद्योग याबाबत काँग्रेसची भूमिका विशद करताना पंडितजी लिहितात की, १९२० च्या सुमाराला " **टाटा पोलाद आणि लोखंड उद्योग** " अडचणीत आले असता केंद्रीय विधानसभेमध्ये काँग्रेस पक्षाने आग्रह करून त्या उद्योगाला शासकीय मदत मिळवून दिली होती. तरीही " **इम्पेरिअल केमिकल इण्डस्ट्रीज** " बादशाही रासायनिक उद्योगधंदे, या प्रचंड संयुक्त उद्योगधंद्यांना ब्रिटिश शासन उत्तेजन देत होते. गांधीजींच्या मते भारतातील वाढत्या दारिद्र्याची कारणे या दोन प्रमुख गोष्टीत होती. (१) परकीय सत्ता व तिच्याबरोबर आलेली पिळवणूक, (२) भांडवली औद्योगिक संस्कृती. गांधीजींना प्राचीन काळच्या स्वयंपूर्ण ग्रामीण समाज व अर्थ व्यवस्थेचे मोठे आकर्षण वाटत होते. त्यामुळे त्यांच्यामध्ये व इतर काँग्रेस पुढाऱ्यांमध्ये (पं. नेहरूंसह) मूलभूत मतभेद निर्माण झाले. गांधीजींनी नैतिक मूल्यांवर दिलेला भर व अयोग्य साधनांनी मिळविलेली सिद्धी व्यक्तीला आणि समाजालाही कशी विनाशाकडे नेते; याबाबत त्यांचा असलेला दृष्टीकोन पंडितजी विशद करतात आणि सांगतात की, असे असले तरी गांधीजी हे केवळ स्वप्नाळू नव्हते. चरखा आणि ग्रामीण उद्योगावर त्यानी दिलेला भर स्वानुभवाधिष्ठित होता. ब्रिटिशांनी भारतामध्ये इंग्रजी शिक्षण घेतलेला एक नवा वर्ग, एक नवी जात निर्माण केली होती. बहुसंख्य जनतेपासून तुटलेला असा हा वर्ग स्वतःच्या स्वयंसंतुष्ट जगात रहात होता. आणि आपल्या राज्यकर्त्यांकडे आशेने पहात होता. गांधीजीनी त्याना आपल्या स्वतःच्या लोकांकडे पहायला व विचार करावयाला भाग पाडले. पंडितजीना नव्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार भारताची थिजलेली व गतिशून्य झालेली अर्थव्यवस्था गतिमान करण्यासाठी आवश्यक वाटतो. शिक्षणाबाबतही त्याना शिक्षणाच्या वाङ्मयीन अंगाचे विशेष प्रलोभन असले तरी पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्र आणि विशेषतः जीवशास्त्राचे प्राथमिक शासकीय शिक्षण देणे अत्यावश्यक वाटते. त्यातून आधुनिक जगामध्ये जगण्यासाठी तरुण पिढीला पात्र ठरविणारी ' विज्ञानवृत्ती ' (Scientific temper) निर्माण व्हावी असेही त्याना निक्षून वाटते. भारताचा औद्योगिक विकास होण्यासाठी पंडितजीना तीन मूलभूत गरजा आवश्यक वाटतात. (१) अवजड अभियांत्रिकी आणि यंत्र निर्माणक उद्योगधंदे, (२) विज्ञान संशोधकन संस्था. (३) विद्युत्‌शक्ती. जमशेटजी टाटा यांनी बंगलोर येथे ' भारतीय विज्ञान संस्था ' स्थापन करून जो दूरदर्शीपणा दाखविला त्याचा नेहरू विशेष उल्लेख करतात. १९४० च्या सुमारास भारतामध्ये विमान निर्मिती उद्योग सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. युद्धकाळात नवे उद्योगधंदे सुरू करावयाला भारत शासनाने बंदी केली होती तरीही त्या शेवटच्या दोन तीन वर्षांत भारतात रासायनिक उद्योगधंदे, जहाजबांधणी उद्योग व बाल्यावस्थेतील

विमान निर्मिती उद्योग प्रगत होत होता. भारत बृहत औद्योगिकरणाच्या कडेपर्यंत येऊन पोचल्याचा भास होत होता.

पंडित नेहरू **'भारताचा शोध'** या आपल्या ग्रंथाच्या उत्तरार्धातील नवव्या प्रकरणाला, 'शेवटचा टप्पा (३), विश्वयुद्ध दोन' असे शीर्षक देतात, आणि आत्मचिंतनपर असा काँग्रेस व इतर पक्षीय राजकारणाचा उत्कट ऊहापोह करतात. १९२० सालापर्यंत काँग्रेस आपल्याच अंतर्गत राजकारणात गुंतलेली होती व परदेशी घडामोडींकडे तिने क्वचितच लक्ष दिले. त्याच वर्षाच्या प्रारंभी काँग्रेसने आपला परदेशी धोरणविषयक ठराव संमत केला व इतर राष्ट्रांशी सर्वांगीण सहकार्याची इच्छा व्यक्त केली. पुनः एखादे जागतिक महायुद्ध येऊ घातलेय याचीही त्यानी दखल घेतली. दुसरे विश्व महायुद्ध सुरू होण्यापूर्वी बारा वर्षे म्हणजे १९२७ साली; युद्धाबाबत आपले धोरण काँग्रेसने जाहीर केले. हिटलर सत्ताधीश होण्यापूर्वी व जपानची मांचुरियावर स्वारी होण्यापूर्वीच्या सहा वर्षे अगोदर. इटाली फॅसिस्ट राजवटीत ड्यूस मुसोलिनीच्या अधिपत्याखाली गाजत होता व इंग्लंडसारखी राष्ट्रे त्याचे कौतुक करीत होती. 'राष्ट्रसंघ '(League of Nations) आणि 'आंतरराष्ट्रीय कामगार कार्यालय' (International Labour Office) यामधील ब्रिटिश व फ्रेंच धोरण निश्चितपणे पुराणमतवादी होते. सोव्हिएट रशियाविरूद्ध युरोपमध्ये संयुक्त आघाडी उभारून त्याला एकटे पाडण्यात आले होते. चिनी क्रांती सुद्धा वेगाने पावले टाकीत होती. कुओमिंगटांगमध्ये दोन विरोधी गट निर्माण झाले होते. जागतिक परिस्थिती स्फोटक होत होती. साम्यवादाचा आत्यंतिक द्वेष करणारी अमेरिका मात्र या गटांपासून अलिप्त राहिली होती. अर्थातच भारतीय मत हे रशिया व चिनी क्रांतीला अनुकूल होते. भारताच्या भावी स्वातंत्र्याची चाहूल त्यामुळे लागत होती. हिटलर आणि नाझी तत्त्वज्ञानाचा युरोपमध्ये उदय झाला तेव्हा काँग्रेसने त्यात अनुस्यूत असलेल्या साम्राज्यवाद व वंशवादाचा निषेध केला. जपानच्या मांचुरियावरील आक्रमणाने तर भारतीय जनतेच्या मनात चीनबद्दल वाढती सहानुभूती निर्माण झाली. इंग्लंड आणि जर्मन राष्ट्रांमध्ये युद्ध होण्याची चिन्हे दिसत होती. प्रजासत्ताक स्पेनच्या लढ्यात व हिटलरी फौजांनी झेकोस्लाव्हियात केलेल्या आक्रमणात इंग्लंड व फ्रान्स राष्ट्रांनी त्यांचा विश्वासघात केला होता. पर्ल हार्बरवर जपानने बॉंब टाकल्यावरच अमेरिका युद्धात सहभागी झाली. आंतरराष्ट्रीयत्वामध्ये राष्ट्रीयत्वाचाच नेहमी विजय होतो हे सांगताना, आंतरराष्ट्रीयत्वाचे प्रतीक ठरत आलेला सोव्हिएट रशिया, जर्मन फौजांनी त्याच्यावर आक्रमण करीपर्यंत कसा आपले राष्ट्रीयत्व जोपासत होता त्याचाही उल्लेख पंडितजी करतात. म्युनिच पेचप्रसंगाने सगळा युरोप हादरला. या पार्श्वभूमीवर गांधीनी राष्ट्रीय चळवळीला वैफल्यग्रस्त होण्यापासून वाचवले व नवी दिशा दिली आणि ती बळकट केली. बहुसंख्य जनता स्वतंत्र भारताच्या विचाराने प्रेरित झाली. इंग्लंड व इंग्लीश साम्राज्यवादाशी असलेले आपले संबंध तोडून टाकण्याची भावना जनमतात प्रबळ होत गेली. या काळात मुस्लिम लीग मात्र धोरणीपणाने गप्प राहिली आणि तिने कोणत्याही आंतरराष्ट्रीय विषयाला बांधून घेतले नाही.१९३८ साली भारताने चीनला वैद्यकीय मदतीसाठी एक डॉक्टरांचे पथक पाठविले. सुभाषचंद्र बोस या काळात काँग्रेस अध्यक्ष होते. जपान, जर्मनी व इटालीविरुद्ध काँग्रेसने व्यक्त केलेल्या धोरणाला त्यांचा विरोध होता. त्यांचे व काँग्रेसचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवरील मतभेद वाढतच गेले आणि १९३९ साली काँग्रेस पक्षाला त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करावी लागली. युद्धाच्या बाबतीत काँग्रेसचे धोरण दुहेरी होते. (१) फॅसिझम, नाझीझम आणि जपानची लष्करशाही याला विरोध, (२) भारताच्या स्वातंत्र्यावर जोर. भारताला स्वातंत्र्य मिळाले तरच जनताशक्ती जागृत होईल व ती युद्धात सहभागी होऊ शकेल, अन्यथा नाही. या आपल्या धोरणात परस्परविरोध होता हे सांगून पंडितजी लिहितात, भारताचे संरक्षण किंवा भारतावर आक्रमण झाले तर त्याला प्रतिकार

करण्यात अहिंसेचा सिद्धांत आड येण्याचा काही प्रश्नच नव्हता. १९३९ च्या मध्यावर भारतीय सैन्य सिंगापूर व मध्यपूर्वेकडे पाठविण्यात आले. १९३५ चा भारत शासन अधिनियम सुधारण्यासाठी ब्रिटिश संसदेने प्रयत्न सुरू केले होते. त्या अधिनियमानुसारच प्रांतिक शासने चालू होती. दुसरे महायुद्ध सुरू होण्यापूर्वी तीन आठवडे अगोदर काँग्रेस कार्यकारी समितीने (ऑगस्ट, १९३९) एक ठराव संमत केला व त्यात म्हटले की, ब्रिटिश शासनाच्या भूतकालीन व वर्तमानकालीन अनुभवावरून त्याला स्वातंत्र्य व लोकशाहीची चाड नाही व ते शासन भारताचा केव्हाही घात करू शकते. १९१४ साली या शासनाने भारतावर युद्ध लादले होते त्याचप्रमाणे यावेळीही प्रांतिक शासनांना धुडकावून लावून ब्रिटिश शासन भारतावर युद्ध लादणार व युद्धाच्या आवरणाखाली भारताला मिळालेल्या मर्यादित स्वातंत्र्याची मुस्कटदाबी करणार आणि भारताची साधनसामुग्री लुटून त्याचे अखंड शोषण चालू ठेवणार.; हे सत्य काँग्रेसने निर्भिडपणे जनतेसमोर मांडले व केंद्रिय विधानसभेच्या सभासदांनी विधानसभेच्या त्यापुढील अधिवेशनाला उपस्थित राहू नये असा आदेश दिला. या काळातील पहिल्या पंचवीस वर्षांत भारतीय जनता आडदांड ब्रिटिश सत्तेला प्रतिकार करीत होती. अपमानाचे लाजिरवाणे जिणे या राजवटीत जगावयाचे नाही असा जनतेने निर्धार केला होता.

पंडितजी सांगतात; या युद्धकाळात भारतात एक नवीन तरूण पिढी उदयाला आली होती. तिला राष्ट्रीय चळवळीचा अनुभव नव्हता. सविनय कायदेभंग व विशीतिशीतील (विसाव्या शतकाच्या) संघर्षही तिला भूतकालीन इतिहास वाटत होता. वडिल पिढीवर ती टीका करीत होती. राजकीय किंवा आर्थिक सिद्धांतावर व नेतृत्वासाठी ते आपापसात भांडत होते. जागतिक प्रश्नांवर ते चर्चा करीत होते पण त्याबाबत त्यांना फारच थोडे ज्ञान होते. ते अप्रगल्भ होते व त्यांच्यामध्ये स्थैर्यभावाचा अभाव होता. त्यांचे बुद्धिमत्तेचे साहित्य व साधने चांगली होती. चांगल्या कार्यासाठी वाहून घेण्याचा उत्साह त्यांच्याकडे होता. परंतु त्यांच्या एकूण वागणुकीचा परिणाम निराशाजनक व निरुत्साहजनक होता. कदाचित ती त्यांची तात्पुरती अवस्था असावी व भविष्यकाळात ते तिच्यावर मात करतील असेही पं. नेहरूंना वाटत होते. ब्रिटिश धोरणाला प्रखर विरोध करण्याचा आग्रह ते काँग्रेसला करीत होते. युरोपमध्ये युद्धाची घोषणा झाली होती व लगेच भारताच्या महाराज्यपालाने (लॉर्ड लिन्लिथगो) भारत सुद्धा युद्धात सामील झाल्याचे जाहीर केले. एक परदेशी माणूस, तिरस्कृत अशा एका सत्तेचा प्रतिनिधी, भारतीय जनतेची संमती न घेता चाळीस कोटी जनतेला युद्धाच्या खाईत खुशाल लोटीत होता. इतर डोमिनिय राज्यांमध्ये युद्धात सामील होण्याचा निर्णय जनतेने घेतला होता. भारतात तसे झाले, तर १४ सप्टेंबर १९३९ रोजी काँग्रेसने एक दीर्घ निवेदन प्रसिद्ध केले. त्यात म्हटले होते की, जर ' जैसे थे ' परिस्थिती, साम्राज्यशाही कब्जातील प्रदेश, वसाहती, हितसंबंध आणि विशेषाधिकार यांच्या संरक्षणासाठी युद्ध असेल तर भारताला त्याच्याशी कोणतेही कर्तव्य नाही. तथापि, लोकशाही आणि लोकशाहीवर आधारलेली नवी विश्वव्यवस्था हा जर युद्धहेतू असेल तर भारताला त्याबद्दल उत्कट आस्था वाटते. काँग्रेस कार्यकारिणीने, ती राष्ट्रीयतावादी असूनही, आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन घेतला होता व म्हटले होते की, हे युद्ध केवळ सशस्त्र सैन्यांमधील संघर्ष नसून त्याहीपेक्षा काहीतरी अधिक आहे. युरोपमध्ये जो पेचप्रसंग गुदरला आहे, तो केवळ युरोपवरच गुदरलेला नसून संपूर्ण मानवतेवर गुदरला आहे. निव्वळ साम्राज्यवादी चेतनेचे हे महाभयानक युद्ध चालू ठेवण्यात आले तर ती एक अनंत शोकांतिका ठरेल. तरीही ब्रिटिश राज्य या देशावर स्वयंसत्ता पद्धतीने एकमेव स्वयंसत्ताधीशाच्या हातात भारत देशातील जनतेचे भवितव्य निर्भर करून दमनशाही करीत होते. या दमनयंत्रणेविरूद्ध निश्चित कृती करण्याची व उठावाची मागणी जनतेकडून वाढत्या प्रमाणात होत होती. काँग्रेस कार्यकारी समितीने त्यावेळी ब्रिटिश धोरणाविरूद्ध आपणाला असहकाराचे पहिले पाऊल उचलावे लागत आहे



एन ४३१४-६अ

असे जाहीर केले आणि त्याचे दृश्य फळ म्हणून आठ प्रांतातील काँग्रेस शासनानी राजीनामे दिले. मात्र काँग्रेस कार्यकारिणीने प्रत्येक काँग्रेस सदस्याला ' सत्याग्रहा 'चे स्वरूप बारकाईने समजावून दिले. विरोधकाबरोबरही सन्मानदायी वाटाघाटी सफलतेने करणे, विरोधकाबद्दलही सदिच्छा बाळगणे, आणि अहिंसा तत्त्वाचे पालन व धोरण तंतोतंत अंमलात आणणे; यावर भर देण्यात आला. तरुण संतप्त पिढी हिंसेचा आश्रय घेण्याचा संभव प्राप्त झाला होता. देशातील परिस्थिती उग्र रूप धारण करीत होती. साध्या सुध्या कृतीसाठीही काँग्रेसजनांना व्यक्तिगत तुरुंगात डांबले जात होते. कनिष्ठ अधिकारी व पोलीस शेतकरी वर्गावर वाढता जुलूम करीत होते. युद्धाच्या नावाखाली सर्वप्रकारे बलग्रहण व आर्थिक शोषण ते करीत होते. त्यामुळे बिहारमधील रामगड येथे मार्च, १९४० मध्ये काँग्रेसला आपले वार्षिक अधिवेशन घेणे भाग पडले. मौलाना अबूल कलम आझाद या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. सविनय कायदेभंगाशिवाय दुसरा पर्याय काँग्रेससमोर नसल्याचा ठराव करण्याखेरीज काँग्रेसला गत्यंतर नव्हते. ब्रिटिश राजने एक युद्ध उपाय म्हणून ' भारत संरक्षण अधिनियम ' संमत करून देशभर चौफेर दमनशाही यंत्र निष्ठूरपणे चालू ठेवले. न्यायचौकशीविना लोकांना तुरुंगात डांबण्यात आले.

याच काळात दुसऱ्या महायुद्धाने नवे वळण घेतले. शत्रू राष्ट्राने डेन्मार्क व नॉर्वेवर आक्रमण केले. पत्त्याच्या बंगल्यासारखा फ्रान्स देश कोसळला व फॅसिस्ट जर्मन फौजा त्या देशात घुसल्या. अशा वेळी इंग्लंडचे स्वतःचे अस्तित्व धोक्यात आलेले पाहून काँग्रेसने सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा विचार बाजूला ठेवला. ब्रिटिश शासनाशी आणखी एक समझोता करण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला. भारतीय स्वातंत्र्याला मान्यता आणि केंद्रामध्ये राष्ट्रीय शासनाची प्रस्थापना ही मागणी ब्रिटिशांकडे करण्यात आली. अर्थात महाराज्यपालाने राष्ट्रीय शासन बनवायला काँग्रेसचा विरोध होता. सांविधिक व सांविधानिक बदल जे यावयाचे ते; पुढील चर्चा होईपर्यंत थांबू शकत होते. या अटींनुसार काँग्रेसने युद्धकार्यासाठी आपले संपूर्ण सहकार्य देण्याची तयारी दर्शविली. परंतु या मार्गात गांधीजींचा विरोध हीच सर्वात मोठी अडचण होऊन राहिली होती. हिंसक युद्ध प्रयत्नांमध्ये काँग्रेसने जबाबदारी स्वीकारावी याविरुद्ध गांधी ठामपणे उभे राहिले. गांधीजींचे सर्व सहकारी व्यथित झाले आणि त्यांच्या लाडक्या नेत्यापासून अलग होण्याच्या अंतिम टोकाला जाण्याशिवाय काँग्रेसला पर्याय उरला नाही. इंग्लंडमधील या काळ्याकुट्ट अंधाऱ्या काळात जर्मन विमाने इंग्लंडवर बॉंब वर्षाव 'ब्लिटझक्रिग ' करीत असताना विन्स्टन चर्चिल यानी पंतप्रधान म्हणून राज्यसूत्रे आपल्या हातात घेतली होती. चर्चिल भारतीय स्वातंत्र्याचा कट्टर विरोधक होता. १९३० च्या जानेवारीत त्याने ब्रिटिश संसदेत म्हटले होते, -" "गांधी आणि भारतीय काँग्रेस आणि ज्यासाठी ती उभी आहे ते सर्व आपल्याला चिरडून टाकावे लागेल. तर त्याच वर्षीच्या डिसेंबरमध्ये तो म्हणाला, ' बादशहाच्या मुकुटातील अत्यंत खरेखुरे तेजस्वी आणि मौलिक रत्न सोडून देण्याचा आमचा हेतू नाही.' भारताला डोमिनियन दर्जा (वसाहतीच्या स्वराज्याचा दर्जा) देण्याबाबतही तो म्हणाला होता, कोणत्याही भविष्यकालीन काळात भारताला कॅनडाच्या तोडीचे सांविधानिक अधिकार व राज्यपद्धती द्यावी असे माझ्या डोक्यातही आले नव्हते. " पंडित नेहरू लिहितात की, डोमिनियन दर्जाचा स्वीकार आम्ही लोकांनी पूर्णपणे स्वीकारले. स्वराज्याची मागणी केली. चर्चिल व आपणामध्ये प्रचंड दरी निर्माण झाली. पंडितजी सांगतात, याच चर्चिलने १९३९ च्या ऑगस्ट महिन्यात युद्धग्रस्त चीनमध्ये आपण गेलो तेव्हा आपल्याला आपल्या शुभेच्छा पाठविल्या होत्या. काँग्रेसची मागणी ब्रिटिश शासनाने धुडकावून लावली. या देशात यादवी युद्धाला उत्तेजन देऊन या देशाचा विध्वंस करावा व आपले साम्राज्यवादी नियंत्रण त्यावर ठेवावे असाच त्यांचा बेत होता. नेहरू सांगतात, आम्हा सर्वांना धक्का बसला. मने खिन्न झाली. आम्ही आता दुसऱ्या मार्गाने गेले पाहिजे अशी आमची

खात्री झाली. व्यक्तिगत सविनय भंगाची चळवळ सुरू झाली. प्रथम काँग्रेस कारिणीतील सर्वोच्च माणसांनी सत्याग्रह करावा असे ठरले. पं. नेहरूना चार वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. १९४० च्या ऑक्टोबरपासून तुरुंगात हाती येईल त्या साहित्यावरून भारतात व जगात काय चालले आहे ते आपल्याला कळत होते. नेहरू सांगतात, ' अध्यक्ष रूझवेल्टचे ' चार स्वातंत्र्ये ' (Four freedoms) आपण वाचले, अंटलांटिक सनद ऐकली आणि लवकरच या सनदेला भारत पात्र नाही हे चर्चिलचे वक्तव्यही आपल्या कानावर आले. १९४१ च्या जूनमध्ये हिटलरने सोव्हीएत रशियावर हल्ला केला, हे वाचून मनाची चलबिचल झाली.' ४ डिसेंबर १९४१ रोजी नेहरूंची व इतर नेत्यांची तुरुंगातून सुटका झाली. त्यानंतर अवघ्या तीन दिवसांनी पर्लहार्बर व जपानी हल्ला व पॅसिफिक युद्ध सुरू झाले, हेही पंडितजी सांगतात. या नव्या तणावपूर्ण परिस्थितीत काँग्रेस कार्यकारिणीची तातडीची बैठक झाली. जपानी फौजा अजून फार पुढे आल्या नव्हत्या. तरीसुद्धा युद्ध भारताजवळ येत असल्याची जाणीव होत होती. विशेषतः भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने राष्ट्रीय शासन स्थापन व्हावे या अटीवर आम्ही ब्रिटिशांसी सहकार्य करायला तयार होतो. पण गांधीजी युद्धाबाबतही आपले अहिंसेचे धोरण सोडायला तयार नव्हते. पंडितजी लिहितात की, त्यांच्या आठवणीप्रमाणे सैन्य, नौदल, विमानदल किंवा पोलीस यांच्या संदर्भात काँग्रेसने अहिंसेचा प्रश्न विचारात केव्हाही घेतलेला नव्हता. अर्थात निःशस्त्रीकरण आणि आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततामय मार्गाने सुटावेत, तसेच राष्ट्रीय प्रश्न सुद्धा; या बाजूने काँग्रेस उभी होती. काँग्रेसमधील सदस्य या प्रवृत्तींना अनुकूल नसल्यामुळे १९३० च्या प्रारंभकाळात गांधीजीनी काँग्रेसचे आपले औपचारिक सदस्यत्व काढून घेतले तरीही ते काँग्रेसचे सल्लागार आणि महनीय नेते म्हणून काँग्रेसशी संबंधित राहिले. नंतर सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स आपले प्रस्ताव घेऊन भारतात आले तेव्हा मात्र गांधीजीनी त्यांचा विचार विशुद्ध राजकीय दृष्टीकोनातून केला. १९४२ च्या ऑगस्टपर्यंतच्या महिन्यापर्यंत राष्ट्रीयत्व आणि स्वातंत्र्य यांच्या उत्कट इच्छेतून व हव्यासातून काँग्रेसने जर भारत स्वतंत्र देश म्हणून कार्य करीत असेल, तर युद्धात सहकार्य केले तरी तिला मान्यता द्यावयाला गांधीजींनी तयारी दर्शविली. पंडितजी लिहितात, [४] " एका बिनतडजोडवादी प्रेषितावर एका व्यावहारिक मुत्सद्याने मात केली होती."

१९४२ सालच्या पूर्वकाळात भारतीय जीवनातील ताणतणाव वाढत गेले. युद्ध जवळ येऊन ठेपलेले होते. भारतीय जनतेला चीनबद्दल सहानुभूती व जपानबद्दल काहीसा वैरभाव वाटत होता. जपानी फौजा दक्षिण आशिया भागात ब्रिटिश वसाहतवादी फौजांचा पराभव करून भारताच्या दिशेने मुसंडी मारीत होत्या. याचा मात्र ब्रिटिशांविरुद्ध जी भावना भारतीय मनात होती तीमुळे लोकांना सुप्त आनंद वाटत होता. आणि त्याच काळात अमेरिका युद्धात उतरली होती. युद्ध जवळ आलेले पाहून गांधीजी अत्यंत अस्वस्थ झाले होते. काँग्रेसने सविनय कायदेभंगाची चळवळ पुन्हा सुरू करण्याचा प्रश्नच नव्हता. गांधीजी भारतीय जनतेला पूर्णपणे जाणत होते. जनतेच्या मनाचा ठाव त्यांनी घेतला होता. काँग्रेसमधून बाहेर पडूनही भारतीय जनमनावर त्यांची नैतिक अधिसत्ता राज्य करीत होती. चालू घडामोडींचा अर्थ ते नेमका जाणत होते. व नेमक्या शब्दांत सारभूत सांगत व लिहित होते. त्या काळातील प्रसिद्ध आंग्ल विचारवंत जॉर्न बर्नार्ड शॉने गांधीजीबद्दल म्हटले होते, [५] " जरी त्यांच्या हातून डावपेचांबाबत अगणित चुका झाल्या तरी त्यांची मूलभूत व्यूहरचना बरोबर राहिली. " ब्रिटिश युद्ध मंत्रिमंडळातर्फे (British War Cabinet) सर स्टॅफोर्ड क्रिप्स प्रस्ताव घेऊन भारतात आले.

ते प्रस्ताव वाचून पंडित नेहरू विलक्षण खिन्न व उदासीन झाले. या प्रस्तावांमध्ये युद्धसमाप्ती नंतरच्या भविष्यकाळाचा विचार करण्यात आला होता. आणि त्या आधारावर वर्तमानकाळातील अडचणीत सहकार्याची मागणी भारतीयांकडून केलेली होती. ह्या प्रस्तावातील मनस्वी खटकणाऱ्या बाबी पुढीलप्रमाणे होत्या :—

(१) स्वयंनिर्णयाचे तत्त्व ठामपणे मान्य करूनही प्रांतांना भारतीय संघराज्यात सामील न होण्याचा आणि विभक्त स्वतंत्र राज्ये स्थापण्याचा अधिकार दिलेला होता.

(२) संविधान तयार करणाऱ्या मंडळावर प्रतिनिधित्वासाठी प्रांतांमध्ये होणाऱ्या निवडणुका विद्यमान विभक्त धार्मिक मतदारसंघाच्या पद्धतीने होतील.

(३) संविधान (घटना) समिती किंवा घटना तयार करणारे मंडळ लोक नियुक्त व बिन-लोकनियुक्त घटकांचे (विचित्रपणे) मिळून झालेले असेल. लोकनियुक्त घटक विभक्त धार्मिक मतदारसंघातून व विशिष्ट प्रस्थापित हितसंबंधियांचे मिळून आलेले असतील आणि बिन-लोकनियुक्तांची संस्थानिकांकडून नेमणूक झालेली असेल.

पंडितजी लिहितात, [२०] " भारताचे भागशः तुकडे करण्याचा कोणताही प्रस्ताव विचारांना दुःख देणारा होता. . . . मुस्लिम लीगकडून आव्हान आले होते पण फारच थोड्या लोकांनी ते गंभीरपणे घेतले होते आणि निश्चितपणेच असे बहुसंख्य मुसलमान होते जे; त्याच्याशी सहमत नव्हते. त्या आव्हानाचा पाया सुद्धा खरोखर प्रादेशिक नव्हता तरीही त्याने एक मोघम अशी भूप्रदेशाची फाळणी सुचविलेली होती. त्याचा पाया, धार्मिक मतभेदांवर आधारलेल्या राष्ट्रांची मध्यमयुगीन संकल्पना होती. आणि म्हणून त्याप्रमाणे भारतातील प्रत्येक खेड्यात दोन किंवा अधिक राष्ट्रे तयार होत होती. भारताची फाळणी सुद्धा या विस्तीर्ण आणि परस्परव्यापी धार्मिक विभाजनांवर मात करू शकत नव्हती. " भावनेचा प्रश्न सोडून दिला तरी फाळणीच्या विरुद्ध अन्य भक्कम कारणे होती. भारत हा अखंडपणे एक विशाल, शक्तिमान व स्वयंपूर्ण घटक होता. सगळीकडे छोटी राज्ये विलीन पावत होती. राष्ट्रीय राज्याची कल्पना सुद्धा बहुविध राष्ट्रीय राज्यामध्ये रूपांतरित होत होती. दूरच्या भविष्यकाळात जगाचा महासंघ होण्याचे क्रांतदर्शित्व दिसत होते. या टप्प्यावर भारताची फाळणी करण्याचा विचारसुद्धा आधुनिक ऐतिहासिक आणि आर्थिक विकास प्रवाहाच्या विरुद्ध जाणारा होता, नेहरू लिहितात, [२१] " आणि तरीही, जाचक गरजेच्या दडपणाखाली किंवा काही माणसाला भाग पाडणाऱ्या अनर्थानुसार, कितीतरी अनिष्ट गोष्टींना संमती द्यावी लागते. जे तर्कसंगतपणे व प्रसामान्यतः मुळीच विभागले जाऊ नये. त्याची फाळणी करण्याची सक्ती परिस्थितीमुळे होईलही! ब्रिटिश शासनातर्फे पुढे मांडण्यात आलेले प्रस्ताव कोणत्या एका निश्चित आणि विशिष्ट अशा भारताच्या फाळणीचा विचार करीत नव्हते. त्यांनी प्रांताच्या व राज्यांच्या अनिश्चित संस्थेच्या फाळण्यांसाठी दूरगामी दृश्यता खुली केली होती. त्यांनी सर्व प्रतिगामी, सरंजामी आणि सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या गटांना फाळणीची मागणी करण्यासाठी भडकावलेले होते." सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांनी मांडलेल्या प्रस्तावांना केवळ काँग्रेसनेच नव्हे; तर ब्रिटिशांशी ; नेहमी सहकार्य करणाऱ्या नेमस्त राजकीय पुढाऱ्यांनीही असंमती दर्शविली. तरीही भारतीय ऐक्याबाबत तीव्र भावना जवळ बाळगणारी काँग्रेस अल्पसंख्यांक व इतर गटांना आपल्याकडे वळवून घ्यावयाला उत्सुक होती. तिने असेही जाहीर केले होते की एखादा प्रादेशिक घटक तेथील लोकांच्या इच्छेविरुद्ध भारतीय संघराज्यात ठेवला जाणार नाही. अगदी अटळच झाले तर काँग्रेस फाळणीचे तत्त्व स्वीकारायलादेखील तयार होती. काँग्रेस कार्यकारिणीने क्रिप्स प्रस्तावांच्या संदर्भात केलेल्या ठरावात तशा अर्थाचा निर्देशही केला होता. प्रस्तावांचा विचार करताना अहिंसेच्या तत्त्वाचा उल्लेखही केलेला नव्हता उलट भारतीय संरक्षण मंत्री तिथे असावा असाही विचार झाला होता. मात्र राष्ट्रीय शासन तयार होण्यावर काँग्रेसचा भर होता. क्रिप्सच्या प्रस्तावांप्रमाणे संरक्षण हा दिवस सोडून इतर सर्व विषय भारतीयांच्या परिणामकारक नियंत्रणाखाली हस्तांतरित होणार होते आणि सशस्त्र सैन्यांवर व लष्करी कारवायांवर ब्रिटिश सेनापतीची

हुकुमत अबाधित रहाणारा होती. भारतीय संरक्षण सभासदाला नेमून दिलेले काम पूर्णपणे हास्यास्पद होते. सर स्टॅफोर्ड क्रिप्स बरोबर संरक्षण सभासदाच्या कार्याबद्दल चर्चा करण्यासाठी नव्याने बैठक झाली तेव्हा तर पूर्वीचे त्याबाबतचे आपले बोलणे क्रिप्सने मागे घेतले व कुणीही भारतीय कोणत्या शक्तीसह संरक्षण मंत्री नेमला जाणार नाही असे स्पष्ट दर्शविले. विद्यमान ' महाराज्यपालाची कार्यकारी परीषद ' (Viceroy's Executive Council) चालू रहाणार होती आणि त्या परिषदेवर राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना घेण्याचा विचार चालू होता. पंडितजी म्हणतात की, आपल्याला आपण राष्ट्रीय सेना आहोत अशी देशाभिमानाची भावना भारतीय सैन्यामध्ये युद्धकाळात निर्माण करावयाची होती. भारतीय जनतेला क्रिप्स योजनेचा पूर्ण अंदाज आल्यावर आपल्या वाटाघाटीत काही गोष्टींना काँग्रेसने जुजबी मान्यता दिली याबद्दलही जनतेने आपला विरोध प्रकट केला. काँग्रेस अध्यक्ष मौलाना अबूल कलाम आझाद यानी क्रिप्स याना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते, [22] " आम्ही तुमच्या निदर्शनास आणून देतो की आम्ही पुढे मांडलेल्या सूचना केवळ आमच्या नसून भारतीय जनतेची ती एकमुखी मागणी आहे, हे तुम्ही विचारात घ्यावे. . . भारतामध्ये हे मतैक्य असताही ब्रिटिश शासनाने स्वतंत्र राष्ट्रीय शासन कार्याला लागून भारतीय उद्दिष्टे व लाखो पिडीत व मरणपंथाला लागलेल्या जनतेचे मोठे कार्य पूर्ण करीत असताना त्याला प्रतिबंध करावा ही शोकांतिका ठरेल." ब्रिटिश प्रस्ताव नाकारण्यात आले. केवळ काँग्रेसपासूनच नव्हेत तर भारतातील सर्व पक्ष व गटांकडून सुद्धा मुस्लिम लीग आपल्या सवयीप्रमाणे इतरेजनांची मते प्रकट होईपर्यंत गप्प राहिली व तिनेही ते प्रस्ताव अमान्य केले. ब्रिटिश संसदेत आणि इंग्लंडमध्ये अन्यत्र केवळ गांधीजींच्या आडमुठेपणामुळे हे प्रस्ताव असंमत झाल्याची आवई उठविण्यात आली. इतरांबरोबरच गांधीजीनी आपली असंमती प्रकट केली होती. युद्ध हाच विषय सर्वांच्या मनात घोळत होता. भारतावर आक्रमण जवळ येऊन ठेपले होते.खरा प्रश्न होता राष्ट्रीय शासनाकडे शक्ती हस्तांतरित करणे. भारतीय राष्ट्रीयता विरुद्ध ब्रिटिश साम्राज्यवाद असा तो जुनाच विषय होता. आणि युद्ध असो, वा नसो, त्या विषयाला इंग्लंडमधील व भारतातील ब्रिटिश शासकवर्ग अढळ चिकटून होता व त्यांच्या पाठीमागे विन्स्टन चर्चिल यांचे व्यक्तिमत्व खडे होते.

दरम्यान भारताच्या पूर्व सरहद्दीवरून भुकेलेल्या भारतीय निर्वासितांचे तांडे आत घुसत होते. जपानी आक्रमण होणार म्हणून पूर्व बंगालमध्ये हाहाःकार माजला होता. त्याचवेळी नदीवर वाहतूक करणाऱ्या नौका युद्धाच्या नावाखाली कुणा एका अधिकाऱ्याच्या चुकीच्या आदेशानुसार नष्ट करण्यात आल्या. पाणपट्टीतच जगत असणारी फार मोठी बंगाली जमात उपजीविकेची साधने गमावून बसली. बंगालच्या भीषण दुष्काळाचे ते एक कारण होते. १९४२ च्या एप्रिलमध्ये अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक झाली. परदेशी दलालांचे गुलाम म्हणून भारतीय जनता कार्य करणार नाही असे जाहीर करण्यात आले. तथापि जनतेने आक्रमकाला मदत करू नये व चालू युद्ध प्रयत्नात अडथळे आणू नयेत अशी समज देण्यात आली. शत्रू घरात घुसलाच तर त्याचा शांततामय प्रतिकार करावा, पूर्णत्वाला पोचलेली असहकाराची कृती त्याच्याबाबत अंगिकारावी असे आवाहन जनतेला करण्यात आले. शांततामय असहकाराने शत्रूसैन्याला थोपविता येणार नाही हे नेत्याना ठाऊक होते, जनताही या धोरणावर टीका करीत होती परंतु त्यातून काँग्रेस नेतृत्वाला एकच आशा वाटत होती की प्रतिकारासाठी एक राष्ट्रीय चेतना देशभर सक्रीय होत जाईल. अन्नधान्याचा प्रश्नही गंभीर होत होता. सरकारी अधिकाऱ्यांना न जुमानता शहरांतून व खेड्यांतून अन्नसमित्या आणि स्वसंरक्षक पथके संघटित करण्यात येत होती. हृदय दुभंगून टाकणारी ती परिस्थिती होती. पंडितजी लिहितात, [२३] " परंतु जरी युद्ध भारताच्या दाराशी आले होते तरी आमची चेतना उल्हसित करणारे त्याने काही आणले नव्हते. त्यामुळे स्वातंत्र्य आणि त्या पलिकडे असणारे भविष्यकाळाचे दर्शन हेच फक्त समोर ठेवून यातना आणि मृत्यू यांचा विसर पडणारा व स्वतःची सुद्धा उपेक्षा करीत प्रयत्नांची शिकस्त करणारा आमचा आंतरिक जोम त्याने चेतविला नव्हता. आमच्यासाठी होती फक्त यातना, दुःख आणि होऊ घातलेल्या अनर्थाची

जाणीव. . . एका अपरिहार्य आणि अटळ शोकांतिकेची चिंताजनक जाणीव आमच्या मनात वाढत गेली, अशी शोकांतिका जी व्यक्तिगत तशीच राष्ट्रीयवादी होती." नेहरू लिहितात,[१९] " आमच्या मनात गुरूदेव रवीन्द्रनाथ टागोर यांनी वर्षापूर्वीच आपल्या मृत्यूशय्येवरून दिलेल्या संदेशाचा विचार, तो त्यांना शेवटचा अंत्यलेख, घोळू लागला. ते सांगतात, " दैवाची चक्रे कोणत्या तरी एका दिवशी इंग्लिश लोकांना आपले भारतीय साम्राज्य सोडून जाण्याची सक्ती करतील. परंतु कोणत्या स्वरूपातला भारत ते मागे ठेवतील, कोणत्या हालअपेष्टा ? जेव्हा त्यांच्या शेकडो वर्षांच्या प्रशासनाची नदी सरतेशेवटी आटून जाईल, तेव्हा किती प्रकारचा चिखल आणि घाण ते मागे ठेवतील ? मला एके काळी विश्वास वाटत होता की संस्कृतीचे झरे युरोपच्या हृदयातून बाहेर उचंबळतील. परंतु आज, जेव्हा हे जग सोडून मी जात आहे, त्या श्रद्धेचे केव्हाच दिवाळे निघाले आहे. . आणि तरीसुद्धा माणसावरील श्रद्धा गमावून बसणारे दुःखदायी पाप; मी करणार नाही. . . एक दिवस असा येईल, जेव्हा अपराजित माणूस आपल्या विजयपथावरील आपली पावले, सर्व अडथळे असतानाही, आपला हरवलेला मानवी वारसा पुनः जिंकण्यासाठी मागे वळविल." आणि मग पंडित नेहरू आपल्या थकलेल्या देहाचे व उध्वस्त मनाने आपल्या भोवतालच्या वातावरणातून पळवाट काढीत हिमालय पर्वताच्या आतल्या कुशीतील कुलू खोऱ्यात प्रवास करतात. कुलू खोऱ्यात पंधरवडा घालवून परत आल्यावर पंडितजींच्या लक्षात येते की, देशांतर्गत परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. या पेचप्रसंगाच्या काळात जनमनात विचारांचे विविध प्रवाह वाहत होते. कुणीही जपानी लोकांच्या बाजूचे नव्हते. चीनबद्दल अनुकूलता जनमनात बळकटपणे वाढली होती. तरीसुद्धा एक लहानसा लोकसमूह जपानी आक्रमकांना अनुकूल होता व भारतीय स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावयाला त्यांचे आक्रमण सहाय्यभूत होईल अशी त्याला भाबडी आशा वाटत होती. शिवाय जपानी आकाशवाणीवरून जी आकाशभाषिते सुभाषचंद्र बोस करीत होते; तीही तो ऐकत होता. परिस्थिती उदासीन करणारी होती. या परिस्थितीला तोंड कसे द्यावयाचे ? भारतामध्ये वर्तमानकाळाबद्दल जनमनात खोल रूजलेला तिरस्कार होता आणि भविष्यकाळ तर अंधारमय भासत होता. भारतीय मनात असा हा संघर्ष चालू असताना व हताशपणाची भावना मूळ धरीत असताना गांधीजींनी अनेक लेख लिहिले आणि लोकांच्या विचाराना एक नवी दिशा दिली. या परिस्थितीवर मात करणारे दोनच मार्ग होते (१) भारतीय स्वातंत्र्याला मान्यता देणे आणि (२) मित्र राष्ट्रांच्या सहकार्याने भारताने परकीय आक्रमणाला व स्वारीला तोंड देणे. लोक निद्रा आलस्यामध्ये खितपत पडले होते. त्यांचा उत्साह मावळला होता. त्यातून त्यांना जागे करणे आणि विद्यमान जीवनपद्धतीला आव्हान देण्यासाठी कोणती तरी कृती करणे भाग होते.

गांधीजींच्या लेखनात व भाषणात एक वर्तमानकाळाची नवी निकड आणि मनस्वीपणा व्यक्त होत होता. त्यात कृतीची सूचना होती. त्या द्वंदामध्ये आंतरराष्ट्रीयत्वावर राष्ट्रीयतेचा विजय झाला होता. राष्ट्रीय स्वातंत्र्य हा खऱ्या आंतरराष्ट्रीयत्वाचा पाया मानण्यात आला होता आणि फॅसिझम व नाझीझम विरूद्ध सहकार्याने लढा देण्याचाही तो खराखुरा मूलाधार ठरणारा होता. गांधीजींच्या नव्या लेखनाने संपूर्ण भारतात खळबळ उडाली होती. क्षोभ निर्माण होत होता. या नव्या घडामोडीमुळे आपण काही लोक फार अस्वस्थ झालो होतो, असे पं. नेहरू लिहितात. गांधीजींचा सर्वसाधारण कल आंतरराष्ट्रीय घडामोडींकडे दुर्लक्ष करणारा व संकुचित राष्ट्रवादावर आधारल्याचा भास होत होता. युद्धकाळात प्रतिकात्मक निषेध चालू ठेवावा; परंतु युद्धकाळात ब्रिटिशांना अडचणीत आणू नये असे हेतुपुरस्सर धोरण कॉंग्रेसने आखले होते. गांधीजींशी याबाबत कॉंग्रेस नेत्यांनी विचारविनिमय केला. परंतु गांधीजींचे मत ते बदलू शकले नाहीत. तरीही हळूहळू गांधीजींची आपली मूळ भूमिका कायम राहून आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा विचार त्यांच्या लेखनातून डोकावू लागला. गांधीजींना आपल्या प्रिय मातृभूमीपेक्षाही भारत

आणखी अधिक काही वाटत होता. जगातील सर्व वसाहती व पिळलेल्या लोकांचे प्रतीक भारत देश होता. जागतिक धोरण ज्यावर ठरविलेच पाहिजे अशी ती कसोटी होती. जर भारत अस्वतंत्र राहिला; तर इतर वसाहती देश आणि परतंत्र वंश त्यांच्या विद्यमान गुलामी स्थितीतच राहतील आणि युद्धात लढणे निरर्थक ठरले असते. युद्धाचा नैतिक पाया बदलणे अत्यावश्यक होते. या नैतिक सामर्थ्यावर शत्रू राष्ट्राची लष्करी शक्ती निष्प्रभ ठरण्याचा व ती कोसळण्याचा चमत्कार निश्चितपणे घडून आला असता. गांधीजींच्या या युक्तीवादांशी आम्ही सर्व परिचित होतो, पंडितजी सांगतात, ' आमचा त्यांच्यावर विश्वास होता व हेच युक्तिवाद वारंवार आमच्या भाषणातून आम्ही करीत होतो. परंतु शोकांतिका अशी होती की, हा चमत्कार घडून येण्याच्या मार्गात ब्रिटिश शासनाचे धोरण हाच मोठा अडथळा होता. मग पुढे काय ? देशात अव्यवस्था फैलावत जात असताना व देशाचा चक्काचूर होत असताना तटस्थपणे तो पाहत रहाणे आम्हाला शक्य नव्हते. गांधीजींचे वय होत चालले होते. ते सत्तरीत आले होते. अखंडपणे आपले जीवन त्यानी चळवळीत घालविले होते. तरीही चैतन्याने व जोमाने त्यांची देहयष्टी व मन सळसळत होते. अशा परिस्थितीत गांधीजीनी आपण होऊनच पुढाकार घेतला व एक काँग्रेस ठराव पुरस्कृत केला. त्याप्रमाणे स्वतंत्र भारताचे तात्पुरते शासन आणले. ते प्राथमिक कर्तव्य पार पाडताना आपली सर्व प्रचंड साधनसामग्री स्वातंत्र्यलढ्यासाठी आणि आक्रमणाविरूद्ध खर्च करणार होते आणि भारताच्या संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्रांशी (United Nations) सहकार्य करणार होते. त्यासाठी सर्वप्रकारचे सैन्यबळ व इतर शक्ती उपयोगात आणणार होते. अशा रीतीने स्वतःला बांधिल करणे गांधीजीना सोपे काम नव्हते. पंडितजी सांगतात की, त्यामुळे आपण व गांधीजी यांच्यामध्ये आड येणारे सैद्धांतिक आणि इतर मतभेद दूर झाले होते. तरीही एक प्रमुख अडचण उरत होती. ती म्हणजे आम्ही कोणतीही कृती केली असती तरी युद्ध प्रयत्नात तिचा अडथळा निर्माण झाला असता. आश्चर्यकारक गोष्ट अशी होती की, ब्रिटिश शासनाशी अजूनही समझौता करता येईल असा विश्वास गांधीजीना वाटत होता. म्हणून प्रत्यक्ष कृतीबद्दल ते बोलत होते, तरी त्यांच्या मनात काय करावयाचे होते ते त्यानी स्पष्ट केले नव्हते. यावेळी भारतीय जनतेची भाववृत्ती बदलली होती. एका दुर्मुख क्रियाशून्यतेकडून ती एका मनःक्षोभाच्या व अपेक्षेच्या अवस्थेकडे जात होती. काँग्रेसच्या निर्णयाची किंवा ठरावाची ती वाट पहाणार नव्हती. आता त्याना स्वतःचा संवेग प्राप्त झाला होता. गांधीजींचे म्हणणे चुकीचे असो वा योग्य असो, जनतेच्या भाववृत्तीला त्यांनी आकार दिला होता. त्यात दुःसाहसीपणा होता. कृतीचे काय परिणाम होतील याचा विचार करणारी मनःशांती, बुद्धिवाद व तर्कशास्त्र यांना त्यात गौण स्थान होते. त्यात एक भावनिक निकड होती. कृतीच्या बिननकाशी समुद्रामध्ये उडी मारणे आणि काहीतरी करणे, हे घातक दैवाचे, दीन विषय होण्यापेक्षा काहीसे अधिक इष्ट होते. युद्ध प्रदीर्घ काळ चालणार होते. लोकांच्या रागाचा पारा चढत गेला तसा शासनाचाही पारा चढत गेला. भारताला एकदाचे कायमचे चिरडून टाकण्याची संधी त्याला घ्यायची होती. अखिल भारतीय काँग्रेस समितीसमोर गांधीजींनी आपले शेवटचे भाषण केले; तेव्हा त्यात समझोत्यासाठी महाराज्यपालाना भेटण्याची कळकळीची इच्छा त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे गांधीजी किंवा काँग्रेस कार्यकारी समितीने सुद्धा जाहीरपणे किंवा खाजगीत लोकांना कोणत्याही प्रकारचे कृतीचे दिशादिग्दर्शन केले नाही. मात्र लोकांनी सर्व प्रकारच्या घडामोडींसाठी तयारीत रहावे व काहीही झाले तरी शांततामय व अहिंसक कृतीच्या धोरणालाच चिकटून रहावे, असे त्यांना सांगण्यात आले.

दिनांक ७ आणि ८ ऑगस्ट १९४२ ला अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक मुंबईमध्ये भरली. जाहीरपणे एका ठरावावर विचारविनिमय करण्यात आला." छोडो भारत " (Quit India) या अभिधानाने तो ठराव ओळखला जाऊ लागला. तो ठराव दीर्घ व समावेशक होता. भारतासाठी आणि संयुक्त राष्ट्रांचे जे कार्य ते यशस्वी होण्यासाठी भारतीय स्वातंत्र्याला तात्काळ मान्यता देणे; आणि भारतातील आपले ब्रिटिश शासन संपुष्टात आणणे यासाठी संयुक्तिक युक्तीवाद त्यात करण्यात आला होता. स्वतंत्र भारताचे संविधान संघीय स्वरूपाचे असेल व त्यात संहत होणाऱ्या घटकांना स्वायत्ततेचे सर्वात मोठे माप देण्यात येईल आणि त्या घटकांना अवशिष्ट शक्ती विहित करण्यात येईल. स्वातंत्र्य हे लोकांच्या एकात्म इच्छाशक्तीवर व बळावर आक्रमणाला परिणामकारक तोंड देण्याचे सामर्थ्य भारताला देईल. हे भारताचे स्वातंत्र्य आशिया खंडातील इतर सर्व राष्ट्रांच्या स्वातंत्र्याच्या नांदीचे प्रतीक ठरलेच पाहिजे असा तो ठराव होता. त्यात स्वतंत्र राष्ट्रांचा विश्व महासंघ सुद्धा प्रस्तावित करण्यात आला होता आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेनेच त्याची सुरूवात करण्यात यावी असे सुचविलेले होते. काँग्रेस समितीने विश्वस्वातंत्र्याच्या हितसंबंधात ब्रिटन आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेला पुनः आवाहन केले आणि मग त्या ठरावात नमूद करण्यात आले की, [२५]" म्हणून ही समिती, स्वातंत्र्य आणि स्वतंत्रता या भारताच्या अनन्य संक्राम्य अधिकाराच्या सत्त्यत्वासाठी, गांधीजींच्या अपरिहार्य नेतृत्वाखाली अहिंसेच्या मार्गावरचा जनता लढा सुरू करावयाला मंजुरी देण्याचा संकल्प करीत आहे." ८ ऑगस्ट १९४२ दिनी अखेरीला हा ठराव संमत झाला. त्यानंतर अवघ्या काही तासातच भल्या पहाटेला मुंबईत व देशात सर्वत्र फार मोठ्या धरपकडी झाल्या आणि आम्ही अहमदनगर.किल्ल्यात येऊन ठेपलो, पंडितजी लिहितात.

अहमदनगर किल्ल्यात आल्यावर १३ ऑगस्ट १९४४ रोजी पंडित नेहरूंना दोन वर्षे होणार; त्या अगोदर चार महिने त्यांनी लेखणी हाती घेतली. पंडितजी लिहितात, [२६]" गेल्या चार महिन्यांत लेखन करीत असताना भारताचे प्राचीन अभिलेख आणि अनुभव यात मी माझे मन गुंतवून ठेवले आणि त्यातून माझ्या डोक्यात जी विचारांची गर्दी उसळली त्यातले काही मी निवडले आणि त्यातून एक पुस्तक तयार झाले " (भारताचा शोध) या पुस्तकाबद्दल ते म्हणतात, " मी काय लिहिले, हे मागे वळून पाहताना ते अपुरे, तुटक, एकसंघपणाचा अभाव असलेले,. अनेक गोष्टींचे मिश्रण असलेले. ज्यात वैयक्तिक घटक प्रधान आहे व ज्यामुळे जो अभिलेख आणि विश्लेषण वस्तुनिष्ठ व्हावे म्हणून इच्छिक होते त्याला व्यक्तिगत रंग आला आहे, असे झाले आहे ". भूतकाळाबद्दल लिहिताना आपण आपल्याला भूतकाळाच्या भारातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे असे पंडितजी लिहितात. १९४२ च्या ऑगस्ट महिन्यात जे घडले ते अकस्मात घडले नव्हते. पूर्वी जे काही घडून गेले होते, त्यावर चढलेला तो कळस होता. युद्ध वाढत गेले तसे अधिकच स्पष्ट झाले की, पाश्चात्य लोकशाही राष्ट्रे परिवर्तनासाठी लढत नव्हती तर ती आपली जुनी व्यवस्था अखंड चालू रहावी यासाठी लढत होती. युद्धापूर्वी त्यांनीच फॅसिझमचा अनुनय केला होता. फॅसिझम आणि नाझीझम हे काही अकस्मात उपटले नव्हते किंवा इतिहासाने घडविलेले ते अपघात नव्हते. त्यांची भूतकालीन वाढ साम्राज्यवादी घटनांतून व तत्त्वज्ञानातून झाली होती. लोकशाही उघडपणे व विचारपूर्वक पायाखाली चिरडीत फॅसिझम व नाझीझम उदयाला आले. परंतु या युद्धाला एक नैतिक पैलू होता. तो लष्करी उद्दिष्टांच्या पलिकडे जात होता. फॅसिस्ट पंथावर व त्याच्या दृष्टीकोनावर तो आक्रमकपणे हल्ला करीत होता. कारण त्यावेळी म्हटले गेले त्याप्रमाणे दुनियेतील लोकांच्या आत्म्यासाठी ती लढाई होती. पाश्च्यात्य देशांतही असे अनेक लोक होते ज्यांचा या नैतिक पैलूवर विश्वास होता आणि एक नवे जग निर्माण व्हावे असे त्यांना वाटत होते.परंतु संयुक्त राष्ट्रसंघाच्या

पुढाऱ्यांची दृष्टी भविष्यकाळाकडे न वळता भूतकाळाकडे वळली होती. विन्स्टन चर्चिल यांच्या दृष्टीने ते युद्ध पुनःस्थापनेसाठी व काही किरकोळ बदल करीत इंग्लंड आणि त्याचे साम्राज्य पुढे चालविण्यासाठी सुरू होते. अध्यक्ष रूझवेल्ट आपल्या भाषणातून अधिक आशादायी अभिवचन जगाला देत होते. परंतु मूलभूतपणे त्यांचे धोरण फारसे निराळे नव्हते. राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटिश राजवटीला आव्हान दिल्यामुळे ती व गांधीजी तिचे एक नंबरचे शत्रू बनले होते.

९ ऑगस्ट १९४२ ला पहाटे नेत्यांची देशभर धरपकड झाल्यावर भारतामध्ये काय घडले होते? तो अखिल भारतीय जनतेचा स्वयंस्फूर्त प्रक्षोभ होता. वायव्य सरहद्द प्रांतातही पठाण नेते बादशहा खान (अब्दुल गफार खान) यांच्या नेतृत्वाखाली हजारो पठाण लोकांनी निदर्शने केली होती. त्यात लाठीमाराने स्वतः बादशहा खानही जखमी झाले होते. सर्व भारतभर, विशेषतः विद्यापीठात शिकणाऱ्या तरुण पिढीने पुढाकार घेतला आणि मग त्या हिंसक असो वा शांततामय, अशा साधनांनी आपली भूमिका पार पाडली. अहिंसेचा धडा लोक विसरले. १८५७ च्या बंडानंतर भारताच्या इतिहासात लोकांकडून हा, असा प्रथमच उठाव होत होता. तरीही, लोकांची मने पेटली असता त्यात वंशवादाची भावना नव्हती. देशाच्या अनेक भागात ब्रिटिश सत्ता संपुष्टात आली होती. ही चळवळ काहीही करून चिरडून टाकण्याचा ब्रिटिश राज्यकर्त्यांनी दृढनिश्चय केला होता. अनेक वरिष्ठ वर्गातील धनाढ्य वर्ग या उठावामुळे अस्वस्थ झाले होते. स्वतःला ते राष्ट्रवादी म्हणवीत व अधूनमधून राज्यकर्त्यांवर टीकाही करीत. तरीही ते मनातून डरपोक होते, पंडितजी लिहितात, " ही चळवळ दडपून टाकण्यात ब्रिटिश सत्तेला यश मिळत गेले तेव्हा त्यांनी सत्तेशी संधिसाधू हातमिळवणी केली. इंग्लिश राज्यकर्त्यांबद्दलचा लोकांच्या मनातील क्षोभ एवढ्या थराला गेला होता की; पंडितजी लिहितात, " भूतकाळात मी नेहमीच इंग्लंडला भेट देण्यासाठी उत्सुक असे. कारण माझे तिथे पुष्कळ मित्र आहेत आणि जुन्या स्मृती मला ओढ लावीत. पण आता मला आढळून आले की अशी इच्छा मला वाटत नव्हती आणि तो विचारही रूचत नसे. शक्य तितके इंग्लंडपासून दूर रहावे असे मला वाटत होते आणि इंग्लिश माणसाबरोबर भारताच्या प्रश्नांची चर्चा करण्याचीही मला इच्छा नव्हती." परंतु या काळात भारत हा एक मनाने आणि देहानेही रुग्ण देश होता. या युद्धकाळात काही लोकांची आर्थिक दृष्ट्या भरभराट झाली तरी बहुसंख्य समाज हवालदिल झाला होता आणि त्यातच बंगालचा दुष्काळ घडला. तितका नव्हे, पण तसाच तो पूर्व आणि दक्षिण भारतामध्ये घडला. ब्रिटिशांच्या १७० वर्षांच्या राजवटीत १७६६ पासून १७७० पर्यंत बंगाल आणि बिहारवर महान दुष्काळाची आपत्ती व त्याबरोबरच रोगराईच्या कॉलरा, मलेरियाच्या साथी सुद्धा कोसळल्या. बंगालच्या दुष्काळात १९४३-४४ या कालखंडात मरण पावलेल्यांची संख्या पंधरा लाखांपासून तीस लाखांपर्यंत होती आणि हा दुष्काळ मानवनिर्मित होता. युद्ध परिस्थिती आणि ब्रिटिश सरकारची बेपर्वा वृत्ती, उद्योगपती व व्यापारी लोक यांच्यामध्ये नफा कमाविण्याची लागलेली स्पर्धा हेही दुष्काळाला कारणीभूत होते. युरोपमध्ये युद्ध सुरू झाल्यावर सव्वातीन वर्षे व जपानी युद्ध होऊन ते ब्रह्मदेशात घुसल्यनंतर एक वर्षानंतर ब्रिटिश शासनाने एक अन्न विभाग सुरू केला. कलकत्ता महानगरीच्या रस्त्यारस्त्यात भूकपिडीतांची प्रेते सर्वत्र विखुरली असतानाही वरिष्ठ वर्गाच्या मौज-मजा चालूच होत्या हेही पंडितजी निक्षून लिहितात. त्यावेळचे भारतीय जीवनातील वास्तव टिपताना पंडितजी लिहितात,[२१] "आज भारतामध्ये कितीतरी मोठ्या प्रमाणात निराशावाद फैलावला आहे. वैफल्यवादाची भावना दोन्हीही समजून घेता येतील. कारण घडलेल्या घटनांनी आमच्या लोकांवर निष्ठूर आघात केले आहेत आणि भविष्यकाळ आशादायी वाटत नाही. परंतु तरीसुद्धा पृष्ठभागाखाली खळबळ आणि घुसळण आहे, नव्या जीवनाची आणि जोमाची चिन्हे दिसताहेत

आणि अज्ञात अशा शक्ती कामाला लागल्या आहेत." युद्धजन्य परिस्थितीच्या आघाताने आशिया व आफ्रिका खंडावर कोणते दूरगामी परिणाम होणार असतील याचे चिंतन नेहरूंच्या संवेदनशील अंतर्यामात अनेक तांत्रिक, वैज्ञानिक, सामाजिक, राजकीय व वैश्विक स्पंदने निर्माण करते. आशिया खंडाबद्दल लिहिताना युरोपशी त्याची तुलना करताना वर्तमान वास्तवाचे नेमके दिग्दर्शन पंडितजी करतात. ते लिहितात," हजारो वर्षे आणि अधिक काळ जेव्हा युरोप मागासलेला होता व अंधार युगांनी गिळून टाकलेला होता; आशिया खंड मानवाच्या प्रगत चेतनेचे प्रतिनिधित्व करीत होते. एका तेजस्वी संस्कृतीची युगामागून युगे तिथे भरभराटीला आली आणि संस्कृतीची आणि सत्तेची महान केंद्रे तेथे उदयाला आली. सुमारे पाचशे वर्षांपूर्वी युरोपचे पुनरूज्जीवन झाले आणि हळूहळू ते पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे पसरले. नंतर शतकाभरात जगावर सत्ता, संपत्ती आणि संस्कृती यांचे वर्चस्व गाजविणारे ते खंड बनले. या परिवर्तनामागे कोणते चक्र होते काय आणि ही प्रक्रिया आता उलटविली जात आहे की काय? निश्चितपणेच, दूर पश्चिमेला अमेरिकेत आणि पूर्व युरोपात सत्ता आणि प्राधिकरण हलविण्यात आले आहे.... भविष्यकाळात संघर्ष घडणार आहेत का, की पूर्व आणि पश्चिम यांच्यामध्ये एक नवा समतोल साधला जाणार आहे ?"

१९४५ च्या मार्च आणि एप्रिल महिन्यात काँग्रेस कार्यकारिणीच्या सभासदांना अहमदनगर किल्ल्यातील तुरुंगतळातून हलविण्यात आले अणि त्यांना आपापल्या प्रांतातील तुरुंगात पाठविण्यात आले.तोही तुरुंगवास दिनांक १५ जून १९४५ रोजी संपला. पं. नेहरू ऑगस्ट १९४२ पासून आपल्या अटकेनंतर १०४१ दिवसांनी पुनः भारतीय जनप्रवाहात सामील झाले. पंडितजी लिहितात, [३०] " हळुहळू गेल्या तीन वर्षांतील कोणते तरी चित्र आपोआपच माझ्या मनात तयार झाले. इतरांप्रमाणेच मला आढळून आले की, जे काही घडले होते ते आम्ही कल्पिले होते त्याहीपेक्षा काही अधिक होते. हा तीन वर्षांचा काळ आमच्या लोकांसाठी फार मोठा प्रसूतिवेदनेचा काळ होता आणि प्रत्येक माणूस; जो आम्हाला भेटला त्याच्या मुद्रेवर त्याची खूण उमटलेली होती. भारत बदललेला होता आणि वरवर शांत दिसणाऱ्या पृष्ठभागाखाली संशय आणि प्रश्नचिन्ह, वैफल्य आणि राग आणि दबलेला मनोविकार भाव होता. आमच्या सुटकेने आणि घटनांनी जे वळण घेतले त्यामुळे दृश्यपालट झाला होता. नितळ पृष्ठभागाला सुरकुत्या पडल्या होत्या आणि भेगा दिसत होत्या. देशभर मनःक्षोभाच्या लाटा उसळल्या होत्या; तीन वर्षांच्या दडपणानंतर, ते कवच फोडून लोक बाहेर पडले होते. मी यापूर्वी असा जनसमुदाय, असा पिसाट मनःक्षोभ, स्वतःला स्वतंत्र करून घेण्याची जनतेची अशी भावोत्कट इच्छा पाहिली नव्हती. तरुण पुरुष आणि स्त्रिया, मुले आणि मुली, काहीतरी करण्याच्या ईर्षेने पेटलेली होती आणि तरीही आपल्याला काय करावयाचे आहे ते त्यांच्या मनात स्पष्ट झालेले नव्हते ." युद्ध संपले होते आणि अणुबॉम्ब हा नव्या युगाचे प्रतिक बनला होता. आझाद हिंद सेनेची कहाणी लोकांच्या कानावर आली होती. येथून तेथून देश पेटला होता. नव्या निवडणुका भारतात येऊ घातल्या होत्या. " परंतु नंतर काय ? " पंडितजी प्रश्न करतात. समारोप करताना ते लिहितात, " येणारे वर्ष एक वादळी आणि त्रासाचे; संघर्षाचे आणि गोंधळाचे ठरण्याचा संभव आहे. भारतामध्ये स्वराज्याच्या पाया घातल्याखेरीज भारतात किंवा कुठेही शांतता नांदणार नाही."

□ □ □

---

**पं. नेहरू यांनी घेतलेला भारताचा शोध**

टीपा :—(१) Discovery of India : by Jawaharlal Nehru : 1956 :Published by MERIDIAN BOOKS LIMITED, 8 GARRICK STREET, LONDON–W.C. 2, P. 1.

(२) कित्ता P. 6, 7, 8, 9

(३) ,, P. 9, 10, 11, 12, 13, 14, 15.

(४) ,, P. 15, 17, 19.

(५) ,, P. 22, 23.

(६) ,, P. 24.

(७) ,, P. 62.

(८) ,, P. 63.

(९) ,, P. 65.

(१०) ,, P. 76, 78.

(११) ,, P. 108.

(१२) ,, P. 230-31.

(१३) ,, P. 278.

(१४) ,, पृ. 300.

(१५) ,, पृ. 358.

(१६) ,, पृ. 378.

(१७) ,, पृ. 446-47.

(१८) ,, पृ. 457.

(१९) ,, पृ. 462.

(२०) ,, पृ. 465.

(२१) ,, पृ. 465-466.

(२२) ,, पृ. 472.

(२३) ,, पृ. 478.

(२४) ,, पृ. 478-79.

(२५) ,, पृ. 489.

(२६) ,, पृ. 490.

(२७) ,, पृ. 507.

(२८) ,, पृ. 518.

(२९) ,, पृ. 561-562.

(३०) ,, पृ. 570.

टीपा

(६) कित्ता P. 24.

(७) ,, P. 62.

(८) ,, P. 63.

(९) ,, P. 65.

(१०) ,, P. 76, 78.

(११) ,, P. 108.

(१२) ,, P. 230-31.

(१३) ,, P. 278.

(१४) ,, पृ. 300.

(१५) ,, पृ. 358.

(१६) ,, पृ. 378.

(१७) ,, पृ. 446-47.

(१८) ,, पृ. 457.

(१९) ,, पृ. 462.

(२०) ,, पृ. 465.

(२१) ,, पृ. 465-466.

(२२) ,, पृ. 472.

(२३) ,, पृ. 478.

(२४) ,, पृ. 478-79.

(२५) ,, पृ. 489.

(२६) ,, पृ. 490.

(२७) ,, पृ. 507.

(२८) ,, पृ. 518.

(२९) ,, पृ. 561-562.

(३०) ,, पृ. 570.

# पं. जवाहरलाल नेहरू आणि समाजवाद

□ शांताराम गरूड

'जवाहरलाल नेहरू म्हणजे समाजवाद 'असे एक समीकरण आपल्या देशात बऱ्याच प्रमाणात प्रसारात आहे. ते बरोबर आहे असं भाबडेपणानं मानणाऱ्यांची संख्याही मोठी आहे आणि काही थोडी मंडळी मतलबीपणानं ते खरं असल्याचं भासवीत असतात. वस्तुतः हे समीकरण पूर्णांशाने बरोबर नाही आणि ते तसे आहे असे मानण्यामध्ये पंडित नेहरू आणि समाजवाद या दोहोंचाही विपर्यास होतो; हे पंडित जवाहरलाल नेहरूंच्या जीवन चरित्राच्या या संदर्भातील भागाचा आढावा घेतला आणि समाजवाद या विषयाचा अभ्यास केला तर लक्षात येते. तरीदेखील जवाहरलाल म्हणजे समाजवाद हे समीकरण लोकमानसात प्रचलित आहे. याचे कारण नेहरूनी भारतात विशेषतः भारतीय स्वातंत्र्य लढ्यात समाजवादाचा अत्यंत प्रभावी आणि तितकाच प्रांजळ असा पुरस्कार व प्रचार केला आहे. कोटयवधी भारतीय स्त्री-पुरूषांना त्यानी समाजवादाच्या प्रचाराने भारून टाकले होते. समाजवादाशिवाय कोणत्याही परतंत्र समाजाचे संपूर्ण स्वातंत्र्य शाश्वत होऊ शकत नाही. हे त्यांना मनोमन पटलेले होते आणि अगदी आंतरिक उमाळ्याने आणि निःसंदिग्धपणे तशी मांडणी त्यांनी आपल्या शेकडो भाषणांतून आणि लक्षावधी पानांच्या लिखाणातून केलेली आहे. हा नुसता भावनात्मकतेचा व स्वप्नाळू आशावादाचा भाग आहे; असे ती भाषणे व ते लिखाण वाचले व अभ्यासले तर निदान तात्त्विक आकलनाच्या, वैचारिक धारणेच्या क्षेत्रात तरी जाणवत नाही, असे म्हणता येत नाही. मात्र प्रत्यक्षात त्यांच्या कार्यक्षेत्रात भारतात आवश्यक ती किंवा त्यांना अभिप्रेत होती ती अनुकूलता असता समाजवादाची प्रस्थापना केल्याच्या किंवा त्याचा पाया घातल्याच्या कर्तबगारीचा भाग त्यांच्या नावे इतिहासात नोंदला गेलेला नाही, नोंदविता येणार नाही. भारतीय जनतेलाही तशी प्रचिती आलेली नाही. खुद्द तेही तसा दावा करू शकले नाहीत; ही मोठी कोड्यात टाकणारी बाब आहे. राजकारणाच्या व समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी सार्वजनिक जीवनात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी व जिज्ञासूनी याची संशोधनात्मक चिकित्सा करणे आवश्यक आहे. आकलन आणि निर्मिती यामध्ये मोठी तफावत असणे हे आपल्या सार्वजनिक व व्यक्तिगत जीवनातील एक व्यंग आहे. नेहरू जन्मशताब्दीच्या निमित्ताने जवाहरलाल नेहरूंसारख्या उत्तुंग व्यक्तिमत्वाचा व कर्तृत्ववान नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास आपल्या सामूहिक व व्यक्तिगत कार्यशक्तीला कर्तृत्ववान करण्यात उपयोगी पडू शकेल असे वाटते. त्याच उद्देशाने या लेखाची मांडणी करीत आहे.

### वैचारिक विकासक्रम

एका संपत्तीमान, उच्चभ्रू पण उदारमतवादी सार्वजनिक नेत्याच्या घरी जवाहरलाल नेहरूंचा जन्म झाला. ब्रिटीश सत्तेच्या दुसऱ्या पर्वात आधुनिक शिक्षण व औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेले आधुनिक राहणीमान यांचा उपभोग घेत असताना सामाजिक व राष्ट्रीय जीवनामध्ये बदल घडवून आणण्याचे

सनदशीर प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रीय नेत्यांपैकी एक मान्यवर नेते म्हणूनच मोतीलाल नेहरू सर्वांना माहिती होते. त्यांचा हा एकुलता एक लाडका मुलगा. त्याचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी त्यांच्या कुटुंबियानी शक्य ते सर्व केले आणि त्याकाळी त्याना अशक्य असे काही नव्हतेही. घरचे व भारतातील आधुनिक शिक्षण पूर्ण करून जवाहरलालनी हॅरो आणि केंब्रिज विद्यापीठात उच्च शिक्षण संपादन केले. प्रचंड आणि अखंड वाचन, जिज्ञासू आणि चिकित्सक निरीक्षण, विचक्षक ग्राहकता यातून संस्कारक्षम, तल्लख व अस्वस्थ अशा मनोभूमीतच जवाहरलाल नेहरूंच्या वैचारिक भूमिकांचा विकास झाला आहे. भावनाप्रधानता आणि वैज्ञानिक विश्लेषण यांचा समतोल कायम ठेवून त्यांनी ही ज्ञानसाधना केली. अंधश्रद्धा, पोथीनिष्ठा वा दुराभिमान यापासून ते नुसते दूर राहिले असे नव्हे; तर त्याविरुद्धची बंडखोरी विचाराच्या आणि प्रचाराच्या क्षेत्रात ते करीत राहीले. इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादी विषयांचा गतिशील, वैज्ञानिक व इहवादी दृष्टीने अभ्यास करून त्याचे विवेचन विशेषतः भारतीय समाज जीवनाच्या संदर्भातील विवेचन त्यांनी आपली भाषणे, लिखाण व प्रचंड पत्रव्यवहार यातून केले आहे. भारतीय, आशियाई तसेच पाश्चात्य तत्त्वज्ञान, इतिहास व सांस्कृतिक विकास यांचे स्वतंत्र प्रज्ञेने त्यांनी आकलन केल्याचे त्यांच्या या विचारधनावरून जागोजागी प्रत्ययाला येते. यातूनच त्यांनी समाजवादाचा स्वीकार केला. त्याचा पुरस्कार व प्रचार केला. १९२७ पासून जवाहरलाल नेहरू यांचा खऱ्या अर्थाने भारताच्या राष्ट्रीय स्तरावर आणि त्याचवेळी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या व्यासपीठावर स्वयंप्रकाशित ताऱ्याप्रमाणे उदय झाला.

भारताचे राष्ट्रीय स्वातंत्र्य हा त्यांच्या ध्येयवादाचा केंद्रबिंदू. मात्र त्यासंबंधीच्या परंपरागत संकुचित एकांगी आणि कालबाह्य कल्पना झिडकारून त्यानी विसाव्या शतकाला साजेल अशी आधुनिक राष्ट्रीयत्वाची व स्वातंत्र्याची संकल्पना तयार केली. ती धीटपणाने मांडून तिला लोकमान्यतेचे पाठबळ मिळविले.

आधुनिक राष्ट्रीयत्वाची आपली संकल्पना ही संकुचित राष्ट्रवादी नसून व्यापक आंतरराष्ट्रीय भूमिकेवर आधारलेली आहे हे स्पष्ट करून आपल्या कार्यकर्त्यांना व सामान्य माणसानाही जागृत करण्याकरिता त्यांनी सांगितले आहे की, " आपल्या भोवताली काय चालले आहे याचा विचार न करता आपल्यापैकी अनेक लोक प्राचीन काळातच वावरत असतात. कांहीना वैदिक काळाची पुनः प्रतिस्थापना व्हायला हवी तर काहींना इस्लामच्या आरंभीचा काळ पुनः यायला हवा आहे. आपली प्राचीन संस्कृती ही निराळ्या परिस्थितीत निर्माण झाली होती हे आपण विसरतो. आपल्याकडील अनेक परंपरा, सवयी, रुढी, आपले सामाजिक कायदे, आपली वर्णव्यवस्था, आपण स्त्रियांना दिलेले (नीच) स्थान आणि आपल्यावर लादलेला धार्मिक कर्मठपणा या सर्व गोष्टी आताच्या परिस्थितीत अगदी कालबाह्य ठरलेले भूतकाळाचे अवशेष आहेत.तुर्कस्थान किंवा रशिया यांच्याप्रमाणे भारत जेव्हा ही भूतकाळातील कर्मकांडे व थोतांडे टाकून देऊन आजच्या वास्तवाचा विचार करू लागेल तेव्हाच त्याची प्रगती होईल." हा आधुनिकतेचा आशय सांगत असताना आजचा साम्राज्यवाद विरोध हा समाजवादाच्या पूर्वतयारीचाच टप्पा आहे हेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. ते म्हणतात, " भारतातील ब्रिटिश साम्राज्यशाहीचा धिःकार करणाऱ्या आमच्यातील अनेक लोकांना हे समजत नाही की, हा काही आंग्लवंशीय विरूद्ध भारतीय लोक अशा संघर्षाचा मामला नाही; तर औद्योगिक क्रांतिनंतर भांडवलदारी पद्धतीने जो विकास झाला त्यातून निर्माण झालेली ही समस्या आहे. भांडवलदारी पद्धतीची परिणती एका माणसाची दुसऱ्या माणसाकडून, एका गटाची दुसऱ्या गटाकडून, एका देशाची दुसऱ्या देशाकडून पिळवणूक होण्यामध्ये होणे अटळच आहे. आणि म्हणून आपला या साम्राज्यशाहीला विरोध असेल तर

आपण भांडवलशाहीलाही विरोधच करायला हवा. आपल्यापुढे याकरिता एकच पर्याय आहे आणि तो म्हणजे कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या समाजवादाचा. यातून केवळ एकच निष्कर्ष निघतो की, आपण ब्रिटिश साम्राज्यशाही विरोधी राजकीयच नव्हे; तर सामाजिक व आंतरराष्ट्रीय पातळ्यांवरूनही लढले पाहिजे.'' थोडक्यात समाजवादाचा आशय असल्याशिवाय स्वातंत्र्य साकार होऊ शकत नाही. हा विचार पंडित नेहरूनी सर्वत्र व सदैव मांडलेला आहे. राष्ट्रीय काँग्रेसची अध्यक्षीय भाषणे अथवा ठराव यांचाही त्याबाबतीत त्यांनी अपवाद केलेला नाही.

भारतातील वैदिक साहित्य व बुद्धवाङ्मय, चीनच्या तत्त्ववेत्यांचे विचार, तसेच ग्रीक, रोमन, इस्लामिक संस्कृती या प्राचीन तत्त्वप्रणाली, त्याचप्रमाणे धर्मविचार यांच्या विचक्षक अभ्यासातून तयार झालेल्या मनाने त्यानी आधुनिक पाश्चात्य विचारधारांचा व आशियायी व भारतीय लोकजीवनाचा अभ्यास केला. रोमा रोलाँ, रोला प्रुधा, बर्नार्ड शॉ, वेब दांपत्य, मार्क्स-लेनिन यांचे विचार आत्मसात करण्याचे शिकस्तीचे प्रयत्न केले. औद्योगिक क्रांती, फ्रेंच राज्यक्रांती, इंग्लंडमधील सत्तांतर आणि रशियामधील क्रांती यांचे तात्त्विक व परिणामात्मक अध्ययन करून भारतातील क्रांतीच्या उभारणीसाठी योग्य वाटणारे तात्त्विक व परिणामात्मक आधार त्यातून शोधण्याचा प्रयत्न करूनच त्यानी आपली वैचारिक धारणा निश्चित करण्याचा प्रयत्न केला; हेही त्यांच्या व त्यांच्या संबंधीच्या लिखाणावरून स्पष्ट होते. त्याचबरोबर हेही स्पष्ट होते की, महात्मा गांधींच्या विचारापेक्षा त्यांच्या आचारांचा नेहरूंवर विलक्षण परिणाम झाला आणि त्यांच्या सहवासाने वैचारिक एकात्मतेच्या अभावी देखील भावनिक एकात्मतेच्या मोहाचा प्रभाव निर्णायक स्वरूपाचा ठरला आहे आणि मूलभूत आकलनापासून तात्कालिक उपाययोजनांच्या तपशीलाबाबत या दोघात पराकोटीचे मतभेद असूनही महात्माजीनी नेहरूना आपले राजकीय वारस म्हणून जाहीर करायचे व ते नेहरूनी बिनबोभाट मान्य करायचे असा प्रकार घडला आहे. कोणत्याही व्यक्तिमत्वाच्या तर्कशुद्ध विकासक्रमाशी ही प्रक्रिया विसंगत तर आहेच परंतु नेतृत्वाच्या विकासक्रमाबाबत ती हानिकारकही ठरणारी आहे. जवाहरलाल नेहरूंच्या जीवन चरित्राच्या अभ्यासातून याचा प्रत्यय येतो.

महात्मा गांधींचा नेहरूंवरील प्रभाव कशा प्रकारचा होता याची त्यांच्याच शब्दावरून कल्पना येऊ शकते. भारताचा शोध या ग्रंथात ते म्हणतात, ''. . . आणि गांधीजी आले, पर्वतावरून येणाऱ्या प्राणदायी वाऱ्याच्या झुळकीप्रमाणे ते वाटले. आम्ही जरा नीट हवा आत घेतली. छाती जरा रुंद झाली. सभोवतालच्या अंधाराला भेदीत सूर्यकिरणाप्रमाणे ते आले. आमच्या डोळ्यावरची झापड त्यानी उडविली. एखादा झंझावात यावा आणि उलथापालथ व्हावी तसे झाले. विशेषतः आमच्या मनोव्यापारात त्यानी क्रांती केली. ते आकाशातून अवतरले असे वाटले नाही. कोटयवधी हिंदी जनतेतून ते पुढे आले असे दिसत होते. ते बहुजन समाजाची भाषा बोलत ; त्यांच्याकडे आणि त्यांच्या अपरंपार दारिद्र्याकडे ते बोट दाखवित.'' तुम्ही सारे त्यांच्या रक्तावर जगत आहात, त्यांच्या शोषणावर जगत आहात. त्यांच्यावर तुमचे ओझे घालू नका, उतरा त्यांच्या पाठीवरून खाली. असे ते म्हणाले. '' हे दुःख आणि दारिद्र्य ज्या पद्धतीमुळे पैदा होते ती पद्धत फेका. '' असेही ते म्हणाले.

'' राजकीय स्वातंत्र्याला नवीन रंगरूप आले. त्यात नवीन अर्थ आला. गांधीजींच्या म्हणण्यातील सारेच आम्ही स्वीकारीत असू असे नव्हे, पुष्कळदा बरेच स्वीकारीतही नसू पण मुद्याची गोष्ट ही नव्हती. त्यांच्या शिकवणुकीचे सार निर्भयता, सत्य व प्रत्यक्ष कृती यात साठविलेले होते.''

महात्मा गांधींचा प्रभाव, हे नेहरूंचे आकलन व आचरण यातील विसंगतीचे जसे बाहेरचे कारण आहे. तसेच त्यांची अंतर्गत ; खुद्द नेहरूंच्या व्यक्तिमत्वात अंगभूत असलेली आणखीही कारणे आहेत-

त्यांचा विचार समाज परिवर्तन आणि नेतृत्व विकास यांचा एकत्र विचार करीत असताना करणे आवश्यक ठरते. स्वतः जवाहरलाल नेहरूनीच अनेक वेळा व अनेक ठिकाणी यासंबंधी चर्चा केली आहे. कित्येक वेळा मुक्त चिंतनाच्या रीतीने त्यांनी सर्वांच्याच विचाराना चालना देणारी मनोगते व्यक्त केली आहेत. आपल्या ' भारताचा शोध ' या महत्त्वपूर्ण ग्रंथात '' जीवनाचे तत्त्वज्ञान '' या विषयांची मांडणी करताना त्यानी बरेच काही लिहिले आहे. ते विचार प्रवृत्त करणारे आहे. तसेच त्यामधून या विसंगतीची कारणेही स्पष्ट होणारी आहेत. त्यामधील समाजवादासंबंधीची चर्चा आपण येथे विचारात घेऊ या. ते म्हणतात, '' मार्क्स आणि लेनिन यांच्या अभ्यासाने माझ्या मनावर अपार परिणाम झाला आहे. इतिहासाकडे, आजकालच्या सर्व घडामोडीकडे पाहण्याची एक नवीन दृष्टी लाभायला त्याची मला मदत झालेली आहे. रशियाच्या प्रयोगातील प्रत्यक्ष सिद्धीचा माझ्यावर खूप परिणाम झाला. तेथील काही गोष्टी, काही घटना मला आवडल्या नाहीत. कधी कधी मी त्या समजू शकलो नाही. कधी कधी क्षणिक संधीसाधूपणाशी किंवा तात्कालिक सत्ताम्ग राजकारणाशी त्या निगडित आहेत, असेही वाटे. परंतु हे सारे बाजूला ठेवूनही मानव जात सुधारावी या मूळच्या उत्कट ध्येयाला जरी काहीशी विकृतावस्था आली असली, तरीही रशियन क्रांतीमुळे मानवी समाजाच्या सुधारणेत एक मोठी उडी मारण्यात आली, हे सांगायला मला शंका वाटत नाही.

'' या क्रांतीने अशी एक ज्वाला चेतवली आहे की, जी आता कोणालाही विझवता येणार नाही. ज्या एका नवसंस्कृतीकडे मानवी समाज-जग जाणार आहे त्या संस्कृतीचा पाया या रशियन क्रांतीने घातला आहे यात शंका नाही. मी हुकूमशाहीचा भोक्ता नाही. मी बराचसा व्यक्तिवादी आहे. वैयक्तिक स्वातंत्र्याचा चाहता आहे.तरी मला कबूल केले पाहिजे की, गुंतागुंतीच्या सामाजिक रचनेत व्यक्तिस्वातंत्र्याला मर्यादा घालायलाच हवी आणि खरे व्यक्तिस्वातंत्र्य हे सामाजिक क्षेत्रात स्वतःला मर्यादा घालूनच उपभोगता येणे शक्य आहे. अधिक व्यापक स्वातंत्र्यासाठी लहान वैयक्तिक स्वातंत्र्याला मुरडही घातलीच पाहिजे.''

'' मार्क्सप्रणित तत्त्वज्ञानातला बराचसा भाग मी सहज स्वीकारू शकलो. अर्थात त्यामुळे माझे पूर्ण समाधान झाले, असे नाही. तरीसुद्धा या मर्यादा सांभाळून मार्क्सवादी दृष्टी आजच्या वैज्ञानिक ज्ञानाच्या मर्यादेत योग्य आहे असे वाटे आणि म्हणून जरी मी समाजवादी तत्त्वज्ञानातील मूलभूत गोष्टी अंगिकारल्या तरी त्यांच्यामागे जे अनेक वाद-प्रवाद निर्माण झाले त्यात मी गुरफटलो नाही.''

यावरून गांधीजींच्या व्यक्तिमत्वाचा भावनिक प्रभाव आणि मार्क्सवादाची शास्त्रीय प्रेरणा यांच्या परस्पर संयोगातून व संघर्षातून जवाहरलालजींची विचारसरणी व व्यक्तिमत्व आकार घेत आले हे सहज लक्षात येते.

मार्क्सवादातील गतिशील इहवादी ऐतिहासिक दृष्टीने, भारताच्या विकासक्रमाचे, भारतावरील ब्रिटिश साम्राज्यशाहीचे इतर कोणाही राजकीय नेत्यापेक्षा नेमके व अधिक शास्त्रशुद्ध विश्लेषण जवाहरलालनी केले आहे. त्यामुळे भारताच्या विकासाच्या प्रक्रियेत संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त झाल्याशिवाय गतीच येऊ शकणार नाही. या निष्कर्षाला ते आले. त्याबाबत ते कोणाशीही कसलीच तडजोड करायला तयार नव्हते. हे १९२७ साली राष्ट्रीय काँग्रेसच्या मद्रास अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाच्यावेळी स्पष्ट झाले. राजकीय, आर्थिक व लष्करीदृष्ट्या पूर्ण स्वतंत्र भारत, हाच त्यांचा आग्रह राहिला. डोमिनियम स्टेटसची मागणी त्यानी झिडकारूनच टाकली आणि या संपूर्ण स्वातंत्र्यात आर्थिक, सामाजिक समान संधीची हमी अभिप्रेत आहे हेही ठणकावून सांगितले. त्यांच्या समाजवादाच्या प्रवक्तेपणाची सुरूवातच ही अशी आहे. त्यापायी त्यांनी इतर नेत्यांशी वैचारिक संघर्ष केलाच पण खुद्द

गांधीजी आणि वडिल मोतीलालजी यांचेशी संघर्ष करताना त्यांनी आपल्या व्यक्तिगत भावना आड येऊ दिल्या नाहीत. '' महाप्रचंड निमसरंजामदारी इस्टेट मधील मालमत्तेचा हक्क हा राज्यघटनेचा एक अबाधित पाया असावा, हा मला गुन्हा वाटतो.'' या परखड शब्दात त्यांनी मोतीलालजींची सूचना फेटाळून लावली होती. पिळवणुकीचे साधन ठरणारी खाजगी मालकी म्हणजे समानतेची संधी नाकारणे होय. अशी त्यांची धारणा होती. फ्रेंच राज्यक्रांतीच्या ऐतिहासिक महत्त्वाचा गौरव केल्यानंतर ' खाजगी मालकीचे पावित्र्य ' हा त्या क्रांतीचा पाया होता व तिच्या परिणामी अपयशाचे कारण आहे असे विश्लेषण त्यांनी यापूर्वीच केलेले होते.

भारतीय देशकालमान, परिस्थितीला साजेसा समाजवादाचा तपशील ठरविणे आवश्यक आहे. अशी भूमिका घेऊन ते मार्क्स-लेनिनच्या विचारांचा पुरस्कार करीत होते. १९२७ ते ३६ या कालखंडात नेहरूंनी जे लिहिले आहे, जे बोलले आहे, त्यामध्ये हेच सूत्र प्रामुख्याने आहे. १९२९ च्या लाहोर काँगेसमध्ये अध्यक्षीय भाषण करताना आणि संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाचा पुनरुच्चार करताना, त्यांनी स्वातंत्र्याचा आशय समाजवाद असेल हे स्पष्ट केले आणि त्यासाठी हप्त्या हप्त्याने दान घेण्याचा मार्ग उपयोगी नाही, एक रकमीच व्यवहार होऊ शकतो हेही बजावले. म्हणून क्रांतिकारक मार्गाचे त्यांनी लोकांना आवाहनही केले. त्यावेळी ही समाजवादाची व क्रांतीची भाषा लोकांना समजण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेलीच होती. देशभर त्यावेळी क्रांतीकारी आणि डाव्या शक्तींनी उठाव केलेले होते. त्याच वातावरणात आपल्या अध्यक्षीय भाषणात नेहरूंनी, गांधीजी मांडत असलेल्या ''भांडवलदार विश्वस्त बनावेत '' या भूमिकेला उपहासपूर्ण विरोधही केला.

१९३१ मध्ये कराची काँग्रेसमध्ये मूलभूत हक्कांचा ठराव करतानाही जवाहरलालनी आपल्या भूमिकांना मान्यता मिळवून घेण्याची शिकस्त चालविली होती आणि १९३६ च्या लखनौ अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरुन त्यांनी समाजवादाची निःसंदिग्ध शब्दात घोषणाच केली. नेहरू म्हणजे समाजवाद हे समीकरण सार्वत्रिक स्वरूपात प्रसारित होण्यात, या भाषणाचा वाटा फार मोठा आहे. पंडित जवाहरलालनी खणखणीतपणे जाहीर केले की, '' माझी खात्री पटली आहे की, जगाच्या समस्या आणि भारताच्या समस्या सोडविण्याची एकमेव किल्ली समाजवादात आहे. जेव्हा मी हा शब्द वापरतो तेव्हा तो संदिग्ध मानवतावादी अर्थानं नव्हे, तर शास्त्रशुद्ध आधुनिक अर्थाने. मात्र समाजवाद हा आर्थिक सिद्धांतापेक्षाही आणखी काही आहे. तो जीवनाचे तत्त्वज्ञान आहे आणि तसासुद्धा तो मला आवडतो. भारतीय जनतेच्या दारिद्र्याचा, अफाट बेकारीचा, अधःपतित आणि गुलामी अवस्थेचा अंत करण्याचा समाजवादाशिवाय दुसरा कोणताही मार्ग माझ्या नजरेस पडत नाही. त्यासाठी आपल्या राजकीय व सामाजिक घडणीत अफाट आणि क्रांतिकारक बदल करणे आवश्यक आहे. जमीन व उद्योगधंदे यांची वर्चस्वधारी सत्ता नष्ट करणे आवश्यक आहे. तसेच सरंजामदारी जुलमी, भारतीय ' संस्थांनी व्यवस्था ' नाहिशी करणे आवश्यक आहे.

लखनौ नंतर फैजपूर, फैजपूर नंतर १९३७ चा निवडणूक प्रचार, पुनः दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतरचा वैचारिकदृष्ट्या घुसमटून टाकणारा कालखंड, कोंडी फोडणारा ८ ऑगष्ट १९४२ चा ' चले जाव ' चा अंतीम ठराव; या प्रत्येक टप्प्यावर समाजवादी भारताची उभारणी करण्यासंबंधीचे विचार आपल्या लखनौच्या या अध्यक्षीय भाषणावर आधारूनच व्यक्त केले आहेत. स्वतंत्र भारतात, ' शेतात व कारखान्यात राबणाऱ्या श्रमिकांची सार्वभौम सत्ता असेल ' ही निःसंदिग्ध घोषणा १९४२ च्या, या ऐतिहासिक ठरावात करण्याबाबत ते दक्ष राहिले. १९४७ च्या सत्तांतरापूर्वीच्या कालखंडात जवाहरलाल नेहरूंची भारतातील समाजवादाच्या निर्मितीबाबत व उभारणीबाबत तात्विक आणि

वैचारिक भूमिका ही अशी होती. ती त्या पातळीवरील गुणवत्तेला पूर्णतया उतरलेली होती असे सहज म्हणता येते.

तात्त्विक आणि वैचारिक दृष्ट्या स्पष्ट व शास्त्रशुद्ध अशी ही भूमिका; त्या संबंधीची संपूर्ण व सार्वभौम सत्ता हाती आल्यानंतर प्रत्यक्षात साकार करण्यात मात्र नेहरूंना अपेक्षित यश मिळाले नाही. या अपयशाची किंवा यशाच्या अभावाची कारणेही बाहेरच्या परिस्थितीतील व खुद्द नेहरूंच्यामधील कमजोरीशी जोडलेली आहेत; असे गेल्या चाळीस किंवा स्वातंत्र्य काळातील नेहरूंच्या हयातीच्या सतरा-अठरा वर्षांच्या कालखंडाचे चिकित्सक विश्लेषण केल्यास दिसून येते.

पंडित जवाहरलाल नेहरू हे या सत्तांतराच्या वेळी भारतातील सर्वात लोकप्रिय नेते होते. प्रचंड असे क्रियाशील, क्रांतीकारी बदलाला आसुसलेले लोकसामर्थ्य नेहरूंच्या आदेशाची वाट पाहत सदैव सज्ज राहिलेले होते आणि या सत्तांतरात राष्ट्रीय काँग्रेसचे समर्थ नेतृत्व म्हणून भारताची खरीखुरी सत्ता राबविण्याचे व्यापक अधिकार असणाऱ्या सत्तापदावर, पंतप्रधानपदावर त्यांचीच निवड झालेली होती; हे जरी खरे; तरी या सत्तांतरात भारतातील सत्ता राष्ट्रीय काँग्रेस या पक्षाकडे आलेली होती आणि त्या पक्षाच्या संघटनात्मक रचनेत जवाहरलाल नेहरू आणि त्यांचे अनुयायी हे अल्पमतातच होते. पक्षाची सत्ता व्यक्ती म्हणून विचार केला तर, नेहरूंपेक्षा सरदार वल्लभभाई पटेल यांच्या हाती होती; आणि विचारधारेच्या संदर्भात पाहिले तर समाजवादापेक्षा भांडवलशाही, सरंजामशाही यांच्या हितसंबंधांचे रक्षण करणाऱ्या विचारधारेच्या हाती होती. लोकप्रियतेच्या उत्तुंग शिखरावर असणारी व्यक्ति; आणि लोकबळ पाठीशी असणारी विचारधारा पक्षाच्या संघटनात्मक संरचनेत अल्पमतात म्हणजे सत्ताहीन राहिली ; हे या बाहेरील कारणापैकी एक अत्यंत महत्त्वाचे कारण आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून म्हणजे जवाहरलाल नेहरूंचे काँग्रेस नेतृत्त्वात स्थान निर्माण झाल्यापासून जवाहरलाल नेहरू व्यासपीठावरून काहीही बोलले किंवा त्यांनी ठरावात काहीही लिहिले आणि जनतेचा किंवा पक्षातील सामान्य सभासद व कार्यकर्ते यांचा प्रचंड पाठिंबा जरी मिळविला; तरी पक्षश्रेष्ठींच्या खऱ्याखुऱ्या सत्ताधारी वर्तुळात ते नुसते अल्पसंख्य होते असे नव्हे; तर अनेक प्रसंगी अगदी एकाकी पडले आहेत .तरी ते जनतेचे नेते होते आणि पक्षाचेही नेते होते. या मूळ विसंगतीची खुद्द त्यांनाही सतत जाणीव होती. हे त्यानी स्वतःच जाहीरपणे सांगितले आहे. अगदी लखनौच्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणतात,– ' मला जाणीव आहे की, सध्या काँग्रेसची जशी रचना आहे त्यातील बहुसंख्य लोकांची येथवर जाण्याची कदाचित तयारी नसेल. . . ह्या देशात समाजवाद आणावा अशी माझी स्वतःची जरी कितीही इच्छा असली, तरी काँग्रेसवर हा प्रश्न लादावा आणि त्यायोगे आपल्या स्वातंत्र्य लढयाच्या मार्गात अडचणी निर्माण कराव्यात असे मला मुळीच वाटत नाही. स्वातंत्र्यासाठी जे लोक कार्य करीत आहेत त्या सर्वांशी जरी त्याना समाजवादाचा उपाय मान्य नसला; तरी मी आनंदाने आज माझ्यातील सर्व ताकदीनिशी सहकार्य करीन.

यापूर्वी १९२८ मध्ये भारताच्या नव्या राज्यघटनेसंबंधात जी सर्वपक्षीय परिषद झाली तीमध्ये बोलताना नेहरू म्हणाले होते की, या सर्वपक्षीय परिषदेच्या व्यासपीठावर सामाजिकदृष्ट्या वर्ज्य असणारी अनेक मंडळी आहेत.

१९२९, १९३६ व त्यानंतरही जवाहरलाल ज्यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष वा सरचिटणीस म्हणून नियुक्त झाले, त्यावेळी काँग्रेस पक्षाच्या संघटनेत ते अल्पमतात होते. १९२९ च्या लाहोर काँग्रेसच्यावेळी कार्यकारी मंडळात त्याना अवघी तीन मते मिळाली होती. वल्लभभाईना पाच व गांधीना दहा, तरी देखील अध्यक्षपद नेहरूना देण्यात आले. कारण काँग्रेस पक्षाच्या सर्वसामान्य सभासदात नेहरू आणि



एन ४३९४-७अ

त्यांचे डावे विचार लोकप्रिय होते; तर काँग्रेस पक्षाच्या बाहेर डाव्या व क्रांतीकारी शक्तींनी मोठे उठाव केले होते. कामगार, शेतकरी, विद्यार्थी यांचे हजारोंच्या संख्येचे मोर्चे काँग्रेस अधिवेशनावर येत आणि डाव्या पुरोगामी धोरणाची मागणी करणाऱ्या घोषणा देत. त्या सर्वांना थोपवून धरून त्यांचे पाठबळ काँग्रेसच्या मागे कायम ठेवण्याला जवाहरलाल नेहरूंशिवाय दुसरे नेतृत्व काँग्रेसजवळ नव्हते. अशा परिस्थितीत नेहरूंची भाषणे, त्यांच्या घोषणा लोकांना आपल्या भावना व अपेक्षाना प्रतिसाद देणाऱ्या वाटत; त्याच बरोबर काँग्रेसने त्या स्वीकारल्या आहेत असाही समज होई. काँग्रेसमधील संघटित उजव्या गटाची मंडळी ही परिस्थिती कायम ठेवीत आणि आपल्या ' दबावातून सौदेबाजी ' या डावपेचासाठी तिचा पुरेपूर उपयोग करून घेत. या उलट या लोकबळाच्या जोरावर काँग्रेस पक्षाच्या संरचनेत बदल करून घेण्याचा प्रयत्न जवाहरलाल नेहरूंनी कधी केला नाही. एक दोन वेळा राजीनामे देऊन ते बाजूला गेले. पण हा नाराजी-रूसण्या फुगण्याचा प्रकार समजून, गांधीजींच्यावरील नेहरूंच्या भक्ती भावनेचा उपयोग करून घेऊन गांधीनी नेहरूना परत काँग्रेसमध्ये रमविले व राबविले. कित्येक वेळा, विशेषतः १९३७ च्या निवडणुकीतील विजयानंतर सत्तास्वीकाराच्या प्रश्नावर जेव्हा नेहरू व पटेलादी उजवे नेते यांच्यात तीव्र मतभेद झाले, नेहमीप्रमाणे नेहरू अल्पमतात राहिले. तेव्हा नेहरू चक्क युरोपात दौऱ्यावर गेले आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नात स्वतःला गुंतवून घेऊ लागले. स्वतंत्र भारताचे समाजवादी भारतात रूपांतर करण्याचे आपले विचार ज्या माध्यमातून नेहरू प्रत्यक्षात आणू इच्छित होते त्या माध्यमाची काँग्रेस पक्षाची अवस्था ही अशी होती. नेहरूंच्या अपयशाचे हे एक प्रमुख बाहेरील कारण आहे.

या बाहेरील प्रमुख कारणाप्रमाणेच नेहरूंच्या व्यक्तिमत्वातील अंतर्गत, अंगभूत अशी काही कारणे आहेत ; आणि तीच मुख्यतः या अपयशाला जबाबदार आहेत. तात्विक आणि वैचारिकदृष्ट्या पटलेला व आत्मसात झालेला विचार प्रत्यक्षात आणावयाचा तर त्याचा एक क्रियात्मक भाग असतो व त्याचाही याच अनुषंगाने विचार करावा लागतो. आपल्याकडे या संबंधात साध्य-साधन संबंधावर विशेषतः साधनशुचितेच्या अंगावर बरेच विवरण, प्रबोधन व प्रचारही झालेला आहे. साध्याच्या दृष्टीने साधनांचा विचार फार कमी झालेला आहे. साध्य म्हणून समाजवादी व्यवस्थेचे फार पूर्वीपासून प्रतिपादन करण्यात आलेले आहे. भारतात तर वेदकालापर्यंत त्याचा मागोवा लागतो. ' सर्वेऽपि सुखिनः संतु ' पर्यंत आपण पोहचू शकतो. परंतु ते प्रत्यक्षात कसे आणायचे याची मांडणी नाही; किंवा जी आहे, ती संदिग्ध स्वरूपाची आहे. म्हणून तर मार्क्स-लेनिन यांच्या शास्त्रीय समाजवादाला जगभर एक वेगळे स्थान प्राप्त झाले आहे. मानवी समाजजीवनाच्या विकासक्रमाचे गतिशील ऐतिहासिक विश्लेषण करून या नंतरची विकासाची अवस्था निसर्गक्रमाने समाजवाद हीच असेल एवढे भाकीत करून मार्क्स-लेनिनचा शास्त्रीय समाजवाद थांबलेला नाही. त्यामध्ये ही परिवर्तनाची प्रक्रिया कशी घडते, कशी घडवावी लागते, कोण ती घडवू शकतात व कोण विरोधात उभे ठाकतात या सर्व प्रश्नांचा ऊहापोह केलेला आहे. तो जवाहरलाल नेहरूनी अभ्यासला आहे; मान्य केला आहे. पण तो आत्मसात केला आहे असे म्हणता येत नाही. समाजवाद प्रत्यक्षात आणण्याची पद्धती, मार्ग, शक्ति, साधने या संबंधी मार्क्स-लेनिन यानी जेवढी चिकित्सा केली आहे; व प्रत्यक्ष कृती केली आहे तेवढी समाजवादाची अपेक्षा बाळगणाऱ्या दुसऱ्या कोणाही तत्त्ववेत्त्यांनी वा क्रांतिकारकांनी केलेली नाही.

आपल्यावर मार्क्स-लेनिन यांच्या विचाराचा अपार परिणाम झाला आहे, असे सांगत असताना नेहरू या संबंधात नेमके व स्पष्ट असे काही बोलत नाहीत. मार्क्सवादातील या संघटनात्मक व क्रियात्मक भागासंबंधी काहीशी साशंकता ते व्यक्त करतात. किंवा तो अवश्यमेव भाग आहे असे ते मानीत नाहीत, हे त्यांच्या अनेक विधानावरून स्पष्ट होते. प्रत्यक्ष कृतीवरून तर सिद्धच होते.

वर्ग लढा हा वर्गीय समाजात चालूच असतो. तो कोणी मुद्दाम निर्माण करावा लागत नाही. हेही त्यानी अनेक वेळा स्पष्ट केले आहे. पण त्यासाठी वर्ग संघटना हव्यात व त्यांच्या संघटित क्रांतिकारी लढ्यातूनच हे गुणात्मक परिवर्तन होऊ शकते; हा मार्क्स-लेनिन वादातील आग्रह त्यांना मान्य नव्हता; असेही त्यांच्या विवेचनावरून दिसून येते. लोकबळावरील सामूहिक लढ्याशिवाय हे क्रांतिकारी परिवर्तन शक्य नसते हेही त्यांना अभिप्रेत होते. मात्र हा सामूहिक लढा हा लोकशाही पद्धतीचा व स्थूलमानाने अहिंसक असला पाहिजे. सशस्त्रच पाहिजे असा आग्रह धरण्याचे कारण नाही, अशी नेहरूंची धारणा होती.

लोकबळावरील सामूहिक लढ्याची आवश्यकता प्रतिपादन करून ते जेव्हा लोकशाही व अहिंसा यांचा आग्रही पुरस्कार करीत तेव्हा प्रथम या संबंधाच्या आकलनाच्या पातळीवर त्यांची कमजोरी लक्षात येते; व्यूहरचना व डावपेच या संबंधात वास्तवाचे अचूक विश्लेषण आणि क्रांतीकारी शक्तीची क्षमता यांचे अचूक निदान करता येणे आवश्यक असते. या दोन महत्त्वाच्या घटकांच्या संदर्भात यामध्ये बदल करावे लागतात. तेथे लवचिकता दाखवावी लागते. कसल्याही ठोकळेबाजीला जागा नसते; हे सूत्र पूर्णांशाने नेहरूना आत्मसात तरी झाले नव्हते; किंवा मान्य तरी नव्हते असे म्हणावे लागते. त्यामुळेच भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या प्रदीर्घ कालखंडात, निरनिराळ्या अवस्थात समाजवादाचा आशय असलेले संपूर्ण स्वातंत्र्य संपादन करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असताही तशी व्यूहरचना व डावपेच याची मांडणी त्यांनी केली नाही. मार्क्स-लेनिन यांच्या संबंधीच्या सूचनांची नक्कल त्यानी करायला हवी होती असेही कोणी अपेक्षित नाही. परंतु त्यांची दखल घेऊन भारताच्या ब्रिटिश साम्राज्यशाही विरोधी लढ्यात अगदी तिसऱ्या चौथ्या दशकातील परिस्थितीला साजेशी स्वतंत्र मांडणी देखील त्यांनी केली नाही. त्या ऐवजी त्यांना हा समाजवादाचा आशय असलेल्या संपूर्ण स्वातंत्र्याचा ध्येयवादही मान्य नव्हता; भारतातील सरंजामदारी व भांडवलदारी हितसंबंधाना धक्का न लागता जेवढे राजकीय परिवर्तन शक्य असेल, तेवढेच ज्याना अभिप्रेत होते त्यानी आखलेल्या व्यूहरचनेत व डवपेचात नेहरू स्वतःला गुंतवून घेत राहिले आणि त्याचे व्हायचे तेच परिणाम झाले.

' अहिंसा ' आणि ' लोकशाही ' या डावपेचाच्या क्षेत्रातील महत्त्वाच्या मुद्द्याबाबत नेहरूंचे विचार बऱ्याच अंशी अनिश्चित व डळमळीत स्वरूपाचे होते. गांधीजींचा त्यांच्यावर जबरदस्त प्रभाव होताच; तरी देखील त्यांनी अहिंसेचा स्वीकार तत्त्व म्हणून केलेला नव्हता. व्यवहार म्हणूनच केलेला होता. हे नेहरूंच्या लिखाणावरून स्पष्ट होते आणि साम्राज्यवादी व प्रस्थापिताविरूद्ध निर्णयात्मक क्रांती करायची असेल तर निःशस्त्र लोक समूहाच्या आंदोलनात अहिंसेचा मार्ग चोखाळावा ; हे व्यावहारिक दृष्ट्या योग्यच आहे. परंतु शत्रूच्या सशस्त्र हल्ल्याविरूद्ध मुकाबला करण्यासाठी लोक पातळीवरील सशस्त्र लोकसेनेचे राखीव बळ उभे करणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे शत्रूची सशस्त्र हल्ल्याची शक्ति मुळात बोथट करण्यासाठी किंवा वापरात येऊ नये अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी सैन्यदलातच स्वातंत्र्यवादी व समाजवादी ' सेनागट ' तयार करण्याचा प्रयत्न करणे हा या डावपेचाचा महत्त्वाचा भाग असतो. कदाचित तो व्यवहारिक अहिंसा तंत्रात बसणाराही ठरू शकेल. तशा तऱ्हेचे प्रयत्न केल्याचे किंवा तसा विचारही केल्याचे नेहरूंबाबत कोठे आढळत नाही.

भारतात ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या भारतीय सैन्यात अगदी १८५७ पूर्वीपासून सैनिकी उठाव झाले आहेत. त्यांची त्यानी दखल घेऊन त्यावर लोकशिक्षण करण्याचा प्रयत्न केल्याचेही दिसत नाही. नेहरूंच्या नेतृत्वाच्या उत्तुंग काळात १९४६ मध्ये भारतात नाविकदल, विमानदल यामध्ये प्रत्यक्ष सैनिकांचे उठाव झाले. भूदल सैनिकांनी ब्रिटिश आदेश धुडकावून लावले, या वास्तवाची दखल घेऊन

नेहरूनी आपल्या लढ्याचे व्यवहार ठरविले नाहीत. ही उणीव नेहरूंच्या पदरी निराशा टाकणारी तर ठरलीच; परंतु संपूर्ण स्वातंत्र्य लढ्याला कमीपणा आणणारी ठरली आहे.

लोकशाही संबंधी नेहरू खूप मनापासून व प्रांजलपणे आग्रही प्रतिपादन करीत असत. त्यावेळी प्रत्यक्ष लोकांच्या सहभागाची व सार्वभौमत्वाची लोकशाही त्याना अभिप्रेत असे, हे अगदी स्पष्ट आहे.समाजवादाशिवाय खरीखुरी लोकशाही प्रत्यक्षात येऊ शकत नाही. वर्गीय विषम समाजात धनिकशाहीच असते; लोकशाही नसते असे ते अगदी परखडपणे मांडत असत. तरी ते स्वतः लोकशाहीवादी होते आणि पक्षांतर्गत लोकशाहीच्या संदर्भात पाहिले तर ' अतिरेकी लोकशाहीवादी ' होते असे म्हणावे लागेल. लोकशाहीत; विशेषतः एका विचाराने एकत्र आलेल्या पक्षातील लोकशाहीत अल्पमताने बहुमताला मान्यता दिली पाहिजे, न्याय दिला पाहिजे आणि आपल्या गुणवत्तेवर बहुमत बनवण्याची कोशीस केली पाहिजे. ही संपूर्ण लोकशाहीची आचार संहिता आहे. ती तर नेहरूना मान्य होतीच. पण ते तेवढ्यावर थांबत नव्हते. जे मत आपल्याला मनोमन पटलेले नाही पण जे बहुमत आहे; त्याला मान्यता द्यावयाची आणि त्याला न्याय देण्यासाठी त्या मताचा जे शंभर टक्के पुरस्कार करतात; त्याना कार्यवाहीचे सर्वाधिकार द्यावयाचे; हाही या आचार संहितेचा एक भाग आहे. त्याकडे नेहरूनी लक्ष दिलेले नाही. आपल्याला मान्य नसणाऱ्या बहुमताच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारीही ते स्वतःच्या खांद्यावर घेत आले आहेत. काँग्रेस पक्षांतर्गत लोकशाहीचे असे भेसळ प्रयोग नेहमीच चालत. नेहरू लोकशाहीचे जाणकार असूनही त्यापासून बाजूला राहू शकले नाहीत. परिणामी स्वातंत्र्याला समाजवादाचा आशय देणाऱ्या खऱ्याखुऱ्या शक्ति ज्या श्रमजीवी समाजातून पुढे येतात; त्या समाजाला नेहरू हे प्रस्थापितांचे क्वचित प्रतिगाम्यांचे भारवाहक आहेत असे वाटू लागले; जाणवू लागले आणि खुद्द नेहरूही आपल्या अल्पमताला पक्षांतर्गत बहुमतात रूपांतरित करण्याची संधी वापरू शकले नाहीत.

स्वातंत्र्याला समाजवादाचा आशय देण्याच्या टप्प्यावर आणि स्वातंत्र्याचे समाजवादात स्थित्यंतर घडवून आणण्याच्या टप्प्यावरही नेहरूंचे नाव झाले, पण काम झाले नाही असेच म्हणावे लागेल आणि ज्याना खरोखरी ध्येयसिद्धीचे काम व्हावे असे वाटते त्याना नेहरूंच्या या चरित्रापासून शिकण्यासारखे खूप आहे. म्हणूनच तात्त्विक व वैचारिक पातळीवर नेहरूनी समाजवादाचे यशस्वी आकलन केले. परंतु ' व्यूहरचना ' व डावपेचांच्या पातळीवर ते आपले आचरण त्यादृष्टीने यशस्वी करू शकले नाहीत असेच म्हणावे लागते.

पंडित जवाहरलाल नेहरू आणि समाजवाद या संबंधीचे हे विवेचन करताना काही बाबत टीकात्मक परीक्षण करणे भाग पडले आहे. पण ते अटळच आहे आणि त्यात गैरही काही नाही. खुद्द नेहरूनीच अनेकांचे असे टीकात्मक परीक्षण केले आहे आणि आपल्या आत्मचरित्राच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, " टीका केली म्हणून त्यांच्यापैकी अनेकांविषयीचा माझा आदर कमी झाला असे नाही, पण मला वाटते की, सार्वजनिक बाबतीमध्ये ढवळाढवळ करणाऱ्यानी एकमेकांशी व ज्या लोकांची सेवा करण्याचा ते दावा करतात त्यांच्याशी प्रांजल असले पाहिजे. खोटा आदबशीरपणा आणि अवघड व काही वेळा दुःखदायी प्रश्न टाळणे, यामुळे एकमेकांचे सामंजस्य निर्माण होण्यास अथवा आपल्या समोरील समस्यांचे आकलन करून घेण्यास मदत होत नाही. मतभेदाना व समान मुद्याना स्वीकारण्यावर व कितीही गैरसोयीच्या असल्या तरी वास्तव गोष्टीना सामोरे जाण्यावरच खरे सहकार्य आधारले पाहिजे . . . "

सार्वजनिक जीवनातील टीकेविषयीचा नेहरूंचा हा दृष्टीकोन लोकशाहीच्या दृष्टीने मदतकारक असाच आहे. त्यादृष्टीने खुद्द जवाहरलाल नेहरूंच्यावर एका तितक्याच अधिकारी व्यक्तीने केलेली टीका अभ्यासण्याजोगी आहे. हा टीकाकार नेहरूंविषयी लिहितो, " नेहरू फारच लोकप्रिय आहेत. त्याना त्यांची पूजा केलेली आवडते, ते दृढनिश्चयी आहेत, उत्साही आहेत तेवढेच गर्विष्ठही आहेत. कोणतेही काम लवकर झाले पाहिजे म्हणून ते तत्पर असतात, ते उतावीळही आहेत. म्हणून लोकशाहीचा धीमा मार्ग त्याना परवडेल की नाही हे सांगता येत नाही. या सगळ्यावरून त्यांच्यातून एखादा भारतीय सीझर–हुकुमशहा निर्माण होण्याचा संभव आहे. परिस्थितीत जरा बदल झाला तर हा माणूस हुकुमशहा व्हायला वेळ नाही लागायचा. मात्र त्यावेळीही तोंडात लोकसत्तेची व समाजवादाची भाषा असेल." वगैरे वगैरे.

१९३८ साली ' मॉडर्न रिव्ह्यू ' या इंग्रजी मासिकात हा लेख प्रसिद्ध झाला. सर्वत्र खळबळ माजली. लेखक कोण ? टीकाकार कोण, याची शोधाशोध झाली. शेवटी समजले; या लेखाचे लेखक होते खुद्द जवाहरलाल नेहरूच. लोकशाही, टीका, आत्मटीका या अशा मूल्यांची नेहरूंना किती कदर होती हे यावरून लक्षात येते. मात्र त्यांचा परिवर्तनाच्या लढ्यात वापर कसा करायचा याचं तंत्र त्यांना अवगत नव्हतं किंवा साधलं नाही असचं म्हणावं लागतं.

समाजवादी समाजरचना करण्याकरिता भारतासारख्या साम्राज्यशाहीच्या गुलामीत दीडशे वर्षांहून अधिक काळ लुटल्या गेलेल्या, शिवाय सरंजामदारी व भांडवलदारी पिळवणुकीची आर्थिक व सामाजिक पकड कायम असलेल्या देशात लोकबळावर मिळविलेल्या स्वातंत्र्य काळात कोणत्या प्रकारची व्यूहरचना व कोणकोणते डावपेच आखायला हवेत; याची क्रांतीकारी योजना आखणे, १९४७ च्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या क्षणी पंडित जवाहरलाल नेहरूंसारख्या नेत्याला सहज शक्य होते. कारण १९४२ च्या देशभरच्या ' चले जाव ' आंदोलनाने शेतकरी, कामगार, मध्यमवर्गीय या श्रमजीवी वर्गाची प्रचंड लोकशक्ती उभी राहिली होती. नाविक दलाच्या व इतर सैन्यदलाच्या उठावानी, आझाद सेनेच्या आगमनाने ब्रिटिश साम्राज्यवाद्यांची लष्करावरील अखेरची भिस्त खचली होती. आंतरराष्ट्रीय संबंधात युरोपीय साम्राज्यवादी युद्धाने जवळजवळ उध्वस्त झाले होते. समाजवादी सोवियत युनियन विजयातून उत्थापन करण्याच्या पवित्र्यात सज्ज झाले होते आणि देशातील उजव्या शक्ति डाव्यांच्या आक्रमक उठावाच्या भीतीने घाबरून गेलेल्या होत्या. त्या ब्रिटिश साम्राज्यवादी, हिंदू व मुस्लीम सरंजामदार व भांडवलदार यांच्याशी तडजोड करायला तयार होत्या. त्यातूनच फाळणी मान्य झाली होती. या सर्व पार्श्वभूमीवर नेहरूनी आजवर घोषित केलेल्या व नियोजित केलेल्या समाजवादी भारताच्या रचनेला, त्याना अभिप्रेत असलेल्या भारतीय परिस्थितीला साजेशा रीतीने आरंभ करण्याचे निर्धाराने घोषित केले असते; तर प्रचंड लोकबळ त्यांच्या पाठीशी उभे राहिले असते. प्रस्थापितांशी देशातल्या व काँग्रेसमधल्या उजव्या शक्तीशी त्यांना मुकाबला करावा लागला असता. लहान मोठी यादवी युद्धेही कदाचित लढावी लागली असती. पण या सगळ्यातून यशस्वीपणे बाहेर पडून समाजवादाच्या रचनेची सुरुवात अगदी थोड्या अवधीत करणे त्यावेळी वस्तुतः शक्य होते. त्यासाठी सारी सामुग्री सिद्ध होती. हवे होते फक्त नेतृत्व आणि त्यावेळच्या संदर्भात फक्त जवाहरलाल नेहरूच ते देऊ शकत होते, ते त्यानी दिले नाही. त्यामुळेच नेहरू म्हणजे समाजवाद हे समीकरण भारतात प्रत्यक्षात अवतरले नाही.

□ □ □

# पं. जवाहरलाल नेहरू आणि संसद

□ पन्नालाल सुराणा

पं. जवाहरलाल नेहरू हे आधुनिक भारताचे प्रमुख शिल्पकार गणले जातात.

आधुनिक भारत या शब्दप्रयोगाने सूचित होणारा अर्थ स्पष्टपणे समजून घेतला पाहिजे. चारपाच हजार वर्षांची सलग परंपरा असलेल्या भारतीय समाजाने अनेक अंगानी स्वतःचे जीवन घडवले आहे. शेती, हस्तोद्योग, व्यापार आदी आर्थिक व्यवहार समाजाचे जीवनयापन करू शकतील या प्रमाणात चालत राहिले. कधी कधी व कुठे कुठे संपन्नता होती, तर अनेक ठिकाणी विपन्नता. उत्पादनाची परंपरागत साधने दोनतीन हजार वर्षे तरी तशीच चालत आली. त्यामुळे शेती व वस्तू उत्पादनाची कार्यक्षमता मर्यादित राहिली. मूठभर सत्ताधाऱ्यांच्या आश्रयाने व्यापार व सावकारी करणारी काही घराणी धनाढ्य होती. सर्वसाधारण माणूस मात्र गरिबीच्या अवस्थेतच जीवन कंठत होता. राज्यकारभार राजेशाही धर्तीवर चालत असे. जन्माधारित जातीभेदाच्या आधारावर समाजरचना उभी राहिली. पारमार्थिक सुखाची लालसा व महाजन सांगतात ते ऐकणे श्रेयस्कर–या मानसिक ठेवणीतून इथल्या स्त्रीपुरुषांनी चाकोरीबद्ध जीवन जगणे मान्य केले होते. काही विद्या व कला, अभिजनांनी विकसीत केल्या; तर काही लोकांच्या पातळीवरही विविध कला बहरत राहिल्या. समाजाचे सातत्य टिकविण्याची क्षमता या व्यवस्थेत होती ; पण सर्वसामान्य माणसांच्या वाट्याला येणारे जीवन भौतिक व सांस्कृतिक दृष्ट्या फारसे सुखावह वा भूषणावह नव्हते.

१७ व्या व १८ व्या शतकात युरोपातील काही देशात राजकीय व आर्थिक बदल झपाट्याने झाले. विषमता व शोषण यावर आधारलेल्या चाकोरीबद्ध जीवनापासून मुक्त होऊन सुखी, स्वाभिमानी व सुसंस्कृत जीवन जगण्याचा प्रत्येक स्त्रीपुरुषाला अधिकार आहे, हा विचार बळावू लागला. व्यक्तिस्वातंत्र्याच्या या मुख्य कल्पनेचा परिपोष होऊ लागला, तसतसे राज्यकारभार जनतेच्या संमतीने चालावा ही लोकशाही दृष्टी रुजत गेली. लोकशाही पद्धतीचा कमी अधिक प्रमाणात विकास होऊ लागला. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन कैक पटींनी वाढले. इतिहासकाळात जी भौतिक सुखे केवळ मूठभर उच्चपदस्थांना मिळत होती, ती आता सर्वसामान्य माणसाला सुद्धा उपलब्ध होऊ शकतील अशी परिस्थिती निर्माण झाली. पण अर्थव्यवहार आणि राज्यकारभारावर मूठभरांचा वरचष्मा राहिल्याने न्यायवाटप होऊ नये अशी दक्षता उच्चपदस्थ मंडळी घेत असत. हा अन्याय आहे असे संवेदनशील विचारवंतांना वाटले. जीवनाश्यक वस्तूंचे उत्पादन पुरेशा प्रमाणात होत असेल तर त्याचे न्याय्य वाटप व्हालेच पाहिजे असे विचार ते मांडू लागले. त्यालाच समाजवादी विचारसरणी असे नाव मिळाले.

मानवी व्यक्तीला स्वतंत्र, सुखी व स्वाभिमानी जीवन जगण्याचा अधिकार आहे ही कल्पना समाजाने तत्वतः तरी मान्य करणे, जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन वाढविणे, प्रजासत्ताक व प्रातिनिधिक लोकशाही पद्धतीने राज्यकारभार चालणे, विज्ञान, विद्या, कला आदी सांस्कृतिक क्षेत्रे बहरू लागली म्हणजे आधुनिकता होय.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला बहुतेक भारत देश ब्रिटिशांच्या अमलाखाली आला होता. आपला व्यापार वाढविणे व जास्तीत जास्त नफा कमविणे या प्रेरणेने सात समुद्र पालथे घालून इथे आलेल्या ब्रिटिशांनी त्यांच्या हेतूपूर्ततेसाठी दळणवळणांची आधुनिक साधने येथे उभारली. व्यापार व उद्योग आधुनिक स्वरुपात म्हणजे अधिक कार्यक्षमतेने चालवू लागले. कायद्याच्या सहाय्याने चालणारी राज्ययंत्रणा उभी केली. धर्मनिरपेक्ष, आधुनिक शिक्षणपद्धती चालू केली.

या आधुनिकतेने जीवन अधिक सुखकर होऊ लागले, हे भारतीय नेत्यांना जाणवू लागले. त्यांच्याशी विसंवादी वा विरोधी असणाऱ्या आपल्या परंपरेतील गोष्टींचा त्याग केला पाहिजे असा विचार ते मांडू लागले. धार्मिक व सामाजिक सुधारणांचे प्रयत्न जाणीवपूर्वक होऊ लागले. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने चालणारे अर्थ व्यवहार आपणही करावेत, आपली उपक्रमशीलता त्या दिशेने वळवावी, अशी धडपड काही उद्योजक करू लागले. तर काही राजकीय पुढारी " स्वदेशी " ची चळवळ चालवून त्यांच्या पाठीशी जनशक्तीचा आधार उभा करू लागले.

ब्रिटिश राज्यकर्ते परकीय आहेत हे अनेकांना खटकत होते. काही जणांना त्यांचे परकेपणच अधिक खटकत होते. भारत देशातून त्यांना घालवून द्यावे अशी उर्मी किंवा स्वातंत्र्याकांक्षा अनेकांच्या अंतर्यामी उसळत होती. त्यापैकी काही जणाना वाटायचे की, आपला धर्म व संस्कृती बाटवणाऱ्या या पांढऱ्या पायाच्या लोकांना हाकलून देऊन आपण इथे परत जुन्या " वैभवशाली " व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करावे. तर काही जणांना वाटायचे की, ब्रिटिश राज्यकर्ते आपली आर्थिक लूट करीत असल्याने त्यांना घालवून देणे आवश्यक असले तरी त्यांनी उभ्या केलेल्या संस्था व घालून दिलेल्या पद्धती नष्ट करण्याचे कारण नाही. आपले प्रश्न, गरजा व परिस्थिती लक्षात घेऊन या आधुनिक संस्थांना योग्य ते वळण आपण द्यावे व त्या चांगल्या प्रकारे चालवून सर्वसामान्य भारतीय स्त्रीपुरुषांचे जीवन सुखी होईल या दिशेने प्रयत्न करावा. किंबहुना त्यांना तसा प्रयत्न करण्याला मदत करावी.

अशा प्रकारे आधुनिक राष्ट्रवादी विचारांची कास धरून भारताच्या प्रगतीला हातभार लावणारांपैकी जवाहरलालजी हे एक वैशिष्ट्यपूर्ण नेते होत. त्यांच्या कुटुंबात खानदानी परंपरा काही अंशाने रेंगाळली असली तरी वडील मोतीलालजी हे प्रथितयश वकील होते. आधुनिक ज्ञान व राज्यकारभाराची रीत त्यांना लहानपणापासून माहित झाली होती. त्यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण इंग्लंडमध्ये झाले. स्वातंत्र्य व समता या श्रेष्ठ मानवी मूल्यांचा त्यांच्या मनावर खोल ठसा उमटला. लोकशाही राजकारण व संसदेचे कामकाज याचाही त्यांना जवळून परिचय झाला.

पुढे मायदेशी परतल्यावर वकिलीचा व्यवसाय करण्याऐवजी जवाहरलालजींनी स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतली. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारत मुक्तीच्या कार्याबरोबरच राष्ट्रघडणीच्या कार्यातही ते हिरीरीने भाग घेऊ लागले. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या राज्यपद्धतीत भारतीय जनतेच्या प्रतिनिधींना अधिक वाव मिळावा असा कॉंग्रेसचा दृष्टीकोन होता. ब्रिटिशांची सत्ता रहायला हरकत नाही, पण इथल्या नागरिकाना अधिक हक्क मिळावे अशा प्रकारच्या मागण्या केल्या जात. १९२९ साली लाहोर येथे भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदी जवाहरलालजींची निवड झाली होती. त्याच अधिवेशनात

'' ब्रिटिशांनी भारत सोडून जावे. आम्हाला संपूर्ण स्वातंत्र्य हवे आहे ''असा ठराव पास करण्यात आला. तो केवळ औपचारिक ठराव नव्हता. भारताला संपूर्ण स्वातंत्र्य मिळविणे हे आपले जीवित कर्तव्य आहे असे मानणारांपैकी जवाहरलालजी प्रमुख होत. स्वातंत्र्यप्राप्तीचा त्यांनी इतका ध्यास घेतला होता की, त्यांच्या सर्व भाषणांतून व लिखाणातून तो अतिशय प्रभावीपणे मांडला जात असे. मात्र ब्रिटिशांना घालवून दिल्यानंतर संसदीय लोकशाही पद्धतीने व कष्टकऱ्यांच्या भल्यासाठी राज्य चालवायचे आहे असा त्यांचा दृष्टीकोन होता. तो पुरेशा स्पष्टपणे ते मांडत असत.

ब्रिटिशांनी भारताच्या राज्यपद्धतीत जनतेला प्रतिनिधित्व देण्याचे तत्व एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपासून स्वीकारले होते. केंद्रीय लेजिस्लेटिव्ह कौन्सिल स्थापन करण्यात आले होते. सुरुवातीला त्यावर सगळे सरकारी अधिकारी असत. पुढे काही भारतीय नागरिकांची नेमणूक होऊ लागली. १९०९ च्या सुमारास बिगर सरकारी प्रतिनिधींची सरकारने नेमणूक करण्याऐवजी लोकांनी त्यांना निवडून द्यावे हे तत्त्व स्वीकारले गेले. पण मतदानाचा अधिकार मोठे शेतकरी, व्यापारी वगैरेपुरता मर्यादित होता. मतदानाचा हक्क सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मिळावा असे मत जवाहरलालजींनी १९३१ साली व्यक्त केले होते.

' पायोनियर ' या इंग्रजी दैनिकाला दिनांक २ सप्टेंबर १९३३ रोजी दिलेल्या मुलाखतीत पंडित नेहरू म्हणाले होते, '' भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी चाललेल्या आमच्या धडपडीचा एक उद्देश असा आहे की, राज्य कारभाराचा खर्च व पर्यायाने शेतकऱ्याच्या डोक्यावरील बोजा कमी व्हावा ''.

भारतीय जनतेला अधिक राजकीय हक्क देणारा व प्रांतामध्ये तरी लोकप्रतिनिधींच्या हाती काही सत्ता सोपविणारा भारत सरकार कायदा १९३५ साली ब्रिटीश पार्लमेंटने मंजूर केला होता. मतदानाचा अधिकार विशिष्ट धनिक वर्गापुरताच मर्यादित होता, आणि गव्हर्नरांना अंतिम अधिकार दिले होते. या कारणास्तव त्या कायद्याला काँग्रेसने विरोध केला होता. त्या संदर्भात इंडिया बुलेटिनमध्ये (एप्रिल १९३६) लिहिताना नेहरूंनी म्हटले होते, '' एकच मार्ग उपलब्ध आहे. प्रौढ मताधिकाऱ्याच्या आधारे घटना परिषदेची निवडणूक घेणे, जी स्वतंत्र भारताची घटना बनवील. . . जर जनसामान्यांना खरे-खुरे प्रतिनिधीत्व मिळाले तर त्याना भेडसावणारे आर्थिक प्रश्न पुढे येतील आणि जातीयवादासारखे निरर्थक प्रश्न बाजूला पडतील. नव्या दमदार शक्ती मुक्त होतील. तळागाळातील जनसमूहांकडून त्यांना ताकद मिळू लागेल आणि भारताचे आर्थिक प्रश्न सोडवायच्या दृष्टीने त्या क्रियाशील बनतील ''.

त्याच वर्षअखेरीस एके ठिकाणी बोलताना नेहरूनी म्हटले की, '' काँग्रेसने स्त्री उमेदवारांची संख्या वाढविली पाहिजे.''

१९३५ चा भारत सरकार कायदा काँग्रेसला पसंत नव्हता. सरकारने मात्र प्रांतिक असेंब्लीच्या निवडणुका घेण्याची तयारी सुरू केली होती. त्यावर बहिष्कार टाकावा असे काही जणांचे मत होते. तर निवडणुका लढवाव्यात, प्रांतिक असेंब्लीस जावे व त्या कायद्याच्या तरतुदी कशा असमाधानकारक आहेत हे तिथून पटवून द्यावे, असा बहुसंख्य काँग्रसवाल्यांचा विचार होता. १२ एप्रिल १९३६ रोजी केलेल्या आपल्या अध्यक्षीय भाषणात जवाहरलालजी म्हणाले, '' भारतीय नागरिकांना मूलभूत नागरी राजकीय हक्क नाकारले जात आहेत. मतस्वातंत्र्य व अभिव्यक्तींचे स्वातंत्र्य वापरता येत नसेल तर निवडणुका कशा ठरविणार? . . . . . खुल्या मार्गांनी राजकारण करण्यात अडचणी खूप आहेत, हे खरे. पण तेवढ्यावरून दहशतवादी मार्गांचा अवलंब करणे योग्य ठरत नाही. तसे करणे म्हणजे दुबळ्या मनोवृत्तीचे प्रदर्शन करणे होय. . . . . स्वतंत्र भारताची राज्यघटना बनवायच्या दृष्टीने जनमत

तयार केले पाहिजे. सत्तेच्या संदर्भातील विविध वर्गांच्या शक्तींचा संबंध न्यायाच्या दृष्टीने प्रस्थापित करणे म्हणजे खरी घटना बनविणे होय. . . . आगामी प्रांतिक असेंब्लीच्या निवडणुका आपण लढविल्या पाहिजेत. आपली विविध धोरणे व आर्थिक कार्यक्रम जनतेसमोर तपशीलाने मांडून त्या आधारे मते मागितली पाहिजेत. असेंब्लीद्वारा खरी सत्ता मिळणार नाही. म्हणून बहुमत मिळाले तरी आपण मंत्रीमंडळे बनवू नये. खरी सत्ता नसताना सत्तापदाची जबाबदारी उचलणे धोक्याचे ठरेल.''

लोकशाही पद्धतीने कारभार चालवावयाचा तर कायदेमंडळात गेले पाहिजे हे पं. नेहरूंना मान्य होते. पण १९३५ च्या कायद्यातील तरतुदी पाहिल्या तर मताधिकार उच्चवर्गियांपुरताच मर्यादित आहे आणि लोकनियुक्त मंत्रिमंडळाना पुरेसे अधिकार असणार नाहीत अशी मते जवाहरलालजींनी वारंवार मांडली होती. आपले तीन प्रमुख कार्यकर्ते असेंब्लीत गेले की, स्वातंत्र्य चळवळीचे इतर कार्यक्रम थंडावतील. लढे देण्याची संघटनेची क्षमता कमी होईल, असे त्यांना वाटत होते. पण बहुसंख्य कार्यकर्त्यांचा विचार वेगळा होता. अखेरीस काँग्रेसने निवडणुका लढविल्या आणि सहा प्रांतात बहुमत मिळाले तेव्हा मंत्रिमंडळेही बनविली. त्याबाबतचे नेहरूंचे मत निवडून आलेल्यांनी नजरेआड किंवा कानानिराळे केले.

एक मात्र खरे की, स्वतः नेहरू व इतर अनेक प्रमुख नेते प्रांतिक असेंब्लीच्या निवडणुकात उभे राहिले नाहीत. प्रचारासाठी दौरे खूप काढले. पुढे काँग्रेसी मंत्रिमंडळाचा कारभार सुरू झाल्यावर त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी काँग्रेस वर्कींग कमिटीने वारंवार विचारविनिमय केला, ठराव केले, आदेश दिले. पक्ष संघटनेने धोरणे ठरवून द्यावीत व असेंब्ली पक्षाने ती राबवावीत असे नेहरू त्या काळात नेहमी म्हणत असत.

सोवियत रशियात क्रांती होऊन कामगार वर्गाच्या हातात सत्ता आली, याचे नेहरूंना अप्रुप वाटत होते. तेथील राज्यकारभार हुकूमशाही पद्धतीने चालला आहे, अशी टीका काही पाश्चिमात्य मंडळी करीत असत. त्या संदर्भात एके ठिकाणी लिहिताना पं.नेहरूंनी म्हटले आहे, '' तेथील सहा लाख खेडी व शहरांना स्वतःचे सोवियत निवडण्याचा अधिकार आहे. ही एक प्रचंड लोकशाही स्वरूपाची यंत्रणा आहे. विविध प्रश्नांवर त्या सोवियतमध्ये चर्चा होत असते, टीका-प्रतिटीका चालते, धोरणे ठरविली जातात, वरिष्ठ समित्यांसाठी प्रतिनिधी निवडले जातात. . . तेथे मतदानाचा अधिकार १८ वर्षांवरील प्रत्येक स्त्री व पुरुषाला आहे. ही लोकशाहीच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. . . तेथे लोकांना उत्पादक व उपभोक्ते म्हणून संघटित होता येते आणि आपले प्रश्न मांडता येतात, हेही लक्षणीय आहे. सार्वजनिक प्रश्नांच्या चर्चेत शेकडो स्त्री-पुरुष सहभागी होत असतात. राज्यकारभार चालविण्यात सहभागी होतात. . . सोवियत रशियाच्या उदाहरणावरून आपण काही धडे घेतले पाहिजेत. काँग्रेस संघटनेच्या खालच्या पायऱ्यांपासून वरपर्यंत गरिबांना प्रतिनिधीत्व देऊन खऱ्या लोकशाहीचा विकास केला पाहिजे ''

१९३५ च्या भारत सरकार कायद्यानुसार केंद्रात जी व्यवस्था करावयाची होती त्याबाबत भारतीय संस्थानिक लवकर राजी झाले नाहीत. म्हणून केंद्रीय असेंब्लीच्या निवडणुका लांबत गेल्या. पुढे १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. ब्रिटनच्या बाजूने भारत त्या युद्धात उतरला आहे अशी घोषणा, व्हाईसरॉयने भारतीयांशी सल्लामसलत न करता परस्पर केली. त्याच्या निषेधार्थ काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामे द्यावेत असे काँग्रेस वर्कींग कमेटीने ठरविले व त्याप्रमाणे सहाही मंत्रिमंडळाने राजीनामे दिले हे विशेष उल्लेखनीय होय. काँग्रेसने ब्रिटिश सरकारशी संघर्ष करण्याचा पवित्रा घेतला. पुढे १९४२

सालचे " चलेजाव " आंदोलन झाले. काँग्रेसचे सर्व प्रमुख नेते स्थानबद्धतेत होते. १९४५ साली युद्ध संपण्याची लक्षणे दिसू लागली. ब्रिटिश सरकारने काँग्रेस पुढाऱ्यांना सोडले. वाटाघाटीच्या फेऱ्या चालू होत्या. १९४६ साली केंद्रीय असेंब्लीच्या निवडणुकाही प्रांतिक असेंब्लीबरोबर घेण्याचे सरकारने योजले. काँग्रेसने त्या लढवण्याचे ठरविले. त्यासाठी जाहीरनाम्याचा मसुदा जवाहरलालजींनी तयार केला होता. (१० डिसेंबर १९४५) त्यातील पुढील उत्तरे नेहरूंच्या विचारांची दिशा दाखविणारी आहेत :

" देशाला स्वातंत्र्य मिळावे व भारताच्या प्रत्येक नागरिकाला समान हक्क आणि समान संधी मिळावी ही काँग्रेसची उद्दिष्टे आहेत. येथील विविध जातीय आणि धार्मिक जमातींचे ऐक्य कायम राहावे. सगळ्यांनी परस्परांविषयी सहिष्णुता व सद्भाव बाळगावा. असे काँग्रेसचे धोरण आहे, म्हणणे आहे.

भारत हे स्वतंत्र लोकशाहीवादी राष्ट्र व्हावे आणि सर्व नागरिकांच्या मूलभूत हक्कांना राज्यघटनेने मान्यता व हमी द्यावी अशी काँग्रेसची भूमिका आहे. तसेच ती घटना संघराज्यात्मक असावी व घटक राज्यांना भरपूर स्वायतत्ता असावी, आणि विधिमंडळाच्या निवडणुका प्रौढ मताधिकाराच्या आधारे व्हाव्यात असे काँग्रेसचे धोरण आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात, त्याचप्रमाणे मताधिकाराबाबत लिंगभेद ही आडकाठी असू नये. राष्ट्राच्या सर्व व्यवहारात स्त्रियांनी नागरिक म्हणून बरोबरीच्या नात्याने सहभागी झाले पाहिजे."

यावेळी नेहरू निवडणुकीला उभे होते व निवडून आले. १९४६ साली केंद्रात त्यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार बनले. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. देशाची राज्यघटना बनवण्याचे काम केंद्रीय असेंब्लीने करावे असे ठरले. त्यावेळी समाजवाद्यांनी नेहरूंवर टीका केली. त्या असेंब्लीसाठी मताचा अधिकार सीमित उच्चवर्गीयांनाच होता. घटना परिषदेची निवड प्रौढ मताधिकाराच्या आधारे व्हावी या आपल्या विचारावर नेहरू खंबीरपणे टिकून का राहिले नाहीत, असा लवाद्यांचा सवाल होता. देशाची फाळणी झाली होती. महायुद्ध, फाळणी व सत्तांतर यामुळे राज्यकारभारात विस्कळीतपणा आला होता. आणि देशाचे राजकीय वातावरण स्थिर नव्हते. त्यामुळे प्रौढ मताधिकाराच्या आधारे निवडणुका घेणे शक्य नाही असे उत्तर नेहरूंनी दिले.

राज्यघटना बनविण्याच्या कामात नेहरूंनी फारसे लक्ष घातले नाही. तरी घटनेच्या उद्दिष्टांविषयीचा ठराव त्यांनीच मांडला. प्रौढ मताधिकाराचा आग्रह धरला. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या सूचनेला मात्र विरोध केला. प्रौढ मताधिकार (२१ वर्षे वयावरील) मान्य केल्यामुळे १९४५ साली मतदारसंख्या ३ कोटी होती, ती १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी १७.३ कोटींवर गेली होती. राज्यघटनेत संसदीय पद्धत स्वीकारण्यात आल्याचे दिसतेच आहे.

१९५२, १९५७ व १९६२ या तीन सार्वत्रिक निवडणुका काँग्रेस पक्षाने पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली जिंकल्या. लोकसभेत त्या पक्षाला त्या तिन्ही निवडणुकीत बहुमत मिळाल्याने पं. नेहरू प्रधानमंत्री झाले होते. त्या काळात त्यांनी संसदेचा सतत आदर केला. किंबहुना संसद या संस्थेला जनमानसात आदराचे स्थान प्राप्त व्हावे असा नेहरूंचा प्रयत्न असे. प्रसिद्ध ब्रिटिश राज्यशास्त्रज्ञ डब्ल्यू. एच. मॉरिस जोन्स यांनी ' पार्लमेंट इन इंडिया ' हा महत्वपूर्ण ग्रंथ लिहिला आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, . . . " हळूहळू प्रघात पडत आहेत आणि संकेत रूढ होत आहेत. संसद ही संस्था स्थिरावत चालली आहे. . . संसदेचा मान वाढावा या दिशेने प्रधानमंत्री (जवाहरलाल नेहरू) व त्यांचे जेष्ठ सहकारी सतत प्रयत्नशील असतात." (पान ३३२)

संसदेच्या बैठकांना नेहरू दररोज उपस्थित राहात व जास्तीत जास्त वेळ बसत. विरोधकांची टीका शांतपणे ऐकून घेत. त्यांच्या आक्षेपांना उत्तरे देत. संसदेतील चर्चेचा दर्जा उंचवावा, पातळी चांगली रहावी यासाठी ते आपल्या पक्ष सभासदांना सतत सूचना देत. सहकारी मंत्र्यांना आवश्यक तिथे ठोकत, तर जरूर तेव्हा त्यांच्या मदतीला धावून जात.

हिंदू कोड बिल, राज्य पुनर्रचना असे अनेक वादग्रस्त प्रश्न त्या काळात संसदेपुढे आले. तिथे इतरांनी केलेल्या सर्व सूचना नेहरू स्वीकारीत असे नाही. पण दखल घेत असत. पुढे टी. टी. कृष्णम्माचारी वित्तमंत्री असताना मुंदडा प्रकरण संसदेतच निघाले. त्याची योग्य ती दखल घेऊन न्यायालयीन चौकशीचा आदेश नेहरूंनी दिला.

संसद सदस्यांचा मान राखण्याबाबतही नेहरू दक्ष असत. त्यांनी विचारलेली माहिती तातडीने मिळवून देत. त्यांच्याशी नीट, अदबीने वागा अशा सूचना ते सरकारी अधिकाऱ्यांना देत. संसदीय पक्षाच्या बैठका ते वारंवार घेत आणि अनेक महत्त्वाच्या विषयांवर खुली चर्चा होऊ देत. लोकसभेत नेहरूंनी केलेली काही भाषणे स्फूर्तीदायी, तर काही विचारप्रवर्तक असत.

एकंदरीत, भारतीय संसदेला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात पं. नेहरूंचा सिंहाचा वाटा आहे असे म्हणायला हरकत नाही.

□ □ □

# पंडित जवाहरलाल नेहरू आणि अमेरिका

□ सदा कऱ्हाडे

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या राजकीय धोरणात भारत आणि अमेरिका तसेच भारत आणि सोविएत संघराज्य या दोन महासत्तांशी असणाऱ्या संबंधांना विशेष महत्त्व आहे. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर जगाची विभागणी भांडवलशाही राष्ट्रे आणि समाजवादी राष्ट्रे अशा दोन गटात झाली. भांडवलशाही राष्ट्रांचे नेतृत्व अमेरिकेने केले आणि समाजवादी राष्ट्रांचे नेतृत्व सोविएत संघराज्याने केले.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले आणि त्यानंतर भांडवलशाही साम्राज्यवादी राष्ट्रांच्या जोखडाखाली असलेली अनेक वसाहती राष्ट्रे स्वतंत्र होऊ लागली. या नवस्वतंत्र व विकसनशील राष्ट्रांना सहाय्य करण्यासाठी व शांततेची आणि सुरक्षिततेची हमी देण्यासाठी अमेरिका व सोविएत संघराज्य यांच्यात स्पर्धा सुरू झाली. दोन्ही राष्ट्रांनी आपले लष्करी बळ वाढविले. दोन महासत्ताच उदयाला आल्या. नवस्वतंत्र व विकसनशील राष्ट्रांचे तिसरे जग मानले जाऊ लागले आणि त्याकडे या दोन महासत्तांचे डोळ्यात तेल घलून लक्ष होते. स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही त्यात होते.तिसऱ्या जगाला सहाय्य करता करता स्वतःचे सत्तावर्चस्व अधिक बळकट करण्याची ' स्वहिताय ' दृष्टी त्यात होती.

अमेरिकेशी मैत्री की सोविएत संघराज्याशी मैत्री ? या प्रश्नाला जागतिक राजकारणाच्या व आंतरराष्ट्रवादाच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले. भारताचा कल सोविएत मैत्रीकडे अधिक होता. पाकिस्तानचा कल अमेरिकाकडे होता. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांनाही जागतिक महत्त्व प्राप्त झाले.

भारताचा कल सोविएत मैत्रीकडे होता याचा अर्थ असा नव्हे की, भारताने अमेरिकेशी शत्रुत्व पत्करले. स्वतंत्र भारताच्या परराष्ट्रीय धोरणात बसेल तेवढी मैत्री अमेरिकेशीही ठेवायची असे भारताचे धोरण होते.

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी एका भाषणात किंवा निवेदनात आपले परराष्ट्रीय धोरण जाहीर करताना पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले--

' We propose, as far as possible, to keep away from the power politics aligned against one another, which have led in the past two world wars and which may again lead to disaster on an even vaster scale,' (7th September. 1946).

सत्तेच्या राजकारणापासून दूर रहायचे आणि युद्धविरोधी भूमिका घ्यायची असे पंडितजींचे धोरण होते. भांडवलशाही साम्राज्यवादी अमेरिका युद्धपिपासू व युद्धखोर राष्ट्र होते. सोविएत संघराज्याने शांततावादी राष्ट्र म्हणून आपली प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पंडित जवाहरलाल नेहरू हे शांततावादी व स्वातंत्र्यवादी होते. स्वातंत्र्य आणि शांतता अविभाज्य आहेत अशी त्यांची धारणा होती. एका देशाच्या स्वातंत्र्याला नकार हा दुसऱ्या कोणाच्या तरी स्वातंत्र्यावर संकट असते आणि त्यातून संघर्ष व युद्ध संभवते. म्हणून पंडित नेहरू शांततावादी, स्वातंत्र्यवादी आणि युद्धविरोधी होते. त्यामुळेच त्यांचा कल सोविएत मैत्रीकडे अधिक होता. अमेरिकेविषयी त्यांच्या मनात मैत्रीची सद्भावना होती.

वर उधृत केलेल्या निवेदनातच पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले,

' We send our greetings to the people of the United States of America to whom destiny has given a major role in the international affairs. We trust that this tremendous responssibility will be utilized for the furtherance of peace and human freedom everywhere.'

अमेरिकेला इतिहासाने आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका दिली होती. ती पार पाडताना अमेरिकेवर कोणती जबाबदारी होती आणि अमेरिकेकडून कोणती अपेक्षा होती, हे वरील उधृतातून लक्षात येते. परंतु शांतता आणि मानवी स्वातंत्र्य यांचा विकास करण्यासाठी अमेरिका आपल्या भूमिकेचा उपयोग करीत नाही, ही वस्तुस्थिती पंडित जवाहरलाल नेहरूंना जाणवत होती. म्हणून शांततावादी सोविएत मैत्रीकडे त्यांचा अधिक कल होता.

अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात जे आदर्श नमूद केले होते, तसेच अमेरिकेच्या राज्यघटनेत व हक्कांच्या मसुद्यात जे नमूद केले होते, त्याचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर खूपच प्रभाव होता. थॉमस जेफर्सन व अब्राहम लिंकन यांच्याविषयी आपल्या देशात तर कमालीचा आदर होता. असे असूनही स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा सच्चा मित्र म्हणून अमेरिकेला प्रतिष्ठा लाभली नाही. रशियातील महान ऑक्टोबर क्रांतीचाही भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर प्रभाव होता आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारत-सोविएत मैत्री वृद्धिंगत होत गेली. इतकेच नव्हे तर या मैत्रीचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरूच होते. सन्मित्राची लक्षणे पंडित नेहरूंना अमेरिकेपेक्षा सोविएत संघ राज्यात अधिक आढळली.

वामन पंडित या प्राचीन मराठी कविने पुढील श्लोकात म्हटले आहे की—

*" योजि हिताप्रति निवारुनी पापकर्मे*
*वर्णी बरेच गुण झाकुनिया कुकर्मे*
*जो आपणास असता व्यसनी त्यजीना*
*सन्मित्र लक्षण असे वदतात जाणा । "*

सोविएत संघराज्याने संकटाच्या वेळी भारताला सहाय्य केले. सन्मित्राच्या लक्षणांचा प्रत्यय भारताला अमेरिकेच्या बाबतीत आला नाही.

पं नेहरूंचा भांडवलशाहीवर विश्वास नव्हता. भांडवलशाही व्यक्तिगत फायद्याच्या तत्त्वावर आधारलेली असते. आपल्याच बांधवांचे शोषण करण्याची संधी शोधणारी समाजव्यवस्था भांडवलशाही पोसते. नेहरूंनी लिहिले आहे—' Which way have we to go ? Are we to follow the English, French and the American way ? Have we time of 100 to 150 years to reach our

destination ? This is impossible. We will perish in the process.' (Nehru And Indian National Congress, P. 27) भांडवलशाहीच्या मार्गाने भारत जाऊ लागला तर त्या प्रक्रियेत भारत नामशेष होईल अशी पंडित नेहरूंची धारणा होती. भांडवलशाहीपेक्षा समाजवादावर त्यांचा अधिक विश्वास होता. ते महात्मा गांधींचे अनुयायी होते व त्यांचेच राजकीय वारस होते. परंतु समाजव्यवस्था म्हणून भांडवलशाहीला त्यांचा विरोधच होता. सामाजिक न्यायाचे व सामाजिक शोषण मुक्तीचे प्रश्न सोडविण्यास भांडवलशाही समाज व्यवस्था असमर्थ व अक्षम आहे, अशी त्यांची धारणा होती. त्यांनी उघडपणे सांगितले होते की, आपण समाजवादी आहोत तसेच प्रजासत्ताकवादी आहोत. राजे आणि राजपुत्र यांच्यावर आपला विश्वास नाही, त्याचप्रमाणे आधुनिक ' उद्योग सम्राट ' निर्माण करणाऱ्या व्यवस्थेवर आपला विश्वास नाही. प्राचीन राजेरजवाड्यांपेक्षा आधुनिक उद्योग सम्राटांकडे अधिक सत्ता असते आणि त्यांच्या पद्धती जुन्या सरंजामशाहीप्रमाणेच असतात. (तत्रैव : पृ. १२) भांडवलशाहीविषयी पं. नेहरूंना किती विलक्षण चीड होती, हे यावरून लक्षात येते. भांडवलशाही आणि समाजवाद या दोनच व्यवस्था संभाव्य असल्यामुळे पं. नेहरूंचा कल समाजवादाकडे झुकलेला होता.

डिसेंबर १९४६ मध्ये घटना समितीपुढे भाषण करताना ते म्हणाले, ' मी समाजवादाच्या बाजूने आहे आणि मला आशा आहे की, भारतही समाजवादाच्या बाजूने उभा राहील. समाजवादी राष्ट्राच्या घटनेकडेच भारताची पावले पडतील. माझा विश्वास आहे की, सगळे जगच समाजवादाकडे वाटचाल करील.' (तत्रैव, पृ. २७)

पंडित नेहरू सोविएत संघराज्याच्या आहारी गेले होते म्हणून त्यांचे धोरण अमेरिकाविरोधी होते, असे म्हणणे बरोबर नाही. तत्त्वतः नेहरू वसाहतवादाच्या व भांडवलशाहीच्या विरोधात होते. म्हणून त्यांचे धोरण अमेरिकेला अनुरुप नव्हते.

पंडित नेहरूंच्या राजकीय विचारात राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद या तीन प्रमुख संकल्पना होत्या.

त्यांची राष्ट्रवादाची संकल्पना अतिशय व्यापक होती. त्यांच्या राष्ट्रवादाच्या मुळाशी कोणतीही धार्मिक संकल्पना नव्हती. स्वामी दयानंद, स्वामी विवेकानंद अथवा अरविंद घोष यांच्याप्रमाणे ते धार्मिक राष्ट्रवादाचे अभिमानी नव्हते. राष्ट्रवाद ही धर्मनिरपेक्ष (Secular) अशी उच्च भावना आहे आणि या भावनेने आत्मोन्नती व आत्मविकास होतो, असे त्यांना मनःपूर्वक वाटत होते. त्यांच्या राष्ट्रवादाचे मूळ भारतीय संस्कृतीत आहे. सांस्कृतिक अनेकत्त्वातून निर्माण होणारा समन्वय हा त्यांना मूलाधार वाटला आणि हाच त्यांच्या आंतरराष्ट्रवादाचा पाया बनला. त्यांच्या राष्ट्रवादाचेच प्रतिबिंब त्यांच्या आंतरराष्ट्रवादात आहे.

वंशवाद मानणाऱ्या अथवा वंशवाद जोपासणाऱ्या अमेरिकेच्या धोरणात पंडित नेहरूंचा राष्ट्रवाद अनुरूप नव्हता. पंडित नेहरूंनी सतत वंशवादाचा निषेध केला.

धर्मातीतता हा त्यांच्या लोकशाहीचाच एक पैलू होता. परंतु भांडवलशाही व लोकशाही एकत्र नांदू शकत नाही अशी त्यांची धारणा होती. फॅसिझम आणि नाझीवाद यांच्या प्रभावामुळे भारताबाहेरच्या बाह्य जगात लोकशाहीची झालेली वाताहात त्यांनी पाहिली होती. भारताला लोकशाहीशिवाय तरणोपाय नाही हे त्यांना पटले होते. लोकशाही ही संरचना (structure) आहे आणि समाजवाद हा त्यातील आशय आहे, हे त्याना विश्वसनीय वाटत होते. म्हणून भांडवलशाही व साम्राज्यवादी अमेरिकेच्या आहारी ते गेले नाहीत, अधीन झाले नाहीत.

भारत आणि सोविएत यांच्यातील मैत्रीसंबंध नियोजित (planned) होते. भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध असे नियोजित कधीही नव्हते. भवितव्यसूचकही (predictable) नव्हते. त्यामुळे या दोन देशातील संबंधाच्या विकासाची दिशा कधीही स्पष्ट अथवा दृष्टीगत नव्हती. अमेरिकेच्या मनात नेहरूंविषयी साशंकताही होती आणि भीतीही होती.

अशी भीती असण्याची प्रमुख कारणेही उघड होती. भांडवलशाहीवर नेहरूंचा अविश्वास होता. वंशवादालाही विरोध होता. जागतिक शांततेवर त्यांचा विश्वास होता. जागतिक शांततेला वंशवादापासून धोका आहे, असे नेहरूंचे मत होते. उलट जागतिक शांततेला कम्युनिझम म्हणजे साम्यवादापासून धोका आहे, असे अमेरिकेचे मत होते. नेहरूंनी साम्यवादविरोधी भूमिका घ्यावी अशी अमेरिकेची इच्छा होती. पण साम्यवादविरोधी भूमिका घेण्यास नेहरू अनिश्चित होते. आंतरराष्ट्रीय राजकारणात साम्यवादविरोधी भूमिका घेणे अमेरिकेला निकडीचे वाटत होते. पण पंडित नेहरूंना अशी निकड वाटत नव्हती. सोविएतशी मैत्री असूनही चीनमधील साम्यवादी चळवळीविषयी व क्रांतीविषयी सहानुभूती होती.

साम्यवाद विरुद्ध वसाहतवाद याबाबत प्रारंभापासूनच नेहरूंचे अमेरिकेशी मतभेद होते. नेहरूंचे अवलोकनच असे होते की, साम्यवाद हा आमचा खरा शत्रू नसून वसाहतवाद हाच खरा शत्रू आहे, असे ते मानत. वासाहतिक व परतंत्र देशांच्या मुक्तीत नेहरूंना विशेष रस होता. आणि वसाहतवादाच्या विरोधी निश्चित भूमिका घ्यायला अमेरिका तयार नव्हती. सर्व वांशिक राष्ट्रांनाही सिध्दांततः व्यवहारतः समान संधी मिळाली पाहिजे, हे नेहरूंचे धोरण मुळातच अमेरिकेला मान्य नव्हते. सोवियत संघराज्य वसाहतवादाच्या विरोधातच होते. सोव्हिएत संघराज्याविषयी भारताची जी भूमिका होती ती अमेरिकेला कधी प्रशंसनीय वाटली नाही.

साम्यवाद हेच मोठे संकट आणि हाच मोठा धोका आहे; अशी दृढ समजूत असल्यामुळे परतंत्र राष्ट्रांना स्वातंत्र्य देण्यास विलंब करण्याचे व अवनतीला जाणाऱ्या साम्राज्यशाहीला पाठिंबा देण्याचे धोरण अमेरिकेने अवलंबिले. इंडोचायनात फ्रेंचांना अमेरिकेने याच दृष्टीने पाठिंबा दिला.

समकालीन बिकट परिस्थितीविषयी सर्वच बोलत असत. परंतु त्याबाबत प्रत्येकाची कृती मात्र भिन्न भिन्न होती. बहुधा अमेरिकेत समकालीन बिकट परिस्थिती म्हणजे साम्यवादाला पाठिंबा विरुद्ध साम्यवादाला विरोध अशीच समजूत होती. काही मर्यादेपर्यंत तशी वस्तुस्थिती असेलही. परंतु आशियामध्ये समकालीन बिकट परिस्थिती याचा अर्थ वसाहतवादाला पाठिंबा विरुद्ध वसाहतवादाला विरोध. पंडित जवाहरलाल नेहरूंना अर्थातच समकालीन बिकट परिस्थितीत (Union of our Time) वसाहतवादाला विरोध हीच भूमिका घेणे कालोचित वाटली होती.

साम्यवादाच्या धमकीने अमेरिका पछाडली गेली होती. त्यात नेहरूंना काही स्वारस्य नव्हते. परराष्ट्रीय धोरणातील आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बळावर अवलंबून राहणे आणि बळाचा उपयोग करणे ही अमेरिकेची भूमिका नेहरूंना प्रशंसनीय वाटत नव्हती ; म्हणून ते तटस्थ होते आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताने घेतलेल्या भूमिकेबाबत अमेरिकाही तटस्थ होती. अशा तटस्थपणामुळे दोन्ही राष्ट्रात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होऊ शकले नाहीत.

परराष्ट्रीय धोरणानुसार पंडित नेहरूंनी भारतासाठी सर्वच प्रमुख राष्ट्रांकडून साह्य घेतले. तसेच अमेरिकेकडूनही घेतले. भारताला आवश्यक असणाऱ्या वस्तू इंग्लंड-अमेरिकेकडून विकत घेतल्या.



एन ४३९४-८

तसेच वेळोवेळी इतर साह्यही घेतले. परंतु आपल्या भूमिकेपासून नेहरू किंचितही हटले नाहीत. असंलग्नतावादी धोरण सोडले नाही. याबाबतीत स्वतः नेहरूंनी म्हटले, ' We stuck to our policy even though we had to deny ourselves the offered help. That is why the countries realise that we cannot be bought by money ' (Select Documents on Indian Foreign Policy. P. 15). असंलग्नतावादी भूमिकेतील धोक्याबाबत ते बोलत होते, तेव्हा त्यांनी हे उद्गार काढले. (12 June 1952). भारताच्या वतीने नेहरूंनी घेतलेली ही स्पष्ट भूमिका अमेरिकेला ताठरपणाची वाटली आणि अमेरिकेचा कल पाकिस्तानकडे अधिकाधिक झुकला. पाकिस्तानला सक्रिय साह्य करायचे अन् भारताची अडवणूक करायची हे धोरण अमेरिकेने अवलंबिले. विशेषतः काश्मिरच्या प्रश्नावर व गोवा मुक्ततेच्या प्रश्नावर अमेरिका सतत भारताच्या विरोधातच राहिली.

भारताची अडवणूक केली म्हणजे नेहरू बधतील ; असे अमेरिकेला वाटत होते.पण बधण्याऐवजी नेहरूंनी असंलग्नतेचा भक्कम पाठपुरावा केला आणि समविचारी राष्ट्रांना संघटित करून असंलग्नतावादी चळवळ (Non-alignment movement) उभारण्यात पुढाकार घेतला. ही तिसरी शक्ती उदयाला येत असल्याचे पाहून अमेरिका अस्वस्थ झाली तशीच पं. नेहरूंबाबत असंतुष्ट झाली.

पंडित नेहरूंनी अमेरिकेला दोन वेळा भेट दिली. पहिली भेट १९४९ मध्ये व दुसरी भेट १९६१ मध्ये. दोन्ही भेटीतून भारताच्या दृष्टीने निष्पन्न तर काही निघालेच नाही. परंतु अमेरिकेचे मत नेहरूंविषयी दूषित आहे हेच पुनः स्पष्ट झाले. जागतिक व्यवहारात भारताची भूमिका काय आहे ते स्पष्ट करण्यासाठी आणि भारतासाठी अमेरिकेकडून मदत मिळावी म्हणून १९४९ मध्ये नेहरू अमेरिकेत गेले. प्रत्यक्षात दोन्ही देशातील नेत्यांची वैचारिक देवाण घेवाण झाली. नेहरूंविषयी अमेरिकेच्या मनात असलेली साशंकता एकाअर्थी अधोरेखित झाली. ही भेट अपरिपक्व आणि अयशस्वी झाली यात आश्चर्य काहीच नव्हते. अमेरिकेकडून पुरेशी मदत मिळाली नाही आणि भारताच्या परराष्ट्रीय धोरणाला पाठिंबाही मिळाला नाही.

१९६१ च्या भेटीतही परस्पर नैराश्यच पदरी पडले. अध्यक्ष केनेडी यांच्या हे लक्षात आले की, महत्त्वाच्या किंवा भक्कम अशा विषयावर अथवा स्वारस्यावर नेहरूंशी बोलण्यात काही अर्थ नाही. भारताची प्रगती करण्याची क्षमता नाही आणि भारत आशियातील एक शक्ती होऊ शकणार नाही, याविषयी केनेडींची खात्री पटली. याबाबतीत भारतावरचा त्यांचा विश्वास उडू लागला. केनेडीना आपला पाहुणा कसा वाटला ? ' a Lincoln weary by too long a spell in office ' (Essays on India's Foreign Policy, P. 65) नेहरूंनी जी काय भाषणे दिली त्यामुळे यजमान कंटाळले. त्याबाबत केनेडी साहेबांची प्रतिक्रिया काय? –' A disaster–the worst head of State visit I have had.' (तत्रैव) राष्ट्रप्रमुखाची इतकी निकृष्ट भेट आपण कधी अनुभवली नाही. या केनेडींच्या उद्‌गारात नेहरूंविषयींची अनास्थाच दिसून येते.

अमेरिका आणि नेहरू यांच्यात वैचारिक मतभेद होते आणि पारस्परिक राष्ट्रीय हिताविषयी आस्था नव्हती. त्यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध कधी सुखावह नव्हते उलट ताणलेलेच होते.

अमेरिकेचे समावेशकताचे (Containment) आणि शीतयुद्धाचे राजकारण भारताला निषेधार्ह वाटत होते. पंडित नेहरूंचा भर सहअस्तित्व आणि पंचशीलावर होता. अमेरिका सतत सोविएत संघराज्याच्या विस्तारवादाचे भय पुढे करीत होती. सुरक्षिततेसाठी ऐक्याचा (Security Alliance) व सत्तेच्या समतोलाचा आग्रह धरत होती.

आपले प्रश्न शांततेने व वाटाघाटीच्या मार्गाने सोडवावेत, मानवी गटात सहकार्य व समन्वय असावा आणि अशा प्रकारे मानवाचा विकास घडवून आणावा यावर पंडित नेहरूंचा कटाक्ष होता. १९५४ साली नेहरू आणि चू-एन-लाय यांनी एकत्रपणे या धोरणाला आधारभूत असलेली पाच तत्त्वे मान्य केली. भिन्न राष्ट्रांनी परस्परांच्या भूमिविषयी, क्षेत्रीय एकात्मतेविषयी व संप्रभुतेविषयी आदर बाळगावा; परस्परावर आक्रमण करू नये; परस्परांच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप करू नये; उभयतात सहजीवनाचा व आर्थिक सहकार्याचा स्वीकार करावा. ' पंचशीला ' मुळे सुरक्षिततेची व आत्मविश्वासाची भावना निर्माण होईल अशी पंडित नेहरूंची अपेक्षा होती. चीनने आक्रमण करून या धोरणाला थोडा हरताळ फासला. पण नेहरू या धोरणाला चिकटून होते. पाकिस्तानला हे धोरण मान्यच नव्हते आणि अमेरिकेचा पाकिस्तानला सतत पाठिंबा होता.

नेहरूंच्या ' पंचशील ' धोरणाचे सोविएत संघराज्याने स्वागत केले. २० व्या महाअधिवेशनात क्रुश्चेव्ह म्हणाले की, आशियातील शांतता दृढ किंवा बळकट करण्याच्या बाबतीत भारतीय प्रजासत्ताकाने फार मोलाची भर घातली. त्यामुळे शांततावादी, समाजवादी आणि न-समाजवादी राष्ट्रांचा मिळून एक विशाल ' शांतता पट्टा ' निर्माण झाला आहे. १९५५ मध्ये क्रुश्चेव्हने भारताला भेट दिली. या भेटीत त्या समर्थनाचा पुनरुच्चार केला. रशियन नेत्यांनी (नेहरू-बुल्गेमिन संयुक्त निवेदन ) ' पंचशील तत्त्वा 'चा पुरस्कार केला आणि भारताच्या काश्मीर व गोव्याविषयीच्या भूमिकेला पाठिंबा दिला. (Essays on India's Foreign Policy. P. 50).

१९५६ ते १९६२ या कालावधीत ध्रुवीकरण स्पष्ट झाले. पाकिस्तान व अमेरिका यांच्यातील ऐक्य दृढ झाले आणि भारत-रशिया अधिक जवळ आले. राजकीय व आर्थिक क्षेत्रात भारत-सोविएत मैत्री व सहकार्य संबंध प्रस्थापित झाले. पाकिस्तान आणि अमेरिका यांच्यातील ऐक्यामुळे पं. नेहरू अधिक अस्वस्थ झाले आणि सोविएतकडे अधिक झुकले. भारताच्या बाजूने सुद्धा एक महासत्ता मित्र म्हणून आहे, हे दाखविणे नेहरूंना आवश्यक वाटत होते आणि दुसरे असे की, अमेरिकेचा काश्मीरबाबत पाकिस्तानला व गोव्याबाबत पोर्तुगालला पाठिंबा होता. त्याला तुल्यबळ असा सोविएतचा भक्कम पाठिंबा भारताला हवा होता.

गोवा ही पोर्तुगीजांची वसाहत आहे, असे डलोस यांनी तीव्रपणे सांगितले ; तर काश्मीरचे लोक काश्मीर हा भारतीय प्रज्यासत्ताकाचा अविभाज्य भाग आहे असेच म्हणतात, असे समर्थन रशियन नेत्यांनी केले. गोवा पोर्तुगालपासून मुक्त करण्याचा भारताला अधिकार अथवा हक्क आहे, असा पाठिंबाही दिला. १९५५ मध्ये भारताने ' समाजवादी समाजाचा आकृतिबंध ' स्वीकारला. पुरेशी सार्वजनिक उद्योग क्षेत्रे (Public Sectors) उभारण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे अमेरिका अस्वस्थ झाली. अमेरिकेतील दात्याना (Donors) भारतातील राष्ट्राच्या मालकीच्या उद्योगांना सहाय्य करण्यात अमेरीकेला स्वारस्य नव्हते. त्यामुळे नेहरूंना सोविएत संघ राज्यावर विसंबून राहण्याशिवाय गत्यंतर नव्हते. बोकारो प्रकल्पाला सहाय्य करण्यास अमेरिकेचा नकार आणि पोलाद संकुल उभारण्यास सोविएतने पुढे केलेला मदतीचा हात, इत्यादी उदाहरणे बोलकी आहेत.

चीनने केलेल्या आक्रमणाच्या बाबतीत सोविएतला थोडा पक्षपात करावा लागला. सोविएत संघराज्याच्या तटस्थपणाला आव्हान देऊन त्याची कसोटी बघण्याचा चीनचा हेतू होता. क्युबा प्रकरणात सोविएतने चीनच्या भूमिकेला संमतो दर्शविली आणि भारताने चीनला अपेक्षित असलेल्या शर्तीवर युद्धबंदीचा प्रस्ताव मंजूर करावा असे सुचविले. परंतु चीनच्या शर्ती स्वीकारणीय नसल्यामुळे भारताने ही सूचना फेटाळून लावली.



एन ४३९४-८अ

थोडा काळ संबंध बिघडले तरी रशियाने पूर्ववत भारताची बाजू घेतली. परंतु दरम्यान भारताला पश्चिमी सहाय्य व सहानुभूती मोठ्या प्रमाणात मिळाली आणि नेहरूंना आपला कल सोविएत संघ राज्याकडून पश्चिमेकडे झुकवावा लागला. संरक्षण मंत्री मेनन यांना राजीनामा देणे भाग पडले. परंतु पंडित नेहरूंनी राजीनामा दिला नाही आणि सोविएत मैत्रीचा संपूर्ण त्यागही केला नाही. कारण चीनविरुद्ध भारताला पाठिंबा देताना भारताने काश्मीर प्रकरणाबाबत पाकिस्तानशी तडजोड करून प्रश्न मिटवावा असा आग्रह पश्चिमी राष्ट्रांनी धरला.

चीनच्या आक्रमणाच्या घटनेनंतर सोविएत संघराज्याला पाकिस्तानच्या बाबतीत आपले धोरण बदलावे लागले. याचा स्पष्ट अनुभव कच्छ प्रकरणात आणि ताश्कंद करारात आला. सोविएत दबावाखाली भारताने पाकिस्तानला अनेक सवलती दिल्या.

एकदा स्पष्ट ध्रुवीकरण झाल्यानंतर भारताने सोविएत मैत्रीचा त्याग करून अमेरिकेच्या मैत्रीचा हात स्वीकारला नाही आणि सोविएतचे धोरण बदलले तरी पाकिस्तानने अमेरिकेची कास सोडली नाही. भारत–पाकिस्तान यांच्यातील तंटे कायम राहिले.

अध्यक्ष आयसेन हॉवर यांनी एक भक्कम प्रस्ताव मांडला होता. त्या प्रस्तावात असे म्हटले होते की, प्रादेशिक एकात्मतेचे संरक्षण करण्यासाठी आणि सुरक्षित राखण्यासाठी, तसेच एखाद्या राष्ट्राचे किंवा राष्ट्र गटाचे राजकीय स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी अमेरिकेच्या लष्करी दलाचा उपयोग करता येईल. मध्यपूर्वेतील अशा एखाद्या राष्ट्राने आंतरराष्ट्रीय साम्यवादाच्या नियंत्रणाखाली झालेल्या लष्करी आक्रमणाविरुद्ध असे संरक्षण मागितले तर अमेरीकेचे लष्करी बळ वापरता येईल.

१९५६ मध्ये अँग्लो–फ्रेंचाची दाणादाण उडाली. त्यामुळे मध्यपूर्वेत ' सत्तेची पोकळी ' निर्माण झाली होती. ही पोकळी फक्त अमेरिकाच भरून काढू शकेल असे आयसेन हॉवर यांना वाटत होते.

' सत्तेच्या पोकळी ' विषयीच्या या धोरणाला अर्थातच पं. जवाहरलाल नेहरूंचा विरोध होता. आशियाई क्षेत्रात, विशेषतः पश्चिम आशियात निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी एखाद्या बाहेरच्या शक्तीने हस्तक्षेप करावा, हे नेहरूंना मान्य नव्हते. आपली प्रतिक्रिया त्यांनी अत्यंत तीव्र शब्दात व्यक्त केली. (२५ मार्च १९५७) हस्तक्षेप करण्याचा हा प्रस्तावच घातक आहे, असे त्यांनी म्हटले. हा प्रस्ताव खोटा व दांभिकपणाचा आहे, कारण तसे पाहिले तर मग ज्या राष्ट्राजवळ पुरेसे शस्त्रबळ नाही तेथे अशी पोकळी असणारच. शस्त्रबळाचाच विचार करायचा तर हैड्रोजन बॉम्बचा पुरेसा साठा असणारे दोनच देश आहेत, अमेरिका आणि सोविएत संघराज्य ; बाकी कोणत्याही देशाजवळ असा साठा नसल्यामुळे तेथे पोकळी आहे असे म्हणावे लागेल आणि ते मूर्खपणाचेच होईल, असे नेहरूंनी परखडपणे सांगितले.

मग कसोटी कोणती लावायची ? लष्करी बळाची ? असा प्रश्न नेहरूंनी उपस्थित केला. दोन देशाव्यतिरिक्त आणखी तीन चार देशांजवळ असे लष्करी बळ आहे. म्हणजे हे सहा देश सोडून बाकीचे सगळे देश लहान आणि लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीने दुर्बळ म्हणावयाचे व तेथे ' सत्तेची पोकळी ' मानायची काय ? आशिया आणि आफ्रिकेतील देशांच्या हितसंबंधाच्या दृष्टीने ही कल्पना अत्यंत घातक आहे असे पंडित नेहरूंनी प्रतिपादन केले. याबाबतीत नेहरूंची भूमिका अशी होती की, जेथे साम्राज्यवादी सत्तेला माघार घ्यावी लागली, तेथे अशी पोकळी राहणारच. पण ती पोकळी त्या त्या देशातील लोकांनी आपल्या देशाचा राजकीय व आर्थिक विकास साधूनच भरून काढायला हवी. ' सत्तेची पोकळी ' भरून काढणाऱ्या अमेरिकेच्या या प्रस्तावातला दुसरा धोका पं. नेहरूंनी निदर्शनास आणला. एखाद्या राष्ट्रात

असा लष्करी हस्तक्षेप करून आपला क्षेत्रप्रभाव वाढविण्याचा प्रयत्न एका महासत्तेने केला की दुसरी महासत्ता त्याच ठिकाणी अथवा दुसऱ्या ठिकाणी आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न करणारच आणि दोन महासत्तांची रस्सीखेच (tug-of-war) सुरू होईल. दुर्बळ राष्ट्रांच्या दृष्टीने हे घातकच होते. (Select Document on India's Foreign Policy. P. 86-87).

अमेरिकेच्या अशा धोरणाला पंडित नेहरू सतत विरोध करीत होते, ते केवळ भारताच्या हितसंबंधापुरते नव्हे, तर संपूर्ण आशिया व आफ्रिकेतील देशांच्या हितसंबंधासाठी. अमेरिकेच्या अडवणुकीच्या धोरणामुळे काश्मीरचा प्रश्न वर्षानुवर्षे भिजत घोंगड्यासारखा होत होता आणि भारत-पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढत होता. पाकिस्तानच्या कुरापतीही वाढत होत्या. तरीही आंतरराष्ट्रीय हितसंबंधाच्या दृष्टीने पं. नेहरूंनी अमेरिकेशी तडजोड केली नाही.

अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यात लष्करी करार झाले. ही वस्तुस्थिती पाकिस्तानने पुनः पुनः नाकारली. परंतु अमेरिकेतील वृत्तपत्रांनीच या करारांविषयी वारंवार लिहिले होते. पाकिस्तानमध्ये एक सुसज्ज लष्करी तळ उभारण्याचा अमेरिकेचा प्रयत्न होता. मोठ्या प्रमाणावर पाकिस्तानला लष्करी साह्य देण्यामागे अमेरिकेचा हाच हेतू होता. पाकिस्तानची दहशत बसून भारताने सामोपचाराने काश्मीरचा प्रश्न सोडवावा असा हेतू लष्करीमागे होता. त्याचप्रमाणे साम्यवादी देशांशी संभाव्य युद्ध झालेच तर पाकिस्तानमध्ये उभारलेल्या लष्करी तळाचा उपयोग करता यावा असा अमेरिकेचा धूर्त उद्देश होता.

पं. नेहरूंनी हा धूर्त उद्देश जाणला होता. त्यांचे म्हणणे असे होते की, ' सत्तेची पोकळी ' भरून काढण्यासाठी बाहेरील लष्करी शक्तीने हस्तक्षेप करणे जसे योग्य नाही तसेच अमेरिकेचे हे उद्दिष्टही अनुचितच आहे. कारण संभाव्य युद्धाची अपेक्षा करणे, त्यासाठी शस्त्रास्त्रसंपन्न होणे, दुर्बळ राष्ट्रांना लष्करी साह्य देऊन तेथे संभाव्य युद्धासाठी लष्करी तळ निर्माण करणे, ही काही शांततेची हमी देण्याची पद्धती नव्हे. उलट ही संभाव्य युद्धाला उत्तेजन देण्याचीच प्रवृत्ती आहे, अशी आपली प्रतिक्रिया नेहरूंनी स्पष्टपणे पाकिस्तानच्या पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात कळविली (९ डिसेंबर १९५३). इतकेच नव्हे तर अमेरिकेच्या मदतीने लष्करी बळाचा विस्तार करण्याचा पाकिस्तानचा हा प्रयत्न मैत्रीसंबंधाशी विसंगत व भारताच्या विरोधात आहे आणि घातकही आहे, असेच भारतीयांचे मत होईल, असा इशाराही नेहरूंनी दिला.

' युद्ध नको निवेदन ' (No War declaration) किंवा ' अनाक्रमण करार ' (Non-agression) असा एक प्रस्ताव पं. नेहरूंनी तयार केला होता. परंतु पाकिस्तानने तो झिडकारला. तेव्हा त्यामागे अमेरिका आहे आणि पाकिस्तानला लष्करी साह्य करण्यामागे अमेरिकेचा शस्त्रस्पर्धेचाच डाव आहे, हे नेहरूंनी जाहीरपणे सांगितले.

अमेरिकेचे धोरण पक्षपाती आहे, हे नेहरू जाणून होते.अमेरिकेच्या अध्यक्षांनी असे निवेदन केले होते की, अमेरिकेने दिलेल्या मदतीचा पाकिस्तानने दुरूपयोग केला किंवा या लष्करी साह्याच्या बळावर दुसऱ्या एखाद्या देशावर आक्रमण केले, तर ते थांबविण्याचा प्रयत्न अमेरिकेचे अध्यक्ष करतील. नेहरूंनी हे लक्षात आणून दिले की, भारताचा अनुभव उलट आहे. अशी आक्रमणे झाली पण अमेरिकेने त्याबाबतीत काही केले नाही. पाकिस्तानी आक्रमणाचा अमेरिकेने निषेध तर केला नाहीच. उलट भारताने काश्मीरचा प्रश्न फार ताणू नये असा सल्ला भारताला दिला. अमेरिकेच्या अध्यक्षांनी असेही सांगितले की, भारताने लष्करी मदत मागितली तर अमेरिका त्याचाही विचार करील. परंतु नेहरूंनी

परखड उत्तर दिले, ' पाकिस्तानला मिळणाऱ्या लष्करी मदतीबद्दल आम्ही आक्षेप घेतो आणि आम्हीच जर अशी मदत मागितली अन् स्वीकारली तर आम्ही दांभिक व संधिसाधू ठरू.' (Select Document on India's Foreign Policy. P. 261).

युद्धबंदी रेषेच्या दोन्ही बाजूचे निरीक्षण करण्याकरिता संयुक्त राष्ट्रसंघाने निरीक्षकांचा गट पाठविला होता. त्यात अमेरिकेने आपलेही निरीक्षक पाठविले. नेहरूंचा त्याला आक्षेप होता. या वादात अमेरिकेचे निरीक्षक नि:पक्षपाती किंवा तटस्थ राहतील असे वाटत नाही ; म्हणून निरीक्षणाच्या वेळी त्यांचे अस्तित्व आम्हाला अनुचित वाटते असे नेहरूंनी स्पष्टपणे सांगितले. अमेरिकेच्या भारताच्या बाबतीतील प्रत्येक कृतीचा पं. जवाहरलाल नेहरू दूरदृष्टीने आणि भारताच्या हितसंबंधाच्या दृष्टीने विचार करीत.

चीनच्या बाबतीत भारताचे धोरणही अमेरिकेला नापसंत होते. दोघांचे धोरण भिन्न होते.

अनिश्चित काळापर्यंत आपले आशियावर प्रभुत्व राहावे असे अमेरिकेचे धोरण होते. नेहरूंचा अर्थातच त्याला विरोध होता. कोणत्याही उद्देशाने का होईना ; पण दुसऱ्या देशाचे वर्चस्व आशियावर असावे असे नेहरूंना वाटत नव्हते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आम सभेतील कार्यपद्धतीवरही नेहरूंनी टीका केली. जागतिक शांततेचा प्रश्न चर्चेला घेण्याचे टाळले जात असे. त्यामागे अमेरिकेच्या वर्चस्वाचा डाव असे. काश्मीरचा प्रश्न आम सभेत उपस्थित करण्याचे कारण नाही असे त्याना वाटत असे. इतकेच नव्हे तर राष्ट्रकुलाच्या पंतप्रधानांच्या परिषदेच्या कार्यक्रमपत्रिकेवर काश्मीरचा प्रश्न ठेवण्यासही त्यांचा विरोध होता.

साम्राज्यवाद्यांच्या आशिया- आफ्रिकेतील अमेरिकेच्या वर्चस्वाला पंडित नेहरूंचा विरोध होता. म्हणून अमेरिका मिळेल त्या संधीचा उपयोग करून काश्मीरचा प्रश्न उचलून धरीत असे. नेहरू त्याबाबत अस्वस्थ झाले तरी पं. नेहरूंनी आपले धोरण बदलले नाही, अथवा आपल्या भूमिकेबाबत तडजोड केली नाही.

अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या करारामुळे अमेरिकेच्या सत्तेच्या राजकारणाची व अनैतिक स्वभावविशेषत: दिसून येते. सोविएत संघराज्याभोवती लष्करी तळांचे जाळे बांधण्याच्या उपक्रमातला तो खेळ होता. या खेळात भारताला ओढण्याचाही प्रयत्न अमेरिकेने केला. नेहरू मात्र त्या खेळापासून सावधगिरीने दूर राहू इच्छित होते.

भूमध्यात तूर्क-ग्रीस ऐक्याला अमेरिकेचा पाठिंबा होता. युरोपात नाही. (NATO—North Atlantic Treaty Organisation) चे लष्करी बळ होते. पश्चिम आशियात अरब-इस्राइल तणाव आणि सुएझ कालव्याचे संघर्ष होते. मध्यपूर्वेत संरक्षण संघटना प्रस्थापित करण्यात अमेरिकेचे प्रयत्न हताश करणारे ठरले. हिंदी महासागर सुरक्षा व्यवस्थेत सहभागी होण्यास भारत, बर्मा, सिलोन आणि इंडोनेशिया यांनी नकार दिला होता. त्यामुळे दक्षिण आणि दक्षिण पूर्व आशियासाठी अमेरिकेने तयार केलेल्या व्यूहरचनात्मक योजनेत मोठीच फट राहिली होती. पॅसिफिक परिसरात आपले अस्तित्व राखण्यासाठी अमेरिकेने पॅसिफिक कराराचा प्रस्ताव आणला. जपानशी सुरक्षा करार केला, दक्षिण कोरियाशी परस्पर सहाय्य करार केला. परंतु इजिप्तपासून इंडोनेशियापर्यंत एक फट राहिली होती. या क्षेत्रातील देशांनी लष्करी ऐक्यात सामील व्हावे म्हणून त्यांचे मन वळविण्यात अमेरिकेला यश मिळाले नाही. म्हणून या तटस्थ क्षेत्रातील एकेक राष्ट्राला अलग पाडण्याचे सूक्ष्म आणि अप्रत्यक्ष प्रयत्न अमेरिकेकडून होत होते.

जॉन फॉस्टर डलेसने ' सोविएत भरती परतवून लावण्याचा ' (Roll-back the Soviet tide) सिद्धान्त मांडला. या सिद्धांताद्वारे अमेरिकेचे लष्करी ऐक्याचे जाळे पश्चिम आशिया व दक्षिण पूर्व आशियात पसरविले. आधुनिक शस्त्रास्त्रांचा पुरवठा करून पाकिस्तानलाही या जाळ्यात ओढले. या जाळ्यापासून भारताला अलिप्त अथवा असंलग्न ठेवण्याचा सावधगिरीचा प्रयत्न पं. नेहरूंच्या धोरणात होता.

पश्चिमी सत्ता मागील दरवाज्याने आशियात पुनः प्रवेश करू पहात आहे, हे पंडित नेहरूंना दुसऱ्या महायुद्धोत्तर अमेरिकेच्या हालचालीवरून तीव्रतेने जाणवले होते. पश्चिमी राष्ट्रांना बाहेर ठेवण्यासाठी पंडित नेहरूंनी असंलग्नतेचे धोरण अवलंबिले. या धोरणाचा पुरस्कार करून भारताने अमेरिकेच्या ' आशियातील सुरक्षा धोरणा 'स सहकार्य देण्याचे नाकारले. आशियाविषयीच्या धोरणाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणून चीनमधील ' लोकांच्या प्रजासत्ताका 'शी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

कोरियाचे युद्ध झाले तेव्हा भारताने प्रथम संयुक्त राष्ट्रसंघाच्या कृतीला पाठिंबा दिला. परंतु नंतर नेहरूंच्या लक्षात आले की, युनोची कृती व युनोचे धोरण अमेरिकेच्या चीनविषयक धोरणाशी निगडित आहे, तेव्हा त्यांनी चीनशी उघडपणे दोस्ती केली आणि आशियातील पश्चिमी अस्तित्वाचा अथवा उपस्थितीचा तीव्र निषेध केला. व्हिएतनामशी अमेरिकेचे व ' सीटो 'चे (SEATO—South East Asiatic Organisation) जे संबंध होते, त्याबाबत जे धोरण होते त्याला नेहरूंचा विरोधच होता. १९५४ मध्ये ' सीटो ' ची स्थापना झाली आणि पाकिस्तान त्या गटात सामील झाले.

नेहरूंनी भारतासाठी असंलग्नतेचे धोरण स्वीकारले. राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने ते योग्य होते. भारत नवस्वतंत्र राष्ट्र होते. आपल्या सामाजिक व आर्थिक पुनर्रचनेच्या समस्येवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक होते. परस्पर विरोधी शक्तींचे गट व त्यांच्यातील स्पर्धायुक्त संबंध यांच्या भानगडीत पडण्याचे नेहरूंनी टाळले. भारतातील विकास योजना पूर्ण होण्यासाठी परकीय अर्थसहाय्य मिळवावे ; परंतु परदेशांच्या सत्तास्पर्धेत गुरफटून जाऊ नये असे धोरण पं. नेहरूनी स्वीकारीले, आणि कोणत्याही लष्करी गटात सामील होण्याचे त्यांनी टाळले.

युद्धाऐवजी शांततेलाच अनन्यसाधारण महत्त्व द्यायचं असेल तर सत्तास्पर्धेपासून व त्यासाठी प्रवृत्त झालेल्या लष्करी गटापासून अलिप्त राहिले पाहिजे आणि परस्परांशी मैत्रीचे व सहकार्याचे संबंध ठेवून आपले राष्ट्र विकसित केले पाहिजे. अशीच नेहरूंची धारणा झाली. इतकेच नव्हे तर आशियातील व आफ्रिकेतील नवोदित राष्ट्रांनीही या धोरणाचा अवलंब करावा असे त्यांना वाटले. असंलग्नता म्हणजे केवळ तटस्थता किंवा निष्क्रियता नव्हे. आंतरराष्ट्रीय तणाव कमी करण्याचा तो एक विधायक मार्ग आहे अशी नेहरूंची कल्पना होती. म्हणून त्यांनी या संकल्पनेचा पाठपुरावा केला. नवोदित राष्ट्रांपुढे ही कल्पना ठेवली. इजिप्तचा नासर, घानाचा अंक्रुना व इतर राष्ट्रप्रमुखांवर त्याचा प्रभाव पडला. पुढे तर असंलग्नता ही चळवळच बनली. (NAM–Non-alignment Movement).

पंडित नेहरूंना अभिप्रेत असलेल्या या संकल्पनेच्या गुणदोष विवेचनाचा आजच्या समकालीन राजकीय परिस्थितीत पुनर्विचार करावा लागेल. असंलग्नतावादाला अमेरिकेचा व अमेरिकेच्या मित्रराष्ट्राचा विरोध होता. परंतु सोविएत संघराज्याचा पाठिंबा होता. लष्करी गटात सामील झालेल्या नवस्वतंत्र राष्ट्रांची अवस्था उपग्रहासारखी होईल अशी एक भीती नेहरूंच्या मनात होती. प्रत्यक्षात काय झाले हे तपासून पाहता येईल. परंतु तो स्वतंत्र लेखाचा विषय होईल.

परंतु दुसऱ्या महायुध्दोत्तर काळात नवस्वतंत्र व विकसनशील राष्ट्रांच्या हितसंबंधाच्या दृष्टीने सत्तास्पर्धेच्या व लष्करी गटात सामील व्हायचे की नाही हा तात्कालिक निकडीचा प्रश्न होता. अशा गटात सामील होणे म्हणजे नवस्वतंत्र राष्ट्रांनी पुनः वेगळ्या अर्थाने पराधीन होण्यासारखे होते.

ऐक्य कराराच्या अथवा संलग्नतेच्या (Alliance or Alignment) बाबतीत प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे अमेरिकेचा पुढाकार होता. अलिप्ततेच्या अथवा असंलग्नतेच्या (Non-Aliance OR Non-Alignment) बाबतीत दुसऱ्या महासत्तेने पुढाकार घेतला नाही. परंतु दुसऱ्या महासत्तेकडे कल असणाऱ्या भारताने (अर्थात् पंडित नेहरूंनी) पुढाकार घेतला. अमेरिकेला अर्थात हे रूचणे स्वाभाविक नव्हतेच.

संलग्नतेच्या धोरणात पं. नेहरूंना काही धोके जाणवले होते. कोणत्याही गटाशी ऐक्य राखणे व त्याशी संलग्न राहणे म्हणजे आपले स्वातंत्र्य गमावणे. कारण आणीबाणीची वेळ आली तर मदत मिळणाऱ्या गटसदस्य राष्ट्राला महासत्तेचे आदेश बंधनकारकच राहणार. दुसरे असे की, आशियातील व आफ्रिकेतील राष्ट्रांनी ऐक्य करारात सामील होणे म्हणजे पश्चिमी राष्ट्रांना पश्चिमी राष्ट्रांच्या दृष्टीकोनातून आशियाई राष्ट्रांचा विचार करण्याची संधी देणे. Asian Problem " Minus Asia " म्हणजे आशियाई राष्ट्रांच्या दृष्टीकोनाला वगळून (Essays on India's Foreign Policy, P. 36). संलग्नता म्हणजे आत्मघातक शस्त्रस्पर्धा, गैरसमज आणि तणाव, आणि असंलग्नता म्हणजे कोणत्याही देशासाठी राष्ट्रीय दृष्ट्या हितकारक धोरण, असे पंडित जवाहरलाल नेहरूंनी स्पष्ट केले. (तत्रैव, पृ. ३६). ऐक्य आणि संलग्नता सुरक्षिततेचा अभास निर्माण करते; They either helped develop " the Moginot line mentality "OR making us " feel that others will defend us, we grow soft." (Ibid, P. 26).

पंडित जवाहरलाल नेहरूंची असंलग्नतेची कल्पना म्हणजे त्यांनी प्रतिपादलेला उपाय किंवा युक्ती (Expedience) नव्हती. एका अमूर्त सिद्धान्ताच्या पातळीवर त्यांनी उमवलेली ती संकल्पना होती. ती संकल्पना त्यांना मूर्त रूपात आणावयाची होती. त्यांची या संकल्पनेवर विलक्षण निष्ठा होती. त्यांचा असा विश्वास होता की, असंलग्नतावादी भूमिका घेऊन भारत सुद्धा जागतिक शांततेत मोलाची भर घालू शकेल. दोन परस्पर भिन्न विचारप्रणालीमुळे जगाची विभागणी झाली होती आणि जग द्विध्रुवी (bi-polarised) बनले होते. नेहरूंचा असा विश्वास होता की, या निष्ठुर दोन ध्रुवांमध्ये सामंजस्याचा एक पूल म्हणून भारताला भूमिका घेता येईल. पंडित नेहरूंना युद्ध नको होते, शांतता हवी होती. युरोप आणि अमेरिकेतील लोकांविषयीही त्यांच्या मनांत आस्था होती. युरोप आणि अमेरिकेशी ते केवळ आशिया व आफ्रिकेचा प्रवक्ता म्हणून संवाद साधू पाहत नव्हते, तर पूर्व आणि पश्चिम यांच्यातील भांडणांत, वितुष्टात मध्यस्थांची भूमिकाही ते बजावू पाहत होते आणि ही भूमिका आपल्याला केवळ भारताच्या असंलग्नतावादी धोरणामुळेच घेता येणे शक्य होईल असा त्यांचा विश्वास होता. लॉरेन्स मार्टिनने नेहरूंचे वर्णन, " a man with the mission to mediate " असे केले आहे. मध्यस्थ म्हणून त्यांचे प्रयत्न असफल झाले असतील. शीतयुद्धाचा शेवट करण्यात १९६० मध्ये त्यांना यश आले नाही. परंतु कोरियातील युद्धबंदी आणि इंडोचायनाचा प्रश्न सोडविण्यासाठी झालेली जिनिवा परिषद, त्यांच्या यशस्वी प्रयत्नांची साक्ष आहे.

पूर्व आणि पश्चिम यांच्यातील मध्यस्थ आणि ' सामंजस्याचा पूल ' ही पंडित नेहरूंची भारताच्या वतीने भूमिका होती. त्यासाठी त्यांनी असंलग्नतावादाचा पुरस्कार केला. परंतु त्यावेळी अमेरिकेला हे पुरतेपणी समजले नसावे. पंडित नेहरू हे सोविएत संघराज्याचे मित्र म्हणून साम्यवादाचे समर्थक, या साशंक आणि समय दृष्टीने अमेरिकेने सतत नेहरूंकडे पाहिले. आणि अमेरिकेचे धोरण आशियातल्या स्वातंत्र्याला व स्वाधीनतेला विधायक आहे अशी नेहरूंची खात्री होती. हे खरे असले तरी त्यावरचा उपाय (expediency) म्हणून त्यांनी असंलग्नतेचे धोरण स्वीकारले असा अमेरिकेप्रमाणे इतर राष्ट्रांनीही समज करून घेतला.

परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतीत पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्या अहिंसा आणि सहिष्णुता या तत्त्वातूनच ' पंचशीला ' चा सिध्दान्त उत्क्रांत केला. जगातील बहुतेक लहानमोठ्या राष्ट्रांनी हा सिध्दान्त तत्त्वतः स्वीकारला. समकालीन परिस्थितीच्या वास्तविक मागण्यांशी त्यांनी आदर्शवादाची सांगड घातली. हे त्यांच्या एकूण राजकीय कर्तृत्त्वाचे आणि थोर पुरुषत्वाचे सारतत्त्व आहे. प्रचंड शस्त्रसज्ज लष्करी शक्तीची निगा राखत असतानाच सहजीवनाचे, शांततापूर्ण सहअस्तित्वाचे तत्त्व इतर राष्ट्रांना स्वीकारण्यास भाग पाडणे, ही काही साधी गोष्ट नव्हती. परंतु ती साध्य करण्याचा पंडित जवाहरलाल नेहरू यांचा अटोकाट प्रयत्न होता. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रचंड प्रगतीमुळे बलाढ्य राष्ट्रांना देखील, आवश्यक नसले तरी शांतता पूर्ण सहअस्तित्वाच्या परिभाषेत विचार करणे शक्य झाले आहे. या वैज्ञानिक व तांत्रज्ञानिक प्रचंड प्रगतीने बलाढ्य राष्ट्रांपुढे अपरिहार्य निवड ठेवली आहे. या निवडीला सामोरे जाणे कोणालाही टाळता येणार नाही. ती निवड—' सह-अस्तित्व ' की ' न-अस्तित्व ' ? (Co-existence OR Non-existence). सत्तास्पर्धा व गटस्पर्धा यांनी दुसऱ्या महायुद्धानंतर शस्त्रास्त्र स्पर्धा गतिमान केली. त्यातूनच ' न अस्तित्वा ' चा धोका निर्माण होत होता.परंतु सोविएत संघराज्याच्या महासत्तेला प्रतिरोध करण्यासाठी अमेरिकेच्या महासत्तेने सर्व जगावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात डोळ्यावर पट्टी बांधून हा न अस्तित्वाचा धोका नजरेआड केला होता. शांतताप्रिय पंडित जवाहरलाल नेहरूंनी दूरदृष्टीने हा धोका न्याहाळला आणि प्रारंभापासून डोळसपणे त्यांनी शांततापूर्ण सह-अस्तित्वाचा पुरस्कार केला.

डॉ. राजेन्द्र प्रसाद यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या व्यक्तित्त्वाविषयी व व्यक्तिमत्वाविषयी काढलेले प्रसंशोद्गार किती अन्वर्थक आहेत ? ' All in all, here is a man the like of whom treads this earth but rarely and only in a crisis. He was born and has lived in a critical period in India's history, and played his part nobly and well.' (A study of Nehru Foreword).भारतीय इतिहासाच्या बिकट कालखंडात पं. जवाहरलाल नेहरू जन्माला आले आणि जगले हे जितके खरे, तितकेच हेही खरे की, दुसऱ्या महायुद्धानंतर जी जागतिक बिकट परिस्थिती निर्माण झाली होती आणि त्याच परिस्थितीत नवोदित स्वतंत्र राष्ट्रांपुढे अस्तित्वाचा जो प्रश्न निर्माण झाला होता त्याची सोडवणूक करण्याकरिता पंचशील व असंलग्नता यांच्या भक्कम आधारावर पं. नेहरू अमेरिकेसारख्या महासत्तेपुढे खंबीरपणे उभे राहिले याची दखल अमेरिकेच्या इतिहासालाही घ्यावी लागेल.

संदर्भ ग्रंथ


१. A study of Nehru : by Rafiq Zakaria (Editor).
२. Select Documents on India's Foreign Policy : by A. Appadorai.
३. Problem of India's Foreign Policy : by Madhu Limaye.
४. Essays on India's Foreign Policy : by Adi H. Doctor.
५. Jawaharlal Nehru and the Indian National Congress : by Alaxander Chicherov.
६. Studies in–Indo-Soviet Reletions : by V. D. Chopra (Editor).
७. आधुनिक भारतीय राज्य-विचार : लेखक, दि. का. गर्दे.
८. आधुनिक भारतातील राजकीय विचार : लेखक, भास्कर लक्ष्मण भोळे.
९. 'सोविएत मित्र' : मासिक, संपादक–सदा कऱ्हाडे (१९७७ ते १९९० या वर्षातील अंक).


□ □ □

# पं. नेहरू आणि रशिया

□ पी. व्ही. अराणके

कामागून एक वर्ष निघून गेली तरी रशियातील प्रत्येक नागरिकाला, एवढेच नाही ; तर गोऱ्यापान लहान बालके व बालिकानांही ' भारत ' हा देश म्हटला की, नेहरूच आठवतात. १९१७ मध्ये रशियात समाजवादाची एक महान क्रांती झाली होती. याच काळात प्राचीन सुवर्णभूमि असलेला भारत हा देशही पारतंत्र्यात, ब्रिटिशांच्या राजवटीखाली होता. भारतीय नागरिकही स्वातंत्र्याची स्वप्ने पहात होते. शांततेची क्रांती व वाटचालही सुरू होती. पं. नेहरू स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान या नात्यानेच रशियन जनता त्यांना ओळखत होती. रशियाच्या महान क्रांतीबद्दल पं. नेहरूंना नितांत आदर होता आणि याच भावनेतून पं. नेहरूंच्याबद्दल रशियन जनतेच्या मनातही मैत्रीचा सद्भाव व आदर होता. त्यामुळेच ते रशियन जनतेचे एक परममित्र होते. नेहरूंच्या नंतर पंतप्रधान इंदिरा गांधीनी भारताच्या राजकीय क्षेत्रात प्रवेश केला तरीही रशियात मात्र पंतप्रधान इंदिरा गांधी असे न संबोधता " नेहरूंची कन्या " असेच संबोधत, याचे कारण म्हणजे नेहरूंनी ' भारत-रशियन ' मैत्रीस अनन्यसाधारण महत्त्व दिले.

सोविएत-रशियाने पुरस्कृत केलेल्या शांतता, निःशस्त्रीकरण, अलिप्ततावाद, समता, विश्वबंधुत्व, अण्वस्त्रविरोध या आंतरराष्ट्रीय शांततेच्या महत्त्वाच्या बाबी पं. नेहरूनीही पुरस्कृत केल्याने रशिया व भारत या दोन देशांच्या राजकीय भूमिकेत साधर्म्य राहिल्याने भारत-रशियन मैत्री अतूट राहिली आहे. त्यातून सोविएत रशियाच्या जनतेने दुसऱ्या महायुध्दाच्या काळात, युद्ध, बॉंबवर्षाव, युद्धाची भीती व सावट, युद्धकैदी, जखमी सैनिकांचा व नागरिकांचा प्रश्न, जीवित व वित्तहानी, तुफानी बॉंबवर्षावाने मोडकळीस आलेली घरे, सारं काही अनुभवल होतं आणि जगाच्या इतिहासात पं. नेहरूंच्या रूपाने एक शांतीदूत अवतरल्यानंतर, साऱ्या रशियन जनतेला ते शांतिदूतच नव्हे तर देवदूतच काय पण शांततेच्या महान क्षेत्रातील एक ' शांततेचा अणुबॉंबच ' समजू लागले. पं. नेहरूंनी एके ठिकाणी म्हटले होते,

" Peace is necessary for all peoples of the world. In contemporary age the only alternative to peace is wiping out of civilisation and human life as such on our planet."

पंडित नेहरूंनी शांतता क्षेत्राच्या वर्तुळाची व्याप्ती अधिक विस्तृत केली. आशिया आणि आफ्रिकेच्या एकतेसाठी त्यांनी अखेरपर्यंत झुंज दिली त्याचे श्रेय म्हणजे बांडुंग येथील जागतिक परिषदेत त्याना जागतिक एकतेचे अध्यक्षपद मिळाले. पं. नेहरूंनी पुरस्कृत केलेला निःशस्त्रीकरणाचा प्रस्ताव जगातील

नव्वद महत्त्वाच्या व इतर देशांनी पुरस्कृत करून कार्यवाहीत आणला आहे. त्यामुळे जगातील कोणत्याही देशाचा नागरिक असो, ज्याला सामाजिक प्रगतिची व युद्धाऐवजी शांततेची कांस आहे ; त्याला पंडित नेहरूंची शांततेची महान तत्त्वे आवडतात. यामुळेच पं. नेहरू, रशियासारख्या महान राष्ट्रातही परिचित आहेत.

दोन शतकापासूनच्या रशियाच्या इतिहासातील नागरी जीवन व युद्ध-घटना आणि राष्ट्रावर आलेली संकटे, अडीअडचणी, तरीसुद्धा रशियाने जी नेत्रदीपक प्रगति करून आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, विज्ञान शिक्षण, आरोग्य व राष्ट्रीय प्रश्न पाहता राखेच्या ढिगाऱ्यातूनच त्यांनी नवरशिया उभारला आणि जुन्या रशियाचे चित्रच बदलून टाकले. हीच अपेक्षा व पूर्ति पं. नेहरूंनी भारतीयांकडून अपेक्षित केली होती. पूर्वेत केलेल्या या रशियाच्या शांततामय प्रगतीने पश्चिमेकडील देशांनाही रशियाने एक आदर्श घालून दिला आणि त्यासाठी या समर्थ राष्ट्राने समानतेसाठी कोणतीही स्पर्धा केली नाही की आशिया खंडाचे नेतृत्व मिळावे यासाठी संघर्ष केला नाही. त्यामुळे प्राचीन महान भारतीय संस्कृतीचा वारसा असलेल्या भारताने व पं. नेहरूंनी सोविएत रशियाचे जगाच्या इतिहासात स्वागतच केले. पंडित नेहरूंनी ' भारताचा शोध ' (Discovery of India ) या ग्रंथात सोविएत रशियाबद्दल म्हटले,

" But most of all we had the example of the Soviet Union which in two brief decades, full of war and civil strife, and in the face of what appeared to be insurmountable difficulties, has made tremendous progress. Some were attracted to Communism, others were not, but all were fascinated by the advance of the Soviet Union in the field of education, culture, health and physical upbringing, as well as in the field of national problem-trmendous and giant efforts aimed at creation of a new world on the ruins of the old one." " If the future is full of hope it is largely because of Russia and what it has done."

ऑक्टोबरच्या महान रशियन क्रांतीने पं नेहरू प्रभावित झाले होते. कम्युनिझम व मार्क्सवाद यांच्याद्वारे प्रवास करून समाजवादाची पायरी नेहरूंनी गाठली. रशियन राज्यक्रांतीनंतर रशियात घडलेल्या घटनांचा प्रदीर्घ परिणाम नेहरूंच्यावर झाला होता. कम्युनिझम, मार्क्सवाद व लेनिन यांच्या प्रभावामुळे नेहरूंच्या मनावर कडवा राष्ट्रवाद विकसित झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सोविएत रशियाच्याबाबत नेहरूंची भावना स्नेहाचीच राहिली. त्यांना सोविएत रशिया अमेरिकेपेक्षा अधिकच जवळचा वाटू लागला. नेहरूंच्या भाषणातही मार्क्सवादाची छाप पडलेली होती.

रशियात राज्यक्रांती झाली. केरेन्स्की व बोल्शेविक यांच्याकडे रशियन राजसत्ता आली. त्यानंतर लेनिन सत्तेवर आले. झारशाहीच्या कालखंडात रशियन जनतेने अमानुष अत्याचार व जुलूम सहन केला. या अत्याचारातून, शिस्तबद्ध लाल क्रांतीद्वारे, या अत्याचारपिडीत जनतेची लेनिन यांनी सुटका केली. त्यामुळे या जुलूमशाहीतून जनतेची सुटका करणारा रशियन क्रांतीचा उद्गाता लेनिन, नेहरूंना अधिक जवळचा वाटू लागला. या काळात रशिया साम्राज्यवादाच्या विरोधात उभा राहिला. रशियन राज्यक्रांतीनंतर लेनिन यांनी रशियाच्या शेजारी चीनच्या प्रदेशात असलेले व झारशाहीत मिळवलेले रशियाचे खास हक्क सोडण्याची घोषणा केली. झार हे साम्राज्यवादी होते आणि लेनिन व रशियन जनता साम्राज्यविरोधी होते. रशियन राज्यक्रांतीनंतर इराण, तुर्कस्तान व चीन या देशाला मिळालेल्या

खास सवलती व विशेष हक्क मिळविले होते ते सर्व साम्राज्यवादी हक्क रशियन क्रांतीनंतर लेनिन यांनी सोडले.

रशियन राज्यक्रांतीनंतर रशियाचा राजदूत इराणमध्ये आला व इराणी जनतेकडे टॅब्रीझ या शहरात, या रशियन राजदूताने इराणी जनतेची क्षमा-याचना मागितली. झारशाहीच्या जुलूम व अत्याचार राजवटीत रशियाकडून जे इराणी नागरिकांवर अत्याचार व अन्याय झाले त्याबाबत रशियन जनतेच्या वतीने या राजदूताने क्षमा मागितली. यामध्ये वांशिक श्रेष्ठत्वाचा अहंकार नव्हता, इतर जनतेविषयी तिरस्कार नव्हता किंवा श्रेष्ठत्वाचाही गर्व नव्हता. नवीन रशिया वांशिक समतेचा पुरस्कर्ता होता व साम्राज्यविरोधी होता. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणाने भारतीय जनतेवरही झारशाहीप्रमाणेच जुलूम व अनन्वित अत्याचार व जालीयनवालाबागसारखी मानवी जीवनाची सामुहिक हत्याकांडे होत होती. ' मारा व झोडा ' ही प्रवृत्ती वाढीस लागली होती. भारतीय जनतेच्या स्वातंत्र्याची गळचेपी चालली होती.

रशियाची आशियातील भूमिका शांततामय-सहजीवनाची, उदारमतवादी व सहानुभूतिची होती. त्यामुळेच नेहरूंना कम्युनिस्ट रशिया हे जगातील सर्वश्रेष्ठ राष्ट्र वाटत होते. शांततेची प्रचिती लेनिन यांनी इराण या देशाला राजदूत पाठवून दिली व इराण, तुर्कस्तान आणि चीन या देशातील झारशाहीच्या साम्राज्यवादाचे खास हक्क व सवलती यावरही पाणी सोडले. या उदाहरणावरून रशिया हे एक ' शांततावादी राष्ट्र ' आहे याची प्रचितीही नेहरूंना रशियाबद्दल वाटली. रशियाचे धोरणही आक्रमक नव्हते. यामुळे जगातील इतर देशांबद्दल विचार करण्याची रशियन पद्धतही नेहरूंना आवडली.

१९२७ मध्ये नेहरूनी रशियाला भेट दिली होती व रशियन राज्यक्रांतीनंतरचे रशियातील जीवन, घटना याच्या समतोल मूल्यमापनातून नेहरूनी मार्क्सवाद, लेनिन व साम्यवादाचा अभ्यास केला व त्यांना मार्क्सवाद आवडला. आपल्या आत्मचरित्रात या आकर्षणाविषयी नेहरूनी म्हटले, " मार्क्स व लेनिनच्या विचारप्रणालींचा माझ्या मनावर परिणाम झाला व या अभ्यासातूनच मला इतिहासाचा नवा अर्थ कळू लागला." मार्क्सवादाच्या शास्त्रशुद्ध पद्धतीने इतिहासाचे विवेचन करण्याची व निर्णय शक्तीची पद्धत नेहरूना आवडली. सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्नाकडे पाहण्याचा शास्त्रशुद्ध व वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांना आवडू लागला व त्यांच्या मार्क्सवादाविषयीच्या आकर्षणाचे कारण ठरला. इतिहासाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन मार्क्स, लेनिनवाद्याशी समविचाराचा होता. याचदृष्टिने ' भारतीय स्वातंत्र्यलढा ' ही एक जागतिक महत्त्वाची घटना त्यांना वाटू लागली. याच दृष्टिकोनातून ' भारतीय स्वातंत्र्यसंग्राम ' हा साम्राज्यविरोधी लढा आहे असे त्याना वाटे.

२७ ऑक्टोबर १९२८ मध्ये उत्तर प्रदेशातील एका सभेच्या अध्यक्षपदावरून बोलताना नेहरू म्हणाले, " भारत हा इंग्लंडचा शत्रू नाही व इंग्लंड हा भारताचा शत्रू नाही . तर भारताचे शत्रुत्व हे साम्राज्यवादाशी आहे. जगाच्या पाठीवर ज्या ज्या राष्ट्रात साम्राज्यवाद आहे ; त्याला आपला विरोध आहे व साम्राज्यवादाच्या विस्ताराखाली भारत हा शांतताप्रिय देश राहू शकत नाही." १९३५ च्या सुमारास समाजवादी व भांडवलशाही या दोन मार्गात ' समाजवादाला 'त्यांनी महत्त्व दिले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपानबरोबर रशियाने तह केला, इंग्लंडवर रशियाने आक्रमण केले व जपान आणि रशियात मैत्रीची वाढ झाली. यामध्ये काही बाबतीत नेहरूना रशियाची धोरणे आवडली नाही. रशियाने जर्मनशी मैत्रीचा करार केला. समाजवादी रशिया व नाझी जर्मनीने एकत्र येऊन पोलंडची वाटणी केली. एकेक लचका तोडला हेही नेहरूंना आवडले नाही. नेहरूनी या मैत्री-कराराबाबत आपले समर्थन करण्याचे

टाळले आहे. कम्युनिस्ट राजवटीत व्यक्ति-स्वातंत्र्याची गळचेपी होते हे त्यांना आवडत नव्हते. व्यक्तिस्वातंत्र्य हाच सर्वंकष निकष असून त्याद्वारेच सर्वांगिण विकास साधता येतो, असे नेहरूंचे मत होते. १९४० नंतर पंडित नेहरू मार्क्सवादापासून दुरावले व त्यांनी राष्ट्रवादाला अधिक महत्त्व दिले. ते स्वतः कम्युनिस्ट नव्हते. भारतात कम्युनिझम रूजू नये असे त्यांना वाटे. त्यांना समाजावाद अभिप्रेत होता. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय प्रश्नावर आकलन करताना त्यावर कार्ल मार्क्स व लेनिन यांच्या चिंतनाची छाप पडलेली होती. नेहरूंनी लोकशाही व समाजवादाचा अविभाज्य संबंध सांगितला आहे. भारतात त्यांनी समाजवादाची इमारत लोकशाही सिद्धांतावर उभारली.

आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांनी अलिप्ततावाद स्वीकारला. लोकशाहीवादी राष्ट्रे कम्युनिझम विरोधात असताना, लोकशाहीवादी राष्ट्रांच्याही बाजूने उभे राहण्यास नेहरूनी नकार दिला. त्यासाठी त्यांनी तटस्थ-राष्ट्रांची फळी उभारली.जगातील कोणत्याही भू-प्रदेशावर त्यांना युद्ध नको होते. नेहरूंच्या अलिप्त व तटस्थता धोरणाची सत्वपरीक्षा कोरियन युद्धात झाली. उत्तर कोरियाला युद्धखोर व आक्रमक ठरवणारा ठराव कम्युनिस्टांना रुचणारा नव्हता पण शांतताप्रिय भारताने त्याला पाठिंबा दर्शविला. दक्षिण कोरियाचा बचाव करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने प्रत्यक्ष हस्तक्षेप करून युद्ध थांबवावे हा ठरावही कम्युनिस्ट राजवटीना न रूचणारा होता. त्यालाही नेहरुनी पाठिंबा दिला आणि प्रत्यक्ष युद्धक्षेत्रातील ३८ अक्षांक्ष पार करून उत्तर कोरियात लष्कर घुसविण्याचा संयुक्त राष्ट्रसंघाने प्रयत्न केला त्यावेळी पं. नेहरूनी त्याला विरोध केला. कारण त्यामुळे आंतरराष्ट्रीय-शांततेला तडा जात होता व त्यातूनच तिसऱ्या महायुद्धाची ठिणगी पडली असती व या ठिणगीतून आगीचा वनवानल भडकून जागतिक-शांतता धोक्यात येणार होती. त्यामुळे ते आक्रमण आहे असे पं. नेहरूनी स्पष्टपणे म्हटले व त्याला सक्रीय विरोधही केला.

अमेरिका व रशिया या दोन समर्थ राष्ट्रांच्या या शीतयुद्धात (Cold-War) युद्धबंदी रेषेवर निरीक्षण व देखरेख करण्यासाठी भारताने आपल्या शांतिसेना व लष्करी फौजा जागतिक-शांततेसाठी कोरियात पाठविल्या. इंडोचायना संघर्षातही कोरियाप्रमाणेच भारताने संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न केला. १९५४ मध्ये ' जिनिव्हा ' परिषदेत शांततामय सहजीवनाचा समझोता घडवून आणणेसाठी नेहरूनी सोविएत रशिया व अमेरिका या दोन महाशक्तीकडे विनंती केली होती. कांगो प्रकरणातही संयुक्त राष्ट्रसंघटनेद्वारे शांततामय मध्यस्तीचा प्रयत्न नेहरूनी केला. कारण युद्धामुळे जगातील कोणतेही जटील प्रश्न सुटत नव्हते. कांगो येथील युद्धक्षेत्रावर संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या विनंतीवरून भारतीय फौजा पाठविल्या होत्या. कोणत्याही राष्ट्रगटात सामील न होता विचार स्वातंत्र्य टिकवून अलिप्त राष्ट्रांचीच संख्या शांततेच्या महान कार्यात नेहरूनी वाढवली. त्यामुळे सोविएत रशिया व अमेरिका ही दोन समर्थ राष्ट्रे भारतास अनुकूल राहिली. जगामध्ये कम्युनिझमचा प्रसार व्हावा किंवा नष्ट व्हावा याबद्दल नेहरूना स्वारस्य नव्हते. सर्वच राष्ट्रांशी त्यांनी मैत्रीचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. यातूनच **नाटो व सीटो** सारख्या करारापासून भारत हा देश अलिप्त व विरोधात उभा राहिला. आशिया खंडात पाश्चिमात्य राष्ट्रांनी कम्युनिझमला विरोध करण्यासाठी जे लष्करी करार व नाटो व सीटो सारख्या संघटना निर्माण केल्या. या मनोवृत्तीतून विकास करण्यापेक्षा विकसित राष्ट्रांनी अविकसित देशांना सर्व क्षेत्रांत सहकार्य केल्यास अण्वस्त्र युगातील आधुनिक प्रगतिचे जग अधिक दूर नव्हते, यावर नेहरूंचा विश्वास होता. लोकशाही विरुद्ध कम्युनिझम या वादाच्या मांडणीविरुद्धच नेहरू होते. कारण त्यांना जागतिक शांतता अभिप्रेत होती. लोकशाही राष्ट्रांनी कम्युनिस्ट राष्ट्रांशी साहचार्याने ' जगा आणि जगू द्या ' या सोविएत रशियाच्या शांततामय सहजीवन पद्धतीने जगावे, यासाठी नेहरूनी पंचशील उधृत केले व त्याला जागतिक मान्यताही मिळाली.

आशियातील सत्तास्पर्धेत दुसऱ्या महायुद्धनंतर अमेरिका व रशिया या दोन राष्ट्रांना अनन्वित महत्त्व प्राप्त झाले. या दोन्ही राष्ट्रांतील मैत्री संबंधात मैत्रीचा समन्वय केंद्रबिंदू पंडित नेहरूनी आपल्या अलिप्ततावादाने व तटस्थेच्या धोरणातून, शांततामय सहजीवन अस्तित्वाच्या भारतीयांच्या क्रियात्मक धोरणाचे नेतृत्व करून केला. स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या त्रिसूत्रीकरणातून अमेरिकन लोकशाहीने जागतिक सत्तास्पर्धेत आपले स्थान अढळ केले; तर रशियाने साम्यवादाचा पुरस्कार करून अमेरिका व रशिया या दोन राष्ट्रांत आशिया खंडाच्या नेतृत्वाची सत्ता-स्पर्धा सुरू झाली होती. भौतिक व वैज्ञानिक क्षेत्रांतही दोन्ही राष्ट्रांत चढाओढ लागली व त्याला विधायक वळण पं. नेहरूनी लावले.

१९५५ मध्ये पं. नेहरूनी रशियाला भेट दिली. ७ जून ते २३ जून १९५५ मध्ये सर्व रशियन जनतेने पंडितजींचे अभूतपूर्व स्वागत केले. या भेटीत नेहरूंच्या कन्या इंदिरा गांधीही होत्या. दिनांक ५ जून रोजी पं. नेहरूनी झेकोस्लाव्हाकियास भेट दिली. ६ जून रोजी राजधानी प्राग येथे व दिनांक ७ जूनला मॉस्को येथे! मॉस्को येथील भेटीचे वेळी मार्शल बुल्गानीन यानी त्यांचे हार्दिक स्वागत केले. मास्को येथील विमानतळावर रशियाचे सर्व प्रमुख अधिकारी व लक्षावधी लाल जनता हजर होती. त्याचबरोबर रस्त्यावर हजारो लहान-लहान रशियन बालक व बालिकाही आपल्या हाती भारतीय राष्ट्रनिशाण व रशियन राष्ट्रनिशाण घेऊन ' भारत-रशियन ' मैत्री चिरायू होवो अशा घोषणा देत होते. रशियन भेटीच्या वेळी पं. नेहरुनी हिंदी वेष परिधान केला होता व आपले भाषणही त्यांनी हिंदीमधूनच केले. भारत म्हणजे शांतता व शांततेचे मूर्त प्रतिक म्हणजे नेहरू. या रशियन भेटीने सर्व रशियन व भारत मैत्रीबद्दल अतूट भाव निर्माण झाला. लेनिनग्राड व मॉस्को या रशियाच्या प्रमुख शहरात भारताच्या प्रगतिबाबतची प्रदर्शने उघडली गेली होती. रशियाच्या सर्व प्रमुख शहरात हिंदी चित्रपटही दाखविले जात होते. आल्टा, लेनिनग्राड या प्रमुख शहरांना भेटीचे वेळी कामगारांची शिस्तबद्धता, रशियन लाल जनतेचे आपल्या राष्ट्रावरील नितांत दृढ निष्ठा व औद्योगिक प्रगती, वैज्ञानिक संशोधन यामुळे पंडितजी भारावून गेले होते.

रशियन भौतिक समृद्धीचा आपल्या देशाला उपयोग व्हावा. दोनही देशांत आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक व औद्योगिक देवाणघेवाण व्हावी हा उद्देश होता. आशिया खंडात रशियाने अमेरिकेप्रमाणेच एक समर्थ राष्ट्र म्हणून प्रगती केली होती. त्यामुळे जागतिक शांतता निर्मितीच्या कार्यात पं. नेहरूंना रशियन मैत्रीच्या सहकार्याचा हात आवश्यक होता. त्यामुळे युद्ध-विरोधाच्या क्षेत्राची व्याप्ती वाढविता येणार होती आणि उदयोन्मुख ; नवीन स्वतंत्र झालेल्या देशांना आपली प्रगती करून घेता आली असती व प्रगतीची समर्थ स्पर्धा करता आली असती. रशियातील सामुदायिक शेतीच्या प्रगतीनेही नेहरूच काय पण सर्व जग भारावून गेले होते. आपल्या रशियन भेटीत पं. नेहरूनी अणुशक्तीचे कारखाने, विमान, पोलाद व मोटारीचे कारखाने तसेच तेथील सांस्कृतिक केंद्रानाही भेटी दिल्या. मॉस्को विद्यापीठाने पंडित नेहरुना ' डॉक्टर ऑफ सायन्स ' ही पदवी बहाल केली.

आपल्या रशियन भेटीत पं. नेहरुना सर्वात महत्त्वाचे शहर आवडले, ते म्हणजे स्टॅलिनग्राड, ॲडाल्फ हिटलरचा उदय झाला आणि त्याने सर्व जग पादाक्रांत करायला सुरुवात केली.आपल्या नाझी जर्मनीच्या जर्मन सैनिकांच्या झंझावाती व कणखर लढाऊ युद्धनीतीने सर्व जगच स्तिमित केले. जर्मनीच्या लढाऊ पँझर तुकड्यानी रशिया गिळंकृत करण्यास सुरुवात केली. १९४२ साली जर्मनानी स्टॅलिनग्राडला ६६ दिवसांचा वेढा दिला होता आणि या ६६ दिवसांच्या काळात रशियन सैनिकांनी व नागरिकांनी या जर्मन सेनेशी अतुलनीय शौर्य दाखवून जर्मन सैनिकांचा वेढा उठविण्यात यश मिळवले होते. स्टॅलिनग्राडमधील लहान-लहान मुले-मुली व महिला आणि नागरिक यांनीही

आपल्या शहराचे संरक्षण करण्यासाठी ' जिंकू किंवा मरू ' पण अखेरच्या श्वासापर्यंत शत्रूला आमच्या भूप्रदेशात पायही रोवू देणार नाही ; या ज्वलंत राष्ट्रभावनेतून संरक्षक खंदक तयार करण्यासाठी रात्रीचा ; दिवस केला. आपल्या भूप्रदेशाचे संरक्षण करण्यासाठी काही महिला, तर काही लहान मुलामुलींना आपल्या जीवाचे बलिदानही करावे लागले. या अतुलनीय शौर्यगाथेची पंडित नेहरूनी स्तुती व गौरवही केला यावेळी भारतीय स्वातंत्र्य सैनिकांची आठवण त्यांच्या मनाला स्पर्श करून गेली.

यानंतर नेहरूनी रशियातील समरकंद या शहराला भेट दिली. **' दि रशियन '** व **' प्रावदा '** या महत्त्वाच्या वृत्तपत्रांत पं. नेहरूंच्या भाषणांचे वृत्तांत व छायाचित्रे प्रसिद्ध झाली. रशियाचा ऐतिहासिक क्रेमलिन राजवाडा येथे त्यांचे भाषण झाले. आपल्या भाषणात नेहरूनी '' रशियाला शांतता हवी आहे '' या वाक्याचा उद्‌घोष करताच सारे रशियन प्रमुख नेते व जनता याना अपेक्षापूर्तीचे समाधान वाटले.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष मार्शल बुल्गानिन यानी आपल्या भाषणात भारतीय प्राचीन संस्कृति व नेहरूनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्य व शांततेसाठी जो अभूतपूर्व लढा दिला त्याची प्रशंसा केली. जगाच्या क्षितिजावर भारत स्वतंत्र झाल्यानंतर जागतिक राजकारणात पं. नेहरू विशेष भाग घेत आहेत याचा प्रकर्षाने उल्लेख केला. इंडोचीन व कोरिया यामधील युद्धसंघर्ष थांबविण्याचे श्रेय त्यांनी चीन, भारत व रशिया याना दिले. मात्र पं. नेहरूनी रशियन सरकारचा हा संघर्ष थांबविण्याचे श्रेय राष्ट्राध्यक्ष मार्शल बुल्गानिन यांना दिले. पं. नेहरूनी रशियाच्या या जागतिक व्यासपीठावर उद्‌घोषित केले की, '' आशिया खंडाच्या सत्तास्पर्धेत समर्थ राष्ट्रांनासुद्धा जागतिक पातळीवर शांतता आवश्यक आहे.'' त्यासाठी शांततेची प्रत्यक्ष कृती नेहरूनी अपेक्षित केली. याउलट युद्धसंघर्ष वाढावा, याकडेच अनेक राष्ट्रांचा कल असतो हे त्यानी नमूद केले.

रशियन जनतेचे व सरकारचे ; त्यांनी इंडोचीन व कोरिया येथील युद्धसंघर्ष थांबविल्याबद्दल रशियाच्या शांततापूर्ण सहजीवन अस्तित्वाच्या कृतीबद्दल नेहरूनी अभिनंदन केले. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर तिसऱ्या महायुद्धाला सुरुवात होऊ नये यासाठी परस्पर देशांमध्ये द्वेष व भय नष्ट होण्यासाठी युद्ध ही संकल्पनाच, रानटीपणाची भावना संपुष्टात येणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. आंतरराष्ट्रीय राजकारणात पं. नेहरूनी '' पंचशील '' तत्त्वे उद्‌घोषित केली. आजचा इतिहास पाहिला तरीही ' पंचशील 'तत्त्वे उपयुक्त वाटतात. इराण-इराक व अमेरिका युद्धसंघर्षात, एकूण एक लाख ऐंशी हजार सैनिक, नागरिक, महिला आणि मुले-मुली मृत्यूमुखी पडली. त्यातील काही जण अधू, अपंग झाले तर काहीजण कधीच बरे होणार नाहीत. या युद्धामुळे जागतिक पर्यावरणातही दोष निर्माण झाले. काही देशात तर काळा पाऊस पडल्याच्या घटना घडल्या. लहान-लहान मुला-मुलींत आजार पसरले. युद्धामुळे मात्र कोणतेही जटील प्रश्न सुटले गेले नाही. इराकमध्ये तेलाच्या विहिरीनांही आगी लावण्यात आल्या तर तेलाचे साठे समुद्रात टाकले गेले. जीवित व वित्तहानी मात्र झाली.

(१) प्रत्येक देशाला स्वायत्तता व स्वातंत्र्य असावे, (२) प्रत्येक देशाने परस्पर देशांचे सार्वभौमत्व मान्य करावे, (३) समानतेच्या भूमिकेतून कोणत्याही देशावर आक्रमण न करता परस्पर देशांचा मान व प्रतिष्ठा राखावी, (४) कोणत्याही देशाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे, (५) शांततापूर्ण सहजीवन अस्तित्व (Peaceful Co-Existence) पद्धत स्वीकारणे व प्रत्यक्ष कृतीत आणणे. या पंचशील तत्त्वांचा पुरस्कार पंडित नेहरूनी शांततामय सहजीवन अस्तित्वाच्या तत्त्वातून केला आणि त्याला ब्रम्हदेश, चीन आणि झेकोस्लाव्हिया या देशांनी मान्यता दिली होती.

आपल्या या शाततेच्या मोहिमेत पं. नेहरूनी रशियासारख्या समर्थ राष्ट्रालाही सहभागी करून घेतले व रशियन जनतेने व सरकारने, इंडोचीन व कोरिया या युद्धातील रक्तपाती संघर्ष थांबविण्यासाठी प्रत्यक्ष कृतीत पंचशील तत्त्वांचे अनुसरण केल्याने व जागतिक शांततेत अधिक भर पडल्याने नेहरूना रशिया अधिक जवळचा वाटू लागला व रशियन जनता व सरकार यांना नेहरू म्हणजे भारत व भारत म्हणजेच नेहरू अधिक जवळचे वाटू लागले. २२ जून १९५५ मध्ये रशियाचे राष्ट्राध्यक्ष मार्शल बुल्गानिन व भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांनी एक संयुक्त-पत्रक प्रसिद्ध केले. यामध्ये प्रामुख्याने जागतिक-शांतता व पंचशील तत्त्वांचा पुरस्कार केला होता. सोवियत-रशिया व भारत यामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व औद्यौगिक व विज्ञान या क्षेत्रांत सहकार्य वाढीस लागावे. बांडुंग-परिषदेच्या निर्णयाला संमती देण्यात यावी. चीनला फोर्मोसाचा ताबा मिळणे व यूनो या संयुक्त राष्ट्रसंघटनेत प्रजासत्ताक चीनला प्रतिनिधीत्व मिळावे. अण्वस्त्र-शक्तीचे उत्पादन-प्रयोग व वापर यावर बंदी व त्याची तपासणी आणि शांततेची कार्यवाही करावी. याशिवाय कम्युनिस्ट देशांनी इतर देशांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करू नये यासही यामध्ये मान्यता देण्यात आली. रशियाने निशस्त्रीकरणाची योजना मांडली होती व प्रत्यक्ष कार्यवाहीही अंमलात आणली होती. रशियन समाजवादाने तेथील किसान व कामगारांनी सर्वच क्षेत्रात प्रगती करून जागतिक-स्पर्धेत एक समर्थ राष्ट्र म्हणून मान्यता मिळवली होती. राष्ट्रीयीकरणातून रशियाने प्रगतिच्या-स्पर्धेत यश मिळवले होते. ,

नोव्हेंबर १९२७ मध्ये सोविएत रशियाचा क्रांतीदिन, दहावा वाढदिवस साजरा झाला त्यावेळी पं. नेहरू, त्यांच्या भगिनी कृष्णा हाथीसिंग व मोतीलाल यांनी मॉस्कोला भेट दिली होती. मॉस्को-दर्शनाविषयी नेहरूनी विजयालक्ष्मी पंडित यांना, १० नोव्हेंबर १९२७ रोजी एक पत्र पाठवले होते ; त्यात त्यांनी रशियन समानतेचा व ज्वलंत राष्ट्राभिमानाचा, राष्ट्रीयीकरणाचा व साम्यवादाचा प्रामुख्याने उल्लेख केला होता.

याद्वारेच रशियाने एक समर्थ राष्ट्र म्हणून जे यश मिळवले त्याचा उल्लेख केला होता. रशियातील क्रेमलिन या प्रमुख शहरात येशू व कुमारी मेरीचे चर्च आहे. तिथे रशियन क्रांतीचे उद्‌गाते कार्ल मार्क्स यांचे एक वाक्य कोरून ठेवले, '' धर्म ही जनतेची अफूची गोळी आहे.'' आणि हे वाक्य पंडित नेहरूना अतिशय आवडले होते. यातूनच भारतात निधर्मी राजकारण पद्धती अमलात आणली गेली. राष्ट्र या संकल्पनेतून आजच्या परिस्थितीत भारतीय पद्धतीकडे अवलोकन केले असता, आज भारतात अयोध्येचा श्रीरामजन्मभूमिवरून व बाबरी मस्‌जिदचा धार्मिक प्रश्न, तेढ व श्रीरामाचे मंदिर यातून भारताची राष्ट्रीय संकल्पनाच नष्ट होत आहे का ; असा प्रश्न मनाला स्पर्शून जातो पण पं.नेहरूना रशियातील कार्ल मार्क्सचे वाक्य आवडले होते, '' धर्म ही जनतेची अफूची गोळी आहे.'' रशियातील ' राष्ट्र ' ही संकल्पनाच अधिक महत्त्वाची वाटते.

पंडित नेहरूंनी भारतीय राजकारणात धर्म-निरपेक्ष लोकशाहीचा पाया भारतात रुजविला. जग दोन गटांमध्ये विभागले होते, एक गट हुकूमशाही व साम्राज्यवादी गटाचा होता तर दुसरा राष्ट्रवादी व समाजवादी गटांचा, यातूनच आशिया खंडाच्या नेतृत्वस्पर्धेसाठी अमेरिका व रशिया या दोन राष्ट्रांत स्पर्धा सुरू झाली होती. हुकूमशाही व साम्राज्यशाही ही दोनही भांडवलशाहीची स्वरूपे असल्याने यातूनच राष्ट्रवाद व समाजवादाचा उदय झाला होता. समाजवादाशिवाय आर्थिक, सामाजिक, विज्ञान व औद्योगिक, सांस्कृतिक व शेती या क्षेत्रांत भारताचा विकास होणार नाही. त्यासाठी जमीन व कारखानदार व संस्थानिकांची सरंजामशाही व भांडवलशाही नष्ट करण्यासाठी खाजगी मालमत्तेवर निर्बंध व नफेबाजी नष्ट करून भारतात सहकाराचा पुरस्कार, ' बिना सहकार नही उद्धार ' केला.

रशियातील या नवीन संस्कृतिचा व या नवीन क्रांतीचे आकर्षण, नवीन समाजरचनेचे आकर्षण पं. नेहरूना वाटले.

भांडवलशाहीने निर्माण झालेल्या संघर्षांना व युद्धावर नियंत्रण ठेवण्याची अमर्याद शक्ती समाजवादात असल्याने एक अर्थशास्त्रीय तत्त्व नेहरूनी मान्य केले. आर्थिक व सामाजिक क्रांतीसाठी राजकीय स्वातंत्र्य त्यांना अपेक्षित होते व काँग्रेस ही एक समाजवादी संस्था बनावी यासाठी त्यांचा प्रयत्न होता. काँग्रेसने समाजवादाचा पुरस्कार करून नवीन संस्कृतिसाठी संघर्ष करणाऱ्या जगातील इतर शक्तीशी सहकार्य करावे ; या भावनेतूनच नेहरूना सोविएत रशिया अधिक जवळचा वाटू लागला. यातून नेहरूनी स्वीकारलेल्या समाजवादातून किसान व कामगार वर्ग भारतात आर्थिक सुबत्ता निर्माण करील यावर त्यांचा विश्वास होता.

१९१७ मध्ये रशियात पहिली कामगार क्रांती झाली. रशियन जनतेने प्रात्यक्षिक जीवनात समाजवाद अमलात आणला. समाजवादी समाज, राजवट, समाजसत्तावादी राजवट व अर्थव्यवस्था मानवी व नागरीक हक्क, बेकारी-रोजगार, नफा-उत्पादन-युद्ध व शांतता, स्त्री-मुक्ती, कला व क्रीडा, शिक्षण-आरोग्य व राजकीय सर्वच क्षेत्रात त्याचे महत्त्व जाणवू लागले.

सोविएत रशियाने ' समाजवादाचा ' पुरस्कार करून जगात अग्रेसर स्थान मिळवले, रूमानिया, पोलंड, हंगेरी, झेकोस्लोवाकिया, पूर्व-जर्मनी, उत्तर कोरिया, चीन, क्यूबा, व्हिएतमान, बल्गेरिया व युगोस्लाव्हिया हा समाजवादी राष्ट्रांचा मोठा गट आहे. जगातील ३७ टक्के लोकांनी शास्त्रीय समाजवादाचा, समाजसत्तावादी अर्थरचनेचा स्वीकार केला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर नवस्वतंत्र देशांचे तिसरे जग निर्माण झाले आहे. भारतात काँग्रेसमध्ये पंडित नेहरू व सुभाषचंद्र बोस स्वतःला समाजवादी मानत. काँग्रेसमध्ये समाजवादाचा अभाव असल्याची खंत पं. नेहरूना होती. नाझी जर्मनी ॲडाल्फ हिटलरच्या लढाऊ पँझर लष्करी फौजा, एकामागून एक देश पादाक्रांत करत वाटचाल करीत होते. सोव्हिएत युनियन हे एकच राष्ट्र त्यावेळी प्रगतीपथावर होते. पश्चिम युरोपमधील झेक, पोलंड इत्यादी देश हिटलरने पादाक्रांत केले होते नाझी भस्मासूर ॲडाल्फ हिटलरने सोविएत रशियावर हल्ला करावा व युद्धात रशियाही हरला जावा यासाठी साम्राज्यवादी राष्ट्रे प्रयत्नशील होती. या कालखंडात स्पेनमध्ये यादवी युद्धाला सुरुवात झाली होती. स्पेनमधील फॅसिस्ट हुकुमशहा फ्रँको याच्या विरोधात लढण्यासाठी व तेथील फॅसिझम विरोधी शक्तीना सहकार्य करण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय संरक्षण फळी सोविएत रशियाच्या मदतीने गेली होती. त्यामध्ये भारताचाही समावेश होता. कम्युनिस्टांच्या सहकार्याने व पं. नेहरूंच्या पुढाकाराने १९३८ मध्ये डॉ. कोटणीस यांच्या नेतृत्वाखाली चीनला एक वैद्यकीय मदत पथकही गेले होते. सर्व जगावर युद्धाचे ढग जमू लागले होते. या इतिहासाच्या घटना पाहिल्या असता, पं. नेहरूंचे धोरण रशियाच्या बाजूने झुकत होते. सोविएत रशिया व भारत साम्राज्यवादाच्या विरोधात उभे राहिले.

भारताने लॅटिन, अमेरिका, आशिया, कॅरेबियन्स व आफ्रिका या ठिकाणच्या साम्राज्यविरोधी लढ्यांना पाठिंबा दिला व यातूनच सोव्हिएट-रशिया व इतर समाजवादी देश यांचेशी भारताचे मैत्रीचे संबंध निर्माण झाले. दक्षिण आफ्रिका, नामिबीया व पॅलेस्टाईन येथील लढ्यांनाही पं. नेहरूनी पाठिंबा दिला. जगातील साम्राज्यवाद्यांचा गट सोडला तर इतर जगात नेहरूनी आपल्या परराष्ट्रीय धोरणातून भारताला सर्वश्रेष्ठत्त्वच मिळवून दिलेले आहे आणि भारतातही कम्युनिस्टांचा पं. नेहरूंच्या या धोरणास सक्रिय पाठिंबा मिळत गेला. सोव्हिएट रशियाशी भारताने मैत्रीचे, परस्पर सहकार्याचे व व्यापाराचे करार केले.

आज तिसऱ्या जगात पं. नेहरूंच्या सोव्हिएट रशियाच्या मैत्रीमुळे भारत हा देशही प्रगतीपथावर आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचे नियोजन व नियंत्रण यासाठी नियोजनमंडळाची स्थापना करून पंचवार्षिक योजनेद्वारे पं. नेहरूनी समाजवादातून प्रगतीचे एक पाऊल पुढे टाकले.

७ जून ते २३ जून १९५५ च्या आपल्या रशियन भेटीत पं. नेहरूनी दहा हजार मैलांचा प्रवास केला. रशियातील १४ प्रमुख शहरांना भेटी दिल्या ५ शेतकी संस्था, ११ औद्योगिक कारखाने व विविध सांस्कृतिक केंद्रांना भेटी दिल्या. २१ जून १९५५ मध्ये मॉस्को येथील डायनामो स्टेडियमवर भारत-सोव्हिएट मैत्रीबद्दल केलेल्या भाषणात ; नेहरूनी रशियन जनता व सरकार यांच्या शांततेच्या व सहजीवन अस्तित्वाच्या जीवन पद्धतीची प्रशंसा केली. २३ जून १९५५ रोजी सोव्हिएट रशिया सोडताना आपल्या निरोपाच्या भाषणात पंडित नेहरू म्हणाले, " मी नवक्रांतीचा सोव्हिएत रशिया सोडताना अधिक श्रीमंत झालो व अधिक गरीबही झालो, मी अधिक श्रीमंत झालो कारण आपल्या मैत्रीच्या व रशियन जनतेने व त्याहीपेक्षा निरागस लहान बालक-बालिकांच्या हार्दिक स्वागताच्या अमर्यादित सौंदर्याच्या सुंदर आठवणी माझ्या स्मृतिमंजूषेत साठवून घेऊन जात आहे ज्यामुळे मी अधिकच गरीब झालो आहे आणि त्यासाठी मी माझ्या हृदयाचा एक कप्पा मी तुम्हा सर्व रशियन बांधवांच्या जवळ ठेवून जात आहे.

सोव्हिएट रशियाचे राष्ट्राध्यक्ष मार्शल बुल्गानिन व कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी निकीता क्रुश्चेव्ह यांनी, १८ नोव्हेंबर १९५५ मध्ये भारत या शांतताप्रिय देशाला तीन आठवड्यांची भेट दिली होती. त्यावेळी दिल्ली येथे त्यांच्या स्वागताप्रसंगी पंडित नेहरू म्हणाले, " प्राचीन भारत हा भगवान बुद्ध, सम्राट अशोकाच्या काळापासून शांतताप्रिय देश होता. त्याचा महान वारसा आम्हा भारतीयांनाही तसाच पुढे चालू ठेवायचा आहे. भारतीय स्वातंत्र्यही जगातील इतर रक्तरंजित क्रांत्यापेक्षा भारताने अहिंसात्मक व सत्याग्रहाद्वारे महात्मा गांधींच्या मार्गदर्शनाखाली मिळवले आहे. भौतिक समृद्धीच्या अण्वस्त्र शोधामुळे युद्ध म्हटले की सर्वनाशच . त्यासाठी जगातील सर्वच राष्ट्रांना शांतता आवश्यक आहे. शांततेसाठी संघर्ष करणाऱ्यांचे आम्ही कॉम्रेडच आहोत ! " यामुळे रशियाचे राष्ट्राध्यक्ष मार्शल बुल्गानिन व निकीता क्रुश्चेव्ह दोघेही भारावून गेले. जागतिक शांततेच्या महान कार्यात भारताची मैत्री अत्यावश्यक आहे. याचे महत्त्व मार्शल बुल्गानिन व निकीता क्रुश्चेव्ह या दोन रशियन नेत्यांनी मान्य केले. भारताच्या भूप्रदेश गोलावर पोर्तुगाल या देशाने आपला हक्क दर्शविला होता. त्याबद्दल सोव्हिएट रशियाचे राष्ट्राध्यक्ष मार्शल बुल्गानिन व निकीता क्रुश्चेव्ह यांनी त्याला कडकडून विरोध केला होता व सर्व रशियन जनतेच्यावतीनेही नापसंती दर्शविली होती. सोव्हिएट रशियाच्या या दोन महान नेत्यांनी इतर राष्ट्रे याबाबत अलिप्त का राहत आहेत याबद्दल सखेद आश्चर्य व्यक्त केले. त्यामुळे सर्व भारतीयांना सोव्हिएट रशिया व सोव्हिएट नेते अधिक जवळचेच नाही ; तर आपल्याच घरातील एक वाटू लागले.

आजच्या आधुनिक प्रगतिच्या विज्ञाननिष्ठ अणुयुगात, शांततामय सहजीवन आणि शांतता व मानवतावाद वादळात सापडलेल्या जहाजांना ज्याप्रमाणे दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतो, त्याप्रमाणे युद्ध आणि शांतता यातील जमीन अस्मानाचा फरक, यातही मार्गदर्शक ठरतो. हिरोशिमा व नागासकी या मोठ्या आधुनिकीकरणाने विकसित असलेल्या शहरावर अणुबॉंबच्या हल्ल्याने झालेला सर्वनाश पहिले व दुसरे महायुद्ध; तर सध्याचे इराण-इराक युद्ध की ज्यामध्ये एक लाख ऐंशी हजाराच्यावर जनसंख्या नष्ट झाली तर रक्तरंजित टोकाच्या मार्क्सवादाचा वर्गसंघर्ष व लेनिन आणि कार्ल मार्क्स यांचे लढे व संघर्ष याचा इतिहास पाहता, एकतर अणुयुगाने सर्व जगाचा विनाश तरी एका सेकंदाच्या अंतरावर उभा आहे. नाहीतर या पृथ्वीचे, या भूगोलाचे संरक्षण व समृद्धी यासाठी शांततामय

सहजीवन जागतिक पातळीवर कार्यवाहीत आणणे जरूरीचे आहे. त्यासाठी संपूर्णपणे निशःस्त्रीकरणाची आवश्यकता आहे.

संसदीय लोकशाहीच्या समाजवादाचा अभिनव पुरस्कार करून पंचवार्षिक योजनांद्वारे सहकारी समाजनिर्मितीचे प्रत्यक्ष स्वप्न पं. नेहरूनी भारतात आकारास आणले. त्यामध्ये आधुनिक जगातील मार्क्सवाद कार्यवाहीत आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. एका अर्थाने साम्यवादी हुकूमशाही तर दुसऱ्या अर्थाने भांडवलशाही, लोकशाही, कार्ल मार्क्सचे विचार बुद्धिप्रामाण्याच्या तत्त्वावर व काळाच्या कसोटीवर घासले गेले होते. नेहरूंच्या आधुनिक विचारसरणीवरही कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला होता. सामूहिक-सहजीवनाचे आधुनिक प्रकार आजच्या भौतिक जगात अधिक उपयुक्त आहेत. अण्वस्त्र निर्मिती आणि त्याचा वापर अंतरिक्ष-संशोधन, विज्ञान व तंत्रविज्ञान प्रगती, नवीन आधुनिक युगाचे शोध नवयांत्रिक मानवाला आकर्षित करत आहेत. या दृष्टिकोनातून कार्ल-मार्क्सचा आधुनिक अर्थशास्त्राचा विचार नेहरूंना आकर्षित वाटला. आर्थिक व राजकीय सत्तेचे न्याय व सर्वांना समान वाटप, वर्गविहीन समाज पंडित नेहरूना भारतात निर्माण करावयाचा होता. सर्वांना समान संधी देणारी समाजवादी विचारसरणी भारतीयांच्या मनावर खोलवर रूजवायची होती. त्यासाठी त्यांना शांततामय लोकशाही मार्गाची घडण अभिप्रेत होती. सोव्हिएट रशियाने आपली अर्थव्यवस्था स्वयंविकासी योजनाद्वारे शेती व तंत्रविज्ञान सर्वच क्षेत्रांत राबवून सर्व जगातही सामर्थ्य मिळवले होते.

स्वातंत्र्यानंतर भारत हा देश अविकसित होता. शिखर परिषदेत पं. नेहरूनी शांततामय सहजीवनाचे आधुनिक तत्त्व, अण्वस्त्र प्रसार बंदी व संपूर्णपणे निःशस्त्रीकरण व आर्थिक सहजीवनाने भारतीयांची प्रगती याद्वारे प्रयत्न करून भारताचे श्रेष्ठ नेतृत्व सिद्ध केले. एवढेच नाहीतर अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष आयझेनहॉवर व रशियाचे राष्ट्रध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह यांच्यातील शीतयुद्धाचे प्रश्न सोडविण्यास भारताने श्रेष्ठत्व घेतले. रशिया व अमेरिका ह्या दोन समर्थ राष्ट्रांचा आर्थिक व राजकीय सहजीवनाचा उपयोग भारतासारख्या अविकसित देशाला करून दिला. रशिया व अमेरिका ही दोन्ही शीतयुद्धाची राष्ट्रे, भारताची मित्र राष्ट्रे झाली.

संयुक्त राष्ट्रसंघटनेतही नेहरूनी लष्करी शस्त्रसामर्थ्य व अण्वस्त्रवाढ यावर आर्थिक खर्च अधिक करण्यापेक्षा, जगातील नवीन स्वतंत्र होणाऱ्या देशांना सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत जागतिक उत्पादनाचा योग्य उपयोग व्हावा व समान वाटणी व्हावी याचे प्रतिपादन केले. या अण्वस्त्रयुगात तर आता युद्ध म्हणजे मानवीजीवनाचा सामूहिकपणे संपूर्ण विनाशच हे गणित कधीही चुकणार नाही. दोन अधिक दोन पाच कधीच होणार नाहीत; चारच राहणार. यासाठी स्वतंत्र भारताच्या इतिहासात, तटस्थता व शांततामय सहजीवन यावर आधारित नेहरूनी आपले परराष्ट्रीय धोरण ठेवल्याने, रशिया व अमेरिका यांची मैत्री भारताला चिरकाल उपयोगी ठरली आहे. शांततामय सहजीवनाच्या धोरणातूनच भारताने चीन व पाकिस्तान या दोन शेजारी देशांशी संबंध ठेवले होते. परंतु नेहरूंच्या या शांततेच्या महान वर्तुळाचा छेद चिनी आक्रमणाने केला व पाकिस्तानने काश्मीर प्रश्नावरूनही भारताशी युद्ध केल्याने आणखी एक छेद केला. चीनने पण पंचशील तत्त्वांचा पुरस्कार केला होता. भारतावरील आक्रमणाने मात्र चीनने स्वीकारलेल्या पंचशील तत्त्वानाच प्रत्यक्ष कार्यवाहीत सुरूंग लावला गेला. राजीव गांधी पंतप्रधान असताना भारत-चीन हितसंबंधाना नवीन दिशा मिळाली. पंतप्रधान राजीव गांधी यांनी चीन या देशाला सदिच्छा भेट दिली होती व भविष्य काळात भारत-चीन हितसंबंधात पंचशील या उदात्त तत्त्वांचे अनुसरण होईल.

आशिया खंडाच्या नेतृत्वस्पर्धेत रशिया व अमेरिका या दोन समर्थ राष्ट्रांपासून अलिप्त राहून, आफ्रिका व आशिया खंडातील स्वातंत्र्य-लढ्यांना भारताने विधायक पाठिंबा दिला; एवढेच नाही तर वंशभेदानाही विरोध केला होता. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयझेनहॉवर व रशियाचे राष्ट्राध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह याना शांततामय सहजीवनाच्या संदर्भात विचार करायला व प्रत्यक्ष कृती करायला पंडित नेहरूनी आपल्या वैयक्तिक प्रयत्नानी उद्युक्त केले होते व नेहरूंच्या या आंतरराष्ट्रीय शांततेच्या महान कार्यातील संदर्भात निकिता क्रुश्चेव व आयझेनहॉवर यानी शिखर-परिषदेचे नेतृत्व पंडित नेहरूनाच दिले. त्यातूनच अमेरिका व रशिया या दोन महान राष्ट्रांतील आणीबाणी, शीतयुद्धाचा तणाव कमी होण्यास मदत झाली. दक्षिण आशिया व अतिपूर्व व पश्चिम आशियाच्या मध्यभागी भारत हा देश असल्याने आंतरराष्ट्रीय शांततेची जबाबदारी शिखर परिषदेद्वारे पं. नेहरूनी स्वीकारली.

युद्धामुळे व संघर्षाने कोणत्याही राष्ट्रगटाला कोणताही फायदा होणार नव्हता. त्यासाठी प्रत्येक मानवी मनातून युद्ध ही कल्पनाच नष्ट करण्याचा प्रयत्न नेहरूनी केला. शीतयुद्ध व युद्धाच्या धमक्या व युद्धखोर पवित्रेही नष्ट करणे आवश्यक होते. इतरांच्या मतांचाही आदर करणे जरूरीचे होते. कोणत्याही देशाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याचे टाळणे महत्त्वाचे होते व त्याऐवजी " जगा आणि जगू द्या ! " या सहजीवनाची सहिष्णुता नेहरूनी वाढीस लावली. याचा परिणाम म्हणजे ' यूनो ' या आंतरराष्ट्रीय राष्ट्रसंघटनेत अमेरिका व रशिया ही दोन समर्थ राष्ट्रे अण्वस्त्रबंदी व निःशस्त्रीकरण यासाठी एकत्र आली व त्यांनी नेहरूंनी मार्गदर्शन केलेला मार्गाचा अवलंब केला. नेहरूंनी युद्धातील प्रश्न सोडविण्यासाठी शांततामय वाटाघाटीचा मार्ग सुचवला. त्यासाठी प्रथम युद्धबंदी व सहजीवनातून शांततामय वातावरण निर्माण करायचे यासाठी त्यानी विरोधी राष्ट्रगटांमध्ये रशिया व अमेरिकेसारख्या राष्ट्रांत शांततेचे पूल बांधले व आंतरराष्ट्रीय शांततेचे क्षेत्र अमर्यादितपणे वाढवले.

" पंडित नेहरू आणि रशिया " या संदर्भात जागतिक शांततेच्या क्षेत्रात नेहरूंनी महत्त्वाची कामगिरी केली आहे. ते निकिता क्रुश्चेव्ह यांचे पुरस्कर्ते होते तर कम्युनिस्ट जगात स्टॅलिन विरोधी गटांचे होते. नेहरूनी लाल कम्युनिस्टांना आपला शिस्तबद्ध साचेबंदपणा सोडून अधिक सौम्य, अधिक स्वतंत्र व विमुक्त व्हायला लावणारे नेहरू ; शांततेचे महान प्रतिक व जगातील एक शांतिदूत होते. सोव्हिएट रशियाचे राष्ट्राध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह यांनी भारताला भेट दिली होती. त्यावेळी भारतासारख्या लोकशाही प्रधान समाजवादाच्या रचनेतही, कम्युनिस्ट बाह्य जगातही आपले सहर्ष स्वागत करणारे व सहकार्य करणारे देश आहेत याचीही खोलवर जाणीव रशियाचे राष्ट्राध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह यांना झाली. भारताने तटस्थता व अलिप्तता धोरण स्वीकारल्याने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयझेनहॉवर यांनी भारताला भेट दिली तरी त्यांनाही असेच अनुभव आले की भारतीयांना अमेरिकेविषयीही स्नेहभावना आहे. पंडित नेहरूनी अमेरिका व रशिया या दोन समर्थ राष्ट्रांत शांततेच्या स्नेहभावनेचा पूल निर्माण केला.

युद्ध संघर्षात लष्कराचा वापर करण्याच्या ' नाटो ' The North Atlantic Trity Organisation सारख्या राष्ट्रांना नेहरूनी विरोध केला. इतर राष्ट्रांच्या सीमामध्ये लष्करी तळ व अण्वस्त्र तळ उभारणाऱ्या राष्ट्रांनाही त्यांनी विरोध केला. त्यांनी वसाहतवादाला विरोध केल्याने फ्रान्स, इंग्लंड, हॉलंड व ब्रिटन या युरोपीयन देशांचा विरोधही पत्करावा लागला. काश्मीर प्रश्नात अमेरिकेने पाकिस्तानला लष्करी सहकार्य, साहित्य, शस्त्रास्त्रे, लढाऊ विमाने, तोफा व तंत्रज्ञान दिल्याने भारताची शांतता अधिक धोक्यात आली. याउलट काश्मीर प्रश्नात सोव्हिएट रशियाने आंतरराष्ट्रीय तणाव कमी करण्यासाठी काश्मीर व इतर प्रश्नावर नवभारताच्या शांततावादी धोरणाना सक्रिय पाठिंबाच दिला. त्यामुळे भारत सोविएत युनियनची मैत्री चिरकाल राहिली आहे व चिरकाल

राहील. अमेरिका व रशियाच्या शीतयुद्धाच्या संघर्षात कोणत्याही गटांत सामील न होता भारत तटस्थ राहिल्याने चिनी आक्रमणाच्या वेळी सोव्हिएट रशिया भारताचा तटस्थ मित्र राहिला व अमेरिका हे राष्ट्र सहाय्यक मित्र म्हणून राहिले. बांगला देश युद्धाच्या वेळी चीन-पाकिस्तान व अमेरिका अधिक जवळ आले. त्यामुळे भारतासारख्या शांतताप्रिय देशाला सोव्हिएट रशियाशी संरक्षण करार करावा लागला. सोव्हिएट रशियाच्या मैत्रीपूर्ण संबंधातून नेहरूनी विश्वशांति निर्माण करण्याचा प्रयत्न केला. भारत व सोव्हिएट रशिया मैत्रिपूर्ण संबंधातील पं. नेहरू हे एक महत्त्वपूर्ण आधारस्तंभ आहेत.

१९२७ मधील मॉस्को भेटीत नेहरू सोव्हिएट रशियातील समाजवादी विचाराने आकर्षित झाले होते. १९६१ मध्ये नेहरूनी सोव्हिएत रशियाला तिसरी व शेवटची भेट दिली. २९ मे १९६४ मध्ये सोव्हिएत रशियाचे राष्ट्राध्यक्ष अलेक्सि कोसिजीन यांनी भारताला सदिच्छा भेट दिली त्यावेळी ते नेहरूंच्याबद्दल आदराने म्हणाले, " The name of Jawaharlal Nehru is dear to the Soviet people, because it is closely connected with the efforts of the nation aimed at the liquidation of colonialism in all its forms and manifestations, at the solution of disputed international problems by peaceful means, through negotiation. He was an ardent champion of peace, and a passionate advocate of the implementation of the principles of peaceful co-existence of States. He was the architect of the policy of non-alignment which is being pursued by the Indian Government. This wise policy has gained respect for India and this is reflected in the fact that India now occupies a deserved place on the international arena."

समाजवादी राष्ट्रे व सोव्हिएत संघाबरोबर मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे, हा भारताच्या पाश्चिमात्य नीतीचा एक अढळ व आधारभूत सिध्दांत होता. नेहरूंच्या रशियन मैत्रीमुळे दोनही देशांत आयात-निर्यात सुरू झाली. रशियाने औद्यौगिकरणाच्या मशिनरी, कागद व रासायनिक खाद्य पाठवले तर भारताने जूट, कापूस, चहा रशियाला पाठविला.

१९५३ मध्ये भारतातील सोविएत रशियाचे राजदूत श्री. मिखाईल मेनाशीकोव यांनी भारतातील पूरग्रस्ताना आर्थिक मदत देण्यासाठी सोविएत संघाच्या रेडक्रॉस संस्थेच्या कार्यकारिणी समितीद्वारे पं. नेहरूना २,५०,००० रुबलचा एक चेक भेट दिला होता. दुष्काळ, महापूर व भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या क्षणी भारतीय बांधवाना, रशियन बांधवानी मदतीचा व सहकार्याचा हात पुढे केला होता. पं. नेहरूनी आपल्या देशाच्या स्वतंत्र विदेश नीतीमध्ये सोविएत संघाच्या मैत्रीला महत्त्वपूर्ण स्थान दिले होते. डिसेंबर १९५३ मध्ये भारत-सोविएत संघामध्ये पंचवार्षिक योजनासाठी व्यापारी सहकार्याचा करार केला. यातूनच भिलाई येथे पोलादाचा कारखाना रशियन सहकार्याने निर्माण झाला. तसेच तेलविहिरी खोदण्याची यंत्रसामुग्री, कोळसा खणण्याची यंत्रसामुग्री व इतर औद्योगिक यंत्रसामुग्री याबाबत करार केला.

सुरतगढ येथील सरकारी शेती फार्म विकसित करण्यासाठी सोविएत रशियाच्या सहकार्याने विकासाबाबत करार झाला. तर नबेली येथे विद्युतकेंद्र उभारण्याचाही करार झाला. भारतात तेल उत्पादन वाढीसाठी भूगर्भ रशियन तपासणी पथकाने भारतीय बांधवाना मदत केली. याचवेळी भारत व सोविएत रशिया मैत्रीत वाढ होण्यासाठी समुद्र व वायुसेवा सुरू झाली. भारताच्या समाजरचनेत समाजवादी निर्मितीमध्ये सोविएत प्रतिनिधी व त्यांची मंडळे भारतात यायची. त्याच्या माहितीची विविध

प्रदर्शने भरू लागली. भारतात येणाऱ्या सोविएत देशाच्या प्रतिनीधींचे स्वागत व त्यांना सहकार्य यासाठी नेहरू त्याना अधूनमधून भेट देत. भारत सोविएत मैत्रीबद्दल टीका करणाऱ्यांना पं. नेहरू स्वतः थंड करीत. एवढा त्याना सोविएत मैत्रीबद्दल आदर होता. १४ नोव्हेंबर हा आपला वाढदिवस साजरा करताना आंतरराष्ट्रीय बाल प्रदर्शनातील विजेत्यामध्ये रशियन बालकांचीच निवड करीत.

पं. नेहरू निसर्गप्रेमी व सौंदर्याचे उपासक होते. त्यांची सांस्कृतिक अभिरूची जगातील कानाकोपऱ्यात पसरली होती. शास्त्रीय संगीत व राष्ट्रीय नृत्याबद्दल त्यांना आवड होती. रशियन बँले नृत्यकंपनी, कलाकार व त्यांची प्रदर्शने व कार्यक्रम नेहरू विशेष आवडीने पहात.

१९५८ ते १९६७ या काळात भारतातील सोविएत रशियाचे राजदूत श्री. इवान बेनेदिकतोव होते व ते भारत सोविएत संघाच्या सांस्कृतिक समितीचे उपाध्यक्ष होते. त्यांनी पंडित नेहरूंच्याबाबत म्हटले आहे– " Nehru was instrumental in promoting friendship and co-operation between India and the U.S.S.R. Fully aware that India could only achieve real economic independence by developing the key national sectors of heavy industry and power resources. Nehru attached great importance to co-operation with the Soviet Union in the development of iron and steel and heavy engineering plants, coal, and oil producing enterprises and electric power stations."

भारत आणि सोविएत रशियातील मैत्री अधिक दृढतापूर्वक होण्यासाठी नेहरूंच्या मनात अतिशय उत्साह होता. भारताने सरकारी क्षेत्रातील उद्योग व शक्ती उत्पादन केंद्रे स्थापन केल्यानेच आर्थिक स्वतंत्रता मिळवू शकेल ; यासाठी त्यानी औद्योगिकरणाच्या वाढीसाठी स्टील व पोलादाच्या कारखान्यांची वाढ करण्यासाठी, तसेच खनिज पदार्थांच्या राष्ट्रीय संपत्तीचा उपयोग होण्यासाठी, देश आर्थिक स्वयंपूर्ण होण्यासाठी, तेल संशोधन केंद्रांची स्थापना, तसेच कोळशांच्या खाणीचा शोध आणि विद्युत केंद्रे उभारण्यासाठी सोविएत संघाच्या सहकार्याला अतिशय महत्त्व दिले. नेहरूनी प्रस्थापित केलेल्या कोणत्याही राष्ट्रगटात सामील न होण्याच्या अलिप्ततावादी व तटस्थ धोरणाचेही सोविएत रशियाने समर्थन केले. आशिया खंडातील जनतेच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण निःशस्त्रीकरण (Non-alignment), साम्राज्यशाही विरोधी धोरण, युद्धबंदी व युद्धक्षेत्र कमी करणे, अण्वस्त्र बंदी-विरोध व प्रत्यक्ष कृती, युद्धकैद्यांच्या समस्या, तटस्थता व शांततामय सहजीवन ; या काळाच्या गरजांना सोविएत रशियानेही पं. नेहरूंच्या ध्येयधोरणांना पाठिंबा दिला. कारण याच काळाच्या गरजा सोविएत रशियानेही पुरस्कृत केल्या होत्या व त्या भारतीय राजनीतीशी तसेच पंडित नेहरूंच्या परराष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरणाशी समांतर मिळत्या-जुळत्या होत्या. भारत-सोविएत आर्थिक सहकार्याबद्दल पंडित नेहरूनी ' प्रावदा ' या रशियन वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत म्हटले,

" There is no doubt, that our friendship and co-operation with the U.S.S.R. have rendered us considerable aid. And it is not only in the field of our economic and cultural development. The friendship and co-operation have broadened our horizons, have helped us to understand better all that is happening in the world. Particularly we welcome the scientific and economic aid of the Soviet Union to India...... We deeply appreciate the warm feelings of the Soviet people towards India."

(From the interview granted to a ' Pravada ' correspondent in January 1963, on the occasion of India's Republic Day) (Soviet Land–1964 No. 22).

सोविएत संघाच्या मित्रत्वाच्या सहकार्यातून भारताला खूपच मदत झाली. ही मदत केवळ सांस्कृतिक, आर्थिक विकासाच्या क्षेत्रांतही मिळाल्याने या मित्रत्वाच्या सहकार्याने दोन्ही देशांतील प्रगतिच्या विस्ताराचे क्षितिज अधिकच विस्तृत होत गेले. जगामध्ये आज जे काही चालले आहे, त्याकडे वेगळ्या दृष्टीकोनातून इतर देशांनी पाहण्याचे सामर्थ्य भारताला प्राप्त झाले आहे. विशेषकरुन आम्ही वैज्ञानिक क्षेत्रातील प्रगतिसाठी आर्थिक सहकार्याचे स्वागत करतो. भारताबाबत असणाऱ्या सोविएत जनतेच्या हार्दिक सदिच्छांचा आम्ही आदर करतो.

आजच्या जगामध्ये भारताची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शेती, विज्ञान व औद्योगिकरण यातील प्रगति साधण्यासाठी शासनाने त्यातील प्रगतिचे संयोजन व नियंत्रण आपल्या हातात ठेवले पाहिजे, यावर पं. नेहरूनी भर दिला होता. या उद्दीष्टातूनच भारताच्या आर्थिक क्षेत्रात सरकारी क्षेत्राचा उदय होणे जरूरीचे आहे, याला नेहरूनी मान्यता दिली होती. उद्योगधंद्यांचे नियंत्रण सरकारने केले पाहिजे. आर्थिक विकासातील सर्वाधिक महत्त्वपूर्ण साधनावर सरकारचा अधिकार असणे आवश्यक आहे असे नेहरूंचे मत होते, ६ जुलै १९३३ मध्ये एका पत्रात नेहरूनी लिहिले होते, " पंचवार्षिक योजनेद्वारे संपूर्ण रशियाचा नकाशाच बदलून गेला आहे. पूर्वीचा रशिया आणि नवीन सोविएत युनियनकडे पाहता एका साम्यवादी देशाकडून प्रगतशील औद्योगिक देशात त्याचा बदल झाला आहे. एवढेच नाही, तर सामाजिक जीवनाच्या सांस्कृतिक क्षेत्रातही सोविएत रशियाने आश्चर्यकारक प्रगति केलेली आहे. रशियातील नागरिकांना मिळणाऱ्या नागरी सुविधा, सार्वजनिक आरोग्य सुविधा व जीवनमान सुधारण्याच्या सुविधा या इतर जगातील जनतेशी तुलना करता आघाडीवर आहेत. भुकेकंगालीचा भयानक धोका, भूकबळी, बेरोजगारीचा भयानक प्रश्न रशियाने समर्थपणे सोडविला होता व याचबरोबर सर्व रशियन जनतेमध्ये राष्ट्रीयत्वाची भावनाही वाढीस लावली होती.

भारत देश स्वतंत्र होण्यापूर्वी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कार्यकारिणीने आर्थिक-नियोजन समितीची स्थापना केली होती. तर १९५० साली राष्ट्रीय नियोजन मंडळाची पुनर्रचना केली गेली व पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्यात आला. भारताच्या औद्योगिकरणाच्या वाढीवर त्यांनी भर दिला. त्याचबरोबर विद्युतशक्ती उत्पादन वाढीलाही त्यांनी प्राधान्य दिले. जगाच्या आर्थिक क्षेत्राच्या प्रगतिस्पर्धेत भारताचा दहावा क्रमांक लागतो. याचे श्रेय पंडित नेहरुना आहे. भारतामध्ये पाण्याद्वारे वीज व आधुनिक विद्युत केंद्रे, मोठमोठी धरणे, पाटबंधारे, लघुसिंचन योजना, लोखंड व पोलादाचे अजस्त्र कारखाने, औद्योगिक क्षेत्रातील मोठमोठाले प्रकल्प व कारखाने, अणुशक्ती-उत्पादन केंद्रे व विद्युत-क्षेत्रातील उद्योग यात भारत हा देश स्वयंपूर्ण झाला. भारताच्या या औद्योगिक प्रगतिचे श्रेय सोविएत संघाच्या आर्थिक व वैज्ञानिक दृष्टिकोनातील सहकार्यालाच जाते. ७० कारखान्यांपैकी ५० कारखाने सोविएत संघाच्या सहकार्यानेच उभारले गेले होते.

२ फेब्रुवारी १९५५ मध्ये दिल्ली येथे भारत-सोविएत आर्थिक-सहकार्याबाबत करार झाला. या करारनुसार भिलाई येथे १०,००,००० टन वार्षिक उत्पादन क्षमतेचा पोलाद कारखाना उभारायचा होता. भिलाई येथे सोविएत संघाच्या सहकार्याने पोलादाचा कारखाना उभारण्यात आला. भारत हा देश आर्थिकदृष्ट्या समृद्ध व्हायला पाहिजे व देशाच्या औद्योगिक विकासासाठी ' पोलाद-शक्ति ' ही राष्ट्राची आधार संपत्ती असते ; यावर पं. नेहरूंचा विश्वास होता. भिलाई येथे रशियन सहकार्याने पोलाद

कारखाना उभारला जात असताना नेहरू भिलाई योजनेच्या प्रगतीबाबत, तेथे जाऊन प्रत्यक्ष पाहणी करत असत. त्यामुळे सोविएत तंत्रज्ञान अधिकारीही खूष असत. नेहरू त्यांना काही अडी-अडचणी आहेत का, याचीही आपुलकीने चौकशी करत. भारतातील विज्ञान, तंत्रज्ञान व शेती या क्षेत्रांतील भारतीय अधिकारीही नेहरूनी रशियात प्रशिक्षणासाठी पाठविले होते. फेब्रुवारी १९६२ मध्ये भिलाई कारखान्यातील कार्यशाळा (Work-shop) व या पोलादाच्या उत्पादनातील अधिकारी व कर्मचारी यांची कार्यनिपुणता पाहून नेहरुनी समाधान व्यक्त केले होते. भिलाई येथे उभारलेला पोलादाचा कारखाना हा भारत-सोविएत-मैत्रीच्या सहकार्याचे एक प्रतिक आहे असे नेहरुनी विषद केले. भिलाई येथील कारखान्यात भारतातील $\frac{१}{३}$ पोलाद निर्मिती होत आहे. भिलाई येथे रशियन सहकार्याने पोलाद कारखाना उभारला गेल्यानंतर भारताला आर्थिक-क्षेत्रात स्वयंपूर्ण बनण्यासाठी औद्योगिक क्षेत्रातील यंत्रसामग्री, तेल काढणारी व कोळशाचा शोध घेणारी यंत्रसामग्री तसेच शेती व औषधविषयक क्षेत्रासारख्या वेगवेगळ्या क्षेत्रांतही सोविएत संघाने भारताला मैत्रीपूर्ण सहकार्य दिले. त्यामुळे भारतीयांची सोविएत मैत्री चिरंतन राहील.

भारतीय शेती सुधारण्यासाठी मोठमोठ्या धरणांची, पाटबंधाऱ्यांची आणि विद्युत केंद्रे व औद्योगिक कारखान्यांची वाढ आवश्यक होती. यासाठी पोलाद कारखान्याची आवश्यकता होती. रशियन सहकार्याने भिलाई येथे उभारलेला पोलाद कारखाना हा भारताच्या भविष्यातील प्रगतीचा एक मानदंड आहे ; असे नेहरूनी विशद केले. १९५६ ते १९६१ या काळखंडात रशियाचे निकोलाई गोल्डिन हे भिलाई येथील पोलाद कारखान्याचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी व भारी उद्योग निर्मितीचे रशियाचे मंत्री होते. सन १९७० पासून ते भारत-सोव्हिएत सांस्कृतिक-संबंध समितीचे अध्यक्ष होते. १९५६ ते १९६१ या काळात नवी दिल्ली येथे भारताचे पंतप्रधान पं. नेहरूंच्याबरोबर त्यांची भिलाई कारखान्याच्या संदर्भात भेटी व चर्चा होत असे. या कालावधीमध्ये शीतयुद्धाने परिसीमा गाठली होती. पश्चिमेकडील काही देश पं. नेहरूंच्या क्रियात्मक तटस्थतेच्या नीतीला ; एक मूर्खपणाची नीती म्हणून हिणवत असत. परंतु भारत आणि सोविएत-संघातील मैत्रीच्या सहकार्याची वाढ अधिक कशी होईल याकडेच पं. नेहरू अधिक लक्ष देत होते.

पंडित नेहरूंच्या भारत-सोविएत सहकार्याबद्दल जगातील काही हितशत्रू शेरे-प्रतिशेरे मारत असत. काहींच्या मते रशियन विशेष अधिकारी योग्य नव्हते. त्यांना रशियन विशेषज्ञ अयोग्य वाटत होते व सोविएत जनता जगातील कोणत्याही देशाबरोबर कोणत्याही क्षेत्रात समर्थ आहेत याचीही खात्री नव्हती; आणि त्यावरूनच ते रशियन साम्यवादी भूमिकेबद्दल निराग्रही भूमिका घेत होते. परंतु भारतात समाजवाद रुजवताना पं. नेहरू रशियासारख्या प्रगत साम्यवादी राष्ट्राची मदत व सहकार्य घेत होते. भिलाईच्या पोलाद कारखान्यात रशियन तंत्रज्ञ भारतीयांच्या खांद्याला खांदा लावून कठोर परिश्रम करून सहजीवनाचा आनंद उपभोगत होते. याच कठोर परिश्रमानी सोविएत रशियाच्या कडव्या राष्ट्रवादी जनतेने जगातील एक प्रगत व समर्थ राष्ट्र निर्माण केले होते–सोविएत रशिया !

भारतात रशियन सहकार्याने जी प्रगती चालली होती त्यावेळी रशियन अधिकारी व तंत्रज्ञ व वैज्ञानिक आणि त्यांच्या परिवारातील काही सदस्य ; की जे मुंबई, अंकलेश्वर, दुर्गापूर, रांची, भिलाई व सुरतगढ येथे राहत. ज्या ज्या वेळी पं. नेहरू रशियन सहकार्याने उभारल्या जाणाऱ्या विशेष कारखान्यांच्या भेटीना जात. त्यावेळी त्यांनी रशियन तंत्रज्ञ, वैज्ञानिक व विशेषज्ञ यांच्या राहणीमानातील अडीअडचणी व सुविधा याबाबत ते विशेष आपुलकीने चौकशी करत व त्या सोडविण्यासाठी सूचना देत. सोविएत रशियाच्या या विशेष अधिकारी व कर्मचाऱ्यांची मुले, मुली ज्या शाळेत शिक्षण घेत त्या शाळांमध्येही

जाऊन पं. नेहरूनी या मुला-मुलींना करमणुकीचे कार्यक्रम व क्रीडा क्षेत्रातील सुविधाही मिळतात की नाहीत याची पाहणी केल्याचा निर्वाळा निकोलाई गोल्डिन, रशियाचे भारी उद्योग-निर्मिती मंत्री यांनी दिला. यातूनच त्याना सोविएत-भारत मैत्रीचे निर्माते म्हणजेच नेहरू वाटत असे त्यानी नमूद केले आहे. म्हणूनच निकोलाई गोल्डिन यांनी म्हटले, '' रशियन सहकार्याने उभारलेला भिलाई येथील पोलादाचा कारखाना म्हणजे नव्या भारताचे एक नवीन तीर्थक्षेत्र आहे.

सोविएत रशियाच्या दूतावासातील १९५६ ते १९६३ या काळात श्री. बोरीस रोमानोव हे आर्थिक विषयाचे प्रतिनिधी होते. त्यांनी सोविएत देशाच्या मासिकास दिलेल्या लेखांत पं. नेहरूंची एक आठवण उद्धृत केली होती. १६ डिसेंबर १९५७ मध्ये भिलाई येथील पोलाद कारखान्यास नेहरूनी भेट दिली होती. कारखाना सुरू होण्यापासून स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान कारखाना उभारणीच्या प्रत्येक क्षेत्रात खोलवर चौकशी करत असत. एवढेच नाही तर काही बाबतीत अधिकाऱ्याकडून शंका-निरसन करून घेत. जेणेकरून कोणत्याही प्रकारच्या अडचणी येऊ नयेत. कारखान्यातील प्रत्येक विभागाची ते सूक्ष्म बुद्धीने पाहणी करत. विशेष तंत्र अधिकाऱ्यांना जी माहिती आहे त्याच्या शेवटपर्यंत ते प्रश्न विचारत. नवीन यंत्रसामुग्रीच्या बाबतही ते वैयक्तिक माहिती करून घेत.

नेहरूनी तेलाचा शोध घेणाऱ्या व तेल बाहेर काढण्याच्या प्रश्नावरही विशेष लक्ष पुरवले होते. जिथे जिथे भारत-सोविएत तंत्रज्ञ काम करत, तिथे जाऊन ते पाहणी करत. भारताच्या आर्थिक-विकास क्षेत्रात खनिजे व तेल आणि नैसर्गिक साधनसंपत्तीला त्यांनी विशेष महत्त्व दिले होते. नेहरू तेलाच्या विहिरींना ' पृथ्वीची देणगी ' वसुधारा भारतीय समृद्धीचे स्त्रोत (Vasudhara–The Source of Prosperity) मानत. सोविएत संघाच्या मित्रतापूर्ण सहकार्याने गुजरातमधील अंकलेश्वर येथे तेल-शोध केंद्र निर्माण झाले होते, आणि अंकलेश्वर येथे मिळालेल्या तेलाच्या महत्त्वपूर्ण शोधामुळे फक्त गुजरातलाच तेल मिळणार नव्हते ; तर भारताच्या आर्थिक विकासातील प्रगतिचे व सर्व भारताला त्यामुळे तेल मिळण्याचे ते एक महत्त्वाचे केंद्र निर्माण झाले होते.

अंकलेश्वर येथे नेहरूनी तेथील सोविएत संघाचे कर्मचारी व अधिकारी यांच्या अडीअडचणी समजून घेण्यासाठी, चर्चा करण्यासाठी एक दिवस मुक्काम केला. कोयाली येथील तेल शोध केंद्र व भिलाईच्या पोलाद कारखान्याला अंकलेश्वर येथूनच तेल पुरविण्यास सुरुवात झाली. भारतीय समाजवादातील एक प्रगतीचे पाऊल नेहरूनी सोविएत संघाच्या सामर्थ्यशाली व विशेष तंत्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केले. रांची व दुर्गापूर येथे सोविएत संघाच्या सहकार्याने कारखान्याच्या भारी यंत्रसामुग्री व विहिरी खोदण्याच्या यंत्रसामुग्रीचे कारखाने उभारण्यात आले. भारतीय शेतकऱ्यांना व कष्टकरी कामगारांना नेहरूंच्या दृष्टिने अतिशय महत्त्व होते. आधुनिक भारत निर्माण करण्याच्या प्रयत्नात भारतीय शेतकऱ्यांनी व कामगारांनी जर कठोर परिश्रम केले तर राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून अन्नधान्याच्या बाबतीत व औद्योगिककरणामुळे रोजगारीचाही प्रश्न सुटला जाऊन आर्थिक क्षेत्रात भारत स्वयंपूर्ण बनेल यावर त्यांचा विश्वास होता.

भारतीय शेतीच्या विकासासाठी व शेतीक्षेत्रात अन्नधान्याच्या बाबत भारत स्वयंपूर्ण होण्यासाठी सोविएत संघाच्या सहकार्याने बंजर भूक्षेत्र शेतीयोग्य बनण्यासाठी पाच प्रकल्प रायचूर, भारसूगुड, कनानोर, जालंधर व हिसार येथे निर्माण केले होते. या प्रकल्पासाठी सोविएत संघाने शेतीसाठी आवश्यक असणारी अवजारे, यंत्रसामुग्री, ट्रॅक्टर्स तसेच इतर आवश्यक असणाऱ्या सहसामुग्री (Spare Parts) भेट स्वरूपात दिल्या होत्या. राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशातील नापीक जमीन शेतीला उपयुक्त व सुपीक बनविण्याच्या नवीन प्रकल्पात १९५६ मध्ये सोविएत संघाचे कृषीतज्ञ

अलेक्झांडर सेलिवानोव यांनी सुरतगढ येथील नापीक जमीन शेती योग्य बनवण्याच्या निर्मितीच्या प्रकल्पात तीन वर्षे काम केले. रांची येथेही सोविएत संघाच्या सहकार्याने यंत्रसामग्री निर्मितीचा कारखाना उभारण्यात आला. रांची येथील कारखान्यात निर्माण होणाऱ्या उत्पादनाचा माल अंकलेश्वर, बोकारो, भिलाई, कलकत्ता, मुंबई व हरिद्वार येथे आजही पाठवला जातो. औद्योगिकरणाच्या आधुनिक भारताचे एक स्वप्न नेहरूनी सोविएत रशियाच्या सहकार्याने वास्तवात उतरवले.

१९४७ ते १९५४ या कालखंडात भारताची, अन्नधान्याबाबत अतिशय बिकट परिस्थिती होती. मद्रास राज्यात ज्यावेळी दुष्काळ पडला व जनतेची उपासमार होऊ लागली, त्यावेळी पं. नेहरूनी तीव्र चिंता व्यक्त केली होती. उपासमार थांबविण्यासाठी, नेहरूनी त्वरित केंद्रशासनामार्फत अमेरिका व रशिया यांच्याकडून अन्नधान्य मिळवले. त्यासाठीच भारताने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणे आवश्यक होते. सोविएत रशियाच्या सहकार्याने भारताला स्वयंपूर्ण बनविण्याचा त्यांनी सर्वच क्षेत्रांत प्रयत्न केला होता. इंग्लंड व अमेरिकेतील लोकशाही परंपरापण भारतात त्यांनी रुजवण्याचा प्रयत्न केला. मात्र आपल्या मनाचा तोल मात्र त्यांनी अमेरिका व रशिया या कोणत्याही एका गटाकडे झुकू दिला नाही.

भारताच्या उत्तर सीमेवर रशिया व चीन ही दोन कम्युनिझमवादी राष्ट्रे अगदी शेजारी आहेत. भारतीय परराष्ट्रीय धोरणाबाबत सोविएत रशियाला भारताच्या प्रगतिमध्ये अनुकूल करण्यास पं. नेहरूंचा सिंहाचा वाटा आहे. काश्मीर प्रश्नावरून पाकिस्तानने भारताशी युद्ध सुरू केल्यानंतर १९४८ साली नेहरूनी काश्मीर प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघटनेत जागतिक व्यासपीठावर नेला. त्यावेळी सोविएत रशियाने अधिकार असतानाही आपला पहिला नकाराधिकार (Veto) वापरला नाही. परंतु भारत हा शांतताप्रिय व तटस्थ देश आहे, याचीच खात्री रशियन करत होते. भारत हा तटस्थ देश आहे याची खात्री, जगातील सर्वच राष्ट्रांना कोरियन युद्धात आली. कोरियन युद्धाच्या वेळी महायुद्ध भडकण्याची शक्यता होती. उत्तर कोरियाने ३८ अक्षांश ओलांडून दक्षिण कोरियावर चढाई केली व युद्धाला तोंड फुटले. उत्तर कोरियाने केलेले आक्रमण प्रथम मागे घ्यावे या संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीच्या ठरावाला, भारत या शांतताप्रिय देशाने सक्रिय पाठिंबा दर्शविला. त्याशिवाय युद्धाची व्याप्ती व युद्धसंघर्ष कमी व्हावा यासाठी भारताने सतत प्रयत्न केला. कोरियन युद्धातील जखमी सैनिकांसाठी वैद्यकीय मदत तर पाठवलीच पण संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीच्या निर्णयानुसार 'युद्धबंदी' जाहीर केल्याने तर मेजर जनरल थोरात यांच्या नेतृत्वाखाली युद्धबंदी कार्यवाहीत आणण्यासाठी व युद्धकैद्यांची अदलाबदल करण्यासाठी भारतीय शिष्टमंडळ पाठविण्यात आले. या भारतीय लष्करी फौजांनी कोरियन युद्धभूमीवर अत्यंत कार्यक्षम व तटस्थपणाने आपली भूमिका पार पाडली. त्यामुळे या भारतीय लष्करी फौजांची, शांतिसेनेची सर्व जगानेच वाहवा केली. सोविएत रशियाची भारताबद्दलची आत्मीयता यानंतर वाढीस लागली. कारण भारतासारखा देश जागतिक स्पर्धेत कोणत्याही एका गटाकडे झुकतो की काय, याचे रशियाकडून परीक्षणही चालले होते. कोरियन युद्धात रशियाला भारताच्या तटस्थतेची खात्री पटली आणि सार्वभौम स्वतंत्र भारताच्या मैत्रीला रशियाने मैत्रीचे स्थान दिले.

हंगेरी येथे रशियन वर्चस्वाविरुद्ध उठाव झाला तो रशियाने अत्यंत क्रूरपणे दडपला. संयुक्त राष्ट्रसंघटनेत रशियाच्या या आक्रमणाविरुद्ध निषेधाचा ठराव आला त्यावेळी भारतीय प्रतिनिधी कृष्ण मेनन यांनी तटस्थतेचे धोरण स्वीकारले कारण काश्मीर प्रश्नामुळे भारत-पाकिस्तान संबंध बिघडले होते. काश्मीरचा भूप्रदेश हा भारताचा अविभाज्य घटक असताना पाकिस्तान त्यावर आपला हक्क प्रस्थापित करून पाकिस्तानने भारताच्या अंतर्गत कारभारात काश्मीरमध्ये हस्तक्षेप करून युद्धनीतीलाच

सुरुवात केली. याचप्रमाणे हंगेरी येथील राजकीय समस्या रशियनापुढे उभी राहिली होती. हंगेरीच्या प्रश्नातही पं. नेहरूनी रशियाने हंगेरी येथील आक्रमण थांबवून मानवीजिवीत हानी वाचवावी, याचे आव्हान केले होते. यामागे शीतयुद्ध थांबवावे व जागतिक शांतता प्रस्थापित व्हावी हाच हेतू पं. नेहरूंचा होता. काश्मीर प्रश्नाच्या संदर्भात, संयुक्त राष्ट्रसंघटनेत सोविएत रशिया भारताला सतत पाठिंबा देत राहिला.

' स्वातंत्र्य, समता, आणि विश्वबंधुत्व ' या त्रिसूत्रीमुळे अमेरिकन लोकशाहीने जगात महत्त्वाचे स्थान मिळवले. परंतु काश्मीर प्रश्नात अमेरिका पाकिस्तानला लष्करी सामग्री, शस्त्रास्त्रे व सतत पाठिंबा देत राहिला गेल्याने भारत-पाकिस्तान सरहद्दीवर भारताच्या अंतर्गत कारभारात काश्मीरमध्ये अद्यापही स्फोटकच परिस्थिती आहे. यामागे भारत-सोविएत मैत्रीमुळे अमेरिकेचे मत पाकिस्तानकडे झुकू लागले. चिनी आक्रमणाच्या वेळी भारताच्या सरहद्दीवर नेफा, लडाख व आसाममध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असता, चीन हा सोविएत रशियाचा सहबंधू असल्याने रशियाने भारत-चीन संघर्षात तटस्थतेचे धोरण स्वीकारले. यावेळी अमेरिका व इतर पाश्चिमात्य राष्ट्राकडून भारताला लष्करी मदत मिळाली. चिनी आक्रमणामुळे भारताची लोकशाही प्रधान राजवट धोक्यात आली होती. जागतिक शांततेच्या तणावात अधिकच भर पडत चालली होती. सोविएत रशियाने भारत-चीन संघर्षात चीनला कोणतीही लष्करी मदत पुरवली नाही व चीनला कोणताही पाठिंबा दर्शविला नाही. त्यामुळे चीनने भारतावर केलेल्या आक्रमणाच्या वेळी रशियाच्या तटस्थतेमुळे चीन संभ्रमात पडला. इंडोचीन व कोरियन युद्धाच्या वेळी पण रशियाने चीनला कोणत्याही प्रकारचा पाठिंबा दर्शविला नाही. त्यामुळे चीनने या कोरिया व इंडोचीन युद्धाच्या वेळी आक्रमण थांबवले.

भारत-चीन संघर्षाच्या वेळी अमेरिका व रशिया यांच्यातही क्यूबा प्रश्नावरून अण्वस्त्र युद्ध सुरू होणार होते. यावेळी सोविएत रशियाने शांततामय सहजीवन या तत्त्वातून क्युबा प्रश्नात अण्वस्त्र युद्धच थांबवले होते. चिनी आक्रमणाच्या वेळी भारतीय सरहद्दीवरही तणाव निर्माण झाला होता. यावेळी जर भारताने अमेरिकेचा आश्रय घेतला असता, तर भारत-रशियन मैत्रीचा बोऱ्याच वाजला असता. याचवेळी ' प्रावदा ' या रशियनच्या महत्त्वाच्या वृत्तपत्रात रशियाने भारत-चीन प्रश्नात भारताने तडजोड करावी असे स्पष्ट केले. याचा अर्थच असा होता. हा भारत-चीन संघर्षाचा प्रश्नही रशियाचे राष्ट्राध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता. भारत-सोविएत रशिया मैत्रीच्या प्रतिष्ठेचाही प्रश्न होता. भारत-चीन संघर्ष थांबायला रशियाचे राष्ट्राध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह व रशियन सरकारचा दबाव व रशियाचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाचे स्थान व समर्थ लष्करी राजसत्ता आणि भारत-सोविएत रशियाची अतूट मैत्री यामुळेच त्यानंतरचे चिनी आक्रमण थांबले गेले. अन्यथा भारताची राजधानी दिल्लीपर्यंतही लष्करी धडक मारायला चीनला कोणताही प्रतिबंध अथवा अटकाव झाला नसता. यावेळी अमेरिकेसारख्या लोकशाहीप्रधान राष्ट्राकडून जर भारताला चिनी आक्रमणाच्या वेळी सर्व सहाय्य मिळत गेले असते; तर आशिया खंडातील शांतताच नष्ट होऊन रशियन सरकारच्या परराष्ट्रनीतीचा व भारत-सोविएत मैत्रीचाही तो कसोटीचा क्षण ठरला असता.

कोरिया व इंडोचीन प्रश्नात भारताने मध्यस्थी करून ; दोन जागतिक महायुद्धे पं. नेहरूंच्या मुत्सद्दीपणाने टाळली गेली, असे बर्ट्रांड रसेल यांनी म्हटले आहे व त्यातूनच सोविएत रशियाचे राष्ट्राध्यक्ष कोसीजिन व अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांनी पं. नेहरूंची जागतिक शांतताविषयक कामगिरी सर्वश्रेष्ठ मानली. नेहरूनी शांततेचा पुरस्कार केल्याने, भिन्न-भिन्न विचारसरणीच्या राष्ट्रांनी या जगात शांततामय-सहजीवनाने राहिले पाहिजे, वादग्रस्त प्रश्न शांततेने व वाटाघाटीनेच सोडविले

पाहिजेत; या पंडित नेहरूंच्या परराष्ट्रनीतीमुळे नेहरू सोव्हिएट जनतेला आवडतात, असे सोव्हिएट-युनियनचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झिस कोसीजिन यांनी म्हटले. तर सर्व जगच हे युद्धापासून पूर्ण मुक्त व्हावे व पं.नेहरूनी जग युद्धमुक्त करण्याचा जो शांततेचा प्रयत्न केला ; तेच त्यांचे शांततेचे खरे स्मारक आहे असे अमेरिकेचे राष्ट्रपती लिंडन बी. जॉन्सन यांनी म्हटले होते.

अमेरिका व सोव्हिएट रशिया या दोन राष्ट्रांच्या भारताच्या परराष्ट्रनीतीमध्ये पं. नेहरूंनी आंतरराष्ट्रीय सहजीवनाचे तत्व मोठ्या जोरदारपणे मांडले. कम्युनिझम व लोकशाही ही तत्त्वे परस्पर-विरोधी आहेत व या दोन तत्त्वांनी एकमेकांचा सर्वनाश केला पाहिजे हा विचारच सर्वनाशाचा असून ही विचारसरणीच चुकीची आहे. शांततामय सहजीवन व समता आणि परस्पर सहिष्णुता याच विचारांचा प्रचार पं. नेहरूनी आपल्या अमेरिकन भेटीच्या दौऱ्यात केल्याने ; अमेरिका हे समृद्ध राष्ट्रही भारताचे मित्रराष्ट्र राहिले. अमेरिका व सोव्हिएत रशिया यातील संघर्ष टाळावयास पं. नेहरूंची परराष्ट्रनीतीही फार मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरली आहे.

भारत व रशिया यांची आर्थिक, राजकीय, विज्ञान व सांस्कृतिक व तांत्रिक क्षेत्रांतील मैत्री ही पं. नेहरूंच्या शांतता प्रयत्नातूनच वाढली आहे. ही मैत्रीच आशिया खंडाच्या शांततेची ग्वाही असल्याने चीन व अमेरिका यानाही ह्या शांतता मैत्रीत सहभागी व्हावे असे वाटण्याइतके त्यांचे मत व ह्रदयपरिवर्तन होईल ; एवढे भारत-सोव्हिएट रशियाच्या मैत्रीत सामर्थ्य आहे ; असे रशियाचे राष्ट्राध्यक्ष कोसीजिन यांनी म्हटले होते. बेल्जियम भांडवलदारांनी आफ्रिकेतील कांगो येथे संघर्ष निर्माण केला होता, त्यावेळी सोव्हिएट रशिया व इतर पाश्चिमात्य राष्ट्रे यात संघर्ष व युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली. त्यावेळी भारताचे पंतप्रधान पं. नेहरूनी ; संयुक्त राष्ट्र संघटनेचे सेक्रेटरी जनरल दाग हॅमरशूल्ड यांच्यामागे आपले सर्व सामर्थ्य उभे केले व जागतिक-शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतता समितीच्या आदेशावरून पंडित नेहरूंनी श्री. राजेश्वर दयाळ यांच्या नेतृत्वाखाली एक शांतता समिती व भारतीय लष्करी फौजा-शांतीसेना पाठविल्या. भारतीय लष्करी सामर्थ्याचा उपयोग जागतिक राजकीय संघर्षाच्या वेळी शांतिसेनेसाठीच केल्याने जगाच्या इतिहासात भारतीय लष्कराला, सामर्थ्याला निश्चितच एक चिरंतन आगळे-वेगळे महत्त्व टिकून राहणार. यातून एकच अर्थ निघतो, पं. नेहरूंनी आपली परराष्ट्र नीती प्रत्यक्ष कार्यवाही ही जागतिक शांततेसाठी व शीतयुद्धाचीच कोंडी करण्यासाठी वापरली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपान, चीन, इटाली, जर्मनी व पोलंड, रशिया आणि बाल्कन राष्ट्रे या राष्ट्रांची अपरिमीत जीवित व वित्त हानी झाली. या दुसऱ्या भीषण महायुद्धाने अडीच कोटी माणसे युद्धाच्या भीषण खाईत मृत्यूमुखी पडली तर त्याहीपेक्षा अधिक कायमची पंगू बनली, तर उर्वरित जगातील मानवाना शांततेची गरज भासू लागली होती. लष्करावर होणारा अमर्यादित खर्च ; त्यामुळे देशांतर्गत आणिबाणी व युद्धजन्य परिस्थिती, अण्वस्त्रांचा वापर झाला तर नागासकी व हिरोशिमा व पर्ल हार्बरप्रमाणे उध्वस्त होणार, देशांतर्गत रेशनिंग! युद्धात सर्व काही क्षम्य असते. युद्धातील आधुनिक शस्त्रास्त्रे व अण्वस्त्रे सर्वनाशच करणार व तोही मानवजातीचाच. युद्ध क्षेत्रावरून आपली मुलेबाळे कधी परतणार याचीच वाट प्रत्येक देशातील नागरिक करणार. पाश्चिमात्य राष्ट्रांनी आपल्या घरापर्यंत युद्ध अनुभवल्याने, पाश्चिमात्य देशांत पं. नेहरूंची ' शांततेची पंचशील तत्वप्रणाली ' योग्यच वाटते. मात्र ज्यांनी युद्धच अनुभवले नाही त्यांना पं. नेहरूंची शांततेची महान तत्त्वे व त्याची किंमतही अयोग्यच वाटणार.

दोन भीषण महायुद्धांनी युरोपमधील सर्वसामान्य जीवन विस्कळीत झाले होते एवढेच नाही ; तर प्रत्येक देशाची आर्थिक-व्यवस्था पण कोलमडली होती. जागतिक संस्कृतीच्या प्रगत युरोपमधील जवळ जवळ दोन पिढ्या पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या भीषण खाईत भाजून, होरपळून निघाल्या. प्रगत युरोपियन देशांची जीवित व वित्त हानी त्वरित भरून निघणे अतिशय अवघड होते. आपल्याच घरातील जी मुले युद्धक्षेत्रावर लढत होती; काहीजण धारातीर्थी पडली होती, तर काही जण अधू, अपंग झाली होती, तर काही जण भयानक भीषण जखमांनी मृत्यूकडे वाटचाल करत होती. युद्धाच्या भीषण ढगांनी रात्री घरामध्ये दिवेही लावायचे नाहीत. अंधारच अंधार, भीषण अंधाराचेच साम्राज्य सर्वत्र पसरले होते. जीवन आणि मृत्यू तसेच युद्ध आणि शांतता यांचाही भीषण संग्रामच चालला होता. देशामध्ये आणिबाणी, रस्त्यावरून फिरायची भीती, शत्रूच्या लढाऊ विमानांची व बॉंब हल्ल्याची भयानक भीती त्यातून मृत्यूची घंटा वाजविणारा, शत्रूची विमाने आपल्या देशावर आली असता वाजणारा कर्णकर्कश भोंगा, त्यानंतर स्त्रिया व पुरुष आणि लहान लहान मुलामुलींची जीव वाचविण्याची पळापळ, हॉस्पिटलमधील वेडे लोकही शुद्धीवर यायचे. हा मात्र युद्धाचा फायदा! कारण एका हॉस्पिटलमध्ये बॉंब पडल्यानंतर त्या वेड्यांच्या इस्पितळातील वातावरण फक्त आपण आपल्या डोळ्यासमोर आणू शकतो. काही हॉस्पिटलमध्ये तर बॉंब हल्ल्याचे आवाजानेच स्त्रिया प्रसूत झाल्या, बॉंब हल्ल्यांनी शहरे भकास व उदास झाली, मृत्यू आणि वियोग यांची प्रदीर्घ कटुता निर्माण झाली. त्यातून शत्रूसैन्य आपल्या शहरातून विजयाची वाटचाल करत आहे त्याचा धसका, शत्रूसैन्याची उपस्थिती, जय आणि पराजयाची टांगती तलवार दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती झाल्यानंतर युरोप विजयदिनाच्या ' स्मशान-शांततेचे ' हार्दिक स्वागत करीत होता.

पहिल्या महायुद्धाच्या ठिणगीने युद्धचा भडका उडल्यानंतर इंग्लंडचे परराष्ट्र मंत्री सर एडवर्ड ग्रे आपल्या कचेरीच्या खिडकीजवळ उभे राहून बाहेर निळ्या आकाशाकडे पहात होते. त्यावेळी ते म्हणाले, " सर्व युरोपमधील दिवे मालवले जात आहेत, आपल्या हयातीत तरी ते पुन्हा लागलेले दिसतील की नाही कोण जाणे! " युद्धाची भयानकता पाहता सर एडवर्ड यांची ही भीति १९४५ साली सत्यच होती. १९१४ ते १९१८ या काळात फ्रान्सच्या तीन कोटी वीस लक्ष लोकसंख्येपैकी तेरा लक्ष सैनिक, स्त्रिया व पुरुष व लहान मुले-मुली मरण पावल्या ; तर त्याहीपेक्षा अधिक, युद्धाच्या भीषण वणव्यात अधू आणि अपंग झाले होते. युद्ध आणि शांतता या संघर्षात युरोपच्या क्षितिजावर पं. नेहरूनी शांततेसाठी, तेही जागतिक शांततेसाठी शांततामय सहजीवन, संपूर्ण निःशस्त्रीकरण, अण्वस्त्र वाढीला बंदी व त्यासाठी तपासणी पथके, मानवतावाद यानाच प्राधान्य दिले. सोव्हिएट रशियन जनतेलाही या युद्धाची झळ पोहोचली होती व पं. नेहरूंच्या याच तत्त्वांचा अवलंब रशियाने केल्याने ; सोविएत रशिया व भारत यांच्या शांतताविषयक जागतिक कामगिरीमध्ये समांतर राहिल्याने भारत-सोविएत मैत्री अधिक जवळ होण्यास मदत झाली.

२२ जानेवारी १९४६ रोजी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या निवासस्थानाभोवती खूपच गर्दी झाली होती. युद्धाची समाप्ती झाली या आनंदासाठी ही गर्दी नव्हती ; तर जगामध्ये शांतता कशी निर्माण होईल यासाठी युरोपमधील विजयदिनाच्या (V.E. Day) प्रसंगी, नागरिक, स्त्रिया, पुरुष, लहान मुले व मुली व सामान्य लष्करी फौजांची कुटुंबिय मंडळी, त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. वॉशिंग्टनमधील " Bring Back Daddy " क्लबांच्या प्रतिनिधीनी हाऊस ऑफिस बिल्डिंगमध्ये त्याकाळचे लष्करी प्रमुख जनरल आयझेनहॉवर यांच्याभोवती पण गर्दी केली होती. लहान-लहान मुलामुलींनी व प्रक्षुब्ध स्त्रियांनी दहा मिनिटे त्यांना वेढा घातला व त्यांच्यावर तक्रारी व मागण्यांचा तुफानी बॉंबवर्षाव केला.

" Bring Back Daddy " या प्रकाराने जनरल आयझेनहॉवर याना लष्कर प्रमुखाच्या जबाबदारीपेक्षाही या सामान्य युद्धाने त्यांची मन:स्थिती दोलायमान झाली. त्याचवेळी सिनेटच्या एका उपसमितीने आग्रहाची मागणी केली होती की, वायुदल आणि नौकादल याना विश्रांती देण्यात यावी वं अद्यापही लष्करात जे २० लाख सैनिक आहेत त्यांना त्वरित लष्करी नोकरीतून मुक्त करावे. युद्धानंतरची भयानक शांतताच मानवी मनाला गिळून टाकत आहे, असाच प्रतिभास होतो. युद्ध आणि शांतता व शांतता आणि युद्ध या द्वंदात पं. नेहरू शांततेचे अणुबाँब होते.

चीन म्हणजे झोपलेला राक्षस आहे. त्याला निद्राधीनच राहू द्या. जर त्याला जाग आली तर सर्व जग तो हादरून सोडील असे नेपोलियन बोनापार्टने म्हटले होते. रशियाच्या पूर्व सरहद्दीवर संघटित व विकसनशील चीनचा उदय झाल्यानंतर अनेक नवीन समस्या निर्माण झाल्या. रशियाच्या जवळच चीन अधिक प्रबळ होऊ लागला व रशियाला शह देऊ लागला. जागतिक इतिहासात राजकीय व भौगोलिक दृष्ट्या चीन प्रबळ ठरू लागला. सोव्हिएट रशियाने इजिप्त, ग्रीस, अर्जेंटिना, पश्चिम जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, युगोस्लाव्हिया व स्कँडिनेव्हिया या राष्ट्रांशी करार केले होते .आर्थिक व तांत्रिक सहकार्यही पुरवले होते आणि ते केवळ फक्त कम्युनिस्ट राष्ट्रांपुरतेच मर्यादित नव्हते तर कम्युनिझम नसलेल्या भारत व अफगाणिस्तान या राष्ट्रांनाही दिले होते.जागतिक राजकारणात चीनचा उदय झाल्यानंतर चीनचे भौगोलिक व राजकीय महत्त्व वाढू लागले. त्यामुळे १९५५ नंतर रशियाने भारतीय मैत्रीत वाढ केली. तर पेकिंगमध्ये नवी राजवट सुरू झाल्यानंतर फेब्रुवारी १९५० मध्ये रशिया व चीनमध्ये तीस वर्षे मुदतीचा मैत्रीकरार झाला. परंतु भारत-चीनचा जो संघर्ष झाला व हा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघटनेत गेला व युद्धतहकुबी चीनने नाकारली. रशियाच्या दबावामुळेच हा नकार दिला असावा. मात्र रशियाच्या दबावामुळे भारत-चीन युद्धाची समाप्ती झाली. जागतिक राजकारणात सामर्थ्याचा कोणत्या कक्षा आहेत याची जाणीव रशियाला झाली होती. तसेच जागतिक परिस्थितीत पं नेहरूंच्यामुळे भारताला फार महत्त्वाचे स्थान निर्माण होत होते याचीही जाणीव रशियाला झाल्यामुळे चीनच्या प्रबळ राजसत्तेला शह म्हणून भारत-रशियन मैत्री अधिक गडद होत गेली. अमेरिका व रशियाच्या अण्वस्त्र स्पर्धेत भारताचे स्थान दोनही राष्ट्रांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे ठरत होते. आशिया व आफ्रिकेतील स्वतंत्र झालेल्या राष्ट्रात, सोव्हिएट रशियाच्या दृष्टीने भारत या देशाने महत्त्वाचे स्थान निर्माण केले होते.

सर्वसाधारणपणे जगातील सर्वांनाच समान संधी कशी मिळेल आणि युद्ध ही संकल्पनाच मानवी मनातून नष्ट व्हावी ; हाच प्रश्न यापूर्वीच्या संस्कृतीपुढे जीवन-मरणाचा यक्ष-प्रश्न म्हणून उभा होता. आपल्या धोरणांची मुख्य उद्दिष्टे ह्याच प्रश्नाच्या अनुरोधाने पं. नेहरूनी आखली व तीच रशियन धोरणांची पण मुख्य उद्दिष्टे असल्याने सोव्हिएट रशिया व भारताचा प्रवास सुरू झाला. त्यात पं. नेहरूंना काही बाबतीत जय-पराजय, मान-अपमान, सारं काही स्वीकारावं लागलं. पण आजच्या जागतिक परिस्थितीचेही अवलोकन करता इराण-इराक युद्ध, इराक व अमेरिका संघर्ष की, ज्यामधे एक लाख ऐंशी हजार जणांना यमसदनाचा रस्ता पत्करावा लागला. आजही पं. नेहरूंची आंतरराष्ट्रीय शांततेची ' पंचशील ' ची शांततामय तत्त्वे दीपस्तंभाप्रमाणेच मार्गदर्शक वाटतात. शांततामय सहजीवनाच्या भावनेतूनच व राजकीय सत्ता समतोलासाठीही सोव्हिएट रशियानेही त्याना मान्यता दिली व कार्यवाहीत पण आणली. त्यामुळे राष्ट्रगटामध्येही सत्तेचा समतोल राहीला गेला. युद्ध आणि वर्ग यातूनच जगाचा विनाश झाला आहे.

रशियाने अण्वस्त्र शक्तिमध्ये वाढ केल्याने रशिया एक अमेरिकेबरोबर स्पर्धा करणारे सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून उदयास आले. अमेरिकेतील कोणत्याही शहरावर हल्ला करण्याचे लष्करी सामर्थ्य

रशियापाशी होते. रशिया व अमेरिका यात युद्ध झाले असते तर रशियाने हायड्रोजन बॉंबसकट सर्व अण्वस्त्रांचा उपयोग केला असता त्याचबरोबर अत्यंत स्फोटक आणि आगलाव्या बॉम्बचा व जंतुयुक्त अस्त्रांचा आणि रासायनिक अस्त्रांचाही वापर करण्याची शक्यता होती. याचप्रमाणे अमेरिकेची पण लष्करी शस्त्रास्त्रे व अण्वस्त्रे रशियाएवढीच प्रभावी होती. अणुयुद्धाने काय साध्य होणार? सर्व जग उजाड होणार व स्मशानवत शांततेचे साम्राज्य! यापेक्षा अधिक काय ते शिल्लक राहते? त्यासाठी युरोपचे रणांगण होऊ द्यायचे नाही यासाठी पं. नेहरू प्रयत्नशील राहीले.

पं. नेहरू आरोग्य, विज्ञान तसेच सांस्कृतिक क्षेत्र यात आवडीने भाग घेत. प्रत्यक्ष निसर्गानेही त्यांना मोठेपणाची अनमोल देणगी बहाल केली होती. भारतातल्याच नव्हे तर सर्व जगभरातील लहान मुला-मुलींचे ते अतिशय बालकप्रिय-आवडते ' नेहरू चाचा ' होते. नेहरूनी रशियाला भेट दिली असता तेथील लहान मुलांतही ते मिसळले. नेहरू चाचा त्यांनाही खूप आवडले आणि त्यांनी नेहरूंच्या जवळ बालहट्ट केला. बोलता बोलता सहजपणाने ती मुले म्हणाली, ' अंकल, आम्हाला खेळायला हत्ती पाहिजे! ' अंकलनी त्याना आठवणीने सांगितले, हत्ती पाठवून देईन, बरं ! भारतात आल्यानंतर नेहरूंनी या रशियन मुलांना भेट म्हणून एक छोटासा हत्ती पाठवून दिला.

यापूर्वी प्राचीन चीन आणि प्राचीन भारत या दोन देशांमध्ये सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय इ. क्षेत्रात घनिष्ठ संबंध होते. बहुतांशी चिनी लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केलेला आहे. चिनी क्रांतिकारक नेत्यांनी आपल्या देशाला साम्यवादाच्या परिपूर्ततेसाठी कडव्या राष्ट्रवादाने एक सामर्थ्यशाली राष्ट्र बनवले. कडव्या राष्ट्रवादाच्या भावनेतूनच लष्कराची अमर्यादित वाढ केली. लष्करातील कडक शिस्त व कडवा राष्ट्रवाद आणि साम्यवाद याद्वारे चीनने शिक्षण, आरोग्य, संस्कृती, तंत्रज्ञान व विज्ञान, शेती आणि अण्वस्त्रशक्ती उत्पादन या क्षेत्रात प्रगतिचा उच्चांक गाठला. साम्यवादाच्या पोलादी चौकटीसाठी सोव्हिएट रशिया हा चीनचा मित्र व मार्गदर्शक होता. पण जागतिक राजकारणातही चीन रशियाशी तुलना करू लागला व प्रबळ होऊ लागला. चीनने सोव्हिएट युनियनलाच आव्हान देऊन सत्तासमतोलासाठी स्पर्धा सुरू केली. जागतिक-सत्तास्पर्धेत रशियाकडे जगातील तिसऱ्या राष्ट्रांचे नेतृत्व होते. चीनचे पंतप्रधान चौ.एन.लाय यांनी १९६३ मध्ये आफ्रिकेला भेट दिली. तेथे त्यांनी रशियाच्या बंधनातून मुक्त व्हायचे व क्रांतीचे आव्हान दिले होते. तर १९६२ मध्ये भारतासारख्या शांतताप्रिय शेजारील देशावर आक्रमण करून अमेरिका व रशिया या दोन समर्थ राष्ट्रांना आश्चर्याचा धक्काच दिला. चीनने ' पंचशील ' तत्त्वांनाच प्रत्यक्ष कृतीमध्ये हरताळ फासला. शांतता, सहजीवन, स्वातंत्र्य, अहिंसा आणि बंधुत्वभाव याना ' हिंदी-चिनी भाई भाई ' म्हणत भारताचा हजारो चौरस मैलावा भूप्रदेश गिळंकृत केला. चीनने अलबेनिया या देशाशी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करून सोव्हिएट रशियाच्या सामर्थ्यशक्तीलाच आव्हान दिले. एवढेच नाही, तर जगातील सामर्थ्यशाली राष्ट्रांत चीनही आहे. या सिध्दतेसाठी १६ ऑक्टोबर १९६४ मध्ये अणुशक्तीचा स्फोट करून, भारत, रशिया, अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, जपान, जर्मनी, आफ्रिका व आशिया खंडातील इतर सर्वच राष्ट्रांना आपल्या लष्करी-सामर्थ्याचे प्रतीक सिद्ध करून दाखवले. भारतावरील आक्रमणानंतर सोव्हिएट रशिया तटस्थ राहिला. एवढेच नाही तर रशियाच्या सामर्थ्यशाली अमर्यादित लष्करी शक्ती व भारत-रशियन अतूट मैत्री व रशियाचा अप्रत्यक्ष दबाव या कारणाने चीनने भारताचा जो काही प्रदेश गिळंकृत करायला सुरुवात केली होती, त्याच पद्धतीने चीनने माघार घेतली.

भारत-चीन संघर्षात चिनी लष्करी फौजा दिल्लीपर्यंत भारताच्या राजधानीपर्यंत धडक मुसंडी मारू शकतील ; पण चीनची राजधानी पेकिंगपर्यंत भारतीय लष्करी फौजा येऊ शकतील, याची भीती मात्र

चीनला नव्हती. भारत-चीन संघर्षात भारताला शांततावादीच भूमिका स्वीकारायला लागली. परंतु स्वतंत्र भारताचे अस्तित्व निर्माण झाल्यानंतर भारताने चिनी आक्रमणाचा प्रतिकार केला आहे. भारताच्या उत्तर सीमेवर भारतीय लष्करी फौजानी अतुलनीय पराक्रम केला. आपल्या देशाची इंच इंच भूमी व तिचे संरक्षण करण्यासाठी, प्रसंगी आपल्या जीवाचे बलिदानही केले. जगामध्ये लोकशाही व कम्युनिझम आणि साम्राज्यवाद यांचा संघर्ष व स्पर्धा सुरू असताना पं. नेहरूनी तटस्थ भूमिकेतून अमेरिकेसारख्या लोकशाहीप्रधान व्यवस्थेच्या गटात किंवा सोव्हिएत रशियाच्या साम्यवादी गटात ; कोणाच्याही आश्रयाला भारत झुकू दिला नाही. चिनी आक्रमणामुळे मात्र रशियनांच्या-भारत मैत्रीलाच एक प्रकारे शह दिला. मात्र या संघर्षात सोव्हिएट रशियाचा-भारत मैत्रीचा अप्रत्यक्ष दबावही चीनने माघार घ्यायला एक कारण ठरला. त्यामुळे सोव्हिएट रशिया म्हणजे साम्यवादाचाच विस्तार ही भावनाच नष्ट झाली. त्याउलट, भारत हा देश लोकशाहीप्रधान व साम्यवादाचा पुरस्कृत असतानाही सोव्हिएत रशियाने भारताशी सर्वच क्षेत्रात मैत्रीचे व सहकार्याचे हितसंबंध प्रस्थापित केल्याने ; आजच्या जागतिक स्पर्धेत जगाच्या नकाशावर भारत हा देश आशियातील एक शक्ती, एक सामर्थ्य म्हणूनच ओळखला जातो. याला कारण म्हणजे पं. नेहरू व रशिया व रशिया आणि भारत मैत्री या संबंधानाच त्याचे श्रेय द्यावे लागेल.

आजच्या जागतिक सत्ता स्पर्धेत सोव्हिएत संघराज्याचे विघटन झाले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातही एक पोकळी निर्माण झाली आहे. आशियामधील सर्व राष्ट्रांनी जागतिक-शांततेसाठी एकत्र यायला पाहिजे हा पं. नेहरूनी मांडलेला विचार आजही मार्गदर्शक व उपयुक्त वाटतो. सोव्हिएत संघराज्यात अनेक नवीन राष्ट्रे उदयास येऊन एकसंघ व प्रबळ रशिया, स्वावलंबी आणि कडवा साम्यवादाचा राष्ट्रप्रेमी व अमर्यादित लष्करी-सामर्थ्याचा सामर्थ्यशाली रशिया, साम्यवादाच्या पोलादी चौकटीचा रशिया, जगातील साम्यवादाचा तत्त्ववेत्ता व मार्गदर्शक सोव्हिएत संघराज्याचे विघटन झाले. सोव्हिएत-संघ राज्याचे तुकडे झाले आणि सोव्हिएत संघराज्याचे विघटन झाल्याने तुर्कमेनीस्तान, युक्रेन, अझरबैझान व बायलोरशिया इत्यादि नवीन राष्ट्रे उदयास आली. अमेरिका व रशिया या जगातील दोन महासत्ता आणि दुसऱ्या महायुद्धानंतर रशिया व अमेरिका या दोन महासत्तांमध्ये शीत-युद्धाचा लपंडाव तर कधी ऊन पावसाचा सतत खेळ चालायचा.

सोव्हिएत संघराज्याच्या विघटनानंतर जागतिक इतिहासामध्ये ' सोव्हिएत-रशिया ' ही महासत्ताच संपुष्टात आल्याने अमेरिका या महासत्तेला शत्रूही उरला नाही व स्पर्धाही संपुष्टात आली. त्यामुळे जागतिक-स्पर्धेलाच ओहोटी लागली आहे. इराक व अमेरिका संघर्ष झाला आणि एक लाख ऐंशी हजारावर लोकांना आपला जीव गमवावा लागला. त्यामुळे या आधुनिक जगाची प्रगति आणि विकास तर जागतिक-शांततेलाच ग्रहण लागले आहे. सोव्हिएत संघराजाच्या विघटनामुळे बहुसंख्य मुस्लिम व कडवा धर्मवाद आणि इस्लामिक युनियन व एकता याना महत्त्व आल्याने जगाच्या नकाशावर ' इस्लामिक-राष्ट्रांची ' एक फळी तयार झाली आहे. त्यामुळे आता जगातील प्रबळ सत्तांमध्ये जपान, जर्मनी, अमेरिका व चीन या सामर्थ्यशाली शक्तिगटामध्ये ' इस्लामिक राष्ट्रांच्या ' फळीचाही समावेश करावा लागेल. सोव्हिएत प्रजासत्ताक राज्यांमध्ये तुर्कस्तान, अझरबैझान व इराण या शक्तिचेही महत्त्व वाढू लागले. सोव्हिएट संघराज्याच्या विघटनानंतर उझबेकिस्तान, ताजकिस्तान, किर्गीस्तान, अझरबैझान, आणि तुर्कमेनीस्तान ही आता स्वतंत्र राष्ट्रे निर्माण झाली आहेत. त्यांना पूर्वी ' आशियाई-प्रजासत्ताक राज्ये ' म्हणून ओळखत. जगाच्या नकाशावर यापूर्वी एकूण ४३ इस्लामिक राष्ट्रे अस्तित्वात होती. सोव्हिएत-संघराज्यांच्या विघटनानंतर उझबेकिस्तान, ताजकिस्तान, किर्गीस्तान,



एन ४३९४-१०

अझरबैझान व तुर्कमेनीस्तान या इस्लामिक राष्ट्रांच्या स्वतंत्रपणाने आता ४८ इस्लामिक राष्ट्रे यापुढे जगातील सत्ता स्पर्धेत भाग घेणार.

सोव्हिएत संघराज्याच्या विघटनानंतर यापूर्वी पं. नेहरूनी उदधृत केलेला नवआशियावाद व त्याचे एकत्रीकरण तर जगाच्या इतिहासात नवीन राष्ट्रांची तटस्थता किंवा त्यांचा सहभाग, स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व तर जागतिक-शांतता, गटनिरपेक्षता, संपूर्णपणे निःशस्त्रीकरण , अण्वस्त्र-विरोध याना पुन्हा महत्त्व प्राप्त होणार.

जगातील आजच्या इतिहासातील घटना पाहता अशांति, अतिरेकी दहशतवाद, युद्धाचे संघर्ष इराक-इराण-अमेरिका, सोव्हिएट संघराज्याचे विघटन, धर्मवाद आणि याशिवाय लष्करी सामर्थ्यात वाढ करणे, जागतिक-स्पर्धेसाठी, समर्थतेसाठी अण्वस्त्रशक्तिची व रासायनिक जंतुनिर्मितीसारखी मानवी सर्वसंहारक शस्त्रास्त्रे निर्माण करणे; यामुळे पुन्हा एकदा तिसऱ्या महायुद्धाचा घंटानाद होणार आणि या युद्धाच्या भीषण आगीच्या भडक्याने पुन्हा एकदा वडवानल पसरणार. कारण प्रत्येक युद्धाच्या व महायुद्धाच्या समाप्तीमध्येच त्यापुढील युद्धाची बीजे रोवली गेली असतात. त्यामुळे पं. नेहरूंच्या एकसंघ, एकत्र नवआशियावादाची महान तत्त्वे पुन्हा एकदा सर्व जगाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक वाटू लागतील.

पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली १९४७ मध्ये भारताची राजधानी दिल्ली येथे पहिली आशियाई शांतता परिषद झाली व या जागतिक-शांतता परिषदेला व आशियाच्या एकतेसाठी जगातून २८ आशियाई राष्ट्रांतील प्रतिनिधी हजर होते. विशेष म्हणजे सोव्हिएत संघराज्यातील आशियाई प्रजासत्ताक राज्यांचे प्रतिनिधीही या शांतता-परिषदेला हजर राहिले. या परिषदेत पं. नेहरू म्हणाले, " जग सध्या संघर्षातून व संकटाच्या रस्त्यावरून वाटचाल करत असताना, आजच्या भौतिक समृद्धीच्या व आधुनिक विज्ञान प्रगतीच्या अण्वस्त्रयुगात, शांतता प्रस्थापित करायची असेल तर आशियाचा सहभाग असल्याशिवाय जगामध्ये अपेक्षित शांतता प्रस्थापित होणार नाही. त्यासाठी शांततामय सहजीवन अस्तित्वाच्या भावनेतूनच आशियातील राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये परस्पर सहकार्य वाढले पाहिजे." आजच्या संघर्षमय जगात जागतिक राजकारणातही प्रचंड उलथापालथी होत आहेत. सोव्हिएट रशियाचा चेहरा-मोहराच बदलला आहे. अमेरिकेला स्पर्धात्मक जगातील स्पर्धेचा प्रतिस्पर्धी राहिला नाही. त्यातून जगाच्या नेतृत्वस्पर्धेत इतरही राष्ट्रे उतरतील. यादृष्टीने पाहता पं. नेहरूंचा आशियाच्या पुनरूज्जीवनाचा ; एक नवा दुर्दम्य आशावाद मार्गदर्शक वाटतो.

पंडित नेहरू ' ऋतुराज ' होते ; निसर्गप्रेमी होते आणि उत्कृष्ट साहित्यिक पण! पंडित नेहरूंना कला, क्रीडा, संस्कृती, नाट्याभिरूची, नृत्यकलेबद्दल आदर होता. ते आरोग्य, विज्ञान तसेच सांस्कृतिक क्षेत्रातही आवडीने रस घेत. सोव्हिएत रशियातील प्रत्येक घरात पं. नेहरूंच्याबद्दल आदर होता. रशियातील अझरबैझानच्या सुप्रसिद्ध रशियन कलाकार एलीमीरा रागीमोवा या जवाहरलाल नेहरूंना आपल्या पित्यासमान मानत. त्यांनी पंडित नेहरूंची एक हृद्य आठवण ' सोविएत-देश ' मासिकात दिली होती. एलीमीरा रागीमोवा ह्याना भारतीय गीते खूप आवडत व या गाण्यातील शास्त्रीय संगीत व रागदारीबद्दल त्याना खूप आदर वाटे. भारत-सोव्हिएत मैत्रीबाबत मॉस्को येथे २१जानेवारी १९५५ मध्ये एक उत्सव आयोजित केला होता. त्यासाठी एलीमीरा रागीमोवा याना खास निमंत्रित केले होते. या कार्यक्रमास श्रोत्यांमध्ये भारताचे राजदूत श्री. के. पी. एस. मेनन उपस्थित होते. या कार्यक्रमाला एलीमीरा रागीमोवा यांनी भारतीय चित्रपटातील ' बैजू बावरा ' व ' आवारा ' या चित्रपटातील प्रसिद्ध गाणी गायली. हा सोव्हिएत रशियात झालेला भारतीय सांस्कृतिक कार्यक्रम

भारतीय राजदूतांना खूप आवडला. कार्यक्रम संपल्यानंतर एलीमीरा रागीमोवा यांची प्रत्यक्ष भेट घेऊन भारताचे राजदूत श्री. मेनन यांनी तिची प्रशंसा तर केलीच पण एक भारतीय या नात्याने भारतीय दृष्टिकोनातून कार्यक्रम खूप-खूप आवडला असे सांगितले.

जाताना त्यांनी तिला बजावले की, मी ज्यावेळी दिल्लीला जाईन, त्यावेळी आपल्या भारतीय सांस्कृतिक प्रेमाबद्दल व कलेबाबत भारताच्या पंतप्रधानांच्याकडे मी तुमची प्रशंसा करणार आहे. एलीमीरा रागीमोवा यांच्या भारत-भेटीपूर्वीच त्यांचे भारतीय गाण्यांचे कार्यक्रम अझरबैझान या प्रमुख शहरात श्रोते ऐकत असत व त्यानाही ते खूप आवडत. एलीमीरा रागीमोवा यांनी भारतीय चित्रपट पाहिले व त्यांना ते खूप आवडले. या आवडीतूनच व त्यातील गाणी आठवणीत ठेवून, प्रथम गाणी व तीही चक्क भारतीय भाषेत शिकून घेतली व या गाण्यातील अवीट गोडी व मधुरता, रशियन जनतेपुढेही सादर करावीत असे त्यांना वाटू लागले.

एलीमीरा रागीमोवा या रशियन कलाकाराला सप्टेंबर १९५७ मध्ये भारताचे पंतप्रधान पं. नेहरूनी भारत-भेटीच्या निमंत्रणाची तार पाठवली आणि या रशियन कलाकाराच्या आनंदाला पारावार उरला नाही. एलीमोरा रागीमोवा हिने भारतात आल्यानंतर रविंद्रनाथ टागोरांच्या " शांतिनिकेतन " या विश्वविद्यालयात कला विभागाच्या पहिल्या वर्षात प्रवेश घेतला. तेथील विद्यार्थ्यांना पं. नेहरूंच्या भेटीचा योग आला. त्यावेळी एलीमीरा रागीमोवा रशियन असूनही तिने भारतीय साडी परिधान केली होती. सर्वांनीच भारतीय साड्या परिधान केल्या होत्या त्यामुळे या सर्वांतून नेमकी पाश्चिमात्य देशातून आलेली रशियन मुलगी पं. नेहरूना ओळखता येणे कठीण झाले. एलीमीरा रागीमोवा ही मुलींच्या रांगेत पं. नेहरूंच्या समोरच उभी होती. त्यानंतर पं. नेहरूनी अतिशय उत्सुकतेने विचारले की, " सोव्हिएत संघातर्फे इथे शिकायला आलेली मुलगी कुठे आहे? " त्यावेळी एलीमीरा रागीमोवाचा परिचय करून देण्यात आला. त्यावेळी परिचय करून देणाऱ्यावरही पं. नेहरूंचा विश्वास बसेना. कारण एलीमीरा रागीमोवा ही रशियन कन्यका पूर्णपणे भारतीयच वाटत होती व दिसत होती व भारतीयच झाली होती. तिने भारतीय वेष परिधान केल्याने ती रशियन आहे हेही ओळखता येणे कठीण झाले होते.

पं. नेहरूनी आपल्या सचिवाकडे वळून सांगितले, " या कन्येस उद्या माझ्याकडे चहाचं निमंत्रण दिलंय " आणि त्यावेळी तिला संपूर्ण सोव्हिएत रशियाचाच तिकडील रशियन वेष परिधान केलेल्या स्वरूपातच पाहणे मला आवडेल. दुसऱ्या दिवशी शांतिनिकेतन विश्वविद्यालयातील परदेशी विद्यार्थी व विद्यार्थीनी समवेत एलीमीरा रागीमोवा पं. नेहरूंच्या भेटीस गेल्या. त्यावेळी तिने अझरबैझानचा राष्ट्रीय वेष परिधान केला होता. तिला पाहताच पंडितजी उद्‌गारले, " आता तू खरोखरच रशियन वाटतेस ! " नेहरूनी तिला अझरबैझानचे राष्ट्रगीत म्हणावयास सांगितले. तिने अझरबैझानचे राष्ट्रीय गीत तर म्हटलेच पण त्याशिवाय ' बैजू-बावरा ' व आवारा या हिंदी चित्रपटातील पण रागदारीतील गाणी म्हटली. त्यावर नेहरूनी तिला विचारले–

" तुला या गाण्यातील ओळींचा अर्थ माहीत आहे का ? " तिने होकार देताच प्रत्येक गाण्याच्या ओळीचा अर्थ पंडितजीनी तिच्याकडून ऐकून घेतला आणि त्यावर पं. नेहरूनी ; भारताच्या पंतप्रधानानी तिला म्हटले, " परमेश्वराच्या चुकीनेच तुझा जन्म अझरबैझानमध्ये झाला, मला आश्चर्य वाटतंय की तू खरोखरच भारतीय कन्या आहेस. त्यानंतर पुन्हा ज्यावेळी पंडितजी " शांतिनिकेतन " या विश्वविद्यालयाच्या दिक्षांत समारंभास आले त्यावेळी एलीमीरा रागीमोवा हिने " संत मीरा " ची भावमधुर भजने गाऊन दाखवली. सर्वांना ' संत मीरा ' च्या काळाची तर आठवण देऊन मंत्रमुग्ध

करून सोडले. यावेळी पं. नेहरूपण तिची कलेमधील प्रगती पाहून भारावून गेले. दुसऱ्या वर्षी तिने भारतीय राष्ट्रीय नृत्यांचा अभ्यास सुरू केला.

एलीमीरा रागीमोवा हिचे आई-वडिल परदेशात. पण पंडितजी १८-१८ तास कामात मग्न असतानाही, तिच्याबाबत आपुलकीने चौकशी करत. तिच्या शांतिनिकेतन विश्वविद्यालयातील शिक्षणाच्या प्रगतिबाबतही आस्थेने विचारपूस करत, याचा तिला अभिमान वाटे. शांतिनिकेतन विश्वविद्यालयातील आपला शिक्षणक्रम पुरा केल्यानंतर एलीमीरा रागीमोवा हिने भारताला तीन वेळा भेट दिली होती आणि तेव्हा दुर्दैवाने नेहरूजी हयात नव्हते. ती ज्यावेळी प्रथम पं. नेहरूना भेटली होती, त्याची आठवण तिला प्रत्येक भारत भेटीच्या वेळी प्रकर्षाने तर झालीच; पण त्याची आठवण आजही तिच्या मनावर कोरून राहिली आहे. भारत भेटीच्या वेळी ती आठवण पुन्हा तशीच्या तशीच जिवंत आहे, याचाच तिला सदैव भास होत राही. एका रशियन कलाकाराच्या मनातील नेहरूंचे स्थान हे त्यांच्या जागतिक कीर्तीपेक्षाही महान वाटते. एलीमीरा रागीमोवा हिने म्हटले, " पंडितजींच्या सहृदय स्वभावातील आठवणींचा एक पैलू मी आयुष्यभर जतन करून ठेवला आहे की, ज्यांनी तिच्या प्रगतिसाठी वैयक्तिकपणे जिव्हाळा दर्शविला होता. भारताचे पंतप्रधान या नात्याने नाही, तर कलाकारांच्या ह्रदयातही आज पंडितजी वास करत आहेत. अद्यापही एलीमीरा रागीमोवा हिला पंडितजींची सहृदय आठवण येताच तिच्या ओठावर नकळत शब्द येतात, " पंडितजी मला वडिलांसमान होते आणि पुन्हा आठवणीने डोळ्यातून दोन अश्रू वाहून जातात. कारण आता तिचे कोडकौतुक करायला . . . . . प्रेमळ पंडितजी थोडेच परतणार! एवढे मात्र खरे की,

" Who lives if India dies ? Who dies if India lives ? "

पंडित नेहरूनी आपल्या ' भारताचा शोध ' या ग्रंथात ' महाभारत ' व ' रामायण ' या दोन महाकाव्याविषयी लिहीले होते. रामायण आणि महाभारत या दोन महाकाव्यांचा परिणाम भारतीयांच्या मनावर सदैव कोरून राहिलेला आहे. रामायण व महाभारतातील भारतीय संस्कृती, इतिहास व सांस्कृतिक दर्शन व त्यातील घटना यामुळे प्रत्येक भारतीयाला त्याच्या लहानपणापासूनच अभिमानाच्या वाटतात. रशियासारख्या समृद्धशाली राष्ट्रातही रामायणाचे कार्यक्रम रशियन कलाकार सादर करत. ८ सप्टेंबर १९६१ मध्ये मॉस्को येथे रशियन कलाकारांनी ' रामायण ' सादर केले. या कार्यक्रमाला पंडितजी हजर होते. रामायण कार्यक्रमाच्या मध्यांतरानंतर नेहरूनी या सर्व रशियन कलाकारांची भेट घेतली व सर्वांबरोबर हस्तांदोलन केले व कार्यक्रम खूप आवडला. असे प्रकर्षाने सांगितले.

मध्यंतरानंतर कार्यक्रम सादर करताना या रशियन कलाकारांना असं वाटू लागलं की, भारतीय इतिहास, भारतीय जनता व सारा भारतच त्यांचा कार्यक्रम पं. नेहरूंच्या दृष्टिकोनातून पाहत आहेत. सोव्हिएत रशियाच्या मॉस्को येथील बाल-नाट्य संस्थेतील प्रसिद्ध रशियन कलाकार गैनेडी पेचनिकोव हे नेहरू पुरस्कार विजेते होते. मॉस्को येथील केंद्रीय बालनाट्य संस्थेद्वारे १९६० मध्ये त्यांनी " रामायणावर " प्रदर्शन भरवले होते. १९६० पासून ते ' रामायण ' मध्ये प्रभु श्रीरामचंद्राची प्रमुख भूमिका करत व ती प्रमुख भूमिका त्यांनी आतापर्यंत एकूण १५० नाट्यप्रयोगांत केली. ८ सप्टेंबर १९६१ मध्ये सोव्हिएत रशियाच्या राजधानीत मॉस्को '-येथे त्यांनी भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांच्यासमोर आपला ' रामायणा 'चा नाट्यप्रयोग सादर केला आणि त्याची आठवण ज्या ज्या वेळी ते रंगभूमीवर रामायणाचा प्रयोग सादर करीत ; त्यावेळी आपल्या नाट्यकला प्रयोगाला भारताचे

पंतप्रधान पंडित नेहरू हजर होते व त्यांनी त्यांचे व सर्व कलाकारांचे जे कौतुक केले त्या आठवणीची जखम गैनेडी पेचनिकोव यांना व त्यांच्या सहकलाकारांना सदैव घायाळ करते.

१९७४ मध्ये मॉस्को येथील या केंद्रीय बालनाट्य संस्थेने भारत दौरा केला होता. १९७१ मध्येच या केंद्रीय बालनाट्य संस्थेने ' रामायणाचा ' १५० वा नाट्यप्रयोग सादर केला होता. पंडित नेहरूंनी-भारताच्या पहिल्या पंतप्रधानानी-या रशियन नाट्यसंस्थेचा ' रामायणाचा ' पहिला प्रयोग पाहिला याची जिवंत आठवण त्या सर्व रशियन कलाकारांना प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी टोकत राहते आणि भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू ; याही कार्यक्रमाला हजर आहेत असाच भास त्याना सदैव होत राहतो. रामायण या नाट्यप्रयोगात मध्यंतर झाले की, या सर्व रशियन कलाकारांता असेच वाटते की, " पंडितजी आपल्या भेटीस येत आहेत."

पंडित नेहरू आणि रशिया ; तसेच रशिया, रशियन कलाकार आणि पंडित नेहरू, सोव्हिएत रशिया आणि भारत ; सोव्हिएत रशिया यातील मैत्री, प्रेम, सौहार्द व एकरूपता यातील विरोधाभासच लुप्त होऊन जातो.

□ □ □

# नेहरू : विज्ञान आणि तंत्रज्ञान

□ डॉ. वसंत गोवारीकर
अनु. दीपा गोवारीकर

स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रीमंडळाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी कार्यभार स्वीकारला; त्यावेळी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अखत्यारीत असणाऱ्या तीन विषयांपैकी "वैज्ञानिक संशोधन" हा एक विभाग होता. दुसरे दोन विभाग म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंध व राष्ट्रकुलातील देशांशी संबंध. तेव्हापासून विज्ञान व तंत्रज्ञान हा विभाग नेहमी पंतप्रधानांच्या अखत्यारीतच राहत आला आहे. यावरून या विभागाचे अत्युच्च राजकीय महत्त्व सिद्ध होते. वास्तविक या देशात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची परंपरा हजारो वर्षांपासून चालत आलेली असली तरी, फक्त स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने त्याचा सामाजिक आणि आर्थिक बदल घडवून आणण्याची प्रमुख शक्ती म्हणून जाणीवपूर्वक विकास केला.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांत आपण कितपत प्रगती करू शकलो ? या प्रश्नाचे उत्तर देणे वाटते तेवढे सोपे नाही. कारण विज्ञान आणि तंत्रज्ञान हे अति महत्त्वाचे विषय असले तरी सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन केवळ विज्ञानावर अवलंबून नाही. बऱ्याच वेळा प्रगतीसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान उपलब्ध असतानाही प्रगती होत नाही असे दिसते. कारण समाज आणि समाजामधील काही घटक विज्ञानावर आधारित प्रगतीला अडथळा उत्पन्न करतात. अशा तऱ्हेने गेल्या चार दशकांतील विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांतील आपली कामगिरी भरीव म्हणण्याजोगी असली, किंबहुना अभिमान वाटावा अशी असली; तरी या दोन्हींच्या साह्याने या देशाने जे साध्य करावयास हवे होते ते साध्य झाले आहे असे म्हणता येणार नाही व ही खरी विचार करावयास लावणारी बाब आहे.

अद्यापही असे दिसते की शैक्षणिक, संशोधनात्मक आणि विकासविषयक प्रयत्न आणि विज्ञान तंत्रज्ञानाच्या पायावरील आर्थिक व्यापारविषयक व औद्योगिक साधने यांचा योग्य, अतूट असा परस्पर संबंध निर्माण झालेला नाही.

### वर्तमानस्थिती

स्वातंत्र्योत्तर काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील विशेष निर्देश करण्याजोगे काय आहे ? तशा बऱ्याच गोष्टींचा उल्लेख करता येईल. विशेषतः आपल्या मानवी साधनाकडे पाहा. आपले वैज्ञानिक, तंत्रज्ञ, कुशल कारागीर हे उच्च दर्जाचे आहेत. कुशाग्र बुद्धीमत्ता आणि कठीण परिश्रमाच्या बाबतीत जगातील कोणत्याही देशाच्या शास्त्रज्ञांपेक्षा ते कमी नाहीत; तर काही बाबतीत सरसच आहेत. या बाबीचा पुरावा म्हणून अत्यंत पुढारलेल्या देशा.नील विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांतील व संयुक्त

राष्ट्रांच्या संकुलातील अत्युच्च पदे भूषविणाऱ्या भारतीयांचा निर्देश करता येईल. तसेच, व्यक्तिशः भारतीय वैज्ञानिकांनी, वैज्ञानिक ज्ञानात अत्यंत मोलाची भर घातलेली आहे. मूळ ढाच्याचा विचार करता, आपणाकडे संस्था आहेत, संघटन आहे व कोणत्याही क्षेत्रात काम करणाऱ्या क्रियाशील शक्ती आहेत. त्यातील काही जुन्या आहेत, तर काही नव्याने स्थापन झालेल्या आहेत. तसेच आपण अनेक पातळ्यावर जोडणी करण्यासाठी काही कार्यपद्धती प्रस्थापित केलेल्या आहेत. विज्ञानाच्या अनेक क्षेत्रात मग ते शेती असेल, आरोग्य असेल, आंतरिक्ष संशोधन किंवा अणुशक्ती असेल. आपण दैदिप्यमान यश संपादन केल्याची एकटी दुकटी का असेनात; पण उदाहरणे आहेत. यात दुग्धोत्पादन, रसायने, प्रक्रिया केलेले अन्न, उपयोग्य वस्तु व जड उत्पादने आदिंचाही समावेश करावा लागेल. या सर्व गोष्टीवरून हे लक्षात येईल की विज्ञानासाठी आवश्यक असलेली माणसे, साधने, कार्यपद्धती या सर्व गोष्टी आपल्याकडे आहेत.

स्वातंत्र्य प्राप्तीच्या नंतरच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा पाया निर्माण करणे व मूळ ढाचा तयार करणे या बाबतीत एक विशिष्ट दिशेने आपण पुढे गेलो पण आता मात्र वेगळ्या दिशेने प्रयत्न करण्याची गरज आहे. एका अर्थाने पाहता आज आपल्याजवळ जे आहे त्याला एका मोठ्या गुंतागुंतीच्या " भारतीय कोड्याचे " तुकडे असे संबोधता येईल आणि हे तुकडे किंवा भाग आपण एकत्र आणून एक सुसंबद्ध आकृती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहोत. पण हे सर्व विभाग एकत्र केल्यानंतरचे चित्र कसे असेल याची मात्र आज कोणालाही सुस्पष्ट कल्पना नाही. एवढेच नव्हे ; तर अंतिमतः तयार होणाऱ्या भारतीय कोड्याच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या एका भागाविषयीसुद्धा आपल्या कल्पना सुस्पष्ट नाहीत. पायाभूत विज्ञान की जीवनास लागू करावयाचे विज्ञान ? तंत्रज्ञानास द्यावयाचे अग्रक्रम आदिबाबतीत अद्यापही प्रश्न उभे आहेत. विज्ञान तंत्रज्ञानाच्या साह्याने आपणास कोणते उद्दिष्ट साध्य करावयाचे आहे? दुसऱ्या शब्दात, आपल्याकडे व्यापक आराखडा तयार आहे का? नसेल तर तो असावयास हवा व त्याची सुस्पष्ट व्याख्या आपण करायला हवी आणि आपल्याजवळ जी साधने आहेत त्यांच्या साह्याने आपण तो आराखडा पूर्ण करण्याकडे वाटचाल करायला हवी.

**भवितव्य! आपणास कोठे जायचे आहे?**

प्रगतीचा व्यापक आराखडा हा देशातील सार्वत्रिक आकांक्षेचे एक व्यक्तीकरण असते. ते एक स्वप्नच असते. सुरुवातीला हे स्वप्न प्रत्यक्षात उतरणे केवळ अशक्य आहे असे वाटते आणि ते तसे प्रत्यक्षात उतरले तर तो मोठ्या समाधानाचा व अभिमानाचा भाग असतो. हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी फार मोठ्या आव्हानांचा सामना करून भव्य यश संपादन करावे लागते. ही मोठी आव्हाने प्रेरणादायी असून ती आपणास खुणावत असतात. सर्वमान्य स्वीकारार्ह उद्दिष्ट म्हणून अशा व्यापक आराखड्याची संकल्पना तयार झाली पाहिजे. हे सर्वमान्य, स्वीकारार्ह उद्दिष्ट एखाद्याच्या वैयक्तिक उद्दिष्टापेक्षा वरच्या पातळीवरचे, अधिक विशाल व अधिक कठीण असेल आणि ते साध्य करण्यासाठी अनेक घटकांनी एकत्र येऊन परस्पर संमतीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

अलीकडील काही वर्षांत, गेल्या चाळीस वर्षांतील कार्यपद्धतीपेक्षा वेगळ्या तऱ्हेने कार्य करण्याची पद्धत अस्तित्वात येते आहे. या नव्या टप्प्यात, अगोदर तयार असलेल्या ढाच्याचा व अस्तित्वात असलेल्या कुशलतेचा वापर करून समस्या सोडवण्यावर मुख्य भर आहे.

व्यापक आराखड्याचा उल्लेख वर केलेला आहे. मोठी कामगिरी किंवा तत्सम योजना या मोठ्या आराखड्याचा एक भाग असतात. सर्वोच्च उद्दिष्ट गाठण्याच्या वाटचालीतील एक टप्पा म्हणून अशा वैयक्तिक कामगिऱ्यांचा उल्लेख करावा लागेल.

जीवनातील वास्तव कामगिऱ्यांचे स्वरूप अनेकांगी असते म्हणून त्या पूर्ण करण्यासाठी केंद्र व राज्ये यांच्या नियंत्रणाखालील अनेक विभागांचा अंतर्भाव करावा लागतो. विज्ञान तंत्रज्ञानाच्या बाबतीत वापरली गेलेली व्यवस्थापनाची तत्त्वे यशस्वी ठरली आहेत आणि तीच तत्त्वे ; शासकीय विभाग आणि घटक यांच्यात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी वापरण्याचे उद्दिष्ट आहे.

शेवटी मला असे म्हणायचे आहे की, स्वातंत्र्य प्राप्त झाले तेव्हा आपल्याकडे विज्ञान तंत्रज्ञानाचा पाया तयार नव्हता पण आता सर्व बाबतीत आपण सिद्ध झालो आहोत. म्हणून विज्ञान तंत्रज्ञानाच्या साह्याने प्रगतीची मोठी झेप घेणे म्हणजेच प्रगतीचा '' व्यापक आराखडा '' प्रत्यक्षात उतरविणे आपणास शक्य आहे. पाकिस्तानमधील नोबेल पारितोषिक विजेते डॉ.अब्दुल सलाम यांनी भारत एक महासत्ता होऊ पाहतो आहे असे भाकित वर्तविले आहे; आणि आता आपल्याकडे तयार असलेल्या विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या पार्श्वभूमीकडे पाहता त्यांचे भाकित महत्त्वपूर्ण व अर्थपूर्ण वाटते. आम्हा शास्त्रज्ञांना ठाम विश्वास आहे की महासत्ता होण्याची प्रक्रिया आम्ही सुरू केली आहे.

□ □ □

# पं. जवाहरलाल नेहरू, भारतीय राष्ट्रवाद आणि धर्मनिरपेक्षता

□ डॉ. ज. रा. शिंदे

भारतीय राष्ट्रवादाच्या विकासाची प्रक्रिया येथील प्रदीर्घ वसाहतिक राजकारणाच्या प्रभावामुळे अत्यंत गुंतागुंतीची आणि क्लिष्ट बनली होती. त्या गुंत्यातून भारत बाहेर पडला आहे, असे आजही म्हणता येणार नाही. किंबहुना भूतकालाने निर्माण केलेल्या प्रश्नांच्या भोवऱ्यात स्वातंत्र्योत्तर ४०-४२ वर्षांत देश अधिकच अडकत चालला आहे. या गुंत्याला अनेक पदर होते आणि आहेत. तरी स्वातंत्र्यपूर्वकाळात या गुंत्याचा मुख्य पीळ प्रादेशिकवाद आणि जमातवाद या दोरांभोवती होता. आजही हाच पीळ राष्ट्रवादाच्या विकासात अडसर निर्माण करीत असून विघटनाच्या प्रक्रियेस चालना देत आहे.

वसाहतपूर्व काळातसुद्धा देशात भिन्न प्रांतीय प्रादेशिक राष्ट्रवादाबरोबरच अखिल भारतीय राष्ट्रवादही अस्तित्वात होता.[१] पैकी प्रादेशिक राष्ट्रवाद लोकांच्या दैनंदिन अनुभवविश्वाशी निगडीत असल्याने अखिल भारतीय राष्ट्रवादाच्या तुलनेने जनमानसात अधिक खोलवर रुजलेला, जिवंत आणि प्रबळ होता. विविध प्रांतीय लोकांच्या, स्थूल एकतेच्या अस्पष्ट जाणिवेच्या स्वरूपात अखिल भारतीय राष्ट्रवादही त्यावेळी अस्तित्वात होता.[२] परंतु या दोन्ही जाणीवा सांस्कृतिक पातळीवर असल्याने एक दुसरीस मारक ठरत नव्हती. पुढे ब्रिटिश काळात वसाहतिक राजकीय अर्थकारणाच्या प्रभावाने समाजात नवे वर्गीय तणाव निर्माण झाले. परिणामी या दोन्ही जाणिवांना एकाच वेळी राजकीय आशय प्राप्त झाला.[३]

भारतातील भिन्न प्रांतीय शिष्टजनांना एकत्र आणून १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात आली. १९०७ पर्यंत या काँग्रेसवर मवाळ गटाचे प्रभुत्व होते. ही सर्व मंडळी पाश्चिमात्य विद्याविभूषित होती आणि युरोपमधील उदारमतवादी विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. यांनी हाताळलेले प्रश्न अखिल भारतीय व्याप्तीचे परंतु केवळ सुशिक्षित शिष्टजनांशी निगडीत असे होते. त्यामुळे सुशिक्षित वर्गात काही प्रमाणात राष्ट्रीय जागृती झाली. तरी वर्गीय चाकोरीतून भारतीय प्रश्नांकडे पाहिले गेल्याने व्यापक अर्थाने राष्ट्रीय जागृती यातून निर्माण होण्याची शक्यताच नव्हती.

पुढे १९०८ नंतर काँग्रेसवर जहालांचे वर्चस्व वाढले. तरी जहालांच्या रूपानेही काँग्रेसमध्ये सुशिक्षित मध्यम वर्गाचाच क्रियाशील सहभाग होता. काँग्रेसचे वर्गीय स्वरूप तेच राहिले, तरी यावेळी ब्रिटिश सत्तेचे स्वरुप आणि राष्ट्रीय चळवळीची भूमिका या दोन्ही बाबतीत आधीच्या मवाळ नेतृत्त्वाहून या नव्या जहाल नेतृत्त्वाचा दृष्टिकोन भिन्न होता. ब्रिटिश सत्ता एकंदरीने भारतासाठी उपकारक आहे.

या सत्तेशी मिळतेजुळते घेऊन आपल्या मागण्या क्रमाक्रमाने पदरात पाडून घेता येतील, असा मवाळांचा विश्वास होता. या उलट ब्रिटिश सत्ता उपकारक वगैरे काही नाही. भारतास गुलाम करून त्याचे शोषण करण्यासाठी इंग्रज येथे आले आहेत. त्यांच्याशी संघर्ष करूनच आपल्याला आपले हक्क प्राप्त करून घ्यावे लागतील; अशी जहाल नेतृत्त्वाची धारणा होती. यासाठी मवाळ नेतृत्त्वाची कार्यपद्धती उपयोगी नव्हती.

साम्राज्याशी संघर्ष देणे मूठभर सुशिक्षितांना जमणार नव्हते. त्यासाठी जनतेचा व्यापक पाठिंबा मिळवावा लागणार होता. धार्मिक आव्हानांचा आणि प्रतिकांचा वापर केल्याने राष्ट्रीय प्रश्न भावनात्मक बनवणे सोपे जाणार होते. जहाल नेतृत्त्व हा मोह आवरु शकले नाही. नेतृत्त्वाच्या वर्गीय मर्यादांच्या दृष्टीने त्यांच्यासमोर अन्य पर्याय नव्हता.

या नव्या पवित्र्यात, पुरातन भारतीय परंपरेचा गौरव ओघानेच येत होता. पौर्वात्यवादी युरोपियन लेखकांनी हे कार्य आधीच सुरू केले होते. श्री. अरविंद घोष या नव्या विचारास आणि कार्यपद्धतीस तात्त्विक अधिष्ठान पुरवित होते. ॲनी बेझंट हा विचार लोकप्रिय करीत होत्या. आधीच परंपरानिष्ठ असलेल्या भारतीय समाजात हा विचार रुजण्यास वेळ लागला नाही. राष्ट्रीय विचार आणि राष्ट्रकार्य हे धार्मिक कर्तव्य म्हणून लोकांपुढे मांडले जाऊ लागले. राष्ट्रवादाच्या या उसळत्या लाटेत प्रादेशिक वाद स्वाभाविकच चेपला गेला. त्याला दुय्यम स्थान प्राप्त झाले. या नव्या पवित्र्याचा एक परिणाम असा की, त्यामुळे मागील प्रदीर्घ सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीच्या कमाईवर पाणी पडले.[१] सामाजिक-धार्मिक सुधारणेचा विचार म्हणजे जणू देशद्रोह अशा पवित्र्यात पुरातन परंपराभिमानी जहाल राष्ट्रवादी वागू बोलू लागले. परिणामी सामाजिक सुधारणा चळवळ खंडित झाली.

याशिवाय राष्ट्रीय प्रश्न धार्मिक बनवण्याच्या जहालांच्या खटाटोपाचा राष्ट्रीय विकास क्रमावरही परिणाम दिसू लागला. मुस्लिमांना राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहण्याचा सल्ला, सर सय्यद अहमदखान यांनी १८८५ मध्येच दिला होता. उत्तरेकडील काही सुशिक्षित मुस्लिम या विचाराने प्रभावित झाले होते. अन्यत्र मात्र याचा फारसा प्रभाव झाला नव्हता. परंतु धर्म आणि राजकारण एकरूप करण्याच्या जहालांच्या पवित्र्यामुळे, सर्वत्रच सुशिक्षित मुस्लिम राष्ट्रीय चळवळीकडे संशयित नजरेने पाहू लागले. ते हळूहळू ब्रिटिश साम्राज्याचे समर्थन आणि त्यास सहकार्य करू लागले. ब्रिटिशांना ते हवेच होते. त्यांनी या दुहीस खतपाणी पुरविले. राष्ट्रीय चळवळ दुभंगली.

दोन जमातीतील तणाव नाहीसा करून राष्ट्रीय चळवळीचे सामर्थ्य वाढविण्यासाठी टिळकांनी अखेर पृथकतावादी मुस्लिम नेत्यांबरोबर " लखनौ करार " केला. यामुळे टिळकांचे उद्दिष्ट काही अंशी सफल झाले. यामुळे राष्ट्रीय चळवळीस तात्कालिक स्वरूपाचा काही फायदा झाला. परंतु राष्ट्र उभारणीच्या दूरगामी उद्दिष्टावर याचा अनिष्ट परिणाम झाला. खरे म्हणजे हा करार अ-लोकतांत्रिक स्वरूपाचा आणि अनिष्ट प्रथांना जन्म देणारा होता. तणाव निर्माण करणाऱ्या जमातवादी शक्तींबरोबर तात्कालिक फायद्यासाठी तडजोड करण्याचा पायंडा यातून पडला. उच्चभ्रू राजकारणाची ही अपरिहार्य शोकांतिका म्हणावी लागेल.

१९२० मध्ये राष्ट्रीय चळवळीचे गांधीपर्व सुरू झाले. गांधीजींची दृष्टी आणि कार्यपद्धती आधीच्या मवाळ आणि जहाल नेतृत्त्वाहून निराळी होती. भारतीय समाजाच्या निरनिराळ्या घटकांना राष्ट्रीय चळवळीत समाविष्ट करून घेण्यासाठी त्यांनी या चळवळीची धोरणे आणि कार्यपद्धती यामध्ये अनेक बदल केले. मुस्लिमांना या चळवळीबद्दल विश्वास आणि आस्था वाटावी यासाठी त्यांनी कॉंग्रेसच्या

कार्यक्रमात " खिलाफत " चळवळीचा समावेश केला. हा प्रश्न मुस्लिमांच्या धर्म भावनेशी निगडीत असल्याने मुस्लिम मुल्ला-मौलवी काँग्रेसकडे खेचले गेले आणि त्यांच्यामार्फत कनिष्ठ स्तरावरील गरीब अशिक्षित मुस्लिमही काँग्रेसचे समर्थन करू लागले. परंतु हा मार्ग दुधारी शस्त्राप्रमाणे होता. काँग्रेसच्या अन्य कार्यक्रमांकडे मुस्लिम समाज आकर्षित होण्यापेक्षा तो स्वतःच्या धर्मपरंपरेच्या रक्षणार्थ मुख्य प्रवाहाचा आश्रय शोधू लागला. येथे राष्ट्रीय चळवळीतील दुसरी अनिष्ट परंपरा निर्माण झाली. राष्ट्र उभारणीच्या दृष्टीने ही अत्यंत हानिकारक ठरली. यामुळे काँग्रेसमध्ये मुल्ला-मौलवी आणि धर्मवेड्या घटकांचे महत्त्व वाढले आणि धर्म निरपेक्ष दृष्टीने राजकीय प्रश्नांविषयी विचार करणाऱ्या मुस्लिमांचे त्यांच्या समाजातील स्थान डळमळीत झाले. राजकीय उद्दिष्टांसाठी धर्म आणि धार्मिक भावनांचा उपयोग केल्यास त्यांचा राष्ट्रीय घडणीवर वाईट परिणाम होईल; असा इशारा देऊन त्यावेळी महम्मद अली जिनानी आपली प्रतिक्रिया नोंदविली.

२

पंडित जवाहरलाल नेहरूंचा भारताच्या राजकीय मंचावरील प्रवेश या काळातील. तेव्हा टिळक आणि गांधींच्या नेतृत्वात क्रमाक्रमाने काँग्रेसने नवा आविष्कार धारण केला होता. पाश्चिमात्य उदारमतवाद आणि मानवतावाद नेहरूंच्या मनात खोलवर रूजला होता.[७] मात्र नेहरूंचा मानवतावाद धर्मप्रणीत मानवतावादापेक्षा निराळा होता. माणसाची श्रेष्ठतम अवस्था प्राचीन काळात होती. पुढे कालक्रमानुसार त्यात अधःपतन होत गेले, पुढे आणखी होणार आहे. म्हणजे माणसाचा वर्तमानकाळ हा वाईट, तर भविष्यकाळ हा त्याहून भयानक राहणार आहे. ईश्वरभक्ती, अनुष्ठान, जपतप आणि कर्मकांडाचे काटेकोर पालन केल्यानेच मनुष्य या दुष्ट चाकोरीतून बाहेर पडू शकेल; असेच जगातील कोणताही धर्म सांगतो. धर्मप्रणीत मानवतावाद आणि भूतदयावाद यांना या चौकटीतच आशय असतो. धर्माच्या या प्रकारच्या शिकवणीने मनुष्य कर्मकांडाचा आणि परंपरेचा गुलाम होतो. नेहरूंच्या मानवतावादात या तथाकथित मानवी अधःपतनावर विश्वास नाही. ते म्हणतात " माणसात अशा काही क्षमता आहेत की त्यामुळे प्रत्येक पुढील अवस्थेत तो अधिक उच्चतर, अधिक सुधारित पातळीवर जगतो, जगणार आहे.[८] ते जीवनाचा विचार शास्त्रीय पद्धतीने करीत. सर्व अशास्त्रीय विचारांचा आणि दृष्टीकोणांचा त्यांना तिटकारा होता. धर्माची शिकवण माणसाच्या विचार प्रक्रियेस आणि विवेकास मारक असल्याने त्याविषयी (धर्माविषयी) नेहरूंमध्ये कमालीची अनास्था होती. धार्मिकदृष्टी आणि परंपरानिष्ठ विचार ते स्वीकारू शकत नव्हते. स्वातंत्र्य, लोकशाही, मानवी प्रतिष्ठा अशा उच्च आदर्शांवर त्यांची निष्ठा होती. तरी भूतदया, प्रेम, सहानुभूती, सहिष्णुता या शिकवणींच्या मर्यादेत ते कोणत्याही धर्मास सहन करू शकत होते. परंतु या पलिकडे मात्र, सर्वच धर्म त्यांना हानिकारक वाटत. ईश्वरास शरण गेल्याने तो सर्व काही ठीक करील, ही शिकवण माणसामधील स्वतःचे प्रश्न सोडवण्याची प्रेरणाच नष्ट करते. स्वतःच्या प्रगतीसाठी ईश्वरास आणि धर्मास शरण जाण्यापलिकडे माणसात काही एक करण्याची आवश्यकता नाही. हा धर्मप्रणीत खोटा विश्वास माणसाच्या कर्तृत्वास मारक ठरतो. " असे शरणार्थी होणे मला पसंत नाही. त्यापेक्षा खुल्या सागराशी झुंजणे मी पसंत करीन, अगदी त्यातील वादळाशीसुद्धा " असे नेहरू म्हणतात.[९] सामाजिक जीवनाचा विचार न करता स्वतःच्या मुक्तीसाठी झटण्याची धर्मप्रणीत प्रेरणा नेहरूंना अत्यंत असामाजिक आणि स्वार्थी वाटते.[१०] ईश्वर किंवा आधि-भौतिक शक्तीच्या अस्तित्वावर नेहरूंचा विश्वासच मुळी नव्हता. याविषयी ते म्हणतात " पुढील जन्माचा किंवा दुसऱ्या जगाचा विचार करण्यात मला स्वारस्य वाटत नाही. या जन्मीचे आणि या जगातील प्रश्नच मला महत्वाचे वाटतात, तेच मला पुरेसे वाटतात ".[११]

जगातील निरनिराळ्या धर्माबद्दल ते लिहितात, " भारतात आणि अन्यत्र आज ज्यांना धर्म म्हणतात त्यांची कृत्ये पाहून मी भयकंपित होतो.[१२] निरनिराळ्या मानवी समूहांचे ते पूर्वग्रहदूषित दुराग्रह आहेत. मला त्यांचे मुळीच आकर्षण नाही.[१३] या धर्मांना मानवी मूल्यांचे आणि सामाजिक न्यायाचे आकलन नाही [१४] हे सर्वच धर्म संकुचित असून त्यांच्याकडे परमतसहिष्णुता नाही. ते आत्मकेंद्रित असून अहं गंडांनी पछाडलेले आहेत."[१५] सारांश, सर्व उपलब्ध धर्मांच्या कार्यपद्धतीची त्यांना घृणा वाटे. यातनांची पर्वा न करता सत्याचा प्रामाणिकपणे शोध घेणे, ही रोमां रोलांची धर्मकल्पना नेहरूंना चालू शकली असती. एका मर्यादेत गांधीजींचा धर्मही नेहरूंना चाले, परंतु त्यांची सत्याची गूढवादी संकल्पना, अहिंसा आणि व्रतस्थ जीवनाचा आग्रह ; या गोष्टी प्रगतीस मारक आहेत असे नेहरूंना वाटे. तात्पर्य, नेहरूंची जीवनदृष्टी पूर्णतः इहवादी होती. ऐहिक जीवनाच्या मर्यादेत त्यांना सत्य आणि अहिंसा या कल्पनाही मान्य होत्या. पाश्चिमात्य उदारमतवादी विचारांचा नेहरूंवर प्रभाव होता. हे वर आलेच आहे. तेथे या उदारमतवादी विचारांचा उदयच मुळी व्यक्तीची प्रतिष्ठा आणि माणसांची समानता यांना मारक असणाऱ्या धर्म, सरंजामशाही आदींच्या विरुद्ध चाललेल्या प्रदीर्घ संघर्षातून झाला होता. पारलौकिक जीवन हे धमाचे कार्यक्षेत्र. या मर्यादेत त्याने मनुष्य जीवनाचे नियंत्रण, मार्गदर्शन करावे. ऐहिक जीवन हे राज्याचे कार्यक्षेत्र यात धर्माची लुडबुड नको. या तडजोडीवर तो संघर्ष थांबला. पाश्चिमात्य उदारमतवादी विचारसरणीत धर्म निरपेक्षतेचा हा अर्थ.[१६]

जमातवादाचा तर नेहरूंना अत्यंत तिटकारा होता. जातीयवाद आणि जमातवाद ही अत्यंत संकुचित विचारांची प्रतिके आहेत, असे त्यांचे मत होते. या मनोवृत्तीत परजातीविषयी आणि परजमातीविषयी भीती, संशय आणि द्वेष असतो, हे उघड आहे. या मनोवृत्तीत स्वजातीविषयी किंवा स्वधर्माविषयीही प्रेम नसते. असे नेहरू म्हणतात.[१७] निरनिराळ्या जाती-जमातीतील उच्चभ्रू घटक स्वतःच्या वर्गीय हितांसाठी जातीयवाद आणि जमातवादाचा आश्रय घेतात, आपापल्या धर्मगटातील सामान्य माणसांना या विषारी विचारांची भूल देऊन आपल्या वर्गीय डावपेचांसाठी राबवतात. या घाणेरड्या संघर्षातून या जाती-जमातीतील मध्यम वर्गाला काही नोकऱ्या तर उच्चतम वर्गीयांना सत्तेत थोडी भागीदारी मिळते. यासाठीच त्यांनी हा उपद्रव केलेला असतो. परंतु तत्‌जन्य विद्वेषाच्या वणव्यात ज्या सामान्य माणसांच्या संसाराची राखरांगोळी होते, त्यांना मात्र काहीही मिळत नाही. [१८]

जमातवाद-जमातवादामध्ये नेहरू भेद करतात, प्रामाणिक जमातवाद आणि अप्रामाणिक जमातवाद. ते लिहितात. " प्रामाणिक जमातवाद हा भीतीचे अपत्य असतो, तर अप्रामाणिक जमातवाद ही राजकारणी लोकांची स्वार्थी प्रतिक्रिया असते."[१९] अल्पसंख्याकांचा जमातवाद एका मर्यादेत प्रामाणिक असतो. सामाजिक, राजकीय जीवनातील बहुसंख्याकांच्या प्रभुत्वामुळे आपले हक्क टिकणार नाहीत, आपल्याला न्याय मिळणार नाही, आपली आर्थिक, सांस्कृतिक गळचेपी होईल अशी अल्पसंख्य समाजातील लोकांना भीती वाटू शकते. ही भीती खरी किंवा काल्पनिक असू शकते. परंतु खरी असो की खोटी, शेवटी भीती ती भीतीच. या भीतीतून जमातवादाला आश्रय देणारी मनोवृत्ती त्यांच्या ठिकाणी निपजते. म्हणून त्यांचा जमातवाद हा प्रामाणिक. खऱ्या लोकशाहीत कोणाच्याच हक्कांची पायमल्ली होत नसते, याची अल्पसंख्याक समाजातील सुशिक्षित आणि उच्चभ्रू वर्गास कल्पना असते. परंतु आपली स्वार्थी उद्दिष्ट्ये साधण्यासाठी ते सामान्य माणसाच्या अज्ञानजन्य भयग्रस्ततेचा फायदा घेतात. आपल्या हक्कांच्या संभाव्य संकोचाच्या, खऱ्या खोट्या प्रचाराच्या सहाय्याने ते कनिष्ट स्तरात जमातवाद रुजवितात. आणि मग त्याच्या सहाय्याने आपली वर्गीय उद्दिष्ट्ये साध्य करून घेतात. म्हणून त्यांच्या सुशिक्षित मध्यम आणि उच्च मध्यम वर्गाचा-जमातवाद अप्रामाणिक असतो. बहुसंख्याकांचा जमातवाद मात्र नेहमीच अप्रामाणिक असतो. कारण तेथे भीतीचे कारण नसते. त्यांच्यातील लबाड आणि

अकार्यक्षम लोक, एरवी असमर्थनीय ठरतील एवढे लाभ स्वतःकडे खेचण्यासाठी हा उद्योग करतात. जातीयवादाचेही असेच स्पष्टीकरण नेहरू करतात.

येथे एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे. अल्पसंख्याकांतील अशिक्षित सामान्य माणसाचा जमातवाद प्रामाणिक असू शकतो, असे नेहरू मानीत असले, तरी तोही त्यांना समर्थनीय किंवा क्षम्य वाटत नाही. सर्व प्रकारच्या जमातवादावर ते कठोर टीका करतात ते लिहितात, '' मुस्लिम जमातवाद सुद्धा काल्पनिक आणि अर्थहीनआहे ''. . . . '' माणसामध्ये केवळ धर्माचाच अनुबंध असतो. राष्ट्र वगैरे काही नसते. आधुनिक संस्कृतीचा आणि प्रगतीचा त्याग करून आपण मध्ययुगीन अप्रगत जीवन पद्धतीचा स्वीकार करावा असा त्याचा आग्रह असतो. लोकतंत्र व्यक्तीस्वातंत्र्य काही नको. त्यापेक्षा एकाधिकारशाही किंवा परकीय सत्ता बरी असा त्याचा आशय असतो. माणसाला अविचारी बनवणारी ही एक मनाची भावनोत्कटता आहे. सत्याला, विशेषतः आर्थिक वास्तवाला सामोरे जाण्याच्या अक्षमतेचे ते लक्षण आहे.''[२०] त्यांच्यामते हा विचार ' राजकीयदृष्ट्या अर्थहीन तर आर्थिक दृष्ट्या केवळ कल्पनारम्य आहे, त्यापेक्षा विचारच न केलेला बरा.'[२१]

अल्पसंख्याकांना विश्वासात घेण्याची, त्यांच्या हितांचे रक्षण करण्याची जबाबदारी बहुसंख्याकांची असते. भारतीय संदर्भात मुस्लिम, ख्रिश्चन आदी अल्पसंख्य समूहांचे रक्षण करण्याची जबाबदारी हिंदूंची आहे असे नेहरूंना वाटे. ते आपल्या कर्तव्यास विसरले तर त्यांचे स्वतःचे आणि राष्ट्राचे नुकसान होईल असे ते लिहितात.[२२]'' धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वास कुठल्याही प्रकारे बाधा येणार नाही. अशा पद्धतीने लोकशाहीतील आपले स्थान वापरण्याची हिंदूंची जबाबदारी आहे.''[२३]

जमातवाद हे राष्ट्रवादाचे दुसरे टोक असून त्यात लोकतंत्राचा निषेध आहे, असे नेहरू म्हणत. '' आपल्या स्वातंत्र्य चळवळीची उद्दिष्टे आणि आपले आदर्श संदिग्ध असल्याने येथे जमातवादाचा उदय आणि प्रसार झाला. स्वराज्यासाठी चाललेला संघर्ष आणि आपले दैनंदिन जीवनातील प्रश्न; यात सामान्य मानवाला संबंधच दिसू शकत नाही.[२४] जमाती-जमातीतील उच्चभ्रू लोकांचे वर्गीय हितसंबंध तणाव आणि पृथकतेत असल्याने त्यांनी जमातवादास खतपाणी घातले.''[२५]

नेहरूंच्या मते, धर्मनिरपेक्षता हा आधुनिक लोकतंत्रातील समाजाचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. धर्माधिष्ठित राज्याची कल्पना मध्ययुगीन अज्ञानांधकाराची द्योतक आहे. आधुनिक भारताला त्या दिशेने नेण्यात काही हंशील नाही. विविध धर्म असलेल्या भारतातील असंख्य प्रश्नांची सोडवणूक धर्मनिरपेक्षतेतच संभवते, अशी त्यांची मनोमन धारणा होती.

३

खिलाफत चळवळीचा काँग्रेस संघटनेवर आणि राष्ट्र उभारणीच्या कार्यावर जो अनिष्ट परिणाम झाला त्याची चर्चा वर आली आहे. या चळवळीने काँग्रेसमध्ये आणि मुस्लिम समाजात धर्मवेड्या आणि कडव्या धर्म दुराग्रही घटकांचे महत्त्व वाढविले. त्यामुळे मुस्लिमांमध्ये धर्मनिरपेक्षता रुजविणे कठीण बनले. याच काळात काँग्रेसने हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी योजिलेले अन्य मार्गही दूरगामी परिणामांच्या दृष्टीने हानीकारक होते. यात ऐक्याचा अधोगामी प्रयत्न होता, म्हणजे ऐक्य वरतून खाली नेण्याचा प्रयत्न होता. जमाती-जमातीतील दंगे आणि हिंसाचार यावरसुद्धा काँग्रेस हाच उपाय करू लागली.[२७]

जमाती-जमातीतील तात्कालिक ऐक्याच्या दृष्टीने हा मार्ग उपयुक्त वाटत असला, तरी राष्ट्र उभारणीच्या दूरगामी दृष्टीने तो हानिकारक होता. अल्पसंख्य जमातीतील उच्चभ्रू नेतृत्त्वाचा काँग्रेसमधील आणि सत्तेतील सहभाग इतरांप्रमाणे भारतीय नागरिक या नात्याने होत नसून त्यांच्या

जमातीचे नेते म्हणून होऊ लागला. त्यामुळे अल्पसंख्याक जमातीतील उच्चभ्रू नेतृत्त्वाला आपल्या जमातीची पृथकता टिकविणे महत्त्वाचे वाटून; ते जमातीतील लोकांची राष्ट्रीय ऐक्याच्या दिशेने वाटचाल होऊ देणार नाहीत; या धोक्याची दखल काँग्रेस नेतृत्त्वाने घेतली नाही. त्यांना हा धोका दिसला नाही असे मानणे योग्य वाटत नाही. तो दिसत असूनही तात्कालिक लाभांच्या दृष्टीने दूरगामी दुष्परिणामांकडे त्यांनी दुर्लक्ष केले असे मानणे युक्त ठरते. याचे काँग्रेस संघटनेवर दोन परिणाम झाले. एक ; काँग्रेस ; नेतृत्त्वाचा अल्पसंख्य जमातीतील सामान्य माणसाशी संपर्क आणि संवाद पूर्णतः बंद झाला. आणि दुसरा काँग्रेसचा धर्मनिरपेक्षतेचा आग्रह शिथिल होत गेला. काँग्रेस नेत्यांना आपापल्या जाती-जमातीच्या संघटनांमध्ये सहभागी होण्याचा परवाना मिळाला. हिंदू काँग्रेसजन हिंदू महासभेत तर मुस्लिम काँग्रेसजन त्यांच्या तबलिक आणि तंजिम सारख्या चळवळीत राजरोसपणे भाग घेऊ लागले. काँग्रेसच्या धर्मनिरपेक्षतेला आता हे चालू लागले. शुद्धीसारखे कार्यक्रम काँग्रेसजन उघडपणे आयोजित करू लागले.[२८] काँग्रेस विरोध करू शकत नव्हती.

काँग्रेसच्या या कार्यपद्धतीतील दोष आणि धोके समजण्यास नेहरूंना वेळ लागला नाही. निरनिराळ्या जातीय-धर्मीय समूहातील जातीयवादी-जमातवादी उच्चभ्रू नेतृत्त्वाशी तडजोडी करून आणि त्यांना विश्वासात घेऊन राष्ट्रीय एकात्मता साध्य होणार नाही. तडजोडीद्वारे आपल्या पदरात लाभ पाडून घेण्यास चटावलेले हे जातीयवादी-जमातवादी नेते, हे लाभ असेच पुढेही आपल्याला मिळवता यावेत यासाठी आपापल्या जाती-जमातीमधील लोकांमध्ये पृथकता, इतराबद्दल अविश्वास आणि संशयीवृत्ती जोपासतील आणि जाती-जातीतील तसेच जमाती-जमातीत तणाव वाढवित राहतील. जनतेत राष्ट्रीय एकात्मता रुजविण्याचा एकच राजमार्ग आहे. तो म्हणजे उच्चभ्रूंचे राजकारण करण्याचे सोडून काँग्रेसने सरळसरळ सर्व जातीधर्मातील सामान्य माणसाला चळवळीत खेचावे. १९२९ मध्ये काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून बोलताना नेहरू म्हणाले " भारत म्हणजे शेतकरी आणि कष्टकरी. काँग्रेसने त्यांचे प्रश्न घ्यावे. आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन हे काँग्रेसचे ध्येय आहे ".[२९]

नेहरू राष्ट्रवादी असले, तरी त्यांना आक्रमक राष्ट्रवाद मान्य नव्हता. तो त्यांना स्वार्थी आणि संकुचित वृत्तीचे प्रतीक वाटे. मानवतावाद आणि जागतिक भ्रातृभाव हे राष्ट्रवादापलिकडील आदर्श आहेत. तिथपर्यंत जाण्याच्या मार्गातील राष्ट्रवाद हा एक टप्पा मात्र आहे. हा टप्पाही महत्त्वाचा आहे. परंतु त्याचे महत्त्व स्वयंभू नाही, असे नेहरूंचे मत होते.[३०] चांगले प्रशासन, सामान्य माणसाला चांगला जीवनस्तर आणि परस्पर संशय आणि भीतीचा अभाव या गोष्टींची हमी हेच राष्ट्रवादाचे समर्थन होऊ शकते.[३१] हे आश्वासनच सामान्य माणसाला काँग्रेसच्या राष्ट्रीय चळवळीकडे खेचू शकेल. जमातवादी डावपेच हे उच्चभ्रूंच्या सत्ता लालसेचे प्रतीक असते. त्यांना सामान्य जनांची पर्वा नसते. जमातवाद हा उच्चभ्रूंनी योजिलेला सापळा आहे. तेव्हा उच्चभ्रू राजकारणाचा त्याग केल्यावाचून काँग्रेस या सापळ्यातून निसटू शकत नाही, असे नेहरूंनी काँग्रेसला अनेक वेळा बजावले.

विशेषतः १९३४ पासून, नेहरूंनी या नव्या कार्यदिशेवर भर देण्यास आरंभ केला. उच्चभ्रू राजकारणाच्या सापळ्यातून मुक्त होऊन काँग्रेसने जनवादी ध्येय आणि कार्यपद्धती स्वीकारावी असा ते आग्रह धरू लागले. सर्व जाती-जमातीच्या सामान्य माणसांशी सरळसरळ संपर्क साधून जनवादी कार्यक्रमाद्वारे त्यांना राष्ट्रीय मुख्य प्रवाहात खेचावे असा याचा अर्थ होता. काँग्रेसमधील उच्चभ्रू नेतृत्त्वास अर्थातच ही नवी कार्यदिशा रुचणे शक्य नव्हते. कामगारांना, शेतकऱ्यांना आणि त्यांच्या संघटनांना काँग्रेसशी संलग्न करण्यास त्यांनी सर्वशक्तीनीशी विरोध केला. नेहरूंच्या विचारांना काँग्रेसमधील डाव्या गटाचा पाठिंबा होता. परंतु त्यांच्यासह नेहरू काँग्रेसमध्ये अल्पमतातच होते. अशा स्थितीत ताणून धरण्याचा अर्थ काँग्रेसमध्ये, फूट पाडणे, काँग्रेसमधून बाहेर लोटणे जाणे किंवा काँग्रेसमध्ये एकाकी

पडणे, असा होता. गांधीजींना कामगार, कष्टकरी वर्गाबद्दल सहानुभूती होती हे मान्य केले तरी, उच्चभ्रूंच्या खेळात त्यांना सहभागी करून घ्यावयास ते फारसे अनुकूल किंवा उत्सुक नक्कीच नव्हते. त्यांनी कनिष्ट स्तारांवरून उच्चभ्रूंना त्यांच्या खेळीत सहकार्य करावे आणि या मोबदल्यात उच्चभ्रूंनी त्यांना काही सवलतीची आश्वासने घोषित करावी. वरिष्ठांच्या खेळीत किंवा सत्तेत त्यांनी सहभागित्व मागू नये, निदान काही दिवस तरी ; अशीच त्यांची धारणा होती. त्यातून पुढे जेव्हा त्यांच्या स्वप्नातील ग्राम स्वराज्याचा सूर्योदय होईल, तेव्हांची परिस्थितीच निराळी असेल. पण यातून ग्राम स्वराज्य येईल काय? याचा मात्र त्यांनी विचार केला नसावा. पाश्चिमात्य उदारमतवादी लोकतंत्राचा हाच आशय आहे. गांधीजींचे आदर्श याच चौकटीतील होते. म्हणूनच या वादात त्यांनी (गांधीजींनी) तटस्थता पाळली. या परिस्थितीत विरोधाच्या परिणामांना सामोरे जाण्याचे धाडस नेहरूंनी दाखवले नाही. त्यांनी बिनशर्त माघार घेतली आणि बहुमतास मान्य असलेली कार्यपद्धती निमूटपणे स्वीकारली. उच्चभ्रू आणि मध्यम वर्गीय नेतृत्त्वाच्या नियंत्रणात सामान्य जनतेने चळवळीस सहकार्य करावे, या गांधीवादी संकल्पनेनुसार काँग्रेस यापुढे निर्वेधपणे कार्य करू लागली. नेहरूनीही याच चाकोरीतून कार्य करण्याचे मान्य केले. जमातवादी डावपेच ही काँग्रेसची मान्यताप्राप्त कार्यपद्धती बनली. काँग्रेसच्या धर्मनिरपेक्षतेला असा कोता अर्थ प्राप्त झाला. कार्यपद्धतीविषयीच्या संघर्षात गांधीजींनी स्पष्टपणे नेहरूंचा पक्ष उचलून धरला असता ; तर काँग्रेसचे व स्वातंत्र्योत्तर भारताचे निराळे चित्र पुढे आले असते. भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेपुढे आज उभे असलेले आव्हान कदाचित उरले नसते किंवा निदान एवढ्या शिरजोरपणे पुढे आले नसते.

स्वातंत्र्योत्तर गांधीवध झाला; तेव्हा काँग्रेसचे नेतृत्त्व नेहरूंकडे आले. नेतृत्त्व बदलले तरी वारशाने नव्या नेतृत्त्वाकडे आलेली काँग्रेस तीच होती. विविध जमातीचे नेते यात पदसिद्ध रूपाने होते. स्वातंत्र्योत्तर यात कसलाही बदल झाला नाही. शिवाय आता परिस्थिती निराळी होती. स्वातंत्र्य मिळाले होते. काँग्रेसपुढे आता कसलेच ध्येय नव्हते. आता होती केवळ सत्तास्पर्धा. केवळ सत्तेच्या मोहाने आताही सर्व मंडळी काँग्रेसमध्ये होती. त्यात नेहरूंवर प्रशासनाची मोठी जबाबदारी होती. त्यामुळे संघटनेच्या कामात ते फारसे लक्ष घालू शकत नव्हते. लक्ष घालूनही ते फारसे काही करू शकणार होते असे नाही. काँग्रेसच्या घोषित आदर्शांपेक्षा उच्चभ्रू काँग्रेस नेतृत्त्वास सत्तास्पर्धा महत्त्वाची वाटत होती. नेहरू स्वतःही या सत्तास्पर्धेचाच भाग होते, ते अलिप्त राहू शकत नव्हते. सत्तास्पर्धेच्या उच्चभ्रू सापळ्यात आता नेहरू बंदिस्त होते. भारतीयांनी नेहरूंवर अपरंपार प्रेम केले. या विराट जनसागराच्या विश्वासाच्या आणि प्रेमाच्या बळावर नेहरू या कारागृहाच्या भिंती तोडू शकले असते. परंतु त्यासाठी काही दिवस सिंहासन सोडून वनवास स्वीकारावा लागणार होता. नेहरूंमध्ये आता असे साहस दाखविण्याची उमेद उरली नव्हती. यापेक्षा त्यांनी आमरण बंदिवास मान्य केला. या बंदिवासातही त्यांना अधूनमधून तारुण्यातील ध्येयवादाचे झटके येत. ते कधी कधी जळजळीत शब्दरूपाने व्यक्त होत. समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता याविषयी त्यांनी आयुष्यभर कंठशोष केला. काँग्रेसला काही ध्येयदृष्टी देण्याचाही त्यांनी अनेकवेळा प्रयत्न केला. परंतु काँग्रेसमध्ये आता उरला होता तो निखळ व्यवहारवाद, ध्येयरहित, मूल्यहीन व्यवहारवाद! काँग्रेसच्या व्यवहारवादी नजरेत नेहरूंचे हे विचार स्वप्नाळू होते. सहकार्याच्या अभावामुळे ते कधीच मूर्तरूप धारण करू शकले नाहीत. कृतीवाचून ते स्वप्नरंजन ठरले. पुढेपुढे सर्वच काँग्रेसजनांनी नेहरूंची परिभाषा उचलली. मतांच्या राजकारणात ती सोयीची होती. शिवाय कृती करणे आवश्यक नसल्यास ती परिभाषा उच्चभ्रू हितसंबंधांना अपायकारक नव्हती. आणि नेहरू ? ज्यांनी धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी शक्तीबरोबर राहून आपल्या स्वप्नातील राष्ट्र उभारणीचे कार्य केले असते, त्यांनी यापुढे देशातील धर्मनिरपेक्ष, समाजवादी आणि साम्यवादी शक्तींचे खच्चीकरण करण्यात काँग्रेसी हितसंबंधांचे नेतृत्त्व केले.

□□□

# पत्रकार पं. नेहरू आणि पत्रकारिता

□ प्रा. सुधीर वामनराव गव्हाणे

वृत्तपत्र विद्या विभाग, मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

स्वातंत्र्य, लोकशाही, समाजवाद, विज्ञान व आंतरराष्ट्रीय मानवतावाद हे पं. जवाहरलाल नेहरू या महान भारतीय नेत्याच्या विचारविश्वाचे पंचप्राण होते असे म्हणता येईल. नेहरूंसारखा ध्येय्यनिष्ठ व लोकसेवक नेता हा देशाचा खरा आत्मा असतो. असे नेते मिळणे किती कठीण असते हे देशातील आजचे चित्र पाहिले की जाणवते. लोकशाही व्यवस्थेत ' जाणते राजे ' ही एक दुर्लभ बाब होते आहे. टीका करणाऱ्या विरोधकांची टीका सहन करणे, आपले दोषदिग्दर्शन करणारी पत्रकारिताही स्वागतार्ह मानणे, लोकशाही व्यवस्थेसाठी एक अटळ नि अनिवार्य बाब असते. कणखर लोकशाहीवादी नेते या दृष्टीने पं. नेहरूंनी पत्रकारितेची वेळोवेळी महती गायली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वतः लेखन केले आहे. ' नॅशनल हेरॉल्ड ' या स्वतःच्या अपत्यावर वारंवार लक्ष दिलेले दिसते. या वृत्तपत्राची गुणवत्ता वाढण्यासाठी व विकास होण्यासाठी जातीने लक्ष घातल्याचेही स्वातंत्र्योत्तर काळात दिसते.

पत्रकारिता ही लोकशाही व्यवस्थेतील चौथी सत्ता व एक महत्त्वपूर्ण **आधारशीला** आहे. याबाबत राव्यसाची पत्रकार व लेखक कै. प्रभाकर पाध्ये यांनी म्हटले आहे.

" समाजाचे संतुलन साधणारी यंत्रणा म्हणजे वृत्तपत्रे, असे माझे प्रतिपादन आहे. वृत्तपत्रे जनमत तयार करतात आणि त्याद्वारे लोकशाही समाजाचा तोल सावरतात. मी असेही प्रतिपादन केले आहे की, फक्त लोकशाहीतच वृत्तपत्रे ही वृत्तपत्रे असतात, म्हणून लोकशाही समाजाचा तोल सावरण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच, वेगळ्या शब्दात, लोकशाही टिकविण्याचा प्रयत्न करणे हे वृत्तपत्रांचे स्वतःबाबतचे कर्तव्य ठरते." (प्रभाकर पाध्ये, अनुवाद-प्र. ना. परांजपे, वसुधा परांजपे, १९९१)[१]

या अर्थाने पत्रकारितेस लोकशाही संवर्धनाचे महत्त्वपूर्ण कार्य करावे लागते.

' जागृत जनमत ' ही प्रगल्भ लोकशाहीची पूर्वअट असते आणि पत्रकारितेला ' जनमत ' घडविण्याचीच जबाबदारी पार पाडावी लागते. पं. नेहरूंसारख्या लोकशाहीवर नितांत श्रद्धा असणाऱ्या नेत्याने पत्रकारितेचे हे अनन्यसाधारण महत्त्व ओळखलेले होते. २४ ऑगस्ट १९३६ रोजी मुंबईच्या पत्रकारांनी केलेल्या स्वागतप्रसंगी पं. नेहरू म्हणाले होते,

' आधुनिक जगाच्या सार्वजनिक जीवनात पत्रकारिता व पत्रकार फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत असतात. वृत्तपत्रांनी त्यांच्या धोरणानुसार काही विशिष्ट प्रकारच्या बातम्यांना प्राधान्य देण्यात मला

काही गैर वाटत नाही. परंतु मी बातम्या दडपणाच्या वृत्तीच्या विरोधी आहे. कारण जगातील घडामोडींसंबंधी योग्य मत बनविण्यासाठी लोकांना उपलब्ध असणारे ते एकमेव माध्यम-साधन आहे.'[२] (बॉम्बे क्रॉनिकल, २५ ऑगस्ट १९३६).

लोकमत जागृत करण्यातील पत्रकारांची भूमिका आणि वृत्तपत्रातील बातम्या दडपून टाकण्याची अनिष्ट प्रवृत्ती व या प्रवृत्तीने जगातील घडामोडी जाणून घेण्याबाबतची व योग्य मत बनविण्याबाबतची नागरिकांची संधी हिरावून घेतली जाणे ; याबाबत नेहरूंनी व्यापकहिताचे तत्त्व मांडलेले आपणास दिसते. ' बातम्या दडपणे ' ही बाब फारच धोकादायक आहे असे नेहरूंचे ठाम मत होते ; कारण त्यामुळे माहिती मिळविण्याच्या मूळ हक्कांपासून नागरिक वंचित होतात, असे त्यांना वाटे. ' पत्रकारितेतील बाह्य हस्तक्षेप वाईटच; पण त्याहून धोकादायक ठरते बातम्या दडपल्या जाणे ' असे त्यांनी भारतीय पत्रकारांच्या भवितव्यासंबंधी हैद्राबाद येथे केलेल्या वृत्तपत्रीय निवेदनात स्पष्ट केले आहे. " Outside interference with the expression of views is bad enough but far more dangerous is the attitude and attempts to supress the news."[3] (Hindustan Times, 28 July 1936—Statement to the Press, Hyderabad, 27 July 1936).

## पत्रकारिता व राजकीय व्यक्ती

पत्रकार व राजकीय व्यक्ती यांच्यामध्ये ' प्रेम व द्वेषाचे ' (Love and hate) नाते असते. पत्रकारांना राजकारणी व्यक्ती अधिक बातम्या पुरवितात किंवा ते बातम्यांचा विषय होतात. राजकारणाचा सर्वदूर प्रभाव असल्याने व राजकीय घडामोडींचे प्रभाव जीवनाच्या सर्वांगावर पडत असल्याने राजकीय घडामोडींविषयी वाचकांनादेखील एक प्रकारचे आकर्षण असते. त्यामुळेच पत्रकारही राजकीय बातम्यांना प्राधान्य देताना दिसतात. राजकारण्यांनाही आपण जे काही ' भले ' करतो आहोत ते जनतेला सांगण्यासाठी व जे काही ' बुरे ' करीत आहोत ते लोकांपासून लपवून ठेवण्यासाठी पत्रकारांशी चांगला संबंध ठेवणे अनिवार्य असते. कारण पत्रकार हेच त्यांच्या भल्याबुऱ्या जनप्रतिमेचे निर्माते असतात. विल्यम रिव्हर्ससारखे जगप्रसिद्ध माध्यमतज्ज्ञ आपल्या ' The other Government ' या ग्रंथात पत्रकारितेस ' दुसरे सरकारच ' संबोधितात. एखाद्या व्यक्तीची प्रतिमा उजळणे वा उध्वस्त करणे हे पत्रकारितेच्या हातात असते ; तसेच एखादे सरकार टिकविणे आणि त्याचबरोबर पाडणे हेही पत्रकारितेच्या हातातच असते. याबाबत पंडित नेहरूंनी ५५ वर्षांपूर्वी याच स्वरूपाचे विचार पत्रकारांना मुंबईत मार्गदर्शन करताना व्यक्त केले आहेत,

" Nobody underestimates the importance of the press. We all recognise its need and importance in the modern world and also realise that it can make or mar reputations and, therefore, it is not surprising that, the politicians make love to the press."[4] The Bombay Chronicle, 25/8/1936).

" पत्रकारितेचे महत्त्व कोणीही कमी लेखू शकत नाही. आम्ही सारे आधुनिक जगातील (राजकीय नेते) पत्रकारितेची गरज आणि महत्त्व मान्य करतो. तसेच हेही जाणतो की, व्यक्तीची समाजातील प्रतिष्ठा वाढविणे व लांच्छित करणे हे पत्रकारितेच्या हाती आहे आणि त्यामुळेच राजकारणी मंडळी पत्रकारितेच्या प्रेमात पडलेले पाहून आश्चर्य वाटायला नको."[४] (दी बॉम्बे क्रॉनिकल, २५/८/१९३६).

एखाद्या व्यक्तीची समाजातील लोकप्रियता वाढविणे आणि घटविणे हे पत्रकारितेच्या हाती असते आणि त्यामुळे राजकारणी मंडळी पत्रकारांशी सख्य ठेऊन असतात किंवा त्यांना सख्य ठेऊन रहावे लागते, हेच पं. नेहरूंना सांगावयाचे आहे.

## –तर पूर्णवेळ पत्रकार झालो असतो

नेहरूंना पत्रव्यवसाय मनस्वी आवडायचा. पत्रकारिता व्यवसायाचे आधुनिक लोकशाही युगातील अढळ स्थान ते ओळखून होते. पत्रकारितेचे त्यांना विशेष असे आकर्षण होते. म्हणूनच स्वातंत्र्याआधी कलकत्त्याच्या पत्रकारांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले होते,–

" मी आज जो काही आहे, त्याऐवजी पत्रकार व्हायला हवे होते का ? याचे उत्तर देणे अवघड आहे. मात्र एक नक्की की, माझ्या आयुष्यात जर कधी मी बेकार राहिलो असतो तर पत्रकारितेकडे नक्की वळलो असतो. पत्रकारितेच्या व्यवसायातून मला जगण्यासाठी आवश्यक उत्पन्न मी निश्चितपणे कमावले असते. परंतु सध्या मी दैनिकांना लेख लिहितो. त्याबद्दल त्या दैनिकांचे मालक मानधन मात्र देत नाहीत."[५] (अमृत बझार पत्रिका, ६ नोव्हें. १९३६).

देशसेवेच्या कार्यात पंडितजी पडले नसते, तर ते पत्रकारितेच्या माध्यमातून लोकसेवक बनू इच्छित होते हेच त्यांच्या या विचारावरून व मनोगतावरून स्पष्ट होते. समकालीन प्रश्नांवर वृत्तपत्रांना सतत लिहित राहणे हाही त्यांचा विशेष होता. त्यांच्या लेखांवरून स्वातंत्र्याआधी अनेकदा वादही उद्‌भवल्याचे नेहरू वाङ्‌मयाचा अभ्यास करताना जाणवते.

## ' सिंध ऑब्झर्व्हर 'चे पुनय्या प्रकरण

' सिंध ऑब्झर्व्हर ' या कराची येथून प्रकाशित होणाऱ्या तत्कालीन वृत्तपत्राची घटना लक्षणीय आहे. ' सिंध ऑब्झर्व्हर ' हे वृत्तपत्र काँग्रेसविरोधी तर होतेच ; त्याचबरोबर ते मुस्लीम जमातवादी विचारधारेचे (Muslim Communalism) होते. त्याचे मालक हे ब्रिटिश धार्जिणे होते आणि त्यामध्ये नेहमी स्वातंत्र्य आंदोलनविरोधी बातम्या छापल्या जायच्या. त्या वृत्तपत्राचे संपादक के. पुनय्या हे नेहरूंवर नेहमीच टीका करीत असत. नेहरू काँग्रेसचे अध्यक्ष असताना १९३६ साली कराचीस गेले होते. त्यावेळी सिंध ऑब्झर्व्हरच्या मालकांनी के. पुनय्यांना काँग्रेस अध्यक्षांच्या दौऱ्याच्या बातम्या मर्यादित करून देण्याचा व दडपण्याचा आदेश दिला. काँग्रेसशी संबंधीत व मेळाव्याचे संबंधित कोणताही फोटो छापू नये असा लेखी आदेश मालकांनी दिला. पुनय्यांना हा आपल्या संपादकीय स्वातंत्र्यावरील घाला वाटला आणि त्यांनी काँग्रेस व नेहरूसंबंधी बातम्या न दडपता दिल्या, अर्थात या बातम्या देताना त्यांनी नेहरूंच्या मतांशी आपण सहमत नसल्याचेही लिहिले. चिडलेल्या वृत्तपत्र मालकांनी पुनय्यांना संपादक पदावरून काढून टाकले व इतकेच नव्हे; तर छापलेल्या मजकूराचे जाहिरातीच्या दराने बिलही त्यांचेवर लावले. याबाबत कराची नगरपालिकेने २१ जुलै १९३६ रोजी निषेधार्थ बैठक, पाच मिनिटांसाठी तहकूब केली. सिंध पत्रकार संघटनेने पुनय्यांनी व्यवसायाच्या प्रतिष्ठेसाठी उचललेल्या कठोर पावलाबद्दल त्यांचे अभिनंदन केले तर कराचीच्या नागरिकांनी सभा घेऊन पुनय्यांना काढून टाकणाऱ्या संचालक मंडळाचा निषेध केला व ' सिंध ऑब्झर्व्हर ' वर बहिष्कार टाकण्याचे अपील केले. याबाबत नेहरू व पुनय्या यांचा पत्रव्यवहार झाला आहे. शिवाय नेहरूंनी पुढाकार घेऊन पुनय्यांच्या संपादकीय स्वातंत्र्यावरील हस्तक्षेपाचा निषेध करणारे पत्रक काढले. त्यात त्यांनी म्हटले होते,

' The Sind observer has never been a pro- congress organ. It is essentially moderate and has supported a communal party. Its old

editor, Mr. Punnaih, has frequently criticised me. He has gone on deputation to the Governor offering his whole-hearted co-operation. Thus there is little in common between my politics and his, but this is not a matter of politics but of the most elementary rights of journalists. ... This seems to me a monstrous interference with an editor's discretion and an insult to the public. ... such an encroachment of their rights cannot be allowed to go unchallenged and any journalist, who submits to it, is not worthy of his responsible profession.'[6]

आपल्या राजकीय विरोधकाच्यावर व टीकाकारवरही अन्याय झाला, त्याच्या मूलभूत वृत्तपत्रीय व संपादकीय स्वातंत्र्यावर गदा आल्यास, नेहरूंनी राजकारणापलीकडे जाऊन उदात्त राजकीय व लोकशाही मूल्यांना महत्त्व दिलेले दिसते. आजच्या राजकीय नेत्यांप्रमाणे आपल्या राजकीय विरोधकांची झालेली दुरवस्था पाहून त्यांना आनंदाच्या उकळ्या फुटलेल्या नाहीत, उलट त्यांनी त्याची जाहीर निर्भर्त्सनाच केली आहे.

### चलपतीरावना संपूर्ण स्वातंत्र्य

दुसऱ्या मालकांच्या वृत्तपत्रातील संपादकांना स्वातंत्र्य असावे म्हणणारे पण आपल्या वृत्तपत्रातील संपादकांना स्वातंत्र्य न देणारे मालक-नेते जास्त दिसतात. पं. नेहरू असे दुतोंडी नव्हते. पं. नेहरूंनी त्यांचे वृत्तपत्र ' नॅशनल हेरॉल्ड ' च्या संपादकांच्या बाबतीतही हेच धोरण स्वीकारले. चलपतीराव हे सुमारें तीस वर्षे नॅशनल हेरॉल्डचे संपादक होते ; परंतु त्यांनी कधीही चलपतीराव यांच्या संपादकीय स्वातंत्र्यात हस्तक्षेप केला नाही. माजी माहिती व नभोवाणी मंत्री श्री. इंद्रकुमार गुजराल याबाबत म्हणतात,

' नॅशनल हेरॉल्ड ' हे पंडितजींचे वृत्तपत्र असल्याने, त्या वृत्तपत्राने आपल्या चुकांवरही पांघरून घालावे अशी नेहरू मंत्रिमंडळातील मंत्र्यांची धारणा असावी. त्यामुळे ते पं. नेहरूंकडे या संदर्भात तक्रारी करीत. पण पं. नेहरू स्वतःच्या पातळीवरच त्यांचा निकाल लावीत. आमच्या नव्वद टक्के अडचणी या नॅशनल हेरॉल्डमुळे झालेल्या आहेत, अशी तक्रार गोविंद वल्लभ पंत यांनी पंडितजींजवळ केली होती. परंतु पंडितजींनी त्याबद्दल चलपतीराव यांना कधीही विचारले नाही. संपादकाचा सन्मान राखला गेला पाहिजे आणि मोकळेपणी लिहिण्याच्या त्यांच्या हक्कांचे रक्षण केले पाहिजे हीच त्यांची भावना होती.'[७] संपादकांच्या लेखन स्वातंत्र्याचा सन्मान व प्रतिष्ठा, हे नेहरूंना लोकशाहीतील फार मौलिक असे मूल्य वाटत असे.

### शैलीदार व सुबोध लेखक

नेहरूंनी नॅशनल हेरॉल्डमध्ये व त्याआधी स्वातंत्र्य आंदोलनांत शेकडो लेख वृत्तपत्रातून लिहिले. त्यांच्या लेखनात जेवढी सुबोधता होती तेवढीच त्यात सरलता आणि शब्दलय होती. ' Jawaharlal Nehru—The Light of Asia ' या ग्रंथात मराठवाडा विद्यापीठ, औरंगबादचे निवृत्त उपकुलसचिव व इंडियन पॅनोरमाचे संपादक श्री. शेषराव चव्हाण त्यांच्या शैलीचे वर्णन करताना लिहितात,

' नेहरूंची स्मरणशक्ती व बुद्धीमत्ता अत्याधिक होती. त्यांच्यातील साहित्यिक लेखनसामर्थ्य त्यांच्या लेखन व भाषणातूनच नव्हे तर त्यांच्या कार्यालयीन नोंदी प्रस्तावातूनही व्यक्त होते. याचे संकलन केले तर उच्च वाङमयीन दर्जाचे व उत्तम राजकीय वस्तुपाठ ठरणारे अनेक खंड तयार होतील. भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते तर त्यांची वैचारिक अभिव्यक्ती ही स्पष्टता व शुद्धता या दोन्ही गुणांनी युक्त होती " (शेषराव चव्हाण, ' जवाहरलाल नेहरू–दी लाईट ऑफ एशिया ' १९८९.)

नेहरूंचे लेखन सामर्थ्य असे वादातीत होते. त्याचा प्रत्यय त्यांच्या हरेक लेखनात आपणास पहावयास मिळतो. ' In a Train ' या लेखाचे उदाहरण घेता येईल. ' मॉडर्न रिव्ह्यू ' च्या ऑगस्ट १९३६ च्या अंकात प्रकाशित झालेल्या आपल्या या मनोज्ञ लेखात, नेहरूंनी रेल्वे प्रवासाचा विषय घेतलाय खरा, परंतु त्याचबरोबर आपला वाचन छंद, पुस्तक प्रेम, मानवी इच्छाशक्ती व कतृत्वाचे अफाट विश्व या साऱ्या बाबींना अत्यंत सरळ नि प्रभावी शैलीत ते लिहिताना स्पर्श करून जातात आणि जाता जाता महत्त्वपूर्ण विचारही देऊन जातात. राजकीय घाई धबडग्यामुळे वाचन-लेखन ही प्रिय कामे करण्यास वेळ मिळत नाही आणि मग रेल्वेच्या प्रवासात हे शक्य होते हे ते सांगतात. लेखाची सुरुवातच पहा,

" मित्र मला विचारतात तुम्ही वाचता केव्हा ? काही कामाच्या व काही शंकास्पद उपयोगाच्या अनेकविध कार्यात माझे आयुष्य खूपच गुंतलेले आहे. पुस्तकांशी मैत्री करणे वाटते तेवढे सोपे काम नाही. राजकारणाच्या धबडग्याने जेव्हा तुमचे तारुण्य संपविलेले असते व तुमच्या दिवस-रात्री खाऊन टाकलेल्या असतात, तेव्हा पुस्तक वाचनासारख्या आनंददायक गोष्टीच्या विश्वात रमायला आवडत असूनही जमत नाही."[१]

तरीही नेहरू रेल्वे प्रवासात वाचन व लेखनासाठी वेळ काढत. ते आपले लेखही रेल्वेत लिहीत असा उल्लेख त्यांनी याच लेखात केला आहे. रेल्वेत लिहिताना डबा हालल्यामुळे जे धक्के बसतात, त्यामुळे लिहिणे थोडे कठीण जाते याचाही उल्लेख ते करतात. अलाहाबाद ते कराची या प्रवासात त्यांनी वाचलेल्या अनेक पुस्तकांपैकी एडवर्ड विल्सन यांच्या पुस्तकाचा उल्लेख या लेखात केला आहे. दक्षिण ध्रुवावर यशस्वी चढाई करून गेलेल्या स्कॉटीश टीमचे सदस्य राहिलेल्या गिर्यारोहक विल्सन याचा मृत्यू परतताना झालेला असतो. विल्सन याचे अतुलनीय धैर्य व साहस, अंटार्क्टिक प्रदेशातील बर्फाळ विषम स्थितीतील वातावरणावर त्यांनी केलेली मात, अनेक संकटात सहगिर्यारोहकांनी परस्परांना केलेले सहाय्य आणि संकटकाळात देखील जागी ठेवलेली विनोद बुद्धी या साऱ्यांचे चित्रदर्शी वर्णन करताना नेहरूंच्या लेखनातून सहजी काव्य ओळी उतरतात,

' I count life just a stuff
To try the soul's strength...'

## सामान्य ग्रामीण समाज व पत्रकारिता

पं. नेहरू हे भारतातील जनतेवर निस्सीम प्रेम करणारे व त्यांच्यावर नितांत विश्वास असणारे जनप्रिय नेते होते. भारताचा कानाकोपरा त्यांनी स्वातंत्र्याआधीच छिनून काढला होता. संतप्त जमावाला सामोरे जाऊन त्यांना शांत करण्याची व त्यांचे मनपरिवर्तनाची किमया करण्यासाठी नेहरू सदैव उत्सुक असत. भारतीय जनजीवनाशी अस्सलतेने समरस पावलेला हा नेता होता. त्यामुळेच पत्रकारितेनेही याच तऱ्हेने सामान्य, गरीब नि ग्रामीण जनतेविषयी संवेदनशील असावे, असे ते पत्रकारांना आवर्जून सांगत. अलाहाबाद येथे १६ फेब्रुवारी १९४६ साली झालेल्या ' ऑल इंडिया न्यूजपेपर एडीटर्स

कॉन्फरन्स ' च्या उदघाटकीय भाषणात त्यांनी ही बाब प्रकर्षाने मांडलेली आढळते. ' The Newspapers and The Common Man ' या आपल्या भाषणात संपादकांना त्यांनी सांगितले होते,

'' तुम्ही शहरांच्या बातम्या देता, प्रमुख राजकारणी नेते व त्यांच्या भाषणांना प्रसिद्धी देता, परंतु भारतातील आम जनतेचे दारिद्र्य, सामाजिक-आर्थिक स्थिती यांच्याबद्दल मौल्यवान असे फार कमी छापले जाते. ग्रामीण भारत विसरला जातो आणि त्याचा विचार देखील केला जात नाही. भारताच्या दारिद्र्याबद्दल नैमित्तिकतेने लिहिलेले संपादकीय लेख दिसतात एवढेच. तुम्ही परदेशी वृत्तपत्रांप्रमाणे काही प्रशिक्षित पत्रकारांना खेड्यांत पाठवायला हवे, झोपडपट्ट्यांमध्ये धाडायला हवे, त्यांची सामाजिक स्थिती अभ्यासून लेखन छापायला हवे. बातम्या दडपल्यामुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात घडलेली अत्यंत दुर्दैवी घटना म्हणजे बंगालमधील दुष्काळाची घटना होय. प्रारंभी या दुष्काळाची बातमीच कोठे छापून आली नाही. दररोज हजारोंनी लोक मरत होते ; पण त्यांचा साधा उल्लेखही वृत्तपत्रात नव्हता.''[१०] अशा रीतीने भारतीय समाजाशी, ग्रामीण-गरीब भारताशी आपली नाळ जोडायचा संदेश नेहरू पत्रकारांना परखड भाषेत सुनावताना आपण पाहतो. याच भाषणात पुढे बंगालच्या दुष्काळाची बातमी कलकत्त्याच्या एका वृत्तपत्राने कशी दिली आणि मग त्यावर बातम्या यायला लागल्या हे त्यांनी सांगितले आहे. पं. नेहरूंचे अलाहाबादचे १९४६ चे भाषण म्हणजे भारतीय पत्रकारितेचे वर्तमान–भविष्य दिशा याबाबतचे मौलिक भाष्य वाटते. आजही ते भाषण गैरलागू वा कालबाह्य वाटत नाही. या भाषणात पत्रकारितेची, पत्रकारांची आर्थिक स्थिती व गुणवत्ता सुधारण्यासाठी त्यांनी सांगितलेले मार्गही पुढे व्यवहारात आलेले दिसतात.

## ' नॅशनल हेरॉल्ड ' चे नेहरू

' नॅशनल हेरॉल्ड आणि नेहरू ' यांना वेगळे करता येणार नाही. स्वातंत्र्य लढ्यातील एक झुंझार वृत्तपत्र म्हणून त्यांनी ' नॅशनल हेरॉल्ड ' ला जन्म दिला. त्यांचे मूल्याधिष्ठीत संगोपन केले. आर्थिक अडचणी, सरकारची नाकेबंदी, माणसांची अडचण या साऱ्यांवर मात करत आपल्या प्रचंड बिझी आयुष्यातही त्यांनी या आपल्या अपत्यावर दक्षपणे लक्ष ठेवलेले दिसते. इतकेच नव्हे, तर त्यांनी ' नॅशनल हेरॉल्ड ' नावाने आणि प्रमुख संपादक या नात्याने अनेक लेख नियमितपणे लिहिलेले आढळतात. नेहरूंच्या या वृत्तपत्रीय लेखनाचा स्वतंत्र अभ्यास होणे गरजेचे वाटते, इतके ते वेगळे व कसदार असे आहेत. ' Before India Is Reborn ' सारखे लेख अमेरिकेतील ' Asia ' नियतकालिकाने पुर्नमुद्रित केले आहेत. ' A Roadside Interlude ' या मद्रासच्या ' त्रिवेणी ' मधील प्रसिद्ध लेखात नेहरूंनी ग्रामीण जनतेला ' भारत माता की जय ' चा समजावून दिलेला अर्थ व अनुभव त्यांच्या अतुलनीय नेतृत्त्वगुणांची साक्ष देतो. नॅशनल हेरॉल्डमध्ये तर त्यांनी विपुल लेखन केले. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नांवर तसेच प्रवास-ग्रंथ यावरही त्यांनी लेखन केले आहे.

हेरॉल्डमध्ये बड्या भांडवलदारांचा अनावश्यक हस्तक्षेप त्यांनी धिक्कारला. स्वातंत्र्य, समाजवाद, धर्मनिरपेक्षता या मूल्यांसाठी त्यांनी वृत्तपत्र चालविले होते. डालमिया जैन ग्रुपचे संस्थापक कै. रामकृष्ण डालमिया यांच्या ' हेरॉल्ड ' मधील शेअरबाबतचा वाद उठल्यावर नेहरूंनी त्यांना २१ डिसेंबर १९४१ रोजी बार्डोलीहून पत्र लिहून चांगलेच सुनावले होते.[११] नॅशनल हेरॉल्डसाठी अनिच्छेने कोणाकडूनही पैसे घेण्याच्या विरोधात मी आहे. पैशापेक्षा अनेक महत्त्वपूर्ण गोष्टी मला आयुष्यात महत्त्वाच्या वाटतात.' नॅशनल हेरॉल्ड ' ला इच्छेने मदत करणारे सुदैवाने मिळतात. तुमची मदत यापुढे कधीही मागितली जाणार नाही. व्यापारी दृष्टीकोन पाहणाऱ्यांना हेरॉल्डमध्ये स्थान नाही अशा कडक शब्दात त्यांना सुनावले होते.

### दैनंदिन कार्यातील दक्षता

' नॅशनल हेरॉल्ड 'च्या दैनंदिन कार्यातही नेहरू लेखनाशिवाय जातीने लक्ष देत असत, हे त्यांनी के. रामा राव, चलपतीराव यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहारावरून स्पष्ट होते. जानेवारी १९४२ साली के. रामा राव यांनी संपादकीय विभाग, त्यांची पात्रता, काम व पगार यांची टिपणी नेहरूंना पाठविली होती. त्यावर सर्व संपादकीय सदस्यांना भेटून प्रत्येकाशी स्वतंत्र चर्चा करण्याचे नेहरूंनी ५ जानेवारी १९४२ च्या पत्राद्वारे ठरविल्याचे दिसते. इंग्लंडमध्ये त्यावेळी असणाऱ्या कृष्ण मेनन यांनी ( पुढे ते नेहरू मंत्रिमंडळात आले) पाठवावयाच्या बातम्या व तारा याबाबतही त्यांनी पत्रात व्यवहार्य व वृत्तपत्रीय दृष्टीने मार्गदर्शन केलेले दिसते. आठवड्यास त्यांचेकडून १००० शब्दांपर्यंतच्या बातम्या घ्याव्यात असे ते सुचवितात. त्या सर्वच्या सर्व तारा न छापता ; त्यांच्या वृत्तमूल्यानुसार छापाव्या असे स्वातंत्र्यही ते के. रामा राव यांना देतात.[१३]

हेरॉल्डची सभ्यतेची पातळी घसरू नये याबाबतही नेहरू अत्यंत जागरूक होते. ३० मार्च १९४२ साली क्रीप्स योजनेबाबत नॅशनल हेरॉल्डमध्ये अग्रलेख आला होता व त्याचे शीर्षक होते " Put it in your pipe and smoke it, Cripps " क्रीप्स योजना सुरळी करून पाईपमध्ये घाला आणि त्याचा धूर सोडा ; एवढी ती अपात्र आहे असे संपादकीयात म्हणायचे होते. नेहरूंना ही भाषा बिलकूल पसंत पडली नाही. अशा असभ्य भाषेने नॅशनल हेरॉल्डची प्रतिष्ठा लोप पावते अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच के. रामा राव यांना २ एप्रिल १९४२ रोजी लिहिलेल्या पत्रात ते स्पष्टपणे सुनावतात,

...It was highly undignified and verging on vulgarity. this kind of thing brings down the reputation of our paper. ... I do not want the Herald to behave at anytime in a manner laking in dignity."[14]

हेरॉल्डबद्दल आणि स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या लढवय्या सैनिकाच्या रूपातील भूमिकेबद्दल नेहरूंनी २ जून १९४२ साली ' नॅशनल हेरॉल्ड ' मध्येच लिहिलेल्या लेखात म्हटले आहे,

" आमची हेरॉल्डसंबंधीची फार कमी स्वप्नं पुरी झाली असतील, फार कमी आशांना मूर्त रूप आले असेल, परंतु तरीही हेरॉल्डने अनेक मर्यादांसहित आमच्या स्वप्नातील, आशांमधील काही बाबी कृतीत आणल्या आहेत. भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढणारा एक शक्तीमान सैनिक म्हणून हेरॉल्डने काही भरीव काम केले आहे."[१५] हेरॉल्ड ग्रुपद्वारेच ' कौमी आवाज ' या उर्दू दैनिकाची उभारणी नेहरूंनी हियातुल्ला अन्सारी या राष्ट्रीय पत्रकाराच्या नेतृत्वाखाली केली व त्यालाही एक लढाऊ रूप दिले होते. कृष्णा नारायण, चलपतीराव, रफी अहमद किडवाई, हियातुल्ला अन्सारी यांच्याशी त्यांनी केलेल्या पत्रव्यवहारावरून[१६] ' कौमी आवाज ' हे वृत्तपत्र उर्दू पत्रकारितेत उत्तम काम करीत होते. मात्र त्याचे व्यवस्थापन कमकुवत होते. काटकसर व कार्यक्षमतेद्वारे अन्सारींचे चांगले संपादकीय नेतृत्त्व असणारे हे उर्दू वृत्तपत्र सुधारण्याचे अनेक मार्ग ; नेहरूंनी संबंधितांना कळविलेले पत्रव्यवहारावरून दिसतात. मूल्यधर्मी पत्रकारितेचे एवढे भान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि संपादकीय जाणीव यांचा एकत्र समुच्चय असणाऱ्या नेहरूंच्या व्यक्तिमत्वात फार मोठा गुणवान पत्रकार दडलेला होता, याबाबत वाद नाही.

□□□

## संदर्भसूची


[१] पाध्ये प्रभाकर, मराठी अनुवाद प्रो. प्र. ना. परांजपे व वसुधा परांजपे, ' पत्रकारितेची मूलतत्त्वे ', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ४११ ०३०, १९९१, पृष्ठ ७४.

[२] Jawaharlal Nehru, Selected Works of J. Nehru, Vol. 7, Orient Longman, New Delhi-1, p. 428.

[३] Jawaharlal Nehru, ' On the lot of Indian Journalist's ', Hindustan Times, 28 July 1936, Selected Works of J. Nehru, Vol. 7, Orient Longman, New Delhi, p. 424.

[४] Jawaharlal Nehru, ' On the Role of Press ', item 19, Vol. 7,Ibid, p. 429.

[५] Ibid, ' On the freedom of Press, item 25, p. 439, 440.

[६] Ibid, item No. 17, p. 424, 425.

[७] इंद्रकुमार गुजराल, ' पं. जवाहरलाल नेहरू आणि वृत्तपत्र स्वातंत्र्य ', दै. लोकमत-साहित्यजत्रा, औरंगाबाद, १३ नोव्हेंबर १९८८, पृष्ठ २.

[८] Chavan Sheshrao, ' Jawaharlal Nehru—The Light of Asia ', Sunil Chavan, Publisher, Aurangabad, 1989, p. 19.

[९] Jawaharlal Nehru, ' Selected Works of J. Nehru, Vol. 7, item 51, p. 325.

[१०] Jawaharlal Nehru, Selected Works of J. Nehru, Vol. 15, item 10, Orient Longman, New Delhi, 1979, p. 614, 615.

[११] Jawaharlal Nehru, Selected Works of J. Nehru, Vol. 12, item 1, p. 575, 576.

[१२] Ibid p. 575 and 576.

[१३] Ibid p. 576 and 577.

[१४] Ibid p. 578.

[१५] Ibid, item No. 5, National Herald, p. 580.

[१६] Jawaharlal Nehru, ' Selected Works of J. Nehru, Vol.14, Orient Longman, New Delhi-1, p. 580, 581, 582 and 583.


□□□

# पं. जवाहरलाल नेहरू आणि धर्मनिरपेक्षता

□ सत्यरंजन साठे

भारत देशाची फाळणी होऊ नये या करिता सर्व प्रयत्न होऊनही शेवटी फाळणी करण्याचे ठरले. भारत आणि पाकिस्तान ही दोन राष्ट्रे त्यातून निर्माण झाली. पाकिस्तान हे मुस्लिम राष्ट्र होणार हे तर उघडच होते. प्रतिक्रिया म्हणून भारत हे हिंदूराष्ट्र होऊ शकले असते. तसे झाले असते तर देशाचे आणखी तुकडे होण्यास निमंत्रण देणारी घटना असा त्या घटनेचा उल्लेख करावा लागला असता. परंतु उर्वरित भारत हे सर्व भारतीयांचे–मग ते हिंदू असोत, मुसलमान असोत, ख्रिश्चन असोत, पारशी अगर शीख असोत–राष्ट्र असेल आणि त्यात धर्मनिरपेक्ष शासन स्थापन होईल, हा निर्णय भारताच्या ज्या नेतृत्वाने घेतला त्यात महात्मा गांधींच्या खालोखाल पं. जवाहरलाल नेहरूंचा सिंहाचा वाटा होता. पाकिस्तान निर्मितीची प्रतिक्रिया म्हणून भारताबदलचा निर्णय बदलणे आणि ते हिंदू-राष्ट्र घोषित करणे ; ही राजकीय प्रौढत्वाच्या अभावाचा प्रत्यय देणारी घटना झाली असती. परंतु राष्ट्रीय चळवळीतून घडलेले भारतीय नेतृत्व इतके चंचल, तत्त्वहीन आणि संधिसाधू नव्हते, म्हणूनच त्या परिस्थितीतही त्याने भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य असेल, असे खंबीरपणे ठरवले.

खरे म्हणजे हा निर्णय काही एकाएकी घेण्यात आलेला नव्हता. राष्ट्रीय चळवळीत नव्या भारताचा जो आलेख साकार झाला, तो लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय यावर आधारलेली समाजव्यवस्था असलेला भारत, असाच पुढे ठेवला गेला. स्वातंत्र्याची चळवळ ही महात्मा गांधींच्या नेतृत्त्वाखाली व्यापक झाली, लोकांची झाली. याला कारण सर्वंकष सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे ध्येय त्या चळवळीने स्वीकारले. ती चळवळ काही केवळ इंग्रजी सत्ता चालविण्याकरता उभी राहिली नाही. इंग्रजी सत्ता ही अनेक सामाजिक, आर्थिक व राजकीय अन्यायाची जननी होती. ती घालवण्यामुळे भारताची राष्ट्रीय अस्मिता पुर्नस्थापित होणार होती. परंतु इंग्रजी सत्तेच्या जागी येणारी सत्ता कुठल्याही राजाची किंवा घराण्याची राजेशाही नसेल ; तर लोकांचे राज्य असेल ही प्रेरणा राष्ट्रीय चळवळीमागे अभिप्रेत होती. भारतीय जनतेला निर्भय बनवून राष्ट्रीय चळवळीत कृतीशील करणे हे असामान्य कार्य फक्त महात्मा गांधींच्यासारखा नेताच करू शकला ; यात शंका नाही. महात्माजींचा विचार शासकीय यंत्रणेमार्फत कार्यवाहीत आणावयाची जबाबदारी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावरच पडली. कारण स्वतंत्र भारताचे पंतप्रधान तेच झाले. गांधींनीच एका ठिकाणी म्हटले होते की, ज्यावेळी ते नसतील त्यावेळी नेहरूच त्यांची भाषा बोलतील–त्यांचा विचार पुढे चालवतील. पंतप्रधान झाल्यावर नेहरूंनी घेतलेले आंतरराष्ट्रीय संबंधाबाबतचे अलिप्ततेचे धोरण, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांना स्थायी स्वरूप देण्याकरता त्यांनी केलेले परिश्रम आणि आर्थिक नियोजनाबाबतचा त्यांचा दृष्टीकोन ; हा तपशीलात गांधींच्या विचारांपेक्षा वेगळा वाटत असला, तरी त्याचा पाया गांधींच्याच विचाराचे सूत्र चालवणारा होता आणि पर्यायाने गांधींनी केलेले वरील भाकित खरे करणारा होता.

महात्मा गांधी धार्मिक प्रवृत्तीचे होते. आपल्या चळवळीकरता त्यांनी धार्मिक भाषा आणि साधने वापरली. त्यांची प्रतिमा महात्म्याची, संताची होती. त्यामुळे त्यांना लोकसंचय मोठ्या प्रमाणावर करता आला. गांधी धार्मिक होते–परंतु सांप्रदायिक नव्हते. सर्व धर्मांना ते समान मानत–सर्वच धर्मांचा आदर करत, परंतु धर्माचा उपयोग राष्ट्रीयत्व सीमीत करण्यासाठी वापरत नव्हते. ते धार्मिक होते पण कर्मकांडी नव्हते. " धर्म " या शब्दाचा व्यापक अर्थ जर घेतला तर मानवतावादी नीती नियम असा होतो. त्या अर्थाने गांधी ' धर्म ' मानत आणि नेहरूही मानत. परंतु गांधी ईश्वर मानत; तर नेहरू ईश्वर आहे किंवा नाही, याबद्दल मनात संशय बाळगणाऱ्यांपैकी होते. इंग्रजीत त्याला ॲगनॉस्टिक (Agnostic) म्हणतात तसे ते होते. परंतु मानवतावादी मूल्ये, लोकशाहीवादी नीती आणि समतावादी विचार मानणारे होते. भारताच्या राष्ट्रीय पुनरुत्थानात या मूल्यांना, विचारांना आणि नैतिक बांधिलकीला मोठे स्थान असणे आवश्यक आहे असे ते मानत. अर्थात अनेक तपशीलात गांधीहून भिन्न विचार आणि आचार असणारे नेहरू, मूलगामी गांधींचीच जीवननिष्ठा बाळगत होते. स्वतंत्र भारत धर्मनिरपेक्ष असेल म्हणजे काय ? तर या देशाचे नागरिकत्व, शासन हे धर्म म्हणजे ज्याला इंग्रजीत रिलिजन (religion) असे म्हणतात ; त्यापासून मुक्त असेल पण ते ' धर्म ' या व्यापक संज्ञेपासून मुक्त असून चालणार नाही. माणूस हा केंद्रबिंदू मानणारी व्यवस्था म्हणजेच लोकशाही, इहवादी आणि समाजवादी व्यवस्था होय. माणसाची मुक्तता धर्मांधतेपासून, अंधश्रद्धेपासून होणे जेवढे आवश्यक होते; तेवढेच आर्थिक व सामाजिक शोषणापासून होणेही आवश्यक होते. इतिहासात धर्मसत्तेने माणसावर केलेल्या जुलुमांची अनेक उदाहरणे आहेत. तशीच सरंजामशाही आणि अनिर्बंध भांडवलशाहीने केलेल्या जुलुमाचीही आहेत. राज्यघटनेत समता व स्वातंत्र्य यांची ग्वाही देऊन सांप्रदायिक, सरंजामशाही किंवा अनिर्बंध भांडवलशाहीप्रधान सत्तेला आव्हान करण्यात आले. आर्थिक न्याय–सामाजिक न्याय निर्माण झाल्याशिवाय सामाजिक समता, धर्मातीतता निर्माण होऊ शकणार नाही ; याची जाणीव असणाऱ्या पं. जवाहरलाल नेहरूंनी आर्थिक नियोजनाची कास प्रथमपासूनच धरली होती. स्वतंत्र भारतात कार्यवाहीत असलेल्या पंचवार्षिक योजना हे त्याचेच फलित होते.

**भारतीय राज्यघटना आणि धर्मनिरपेक्षता.**–भारतीय राज्यघटना घटना समितीने केली हे खरे. परंतु ज्या तीन पुढाऱ्यांनी त्याचे राजकीय मार्गदर्शन केले, त्यात नेहरू, पटेल आणि आंबेडकर ह्यांची नावे प्रामुख्याने घ्यावी लागतील. या राज्यघटनेच्या प्रतिज्ञापत्रकात ' सेक्युलर ' हा शब्द सुरुवातीला नव्हता. तो बेचाळीसाव्या घटना दुरुस्तीने आणीबाणीत घालण्यात आला आणि योगायोग असा की, तेव्हापासून राजकीय पातळीवर धर्म आणि राजकारण याची गल्लत मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. मूळ प्रतिज्ञापत्रकात ' सेक्युलारिझम ' हा शब्द का नव्हता ? याचा अर्थ मुळात राज्यघटनेत ते तत्त्व समाविष्ट नव्हते, असा घ्यायचा का ? राज्यघटनेच्या अनेक तरतुदी पाहिल्या तर इहवादी शासनाची संकल्पना त्यात समाविष्ट झालेली होती असेच म्हणावे लागेल. इहवादी शासनाची तीन आवश्यक लक्षणे राज्यघटनेत समाविष्ट होती. ती खालीलप्रमाणे होत :–

(१) कायद्यापुढे सर्व समान आणि धर्म, जात, लिंग किंवा वंश या कारणास्तव पक्षपात होता कामा नये, असे शासनावरील बंधन ; (२) व्यक्तीला धर्मश्रद्धेचे, पालनाचे तसेच त्याचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य ; आणि (३) शासनामार्फत कुठल्याही एका धर्माचा पाठपुरावा होऊ नये. त्याकरता कर आकारला जाऊ नये किंवा त्याचे शिक्षण शासकीय शिक्षण संस्थात समाविष्ट असू नये, अशी हमी. भारताच्या घटनाकारांना अमेरिकेतील इहवादी शासनाचा अनुभव ज्ञात होता आणि म्हणून अमेरिकन राज्यघटनेतील त्रुटी आणि भारतीय परंपरेला अनुकूल असणाऱ्या अटी त्यांनी राज्यघटनेत समाविष्ट

केल्या नाहीत. परंतु तत्त्वतः इहवादी शासन व्यवस्था राज्यघटनेला अभिप्रेत होती. परंतु अशी व्यवस्था केवळ घटनेच्या तरतुदीनुसार निर्माण होत नसते; ती निर्माण होण्यास अनेक संकेत, परंपरा नव्याने निर्माण व्हाव्या लागतात आणि तशा त्या निर्माण करण्याची, त्यांना सामाजिक प्रामाण्य प्राप्त करून देण्याची अवघड जबाबदारी राजकीय नेतृत्त्वावर असते. त्या दृष्टीने राज्यघटना तपशील घालून बोजड करण्यापेक्षा तिच्या कार्यवाहीत असे संकेत निर्माण करून ती समाजाभिमुख ठेवणे ही एक घटनाशास्त्राची अवघड अशी आवश्यकता असते. पं. नेहरूंवर हीच जबाबदारी होती आणि याची जाणीव त्यांच्या मनात सातत्याने होती. भारताच्या परंपरेत इहवादी शासन निर्माण होणे ही एक अत्यंत अवघड गोष्ट होती. कारण हिंदुत्वात जरी इहवादी अंश समाविष्ट असला, तरी शासनाच्या पातळीवर ते तत्त्व आणणे कठीण होते. हिंदू आणि इस्लाम हे दोन्ही ' धर्म ' (संकुचित अर्थाने) व्यक्तीच्या सर्व सामाजिक व्यवहारांचे नियमन करू पाहणारे धर्म होत. धर्माचे क्षेत्र निराळे, राजकीय–सामाजिक क्षेत्र निराळे असा भेदभाव त्या परंपरेत नव्हता त्यामुळे या देशात इहवादी शासन निर्माण करण्याकरता समाजमनातच फार मोठे परिवर्तन होणे आवश्यक होते. माणसाची ईश्वरश्रद्धा घालवावी, असे इहवादी शासनाचे म्हणणे असत नाही. कारण नाहीतर त्याने धर्मविषयक स्वातंत्र्य व्यक्तीला बहाल केले असते. परंतु धर्मविषयक स्वातंत्र्य हे पारलौकिक आणि पारमार्थिक व्यवहारापुरते मर्यादित असावे–इतर सर्व सामाजिक व्यवहार भौतिक विधीनियमानुसारच नियमित व्हावेत अशी अपेक्षा असते. याकरता नेतृत्त्वावर फार मोठी जबाबदारी असते. कारण भारतासारख्या देशात–जिथे नेतृत्त्वाची परंपरा आहे तिथे नेत्याच्या अंगचे गुण हेच आदर्श म्हणून समोर ठेवले जातात. आपल्या या सामाजिक आकर्षणाचा उपयोग नेहरूंनी लोकशाही, धर्मनिरपेक्षता या तत्त्वांना पूरक असे संकेत आणि राजकीय परंपरा निर्माण करण्यात पुरेपूर केला. राष्ट्रपतीने गंगेवर ब्राह्मणांचे पाय धुणे योग्य नव्हे, अशी खंबीर भूमिका फक्त जवाहरलाल नेहरूच घेऊ शकले. त्यानंतरच्या काळात राष्ट्रपतीच काय, तर पंतप्रधानही पुजाऱ्याच्या आणि शंकराचार्यांच्या आशीर्वादाकरता तिष्ठत बसू लागले.

नेहरू हे लोकशाहीवादी असल्याने काही ठिकाणी त्यांनी, त्यांना शक्य होते तेवढ्या आक्रमकपणे इहवादी शासनास आवश्यक ती पावले टाकली नाहीत, हे खरे. हिंदू कोड बिलाबाबत जो उशीर लागला त्यास डॉ. राजेंद्रप्रसाद यांचा विरोध हे एक कारण होते, तसेच १९५२ पूर्वी या सार्वमतावर निवडणुका न झाल्याने तात्पुरत्या संसदेला अशा तऱ्हेचे मूलगामी बदल करता येतील का, ही शंका नेहरूंच्या मनात असणे हेही कारण होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ही दिरंगाई मान्य झाली नाही. लोकशाहीत विरोध जिंकावा लागतो–केवळ तात्त्विक भूमिका घेऊन चालत नाही. काही प्रमाणात पवित्रे (strategies) आवश्यक असतात. नेहरू हे एका राष्ट्रीय पक्षाचे पुढारी होते. आपले म्हणणे पक्षावर लादून मनाप्रमाणे कुठलीही गोष्ट करून घेणे त्यांना अशक्य नव्हते. परंतु तसे करणे त्यांच्यातल्या लोकशाही मनाला मानवणारे नव्हते. म्हणून हिंदू कोड बिल आणण्याऐवजी विवाह कायदा, वारसा कायदा आणि दत्तकाचा कायदा अशी तीन विधेयके आणून हिंदू कायद्याचे आधुनिकीकरण त्यांच्या सरकारने केले. मुस्लिम व्यक्तीगत कायद्यात मात्र कुठलाही बदल त्यांच्या हयातीत झाला नाही. समान नागरी कायद्याचे उद्दीष्ट जरी त्यांनी राज्यघटनेत अंतर्भूत केले होते ; तरी त्या दिशेने पावले त्यांच्या सरकारने टाकली नाही ;. धर्मसत्तेला आव्हान देणारा जाती बहिष्कृततेविरुद्धचा कायदा मुंबई शासनाने केला. बोहरा धर्मगुरुच्या हातात त्याचा फतवा व हुकूम न मानणाऱ्या बोहरा समाजातील व्यक्तीला बहिष्कृत करायचा अधिकार आहे. या अधिकाराचा उपयोग बोहरा धर्मगुरू हे व्यक्ती स्वातंत्र्याची संपूर्ण गळचेपी करण्याकरता वापरतात. मुंबई राज्याने या बहिष्कृत करण्याच्या प्रथेस बेकायदा ठरवणारा कायदा केला. हा कायदा सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला. असा कायदा धार्मिक पीठांच्या

स्वायत्ततेचा संकोच करतो असे न्यायालयाने मत दिले. परंतु धार्मिक पीठांची स्वायत्तता आणि व्यक्तीचे स्वातंत्र्य यामध्ये कुठले मूल्य अधिक महत्त्वाचे? न्यायालयाचा हा निर्णय दुर्दैवी होता आणि धर्मविषयक अधिकारांबाबत समाजसुधारणा करण्यास अडसर निर्माण करणारा ठरला. मुस्लिम कायद्यात बदल व्हायचा, तर त्या समाजाकडूनच त्या बाबतची मागणी यावयास हवी हे तत्त्वतः बरोबर होते. पण अशी मागणी येणार कशी? जोवर मुस्लीम नेतृत्त्व हे मुळी वेगळेपणा आणि गूढवाद यावर आधारलेले आहे तोवर ते होणे कठीणच. काँग्रेस पक्षाने आपण धर्मनिरपेक्ष आहोत असे सिद्ध करण्याकरता मुस्लिम मूलतत्त्ववादांचा तसेच गूढवादांचा अनुनय केला–त्यातून नेहरूंनाही वगळता येणार नाही. स्वातंत्र्य आल्याबरोबर समान नागरी कायद्याच्या दिशेने पावले टाकता आली असती. नेहरूंसारख्या सामर्थ्यवान नेत्याला ते सर्वात अधिक शक्य होते. परंतु त्यांनी ते केले नाही. त्याची अनेक इतर कारणे असू शकतील. नेहरूंना असे वाटत होते की, एकदा आर्थिक प्रगती झाली, साधनसंपत्तीचे वाटप न्याय्य पद्धतीने झाले की, धर्म, जात या विभागणाऱ्या भिंती या आपोआपच खाली पडतील आणि मग कायद्याचे आधुनिकीकरण करणे सोपे होईल. परंतु कायद्याचे आधुनिकीकरण हे देखील आर्थिक प्रगतीस उपकारक होऊ शकले असते. ख्रिश्चनांचा कायदाही असाच कालबाह्य झालेला आहे. ख्रिस्ती समाजातल्या अनेकांची कायद्यात सुधारणा करा, अशी मागणी आहे. याही कायद्याला आजवर कुणी हात घातलेला नाही.

फाळणी झाली तेव्हा लोकसंख्येची अदलाबदल करावी असा विचार पुढे आला. त्याला पंडितजींनी निकराने विरोध केला. मुस्लिमांना सैन्यात किंवा पोलीसदलात घेऊ नये, असाही विचार मांडण्यात आला. त्यालाही पंडितजींनी विरोध केला. फाळणीनंतर जी अनेक संस्थाने होती, त्यांनी भारतात किंवा पाकिस्तानात विलीन होणे क्रमप्राप्तच होते. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पोलादी नेतृत्त्वाचा भौगोलिक दृष्ट्या भारतात किंवा त्यास लागून असणाऱ्या सर्व संस्थानांचे भारतात विलिनीकरण घडवून आणण्यास सिंहाचा वाटा होता. अपवाद राहिला फक्त जुनागढ, हैदराबाद व काश्मीर यांचा, त्यापैकी जुनागढमध्ये हिंदू बहुसंख्य आणि मुसलमान राजा–तसेच हैदराबादमध्येही होते. ही दोन्ही संस्थाने भारताकडे येणे प्राप्तच होते. कारण त्या दोन्ही संस्थानांच्या लोकांची तशी इच्छा असणे अनिवार्य होते. ते हिंदू होते म्हणून नव्हे; तर दोनपैकी एक धर्माच्या पायावर स्थापन होत असल्याने व ते इस्लामी राज्य होत असल्याने त्यांनी धर्मनिरपेक्ष भारतातच सामील होणे नैसर्गिक होते. काश्मीरमध्ये मुस्लिम बहुसंख्य होते पण राजा हिंदू होता. केवळ द्विराष्ट्रवादाच्या भूमिकेतून पाहिले असता, काश्मीर पाकिस्तानमध्ये जाणे संयुक्तिक झाले असते. परंतु काश्मीरच्या जनतेचा लोकशाही हक्कासाठी जो लढा अनेक वर्षे चालला होता; तो तेथील राजसत्तेविरुद्ध होता आणि पं. नेहरू व त्यांचा काँग्रेस पक्ष हे त्या लढ्याबाबत सहानुभूती बाळगून होते. हिंदू-मुस्लिम या द्वंद्वात काश्मीरची जनता आणि त्या जनतेचे नेते शेख अब्दुल्ला त्यावेळी विचार करत नव्हते. लोकविरुद्ध राजेशाही असे तेथील संघर्षाचे स्वरूप होते. त्या संघर्षाबद्दल आणि लोकांच्या चळवळीबद्दल पं. नेहरूंच्या मनात आस्था होती म्हणूनच काश्मीरच्या राजाने त्यांना काश्मीरात प्रवेश करण्यासही बंदी केली होती. काश्मीरच्या महाराजांचा डाव भारत व पाकिस्तान या दोन्हींना झुलवत ठेवण्याचा होता. पाकिस्तान त्याबाबत अधीर झाले आणि त्याने टोळीवाल्यांना काश्मीरवर आक्रमण करण्यास धाडले. त्या परिस्थितीत टोळीवाल्यांनी तेथे इतके अत्याचार केले की, काश्मीरच्या महाराजांना भारताकडे मदत मागणे भाग पडले. काश्मीर भारतात विलीन झाल्यावरच भारत त्याच्या साह्यास सशस्त्र जाऊ शकेल असे भारताचे गव्हर्नर जनरल–मौंट बॅटन यांनी सांगितल्यावर नाईलाज म्हणून काश्मीरच्या राजांनी विलीनीकरणनाम्यावर सही केली. त्यानंतरचा इतिहास सर्वज्ञातच आहे. भारताने, पाकिस्तानने धाडलेल्या टोळीवाल्यांचे

आक्रमण परतवले. पाकिस्तानने केलेल्या आक्रमणाची तक्रार घेऊन पंतप्रधान नेहरू यूनोकडे गेले. परंतु यूनोने आक्रमक आणि त्याविरुद्धची तक्रार करणाऱ्यांना एकाच मापाने मोजले. शेवटी आंतरराष्ट्रीय राजकारण केवळ तत्त्वानुसार होत नसते; तर अनेक राष्ट्रांच्या आणि त्यातल्या त्यात बड्या राष्ट्रांच्या हितसंबंधांनुसारच होत असते, हा अनुभव नेहरूंना आला. लोकशाहीवर निष्ठा असल्याने काश्मीरात पाकिस्तानी आक्रमण संपूर्ण मागे गेल्यावर आपण सार्वमत घेऊ आणि त्यानंतरच काश्मीरचे भारतातील विलीनीकरण अंतिम होईल, अशीही ग्वाही नेहरूंनी दिली. पाकव्याप्त काश्मीरात पाकिस्तान पाय रोवून बसले. त्यास तेथून जाण्यास युनोने सांगितले असताही त्याने आपले सैन्य तेथून काढून घेतले नाही. भारताने अलिप्ततेचे धोरण अवलंबिले तर पाकिस्तान हा पाश्चिमात्य राष्ट्राच्या संरक्षण करारात सामिल झाला. पाकिस्तानव्याप्त काश्मीर आणि उर्वरित भारतातला काश्मीर असे दोन तुकडे झाले. राजकीय परिस्थिती इतकी बदलली की, सार्वमत घेण्याचे आश्वासन पुरे करणे त्यानंतर शक्य नव्हते. नेहरूंच्या काश्मीर विषयक धोरणामागे आणि त्यांच्या आंतरराष्ट्रीय क्षेत्रातल्या अलिप्ततेच्या धोरणामागे त्यांचे वसाहतवाद विरोधी शांततावादी तत्त्वज्ञान होते. भारत हे जसे हिंदू राष्ट्र नाही, तसेच ते मुस्लिमविरोधी राष्ट्रही नाही; हे जगातल्या अनेक राष्ट्रांना–मुख्यतः मुस्लिम लोकसंख्या असलेल्या राष्ट्रांना पटवून देण्याची आवश्यकता होती. मुस्लिम बहुसंख्येने ज्या राज्यात आहेत ते काश्मीर भारताचा अविभाज्य भाग आहे असे म्हणत असताना खूप किंमत देऊन का होईना, परंतु जीनाने प्रस्थापित केलेल्या द्विराष्ट्रवादाला आपण शह देऊ शकलो, असे समाधान नेहरूंना होते. ज्या परिस्थितीत काश्मीर भारतात आले त्या परिस्थितीत आणि तेथील मुस्लिम लोकसंख्येमुळे भारतीय संघराज्यात काश्मीरचे निराळे व वेगळे स्थान राहील अशी ग्वाही देणेही भाग होते. कलम ३७० हे त्यासाठीची व्यवस्था होती. कलम ३७० मध्ये काश्मीर राज्याला संघराज्य पद्धतीत असणारी जास्तीत जास्त स्वायत्तता देण्यात आली. आज काश्मीरात जे प्रश्न निर्माण झाले आहेत; ते कलम ३७० मुळे झाले हे म्हणणे योग्य होणार नाही. काश्मीरच्या जनतेला भारतीय राष्ट्रीय-प्रवाहात ओढून घेण्यात भारतीय नेते अपयशी ठरले असेच म्हणावे लागेल. बांगला देशच्या निर्मितीने देखील द्विराष्ट्रवाद खोटा पाडला गेला. काश्मीरचे भारतात खऱ्या अर्थाने जर विलीनीकरण व्हायचे असेल तर काश्मीरच्या लोकांनाच आपण भारतीय आहोत असे वाटणे आवश्यक आहे. ते का वाटत नाही; हा या लेखाचा विषय नाही. परंतु काश्मीरकडे नेहरूंनी धर्मनिरपेक्षतेचा प्रत्ययकारी पुरावा म्हणून पाहिले. परंतु केवळ भावनेवर असे प्रश्न सुटत नसतात. त्याला कठोर अशा व्यवहाराची जोड लागते. बांगला देश निर्मितीमुळे पराभूत झालेला द्विराष्ट्रवाद आज पुन्हा डोके वर काढत आहे. काश्मीर भारतापासून फोडण्याकरता काश्मीरच्या लोकांना धर्माच्या आधारावर वेगळे करण्याचा पाकिस्तानी नेत्यांचा डाव आहे. काश्मीरच्या लोकांना जर ' इस्लाम ' याच आधारावर निवड करायची असती तर ती त्याना १९४७ सालीच करता आली असती. त्यावेळी पाकिस्तानमध्ये सामील होण्याचा निर्णय त्यांनी का घेतला नाही? टोळीवाल्यांच्यामार्फत केलेल्या पाकिस्तानी आक्रमणाचा त्यांनी का विरोध केला? भारत लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे हीच काश्मीरी जनतेला महत्त्वाची बाब वाटली. आपली अस्मिता व वेगळी संस्कृती टिकेल ती भारतातच, असे त्यांना वाटले. कलम ३७० ने त्याचीच हमी दिली आहे. कलम ३७० घालवण्याची मागणी करण्यापेक्षा काश्मीरात खुल्या निवडणुका कशा होतील; तिथे आर्थिक व सामाजिक विकास होईल याकडे लक्ष द्यावयास हवे. काश्मीर हा भारताच्या धर्मनिरपेक्षतेचा महत्त्वाचा पुरावा आहे. नेहरूंचे काश्मीरबाबतचे धोरण याच भूमिकेवरून होते. द्विराष्ट्रवादाच्या आधारे काश्मीर भारतापासून तोडला जाणे हे येथील लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता या दोन्हींना घातक ठरेल असे ते नेहमी म्हणत. खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष राज्यनीती, आर्थिक विकास आणि शिक्षण हीच या

परिस्थितीवर मात करण्याची साधने होऊ शकतील. नवीन राष्ट्रीय मोर्चा सरकारने त्याच दिशेने प्रयत्न करावेत. परंतु काश्मीर भारतात रहावे असे नेहरूंना प्रकर्षाने वाटत होते. भारतात काश्मीर असणे हा द्विराष्ट्रवादाचा पराभव आहे असे म्हणत. धार्मिक पायावर राष्ट्राची उभारणी ही त्यांना हास्यास्पद गोष्ट वाटत असे. बांगला देशच्या निर्मितीने ते सिद्धही झाले. ते पहावयास नेहरू हयात नव्हते. परंतु बांगला देशाच्या वेळच्या पाकिस्तानशी झालेल्या युद्धात पंतप्रधान इंदिरा गांधींनी जी भूमिका घेतली, ती संपूर्णपणे नेहरूंच्या भूमिकेशी सातत्य ठेवणारी होती. इंदिरा गांधींशी विरोध असणाऱ्यांनाही त्यावेळच्या त्यांच्या नेतृत्त्वगुणांच्या अविष्काराला दाद द्यावीच लागली, हे ऐतिहासिक सत्य आहे. सिमला करार हाही त्याचाच भाग. अरब देशांशी भारताचे सलोख्याचे संबंध ठेवणे हे केवळ वसाहतवादाचा विरोध म्हणूनच योग्य नव्हते तर पाकिस्तानने द्विराष्ट्रवादावर आधारित आंतरराष्ट्रीय संबंधाचा जो आलेख निर्माण करण्याचे योजिले होते त्याला काटशह देण्यास आवश्यक असे धोरण होते. नासर सारखा नेता त्यावेळी उदयाला आला आणि नेहरू–नासर–टिटो ही त्रयी हे आंतरराष्ट्रीय पातळीवर शीत युद्धात सापडलेल्या जगाला एक नवीनच आशास्थान म्हणून प्रस्थापित झाले. धर्मातीतता आणि मानवतावाद या दोन सूत्रांवरच नेहरूंचे परराष्ट्र धोरण (अलिप्ततावाद Non-alignment) आधारित होते.

नेहरू युगात भारताने औद्योगिकरणाचा पाया घातला. औद्योगिक क्षेत्रातली भारताने जी प्रगती केली त्याला नेहरूंची दूरदृष्टी कारणीभूत होती. परंतु आर्थिक नियोजनात प्राथमिक शिक्षण आणि शेतीविकास यांना पुरेसा वाव मिळाला नाही. त्यानंतरच्या काळात शेती उत्पादनाकडे जास्त लक्ष दिले गेले. हरित क्रांतीमुळे भारत अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण झाला. परंतु अर्थव्यवस्थेवरच्या प्रस्थापित गटांची पकड कमी झाली नाही. समाजवादी धोरणांची कार्यवाही करताना नोकरशाही लालफीत आणि भ्रष्टाचार वाढला. त्यामुळे गरीब आणखी गरीब झाले आणि श्रीमंत आणखी श्रीमंत झाले. लोकांचे मूलभूत प्रश्न सोडवले न गेल्याने धर्मांधता, पुनरुज्जीवनवाद वाढला. राजकीय पक्षांमध्ये ध्येयहीनता, दिशाहीनता आली. व्यवहार्य या नावाखाली भ्रष्टाचार साळसूदपणे मिरवू लागला. अशा परिस्थितीत धर्मातीतता–धर्मनिरपेक्षता टिकणे कठीण असते. मुस्लिमांचा किंवा अल्पसंख्याकांचा अनुनय प्रमाणाबाहेर गेला. त्याचे एक उदाहरण म्हणजे ; राजीव गांधी सरकारने शहाबानो खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने मुस्लिम स्त्रीला पोटगीचा अधिकार देणारा जो निर्णय दिला, तो फिरविण्याकरता मुस्लिम स्त्री (घटस्फोट) हक्क संरक्षण कायदा, १९८६ पास केला. मंत्री आणि इतर राजकारणी देव, धर्म या उत्सवात उघड भाग घेऊ लागले. हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही समाजात अंधश्रद्धा, धर्मांधता, जातीयता गेल्या १० वर्षांत वाढल्या आहेत. आर्थिक धोरणे चुकीची आणि धोरणांविरोधी राजकीय वर्तन यामुळे सामान्य माणसाचा कायदा, गुणवत्ता इत्यादीवरचा विश्वास उडाला. तो भ्रष्टाचारी झाला आणि आपल्या मनातल्या असुरक्षिततेमुळे दैववादी, कर्मकांडी बनला. इहवादी शासन हे पुनरुज्जीवनवादी, धर्मांध समाजात राहू शकत नाही. इहवादी शासन हवे असेल तर दैववाद, पुनरुज्जीवनवाद, धर्मांधता यापासून समाज मुक्त असायला हवा. निदान नेत्यांनी तरी असायला हवे. इंदिरा गांधी काळापासून हे तारतम्य घालवले गेले. इहवादी नैतिकता निर्माण करून ती कार्यवाहीत आणणे हे आव्हानात्मक असते. कर्मकांडी, दैववादी आणि पुनरुज्जीवनवादी बनणे हा पलायनवादी मार्ग आपल्या नेत्यांनी आणि समाजाने स्वीकारलेला दिसतो. यास पंतप्रधान इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि काँग्रेसेतर पक्षांचे पुढारीही जबाबदार आहेत. देवराळा येथे १९८८ मध्ये एक मुलगी सती म्हणून जळून मरते, हे आधुनिक विज्ञाननिष्ठ भारताला लाजिरवाणे आहे. नेहरू असते तर ह्या विरूद्ध संतापाने बोलले असते–त्याचा निषेध केला असता. राजकारणाकरता निषेध राजीव गांधीनीही केला. पण तो मनापासून नव्हता. शीख मूलतत्त्ववाद्यांचे आव्हान तसेच काश्मीरमधील आव्हान स्वीकारायचे तर धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्थेवर

खंबीर निष्ठा नेतृत्त्वात असावयास हवी. पं. जवाहरलाल नेहरूंच्या शताब्दीच्या निमित्ताने यावर जास्त गंभीरपणे विचार जरी आमच्या नेतृत्त्वाने केला तरी खूप झाले. धर्मनिरपेक्षता याचा अर्थ केवळ सर्व धर्मांबाबत समभाव ठेवणे एवढा नसून खऱ्या अर्थाने धर्मापासून निराळे असे इहवादी शासन स्थापन करणे हा आहे. अल्पसंख्याकांचा अनुनय नको–पण योग्य ते संरक्षण आणि संवर्धन करायला हवे. धर्माबद्दल आदर असावा परंतु धर्माच्या नावाने मानवताविरोधी रुढी, परंपरा यांना कुणी जर उजाळा देत असेल, तर त्यास विरोध झाला पाहिजे. धर्म ही व्यक्तीची खाजगी गरज आहे व असावी ; नीती ही समाजाची गरज आहे आणि नीती ही धर्मातीत असू शकते. धर्मातीत म्हणजे धर्मनिरपेक्षता नव्हे. लोकशाही समाजवादाचे नीतीशास्त्र आहेच. माणसाला सुखी करणे, अधिक नीतीमान करणे, समता, न्याय, व्यक्तीस्वातंत्र्य या मूल्यांशी बांधिलकी ही इहवादी नीतीची आवश्यक अंगे आहेत. माणूस कितीदा देवळात किंवा मशिदीत जातो यावर त्याची नैतिकता न मोजता, तो सार्वजनिक व खाजगी जीवनात इतर व्यक्तींशी वागताना कुठले नीतीनियम मानतो यावर ठरवायला हवी. हेच इहवादी आणि धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेस आवश्यक आहे.

□□□

# पत्ररूप नेहरू

## □ श्री. गोविंद तळवलकर

पंडित जवाहरलाल नेहरू यांचा पत्रव्यवहार प्रचंड आहे. त्यांनी काढलेली प्रदीर्घ पत्रके, लिहिलेली भाषणे इत्यादींचा विचार सोडला, तरी हा पत्रव्यवहार अवाढव्यच म्हणावा लागेल. कारण कोणतेही असो, पंडित नेहरूच नव्हे तर महात्मा गांधी, डॉ. राजेंद्रप्रसाद यांचा पत्रव्यवहारही असाच फार व्यापक आहे. सरदार वल्लभभाई पटेल हे कमी लिहिणारे व कमी बोलणारे. पण त्यांच्या पत्रव्यवहाराचेही दहा खंड आहेत. ज्या कोणास या नेत्यांचे चरित्र लिहावयाचे असेल त्यांना या पत्रव्यवहाराचा अभ्यास करावा लागेलच; पण ज्यांना आधुनिक भारताचा इतिहास लिहावयाचा असेल वा अभ्यासावयाचा असेल त्यांनाही या सर्वांच्या पत्रव्यवहाराचे खंड वाचावे लागतील.

पंडित नेहरूंची स्वातंत्र्यापूर्वीच्या कालखंडातील पत्रे संग्रहित झाली आहेत आणि स्वातंत्र्यानंतरही होत आहेत. राजकीय पुढारी, एक सुसंस्कृत व सुविद्य गृहस्थ या नात्याने त्यांनी लिहिलेली पत्रे आहेत. त्याचप्रमाणे जगभरचे अनेक पुढारी, रवीन्द्रनाथ, रोमाँ रोलाँ, अर्न्स्ट वेबर, एडवर्ड थॉम्पसन इत्यादींना लिहिलेली आहेत. त्यांच्या कुटुंबियांपैकी कन्या इंदिरा गांधी यांना लिहिलेल्या पत्रांची संख्या सर्वात अधिक आहे.

आपल्या मनात जे असेल ते भराभर बोलून दाखवावयाचे असा काहींचा स्वभाव असतो. पंडित नेहरूंचा तसा होता. कुटुंबिय, सहकारी, पुढारी, मित्र आणि सामान्य जनता यांच्याशी ते सतत संवाद साधीत असत. प्रदीर्घ कारावासामुळे त्यांना आपले विचार बोलून दाखविण्यास अडचण येत असे. तेव्हा पत्ररूपाने ते संवाद साधीत. काही वेळा ही पत्रे, पत्रलेखक स्वतःशीच बोलत आहे असा भास निर्माण करतात. नेहरूंच्या काही पत्रांचे स्वरूप असे आहे. पंडितजींच्या स्वभावाचा आणखी एक विशेष होता. आपण एक शिक्षक आहोत अशी त्यांची भावना होती. अगदी प्रथम त्यांनी आपल्या दहा वर्षांच्या कन्येस जगाच्या उत्पत्तीची हकिकत पत्ररूपाने सांगितली, तेव्हा त्यांच्यातल्या पित्याप्रमाणे शिक्षकही जागा झाला असावा असे वाटते. पुढे हीच वृत्ती काँग्रेसच्या लहानमोठ्या पुढाऱ्यांना लिहिलेल्या काही पत्रांत आढळते. १९४९ साली राष्ट्रकुल पंतप्रधानांची बैठक झाली असता, पं. नेहरूंनी ब्रिटनबरोबर गुप्त करार केला असल्याचा आरोप श्री. अशोक मेहता यांनी केला होता. ब्रिटन युद्धात पडल्यास भारतासही त्यात सामील व्हावे लागेल असे बंधन यामुळे येऊन पडत असल्याची टीका त्यांनी केली होती. या टीकेला पंडित नेहरूंनी एका सभेत उत्तर देताना म्हटले होते की, आपल्यात काही दोष आहेत ; पण गुप्तपणे काम करण्याचा दोष नाही. आपण काय करतो व आपल्याला काय वाटते हे आपण नेहमीच लोकांना सांगत आलो आहोत, असे नेहरू म्हणाले. आपण काही गुप्त ठेवण्याचा प्रयत्न केला तरीही आपल्याला ते जमत नाही व मनात असेल ते बोलून जातो, अशा आपल्या स्वभावाची कबुली त्यांनी या भाषणात दिली होती. पंडितजींचा पत्रव्यवहारही याची ग्वाही देतो. विशेषतः पंतप्रधान या नात्याने

त्यांनी मुख्यमंत्र्यांना जी नियमितपणे पत्रे लिहिली, त्यात त्यांच्या या स्वभावाचा प्रत्यय येतो. देशापुढील प्रश्न, आंतरराष्ट्रीय राजकारण याविषयी त्यांनी अगदी मनमोकळेपणाने लिहिले आहे. त्यांना भेटलेले परदेशी नेते काय म्हणाले, त्यांच्याशी कोणत्या विषयावर चर्चा झाली येथपासून अधिक श्रमाने आपणास काही वेळा थकल्यासारखे कसे वाटत होते आणि कुलु मनालीत घेतलेल्या आठदहा दिवसांच्या विश्रांतीने कसे ताजेतवाने वाटू लागले येथपर्यंत पंडित नेहरू मुख्यमंत्र्यांशी हितगूज करताना दिसतात.

मुख्यमंत्र्यांना पं. नेहरू हे केवळ पंतप्रधानच वाटत नव्हते तर ते त्यांचे नेते होते. तरीही पंतप्रधान् वा नेता या अधिकारापेक्षा एक ज्येष्ठ सहकारी या नात्याने नेहरू पत्र लिहित आहेत, असे कोणतेही पत्र वाचले तरी वाटू लागते. आदेश देण्याची, अधिकार गाजवण्याची वृत्ती त्यामागे दिसत नाही.

आपल्या कुटुंबियांना व जवळच्या मित्रांना लिहिलेल्या पत्रात नेहरू आपल्या व्यक्तिगत भावना व्यक्त करतात. पण त्याही अत्यंत संयतपणे. आपल्या कन्येला लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी म्हटले आहे की, ब्रिटिश माणसाच्या स्वभावातच संयम आहे आणि आपल्याला हा स्वभाव आवडतो. पं. नेहरूंच्या रागाचे झटके अनेकांनी पाहिले व सोसले आहेत. तेव्हा ते संयमी कसे असा प्रश्न विचारला जाईल. आपला राग त्यांना अनेकदा आवरत नसे व काही वेळा त्यांना फार लवकर राग येई हेही खरे. या दृष्टीने ते संयमी नव्हते. पण स्वतःबद्दल लिहिताना दुःख व्यक्त करण्यात ते कमालीचे संयमी होते यात शंका नाही. किंबहुना स्वतःबद्दल फार बोलणे व लिहिणे हे त्यांना मानवत नसे. म्हणून त्यांच्या आत्मचरित्राचा गौरव करूनही असे नमूद करावेसे वाटते की, व्यक्ती या नात्याने लेखकाची ओळख या आत्मचरित्राने होत नाही. तरीही त्यांच्या एवढ्या पत्रसंभारातून त्यांच्या व्यक्तित्वावर, व्यक्तिजीवनावर काही प्रकाश पडतो.

पंडित नेहरू यांच्या सवयी तशा साध्या होत्या. प्रकृती उत्तम होती व ती त्यांनी प्रयत्नपूर्वक टिकविली होती. पंतप्रधानपद त्यांच्याकडे आले, तेव्हा ते साठीच्या घरात होते. त्यानंतर राज्यकारभाराचा भार, प्रवास हे सर्व ते पेलू शकत होते आणि सोळा ते अठरा तासही कामात घालवित होते. हे सर्व प्रकृती अत्यंत निकोप ठेवल्यामुळे. त्यांनी एक अनुभव दिला आहे. एकदा भर उन्हाळ्यात आलाहाबादजवळ ते टोपी न घालता गेले. त्यामुळे घामाघुम व लालबुंद झाले. मग त्यांनी असे ठरविले की, आपल्या कार्यालयात पंखा न चालविता एक दिवस काम करायचे. हे करताना ते घामाने न्हाऊन निघाले आणि काही लिहायचे तर हाती लेखणी घेणेही अशक्य झाले. पण नेहरू म्हणतात, आपण हे सर्व सहन करू शकलो व प्रकृती बिघडली नाही यात आपल्याला आनंद होता.

तुरुंगात असतांना नेहरूंचा कार्यक्रम ठरलेला असे. उजाडण्यापूर्वीच ते उठत आणि सकाळचे आन्हिक उरकल्यावर वाचन, बागकाम यात वेळ घालवित. दुपारी थोडी वामकुक्षी व पुन्हा वाचन व लेखन. एका पत्रात ते लिहितात, बागकामासारखे दुसरे काही नाही. आपण स्वतः जमीन खोदून लावलेल्या झाडांची निगा राखणे आणि त्यावर बहरणारी फुले पाहणे हा एक अवर्णनीय आनंद आहे. मऊ, गरम अशा जमिनीशी खेळ करण्यास मला आवडते. आपल्या आयुष्यात आपल्याला ही उणीव भासत असते. जमीन खोदून झाली व बागकाम करून झाले की एक सुखद अनुभव घेतल्यासारखे वाटते. बॅटमिंटन खेळतांना माझा हात दुखतो. तेव्हा खोदकाम करणे अशक्य होईल असे वाटले होते. पण तसे काही झाले नाही, असा खुलासाही त्यानी केला आहे. तुरुंगात नेहरूंनी खारही पाळली होती व तिच्या बद्दलही त्यांनी प्रेमाने लिहिले आहे.

वैचारिक जीवनाची ओढ नेहरूंना अखेरपर्यंत होती. तुरुंगात असतांना विविध विषयांवरील वाचन आणि त्यानुसार लिखाण यात त्यांचा वेळ जात असे. त्यांनी अनेक पत्रांतून मागविलेल्या व वाचलेल्या

पुस्तकांची नावे उल्लेखनीय आहेत. यात काव्य, चरित्र, आत्मचरित्र, सृष्टीविज्ञान, पक्षीविज्ञान, गणित, इतिहास, तत्त्वज्ञान असे विविध विषय आहेत. सामान्यांसाठी गणित हे पुस्तक त्यांना आवडत होते, त्याचप्रमाणे ग्रीक नाटकांनी त्यांच्यावर प्रभाव टाकला होता. व्हर्जिनिया वुल्फची ' लाइट हाऊस ' ही कादंबरी वाचून त्यांना या लेखिकेच्या लिखाणाचा मोह पडला आणि अनेक पिढ्यांतील लोकांनी लिहिलेली साधारणतः तेराशे पानाची एक प्राचीन कादंबरी वाचण्याची आपल्या कन्येला ते शिफारस करतात. ' सायन्स ऑफ द सिटीझन ' हा हार्गबेन यांचा ग्रंथ असाच जाडजूड होता. त्यातील अगदी तांत्रिक बाबी सोडून हा ग्रंथ वाचला पाहिजे, असेही त्यांनी लिहिले होते. थोडीच पुस्तके असली की निवड करण्याची, त्यांची चाळवाचाळव करण्याचा आनंद घेण्याची सोय नसते; बरीच पुस्तके बाळगणे आपण पसंत करतो असे खऱ्या ग्रंथ व ज्ञानप्रेमीलाच शोभेल अशी त्यांची भावना एका पत्रातून व्यक्त झाली आहे. देशातल्या व परदेशातल्या सुंदर, ऐतिहासिक स्थळांची माहिती नेहरू आपल्या कन्येस व मुख्यमंत्र्यांनाही देताना आढळतात.

स्वातंत्र्यपूर्व काळात व नंतर महात्मा गांधी, इतर काँग्रेस पुढारी व अन्य पक्षांचे नेते यांना, तसेच परदेशस्थ पुढाऱ्यांना नेहरूंनी लिहिलेल्या पत्रांची संख्याही प्रचंड आहे. परदेशी पुढाऱ्यांत युरोपीय पुढारी आहेत. तसेच नाहास पाशा यांच्यासारखे इजिप्शियनही आहेत. सर जॉर्ज शूस्टर, एडवर्ड थॉम्पसन, लॉर्ड लोथियन, सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना लिहिलेल्या पत्रांत भारतास स्वातंत्र्य देणे का आवश्यक आहे, ब्रिटिश साम्राज्यसत्ता या देशास कशी घातक ठरत आहे याविषयी परोपरीने केलेला युक्तिवाद आढळतो. एडवर्ड थॉम्पसन यांनी नेहरूंची काही विधाने अतिरेकी ठरविली आहेत, तर त्यांच्या जगाच्या इतिहासातील काही विधानांना इतिहासाचा आधार नाही असे दाखवून दिले आहे. पण त्यानीही त्या ग्रंथाची प्रशंसा केली आहे. देशनिष्ठा आणि युरोपात उदयास येणाऱ्या फॅसिझमची जाणीव या दोन्हीचे दर्शन पंडितजींच्या पत्रांवरून होते.

स्वदेशाच्या राजकीय जीवनाचा विचार केला तर एकीकडे सुभाषबाबू तर दुसरीकडे जयप्रकाश नारायण पं. नेहरूंच्या स्वाभाविक सौजन्यावर विश्वास ठेवून असल्याचे आढळेल. आपल्या राजकीय विचारांप्रमाणेच व्यक्तिगत अडचणीही ते सांगतात. तसे पाहिले तर अगदी महात्मा गांधींपासून ते जयप्रकाश नारायण यांच्यापर्यंत नेहरूंचे मतभेद होते. आपली मते या सर्वांनी स्पष्टपणे मांडली आहेत. इतकेच नव्हे, तर इंग्लंडमध्ये महाविद्यालयात शिकत असता, पं. मोतीलाल नेहरूंनी जेव्हा लोकमान्य टिळक व नामदार गोखले यांच्या वादात आपण गोखले यांच्या बाजूचे आहोत असे कळविले, तेव्हा आपण टिळकांच्या बाजूचे असून नेमस्तांचे राजकारण पराभूत होणार, असेही पं. नेहरूंनी आपल्या पित्याला एका पत्रातून कळविले होते.

काँग्रेसमधील सहकाऱ्यांच्या राजकीय भूमिकेशी व कार्यपद्धतीशी पंडितजी अनेकदा सहमत होत नसत. महात्मा गांधींच्या काही राजकीय भूमिका त्याना पसंत नव्हत्या. यासंबंधात त्यांनी आपले विचार पत्रातून कळविले आहेत. पण महात्मा गांधींना लिहिलेल्या पत्रांचा सूर व नूर सहकारी नेत्याना लिहिलेल्या पत्रांपेक्षा वेगळा आहे. महात्मा गांधीही नेहरूंच्या काही विचाराना व विधानाना आक्षेप घेतात ; पण त्यांच्याही पत्रांचा सूर पाहिला तर विशेष प्रेमातल्या, पण मनस्वी व अवखळ मुलाला एखाद्या पित्याने लिहावे, तशी महात्मा गांधींची पत्रे आहेत.

त्यावेळच्या काँग्रेसच्या या वरिष्ठ नेत्यांतील काही वादांचा निकाल काळानेच लावला आहे. तेव्हा त्यावेळचा पत्रव्यवहार इतिहास म्हणूनच आता पहावा लागेल. सुभाषबाबू व महात्मा गांधी यांच्यातील वाद, त्रिपुराच्या काँग्रेसच्या वेळी काँग्रेस कार्यकारिणीच्या सभासदानी केलेला असहकार, इत्यादी विषय



एन ४३१४-१२

हे असे आहेत. सुभाषबाबूंनी नेहरूंना यासंबंधात पत्रे लिहिली होती व नेहरूंनी उत्तरेही दिली आहेत. युरोपच्या दौऱ्यावरून आल्यावर ३८ सालच्या सुमारास नेहरूंनी समाजवादाचा पुरस्कार केला व पर्यायाने आपल्या सहकाऱ्यावर टीका केली. यास सरदार पटेल व राजेंद्र प्रसाद यांनी आक्षेप घेतला. या पुढाऱ्यांना वाटे, नेहरू तरुण समाजवादी नेत्यांशी अधिक जवळिक ठेवतात; तर या समाजवाद्यांना पंडित नेहरू स्पष्ट भूमिका घेऊन आपल्या गटाचे नेतृत्त्व करीत नाहीत याबद्दल खंत वाटे. ते याबद्दल टीका करीत. पंडितजींची भूमिका त्यांच्या पत्रातून प्रगट झाली आहे. त्यांनी आपल्या जुन्या सहकाऱ्यांबद्दल म्हटले आहे की, आम्ही वाद घालतो, आमची सर्व मते तंतोतंत जुळत नाहीत. पण काय वाट्टेल ते झाले तरी आम्ही एकमेकांच्या निष्ठेबद्दल, हेतूंबद्दल संशय घेत नाही. मतभेद प्रामाणिक असू शकतात आणि ते विकोपाला नेऊन काँग्रेस न फोडण्याचे ठरविले आहे. काँग्रेस फुटल्यास कार्यनाश होईल याची आम्हां सर्वांना कल्पना आहे. म्हणून आम्ही वाद घालतो, पण अखेरीस तडजोड करतो. राजकीय पक्ष असो वा कोणतीही संस्था असो, तिच्या प्रमुख चालकांनी हीच वृत्ती धारण केली पाहिजे. यामुळे काही उभे करता येते; एरवी सर्व विध्वंस व पाडापाड यांचाच अनुभव येतो.

स्वातंत्र्यापूर्वी ; देशाचे स्वातंत्र्य, राष्ट्रीय एकजूट आणि जातीयताविरोध याविषयी नेहरू अत्यंत पोटतिडकीने लिहितांना व बोलताना दिसतात. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यानंतर जातीयताविरोध, आर्थिक विकास, सामाजिक न्याय इत्यादीविषयी याचप्रमाणे ते बोलत व लिहित. त्यांचा पत्रव्यवहार याचा साक्षी आहे. फाळणीमुळे जातीय दंगलीचा वणवा पेटला. त्या भावनाप्रक्षोभाच्या काळात नेहरूंचे धार्मिक सहिष्णुतेबद्दलचे विचार अनेकांना मानवत नव्हते. पण नेहरूंनी आपली भूमिका बदलली नाही.

राज्यकारभार, आर्थिक विकास, संसदीय लोकशाहीचा नवा प्रयोग याविषयी नेहरूंच्या पत्रात ऊहापोह केलेला आहे. काँग्रेसजनातील बेशिस्त, पक्षात शिरलेल्या अनिष्ट प्रवृत्ती, गुन्हे केल्याचा आरोप असलेल्याना विद्यापीठ वा विधिमंडळ यात मिळालेला प्रवेश यावर नेहरूंनी कडाडून हल्ला केला. आज ते असते तर त्यानी काय केले असते, याची कल्पना करवत नाही. कारण गुन्हेगार व लोकप्रतिनिधी, मंत्री याचे अनेक ठिकाणी साटेलोटे आहेच, पण काही गुन्हेगारच अधिकारपदस्थ झाले आहेत. स्वातंत्र्यापूर्वी काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने नेहरूंनी सर्व प्रदेश काँग्रेस कमिट्यांना असेच धारेवर धरले होते.

स्वातंत्र्यानंतर प्रादेशिक पुनर्रचनेचा प्रश्न आला. काँग्रेसने भाषावार प्रांतरचनेला पूर्वीच मान्यता दिली होती. पण स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान या नात्याने जेव्हा नेहरू या प्रश्नाचा विचार करू लागले तेव्हा प्रादेशिक भावना अहंकाराचे व नंतर अलगतेचे स्वरूप घेईल असा धोका त्याना वाटू लागला. उत्तरेत नव्याने पुनर्रचना करण्याचा प्रश्न नव्हता. दक्षिण व पश्चिम भारतात तो होता. फुटीर प्रवृत्ती वाढण्याचा जो धोका नेहरूंना दिसत होता तो अनाठायी नव्हता. पण भाषावार प्रांतरचनेनेच ही भावना वाढली असे नव्हे.

तामिळनाडू हे राज्य स्थापन झाले होतेच, पण फुटिरतेची भाषा प्रथम तेथे सुरू झाली. महाराष्ट्र व गुजरातमध्ये वेगळ्या राज्यासाठी चळवळ झाली ; पण फुटिरतेच्या भावनेला कोणी खतपाणी घातले नाही. उलट पंजाबी सुभा होऊनही अकाली शीखांनी अलगतावादी भूमिका सोडली नाही. तेव्हा या भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न नेहरू अधिक संयमाने हाताळू शकले असते. पण शांत चित्ताने निर्णय घेण्याऐवजी फुटिरतेच्या धोक्याने त्यांच्या मनाचा ताबा घेतल्यामुळे काही काळ आन्ध्र, महाराष्ट्र व गुजरातमध्ये कटुता निर्माण झाली.

स्वतंत्र भारतात संसदीय परंपरा दृढ करण्यासाठी पं. नेहरूंनी केलेले प्रयत्न मोलाचे होते. पण संसदीय परंपरेत मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे स्थान, मंत्रिमंडळाचा कारभार कसा चालावा, पंतप्रधान व सहकारी मंत्री यांचे कसे संबंध असावे ; यासंबंधी पं. नेहरूंच्या कल्पना आणि त्याहीपेक्षा त्यांची कार्यपद्धती ही नेहमीच वादातीत होती, असे म्हणता येणार नाही. यासंबंधात एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, सरदार पटेल, राजाजी इत्यादि सहकारी हे त्यांच्या बरोबरीने दीर्घकाळ वागत होते ; पण बाकीचे मंत्री नेहरूंना आपल नेता मानीत व त्यांच्या प्रभावाखाली असत. तरीही आपणास अधिक विश्वासात घ्यावे अशी त्यांची भावना होती. सरदार पटेल हे नेहरूंना सहकारी मानीत आणि पंतप्रधान या नात्याने त्यांचे अधिकारही मान्य करीत. पण पंतप्रधानांच्या अधिकारास मर्यादा आहेत, त्याने इतर मंत्र्यांना सहकारी म्हणून वागविले पाहिजे अशी त्यांची मागणी होती. यातून वाद झाला व गधीजींपर्यंत तो गेला. त्यांनी जुळविण्याचा प्रयत्न केला. यासंबंधात तेव्हाचे गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन व नेहरू यांच्यात पत्रव्यवहार झाला होता. सरदार पटेल अधिकाऱ्यांच्या नेमणुका करताना जादा अधिकार वापरीत असले ; तरी युद्धकाळात चर्चिल यांनीही जे अधिकार वापरले नाहीत ते तुम्ही वापरता अशी त्यांनी नेहरूंना स्पष्ट जाणीव दिली. या वादाच्या काळात दोघांनीही अधिकार सोडण्याची तयारी दाखविली होती आणि सरदार पटेलांनी लिहिले की, माझ्यापेक्षा तुम्ही वयाने लहान व प्रकृतीने धडधाकट आहात, देशात तुम्ही लोकप्रिय असून परदेशात तुम्हाला मान आहे ; माझ्यापाशी हे नाही तेव्हा मीच बाजूस होणे चांगले. पुढे महात्मा गांधींचा अमानुष खून झाल्यावर पंडितजी व सरदार यानी देशाच्या हितासाठी व ऐक्यासाठी मतभेद विसरून एकत्र काम करण्याचे ठरविले.

दुसरा राजकीय वाद झाला तो प्रजासत्ताकाची स्थापना होऊन डॉ. राजेन्द्रप्रसाद राष्ट्रपती झाले तेव्हा. हिंदू कोड बिल हा वादाचा विषय असला तरी राष्ट्रपती व पंतप्रधान याचे अधिकार काय याबद्दल मुख्यतः मतभेद होता. संसदीय राजवटीत संसदेला जबाबदार अशा पंतप्रधानांचे अधिकार अधिक असून राष्ट्रपती हा घटनात्मक प्रमुख आहे ही नेहरूंची भूमिका होती. राजेन्द्रबाबूंना हे मान्य नव्हते. पण त्यांचे म्हणणे मान्य केल्यास सत्तेची दोन केंद्रे निर्माण होतात व ते राज्यकारभारासही विघातक आहे असा युक्तिवाद नेहरू करीत होते आणि सरदार पटेल त्यांच्याशी सहमत होते. या वादाचा निर्णय अखेरीस नेहरूंच्या बाजूने लागला; पुढच्या काळात श्रीमती इंदिरा गांधी, श्री. मोरारजी देसाई व श्री. राजीव गांधी यांना याच वादाला तोंड द्यावे लागले.

आर्थिक विकासासंबंधी पं. नेहरूंच्या कल्पना स्वातंत्र्यापूर्वीपासून आकार घेत होत्या. काँग्रेसने त्याहीवेळी एक नियोजन समिती स्थापन केली होती. स्वातंत्र्यानंतर नियोजन मंडळाची स्थापना झाली. रशियाच्या नियोजन व्यवस्थेचा नेहरूंवर प्रभाव होता आणि अवजड उद्योग, कारखानदारी वाढल्याखेरीज या देशाची खरी सुधारणा होणार नाही याची त्यांना खात्री होती. अवजड उद्योग, विविध माल उत्पादन करणारे मोठे कारखाने यासाठी खाजगी भांडवल पुरेशा प्रमाणात पुढे येईल अशी स्थिती नव्हती. तेव्हा सरकारने भांडवल गुंतवणूक करून सार्वजनिक क्षेत्रांत कारखाने सुरू करण्याचे ठरविले. रशियन योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचा जरी प्रभाव होता, तरीही पं. नेहरूंनी शेती व कारखानदारी यातील खाजगी भांडवलास मज्जाव केला नाही. त्यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला.

तेव्हांच्या धान्यटंचाईच्या व त्यावरील उपाययोजनांचाही खल करणारी अनेक पत्रे आहेत. ही टंचाई आणि एकंदर आर्थिक मागासलेपण यांच्या संदर्भात पंडित नेहरूंनी लोकसंख्यावाढीसंबंधी काही पत्रांतून उल्लेख केला आहे. परंतु लोकसंख्यावाढ हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असून तो सोडविण्यासाठी निकराचे व सर्वांगीण प्रयत्न केले पाहिजेत ; असा निर्धार त्यांनी व्यक्त केलेला मात्र दिसत नाही.

मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या अनेक पत्रात रशिया व नंतर चीन यांतील अर्थव्यवहाराची नेहरूंनी बरीच चर्चा केलेली दिसेल. आर्थिक विकास साधण्यासाठी रशियात केलेल्या दडपशाहीबद्दल त्यांनी सौम्य शब्दांत नापसंती व्यक्त केली आहे. पण सैबेरियांत स्टालीनच्या कारकीर्दीतही फार मोठ्या क्षेत्रात आधुनिक शेती होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. त्यांचा असा विश्वास होता की, याप्रकारे आधुनिक शेती होत असल्यामुळे रशिया आपली धान्यविषयक गरज भागवू शकेल. तसेच अमेरिकेपेक्षा रशिया तांत्रिक प्रगतीच्या दृष्टीने मागे असला, तरी तेथील कारखानदारी प्रगत आहे. लोकांच्या गरजा भागल्या जात आहेत. घरबांधणी प्रचंड प्रमाणात होत असून शिक्षण व आरोग्य व्यवस्था वाखाणण्यासारखी आहे. नेहरूंनी स्वतः रशियातील शेती, कारखानदारी, शाळा, निवासस्थाने पाहिली होती. त्यांनी बरीच माहितीही मिळवली आणि ती त्यांनी मुख्यमंत्र्यांना पुरविली होती. पुढे एक रशियन तज्ज्ञ भारतात आला असता, त्याच्याशी रशियाच्या नियोजन पद्धतीबाबत नेहरूंची चर्चा झाली. क्रुश्चॉव व बुल्गानिन यांच्याशीही विचारविनिमय झाला होता.

पंडित नेहरूंनी या सर्वांना विचारलेले प्रश्न व मिळविलेली माहिती, महत्त्वाची आहे. पण त्याही वेळी रशियन अर्थव्यवहारातील उणीवा व जो काही विकास होत होता, त्यासाठी लाखो लोकांच्या बलिदानाविषयी माहिती उपलब्ध होती. कारखान्यांवर पक्षाचे वर्चस्व नसून मंत्रालयांचे आहे व व्यवस्थापकांना निर्णयस्वातंत्र्य देण्यात आल्याचे पं. नेहरूंना रशियन तज्ज्ञाने सांगितले होते. वस्तुस्थिती मात्र वेगळी होती. आजही पूर्ण निर्णयस्वातंत्र्य व्यवस्थापकांना नाही. रशियाची शेती व कारखानदारी मागासलेली होती व आहे. शिवाय उत्पादनखर्चाचा कधी विचार केला नव्हता. रशियन राज्यकर्त्यांनी गेल्या पाच वर्षांत यासंबंधी स्वतःच बरीच माहिती जगापुढे मांडली आहे. धान्य व उपभोग्य वस्तूंचा तुटवडा यामुळे रशिया बेजार झाला असून अराजकसदृश परिस्थिती आहे. तेव्हा रशियाच्या आर्थिक विकासाचे जे काही चित्र नेहरूंपुढे उभे करण्यात आले होते; ते दिशाभूल करणारे होते. मॉस्कोतील आपल्या वकिलातीने यासंबंधात खरी स्थिती काय आहे याची कल्पना दिली होती की नाही; हे कळावयास मार्ग नाही. ज्या घरबांधणी व आरोग्य सेवेबद्दल नेहरू समाधान व्यक्त करतात त्यांचीही अवस्था ठीक नव्हती. आज या दोन्हीच्या उणीवा तीव्रतेने भासत आहेत. त्यावेळच्या अनेक विचारवंताना, राजकारण्यांना रशियाच्या आर्थिक विकासाच्या खोट्या चित्राने भूल टाकली होती. पं. नेहरू हे त्यातील एक होते. विशेषतः मानवी स्वातंत्र्याविषयी जागरूक असणाऱ्या नेहरूंना रशियातील हत्याकांडाबद्दल टीका कराविशी वाटू नये, हे आश्चर्य आहे.

रशियाच्या या प्रभावामुळे येथे सामुदायिक नसली तरी संयुक्त शेती करावी असा ठराव नेहरूंच्या प्रेरणेने काँग्रेसमध्ये आला होता. त्यास विरोध झाला. तेव्हा व्यक्तिगत शेतीचे महत्त्व मान्य आहे, पण सुधारित शेतीसाठी संयुक्त शेतीचा प्रयोग करून पहावा असा शिफारसवजा ठराव झाला. रशियाला शेतीच्या आघाडीवर आलेले अपयश पाहाता; संयुक्त शेतीचा प्रयोगही येथे झाला नाही हे बरेच झाले असे म्हटले पाहिजे. रशियन आर्थिक विकासाचे जे एकांगी चित्र नेहरूंपुढे उभे केले होते व ज्यावर त्यांचा विश्वास बसला होता; त्याची प्रतिकृती तशीच्या तशी उभी करण्याचे धोरण मात्र नेहरूंनी अवलंबिले नाही. त्यांनी खाजगी क्षेत्राला वाव ठेविला, व्यक्तिगत शेती चालू राहिली. अवजड उद्योगांप्रमाणे लहान व मध्यम कारखान्यांना मोकळीक दिली. त्यामुळे रशिया व इतर कम्युनिस्ट देशांच्या अर्थव्यवहाराची जी वाताहात झाली आहे, तशी आपली झाली नाही.

रशियाप्रमाणेच चीनच्याही आर्थिक विकासाचे खोटे चित्र नेहरूंपुढे उभे केले होते. तेथील हत्याकांडाबद्दलही नेहरूंनी आपल्या पत्रात काही विशेष उल्लेख केला नाही व टीकाही केली नाही.

रशियाने पूर्व युरोपात व चीनने आशियात जी विस्तारवादी पाऊले टाकली होती, त्याबद्दल मात्र नेहरू नापसंती व्यक्त करतात. टिटो यांना मिळालेली वागणूक त्यांना रास्त वाटत नव्हती. पोलंड व हंगेरीतील उठाव हे राष्ट्रीय उठाव होते अशी कबुली त्यांनी एका पत्रात दिली आहे. जागतिक युद्धाचा धोका असल्याने रशियाने पोलंड व हंगेरीतील उठाव दडपले असतील असे नेहरू म्हणतात ; पण त्याचबरोबर आपण याचे समर्थन करीत नाही असा खुलासाही करतात. पूर्व युरोप, रशिया व चीन यांच्यासंबंधी आता प्रसिद्ध होत असलेली माहिती पाहाता तेव्हांची ही मीमांसा निरर्थक वाटेल.

एक मात्र मान्य केले पाहिजे ; नेहरू दोन चार वेळा आपल्या पत्रातून भाकित करतात, की रशियात शिक्षित व शास्त्रीय विषयांचा अभ्यास केलेली पिढी तयार होत आहे आणि तिथे संख्याबळ वाढत जाणार असल्यामुळे ती अनेकविध बंधने मान्य करणार नाही. या पिढीचे दडपण व आर्थिक दु:स्थिती यामुळे रशियात बदल करणे भाग झाले. त्याने स्वीकारलेले आर्थिक सिध्दांत संपुष्टात आले आहेत.

चीनच्या विचारवादाची चाहूल नेहरूंना लागली होती. चाऊ एन लाय यांच्याशी झालेल्या चर्चेचा वृतान्त त्यांनी मुख्यमंत्र्यांना कळविला होता. हा विस्तारवाद वाढत गेला आणि नेहरूंचा विश्वासघात झाला. त्यांची या पर्वातील पत्रे ही या भावनेची द्योतक आहेत. ही त्यांची शोकान्तिका होती.

असे हे पं. नेहरूंचे पत्ररूप दर्शन. आपण काही लपवून करीत नाही ही त्यांची ग्वाही खरी असल्याची साक्ष देणारे हे दर्शन आहे.

□□□

# नेहरूंचा अलिप्ततावाद : तेव्हा आणि आता

□ भास्कर लक्ष्मण भोळे

अलिप्ततावाद हे नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे एक सूत्र होते. आजही त्या सूत्राला धरूनच भारताचे परदेश धोरण पुढे चालू आहे. देशातून तसेच देशाबाहेरूनही अलिप्ततावादाच्या धोरणाला वाढता पाठिंबा मिळत आहे. याचे प्रमुख कारण त्या धोरणाच्या यशस्वितेत सापडते. वस्तुतः परदेश संबंध हे अत्यंत अस्थिर व नित्य बदलत्या संतुलनाचे क्षेत्र असते. त्यात एखादे धोरण इतकी अनेक वर्षे आपली प्रस्तुतता कायम राखते ; याचा अर्थच हा की त्या धोरणात बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचा लवचिकपणा पुरेपूर आहे.

अलिप्ततावादाच्या धोरणातून नेहरूंच्या विचारांतील वस्तुनिष्ठता व आदर्शवाद यांचा उत्तम समन्वय आढळतो. अलिप्ततावादाचे व्यावहारिक आणि सैध्दांतिक या दोन्ही दृष्टींनी स्पष्टीकरण व समर्थन नेहरूंनी वारंवार केले आहे.

नवस्वतंत्र भारताच्या सर्वांगीण समस्या सोडवण्यासाठी उसंत मिळायची, तर आंतरराष्ट्रीय ताणतणावांच्या धकाधकीपासून त्याने स्वतःला दूर ठेवले पाहिजे. दोन महाबलाढ्य सत्तांमध्ये विभक्त झालेल्या जगात कोणत्याही एका पक्षाची कड घेऊन भारत उभा राहिल्यास त्याला आपले स्वातंत्र्य टिकवता येणार नाही. उलट त्याने नुकतेच झुगारलेले साम्राज्यशाहीचे जोखड लष्करी करारांमधून पुन्हा त्याच्या मानेवर येईल. शीतयुद्धातील वैराच्या रणधुमाळीत त्याला आपल्या साधनसामुग्रीची नासाडी करणे भाग पडले तर त्याच्या आर्थिक विकासाला अपरिहार्यतः खीळ बसेल. त्याऐवजी जर तो गटनिरपेक्ष राहिला, तर दोन्ही महाबलाढ्य सत्तांकडून त्याला सहकार्य व मदत मिळू शकेल–हा राष्ट्रीय स्वार्थ नेहरूंच्या अलिप्ततावादाच्या मुळाशी नव्हता असे नाही. पण केवळ तोच त्याचा आधार नव्हता. नेहरूंची गटनिरपेक्षतेची भाषा म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून केवळ संकुचित राष्ट्रहिताचा अविष्कार आहे ; अशी टीका त्या काळात अनेकांनी केली होती. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री जॉन फॉस्टर डलेस यानी तर त्या धोरणाला अनैतिक ठरवून धिक्कारले होते. राष्ट्रस्वार्थालाच प्रमाण मानणारे हे धोरण, जगातील सर्व दीनदलितांचा कैवार घेणाऱ्या भारताच्या मूळ भूमिकेशी विसंगत आहे ; असाही आक्षेप टीकाकारांनी घेतला होता.

पण आज परिस्थिती बदलली आहे. आज गटनिरपेक्षतावादाचे व्यापक संदर्भ आणि विश्वात्मक उपयुक्तता सिद्ध झाली आहे. आपले हे जग अधिक उत्तम व्हावे, अधिक शांततामय सहजीवनाचे ते केंद्र व्हावे, अशी मनोकामना बाळगणाऱ्या तमाम मानवमात्रांच्या दृष्टीने अलिप्ततावाद हे आज एक सर्वश्रेष्ठ नैतिक मूल्य ठरले आहे. ज्यांच्या अंतःकरणात विवेक, प्रेम आणि भूतदया यांचे वास्तव्य असेल त्या सर्वांना अलिप्ततावादाबाबत आज आस्था वाटू लागली आहे. शीतयुद्ध आज इतिहासजमा झाले

असले तरी शीतयुद्ध-मानसिकतेचा फैलाव प्रचंड वेगाने होत आहे. संहाराच्या भीषण कड्यावर जग उभे आहे. अशावेळी नेहरूंना अभिप्रेत असलेल्या व्यापक अर्थाने अलिप्ततावादाचा अन्वय समजावून घेणे नितांत आवश्यक ठरले आहे.

अलिप्ततावादी धोरणच भारतासाठी सर्वोत्तम आहे, असे नेहरूंचे ठाम प्रतिपादन होते. त्यांच्या मते, केवळ आजच नव्हे तर नेहमीसाठीच भारताला त्याखेरीज दुसरा पर्याय नव्हता. येथे कोणताही पक्ष सत्तेवर असो वा येवो; सर्व व्यावहारिक तथ्ये तपासल्यानंतर त्याला हेच धोरण स्वीकारावे लागेल, याबद्दल नेहरूंना कधीच शंका नव्हती. मात्र अलिप्ततावादाचा विचार करताना त्यांनी आपले लक्ष भारतापुरते कधीच सीमित ठेवले नव्हते. आशिया-आफ्रिका खंडातील सर्व उदयोन्मुख राष्ट्रांचा विचार त्यांच्या मनात होता. एवढेच नव्हे तर ' आंतरराष्ट्रीय संबंधांतील या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याची मोजपट्टी ' म्हणून नेहरू अलिप्ततावादाकडे बघत होते. त्या नवस्वतंत्र राष्ट्रांच्या हाती या चळवळीतून एक निर्णायक शक्ती यावी आणि जागतिक शांतता व सुरक्षितता या कामी तिचा वापर व्हावा, ही त्यांची अपेक्षा होती. दोन महासत्तांपासून किंवा लष्करी तह-करारांपासून दूर राहणे एवढ्या नकारात्मक संदर्भापुरती त्यांची अलिप्ततावादाची संकल्पना मर्यादित नव्हती ; तर तिसऱ्या जगातील राष्ट्रांना संघटित करून स्वाभिमानाने जागतिक राजकारणात वावरता यावे असे सकारात्मक साध्य तिच्यापुढे होते. पहिल्या व दुसऱ्या जगांमधील विकसित राष्ट्रांपेक्षा तिसऱ्या जगातील राष्ट्रांचे प्रश्न मूलतः निराळे होते. विकसित राष्ट्रे " जैसे थे वादी " राहू शकतात. तिसऱ्या जगातील राष्ट्रांना परिवर्तनाग्रही राहण्यावाचून तरणोपाय नाही. सर्व विकसित राष्ट्रांच्या परस्परांच्या सहकार्यानेच ही राष्ट्रे आपल्या विकासाच्या वाटा तुडवू शकतील, असा विश्वास नेहरूंनी व्यक्त केला होता.

अलिप्ततावादाच्या जनकत्वाचे श्रेय नेहरूंनी स्वतःकडे कधीच घेतले नव्हते. ते असे म्हणत असत की, अलिप्ततावाद हा भारताच्या पूर्वेतिहासात, परिस्थितीत, जीवनविषयक दृष्टिकोनात, स्वातंत्र्याकांक्षी मानसिकतेत आणि जगाच्या सद्यःस्थितीतच अंगभूत होता. काही अंशी त्यांचे हे विधान खरे आहे कारण भारताचे भूराजकीय स्थान, आकारमान, आर्थिक विकासाची निकड, हिंदू-बौद्ध दर्शनांमधून सहिष्णुतेवर तसेच सत्य आणि न्याय यांच्या सापेक्षतेवर दिलेला भर, राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनाचा वारसा इत्यादी अनेक भौतिक-अभौतिक मूलस्रोतातून अलिप्ततावादाची निष्पत्ती झाली होती. त्याचप्रमाणे कोणतीही गोष्ट एकदम काळी किंवा एकदम पांढरी अशा टोकाच्या रंगात न पाहता मधल्या असंख्य छटांमध्ये पाहण्याची भारतीयांची जी वृत्ती आहे, तिच्याशीही अलिप्ततावाद अत्यंत सुसंगत ठरतो.

पण तरीही या धोरणाचे खरे शिल्पकार जवाहरलाल नेहरूच ठरतात. १९२१ पासून १९४६ पर्यंत सातत्याने अलिप्ततावादाच्या तत्त्वाला अनुरुप अशा भूमिका घेणारे नेहरू हे एकमेव काँग्रेस नेते होते आणि स्वातंत्र्योत्तर काळातही काही प्रसंगी त्यांच्या या धोरणावर टीका झाली असली तरी त्यांची त्यावरची निष्ठा अविचल राहिली होती. एका बाजूने पाश्चिमात्य उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेचे जसे नेहरूंना आकर्षण होते तसेच दुसऱ्या बाजूने क्रांत्युत्तर, रशियाने नियोजनातून साधलेल्या नेत्रदीपक प्रगतीचेही होते आणि त्यातूनच त्यांची मिश्र अर्थव्यवस्थेची संकल्पना किंवा लोकशाही समाजवादाची धारणा साकार झाली होती. कोणत्याही एका विचारप्रणालीशी हा देश जखडला जाता कामा नये, कारण त्या सर्वच विचारप्रणाली या देशाहून भिन्न असलेल्या युरोपीय पार्श्वभूमींमधून प्रादुर्भूत झालेल्या आहेत, हीच नेहरूंची धारणा अलिप्ततावादाच्या तत्त्वज्ञानातूनही व्यक्त झाली आहे. भांडवलशाहीतील स्वार्थांधता नको आणि साम्यवादातली अधिकारशाहीही नको ; या त्यांच्या मनोवृत्तीचे प्रतिबिंब अलिप्ततावादात उमटले आहे.

नेहरूंची अशी खात्री होती की, जगातील अनेक छोटी राष्ट्रे एका ध्येयाने एकत्र आल्यास दोन्ही महासत्तांवर वचक बसवू शकतील. संपूर्ण जग जर सरळ सरळ दोन आघाड्यांमध्ये विभक्त झाले तर सर्वनाशी युद्धाचा संभव जेवढा वाढतो तेवढाच तो जास्तीत जास्त राष्ट्रे त्या विभक्तीकरणापासून अलिप्त राहिल्यास खचितच कमी होतो ; भारतासारख्या राष्ट्राने महासत्तांपैकी एकीची कड घेण्यातून त्यांच्यातला संघर्ष अधिकच तीव्र होऊ शकतो. त्यापेक्षा दोहोंपैकी कोणाचाही रोष न ओढवून घेता, समानांतरावरून दोहोंशी स्नेह ठेवल्यास युद्ध टाळण्यात भारत बराच हातभार लावू शकतो. अलिप्तता म्हणजे तटस्थता वा औदासिन्य नव्हे, हे तर नेहरूंनी वारंवार आपल्या शब्दांतून आणि कृतींमधून स्पष्ट केले होते. ते म्हणाले होते की, आम्ही अलिप्त असलो तरी वास्तवाकडे कधीच डोळेझाक करणार नाही. कोणाच्या स्वातंत्र्यावर कुठूनही गदा आली, अन्याय-आक्रमण झाले तर अशा प्रसंगी आम्ही तटस्थ राहणार नाही.

गटनिरपेक्ष राष्ट्रे आकाराने लहान असली, तरी संख्येने आणि लोकसंख्येने जर मोठी झाली तर ती खूप काही करू शकतात, म्हणून त्यांनी एकत्र यावे असे आवाहन त्यांनी केले होते. नेहरूंचा हा सदहेतुमूलक सल्ला आज लहान राष्ट्रांना खूप पटला आहे, हे अलिप्ततावादी चळवळीतील वाढत्या सदस्यसंख्येवरून दिसते. आज या ना त्या गटात असलेल्या राष्ट्रांपेक्षा, गटनिरपेक्ष राष्ट्रांची संख्या कितीतरी मोठी झाली असून जगाची दोनतृतीयांश लोकसंख्या अलिप्ततावादाचा पुरस्कार करू लागली आहे. त्यामुळे ही चळवळ स्थिरपद व अधिकाधिक उपयुक्त ठरत आहे. सर्वसंहारक युद्ध आजवर टाळण्याचे संपूर्ण श्रेय कदाचित या चळवळीला देता येणार नाही, पण तिने जागतिक शांततेच्या संदर्भात लक्षणीय कामगिरी केली आहे हे कुणीच नाकारू शकणार नाही.

राष्ट्राचे हितसंबंध जोपासणारे तात्पुरते व संधिसाधू धोरण असे अलिप्ततावादाचे स्वरूप कधीच नव्हते, तर नेहरूंच्या चिंतनात मध्यवर्ती महत्त्वाची असलेली नैतिक भूमिका हा त्या धोरणाचा कणा होता. माणसाने आपले प्रश्न सहिष्णुतेद्वारे, अहिंसक मार्गांनी आणि स्थूल मतैक्याचा (कॉन्सेन्सस्) शोध घेऊन सोडवावेत, त्याच्या प्रत्येक कृतीमागे मानवमात्राच्या भवितव्याचा नीट विचार केला गेलेला असावा, आणि प्रसंगोपात्त अहिंसेखेरीज अन्य मार्गाचा वापर करणे भाग पडलेच तर तो फक्त तेवढ्यापुरताच व्हावा–अशी नेहरूंची भूमिका होती. त्यांनी या परिप्रेक्ष्याचा विसर कधीच पडू दिला नाही.

रोमेश थापर यांनी म्हटल्याप्रमाणे " नेहरूंच्या या दृष्टिकोनामुळे अलिप्ततावाद हे केवळ एक धोरण न राहता, जगातल्या अनेक राष्ट्रांसाठी ते एक भावात्मक तत्त्वज्ञान झाले आणि महासत्तांमधील संघर्षाला आटोक्यात ठेवण्याची क्षमता आणि संधी त्यांना त्यातून लाभली " (नेहरू ॲण्ड दि मॉडर्न वर्ल्ड, ३१). अलिप्ततावादाची मांडणी करण्यापूर्वी तटस्थतेची (न्यूट्रॅलिटीची) जी भूमिका परिचित होती ती म्हणजे अशी की, सर्व राष्ट्रराज्ये आपापले प्रभावक्षेत्र वाढवण्याच्या स्पर्धेत संपूर्ण ताकदीनिशी सहभागी आहेत आणि त्यांच्यातल्या सत्तासंतुलनावरच जागतिक स्थैर्याची भिस्त आहे. या स्पर्धेतून जेव्हा दोन राष्ट्रे एकमेकांशी युद्ध करण्यास प्रवृत्त होतात तेव्हा त्या दोहोंपासून दूर राहणे आणि त्यांच्यातल्या स्पर्धेबद्दल उदासीन राहणे म्हणजे तटस्थता असे मानले जाई. तिच्या तुलनेत अलिप्ततावादाची संकल्पना अधिक स्पष्ट पायावर उभारलेली असून अधिक उपयुक्तही आहे. प्रचंड मोठा भूभाग व फार मोठी जनसंख्या यांना अलिप्ततावादाने सत्तासंघर्षातून आज बाहेर खेचले आहे. सत्तासंघर्षाच्या परिघाबाहेर राहून आपल्या प्रत्येक सभासद राष्ट्राची अलिप्तता जपणारा एक राष्ट्रप्रमुख ; बलाढ्य महासत्ताचे वर्तन जाणीवपूर्वक प्रभावित करू पहात आहे हे चित्र अभूतपूर्व आहे. विशिष्ट सत्ता विवादात स्वतः प्रत्यक्ष सहभागी नसतानाही युनोसमोर एखादा राष्ट्रसमूह हस्तक्षेप करतो हेही पूर्वी कधी घडले

नव्हते. अलिप्ततावादी राष्ट्रांनीच हे प्रथम करून दाखवले. त्यांची कामगिरी फार डोळ्यात भरण्याजोगी नसेलही पण ते एका नव्या दिशेने आंतरराष्ट्रीय संबंध हाताळू बघत आहेत. या वस्तुस्थितीतून त्यांना अभूतपूर्व प्रतिष्ठा व बळकट आधार प्राप्त झाले आहेत. अणुयुगाच्या दृष्टीने अनुरूप अशी आंतरराष्ट्रीय व्यवस्था उभारण्याची एक भावात्मक भूमिका ती राष्ट्रे आज पार पाडीत आहेत. अलिप्ततावादाच्या या यशात सिंहाचा वाटा, त्या चळवळीचे प्रवर्तक नेहरू, मार्शल टिटो, नासेर, सुकार्नो यांचा आहे. एखाद्या शेजारी राष्ट्राने अपेक्षाभंग केला किंवा धोका दिला एवढ्यामुळे अशा तत्त्वनिष्ठ धोरणाची प्रस्तुतता संपू शकत नाही.

अलिप्ततावादी चळवळीच्या प्रारंभिक टप्प्यावर महासत्तांच्या मनात या चळवळीबद्दल काहीशी अढी होती. पण नेहरूंच्या यशस्वी राजनयातून ती बरीच कमी झाली. एकेकाळी शीतयुद्धाच्या दडपणामुळे दोन्ही महासत्ता जेव्हा भयग्रस्त होत्या, तेव्हा त्यांचा प्रयत्न जास्तीत जास्त राष्ट्रांना आपल्या कळपात खेचून त्यांच्यावर आपले कडक वर्चस्व बसवणे इतपतच मर्यादित होता. अधिक व्यापक भीषण संकटांचा प्रत्यय येऊ लागल्यानंतर त्या महासत्तांना एका बाजूने उभयतांतील स्पर्धा गौण वाटू लागली आहे आणि दुसऱ्या बाजूने अलिप्ततावादी चळवळीच्या सुप्त क्षमतांची जाणीव होऊ लागली आहे. आजचे गुंतागुंतीचे आंतरराष्ट्रीय वास्तव सुरळितरीत्या हाताळण्याच्या दृष्टीने अलिप्ततावादी चळवळीची बरीच मदत होऊ शकते हे त्यांना अनुभवान्ती पटले आहे. या चळवळीमुळे अनेक नव्या राष्ट्रांना स्वतःचे राजकारण व परराष्ट्रकारण स्वतःच करण्याची ताकद लाभल्यामुळे एका परीने महासत्तांच्या डोक्यांवरचे ओझे हलके झाले आहे. या सर्व राष्ट्रांत जर सत्तापोकळ्या निर्माण झाल्या असत्या, तर महासत्तांनाही त्यांचे व्यवस्थापन झेपले नसते. गतिमान संप्रेषण व अतिसंहारक अण्वस्त्रे असलेल्या आणि तीव्र राजकीयीकरण झालेल्या आजच्या जगात ; व्यामिश्र झालेल्या आंतरराष्ट्रीय संबंधांचा गुंता सोडवण्यात अंशतः का होईना; नेहरूप्रणीत अलिप्ततावादी चळवळ उपयुक्त ठरली आहे. जागतिक शांततेच्या कामी वापरता येईल असे प्रचंड मोठे प्रभावक्षेत्र या चळवळीला आज उपलब्ध झाले आहे. आंतरराष्ट्रीय सहजीवनात शांततापूर्ण सहअस्तित्त्व आणि शेजारधर्म अशा तत्त्वांच्या बाजूने आपले वजन या चळवळीने आजवर परिणामकारकपणे खर्ची घातले आहे.

अर्थात हे खरे की, अजूनही तिची ताकद काही उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी अपुरी पडत आहे, तसेच काही भांडवलशाही राष्ट्रे तिला दुर्बल करण्याचाही प्रयत्न हरप्रकारे करीत आहेत. युनोसमोर भारताने पहिला ठराव दक्षिण आफ्रिकेतल्या वर्णवर्चस्वाच्या विरुद्ध मांडला होता. वर्णवर्चस्व व वंशद्वेष यांना तेव्हापासून सतत अलिप्ततावादी चळवळीने प्रतिकार केला आहे. पण पाश्चिमात्य राष्ट्रे (आणि विशेषतः अमेरिका) आजही दक्षिण आफ्रिकेच्या वांशिक श्रेष्ठत्ववादी राजवटीचे समर्थन करीत आहेत. साम्राज्यशाहीला पोषक असलेली जुनी आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था बदलून, तिच्या जागी नवी अर्थव्यवस्था आणण्याची मागणीही अलिप्त राष्ट्रांनी सतत केली असून युनोच्या महासभेने ती मान्य केली आहे. पण त्या दिशेने केला जाणारा प्रत्येक प्रयत्न भांडवलशाही विश्वाचे नेतृत्त्व करणाऱ्या अमेरिकेने आजपर्यंत हाणूनच पाडला आहे. माहिती प्रसारणाची जुनी " साम्राज्यवादी " व्यवस्था आपल्यावर अन्याय वा आपली उपेक्षा करीत असल्यामुळे तिच्यात आमूलाग्र फेरबदल व्हावेत या अलिप्त राष्ट्रांच्या मागणीचाही फारसा गंभीरपणे विचार झालेला दिसत नाही. आपल्या प्रभावी प्रचारयंत्रणेद्वारे पाश्चिमात्य देश स्वतःचे श्रेष्ठत्व व स्वतःची राजकीय संस्कृती नवस्वतंत्र राष्ट्रांवर खुशाल बिंबवीत आहेत. यातून ही नवस्वतंत्र राष्ट्रे स्वतःच्या अस्मिता हरवून बसत आहेत.

अनेक स्वरूपात अवतीर्ण झालेला नववसाहतवाद निपटून काढणे हे फार मोठेच आव्हान अलिप्ततावादी चळवळीसमोर आहे. त्याचप्रमाणे दारिद्र्य, बेरोजगार, निरक्षरता व रोगराई यांचे निराकरण करण्याच्या जबरदस्त आव्हानालाही तिला तोंड द्यायचे आहे. निःशस्त्रीकरणातून विकासाच्या वाटा मोकळ्या होऊ शकतात, हे सत्य अलिप्त राष्ट्रांना समजले असले तरी प्रगत राष्ट्रांच्या गळी ते उतरवून; त्यांना निःशस्त्रीकरणास भाग पाडण्याइतपत साधनसंपन्नता अजूनही अलिप्ततावादी चळवळीपाशी नाही. अनेक बाबतीत आज या चळवळीतील प्रमुख राष्ट्रांनासुद्धा प्रगत राष्ट्रांची कास धरावी लागते. सधन राष्ट्रे, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी किंवा जागतिक बँक यांच्यासमोर हात पसरावे लागतात. नेहरूंच्या काळात याबद्दल किमान अपराध भावना होती. आज तीही नष्ट झाली आहे. नेहरूंनी घटकराज्यांच्या मुख्यमंत्र्यांना लिहिलेली शेकडो पत्रे या गोष्टींची साक्ष देतात की, आपण सर्व दृष्टींनी स्वयंपूर्ण झाल्याखेरीज आपल्या अलिप्ततावादाला खरा अर्थ प्राप्त होणे शक्य नाही. याबद्दल नेहरूंच्या मनात मुळीच शंका नव्हती. स्वयंपूर्णतेची त्यांची ती अपेक्षा आजही अतृप्तच राहिली आहे.

अलिप्त राष्ट्रांनी महासत्तांवर दडपण आणून नवी आंतरराष्ट्रीय व्यवस्था निर्माण करण्याचा खटाटोप सुरू ठेवावा पण त्याचवेळी त्यांनी आपण स्वतः आपले प्रश्न सोडविण्यासाठी काय करू शकतो; याचाही अधिक गंभीरपणे विचार व प्रयत्न करण्याची आज निकड आहे. सर्व अलिप्त राष्ट्रांनी आपली आर्थिक, तंत्रज्ञानात्मक व मानवी साधनसामुग्री संकलित करून गरजेनुसार तिचा योग्य त्या जागी वापर करायला शिकले पाहिजे. समाजवादी राष्ट्रे बहुसंख्येने आज तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या बाजूने आहेत. पश्चिमेकडील देशातही फ्रान्स, स्कॅंडिनेव्हियन देश यांच्यासारखे त्यांचे काही मित्र आहेत. त्यांची मदत घेऊन औद्योगीकरणाचा व आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अलिप्त राष्ट्रांना चोखाळता येईल. स्वावलंबनाखेरीज खरी राजकीय अलिप्तता अस्तित्वात येऊ शकत नाही, हे नेहरूंचे विधान स्मरून परस्पर सहकार्याने आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न प्रत्येक राष्ट्राने केलाच पाहिजे.

अर्थात् याचा अर्थ जगातल्या महासत्तांशी आर्थिक काडीमोड घेणे, असा मुळीच होत नाही. मिळेल तिथून मदत अवश्य घ्यावी, मात्र आर्थिक धोरणांबद्दलचे स्वतःचे स्वातंत्र्य मात्र गमावून बसता कामा नये. व्यापार, विकास व तंत्रज्ञानात्मक आदानप्रदान इत्यादींबाबत अलिप्त राष्ट्रांनी एकमेकांना सहकार्य करावे. संयुक्त संकल्प, संयुक्त संशोधन आणि सल्लादायी अभिकरणे यांच्याद्वारे ते एकमेकांना असे सहकार्य करू शकतील. त्याचप्रमाणे आपल्या आर्थिक विकासासाठी पाश्चिमात्य देशांची अप्रस्तुत प्रतिमाने घेऊन, व्यर्थ शक्तिपात करण्याऐवजी नवीन अनुरूप विकासप्रतिमाने निर्धारित करण्याबाबतही एकमेकांना ती उपयोगात पडू शकतील. त्या दिशेने अलीकडच्या शिखर परिषदांमधून या चळवळीची पावले पडत असून ती स्वागतार्हच मानायला हवीत.

वृत्तसंस्था व संप्रेषण माध्यमे यांचीही भूमिका देशाच्या परदेश धोरणाच्या व राजनयाच्या दृष्टीने फार मोलाची असते. परसत्तेच्या लष्करी आक्रमणापेक्षाही तिच्या संप्रेषण माध्यमांच्या अतिक्रमणाचे दुष्परिणाम अधिक सूक्ष्म व परिणामदृष्ट्या अधिक गंभीर होऊ शकतात. आज वस्तुस्थिती अशी आहे की, तिसऱ्या जगातील राष्ट्रे स्वतःकडे व जगाकडे पाहतात; ती इंग्लंड, अमेरिका किंवा फ्रान्स सारख्या देशातील वृत्तसंस्थांच्याच चष्म्यातून. विकसनशील देशांचा न्यूनगंड व विकसित देशांचा अहंगंड या वृत्तसंस्था सतत जोपाशीत असतात. शीतयुद्ध इतिहासजमा झाल्यानंतरही शीतयुद्धाची मानसिकता टिकून राहिली, याला मुख्यत्वे या वृत्तसंस्थाच कारणीभूत आहेत. विकसनशील देशांमधील अनेक स्तुत्य उपक्रम अंधारात ठेवून प्रगत राष्ट्रांच्याच कीर्तीचे नगारे त्या सतत वाजवतात.

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे तर प्रगत राष्ट्रांची संप्रेषण क्षेत्रातील क्षमता अफाट विस्तारली आहे. एक प्रकारचा '' **संप्रेषणात्मक साम्राज्यवाद '' च** अवतीर्ण झाला आहे (हरी जयसिंग, इंडिया ॲण्ड दि नॉन अलाइन्ड वर्ल्ड, ८९). यातून वृत्तप्रसारणात पक्षपात, अवास्तवता, विकृतीकरण वा उपेक्षा यांच्याखेरीज दुसरे काहीच विकसनशील राष्ट्रांच्या वाट्याला येऊ शकत नाही. अलिप्ततावादी चळवळीच्या व्यासपीठावरून या प्रश्नांची जाहीर चर्चा होऊ लागलेली आहे. आर्थिक-राजकीय आघाड्यांप्रमाणे यापुढे साम्राज्यवादाचा मुकाबला सामाजिक-सांस्कृतिक आघाड्यांवरही करावा लागेल, याची जाणीव त्यांना प्रकर्षाने होत आहे. अल्जीयर्स शिखर परिषदेच्या घोषणापत्रात असे म्हटले होते की, '' अलिप्त राष्ट्रांनी आपापल्या सर्वांगीण यशांबद्दलच्या माहितीचे आदानप्रदान आणि प्रसारण आपापल्या वृत्तपत्रांतून, नियतकालिकांतून, वृत्तसंस्थांतून आणि आकाशवाणी-दूरदर्शनादींमधून केले पाहिजे.'' त्यानंतरच्या परिषदांमधूनही या निर्धाराचा पुनरुच्चार अनेकदा झाला, पण ठोस निष्पत्ती मात्र अजूनही फारशी झालेली आढळत नाही.

आज अलिप्ततावादी चळवळीत अनेक वंशांचे, धर्मांचे लोक आहेत. त्यांच्या परंपरा, भाषा व विचारप्रणाली भिन्न आहेत. साम्राज्यशाही, वंशवाद, नववसाहतवाद, परराष्ट्रीय शोषण यांच्या प्रतिकारासंबंधी त्या सर्वांमध्ये एकवाक्यता असली तरी इतर अनेक बाबतीत त्यांचे गंभीर मतभेद आहेत. जिथे एकवाक्यता आहे ; तिथेही त्या सर्वांचा प्रतिसाद व सहभाग ; सारखाच आहे असे दिसत नाही. त्यांचे आपसातील ताणतणाव व कुरबुरी अलिप्त राष्ट्रांचे ऐक्य सुदृढ होण्याच्या आड आज येत आहेत. आपसातील संघर्षाचे निवारण करण्याची सर्वमान्य यंत्रणा उभारण्यावरच अलिप्ततावादी चळवळीचे भवितव्य अवलंबून आहे असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे ठरणार नाही. ही चळवळ म्हणजे सदस्य राष्ट्रांमधील तंटे सोडवण्याचे व्यासपीठ नाही; किंवा न्यायनिवाडा हे तिच्या शिखर परिषदांचे प्रयोजनही नाही हे मान्य, तरीपण प्रत्यक्ष तंटे सोडवण्याच्या कामी नसले तरी आधीच संघर्षांना प्रतिबंधक ठरणारे वातावरण निर्माण करण्याच्या संदर्भात बरेच काही करणे या चळवळीला शक्य होऊ शकेल. सदस्य राष्ट्रांच्या सरहद्दीसंबंधीची भांडणे, ही एक कायमची डोकेदुखी या चळवळीच्या शक्ती क्षीण करीत आहे. फार काळ या व अशा प्रश्नांची उपेक्षा या चळवळीकडून होणे तिला घातक ठरू शकेल.

अलिप्ततावादाच्या स्वरूपात नेहरू व त्यांच्या सहकाऱ्यांनी रंगवलेली भव्यदिव्य स्वप्ने अजूनही साकार झालेली नसली, तरी अलिप्ततावादाशी एकनिष्ठ राहूनच ती साकार होऊ शकतात ; हा आत्मविश्वास आज नक्कीच बळावला आहे. शांतता, युद्धमुक्ती, समता व न्याय यावर आधारित नवी जागतिक व्यवस्था अस्तित्वात येईल, तेव्हाच या स्वप्नांची परिपूर्ती होईल. शांततेच्या शत्रूंचा संपूर्ण निःपात केवळ निःशस्त्रीकरणातून किंवा तणाव शिथिलनासारख्या (देतॉन्त) मार्गाने होऊ शकत नाही. अलिप्ततावादाची व्याप्ती वाढवीत नेण्यातूनच तो होऊ शकतो. जागतिक राजकारण जर आज लोकशाहीच्या तत्त्वानुसार चाललेले असते ; तर महासत्तेपेक्षाही अलिप्त राष्ट्रांचे पारडे जड झाले असते ; कारण आज जगाच्या लोकसंख्येपैकी दोन तृतीयांशांचे प्रतिनिधित्व अलिप्ततावादी चळवळ करते. आंतरराष्ट्रीय संबंधात लोकशाही तत्त्व जेव्हा प्रमाण मानले जायचे असेल तेव्हा जावो. तूर्तास अलिप्त राष्ट्रांनी एवढे करावे की, साम्राज्यशाही राष्ट्रांच्या षड्यंत्रांपासून ही चळवळ सुरक्षित राहील, हे डोळ्यात तेल घालून पहावे. आपसातील संघर्षनिवारणाच्या यंत्रणा विकसित कराव्यात आणि किमान आपले प्रदेश '' शांतता क्षेत्रे '' घोषित करून विकसित करावेत.

अलिप्ततावादाच्या शिल्पकारांच्या स्वप्नपूर्तीची वाट त्याना यातूनच सापडेल.

□□□

# पंडित नेहरूंचे यशापयश

□ अनंत भालेराव

पंडित नेहरूंचे वर्णन कविवर्य रविंद्रनाथ टागोरांनी एकदा ' ऋतुराज ' या विशेषणाने केले होते तर पंडितजींच्या आत्मचरित्राविषयी आपला अभिप्राय कळविताना त्यांनी लिहिले आहे की, ' तुमचे आत्मचरित्र आताच वाचून संपविले. मी या थोर ग्रंथाच्या वाचनाने खूप प्रभावित झालो. तुम्ही जे साध्य केले त्याविषयी मला अभिमान वाटतो. ग्रंथाच्या विस्तारात व तपशिलात मानवतेचा एक प्रवाह वाहताना आढळतो. वास्तवाची दुर्गम आडवळणे पार करून हा प्रवाह आपल्याला अशा माणसाच्या सन्निध आणून सोडतो की, जो आपल्या कामगिरीपेक्षा मोठा व त्याच्या सभोवतीच्या परिस्थितीपेक्षा सत्य आहे.' पंडितजींविषयी असे पुष्कळ लिहिले व बोलले गेले. महात्मा गांधीनी तर त्यांना आपले वारसच नेमले होते. मध्यंतरी राजकीय क्षेत्रात अशी अफवा पसरली होती की, बापूजींच्या मर्जीतून पंडितजी उतरले असून त्यांची जागा आता राजाजींनी (राज गोपालचारींनी) घेतली आहे. याला कारण महात्माजी व पंडितजींच्या दरम्यान वाढत चाललेले मतभेद होते. महात्माजींच्या कानावर ही अफवा गेली. तेव्हा ते म्हणाले की, (वर्धा येथे झालेल्या अ. भा. काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनात जाहीरपणे बोलताना. १५ जानेवारी १९४२). ' माझे व जवाहरलालचे आपसात बनेनासे झाल्याची कुजबूज चालू आहे. मी एवढेच सांगतो की, माझ्यापासून जवाहरलालला वेगळे करण्यासाठी केवळ मतभेद पुरेसे नाहीत. त्यासाठी बरेच काही करावे लागेल. आरंभापासून आम्ही एकमेकांचे सहकारी झालो तेव्हापासून आमच्यात मतभेद आहेत आणि तरीही मी हे निःसंदिग्धपणे सांगतो की, माझा वारस जवाहरलालच आहे व असेल. जवाहरलाल म्हणतो की, त्याला माझी भाषा कळत नाही आणि तोही मला न उमजणारी भाषा बोलतो. हे खरे असेल अगर नसेल परंतु अंतःकरणाच्या मिलनासाठी भाषांची आडकाठी असत नाही व येऊ शकत नाही आणि मला हे पुरतेपणे माहीत आहे की, मी जेव्हा या जगात नसेन तेव्हा तो माझीच भाषा बोलेल.' आणि पुढे हेच खरे ठरले.

**विलक्षण लोकप्रिय**

पंडितजींची स्तुती करणारी ही दोन उदाहरणे मी मुद्दामच निवडली. तसे बघितले तर महात्माजींच्या नंतर जगभरातून सर्वात जास्त लिहिले व बोलले गेले असेल तर ते फक्त पं. नेहरूंवर व त्यांच्याविषयी. पंडितजींवर टीकाही भरपूर झाली. टोकाला न जाता सतत मधला मार्ग काढण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीला भल्याभल्यांनी ' द ग्रँड पॅचवर्क ', ' कन्फ्यूजन वर्स्ट कन्फाऊंडेड ' आणि ' क्लासिकल फीटस् ऑफ कॉम्प्रोमायझेस ' (The grand patchwork, Confusion worst confounded, Classical feats of Compromises.) अशी बिरूदे बहाल केली आहेत आणि तरीही एक वास्तव आजतागायत कोणालाच नाकबूल करता आले नाही की, भारतात गांधीजींच्या पाठोपाठ विलक्षण लोकप्रियतेचे भाग्य फक्त पंडितजींच्या वाट्याला आले. शेवटी शेवटी थोडा फरक पडला तरीही तुलनेने

त्यांचीच लोकप्रियता अधिक होती. या दोन्ही (बापूजी व पंडितजी) पुढाऱ्यांचा एक विशेष असा होता की, त्यांनाही आपली ही लोकप्रियता नीट माहीत होती. पंडितजींपाशी जनतेचे व जनतेपाशी पंडितजींचे लाड चालत ; ते बापूजींपाशी चालत नसत. गांधीजींच्या शिस्तीच्या चौकटीत राहूनच लोकांना वागावे लागत असे. पंडितजींच्या मनात आपल्या या लोकप्रियतेविषयी जबर विश्वास तर होताच परंतु कळत न कळत एक अहंकारही रूजला होता. स्वातंत्र्योत्तर काळात तर त्यांना ' आपण मतांचे जादूगार ' आहोत याची तीव्र जाणीव झाली होती. राजकारण करताना त्यांनी आपल्या या सामर्थ्याचा वापरही करून घेतल्याचे दिसते. परुषोत्तमदास टंडन यांना अखेरीस अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला, त्या मागचे एक कारण हेच होते. पंडितजींनी अनेकदा म्हटले आहे की, माझा मतदारसंघ संपूर्ण भारतवर्ष आहे. भारतीय जनता आहे. यात खोटे काहीच नव्हते. गुणदोषांची रूढ कोष्टके पंडितजींची थोरवी मोजण्यासाठी उपयोगी पडणारी नाहीत ही इतिहासाची साक्ष सदैव लक्षात ठेवूनच या थोर पुरुषाचे मूल्यमापन करता येईल. त्याचबरोबर विभूतिपूजेची रूळलेली चाकोरीही काही काळ सोडून द्यावी लागेल.

पंडितजींसारख्या थोर पुरुषाचे यशापयश जोखायचे म्हणजे वितीने पर्वताची उंची मोजण्याचाच प्रयास ठरण्याची शक्यता आहे, हे मी जाणून आहे. शेवटी यश तरी कशाला म्हणायचे ? असे म्हणतात की, प्रत्येक उज्ज्वल यशाचा भूतकाळ अपयशानेच व्यापलेला असतो. अपयशाची एक मालिका संपली असाच यशाचा अर्थ असतो. जगातील यच्चयावत् सर्व थोर पुरुषांचे जीवन ज्ञात यशापेक्षा अपयशानेच अधिक ओतप्रोत असते. कार्लमार्क्स हा थोर व द्रष्टा पुरुष ; आपण यशाची जी व्याख्या करतो त्या कसोटीवर अपयशीच म्हणावा लागेल. गांधीजीच्या बाबतीतही हेच विधान काही मर्यादांत करता येईल. लेनिन, माओ, हो चि मिन्ह अशा थोर पुरुषांच्या यशापेक्षा त्यांचे अपयशच अधिक मोठे होते. त्याचे कारण ही सर्व थोर माणसे, टागोरांनी पंडितजीविषयी म्हटले ; त्याप्रमाणे त्यांच्या कार्यापेक्षा किती तरी मोठी होती. स्वतः नेहरूंनीच सांगून ठेवले आहे की, ' None Can Command the Success. Success comes to those who dare and act.'

पंडितजींना सुदैवाने त्यांच्या अन्य सहकाऱ्यांपेक्षा बराच अधिक कालावधी लाभला. इंग्लंडमधून परत आल्यानंतर १९२३ मध्ये पंडितजी प्रथम अ. भा. काँग्रेसचे सरचिटणीस निवडले गेले. येथून त्यांची राजकीय कारकीर्द मोजली, तर ४१ वर्षे पंडितजी भारतीय राजकारणाचे व एकूण सार्वजनिक जीवनाचे नेते व नियंत्रक होते. आपल्या सोयीसाठी आपण त्यांच्या जीवितकार्याचे दोन विभाग केले तर स्थूलमानाने स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर असे खंड पाडता येतील.

स्वातंत्र्य संपादनासाठी गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली भारतीय जनतेने जो लढा दिला, त्याचा संस्थात्मक आविष्कार काँग्रेस हाच होता. स्वातंत्र्य संपादनाचे तेच एक प्रभावी साधन होते. हे साधन परिस्थित्यनुरूप समर्थ व धारदार बनविण्याचा प्रयास ज्या राष्ट्रीय नेत्यांनी केला त्यांत गांधीजींच्या नंतर पंडितजींचा क्रम लागतो. नेमस्त आणि मवाळ नेत्यांच्या ताब्यातली काँग्रेस लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल यांनी आपल्याकडे घेतली व तिला व्यापक लढाऊ संघटना बनविण्याचा ओनामा केला. गांधीजींनी हे कार्य पुढे नेले. देशातील सर्व थरांतील व विशेषतः खेड्यापाड्यांतील गरीब व श्रमिक जनता काँग्रेसच्या पाठीशी आणून उभी केली. एवढेच नव्हे, तर तिचे प्रचंड लढे प्रत्यक्ष संघटित केले. या कामात गांधीजींचा उजवा हात म्हणून ज्यांचा उल्लेख करता येईल, त्या पंडितजींचा फार मोठा भाग होता. वणवा पेटवावा तसा पंडितजींनी वेळोवेळी भारत पेटवला. गांधीजींच्या सत्य-अहिंसेवर आरंभी त्यांची निष्ठा नव्हती. एक चांगले व प्रभावी साधन म्हणूनच ते त्याकडे बघत असत. परंतु नंतर

त्यांनी व त्यांच्या पाठोपाठ काँग्रेसने एक ध्येय, एक नीती म्हणून अहिंसेचा स्वीकार केला. गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे पंडितजी गांधीजींचीच भाषा बोलू लागले. पंडितजीनी दोन तपांहून अधिक काळ तुरुंगात काढला. त्यांनी स्वतःच म्हटले आहे की, माझे शिक्षण जेवढे इंग्लंडमधील हॅरो व केंब्रिजमध्ये झाले ; त्याहून कितीतरी जास्त भारतीय जनतेने व गांधीजींच्या चळवळीतील तुरुंगवासांनी केले. त्यांची काही पुस्तके तुरुंगातच लिहिली गेली.

या लेखाच्या मर्यादेत सर्व गोष्टी विस्ताराने नमूद करणे शक्य नाही व ते अभिप्रेतही नाही. तेव्हा महत्त्वाच्या टप्प्यांचा निर्देश करून पुढे जावे लागेल. पंडितजींची भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाला दिलेली सर्वात मोठी व मौल्यवान देणगी विचारांची, सिध्दांतांची, निष्ठांची व त्यानुसार कार्यक्रम अमलात आणण्याची शक्ती संघटनेत व जनतेत निर्माण करण्याची होती. चर्चिलपर्यंतचे सर्व ब्रिटिश राज्यकर्ते गांधीजींची व भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाची यथेच्छ टर उडवीत असत. पंडितजीही त्यातून सुटले नाहीत. ब्रिटिश राज्यकर्त्यांची कल्पना अशी होती की, हॅरो व केंब्रिजमध्ये शिकून तयार झालेले व मोतीलाल नेहरूंसारख्या पाश्चिमात्य उमरावाचे जीवन जगणाऱ्याच्या घरात वाढलेले जवाहरलाल, हे काही झाले तरी ब्रिटिशांनाच अनुकूल राहतील. जास्तीत जास्त ते ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली वसाहतीचे स्वराज्य मागतील. ब्रिटिश उदारमतवाद व लोकशाहीच्या तथाकथित मातृस्थानी विकसित झालेल्या घटनात्मक, कायदेशीर संसदीय पद्धतीशी ते शेवटपर्यंत बद्ध राहतील. परंतु पुढे चालून भारताने नियतीशी जो करार (Tryst with destiny) केला व जो पंडितजींच्या मुखावाटे आविष्कृत झाला. त्याने ब्रिटिश राज्यकर्त्यांची ही सर्व स्वप्ने भंग पावली व त्यांच्यावर पहिला प्रहार पाश्चिमात्य संस्कारात वाढलेल्या पंडित नेहरूंनीच केला. वसाहतीच्या स्वराज्याऐवजी त्यांनी सरळ सरळ संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाशीच काँग्रेसला पक्के बांधून घेतले. एकीकडे ते व दुसरीकडे गांधीजी काँग्रेसला पुढे पुढे ओढीत होते. एकेक टप्पा ओलांडीत होते. जुने नेमस्त नेतृत्व वेगाने कालबाह्य होत होते. आरंभी आरंभी तर गांधीजींसुद्धा संपूर्ण स्वातंत्र्याला अनुकूल नव्हते. त्यांना त्या ध्येयासाठी त्यावेळची परिस्थिती अनुकूल वाटत नव्हती म्हणून त्यांनी पंडितजींना सावधगिरीची सूचना दिली होती की, जवाहरलाल फार घाईने, उतावळीने धावतो आहे. एकट्याने धावायचे असेल तर ठीक आहे. परंतु सर्वांना बरोबर घ्यावयाचे असेल, तर उतावीळ होऊन चालणार नाही. परंतु हे खरेच आहे की, पंडितजींना घाई झाली होती. त्यांनी आपला आग्रह रेटला. शेवटी गांधीजीनीच मधला मार्ग काढला. वर्षभरात ब्रिटिश सरकारने वसाहतीचे स्वराज्य दिले तर बरे; अन्यथा आपण संपूर्ण स्वातंत्र्याचीच मागणी करू. ती लगेचच करावी लागली.

काँग्रेसमध्ये एव्हाना जनतेच्या बरोबरच जहाल मताचे तरुणही दाखल झाले होते. पुढे चालून काँग्रेस समाजवादी म्हणून संघटित झालेले समाजवादी व इतर जहाल यांचे नेतृत्व पंडितजींकडे चालत आले. त्यांनी नंतर नागरी स्वातंत्र्याची सनद व स्वातंत्र्याचे राजकीय, आर्थिक व सामाजिक अंतरंग तयार करून ते काँग्रेसकडून मान्य करवून घेण्याचा चंग बांधला. पंडितजी विचारांनी व निष्ठांनी नेमके कोण होते याचे दर्शन या निमित्ताने घडून येते. त्यांच्या लोकशाही समाजवादी निष्ठा स्पष्ट झाल्या. भारताचे भावी चित्र त्यांना समाजवादी भारताच्या रूपानेच दिसत होते. पंडितजींच्या मनावर व विचारांवर इंग्लंडमध्ये असताना तेथील उदारमतवादाचा जसा प्रभाव पडला होता; तसेच ते फेबियनांच्या समाजवादानेही प्रभावित झाले होते. नंतर १९२७ मध्ये त्यांनी रशियाला भेट दिली. आजवरच्या प्रचंड व्यासंगातून व चिंतनातून ते मार्क्सचे भक्त बनलेले होते. रशियात लेनिनने जो समाजवाद प्रत्यक्षात आणून दाखविला त्याचाही त्यांच्या मनावर परिणाम झाला व ते समाजवादाच्या दिशेने झेपावत गेले.

परंतु त्यांच्यावर मार्क्सइतकीच नव्हे ; तर पुष्कळ अधिक छाप गांधीजींची व त्यांच्या विचारांची पडली होती. या मिश्रणातूनच ते भारतीय स्वातंत्र्याचा विस्तार करीत गेले. समतेला स्वातंत्र्याची जोड आवश्यक आहे, हे त्यांना मनोमन पटले व ते विचाराने लोकशाही समाजवादी बनले. पंडितजींनी आपल्या या निष्ठांना धरून व अन्य समविचारी सहकाऱ्यांच्या मदतीने काँग्रेस संघटनेला समाजवादी स्वरूप दिले.

पंडितजींची आणखी एक उल्लेखनीय देणगी आंतरराष्ट्रीय संदर्भातली होती. भारताच्या स्वातंत्र्याची गाठ त्यांनी संपूर्ण जगाशी जोडली व आपल्या स्वातंत्र्याला वैश्विक व मानवी स्वातंत्र्याचा भाग बनविले. जगात जेथे गुलामी आहे, साम्राज्यवाद आहे, वसाहतीचे परावलंबित्व आहे, तेथील जनतेच्या स्वातंत्र्याचे आपण प्रतिनिधी आहोत आणि या अर्थाने आपला स्वातंत्र्याचा लढा व्यापक मानवी स्वातंत्र्याचा लढा आहे ; अशी व्याप्ती त्यांच्या विचारांमुळे व प्रयत्नांमुळे प्राप्त झाली. काँग्रेसचे बहुतेक सर्व राजकीय व ध्येयधोरणविषयक ठराव आणि तिचे जाहीरनामे पंडितजींच्या लेखणीतूनच साकार झाले होते हे लक्षात ठेवले पाहिजे. पंडितजींच्या या विशाल दृष्टीमुळे देशांतर्गत राष्ट्रवादी शक्ती प्रबळ होऊन विस्तार तर पावत गेल्याच, परंतु त्यांना संकुचित व आक्रमक राष्ट्रवादाचे विकृत स्वरूप कधीच आले नाही. त्या दृष्टीचे लोक देशात व काँग्रेसमध्ये नव्हते, अशातला भाग नाही. परंतु पंडितजींच्या व त्यांच्यासारखा विचार करणाऱ्यांच्या तुलनेत ते अगदीच नगण्य ठरले. स्वातंत्र्याच्या नंतर पंडितजींच्याविषयी ब्रिटनचे माजी पंतप्रधान व मजूर पक्षाचे नेते लॉर्ड क्लेमेंट ॲटली यांनी असे म्हटले होते की, ' Nationalism is a good servant, but a bad master ' पंडितजींवर त्यांच्या राष्ट्रवादाने कधीच मात केली नाही. तो त्यांचा नियंता झाला नाही. त्यांचा सेवकच राहिला. त्यामुळे भारतासारख्या खंडप्राय देशाची आणखी फाळणी झाली नाही. स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या पंडितजींच्या कामगिरीचा धावता आढावा इथपर्यंत घेतला तो संक्षिप्त आहे हे उघडच आहे. दुसऱ्या म्हणजे स्वातंत्र्योत्तर भागाकडे वळण्यापूर्वी एका गोष्टीचा उल्लेख करणे उचित ठरेल. पंडितजींच्या यशाचाच आलेख इथवर मी मांडला. त्यांच्या या यशाला शेवटी शेवटी आणि तसे म्हटले तर १९४० पासूनच एका दुःखद अपयशाला बळी पडावे लागत होते. हिंदू-मुस्लिम जातीयता व त्यातून निष्पन्न झालेला फाळणीचा पर्याय ; काँग्रेसचा व एकूण स्वातंत्र्य आंदोलनाचा एकसारखा पाठलागच करीत होता. गांधीजी, पंडितजी, सरदार, मौलाना सर्वांनीच फाळणीला कडाडून विरोध केला परंतु शेवटी त्यांना हा विषाचा प्याला घशाखाली ओतावाच लागला. फाळणीला मान्यता देऊन स्वातंत्र्य हस्तगत करता आले. सत्तेची चाहूल लागली आणि पंडितजींच्या व अन्य नेत्यांच्या यशस्वी करकीर्दीला अपयशाच्या पडछायेने गाठले. वस्तुतः फाळणीच्या रूपाने झालेला पराजय कोणा एका व्यक्तीचा नव्हता; असा युक्तिवाद करता येईल. परंतु पंडितजी व सरदार पटेल यांच्यासारख्या सर्वश्रेष्ठ नेत्यांना पराजयाचा व अपयशाचा हा ठपका कुठल्याही स्थितीत टाळता येणार नाही. इतिहासानेही त्यांना तसा अवसर दिलेला नाही. यशाचे धनीपण घ्यावयाचा असेल तर अपयशाचा अव्हेर करताच येणार नाही. पंडितजींच्या अपयशाचा प्रारंभ फाळणीने झाला असे म्हटले, तर ते चुकीचे ठरणार नाही.

सत्तांतरासंबंधी ब्रिटिश सरकारच्या ताब्यातील बरीच कागदपत्रे आता उजेडात आली आहेत. त्यांच्या आधारे असे विधान नक्कीच करता येईल की सरदार पटेल व पंडित नेहरूंना सत्ता हस्तगत करणे अधिक महत्त्वाचे वाटत होते. अनेकांनी त्यांना सत्ता घेण्याची घाई झाली होती असा आरोप केला आहे ; तो अगदीच निराधार म्हणता येत नाही. पंडितजींच्या कारकीर्दीचा व त्यांनी भारताच्या राजकीय जीवनाला दिलेल्या आकाराचा आपण आढावा तर घेतला पण त्यात त्यांच्या धर्मनिरपेक्षतेचा व लोकशाही निष्ठांचा ऊहापोह राहून गेला. पंडितजी अगदी आरंभापासून अधार्मिक होते. त्यांचे वडील

पं. मोतीलालजी, हे स्वतःच धर्म व धर्माचे कर्मकांड यापासून अलिप्त होते. परदेशाला गेल्यामुळे गांधीजींसह अनेकांना देशात आल्यावर प्रायश्चित घ्यावे लागले. मोतीलालजींनी मात्र त्याला ठाम नकार दिला. धार्मिक बहिष्काराची त्यांनी पर्वा केली नाही. जवाहरलालजी आपल्या पित्याच्यापुढे आणखी दहा पावले होते. नेहरू कुटुंबियांच्या मित्रपरिवारात, सर्व जातिधर्मांच्या लोकांचा अंतर्भाव होता. हिंदुत्ववादी डॉ ना. भ. खरे यांनी तर नेहरूंची चक्क निंदाच केली की, ते शिक्षणाने इंग्रज, संस्कृतीने मुस्लिम व जन्माच्या अपघाताने हिंदू होते. निंदा बाजूला सारली, तर पंडितजींची धर्मनिरपेक्ष वृत्तीच प्रकर्षाने आपल्या निदर्शनास येते. गांधीजींच्या सहवासाने यात नंतर नंतर फरक पडत गेला. तुरुंगात असताना पंडितजी गीता वाचू लागले. वेद उपनिषदांचाही त्यांनी अभ्यास केला. एवढा बदल जरूर झाला. परंतु ते धार्मिक अगर धर्मश्रद्ध कधीच बनले नाहीत. धर्मनिरपेक्ष विचारांचे स्वरूप प्रामुख्याने पाश्चिमात्य व धर्मविरोधी होते. त्याची जागा आता सर्वधर्मसमभावाने घेतली. या संदर्भात एक घटना नमूद करण्याजोगी आहे. इंदिरा गांधींनी आपला वाढदिवस धर्मश्रद्धेतून भारतीय तिथीमध्ये निश्चित केला. पंडितजींना हे समजले, तेव्हा त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली. लोकेषणा किंवा लोकानुरंजन म्हणून ते मंदिरातून , मशिदीतून व गुरुद्वारांतून गेले व तेथे थोडेफार उपचार त्यांनी करवून घेतले म्हणजे डोक्याला साफा बांधणे वगैरे. परंतु या पलिकडे ते गेले नाहीत. सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धारालाही त्यांनी विरोध केला होता. या पार्श्वभूमीवर फाळणीच्या रूपाने येणारे अपयश अधिकच गडद बनते. धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मविरोधच असला पाहिजे, असा आग्रह असणारे पंडितजींवर तडजोडीचा आरोप करतात. माझ्या मते जेथे भिन्न धर्माचे व संस्कृतीचे लोक राहतात तेथे ही तडजोड उचितच नव्हे ; तर अनिवार्य ठरते. खेरीज धर्म ही संकल्पना मानवाच्या मनातून पूर्णतया निघून जाईल, अशी शक्यता दिसत नाही. त्यामुळे धर्मविरोध हा त्या अर्थाने लोकविरोधच ठरतो. एवढे खरे की, एकदा का आपण बोटचेपी भूमिका स्वीकारली की, धर्मश्रद्धा अलगद डोक्यावर येऊन बसतात व धर्मनिरपेक्षता नाममात्र उरते. पंडितजी पक्के लोकशाहीवादी होते. लोकशाहीवरची त्यांची निष्ठा प्रामुख्याने पाश्चिमात्य उदारमतवादाच्या संस्कारानी प्रभावित होती. भारतासारख्या अविकसित देशात आपल्या या औपचारिक लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाहीत अगर सहभागी लोकशाहीत आजतागायत होऊ शकले नाही, हे अपयशही पंडितजींच्या खात्यावर नोंदविण्यावाचून गत्यंतर ठरत नाही. आशिया खंडात भारताच्या शेजारी राष्टांत लोकशाही टिकू शकली नाही. भारतात मात्र तिने पाय रोवले. औपचारिक लोकशाहीचे हे यशही ; वरील अपयशाच्या बरोबर लक्षात घेतले पाहिजे.

आता आपण पंडितजींच्या जीवनातील दुसऱ्या म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालखंडाकडे वळू या. चांगली १७ वर्षे (१९४७ ते १९६४) पंडितजी भारताचे पंतप्रधान राहिले. या अवधीतील त्यांच्या यशस्वितेत भारतात लोकशाहीची स्थापना, संसदीय लोकशाहीचा विकास, पक्षपद्धतीला बळकटी, ठरलेल्या अवधीत देशाची घटना तयार करणे, सामान्यतः साम्यवादी राष्ट्रांमधून ज्या आर्थिक नियोजनाची कल्पना रूढ झालेली दिसते ; तिचा स्वीकार करून मुक्त अर्थव्यवस्थेला मर्यादित करणे, मूलोद्योग व अवजड उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करून भांडवलदारी व्यवस्थेला ताब्यात ठेवणे, इतर क्षेत्राऐवजी औद्योगीकरणावर भर देणे, उत्पादन वाढविण्याचे मुख्य लक्ष्य निर्धारित करणे, शेतीच्या आधुनिकीकरणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा व विज्ञानाचा उपयोग करून मोठमोठी धरणे बांधणे, यांत्रिकीकरण करणे व एकूण राष्ट्रीय जीवनात विज्ञानाला व वैज्ञानिक दृष्टीला प्राधान्य देणे इतक्या गोष्टींचा समावेश होतो. यावर विपुल लेखन झाले असल्याने त्यांचा मी फक्त निर्देश करून ठेवतो. यातूनही पंडितजींच्या समाजवादी निष्ठा दिसून येतात. रशियातील साम्यवादी प्रयोगाविषयी त्यांना आरंभी जे आकर्षण वाटत होते ते नाहीसे झाले. त्यांनी यासंबंधी आपले मत स्पष्ट शब्दांत नमूद करून ठेवले आहे. ते म्हणतात–

'Orthodox socialism does not give us much hope. The war has shown that an all powerful state is no lever of individual liberty. It is the breeding ground for the bureaucrat who in the West as in the East is most intolerant of criticism and is seldom enamoured of progress. Life under socialism would be a joyless and a soulless thing regulated to the minutest detail by rules and orders framed by the all powerful official cores.'

रशियात झालेल्या मानवी संहारावर व हुकूमशाहीवर त्यानी कडाडून हल्ला केला. मार्क्सवर गांधींनी विजय मिळविला तो येथे व येथून पुढे. रशियामध्ये अलिकडच्या काळात जे परिवर्तन घडून आले आहे, त्याने केवळ पं. नेहरूंचेच नव्हे तर बाकीच्या सर्व लोकशाही समाजवाद्यांचे आक्षेप खरे ठरले आहेत. नेहरूंचे बरेच मोठे अपयशही याच परिघात झाल्याचे दिसून येते. त्यांनी नियोजनाची देन देशाला दिली खरी- त्यातून जे परिणाम अपेक्षित होते ते अजूनही दृष्टिपथात आलेले नाहीत. शोषित व श्रमिकवर्ग या तथाकथित प्रगतीच्या फळांपासून आजतागायत वंचित राहिला. भारत समाजवादी तर बनलाच नाही उलट नियोजनाच्या आश्रयानंतरही देशात इतरत्र आढळते, त्याप्रमाणे भांडवलशाहीची पुढची अवस्था म्हणून खुद्द भारतात मक्तेदारी भांडवलशाही वाढली. अमेरिकेचे गॅलब्रेथ आपल्या समाजवादाचा उपहास करीत असे म्हणत असत की, आमची अमेरिकाही तीस टक्के समाजवादी आहे. आपल्या सर होमी मोदींनी तर एकोणिसाव्या शतकातील भांडवलशाही विसाव्या शतकात (पीपल्स कॅपिटॅलिझम्) जनतेची भांडवलशाही झाली असल्याचे सांगून पंडितजींच्या समाजवादाची ते भलावण करीत असत. पंडितजींच्या सद्हेतूला हे जे दौर्बल्याचे व विपरीततेचे फळ लागले, त्याची पुष्कळ कारणे आहेत. त्यातले प्रमुख असे की, गांधी आणि मार्क्स यांचा समन्वय तर ठीक आहे. परंतु त्यात शास्त्रीय समाजवादाचे कोणते प्रारूप बसवायचे हे पंडितजी शेवटपर्यंत ठरवू शकले नाहीत व सांगूही शकले नाहीत. त्यामुळे एकीकडे गांधीप्रणित विकेंद्रित अर्थव्यवस्था, मध्यम व अल्पप्रमाण तंत्रज्ञान याची स्तुती करावयाची व निखळ भांडवलदारी व्यवस्थेप्रमाणे केंद्रित उद्योग, विशाल तंत्र व मोठ्या प्रमाणावर उद्योग यांचीच हमखास कास धरावयाची. म्हणून पंडितजींवर तडजोडीची, गोंधळाची वा ठिगळे जोडण्याची टीका झाली. पंडितजींनी त्यांच्या पक्षात जी आर्थिक घडी त्यांच्या वारसांच्या स्वाधीन केली ; ती मिश्र अर्थव्यवस्था, कळत न कळत मक्तेदारांचीच संरक्षक व बटीक झाली. समाजवादातून नेमकी तीच जनता निसटली, जिच्यासाठी सर्व आटापिटा चालला होता.

पंडितजींच्या या अपयशाची अनेकांनी मीमांसा केली आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस हे आरंभी पंडितजींचे समविचारी व समाजवादी सहकारी होते. त्यांनी स्वातंत्र्य मिळण्याच्या आधीच पंडितजींवर टीका केली होती. पंडितजी व्यक्तिवादी आहेत असा त्यांचा आरोप होता. त्यांचे म्हणणे असे होते की, आपला विशिष्ट ध्येयवाद, विशिष्ट उद्दिष्ट असेल तर ते प्रत्यक्षात आणण्यासाठी एखादा पक्ष, एखादा गट असणे आवश्यक आहे. पंडितजींचे ध्येय समाजवादाचे होते परंतु त्यासाठी त्यांनी कोणताही गट जवळ केला नाही. म्हणून सुभाषबाबूंनी पंडितजींचे सिध्दांत व त्यांच्या निष्ठा क्रांतिकारी बांधिलकी स्वीकारल्या नव्हत्या, असा अभिप्राय नमूद केला आहे. इतिहासाची साक्ष सुभाषबाबूंच्या बाजूनेच पडते. काँग्रेसमध्ये समाजवादी विचारांच्या तरूणांनी जो काँग्रेस समाजवादी गट स्थापन केला होता त्याचा पंडितजींनी वापर तर करून घेतला, परंतु त्यात त्यांनी ना भाग घेतला ; ना त्याला कधी मदत केली. मधू लिमये यांनी आपल्या पुस्तकात ( प्राईम मूव्हर्स) हा सर्व तपशील दिला आहे. सुभाष बाबूंनी पुढे



एन ४३९४-१३

असे म्हटले की, कोणत्याच पक्षाशी अगर गटाशी संबंध न ठेवल्यामुळे सर्वत्र लोकप्रिय होणे शक्य आहे परंतु त्या लोकप्रियतेचे मोल काय ? स्वतः गांधीजींचे मतही या ग्रंथात उद्धृत करण्यात आले आहे. ते म्हणतात की, सुभाषचा स्वतःवरच विश्वास होता. त्याचप्रमाणे त्याच्यासमोर एक ' मिशन ' होते. जवाहरलालचे तसे नव्हते. गांधीविरहित त्याचे कसलेच मिशन नव्हते व त्यांची गांधींवरची निष्ठा अव्यभिचारी होती. आपले ध्येय साध्य करण्यासाठी पंडितजींना पक्षासारख्या साधनाची कधीच गरज वाटली नाही. त्यांना काँग्रेस पुरेशी वाटली. त्यांच्याबाबतीत सर्वत्र असा समज पसरला होता की, सरदार पटेल वगैरे पंडितजींशी एका धोरणाने वागत असत. त्यांना खूप बोलू देत. अगदी त्यांचा अहंकार तृप्त होईपर्यंत त्यांचे हे बोलणे चालू देत. शेवटी त्यांनाच त्या प्रश्नांविषयी ठराव करायला सांगत आणि त्या ठरावात आपणा सर्वांची मते अंतर्भूत होतील याची काळजी घेत.पंडितजींच्या अहंकाराला व त्यांच्या शिस्तप्रियतेला कौल लावून सरदार वगैरे हा खेळ करीत. स्वतः पंडितजींनीही याची कबुली दिलेली आढळते. समाजवाद अगर परराष्ट्र राजकारणाचा विषय निघाला की, काँग्रेस पक्षातले माझे सहकारी माझे म्हणणे मुकाट्याने ऐकून घेत व जणू माझी चेष्टा करण्यासाठी मला ठराव लिहायला सांगत.

संघटनेविषयी अगर उचित साधनाविषयी पंडितजी एवढे बेफिकीर का म्हणून होते ? त्यांची गणना अनेकांनी स्वप्नाळू व आदर्शवादी लोकात केली आहे. परंतु सत्तेच्या संदर्भात इतर कोणाही इतकेच नव्हे तर कांकणभर जास्त ते व्यवहारी व वास्तववादी होते. पंडितजी हे ओळखून होते की, काँग्रेस पक्षातली अगर बाहेरची सत्ता गांधीजींच्या हातात आहे. सत्ता मिळायची झाली तर त्यांच्याकडूनच मिळेल मग इतर गट व पक्ष काय करायचेत ? गांधीजींचे तर ते वारसच होते. पंडितजींनी अन्य प्रसंगी काँग्रेसअंतर्गत गट अगर पक्ष यांना उत्तेजन दिले नाही असे नाही. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसच्या नासिक अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून पुरुषोत्तमदास टंडन निवडून आले. पंडितजींचा त्यांना विरोध होता. टंडन हे सरदार पटेलांचे उमेदवार होते. टंडन यांच्या विरुद्ध रफी अहमद किडवई यांनी आचार्य कृपलानी यांना उभे केले. वस्तुतः पंडितजींच्या सल्लामसलतीनेच हे झाले होते परंतु त्यांनी कृपलानींची उघड बाजू घेतली नाही. त्यानंतर टंडन व किडवई यांच्यातील वाद वाढत गेला. हा वाद प्रत्यक्षात सरदार व पंडितजी यांच्या दरम्यानचाच होता. किडवई यांना टंडन यांनी कार्यकारिणीवर घेण्यास नकार दिला. शेवटी वाद विकोपाला गेला व कृपलानी आणि किडवई यांनी काँग्रेस डेमोक्रॅटिक फोरमची स्थापना केली. या गटाचा वापर करून पंडितजींनी टंडन यांना राजीनामा देण्यास भाग पाडले. परिणामी कृपलानींनी काँग्रेस सोडली व त्यांनी किसान मजदूर प्रजापक्ष नावाचा नवा पक्ष काढला. किडवई काँग्रेसमध्येच राहिले. दबावासाठी गट कायम करणे व त्याचा वापर करणे याचा हा पुरावा पुष्कळच बोलका आहे. पंडितजींच्या तुलनेत सरदार पटेल उघड उघड आपले दबाव गट तयार करीत व शेवटपर्यंत ते टिकवून ठेवीत. संघटनेच्या बाबतीत पंडितजींनी नेहमीच उदासीनता अगर असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर त्यांच्या विचारांचे म्हणून देशभर जे नेते व कार्यकर्ते होते त्यांची सत्तापदावरून हकालपट्टी झाली. पंडितजी मात्र आपल्या पदावर टिकून राहिले. हैद्राबाद संस्थानातले उदाहरण सर्वज्ञात आहे. आंदोलनात कुठेही नसणारे जमीनदार, प्रतिगामी व मवाळ सरदार पटेलांच्या पाठिंब्याने सत्तेवर आले व पंडितजींचे अनुयायी असणारे पुरोगामी विचारांचे स्वामी रामानंद तीर्थ व गोविंदभाई श्रॉफ यांच्यासारखे मातबर लोक बाहेर फेकले गेले. पंडितजी त्यांचा बचाव करू शकले नाहीत. पंडितजींना अशा प्रकारचे अपयश जवळ जवळ सर्व देशभरात व प्रांतोप्रांती पत्करावे लागले.

सत्तेसाठी व अधिक औदार्याने सांगावयाचे झाल्यास इंग्रज निघून गेल्यानंतर देशाचा राज्यकारभार व्यवस्थित चालण्यासाठी पंडितजींनी सरदार पटेलांच्या सहकार्याने ब्रिटिश साम्राज्याच्या तालमीत

तयार झालेली सनदी नोकरशाहीची संपूर्ण यंत्रणा जशीच्या तशी दत्तक घेतली. वस्तुतः समाजवादी विचाराच्या योजनेत हे कुठेच बसत नाही. पक्षाचे प्रशिक्षित व समर्पित कार्यकर्तेच नव्या व्यवस्थेचे पाईक ठरू शकतात. परंतु समाजवादी पंडितजींनी आयती तयार यंत्रणाच स्वीकारली. कायदा आणि व्यवस्थेच्या हद्दीपर्यंत हा मार्ग जवळचा व सोयीस्कर ठरला. परंतु अपेक्षिलेली गुणात्मक फरक असणारी व्यवस्था स्वप्नवतच राहिली. संघटनेची क्षिती न बाळगता जो समाजवाद पंडितजींच्या नेतृत्वाखाली आला तो भव्य-दिव्य संकल्पना म्हणून, समाज परिवर्तनाचे साधन म्हणून नव्हे. बाकीचे अपयश मग क्रमप्राप्त म्हणूनच पदरात घ्यावे लागले.

पंडितजींची संस्मरणीय देणगी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात दिसून येते. भारताच्या परराष्ट्र नीतीचे तेच जनक होते. महासत्तांच्या व अन्य लष्करी गटात सामील न होता आपले धोरण आपल्या राष्ट्रीय हितापुरते मर्यादित असावे व सर्वांशी सख्य राखणारे असावे. पंडितजींनी अलिप्त राष्ट्रांना एकत्र आणून त्यांना ' पंचशील ' सिध्दांताशी बांधून घेण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांना थोडेफार यश आलेही परंतु याही बाबतीत त्यांना फार दाहक पराजय लवकरच पत्करावा लागला. चीन हे साम्यवादी राष्ट्र आहे व ते आक्रमण करणारच नाही, या श्रद्धेचा चीनने चक्काचूर केला. चीनने भारताला केवळ पराभूतच केले नाही ; तर एकतर्फी युद्धबंदी घोषित करून हास्यास्पद बनविले. या संबंधीचा जो तपशील आता वाचावयास मिळतो त्यावरून असे दिसते की, पंडितजी व संरक्षण मंत्री कृष्ण मेनन यांनी चुकीचे निर्णय घेतले. गोंधळाची परिस्थिती निर्माण केली. लष्करातही पक्षपाती बदल केले. तयारी नसताना लष्कराला रणांगणावर पाठविले आणि शेवटी चीनने वाटाघाटीसाठी बोलावले असता खोट्या प्रतिष्ठेच्या आहारी जाऊन We may talk but not negotiate अशी भूमिका घेतली.फाळणी इतकेच हे अपयश पंडितजींच्या फार जिव्हारी लागले.

सारांश, पंडित नेहरूंसारख्या प्रचंड व्यक्तिमत्वाच्या थोर पुरुषाचे यशापयश जोखणे इतके सोपे नाही. चुका व दोष कितीही आढळत असले तरी त्यांचे व्यक्तित्व खरोखरीच फार उत्तुंग होते. त्यांचे एकेकाळचे जिवलग स्नेही डॉ. सय्यद महमूद यांनी पंडितजींविषयी असे म्हटले आहे की,

' Jawaharlal is half a Century ahead of his time and with whom possibly it is difficult for most of his-co-workers to keep pace.'

पंडितजींसारखा एवढा थोर नेता आपल्या देशाला लाभला, हे आपले महद्भाग्यच म्हटले पाहिजे. त्यांनी प्रस्थापित केलेल्या लोकशाहीला, संसदीय व्यवस्थेला व समाजवादाला त्यांच्या पश्चात इतकी अवकळा यावी ; ही वास्तवता आपणास आत्मनिरीक्षणास प्रवृत्त करू शकली तर फार बरे होईल.

नेहरू इतिहासाचे व तत्त्वज्ञानाचे गाढे व्यासंगी व अभ्यासक होते. एकदा अरुणा असफअलींना त्यांनी लिहिले होते की, ' As for the answers to the problems of life, do you know what Marx said about it ? The only way history answers questions is by putting further questions.'

□ □ □

# पं. नेहरूंच्या कविमनाचे रंग

□ डॉ. निर्मलकुमार फडकुले

भारताच्या भवितव्याला आकार देणारी एक निर्मितिशील शक्ती ; असाच उल्लेख पं. जवाहरलाल नेहरूंच्या संदर्भात इतिहासाला करावा लागेल. आपल्या कर्तृत्वाने एखाद्या खंडतुल्य देशाचा इतिहास घडवणाऱ्या प्रमुख नेत्यांत त्यांची गणना करणे आवश्यक आहे. पंडित नेहरू हे क्रांतीच्या तेजाचे अपत्य होते. एका नव्या प्रगतिवादी कालखंडाचे ते निर्माते होते. युगंधर पुरुषाच्या ठायी विचार आणि प्रतिभा यांचा जो स्रोत असतो, तो पंडितजींच्या व्यक्तित्वात आणि कर्तृत्वात होता, असे त्यांच्या जीवन कार्यावरून स्पष्ट होते. विसाव्या शतकात जगाच्या राजकीय क्षितिजावर स्वयंतेजाने जे तारे तळपले, त्यात पंडितजींचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागतो. भारताच्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही कालप्रदेशावर त्यांच्या व्यक्तित्वाचा प्रसन्न व प्रभावी प्रकाश पडलेला आहे. कोट्यवधी लोकांच्या अंतःकरणात त्यांना स्थान मिळाले होते. ही लोकप्रियता म्हणजे नियतीची लहर नव्हती. पंडितजींचे नेतृत्व, त्यांचा असीम त्याग, त्यांची लोकाभिमुखता असे त्यांच्या रोमारोमांतून लहरत असलेले स्वातंत्र्यप्रेम ; या साऱ्या घटकांमुळे कोणत्याही राज्यकर्त्याला दुर्लभ असलेली असाधारण लोकप्रियता पंडितजींच्या वाट्याला आली. त्यांच्या राजकारणाची गुणदोष मीमांसा करणारे अभ्यासक काहीही म्हणोत, पण जगातल्या लोकमान्य नेत्यांत पं. नेहरूंना अद्वितीय स्थान लाभले होते, याबद्दल शंका उरत नाही. भारताच्या राजकीय जीवनात ' नेहरू युग ' येऊन गेले अशीच साक्ष इतिहास देऊ शकेल.

पं. नेहरू हे केवळ राजकीय नेते नव्हते. त्यांचे व्यक्तित्व एकारलेले नव्हते. या व्यक्तित्वात अनेक मोहक रंग आणि रेषा होत्या. लोकमानसात त्यांच्या देखण्या, राजबिंड्या रूपाची एक हास्यमुखी प्रतिमा आजही उभी आहे. त्यांच्या कोटावरील बटनहोलमध्ये खोवलेल्या ताज्या गुलाबपुष्पाचा मधुरगंध जणू आजही लोकमनात रेंगाळत आहे. राजकारणाच्या रूक्ष, स्नेहशून्य, कडवट वातावरणातही आपल्या रसिक वृत्तीचे गुलाबपुष्प ताजे टवटवीत ठेवण्याची किमया पंडिजींना साधली होती. उघड्या मोटारीतून जाताना अफाट जनसंमर्दाकडे प्रसन्न हास्यकटाक्ष फेकून आपला हात प्रेमाने उंचावणारा त्यांच्यासारखा नेता पुन्हा कधी जनतेला भेटेल हे मात्र सागता येणार नाही. नेहरू हे अभिजात रसिकतेचे आणि तारुण्याचे एक विलक्षण प्रतीक होते हेच खरे !

पंडितजींच्या व्यक्तिमत्वात कितीतरी रंगांची लक्षणीय गुंफण झालेली होती. स्वातंत्र्याच्या संग्रामात त्यांनी स्वतःला मनस्वीपणे झोकून दिले ; आणि ते पुढे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान झाले. पण तरीही राजकारण हा त्यांचा ' स्थायीभाव ' नव्हता. विद्वत्व, कवित्व आणि रसिकत्व यांचा संगम त्यांच्या ठायी झालेला होता. त्यांचे मन संवेदनशील होते. जीवन आणि निसर्ग यांच्याविषयी एकप्रकारचे अखंड कुतूहल त्यांच्या मनात जणू भरलेले होते. प्राचीन इतिहासाचे त्यांना उत्कट आकर्षण होते. एखाद्या

ऐतिहासिक शिल्पाला किंवा स्थळाला भेट दिल्यानंतर त्यांच्या मुद्रेवर आनंद आणि विषण्णता यांचे संमिश्र रंग प्रकट होत असत. त्या शिल्पामागचा इतिहास जणू त्यांच्याशी भावपूर्ण संवाद करीत असे. तो भूतकाळ त्यांच्या शोधक दृष्टीसमोर साकार होत असे. इतिहासावर आणि संस्कृतीवर त्यांचे नितांत प्रेम होते, भक्ती होती, पण त्यांच्यातल्या जागरूक तत्त्वचिंतकाने या भक्तीचे रूपांतर अंधश्रद्धेत कधीच होऊ दिले नाही. साहित्य, नाट्य, नृत्य, चित्र, संगीत या नानाविध कलांवर त्यांनी मन:पूर्वक पण डोळस प्रेम केले. त्यांच्या विचारावर आईन्स्टाइन, रसेल, बर्नार्ड शॉ यांचे काही दृढ संस्कार झाले. लेनिन आणि मार्क्स यांच्या विचारांचेही त्यांना जबरदस्त आकर्षण होते. ललित आणि वैचारिक साहित्याचे तर ते भोक्ते होते. त्यांच्या भाषणातून या साहित्याचे अनेक संदर्भ विखुरलेले असत. उत्तमोत्तम साहित्यकृतींच्या पारायणातून त्यांच्या जीवनदृष्टीला विचारसौंदर्याचा मोहोर आलेला दिसतो. त्यांच्या टेबलावरील काचेच्या खाली प्रसिद्ध अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्ट यांच्या कवितेतील चार ओळी लिहून ठेवलेल्या होत्या. त्या काव्यपंक्तीतून प्रकट होणारे भावविचार हेच पंडितजींचे जीवनविषयक तत्त्वज्ञान बनलेले होते.

The woods are lovely, dark and deep
But I have promises to keep
And miles to go before I sleep
And miles to go before I sleep

त्यांच्या मनाला मोह पाडणाऱ्या या कवितेतून जणू पंडितजींचे मन प्रकट झाले होते. त्यांच्या आयुष्याच्या कहाणीतला मध्यवर्ती सूर जणू या कवितेतून टिपलेला आहे. ही समोर पसरलेली उद्याने आणि वने विलक्षण सुंदर व आकर्षक आहेत. त्यांच्या गहनतेत व हिरवेपणात आपण मिसळून जावे असेच वाटते. येथेच थांबावे आणि विश्रांती घ्यावी. या उद्यानांचे आमंत्रण बलवत्तर आहे. पण मी दिलेल्या अनेक अभिवचनांची पूर्तता मला करायची आहे. ही मोहवशता झुगारून मला पुढेच चालत राहिले पाहिजे. अखेरची विश्रांती घेण्यापूर्वी कितीतरी दूर-दूरपर्यंत मला चालत राहायचे आहे. ही कविता पंडितजींच्या हृदयावर कोरली गेली होती. फ्रॉस्टची कविता त्यांच्या वाचनात नेमकी केव्हा आली हे माहीत नाही. पण या कवितेचा त्यांच्या चिंतनाला आणि जीवनदृष्टीला निश्चित आधार मिळाला होता. एका ध्येयवादी पण सौंदर्यनिष्ठ, संवेदनशील मनाचे काही उचंबळते विचारक्षण या काव्यातून व्यक्त झाले आहेत. जीवनातील अनेक लोभ आणि मोह, अनेक प्रकारची लोभस, सुखद स्थळे वैचारिक कणखरपणाने बाजूला सारून आपल्याला निर्धाराने चालत राहिले पाहिजे. रस्ता खडतर असेल म्हणून हिरव्या गर्द वनराजींच्या मोहपाशात गुंतून राहाणे हा वचनभंग ठरेल. येथे विश्रांती घेण्याचा आपल्याला नैतिक अधिकार नाही हीच भूमिका पंडितजींनी जन्मभर घेतली होती. कविता रॉबर्ट फ्रॉस्टची, पण तिच्यातले भावतरंग मात्र पंडितजींच्या अंत:करणात उमटलेले होते.

पंडित नेहरू स्वप्नवादी होते. या देशाच्या भविष्याची अनेक विलोभनीय स्वप्ने ते रेखाटीत असत. भारताच्या प्राचीन इतिहास धारेचे आपण एक अतूट घटक आहोत, या विचाराने ते भारून गेलेले असत. पाश्चात्य भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्याबद्दल त्यांना आस्था असली तरी व त्यांचा त्यांच्यावर काही अंशी प्रभाव असला तरी भारतीयत्वाबद्दलचा एक रसरशीत अभिमान त्यांना वाटत होता. एका लेखात ते म्हणतात,

'मला जर कोणी विचारले की, भारताचा सर्वात मोठा खजिना आणि सुंदर वारसा कोणता; तर मी न कचरता उत्तर देईन, 'संस्कृत भाषा आणि त्या भाषेतील साहित्य आणि इतर सारे.' हा एक

भव्योदात्त वारसा आहे. जोपर्यंत तो टिकून आहे आणि आपल्या लोकांच्या जीवनावर त्याचा प्रभाव आहे, तोपर्यंत भारताची प्रतिभा टिकून राहील. संस्कृत भूतकाळाचा खजिना तर आहेच ; पण इतक्या प्राचीन भाषेच्या मानाने तिला आधुनिक परंपराही आहे. संस्कृत भाषेच्या अभ्यासाचा पुरस्कार करणे मला आवडेल. भाषेतील विद्वानांनी, विस्मृत झालेले ग्रंथ आणि इतर वाङ्मय यांचा संशोधन करून ते उपलब्ध करून द्यावे असे मला वाटते, (नॅशनल हॅरॉल्ड, फेब्रुवारी १९४९).

भाषा, विचार, शैली यांचे सौंदर्य त्यांच्या चिंतनशील मनाला नेहमीच आकृष्ट करून घेई. आपल्या विचारांची अभिव्यक्ती करताना त्यांच्यातली काव्यवृत्ती पदोपदी प्रकट होते. त्यांचे शब्द आकर्षक विचारसूत्रात गुंफलेले असतात. नेहरूंचे चिंतन केवळ एक उत्कट कवीचे चिंतन नसून ; ते एका उत्कट राष्ट्रभक्ताचे, एका ज्ञाननिष्ठाचे आणि जग बदलू पाहाणाऱ्या एका क्रांतिकारकाचे भावसंपन्न चिंतन आहे. त्यामुळेच ते बुद्धीला आवाहन करते, भावनेला व्याकुळ करते आणि आपल्या रसिकतेला संतुष्ट करते. पंडितजींच्या मनात त्यांच्या आयुष्याचा अंतापर्यंत एक मनस्वी कवी वसतीला होता, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. या कविमनाचे रंग मोहक आहे. नानाविध रंगांनी विखुरलेले नेहरूंचे साहित्य, हा आनंदाचा एक दुर्मिळ ठेवा आहे. आपल्या आत्मकथेत एका ठिकाणी त्यांनी म्हटले आहे,

जानेवारी महिना संपून फेब्रुवारीला नुकताच प्रारंभ झाला आहे आणि वातावरणात वसंताचा पदरव ऐकू येत आहे. बुलबुल वगैरे पक्षी दिसू लागलेले असून त्यांचे संगीत कानावर पडत आहे. इवलाले कोंभ जमिनीच्या कंवधा फोडून वर डोकावत असून या विचित्र सृष्टीकडे विस्मयाने पाहात आहेत. टेकड्यांच्या उतरणीवर ऱ्होडोडेंडूनचे रक्तासारखे लाल गुच्छ बहरलेले आहेत आणि पीच व प्लमच्या झाडावर नुकता कोठे मोहोर डोकावू लागला आहे. सरांतून ओघळून जाणाऱ्या मण्याप्रमाणे चाललेले दिवस मोजीत व कमलच्या पुढील भेटीचा विचार करीत मी बसलो आहे. आशाभंग, यातना आणि वियोग यांच्या शिशिर ऋतुनंतर जीवनाच्या प्रफुल्ल वसंताला प्रारंभ होतो असे म्हणतात ; ते कितपत खरे असेल? असा विचार माझ्या मनात येत आहे. दुःखावाचून आनंदाला रूची चढत नसावी. विचारांतील गाळ नाहीसा होण्यासाठी हालअपेष्टांची आवश्यकता असेलही. पण त्या देखील पराकोटीला पोचल्या, म्हणजे माणसाची बुद्धी मंद होते नव्हे का ? तुरुंगवासामुळे अन्तर्निरीक्षणाची सवय लागते. माझी अनेक वर्षे तुरुंगात गेली असल्याकारणाने अधिकाधिक अन्तर्मुख होणे मला भागच पडले. मी जात्या अन्तर्मुख नव्हतो, पण दाट कॉफी अथवा अफू यांच्याप्रमाणे तुरुंगवासामुळेसुद्धा मनुष्य अंतर्मुख बनत असतो. कधी कधी गंमत म्हणून अंतर्मुखता व बहिर्मुखता यांच्या मापनासाठी प्रो. मॅक्डूगल यांनी योजलेल्या घनाची आकृती काढून माझ्या मनातल्या घडामोडींचे प्रमाण काय पडते ते मी पाहात बसतो. माझ्या मनात फारच झपाट्याने घडामोडी होत असतात, असे मला त्या प्रयोगावरून आढळून आले आहे.'

(आत्मकथा–अनुवादक : ना. ग. गोरे)

रमणीयतेचे दर्शन आणि चिंतन हा या रसिक लेखकाचा जणू धर्म होता. पंडितजींची आत्मकथा म्हणजे त्यांच्या अनेकरंगी व्यक्तित्वाचा एक हृद्य अविष्कार आहे. ही कहाणी वाचता वाचक त्यांच्या विशिष्ट उंचीवरच्या सुखदुःखांशी सहकंप पावतो. ' आत्मकथे ' तून प्रकट झालेले भावविश्व एका हळव्या पण तत्त्वकठोर भावनाशील आणि तरीही बुद्धीवादी देशभक्ताचे चमत्कृतिपूर्ण विश्व आहे. ही सामान्य पातळीवरची सामान्य सुखदुःखे नाहीत. या कथेतून जाणवणारे मन भव्यतेकडे आणि उदात्ताकडे झुकलेले आहे. ' आत्मकथा ' लिहिणारा हा कवी कठोर वास्तवाच्या भूमीवर पाय रोवून

स्वप्नांच्या वातावरणात झेप घेत आहे. येथील दुःखांना आणि वेदनांना आगळाच सुगंध आहे. एका ठिकाणी पंडितजींनी ध्येयवादित्वाबद्दल म्हटले आहे,

'ज्यांना आयुष्यात काही ध्येय नाही; ती समाजवृक्षावर उगवलेली निव्वळ बांडगुळे आहेत. मी स्वतःच्या ध्येयवादाने इतका व्यग्र झालो आहे की, ज्यांच्या आयुष्यात कसलेही ध्येय नाही, त्यांचे जीवन मी समजूच शकत नाही. आयुष्य आधीच थोडे म्हणून ते क्षुद्रपणाने आपण जगू नये. अगदी फाशीच जाण्याचा प्रसंग आला तर दीडशे वर्षांपूर्वी फ्रेंच उमराव ज्याप्रमाणे ऐटीने आणि मिजाशीने फाशी गेले, त्याप्रमाणे आपणही हसत हसत दिमाखाने आपल्या वधस्तंभावर चढावे.'

ध्येयाच्या उन्मादाने आणि ज्ञानाच्या विचाराने पंडितजी जन्मभर भारलेले होते. त्यांची वृत्तीच रोमँटिक होती. मूर्त आणि अमूर्त सौंदर्यावर प्रेम करणाऱ्या या वृत्तीचे स्तिमित करणारे दर्शन त्यांच्या साहित्यात आणि जीवनात घडत राहिले. ते एखाद्या मनस्वी कवीप्रमाणे कलंदर आणि सौंदर्यप्रेमी होते. 'रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान् पर्युत्सुकी भवति यत्सुखिनोऽ जन्तुः' अशीच त्यांची अवस्था होती. सुंदरतेच्या सान्निध्यात देहभान हरपून जाण्याची त्यांची वृत्ती होती. हिमालयाच्या हिमशुभ्र उत्तुंग शिखरांचे ते सौंदर्य असो, क्षितिजापर्यंत पसरलेल्या महासागराच्या उसळत्या लाटांचे असो, खोल खोल दऱ्याखोऱ्यांत पसरलेल्या हिरवळीचे नाजुक सौंदर्य असो, अथवा निरागस बालकाच्या गालावर उमललेल्या कोवळ्या स्मिताचे दर्शन असो, एखाद्या गायिकेच्या कंठातून बाहेर पडण्याच्या नितळ स्वरांचे लावण्य असो किंवा ते एखाद्या नर्तकीच्या लयबद्ध पदन्यासांतून प्रकट होणारे संगीत असो, ते नाट्यातले वा चित्रातले लावण्य असो, पंडितजींच्या ठायी या अनेक प्रकारच्या सौंदर्याला उत्कट प्रतिसाद देण्याची शक्ती होती. चार्ली चॅप्लीनच्या कलेवर ते लुब्ध होते, त्याची, त्यांनी आवर्जून भेट घेतली होती. इंग्लंडला गेल्यावर बर्नार्ड शॉची भेट घेतल्याशिवाय त्यांना समाधान वाटत नसे. साहित्यिकांच्या आणि कलावंतांच्या सहवासात ते रमून जात असत. दिलखुलासपणे हास्यविनोद करीत जीवनाविषयीच्या आणि माणसासंबंधीच्या अतूट प्रेमातून त्यांचे साहित्यप्रेम निर्माण झालेले होते. त्यामुळेच 'जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन' आणि 'भारताचा शोध' ग्रंथ त्यांनी मनःपूर्वक लिहिले. त्यांच्या 'आत्मकथे'तही त्यांच्या व्यक्तित्वाचे गहिरे रंग व्यक्त झाले आहेत. पंडितजींना लिहायला भरपूर अवसर मिळाला असता, तर इंग्रजी साहित्यात त्यांनी अत्यंत अमोलिक भर टाकली असती. आजही या साहित्याला त्यांनी दिलेले योगदान निःसंशय उल्लेखनीय आहे. मर्यादित अर्थाने ते राजकारणी नव्हते. त्यांच्या राजकारणाला सुसंस्कृत उदारमतवादाची एक व्यापक बैठक होती. त्यांच्या चिंतनाची कक्षा त्यामुळेच विस्तृत झाली. या जीवनवादी लेखकाच्या आणि चिंतकाच्या मळ्याला सीमित करणारे कोणतेही कुंपण पडलेले नव्हते. जे लेखक आणि विचारवंत उदार जीवनमूल्यांवर उदंड प्रेम करतात; त्यांच्या विकसित व्यक्तित्वाच्या अनेक प्रसन्न खुणा त्यांच्या साहित्यात उमटत राहतात. पंडितजींचे साहित्य याच जातीचे आहे. आपण एकाकी आहोत, आपल्याबरोबर कोणीही नाही, अशी उदास जाणीव तुरुंगातल्या एकांतवासातही त्यांना कधी झाली नाही. 'आत्मकथेतून' पंडितजींचे निसर्गप्रेम, पशुपक्ष्यांविषयीची ओढ जाणवते. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या या देशातल्या सृष्टीची अनेक दर्शने त्यांनी आपल्या ज्ञानात साठवली होती. कोणत्याही राजकारणी व्यक्तीने लिहिलेल्या आत्मचरित्राहून ही 'कथा' निराळी व रसमय वाटते.

पंडितजींचे मृत्युपत्र म्हणजे एक हृदयस्पर्शी भावकवित्व आहे. मृत्युपत्रातून वस्तुतः काही व्यावहारिक, रूक्ष तपशील असतात पण जिवंत विचारांच्या काव्यधारांनी चिंब भिजलेले हे मृत्युपत्र खरे 'जीवनपत्र' आहे. विचारांनी व भावनांनी काठोकाठ भरलेल्या समृद्ध मनाचे नितळ प्रतिबिंब यात

पडलेले आहे. हे वाचताना वाचकाचे डोळे ओलावतात. पंडितजींची सामाजिक जाणीव, देशभक्ती, जीवनविषयक अदम्य श्रद्धा, निसर्गाविषयीचा आत्मीय भाव, संस्कृती आणि परंपरा यांच्याबदलचे प्रेम यात इतक्या रसरशीतपणे प्रकट झाले आहे की, त्याच्या स्पर्शाने आपण रोमांचित होतो. जगातल्या कोणत्याही राजकीय नेत्याने असे मृत्युपत्र लिहिले नसेल. केवळ या अंतिम इच्छापत्रावरूनही पंडितजींच्या जीवनदृष्टीची कल्पना येऊ शकते. ते धर्मवादी नव्हते. कर्मकांडापासून नेहमीच अलिप्त होते. एकदा पंढरपूरच्या विठ्ठलमंदिरात त्यांनी दर्शनासाठी यावे असे त्यांना सुचविण्यात आले. तेव्हा,' आपला सारा देश म्हणजे विठ्ठलाचे मंदिर आहे आणि प्रत्येक माणूस साक्षात विठ्ठलच आहे ' असे मार्मिक उत्तर त्यांनी दिले होते. त्यांच्या मृत्युपत्रात कर्मकांडात्मक श्रद्धेला अवसर नाही. पण त्यांच्या हृदयस्थ जीवनश्रद्धेचा गंध मात्र दरवळत राहिलेला दिसतो. आपली अखेरची इच्छा व्यक्त करताना ते लिहितात,

' माझ्या देहाच्या राखेपैकी मूठभर राख गंगेत टाका. हे मी कोणत्याही धार्मिक भावनेने सांगितलेले नाही. अलाहाबादजवळून वाहात जाणाऱ्या गंगा व यमुना नद्यांशी लहानपणापासूनच मी मनाने बांधला गेलो आहे. जसा जसा मी मोठा होत गेलो, तसतसे हे बंधनही अधिकाधिक दृढ होत गेले. जसजसे ऋतु बदलत जातात तसतसे गंगा-यमुनांचे रूप आणि वृत्ती बदलत जातात. ही त्यांची बदलती रूपे मनात कोरून ठेवली आहेत. अनेक वेळा या रूपांच्या पलीकडे जाऊन या नद्यांची गाणी मी ऐकली आहेत. त्यांच्या अनादिक प्रवाहाबरोबर वाहात आलेल्या कथांचे मी श्रवण केले आहे. या नद्यांची प्राचीन परंपरा, त्यांचा इतिहास व पुराणातून त्यासंबंधी असलेले उल्लेख यांच्यावर मी कितीतरी विचार केला आहे. या नद्या, विशेषतः गंगा ही सर्वार्थाने भारताची नदी आहे. गंगेवर भारतातील जनतेचे अलोट प्रेम आहे. गंगा नदीच्या भोवती भरतवंशाची अनेक संस्मरणे गुंफली आहेत. भारताच्या आशा-आकांक्षा, जय-पराजय यांची गंगा ही साक्षीदार आहे. भारतमातेच्या विजयाची गाणी तिने ऐकली आणि पराभवाचा आक्रोशही तिने केला आहे. गंगा ही भारताच्या प्राचीनतम संस्कृतीचे व जीवनप्रवाहाचे प्रतीक आहे. जीवनप्रवाह बदलत राहतो, वाहात राहतो. त्याचे प्रतीक मात्र गंगाच राहाते.

गंगेकडे पाहिले म्हणजे मला हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांची आणि खोल खोल दऱ्यांची आठवण होते. या हिमशिखराप्रमाणेच मला गंगा नदीकडे पाहून समृद्ध आणि विस्तीर्ण अशी दुआबातील मैदाने आठवतात. याच प्रदेशात माझे जीवन घडले आहे. जीवनकार्य ठरले आहे. सकाळी सूर्यकिरणाच्या कोवळ्या प्रकाशात गंगा कशी हास्य करीत नाचत, बागडत चाललेली दिसते. पण एकदा का संध्याछायांचे आवरण पडले, म्हणजे तिचा प्रवाह कसा खिन्न आणि गूढ भासू लागतो. हिवाळ्यात प्रवाह रोडावतो खरा, पण गंगा कशी मंदगतीने आणि डौलाने वाहात जाते. पावसाळ्यात तिचा प्रचंड प्रवाह घनगर्जना करीत येतो. त्यावेळी त्याचे रूप म्हणजे भरदार छातीच्या सागराचेच जणू दर्शन ! वर्तमानकाळातून वाहत वाहत भविष्यकाळाच्या महान सागरात एकरूप होणाऱ्या भारताच्या भूतकाळाचे गंगा हे मला प्रतीक वाटते, भव्य स्मारक वाटते.

अनेक जुन्या परंपरा व रूढी मी टाकून दिल्या आहेत. सर्व प्रकारच्या बंधनातून भारत मुक्त झाला पाहिजे, असे मी सांगत आलो आहे. असे असले, तरी भूतकाळाशी पूर्णतः फारकत घ्यावी असे मला कधीच वाटत नाही. आपला महान सांस्कृतिक वारसा हे माझेही अभिमानाचे निधान आहे. ही परंपरा म्हणजे माझा अनमोल ठेवा आहे. . . . . . माझ्या या सर्व भावभावनांचा साक्षीदार असलेल्या माझ्या देहाची थोडी राख म्हणून गंगेत पडावी अशी माझी विनंती आहे. भारताच्या सांस्कृतिक परंपरेला माझा तो अखेरचा प्रणिपात आहे. . . . . . मात्र मूठभर राखेचे गंगेत विसर्जन केल्यावर जी राख उरेल ती विमानातून उंच आकाशात न्यावी आणि ती भारतभूमीवर विखरून टाकावी. भारताच्या भूमीचाच तो एक अंश बनावा हीच माझी अखेरची इच्छा आहे. (मृत्युपत्रातील उद्‌गार :' सूर्यास्त ' या आचार्य अत्रे यांच्या पुस्तकातून)

गंगेकडे पाहाण्याचा हा सुजाण, भावम्य दृष्टिकोन केवळ इतिहासाच्या अध्ययनातून उद्‌भवलेला नाही. हा दृष्टीकोन नेहरू नावाच्या इतिहासकाराचा जसा आहे; तसाच तो जवाहरलाल नावाच्या कविचाही आहे. ज्या नदीने आपल्याला घडवले, वाढवले, जिला साऱ्या भारतीय जीवनाचा शतशतकांचा सुखदुःखात्मक इतिहास माहित आहे, जी आपल्या परंपरेचे प्रतीक आहे, तिला पंडितजींच्या कृतज्ञ मनाने आपल्या भावनांची अंजली अर्पण करावी, हे अगदी स्वाभाविक आहे. ही गंगा पाहिली की त्यांना आपले मुग्ध किशोरावस्था आठवत असे. गंगा-यमुनेचा संगम त्यांनी शेकडो वेळा आपल्या ओलावलेल्या नेत्रांनी टिपला असेल. नद्यांवर, झाडाझुडुपांवर, डोंगर-पर्वतांवर, माथ्यावरच्या निळ्या आभाळावर, धरित्रीवर आणि देशातल्या नव्हे; जगातल्या असंख्य माणसांवर आपल्या आत्मीय भावनेचा वर्षाव करणारा हा माणूस संतही होता आणि कवीही होता. भारताच्या मातीशी एकरूप होण्याचा ध्यास त्यांनी मृत्युपत्रातून व्यक्त केला आहे. खरे तर, पंडितजी जगभर फिरले. एक अर्थाने ते जगाचे नागरिक होते, पण भारताची माती त्यांना अत्यंत प्रिय होती. या मातीची त्यांना विलक्षण ओढ होती. त्यांचा आत्मा भारताच्या अणुरेणूत जणू सामावलेला होता. आयुष्यभर ते ' भारताचा शोध ' करीत राहिले. इथला सर्वसामान्य माणूस, त्याचा श्रद्धाभाव यावर त्यांनी प्रेम केले. एका ठिकाणी ते म्हणतात,

' केवळ भौगोलिक प्रचंड विस्तारामुळे मी माझ्या देशावर प्रेम केलेले नाही. भूतकाळात हा देश महान होता, एवढ्यासाठीच केवळ त्याच्यासंबंधी मला आत्मीयता वाटत नाही तर सत्य, स्वातंत्र्य आणि जीवनातल्या श्रेष्ठ मूल्यांसाठी, हा माझा देश निश्चितपणे आज उभा राहील असा मला विश्वास वाटतो. म्हणून मी भारतावर प्रेम करतो.'

भारतीय माणसाच्या रूढीवादावर, धर्मभोळेपणावर, त्यांच्या आळसावर आणि मागासलेपणावर त्यांनी सतत वैचारिक प्रहार केले. पण तरीही हा माणूस सदैव त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय राहिला. या माणसाने पंडितजींवर आपुलकीचे आणि प्रेमाचे छत्र अखंड धरले होते. भारताच्या मातीशी एकरूप होऊन जाण्याची उत्कट कल्पना हा पंडितजींच्या श्रद्धाळू मनाचा, हळवा पण सुंदर आविष्कार आहे. पार्थिव देहाची राख एखाद्या नदीत टाकली काय किंवा तिची कशीही विल्हेवाट लावली काय–बुद्धिवादी दृष्टिकोनातून पाहिल्यास त्यात काहीच फरक पडत नाही. आपल्या मृत पत्नीच्या अस्थींचा कलश पंडितजींनी वर्षानुवर्षे जपून ठेवला. हे देखील त्यांच्या भावव्याकुळतेचे एक हृदयंगम चित्र आहे. आपल्या जन्मभूमीच्या मातीत आपल्या देहाची रक्षा मिसळून जावी असे पंडितजींना तीव्रतेने वाटले, याचा अर्थ त्यांच्या तर्ककठोर दृष्टीकोनावर त्यांच्यातल्या देशभक्ताने आणि कवीने निःसंशय मात केली आहे. केवळ कोरडा बुद्धिवाद मनाला समाधान करू शकत नाही. पंडितजी विज्ञानाचे उपासक असतील. बुद्धीच्या सामर्थ्यावर त्यांचा प्रगाढ विश्वासही होता. पण त्यांचा पिंड कवीचा–जातिवंत कवीचा होता. त्यामुळेच त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याला भावसौंदर्याचे मोहक रंग आहेत. अस्सल कलेचा रंग हा अखेर अंतरंगाचाच घटक असतो. खरे तर पंडितजींच्या दर्शनी व्यक्तित्वातही विलोभनीय रंग होता. त्याग आणि संघर्ष, भावना आणि बुद्धी, भक्ती आणि प्रेम यांची सरमिसळ झालेल्या त्यांच्या आयुष्याचा जिवंत गंध घेऊन त्यांचे साहित्य प्रकट झाले आहे. सूक्ष्म आणि संवेध दृष्टी लाभलेल्या या सौंदर्यप्रेमी रसिकाने आपल्या काव्यात मनोवृत्तीचे रंग-गंध राजकारणाच्या उष्ण हवेत विटू दिले नाहीत हे आश्चर्यकारक नव्हे काय?

□□□

# जवाहरलाल नेहरूंचे व्यक्तिमत्त्व

□ ग. प्र. प्रधान

पं. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वामध्ये अनेक छटांचा विलोभनीय मिलाफ झाला होता. अशा व्यक्तिमत्वाचा शोध घेताना स्वाभाविकपणेच संस्कारक्षम वयात त्याची घडण कशी झाली, हे पाहणे आवश्यक असते. पंडितजींचे शैशव आणि कुमारवय, इतकेच नव्हे तर ते इंग्लंडमधून बॅरिस्टर होऊन भारतात परतल्यावर १९१५ पर्यंतचा त्यांचा ऐन तारुण्याचा काळ आणि त्यापुढील त्यांचे आयुष्य, यांत फार मोठी तफावत आहे. परंतु असे असले तरी या पहिल्या कालखंडात त्यांच्या स्वभावात ज्या काही छटा उमटल्या, त्या त्यांच्या अखेरीपर्यंत टिकल्या.

कौटुंबिक वातावरणामुळे लहान मुलांचे मन घडत असते. जवाहरलालजींचे वडील पं. मोतीलाल नेहरू, हे अत्यंत यशस्वी कायदेपंडित होते आणि त्यामुळे घरात संपन्नता नांदत होती. अशा घरातील एकुलत्या एका मुलाचे खूप लाड होतात. जवाहरलालजींचेही तसे लाड पुरविले गेले. परंतु त्यांना नीट वळण लागावे, ही खबरदारीही त्यांच्या मातापित्यांनी घेतली. त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे नेहरूंचे एकत्र कुटुंब होते. परंतु जवाहरलालना समवयस्क भावंडे नव्हती. त्यांच्या मातोश्री प्रेमळ आणि सात्विक वृत्तीच्या होत्या. जवाहरलालने लहानपणी रामायण-महाभारतातील कथा ऐकल्या आणि तो आईबरोबर अनेकदा गंगास्नानालाही गेला. आपल्या मुलाला उत्कृष्ट शिक्षण द्यावे, ही मोतीलालजींची इच्छा होती. छोटा जवाहरलाल थोडे दिवस शाळेत गेला. तरी खाजगी शिक्षक ठेवूनच त्याचे शिक्षण करावे, असा मोतीलालजींनी निर्णय घेतला. बरोबरीची भावंडे नसल्यामुळे आणि शाळेत मिळणारे मित्रही न मिळाल्याने जवाहरचे बालपण एकाकीच गेले. मोतीलाल यांचा आनंदभवनात पोहण्याचा एक तलावही होता. छोटा जवाहर उत्तम पोहत असे आणि घोड्यावर बसण्याचे शिक्षणही त्याला मिळाले होते. पं. गंगानाथ झा हे जवाहरला हिंदी व संस्कृत शिकवीत. मात्र त्यांच्यावर जास्त प्रभाव पडला तो ब्रूक्स या आयरिश शिक्षकाचा. त्यामुळंच जवाहरला वाचनाची गोडी लागली आणि इंग्रजी साहित्याबद्दल प्रेम वाटू लागले. ब्रूक्स हे थिऑसॉफिस्ट होते. त्यांनी जवाहरला उपनिषदे व भगवद्गीता यांची ओळख करून दिली. ब्रूक्स यांच्यामुळेच जवाहरला विज्ञानाच्या क्षेत्राचाही परिचय झाला आणि त्याला विज्ञानाबद्दल आकर्षण वाटू लागले. त्यानंतर मोतीलालजींनी त्याचे शिक्षण इंग्लंडमध्ये व्हावे असे ठरविले आणि जवाहरने हॅरो येथे पब्लिक स्कूलमध्ये प्रवेश घेतला. प्रथम हॅरो व नंतर केंब्रिजमध्ये असताना त्याला ब्रिटिशांच्या जीवनाची ओळख झाली. स्वातंत्र्यामुळे जीवन कसे बहरून जाते, हे त्याने पाहिले आणि भारतात पारतंत्र्यामुळे जीवन खुरटून गेल्याची जाणीव त्याला तीव्रतेने झाली. उदारमतवादी विचाराबद्दल त्याला आकर्षण वाटले परंतु ब्रिटिश राज्यकर्त्यांचा साम्राज्यवाद हा उदारमतवादाशी पूर्णपणे विसंगत आहे, हेही त्यांच्या लक्षात आले. भारतातील राजकीय घटनांचा विचार करताना लो. टिळकांच्या जहाल राष्ट्रवादाबद्दल त्यांच्या मनात जबरदस्त ओढ निर्माण झाली. बुद्धिमान

आणि खूप वाचन करणाऱ्या या तरुण मुलाने केंब्रिजला विशेष यश मिळविले नाही. तो बॅरिस्टर झाला आणि भारतात परतला.

पं. नेहरूंच्या जीवनातील हा कालखंड नीरस होता, असेच म्हणावे लागेल. ज्यांना कुमार वयापासून अस्तित्वाकरिता झगडावे लागते, त्यांच्या मनाला धार येते. काहींचे मन आघातांनी विव्हल होते, संकुचित व स्वार्थी बनते. काहींना संघर्ष करताना आत्मविश्वास येतो. जवाहरलालजींच्या बाबतीत यातले काहींच घडले नाही. वडिलांमुळे, त्यांना दारिद्र्याचे चटके कधी सोसावे लागले नाहीत. त्याचप्रमाणे कठोर निर्णय घेण्याची जबाबदारीही त्यांच्यावर पडली नाही. पं. मोतीलाल नेहरू यांच्या करारी, कठोर आणि अधिकार गाजविणाऱ्या व्यक्तिमत्त्वामुळे जवाहरलालजींच्या स्वभावात पुरेसा आत्मविश्वास निर्माण झाला नाही. त्यांना खास मित्रही कोणी लाभले नाहीत. या एकाकीपणामुळे ते काहीसे अंतर्मुख बनले. पंडितजींच्या दैनंदिन जीवनात वादळे नसली, तरी त्यांच्या मनात मात्र संघर्ष चालू होते. उदारमतवादी तत्त्वज्ञान बुद्धीस पटत असले, तरी भारताच्या तत्कालीन परिस्थितीत जहाल राष्ट्रवादच योग्य वाटत होता. तरुण वयामुळे कृतिशील जीवनाची ओढ होती, परंतु नेमके काय करावे याचा निर्णय होत नसल्याने भविष्यकाळ धूसर, अस्पष्ट वाटत होता. वाचनात मन रमत होते, परंतु कोणत्याही एका विषयामुळे–ना विज्ञानामुळे, ना कायद्याच्या अभ्यासात–बुद्धी रंगून जात नव्हती. भारतात परतल्यानंतरही काही वर्षे त्यांच्या मनाची हीच अवस्था होती. वकिलीच्या व्यवसायात त्यांना गोडी वाटेना. नेमस्त राजकारण त्यांना अर्थशून्य वाटत होते. काही दिवस त्यांनी होमरूल लीगमध्ये काम केले परंतु नेटाने राजकारण करण्याचा निर्धार होत नव्हता. काँग्रेसच्या अधिवेशनांना ते हजर राहत असत ते प्रेक्षक म्हणूनच. याच सुमारास त्यांचे लग्न झाले. लग्नानंतर पत्नीसमवेत ते काश्मीरला गेले. आत्मचरित्रात त्यांनी त्यावेळच्या हिमालयातील प्रवासाबद्दल जे लिहिले आहे, त्यावरून त्यांच्या अस्वस्थ मनाला हिमालयाच्या सहवासात शांतता लाभत होती आणि त्यांच्या मनातील साहसाची ऊर्मी त्या भटकंतीतून प्रगट होत होती, असे दिसते. सुखलोलुप जीवनाचे त्यांना मुळीच आकर्षण नव्हते. स्वतःबद्दल असमाधानी असणाऱ्या जवाहरलालजींचे वडिलांच्या छायेतले सुरक्षित जीवन, निष्क्रीय होण्याची भीती होती. परंतु भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात एक नवे पर्व सुरू झाले आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवे नवे धुमारे फुटले. हे व्यक्तिमत्त्व अकस्मात बहरले. हा बहर काहीसा विस्मयजनक तर खराच. मात्र या बहरातही त्यांना वाटणारा एकाकीपणा, निर्णयापूर्वी परस्परविरोधी विचारांची त्यांच्या मनातली वादळे, वडिलांप्रमाणेच कोणातरी खंबीर व्यक्तीच्या आधाराची त्यांना वाटणारी आवश्यकता–या पूर्वायुष्यातील त्यांच्या स्वभावातील छटा अनेकदा प्रगट झाल्या.

गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली असहकाराची चळवळ सुरू झाली. पंडितजी या चळवळीत स्वतःला झोकून दिलेल्या चळवळीतच, समर्पण वृत्तीने कार्य करण्यातील साफल्य जवाहरलालजींनी प्रथम अनुभविले आणि ही समर्पणवृत्ती हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा पैलू बनली. पं. नेहरू बुद्धिनिष्ठ होते, परंतु ही बुद्धिनिष्ठा त्यांच्या क्रियाशीलतेआड आली नाही. ते कधी सावधपणे चळवळीत उतरले नाहीत. स्वतःच्या आणि कुटुंबाच्या सुखदुःखाची यत्किंचित् फिकीर न करत स्वातंत्र्य चळवळीत काम करताना पंडितजींच्या उत्साहाला उधाण आले आणि या उत्साहातून इतरांनाही सतत प्रेरणा मिळत गेली. पंडितजींच्या व्यक्तिमत्त्वाला हे तेज चढले, ते स्वातंत्र्य संग्रामामुळेच.

वृत्तीने कमालीचे स्वाभिमानी असलेल्या पं. नेहरूंना मायभूमीचे पारतंत्र्य दुःसह वाटे. या पारतंत्र्याच्या शृंखला तोडल्या पाहिजेत, या उत्कट आकांक्षामुळे ते चळवळीत ओढले गेले. गांधीजींच्या नेतृत्त्वाचे सामर्थ्य जाणवताच मोतीलालजींच्या नेमस्त भूमिकेवर ते निर्भयपणे टीका करू लागले.

वयाच्या पंचविशीपर्यंत वडिलांच्या कर्तृत्वामुळे काहीसे दडपून गेलेले जवाहरलाल आणि असहकाराच्या चळवळीत मुक्तपणे, हिरीरिने काम करणारे जवाहरलाल या त्यांच्या दोन अवस्थांचा विचार केल्यावर, संघर्षातून पंडितजींचे व्यक्तिमत्त्व कसे विकसित होत गेले ते समजून येते. या विकासाला म. गांधीही फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत होते. गांधीजींबरोबर पं. नेहरूंचे काही मतभेद होते. गांधीजींनी असहकाराच्या चळवळीत खिलाफतीचा प्रश्न गोवल्यामुळे राजकारण व धर्म यांची गल्लत झाली, असे त्यांना वाटत होते. त्याबद्दलची नाराजी पंडितजींनी आत्मचरित्रात स्पष्टपणे नोंदली आहे. परंतु मतभेद टोकाला नेऊन गांधीजींच्या चळवळीपासून दूर होणे इष्ट नाही, असाच त्यांच्या मनाने कौल दिला. असहकाराच्या चळवळीत भारतीय जनतेमध्ये जी निर्भयता आली, तुरुंगवास आणि अन्य हालअपेष्टा धैर्याने सोसण्याची जी वृत्ती साध्यासुध्या शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली, ती पाहून पंडितजींचे मन हरखून गेले. चळवळीत काम करीत असताना, आपल्या मनातील वैफल्य कसे दूर झाले व स्वातंत्र्याचे ध्येय साध्य होण्यासाठी बंदिशाळा प्रासादासारखी कशी वाटू लागली, हे पंडितजींचे आत्मकथन वाचताना त्यांच्या निरागस ध्येयवादी मनाचे दर्शन घडते.

राजकीय चळवळीची वाटचाल नेहमीच खडतर असते. विशेषतः स्वकीयांशी मतभेद झाल्यावर तर ती अनेकदा दुःसह वाटते. चौरीचौरा येथील हिंसाचारानंतर गांधीजींनी चळवळ मागे घेतली तेव्हा पंडितजींना हा अनुभव आला. असहकाराच्या चळवळीमुळे देशभर चैतन्य निर्माण झाले असताना गांधीजींनी एकदम चळवळ मागे घेतल्याने देशाचा तेजोभंग झाला, असे जवाहरलालना वाटले. गांधीजींनी मात्र त्यांच्या भूमिकेस मुरड घालण्याचे नाकारले आणि त्यांच्याशी मतभेद असलेल्या सर्व पुढाऱ्यांना अखेर त्यांचेच म्हणणे मान्य करावे लागले. या अनुभवातून जात असताना जवाहरलालजींच्या मनाला तीव्र वेदना झाल्या, परंतु ' चळवळ मागे घेतली तरी लढा पुढे चालवायचाच आहे, त्याचे स्वरूप काही काळ बदलावे लागेल,' हे गांधीजींचे म्हणणे मान्य करताना पंडितजींनी राजकीय प्रगल्भता दाखविली. ते यावेळी नेते नव्हते ; पण अशा अनुभवांतून तावून-सुलाखून निघताना, तरुण सहकाऱ्यांना सांभाळून बरोबर नेताना, पंडितजींमधील नेतृत्वाचे सुप्त गुण वाढीस लागले. पंडितजींच्या घडणीत गांधीजींचा फार मोठा भाग होता. या दोन नेत्यांचे स्वभाव भिन्न होते. परंतु स्वातंत्र्यलढ्यात ते एकमेकांपासून कधीही दूर झाले नाहीत. गांधीजींचे विचार स्पष्ट असत आणि विचारांनुसार कृती होण्यावर त्यांचा कटाक्ष असे. ते कमालीचे आग्रही व कठोरही होते. त्यांच्या या गुणांमुळेच जवाहरलालजींनी त्यांचे नेतृत्त्व मान्य केले. कौटुंबिक जीवनात, मोतीलाल नेहरूंशी जे संबंध जवाहरलालजींचे होते, तसेच राजकीय जीवनात गांधीजींशी होते. जवाहरलाल स्वमताचा आग्रह धरीत, परंतु निर्णय मात्र गांधीजी सांगतील तोच घेत. ' गांधीजींना भारताचे जनमानस अचूक माहीत आहे आणि असंख्य लोकांना स्वातंत्र्यसंग्रामात आणण्याचे त्यांचे सामर्थ्य असीम आहे म्हणूनच गांधीजींचे नेतृत्त्व मान्य करून त्यांच्या आदेशानुसार वागले पाहिजे ', अशी जवाहरलालजींची भूमिका होती. काहींना ती पडखाऊपणाची वाटली ; तरी त्या भूमिकेमुळेच स्वातंत्र्यलढ्याचा मुख्य प्रवाह अखंडित राहिला.

स्वातंत्र्यसंग्रामात पंडितजींना भारताची खरी ओळख झाली. संयुक्त प्रांतातील किसान चळवळीत भाग घेताना त्यांना भारताचे खरे दर्शन घडले. शेतकऱ्यांचे दारिद्र्य व दुःख पाहून ते व्यथित बनले आणि शेतकऱ्यांच्या भोळ्याभाबड्या प्रेमाने ते भारावून गेले. येथेच भारतीय जनतेशी त्यांचा अतूट भावबंध निर्माण झाला आणि तो त्यांच्या व्यक्तित्त्वाचा अविभाज्य घटक बनला. यापुढील राजकीय जीवनात पंडितजी आणि भारतीय जनता यांच्यातले हे नाते, दृढतर होत गेले आणि पंडितजींच्या जीवनात चैतन्याचा झरा अक्षय वाहू लागला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा हा पैलू, सभेत ते बोलत तेव्हा

सतत प्रत्ययास येई. जवाहरलाल, राणा भीमदेवी भाषणे करीत नसत. ते विचार मांडीत. ते सर्व विचार सर्वसामान्य माणसांना कितपत समजत हे सांगणे कठीण आहे ; परंतु त्यांच्या भाषणाचे मध्यवर्ती सूत्र ' आपण स्वतंत्र झाले पाहिजे व नवा समाज घडविला पाहिजे '–लोकांस बरोबर समजत असे. पंडितजींची तळमळ त्यांना जाणवे. हा नेता चुकेल पण आपली कधी फसवणूक करणार नाही, हा विश्वास लोकांना वाटे आणि म्हणून ते पंडितजींवर प्रेम करीत. जवाहरलाल स्वभावाने उतावळे होते. गैरशिस्त वा गोंधळ दिसला की ते चिडत. पण लोकांवर त्यांचे मनापासून प्रेम होते. भारतीय जनतेत अपार दुःख शांतपणे सोसण्याचे सामर्थ्य कसे आले, हे त्यांना आरंभी उमजत नसे. परंतु चळवळीत काम करताना जनसामान्याच्या जीवनाची ओळख होत गेली तसे त्यांना ते कळले आणि या जनतेवरील त्यांचे प्रेम अधिकाधिक दृढ होत गेले. सभेत भाषण करताना त्यांना लोकांच्या डोळ्यांतील भाव अचूक समजे आणि त्यांच्या मनात काहीतरी भव्य, उदात्त आहे हे लोकांच्याही प्रत्ययास येई. पंडितजी आणि भारतीय यांच्यातला हा सुखसंवाद १९२० सालापासून सुरू झाला आणि उणीपुरी चार दशके तो अप्रतिहत चालू राहिला.१९२९ च्या लाहोर काँग्रेसमध्ये अध्यक्षपदावरून संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडताना पं. नेहरूंनी केलेले भाषण, हा देशातील जनतेबरोबर त्यांनी केलेला संवादच होता. चळवळीत, निवडणुकीपूर्वी ते देशभर दौरे काढीत. ते फार दगदगीचे असत, पण पंडितजी कधी थकत नसत. लोक त्यांच्यावर जे अफाट प्रेम करीत, त्यामुळे त्यांच्या मनात उत्साहाचे कारंजे सतत थुईथुई नाचत असे. अशावेळी त्यांना स्वतःच्या एकाकीपणाचा विसर पडे. पंडितजींनी भारतीय जनमानस घडविण्यासाठी अविश्रांत मेहनत केली व हे करतानाच त्यांचे मनही घडत गेले. भारतातील जनतेने पंडितजींना घडविले. त्यांच्या मनाला आकार दिला. जनतेशी असलेले हे अतूट नाते हा पं. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विलक्षण विलोभनीय पैलू होता. त्यांचा जनमानसावरील हा प्रभाव गांधीजी जाणून होते आणि म्हणूनच सरदार पटेल आणि राजेंद्रबाबू हे विचाराने त्यांच्या अधिक जवळचे असूनही पं. नेहरूंकडेच देशाचे नेतृत्त्व दिले पाहिजे असा गांधीजींचा आग्रह असे. ' पं. नेहरूंच्या हाती देश सोपविला तर तो सुरक्षित राहील ' अशा आशयाचे उद्‌गार गांधीजींनी काढले होते. याचे कारण पं. नेहरूंचा ध्येयवाद, देशहिताची त्यांची कळकळ, यांवर गांधीजींचा पूर्ण विश्वास होताच. त्याचबरोबर भारतीय जनतेचा पंडितजींबरोबर जो ऋणानुबंध होता त्यामुळे तो त्यांना ध्येयापासून कधी विचलित होऊ देणार नाही, हेही गांधीजींना ठाऊक होते.

भावनाशीलता हा पंडितजींच्या व्यक्तित्वाचा एक भाग होता. त्याचबरोबर, जीवन विचाराधिष्ठित असले पाहिजे, हाही त्यांचा आग्रह होता. पंडितजींनी मार्क्सचे जे ग्रंथ वाचले व रशियन समाजाचे जे निरीक्षण केले, त्यामुळे त्यांना शोषणमुक्त समाज स्थापन व्हावा असे तीव्रतेने वाटू लागले. भारतातील विषमता त्यांना असह्य वाटे. स्वतंत्र भारतात समाजवादी समाजरचना असावी, हे त्यांचे ध्येय होते. १९४२ च्या ८ ऑगस्टच्या ठरावातील,' उद्याचे स्वराज्य हे शेतांत राबणाऱ्या शेतकऱ्यांचे आणि कारखान्यांत घाम गाळणाऱ्या कामगारांचे असेल ', अशा आशयाचा हा भाग पंडितजींमुळेच त्यामध्ये आला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आवडी येथे भरलेल्या अधिवेशनात पंडितजींनी समाजवादाचे ध्येय काँग्रेसला स्वीकारावयास लावले, ते त्यांच्या या वैचारिक भूमिकेमुळेच. हे ध्येय लोकशाही मार्गानेच साध्य झाले पाहिजे, हाही त्यांचा आग्रह होता. लोकशाही समाजवाद हा केवळ राजकीय विचार म्हणून पंडितजींनी स्वीकारला नव्हता. ती त्यांची जीवनदृष्टी होती. त्यांना इतकी अफाट लोकप्रियता लाभली होती की, त्यांना आपल्या हातांत सत्तेची सर्व सूत्रे ठेवणे सहज शक्य होते. परंतु त्यांना ते मान्य नव्हते. रशियातील हुकूमशाही पद्धतीस त्यांचा विरोध होता. हिटलर व मुसोलिनीच्या फॅसिझममुळे जगाचा विनाश होईल असे त्यांना वाटत होते. भारतात दुसऱ्या महायुद्धापूर्वी, हुकूमशाहीबद्दल आकर्षण वाटणारे

पक्ष आणि संघटना होत्या. या वीषबीजाचे भारतातून  निर्मूलन करण्यासाठी पंडितजींनी सातत्याने व नेटाने प्रयत्न केले. समतावादी आणि लोकशाहीवादी दृष्टीकोन हे पंडितजींच्या व्यक्तित्त्वाचे अधिष्ठान होते. त्यांच्यामुळेच भारतात लोकशाही दृढमूल बनली. पंतप्रधान झाल्यावर त्यांनी वेगवेगळ्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना लिहिलेली पत्रे वाचल्यावर, आपल्या सहकाऱ्यांना नवा भारत घडविण्याच्या कार्यात सहभागी करून घेण्यासाठी पं. नेहरूंनी जे अपार परिश्रम केले, प्रयत्न केले, त्यांची कल्पना येते. पंतप्रधान म्हणून हाती आलेल्या सत्तेचा उन्माद त्यांना कधी चढला नाही. विरोधकांशीही ते कमालीच्या सहिष्णुतेने वागत. ते रागावत, पण कधी कोणावर आकस धरीत नसत. विशाल, व्यापक दृष्टिकोन आणि उदारमनस्कता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आगळी वैशिष्ट्ये होती.

पंडितजींच्या स्वभावात काही दोषही होते. त्यांची माणसांची पारख अनेकदा चुकत असे. व्ही के. कृष्ण मेनन यांच्यावर त्यांनी इतका विश्वास का टाकला, हे एक कोडेच आहे. पंडितजींनी स्वतः कधी भ्रष्टाचार केला नाही, परंतु प्रतापसिंग कैरोंच्या कार्यक्षमतेवर खूष होऊन त्यांच्या भ्रष्टाचाराकडे त्यांनी डोळेझाक केली. राजकीय नेतृत्त्वासाठी धूर्तपणा आवश्यक असतोच. पंडितजींच्या व्यक्तित्त्वात तो पुरेसा नव्हता. चीनच्या नेत्यांवर त्यांनी ठेवलेला विश्वास हा स्वप्नाळू वृत्तीचा अतिरेकच म्हणावा लागेल. अखेरच्या दिवसांत लालबहादुर शास्त्रीजींकडे देशाची जबाबदारी सोपविण्याचा त्यांचा निर्णय मात्र अचूक होता. शास्त्रीजींच्या व्यक्तित्त्वात कमालीचा साधेपणा होता. ते ऋजु होते. परंतु त्यांचे सामर्थ्य पं. नेहरूंनी बरोबर ओळखले होते.

पंडितजींच्या जीवनात ज्या स्त्रिया आल्या, त्यांच्यासंबंधी बरेच लिहिले गेले आहे. पुरुषाला वाटणारी स्त्री-सहवासाची ओढ ही नैसर्गिक आहे. कमला नेहरूंच्या अकाली निधनामुळे पंडितजींच्या जीवनात कमालीचा एकाकीपणा आला होता. काही स्त्रियांशी त्यांची मैत्री होती, तिचे स्वरूप काय होते हे सांगणे सोपे नाही. परंतु या मैत्रीमुळे पं. नेहरू सार्वजनिक कर्तव्यापासून कधी ढळले नाहीत, असे मला निश्चित वाटते. पंडितजी हे माणूस होते. सर्वसामान्य माणसाचे गुणदोष त्यांच्यात होते, अपूर्णता होती. परंतु त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार त्यांच्या राजकीय कार्याच्या संदर्भातच केला पाहिजे अशी माझी भूमिका आहे.

पं. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाला आणखीही अनेक पैलू होते. निसर्गाबद्दल त्यांना नितांत प्रेम होते. राजकीय जीवनातील कोलाहलामुळे होणारा मनस्ताप ते हिमालयाच्या सहवासात विसरत असत. मर्दानी खेळाची त्यांना आवड होती. लहान मुलांच्या निरागसतेने ते वेडावून जात. साध्याभोळ्या आदिवासींच्या सहवासात त्यांचे मन रमत असे. कपटी, कारस्थानी माणसांचा त्यांना तिटकारा असे. तरुणांशी ते चटकन् एकरूप होत. इंडोनेशियाची राजधानी जकार्ता येथे बोटीने जाताना त्यांच्या समवेत भारताच्या नौदलातले तरुण होते. देशाच्या वेगवेगळ्या भागांतून आलेल्या या तरुणांच्या सहवासात पंडितजी कसे रमून गेले आणि भारताच्या भविष्याबद्दल त्यांच्या मनातील आशा कशी पल्लवित झाली, याचे बहारीचे वर्णन त्यांनी एका पत्रात केले आहे. त्यांची साहित्याबद्दलची अभिरूची मोठी चोखंदळ होती. त्यांनी तुरुंगात आणि तुरुंगाबाहेरही विपुल लेखन केले. ग्रंथांवर अपार प्रेम करणारे नेहरू, इंग्रजी भाषेवर असामान्य प्रभुत्व असणारे नेहरू, 'नियतीशी करार' यासारखे अविस्मरणीय शब्दप्रयोग करणारे नेहरू आणि आपल्या जीवनाच्या अखेरीपूर्वी भारताशी आणि भारतीय संस्कृतीशी आपले असलेले नाते हृदयस्पर्शी शब्दात व्यक्त करणारे नेहरू–या सर्व पैलूंचे वर्णन करायला एखादा प्रतिभावान लेखकच हवा !

आधुनिक विज्ञानाच्या साहाय्यानेच भारताची प्रगती होऊ शकेल, असे पं. नेहरूंना वाटत होते. या बाबतीत पंडितजींचे दूरदर्शित्व आणि त्यांची कार्यक्षमता असामान्य होती. नव्या पिढीला अत्याधुनिक वैज्ञानिक शिक्षण देण्यासाठी पं. नेहरूंनी देशभर ज्या सुविधा निर्माण केल्या आणि वैज्ञानिक संशोधनासाठी त्यांनी ज्या संस्था उभारल्या, त्यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वात भविष्याचा वेध घेण्याचे जे सामर्थ्य होते त्याची कल्पना येऊ शकेल.

पंडितजींच्या आयुष्यातील जवळ जवळ बारा वर्षे तुरुंगात गेली. परंतु स्वातंत्र्यासाठी हे सारे सोसताना त्यांचे मन करपून गेले नाही ; उलट, ते अधिक तेजस्वी बनले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंतप्रधान म्हणून देशाची धुरा वाहताना अनेक कसोटीच्या प्रसंगांतून त्यांना जावे लागले. काही वेळा ते चुकले, अपुरे पडले ; पण त्यांनी जे केले ते सारे देशहित साधावे या उद्देशानेच केले. त्यांच्या आयुष्याच्या प्रदीर्घ कालखंडात स्वतंत्र भारताचे स्वप्न त्यांनी डोळ्यासमोर ठेवले आणि ' एकच तारा समोर आणि पायतळी अंगार ', अशी वाटचाल केली. स्वतंत्र भारताचे पंतप्रधान झाल्यानंतर समताधिष्ठित, धर्मनिरपेक्ष, समृद्ध व समर्थ भारताचे स्वप्न साकार करण्याकरिता आपल्या देशबांधवांना बरोबर घेऊन ते प्रगतिपथावर चालत राहिले. जनतेला दिलेली अभिवचने आपणांस पूर्ण करावयाची आहेत याची त्यांना अखेरच्या क्षणीही जाणीव होती. सभोवतालच्या जगावर प्रेम करताना, अद्याप खूप साध्य व्हायचे आहे याचे भान असणाऱ्या, कविमनाच्या पंडितजींनी रॉबर्ट फ्रॉस्टच्या काव्यपंक्तींतून आपले हृद्‌गत, जीवनयात्रा संपविण्यापूर्वी व्यक्त केले.

" Woods are long, lovely and deep
But I have promises to keep
And miles to go before I sleep,
–Miles to go before I sleep."

□□□

# जवाहरलाल नेहरू आणि महात्मा गांधी

□ यदुनाथ थत्ते

आधुनिक भारताच्या प्रमुख भाग्यविधात्यांत जवाहरलाल नेहरू आणि महात्मा गांधी यांची अग्रक्रमाने गणना करावी लागेल. स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतचा काळ हा मुख्यतः महात्मा गांधींच्या नेतृत्वाचा काळ होता आणि स्वातंत्र्योत्तर जवाहरलाल नेहरूंच्या प्रधानमंत्रीपदाचा काळ हा मुख्यतः नेहरूंच्या कर्तृत्वाचा काळ म्हणता येईल. दोघांनीही आपल्या आत्मकथा लिहिल्या असून त्यांचे जीवनासंबंधीचे आकलन आपल्याला त्यातून समजू शकते. गांधींचे लिहिणे हे सरळ सोपे असे. त्यामुळे त्यांच्या इंग्लिशला ' जिब्लिकरण ' असे म्हटले जात असे. सोपे आणि अर्थपूर्ण लिहिणे किती अवघड असते ते गांधीजींचे लेखन वाचताना ध्यानी येते. जवाहरलाल नेहरूंच्या लिखाणात स्वप्निल काव्यात्मता आढळते. महात्मा गांधींच्या साधेपणात त्यांचे ऐश्वर्य दिसून येई व लोकांना त्यांचे आकर्षण वाटे. तर जवाहरलाल नेहरूंच्या एकूणच ऐश्वर्याचे लोकांना आकर्षण वाटे. दोघे खरे म्हणजे मनाचे मवाळच होते. गांधीजी तर स्वतःला मवाळाग्रणी नामदार गोखल्यांचे शिष्य म्हणवून घेत आणि राजकारणाचे अध्यात्मीकरण (स्पिरिच्युअलायझेशन ऑफ पॉलिटिक्स) करण्यासाठी धडपड करत, कारण एकदा मूल्यांचे भान सुटले की राजकारणात सत्तालालसेचा संघर्ष सुरू होतो, याची त्यांना जाणीव होती.

लोकमान्य टिळकांनी ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच ' असे कितीही बुलंद आवाजात सांगितले असले, तरी स्वराज्य तेव्हा दृष्टिपथातही नव्हते आणि त्यामुळे त्यांनी निष्काम कर्मयोगाचे अनुपान सांगितले. गांधीजींच्या नेतृत्वाच्या काळात स्वराज्याची चाहूल लागू लागली होती, आणि त्यामुळे त्यांनी अनासक्तीचे प्रतिपादन केले. जवाहरलाल नेहरूंना शासकीय अधिकार पदे उपभोगायला मिळाली आणि सत्तास्पर्धा काबूत ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची चिंता बाळगावी लागली. गांधी आणि नेहरूंच्या जाणिवांच्या परी वेगळ्या होत्या आणि त्यामुळे त्यांच्या प्रयत्नांतही वेगळेपण होते. लोकांच्या सम्यक प्रबोधनाच्या आधारावरच भारताचे भाग्यविधान अवलंबून आहे, याची जाणीव दोघांनाही होती, गांधीजींचा ओढा विचार दालनाकडे होता, तर जवाहरलाल दंडशासन निषिद्ध मानत नसत. जवाहरलाल नेहरूंना शब्द हे प्रबोधनाचे मुख्य हत्यार वाटत असे; तर ज्या समाजाची शब्दक्षमता मुळातच मर्यादित आहे, त्याच्या संदर्भात शब्द हे साधन अपुरे आहे असे जाणवल्यामुळे, गांधीजींना रचना व शांततामय संघर्षातून लोकप्रबोधनाचा टप्पा गाठता येईल, असा विश्वास वाटत होता.

गांधीजी, जवाहरलाल नेहरूंपेक्षा दोन दशके आधी जन्मले होते आणि जवाहरलाल नेहरू गांधीजींच्या निधनानंतर जवळ जवळ दोन दशके प्रधानमंत्रीपदाचा भार सांभाळत होते. दोघांच्या

जीवनाचा विचार करताना हा काळाचा आघात विसरून चालणार नाही. गांधीजी बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला जायला निघाले तेव्हा त्यांच्या आईला त्यांनी तीन वचने दिली. मद्य, मांस आणि परस्त्री यांच्यापासून विलायतेतही आपण दूर राहू असे अभिवचन देऊन ते इंग्लंडला गेले. जवाहरलाल नेहरूंना युरोपीय जीवनाचा लाभ सुरूवातीपासूनच मिळावा, असा त्यांचे वडील मोतीलाल यांचा कटाक्ष होता. काम प्रेरणेबद्दल दोन्ही कुटुंबांतील धारणा वेगळ्या होत्या. गांधीजींना ब्रह्मचर्याची महती वाटत होती आणि संतानिर्मिती हाच कामजीवनाचा हेतू आहे असे वाटत होते. नेहरूंची धारणा वेगळी होती. मोतीलाल नेहरूंच्या संतानांच्या जन्मातील अंतर आणि जवाहरलाल नेहरूंना एकमेव संतानाचा झालेला लाभ, या गोष्टी त्यांच्या कामविषयक कल्पना किती भिन्न होत्या ते दाखवतात. अर्थ-कामाच्या प्रेरणा नेहरूंना महत्त्वाच्या वाटत होत्या तर गांधीना धर्म आणि मोक्षाचा ध्यास लागला होता.

भारत खेड्यांत सामावलेला आहे आणि जोवर भयग्रस्त आणि आनंदहीन असे जीवन हे ग्रामीण लोकांच्या नशिबी येत राहील, तोवर नुसते परदास्यमोचन हे पुरेसे होणार नाही, यांची गांधीजींना अनुभूती होती आणि त्या निःस्त्राण जनतेला त्राण देण्यासाठी गांधीजींनी विधायक कार्याची मालिका उभी केली. जवाहरलाल नेहरूंना सत्ताप्राप्तीपर्यंत संघर्षाचे काव्यात्म आकर्षण होते. गांधीजींना ग्रामीण जनतेचा निखालस उमाळा होता, जवाहरलाल नेहरूंना त्यांच्या प्रश्नांचे काहीसे बौद्धिक आकलन होते.

महात्मा गांधी बॅरिस्टर होते आणि त्यामुळे कायद्यांतून पळवाटा आणि चोरदरवाजे शोधून देणारा वकिलांचा एक वर्गच उभा राहिल्याचे त्यांनी अनुभवले होते आणि म्हणून सत्याग्रही व्रतानुशासनाचा अवलंब लोकांनी करावा म्हणून त्यांनी उदाहरण घालून दिले. व्रत हे स्वेच्छेने स्वीकारलेले असल्याने त्यातून चोरदरवाजे आणि पळवाटा शोधण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही, अशी गांधीजींची धारणा होती. गांधीजी प्रशिक्षणार्थ इंग्लंडला गेले आणि नंतर गोलमेज परिषदेला पुन्हा एकदा इंग्लंडला गेले. बादशहाच्या दरबारातही ते दरिद्रनारायणाच्या वेषातच गेले आणि म्युरियल लेस्टर ह्या झोपडपट्टीत काम करण्याच्या भगिनीचे आतिथ्य त्यांनी स्वीकारले. याउलट नेहरूंना विदेश यात्रेचा शौक होता आणि शाही इतमानाने राहण्याचे त्यांना आकर्षण होते. त्या नंग्या फकिराचा साम्राज्याला सुद्धा दबदबा वाटत होता.

नेहरूंना उत्तर आयुष्यात भारताचा शोध घ्यावासा वाटला; तर गांधीजींना आफ्रिकेत असतानाच तो शोध लागला होता. जो समूह आत्मबलाने आवश्यक परिवर्तन घडवून आणण्याचे नाकारतो, तो परकी हस्तक्षेपाला अप्रत्यक्ष आमंत्रणच देत असतो ह्याची जाणीव गांधीजींना आफ्रिकेत आली. 'हिंदस्वराज्य' व 'माझ्या स्वप्नातील भारत' ह्या छोट्या पुस्तिकांत आपले आकलन अल्पाक्षर अर्थबहुल पद्धतीने गांधीनी मांडले आहे; तर नेहरूंचे या क्षेत्रातले सामर्थ्य किती होते ते त्यांच्या विशाल साहित्याचे वाचन केले की ध्यानी येते.

नेहरूंच्या पुढे पश्चिमी देश हा एक नमुना होता. इंग्लंडमधल्या तथाकथित उदारमतवादाचे आणि रशियातील तथाकथित यांत्रिक समतेचे नेहरूंना वैचारिक आकर्षण होते. 'समाजवाद' हा शब्द त्यांनी देशात रुजवण्याचा प्रयत्न केला. समाजवादी गांधीजींना खोदखोदून विचारायचे की, 'तुम्ही समाजवादी आहात का ते सांगा. तेव्हा गांधीजींनी उत्तर दिले, " हो, मीही समाजवादीच आहे, पण माझ्या समाजवादाचा प्रारंभ स्वतःपासून होतो. यस, आय टू मॅन ए सोशालिस्ट, बट माय सोशलिझम बिगिन्स युइथ द फर्स्ट कनव्हर्ट " दाव्याला कृतीचे तारण असते तेव्हा



एन ४३९४-१४

शब्दाचा प्रभाव पडतो, अन्यथा घोषणांचा गगनभेदी घोष होत असूनही त्या शब्दांनी कैफ चढतो, पण प्रत्यक्षात काहीच घडत नाही. गांधी व नेहरू यांच्या लिखाणाकडे पाहिले की ही गोष्ट ध्यानी येते. गांधीजींनी आपला निर्णय चूक की बरोबर, योग्य की अयोग्य याची एक मार्मिक कसोटी सांगितली आहे. ' समाजातील सर्वांत खालच्या पायरीवर असणाराचे ज्यात भले तो निर्णय योग्य समजावा ', असे ते म्हणत; आणि अंत्योदयाचे तत्त्व ते प्रतिपादन करत. जवाहरलाल सरासरी आकडेवारीवर संतुष्ट असत. त्यामुळे विषमता तितकी दाहक वाटत नाही.

आफ्रिकेत असताना रशियनचे ' अंटु धिस लास्ट ' हे पुस्तक गांधीजींनी रेल्वे प्रवासात वाचले आणि परतले ते पूर्णपणे बदलून ! सर्वोदयाचे सिद्धांत त्यातून त्यांना गवसले. (१) सर्वांच्या भल्यात आपले भले आहे. (२) उत्पादकाची जिंदगी हीच खरीखुरी जिंदगी होय. (३) उत्पादनाच्या कार्यात प्रत्येकाने सहभागी झाले पाहिजे आणि उत्पादनाचा मोबदला बाजारी उलाढालींवरून न ठरता समाजोपयोगी सर्व श्रमांचा मोबदला तुल्य असला पाहिजे, असे गांधीजी म्हणत.समाजवादाची भाषा करणारेही जीवन स्वीकारायला तयार नसतात. श्रमिकांचा कळवळा वाटून त्यांच्या संघटना उभारणे वेगळे; आणि श्रमिकाच्या जीवनाचा स्वीकार करणे वेगळे. गांधीजींच्या सत्याग्रही व्रतानुशासनात शरीरश्रम हे एक व्रत आहे. गांधीजींनी स्वतः भंगी काम केले व त्यातून सफाईचे एक शास्त्रच उभे राहिले. नेहरूंना सफाई कामगाराला योग्य ते वेतन दिले की संतोष वाटला असता.

गरीबांच्या जीवनाशी एकरूप होता यावे म्हणून गांधीजी सेवाग्रामच्या हरिजन वस्तीत झोपडी बांधून आनंदाने राहिले. नेहरू आधी आनंदभुवनात आणि नंतर दिल्लीतील राजप्रासादात राहिले. गांधीजी राजधानीत गेले तरी भंगी कॉलनीत राहात असत. राजधानीत गांधीजींची निर्घृण हत्या झाली आणि शासकीय सन्मानाने आणि लष्करी रणगाड्यावर त्यांचे शव नेऊन राजघाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. नेहरूंच्या देहावरही यमुनाकाठीच अंत्यसंस्कार करण्यात आले.

गांधीजींची ' प्रसाद दीक्षा ' एकेकाळी वादळ उठवून गेली. तर नेहरू आणि माउंटबॅटन (मुख्यतः एडविना) यांचे संबंध रहस्यमय असावे, असे लोकांना वाटत राहिले. गांधीजींना संतान संख्या मर्यादित करणे तत्त्वतः मान्य होते तर १९३८ साली संतानसंख्या मर्यादित करण्यासाठी सल्ला व साधने उपलब्ध करून द्यावी, असे अशासकीय विधेयक मुंबई त्याच मंडळात सादर करताना समर्थनार्थ अवतरणे देण्यात आली होती.

महात्मा गांधी जिवंत असेपर्यंत नेहरू सदैव त्यांच्या बाजूने राहिले. त्यांच्यांत मतभेद आहेत हे सर्वज्ञात होते, पण प्रधानमंत्रीपदाच्या सिंहासनावर आरूढ झाल्यानंतर गांधीविचार नेहरूंनी चाणाक्षपणे बाजूला सारले. देशाचा संरक्षणखर्च जागतिक शांततेचा पुरस्कार करणाऱ्या नेहरूंच्या कारकिर्दीत सतत वाढतच गेला.

गांधीजींचा विकास कठोर, आत्मतपस्येने त्यांना स्वतःलाच करून घ्यावा लागला, जवाहरलाल नेहरूंच्या विकासाचा पाया, त्यांच्या जागतिक इतिहासाच्या आकलनातून घातला गेला. मार्क्सने जी इतिहास मीमांसा केली आणि शास्त्रीय समाजवादाचा पाया घातला असा दावा केला त्याचा नेहरूंच्या मनावर प्रभाव होता, पण त्यांचा समाजवाद स्वप्नवतच होता. जयप्रकाशांनी सहकार्यासाठी जो मसुदा नेहरूंकडे पाठवला, तो जवाहरलाल नेहरूंनी मान्य केला नाही, गांधीजींना मात्र जयप्रकाश हे समाजवादाचे थोर भाष्यकार वाटत.

गांधीजींचा 'आतला आवाज' नेहरूंना अनाकालनीय आणि गूढ वाटे. गांधीजींना आश्रम, प्रार्थना या गोष्टी सार्वजनिक जीवनाचा तोल सांभाळण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या वाटत, तर नेहरूंना त्यामुळे लोकांच्या अंधश्रद्धा तर जोपासल्या जाणार नाहीत ना, अशी शंका येई. धर्माच्या नावाने कमजोर वर्गाचे होणारे शोषण आणि पोसली जाणारी विषमता नेहरूंना अस्वस्थ करी. परंतु गंगा, यमुना आणि अलाहाबाद यांचे त्यांना आकर्षणही वाटे.

गांधी काय किंवा जवाहरलाल काय, हे स्वतंत्रप्रज्ञ, तत्त्वचिंतक गणले जाणार नाहीत. दोघांचा भर कृतीवर अधिक होता. पण गांधीजींचे अवघे जीवन कृतीशील तत्त्वचिंतकाचे होते; तर नेहरूंची इच्छा कृतिशीलतेला तत्त्वचिंतनाचा ठोस पाया द्यावा, अशी असे. युगोस्लावियाचे बंडखोर तत्त्वचिंतक जिलास यांनी 'द न्यू क्लास' हे पुस्तक लिहून भांडवलदारी उत्पादनतंत्राचाच रशियाने वापर केल्याने, वेगळ्या नावाखाली वर्गाधारित समाजरचनाच रशियात अस्तित्वात आली; हे स्वच्छपणे दाखवले. पण नेहरूंनी देशाचा विकास करताना उत्पादनतंत्राचा सखोल विचार केला नाही. गांधी-कुमारप्पा यांनी उत्पादनतंत्र आणि समाजाची जडणघडण यांचा मूलगामी विचार केला होता.

खादी-ग्रामोद्योग ही तात्पुरती मलमपट्टी आहे असे नेहरूंना वाटे, पण गांधीजींना त्यामुळे निस्त्राण समाजात त्राण येईल असे वाटे. माणसाचे बौद्धिक आकलन आणि त्याच्या कर्मेंद्रियांत तुल्यता नसेल तर यंत्रे माणसाला खो देतील, असे गांधीजींना वाटे. नेहरूंना पश्चिमियनांचे आकर्षण होते. अहिंसा ही गांधीजींची मूलभूत श्रद्धा होती; तर नेहरूंना परिस्थितिजन्य धोरण या अर्थाने ती मान्य होती. शोषण ही सर्वात क्रूर हिंसा असून शस्त्रास्त्रांची हिंसा ही त्यामानाने सौम्यच म्हणावी लागेल, असे नेहरूंना वाटे. देशाच्या संरक्षणाशी इथल्या उत्पादनतंत्राचा मूलभूत संबंध आहे, असे नेहरूंना वाटत असे. अहिंसेच्या मर्यादा ते सतत पुढे मांडत असत.

गांधीजींबद्दल जवाहरलाल भावविवश होऊन बोलत आणि लिहित. पण गांधी कठोर चिकित्सा करतानाही ते कचरत नसत. गांधीजींबद्दलचे नेहरूंचे आकलन वैशिष्ट्यपूर्ण होते.

बिहारमधील भूकंपाच्या संदर्भातील गांधीजींचे वक्तव्य नेहरूंना पटले नाही. अस्पृश्यतेच्या पापाचा तो परिणाम आहे, असे जाहीरपणे गांधीजी म्हणाले होते. जवाहरलाल नेहरूंना त्याच्या शास्त्रीय कारणांचा उलगडा लोकांसमोर करावा असे वाटत होते. भूकंपग्रस्तांची कणव दोघांना सारखीच होती आणि त्यांच्या पुनर्वसनावर दोघांचा सारखाच भर होता.

नेहरू दुसऱ्या महायुद्धाच्या संदर्भात जागतिक दृष्टीने विचार करत होते. भारतीय स्वातंत्र्यापेक्षा लोकशाही व समतावादी शक्तींचा विजय त्यांना महत्त्वाचा वाटत होता. लोकशाहीच्या कैवाराची भाषा बोलणारांनी भारताला स्वातंत्र्य देऊन आपल्या शब्दांची खात्री पटवावी, असे दोघांचेही मत होते. ब्रिटिशांचे भारतात सत्तास्थानी राहाणे हे जपानला पुरेसे मोहात पाडणारे आहे, असे दोघांचेही मत होते. अखेरी 'ब्रिटिशांनो, भारत सोडा' असे सांगून स्वातंत्र्ययुद्धाचे अखेरचे पाऊल टाकण्याचा ठराव मुंबईत काँग्रेसने केला. गांधीजींना आणि काँग्रेस कार्यकारिणीच्या सभासदांना वेगवेगळ्या अज्ञात स्थळी स्थानबद्ध करण्यात आले. तुरुंगात जवाहरलाल नेहरूंनी 'भारताचा शोध' घेतला. गांधीजींचेही अध्ययन चालूच होते.

दोस्तांना निर्णायक विजय; अण्वस्त्रांचा जपानवर मारा केल्यावर मिळाला. अण्वस्त्रांमुळे जीवित वित्ताची जी अपरिमित हानी झाली ती स्तिमित व व्यथित करणारी आणि इशारा देणारी होती. त्याचा परिणाम गांधी आणि नेहरू दोघांवरही झाला. आगस्ट क्रांतीचे आवाहन करताना गाधीजींनी असे सांगितले होते की, भारतीय स्वातंत्र्य ही जगातील गुलाम देशांच्या स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे. नेहरूनाही ही भविष्यवाणी मान्यच होती.



एन ४३९४-१४अ

युद्धोत्तर भारतीय स्वातंत्र्याच्या वाटाघाटी सुरू झाल्या. बॅ. जीनांशी गांधीजी आणि नेहरूंनी वाटाघाटी केल्या. जीनांनी हटवादीपणाने देशाची फाळणी मागितली. देश विखंडित होण्याआधी माझ्या देहाची खांडोळी पाहावी लागतील, अशी निर्वाणीची भाषा गांधीजींनी वापरली. भारतीय संघराज्यातील मुस्लिम बहुसंख्येच्या प्रांतांना स्वायत्तता द्यावी लागणार, याची जाणीव ठेवून देशाची फाळणी पत्करून रक्तपात थांबवावा असे नेहरूंना वाटले. ज्या तत्त्वाच्या आधारे जीनांनी देशाचे विभाजन मागितले; त्याच आधारावर पंजाब आणि बंगाल यांचीही तौलनिक संख्या प्रदेशातील बहुसंख्येच्या आधारावर फाळणी जीनांना मान्य करावी लागली. पूर्व-पश्चिम पाकिस्तानला जोडणारा पट्टा जीनांना हवा होता, तो त्यांना नाकारण्यात आला आणि तुटके पाकिस्तान त्यांना पत्करावे लागले. गांधी जीनांच्या हाती देशाची बागडोर सोपवण्याला तयार होते. नेहरूंनी व्यावहारिक शहाणपण दाखवून सत्तेचा स्वीकार केला. माउंटबॅटन यांच्या मुत्सद्दिगिरीला नेहरू वश झाले. गांधीजी मात्र नौखालीतील जातीय अत्याचार पीडितांचे कैवारी बनून नौखालीत गेले. माउंटबॅटन यांनी गांधींचा त्याबद्दल 'एका व्यक्तीचे सीमा सुरक्षा दल' या शब्दांत गौरव केला.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. दिल्लीत लाल किल्ल्यावर प्रधान मंत्री नेहरूंच्या हस्ते तिरंगा फडकला. गांधीजींनी त्या दिवशी उपवास व प्रार्थना केली. बंगालमध्ये पत्रकारांनी त्यांच्याजवळ संदेश मागितला तेव्हा गांधीजी म्हणाले, 'संदेश, प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरूंकडून मागा. आता देशाच्या भवितव्याचे तेच प्रमुख शिल्पकार आहेत.'

भारतातील जातीय दंगलींचा उपशम व्हावा म्हणून गांधीजी राजधानी दिल्लीला आले. देशात शांतता निर्माण झाल्यानंतर पाकिस्तानमध्ये जाण्याचा त्यांचा मनसुबा होता.

गांधीजींचे दिल्लीतील वास्तव्य आणि हिंदू जातीयवाद्यांचा गांधी विरोधी पाताळयंत्रीपणा, हा नेहरूंच्या चिंतेचा विषय होता. गांधीजी निर्भयपणे, स्वेच्छेने दिल्लीत वावरत होते. नेत्यांशी विचारविनियम करीत होते. नेहरूंना त्यांच्या सुरक्षिततेची चिंता लागून राहिली होती.

स्वातंत्र्याची सर्वपक्षीय आघाडी असणाऱ्या काँग्रेसचे लोकसेवक संघात रूपांतर करावे व विविध ध्येयवाद बाळगणारांनी आपापले स्वतंत्र लोकशाही पक्ष निर्माण करून, निकोप लोकशाही राजकारणाची आखणी करावी, असे गांधीजींना वाटत होते; तर नेहरूंना आपल्या हाती असलेले हुकमी हत्यार अशा प्रकारे निष्प्रभ होणे मान्य नव्हते.

समाजवादाची भाषा बोलणाऱ्या नेहरूंच्या पहिल्या मंत्रिमंडळात, ज्यांना चुकूनसुद्धा कोणी समाजवादी म्हणणार नाही अशांचा समावेश झाल्याचे अनेकांना आश्चर्य वाटले ! जयप्रकाश-लोहिया, नरेंद्र देव, अच्युत पटवर्धन प्रभृतींचा अंतर्भाव असल्याने अनेक जण व्यथित झाले. तेव्हा नेहरूंचे एक निकटवर्तीय मित्र म्हणाले की, सत्तेच्या काही अपरिहार्यता असतात आणि नेहरूंनाही त्या ध्यानी घेण्यावाचून गत्यंतर नव्हते. त्यांच्या मंत्रिमंडळातील असमाजवादी हे नेहरूंच्या राजीखुशीमुळे आपल्या जागी होते. याउलट समाजवादी नेते हे त्यांचे विकल्प असल्याने त्यांना जवळ करणे त्यांना परवडण्यासारखे नव्हते.

गांधीजींनी आपल्या मुलांपैकी कोणालाच वंशपरंपरेने आपला वारस ठरवले नाही. लोकशाही समाजवादाची भाषा बोलणाऱ्या नेहरूंना मात्र, आपली कन्या ही आपली राजकीय वारस व्हावी असे वाटत होते आणि तसा त्यांचा प्रयत्न असावा अशी शंका घ्यायला जागा आहे.

गांधीजींनी आपल्या आत्मकथेला 'माय एक्सपेरिमेंटस् वुईथ टुथ' 'माझे सत्याशी केलेले प्रयोग' हे नाव दिले. आत्मकथेच्या प्रस्तावनेवरूनही त्यांची वैज्ञानिकवृत्ती दिसून येते. सखोल

वैज्ञानिक जाणिवेचे, हे नाव द्योतक आहे. नेहरूंना वैज्ञानिक वृत्तीपेक्षाही आधुनिक उत्पादन विकसित करणारे विज्ञान व तंत्रज्ञान प्यारे होते. त्यांनी परराष्ट्र आणि विज्ञान तंत्रज्ञान खाते ठेवले होते. देशात खर्चिक विज्ञान संशोधन मंदिरांची मालिका त्यांनी उभारली. वैज्ञानिक व तंत्र वैज्ञानिकांचा एक सुखसुविधाभोगी नवा नोकरशाही वर्ग नेहरूंनी उभा केला.

स्वातंत्र्यानंतर दोन महत्त्वाच्या गोष्टी नेहरूंनी केल्या. भारताचे लोकशाही संविधान तयार केले आणि योजना आयोगाची स्थापना केली. नेहरूंची ध्येयासक्ती निखालस होती. पण त्यांच्या मागून आलेले लोक सुखसुविधासक्त होते.

जवाहरलाल नेहरू हे गांधीजींचे राजकीय वारस आणि आचार्य विनोबा हे आध्यात्मिक वारस समजले जात. ह्या वारसांमध्ये उत्कट आपलेपणा होता आणि दोघे परस्परांबद्दल गौरवोद्‌गारच काढत. विनोबांना जवाहरलाल नेहरू हे जनकसदृश निरीच्छ राज्यकर्ते वाटत, तर नेहरूंना विनोबा हे समाजकल्याणाचे रखवालदार वाटत.

गांधी आणि नेहरू या देशाचे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भाग्यविधाते होते. त्यांची काही धोरणे परस्पर पूरक होती तर काही धोरणे परस्परांना विकल्प ठरणारी होती. त्यांच्यातले संबंध गूढ होते, असेच म्हणावे लागेल. चिकित्सा करतानाही ते कचरत नसत. गांधीजींबद्दलचे नेहरूंचे आकलन वैशिष्ट्यपूर्ण होते.

□□□

# पंडित नेहरू आणि मुस्लिम अल्पसंख्याक

□ प्रा. फ. ह. बेन्नूर, सोलापूर.

भारतीय राजकारणात किंवा एकूण भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात पं. नेहरूच एक असे असामान्य नेते होते की, ज्यांनी भारतातील विविध जाती-जमातीचा विचार धार्मिक किंवा जातीय दृष्टीकोनातून केला नाही. इंग्लंडमधील हॅरो, केंब्रिज आणि लंडन येथील ब्रिटिश उदारमतवादाचा प्रभाव, युरोपियन " रेनासान्स " आणि फ्रेंच राज्यक्रांतीमधून उदयास आलेला बुद्धीवाद, ब्रिटीश फॅबियन समाजवादाचा, मार्क्सवादाचा आणि रशियन राज्यक्रांतीचा प्रभाव अशा अनेकविध प्रभावांनी त्यांचे व्यक्तिमत्व व विचारविश्व घडविले होते, म्हणूनच पं. नेहरू हे सर्व भारतीय नेत्यांपेक्षा वेगळे दिसतात, म्हणूनच " डिस्कव्हरी ऑफ इंडिया " मध्ये पं. नेहरूंनी अगदी सहजगत्या लिहिले आहे की, " हिंदू धर्म, इस्लाम, बौद्ध धर्म किंवा ख्रिश्चन धर्म यापैकी कोणताही धर्म असो, त्याचे पालन करणारी सामान्य माणसे किंवा विचारवंतही असोत, त्यांच्याकडून ज्या पद्धतीने धर्माचरण केले जाते, ते पाहूनच माझा अपेक्षा भंग होतो. पोथीनिष्ठ अंधश्रद्धा आणि कर्मठपणा आणि जीवनविषयक अवैज्ञानिक दृष्टीकोन हीच धर्माची वैशिष्ट्ये बनलेली आहेत. आणखी एका ठिकाणी पं. नेहरूंनी स्पष्टपणे जाहीर केले होते की, " पारलौकिक जगाच्या कल्पनेत मला काही अर्थ वाटत नाही. याच पृथ्वीवरल्या जीवनाच्या विचारांनी माझे सर्व विचारविश्व व्यापून टाकले आहे." त्यांच्या धर्मविषयक आणि मानवतावादी विचारांनी, त्यांचे सामाजिक तत्त्वज्ञान घडविले होते. किंबहुना, पंडित नेहरूच सर्व स्वातंत्र्य आंदोलनातील असे एकमेव नेते आढळून येतात की, ज्यांनी भारतीय माणसाकडे धर्माच्या चष्म्यातून पाहिले नाही, किंबहुना धर्मसंघर्ष आणि जमातवादाची समस्या ही धार्मिक, अध्यात्मिक नसून राजकीय स्वरूपाची आहे, धर्माचे राजकीयीकरण करून जमातवाद पसरविण्यात भारतातील हिंदू-मुसलमानांच्या वरिष्ठवर्गीय आणि बूर्झ्वा वर्गाचे हितसंबंध गुंतलेले आहेत, अशी स्पष्ट आणि जाहीर मांडणी करणारे, पं. नेहरू हे काँग्रेसमधील एकमेव नेते होते.

पं. नेहरूंचे प्रतिपादन होते की, भारतात निर्माण झालेला जमातवाद आणि सांप्रदायिकता ही ब्रिटिश काळाची देणगी असून प्राचीन किंवा मध्ययुगीन भारतीय इतिहासातून झालेली ती निर्मिती नाही. स्वातंत्र्यानंतरदेखील पं. नेहरूंनी हेच प्रतिपादन केले होते की, जमातवादी आणि सांप्रदायिक संघटनांच्या पाठीमागे समाजातील प्रतिगामी घटकांची शक्ती आहे. त्यांनी स्पष्टपणाने म्हटले होते की, राजकीय सत्तेपासून वंचित झालेले जुने सत्ताधारी वर्ग, मोठमोठे नबाब, जहागिरदार, जमीनदार, भांडवलदार हे जमातवादी संघटनांचे आणि जमातवादाचे समर्थन करतात. हिंदू राष्ट्र, शीख राष्ट्र यांच्या गोष्टी करतात. म्हणजे पं. नेहरूंनी धर्मवाद आणि जमातवाद यांचे स्वरूप राजकीय-आर्थिक हितसंबंधाचे मानले होते, तसेच मानवतावाद आणि व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार

करणाऱ्या नेहरूंना धर्माचे सर्वंकष स्वरूप मान्य होणे, कदापी शक्य नव्हते, म्हणूनच नेहरूंनी धर्माला हुकुमशाही प्रवृत्तीचे मूळ मानले आणि धर्म म्हणजे शोषितांची पिळवणूक करण्याचे प्रमुख साधन होय, असे म्हटले. विज्ञाननिष्ठ मानवतेचा पुरस्कार करणाऱ्या नेहरूंना, धर्म हा अंधश्रद्धेचा शास्त्रीय प्रकार वाटत होता. परिणामी नेहरूंचा व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टीकोन देखील पूर्णपणे वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक होता. म्हणूनच त्यांनी व्यक्तीकडे केवळ माणूस म्हणून पाहिले, धर्माचा घटक म्हणून पाहिले नाही, व्यक्तीकडे, समाजातील वगेवेगळ्या वर्गाचे प्रतिनिधी म्हणून पाहिले. म्हणूनच पं. नेहरूंचा अल्पसंख्यांक जाती-जमातीकडे पाहण्याचा दृष्टीकोन धर्माच्या कसोटीत नव्हता. १९३७ मध्ये जिना आणि मुस्लीम लीगला शह देण्यासाठी पं. नेहरूंनी काँग्रेसला मुस्लीम जनसमुदायापाशी संपर्क साधण्याची धडक मोहीम हाती घेतली होती, कारण पं. नेहरूंचा सिद्धांतच होता की, जमातवादाची समस्या ही सर्वसामान्य जनतेची नसून तो एक दुय्यम प्रश्न आहे आणि जनतेसमोर आर्थिक कार्यक्रम ठेवून आणि राजकीय कृतीचे आवाहन करून त्यांना राष्ट्रहिताकडे आकर्षित केले जाऊ शकते; यावरून पं. नेहरूंचा व्यक्ती आणि समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्पष्ट होतो. पंडितजींच्या अल्पसंख्याक जाती-जमातीसंबंधीच्या भूमिकेची चर्चा करीत असताना, त्यांचा धर्म आणि व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टीकोन लक्षात घेतल्याशिवाय; त्यांच्या विचारांचे योग्य मूल्यमापन करणे शक्य होणार नाही.

एकट्या नेहरूंचा अपवाद सोडल्यास, काँग्रेसचा हा विचार फार मोठ्या प्रमाणावर ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी दृष्टीकोनामुळे प्रभावित झालेला होता. उदाहरणार्थ, काँग्रेसने ब्रिटिश सत्ताधाऱ्यांप्रमाणेच गृहीत धरले होते की, अल्पसंख्य जमाती या एकजिनसी (होमोजिनियस) असून भारतीय समाज म्हणजे विविध धार्मिक जमातींची एक उतरंड आहे आणि जमातीच्या व्यक्तिमत्त्वाची कसोटी ही धर्मावरून ठरत असते. नेमकी हीच गोष्ट पं. नेहरूंना मान्य नव्हती, म्हणूनच पं. नेहरूंनी इतिहासाची देखील मांडणी करीत असताना, इतिहासाचा जमातवादी दृष्टीकोन स्वीकारला नाही ; हिंदू कालखंड, मुसलमानी कालखंड अशी इतिहासाची विभागणी त्यांनी कधीच मान्य केली नाही.

जमातवादी विचार आणि संघटनांची मांडणी करीत असताना नेहरूंनी अल्पसंख्याकांचा जमातवाद यात फरक केलेला दिसून येतो. मुस्लीम अल्पसंख्याकाबद्दल त्यांचे प्रतिपादन होते की, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपणामुळे त्यांच्यात असुरक्षिततेची आणि भयगंडाची भावना निर्माण झाल्यामुळे त्यांचा जमातवाद उदयास आला आहे. म्हणून त्यांच्यांत विश्वास निर्माण करून व त्यांना सुरक्षितता देऊन त्यांना भारतीय समाजाची एकरूप करता येणे शक्य आहे. याच भूमिकेतून त्यांनी अल्पसंख्याकांकडे पाहिल्याचे दिसून येते. १९३० मध्येच त्यांनी म्हटले होते की, " अल्पसंख्याकांचे समाधान करून त्यांची मने जिंकल्याखेरीज आमचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यापैकी काहींना बहुसंख्याकांची भीती वाटत असते, म्हणून आपल्या स्वातंत्र्य-चळवळीपासून ते दूर राहतात." हे त्यांचे प्रतिपादन मुस्लीमांसंबंधीच होते. त्यांनी पुढे म्हटले होते की, " नवोदित सोव्हिएट रशियामध्ये वेगवेगळ्या अल्पसंख्याकांना सांस्कृतिक, शैक्षणिक आणि भाषिक स्वातंत्र्य देऊन मोठ्या प्रमाणावर त्यांचे प्रश्न सोडविण्यात आलेले आहेत, म्हणून भारतात देखील आपण अशा प्रकारची स्वातंत्र्ये देऊन अल्पसंख्याकांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. " आपल्या मृत्यूपर्यंत पंडितजींनी अल्पसंख्याकांकडे याच भूमिकेतून पाहिले.

पंडितजींची जमातवादासंबंधीची जाणीव ही एक प्रकारे आदर्शवादाची असली तरी मूलभूत महत्वाची होती. " अल्पसंख्यांकांचे समाधान करून त्यांची मने जिंकल्याखेरीज आमचे प्रश्न सुटणार

नाहीत." हे त्यांचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीच्या उभारणीसाठी जसे महत्त्वाचे होते; तसेच स्वातंत्र्योत्तर भारतातील राष्ट्रबांधणीच्या दृष्टीनेही महत्त्वाचे होते. भारतीय इतिहासाच्या सांप्रतच्या टप्प्यावर जिथे राष्ट्रीय अस्मितेच्या नावाखाली बाबरी मशिदीचा वाद निर्माण करून, एकांगी धर्मवाद उभा करून, अल्पसंख्याक मुस्लिम समाजाच्या तथाकथित राष्ट्रद्रोहीपणाचे बुजगावणे निर्माण करून, असहिष्णु फॅसिस्ट तत्त्वज्ञान उभे राहू पाहत आहे. तिथे पंडितजींची ही भूमिका अतिशय महत्त्वाची ठरते. अल्पसंख्याकांच्या दमनांवर आणि मानहानीवर उभा राहू पाहणारा तथाकथित राष्ट्रवाद हा हिंदू जमातवादच आहे. पंडितजींनी हे नेमकेपणाने ओळखले होते. म्हणूनच ते अगदी सुरूवातीपासून धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा विचार मांडत होते. त्यांच्या या धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाला " सूडो-सेक्युलॅरिझम " म्हणून हिणवून उच्चवर्णीय फॅसिझम फोफावू पाहत आहे. पंडितजींचा सेक्युलॅरिझम हा मुस्लिमांचा अनुनय आहे. अशी प्रचाराची धमाल उडवूनच हिंदू जमातवाद फॅसिस्ट राज्याची निर्मिती करू पाहत आहेत.

परंतु पंडितजींचा मुस्लिमविषयक दृष्टीकोन हा अनुनयावादी होता का, हे तपासून पाहणे अतिशय महत्त्वाचे आहे.पंडितजींचा भारतातील लोकसमुदायाकडे पाहण्याचा दृष्टीकोनच हा धार्मिकतेच्या कसोटीवरून कधीच नव्हता, परंतु त्याचबरोबर अल्पसंख्याकांच्या सांस्कृतिक, भाषिक आणि धार्मिक स्वायत्ततेची जपणूक करणारा होता. पंडितजींनी मुस्लिमांची एकांगी बाजू कधीच घेतली नाही. सप्टेंबर १९२४ मध्ये मोहरमप्रसंगी मोरादाबाद आणि संबळ या गावी स्पष्टपणे मुसलमानांना जबाबदार धरले होते आणि दोन्ही जमाती एकमेकांवर खोटे व अतिरेकी स्वरूपाचे आरोप करीत असल्याची टीका केलेली होती, हे स्पष्ट होते की, पंडितजी प्रारंभापासूनच वस्तुनिष्ठ आणि निःपक्षपाती दृष्टीचे होते.

परंतु त्याचबरोबर राष्ट्रवादाच्या नावाखाली देशातील अल्पसंख्याकांवर बहुसंख्याकांचा धर्म, संस्कृती आणि विचार लादणे हे त्यांना मान्य नव्हते, कारण त्यांच्या इतिहासाच्या अवलोकनाने त्यांना ही व्यापक दृष्टी दिलेली होती. १५ मे १९३० मध्ये " यंग इंडिया " मध्ये लिहिलेल्या लेखात त्यांनी म्हटले होते की, युरोपातील अनेक देशांच्या आणि भारताच्या इतिहासावरून हे सिद्ध होते की, जर अल्पसंख्याकांवर बहुसंख्याकांची जीवनपद्धती लादण्याचा प्रयत्न केल्यास किंवा त्यांची दडपणूक करण्याचा प्रयत्न केल्यास, देशात शांतता राहू शकत नाही. अल्पसंख्याकांना धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक स्वातंत्र्य देऊन त्यांचा विकास साधण्याचे प्रयत्न झाले तरच त्यांच्या असंतोषाचे प्रश्न सुटू शकतील. ही भूमिका पंडितजींच्या राष्ट्रवादाचा आधार होता. एकांगी विचारप्रणालीच्या आधारे, मग ती धार्मिक असो किंवा साम्यवादासारखी राजकीय असो, राष्ट्र टिकवून ठेवता येत नाही. हे साम्यवादी राजवटीच्या विघटनाने सिद्ध झाले आहे. अल्पसंख्यांच्या दडपणुकीमधूनच सांप्रतचा युरोपातील वांशिक संघर्ष उफाळून आला आहे. पंडितजींनी ही भूमिका १९३० पासून स्वीकारली होती. त्यावरून त्यांचे इतिहासाचे आकलन किती द्रष्टेपणाचे होते, हे सिद्ध होते. पंडितजींच्या या भूमिकेला मुस्लिमांचा अनुनय म्हणणाऱ्यांना इतिहासाने दिलेली विघटनाची आणि यादवी युद्धाची जाणीव दिसलेली नाही, असे म्हणावे लागते.

१९३१ मध्ये, कॉंग्रेस ही हिंदूंची संघटना आहे, असा आरोप करून त्यावर एका मुस्लिमाने टीका केलेली होती. या आरोपाला पंडितजींनी दिलेले उत्तर हिंदुत्त्ववाद्यांचे हिटलरी तंत्र उघडे पाडणारे आहे. या आरोपाला उत्तर देताना पंडितजी म्हणतात की, ' कॉंग्रेसमध्ये हिंदू बहुसंख्य आहेत, कारण तेच देशात बहुसंख्य आहेत आणि मुस्लिमांनी सातत्याने स्वतःला कॉंग्रेसपासून

दूर ठेवले आहे, म्हणजे हिंदूंच्या बहुसंख्याक अस्तित्त्वाचे वास्तव पंडितजींनी सदैव लक्षात ठेवलेले होते, परंतु त्यांचे राजकारण धर्मवादाचे किंवा जमातवादाचे नसल्याने, ते हिंदूंना इतिहासाचे भान ठेवून राष्ट्रउभारणी करण्यास सांगत होते, म्हणजे मुस्लिमांसंबंधीची आपली भूमिका निश्चित करताना पंडितजींनी हिंदू-बहुसंख्याकत्त्वाचे भान स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच राखलेले होते, परंतु हिंदू बहुसंख्याकांनी अल्पसंख्याकाचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा आणि अल्पसंख्याकांचे अस्तित्त्व आणि अस्मिता जोपासण्याची जबाबदारी हिंदूंची आहे, ही पंडितजींची प्रमुख भूमिका होती.

पंडितजींच्या मुस्लिमांसंबंधीच्या आणि धर्मनिरपेक्षतेसंबंधीच्या भूमिकेवर केली जाणारी टीका हिटलरी पद्धतीची आहे, कारण पंडितजींनी हिंदू बहुसंख्याकांना कधीच दुय्यम लेखलेले नाही किंवा त्यांची उपेक्षा देखील केलेली नाही, उलट ब्रिटिशांनी भारतातील भाषिक, प्रादेशिक आणि सांस्कृतिक विविधता म्हणजे अलगता किंवा भारत हे सलग राष्ट्र नसल्याचा पुरावा आहे, अशी मांडणी करून, भारताचे तुकडे करण्यासाठी तात्त्विक अधिष्ठान तयार करण्याचे जे प्रयत्न चालविलेले होते, त्याला पंडितजींनीच समर्थक उत्तर दिले होते आणि त्यासाठी त्यांनी " विविधतेतील एकतेचा " पुरस्कार केला होता. भारताच्या विविधतेतील एकतेची मांडणी करताना भारतातील सर्व प्रकारच्या विविधतेला सामावून घेणारी भारतीय संस्कृतीची संकल्पना आणि बहुसंख्याकांच्या सहिष्णु परंपरेचे अधिष्ठान आग्रहाने मांडलेले होते. ही मांडणी त्यांच्या " डिस्कव्हरी ऑफ इंडिया " मधून स्पष्टपणाने व्यक्त होते. प्राचीन वेद आणि उपनिषदे यांचे, विचारांचे संचित, पंडितजींना महत्त्वाचे वाटत होते, हे त्यांना वेळोवेळी केलेल्या लिखाणात दिसते, तर मग पंडितजींचा राग कोणावर होता ? पंडितजी हे हिंदूवर नव्हे; तर हिंदू महासभेच्या आणि संघवाल्यांच्या तथाकथित हिंदुत्ववादांवर टीका करीत होते, अगदी स्वातंत्र्यपूर्व काळात १९३० च्या प्रारंभापासूनच ते हिंदूमहासभेचे प्रखर टीकाकार असल्याचे दिसते. बनारस विद्यापीठात पं. मालवीय यांच्या सभेतच त्यांनी हिंदू महासभेवर केलेल्या टीकेचा उल्लेख त्यांच्या आत्मचरित्रात सविस्तरपणे दिला आहे. तसेच हिंदू महासभेबद्दल लिहित असताना, ती प्रतिगामी संघटना असून त्यांची आर्यकुमार सभा ही युवक संघटना, भारतातून मुस्लिम आणि ख्रिश्चनांचे उच्चाटन करण्याचा उद्देश बाळगून आहे, अशी टीका केलेली होती. पं. नेहरूंचे प्रतिपादन होते की, हिंदू महासभा ही राष्ट्रवादाच्या नावाखाली आपला संकुचित आणि एकांगी जमातवाद लपविण्याचा प्रयत्न करीत होती. त्यांचे म्हणणे होते की, हिंदू महासभा ही हिंदू संस्थानिक आणि हिंदू जमीनदार यांचे हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करणारी जमातवादी संघटना आहे. इतकेच नव्हे; तर हिंदू महासभेचे काही जबाबदार सदस्य परकीय शासनाशी सहकार्य करीत असून हा सरळ सरळ भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा विश्वासघात आहे, असे त्यांचे मत होते. (नेहरू कलेक्टेड वर्क्स, भा. ६, पा. १५७)

म्हणजे पंडितजी हिंदू बहुसंख्याकांवर किंवा हिंदू धर्मावर टीका करत नव्हते, तर हिंदूंच्या नावाने हिंदू जमातवादाची मांडणी करणाऱ्या हिंदुत्त्ववादी संघटनांवर टीका करीत होते, ही भूमिका त्यांची स्वातंत्र्यपूर्वकाळातली होती आणि स्वातंत्र्यानंतरही होती, म्हणूनच खोटा आणि भडक प्रचार करून नेहरूवाद म्हणजे मुस्लिमांचा अनुनय आणि हिंदूंना दिली गेलेली दुय्यमतेची वागणूक असा भ्रम निर्माण केला जात आहे. पंडितजींना जर हिंदूंना दुय्यम लेखून मुस्लिमांचे लाड करावयाचे असते तर ब्रिटिश सरकारच्या " कॅबिनेट मिशन प्लॅन " च्या संदर्भात हिंदू आणि मुसलमान या दोन्ही जमातींना बरोबरीने (पॅरिटी) लेखण्याच्या ब्रिटिशांच्या आणि मुस्लिम लीगच्या प्रयत्नांना त्यांनी विरोधच केला नसता. गांधीजींच्या बरोबरीनेच पंडितजी हिंदू आणि मुसलमानांच्या पॅरिटीच्या

तत्त्वाच्या विरोधात होते. कॅबिनेट प्लॅन नाकारले जाण्याचे ते एक महत्त्वाचे कारण होते. याबाबतीत पं. नेहरूंवर मौ. आझादांप्रमाणेच अनेकांनी कडक टीका केली आहे. अलिकडच्या काळात सुप्रसिद्ध कायदेपंडित एच. एम. सिरवाई यांनीही पंडितजींवर ताशेरे ओढले आहेत. (लिजेंड ॲन्ड रिॲलिटी).

१९२० नंतरच्या काळात, हिंदुस्थानात हिंदू-मुस्लिमांच्या झालेल्या दंगलीमुळे पं. नेहरू हे जमातवादाच्या; जमातवादी संघटनांच्या आणि त्यांच्या धार्मिकतेच्या राजकारणांवर तुटून पडल्याचे दिसते. तेव्हापासूनच धर्माच्या नावावर जमातवादाचे राजकारण करणाऱ्या संघटनांना त्यांचा प्रखर विरोध सुरू झालेला दिसतो. ते केवळ हिंदू महासभेसारख्या हिंदुत्त्ववादी संघटनेला विरोध करून थांबलेले नाहीत, तर जीना आणि त्यांच्या मुस्लिम लीगशी कोणत्याही बाबतीत तडजोड करण्याचे नाकारले . मुस्लीम लीग ही मुस्लिमांचे प्रतिनिधित्त्व करणारी संघटना आहे, हे जीनांचे म्हणणे पं. नेहरूंनी संपूर्णपणाने नाकारलेले होते.

किंबहुना, कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून मुस्लिमांना आपल्या विचाराकडे वळविता येईल, असे नेहरूंना वाटत होते. १९४५ च्या प्रांतिक निवडणुकांत लीगला मोठा विजय मिळाला, परंतु पं. नेहरूंचे म्हणणे होते की, हा विजय कॉंग्रेसचे नेते सतत तुरूंगवासात असल्याने, कॉंग्रेसचा मुस्लिमांशी संपर्क तुटल्यामुळे झाला आहे. म्हणजे नेहरू हे हिंदू-मुस्लीम संबंधाकडे धार्मिक दृष्टीकोनातून पहातच नव्हते, हे स्पष्ट होते.

राजकारणात मुस्लिम लीगला महत्त्व का प्राप्त झाले, याची मीमांसा करीत असताना, नेहरूंनी मांडलेले विचार अतिशय महत्त्वाचे असून, त्यांतून त्यांचा मुस्लीम समाजाविषयींचा दृष्टीकोन व्यक्त होतो. तथाकथित " राष्ट्रीय मुस्लीम नेत्यांची " पीछेहाट होऊन मुस्लीम लीग का पसरली, याचे विवेचन करताना ते म्हणतात की, तथाकथित राष्ट्रवादी मुस्लिम नेते, हे उच्चमध्यम वर्गातील बुद्धीजीवी प्रकारातले असून त्यांच्यामध्ये प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे कोणी नाही, हे नेते मुस्लीम जनतेला प्राधान्य देण्याऐवजी जास्त विचार; आपापले व्यवसाय आणि उद्योगधंद्याचा करतात, त्यामुळे आणि ते सर्वसामान्य जनतेशी मिसळत नसल्यामुळे त्यांना लोकांवर प्रभावच टाकता आलेला नाही आणि भर म्हणून ही मंडळी दिवाणखान्यात बसून, आपल्या बैठका घेत असल्याने. मुस्लीम लीगच्या जमातवादी पुढाऱ्यांचे व पक्षाचे फावले. परिणामी तथाकथित राष्ट्रवादी मुस्लीम पुढाऱ्यांना जातीयवादांशी नको असलेल्या तडजोडी कराव्या लागल्या. परिणामी मुस्लिम जमातवाद फोफावला. (नेहरूंचे आत्मचरित्र पा. १३८-१३९) म्हणूनच नेहरू, मुस्लिमांचा एकमेव पक्ष म्हणून, लीगला मान्यता द्यायला तयार नव्हते. म्हणून त्यांना वाटत होते की, कॉंग्रेसने मोठ्या प्रमाणावर मुस्लिम जनसंपर्काची मोहीम हाताशी घेतली तर लीगच्या जमातवादी राजकारणाला शह देता येईल.

मुस्लिमांच्या संदर्भात विचार करीत असताना पंडितजींनी तथाकथित मुस्लिम संस्कृती आणि मुस्लीम राष्ट्रीयत्व याबद्दल मांडलेले विचार महत्त्वाचे आहेत. त्यांच्यामते, हिंदु राष्ट्र आणि मुस्लीम राष्ट्र अशी धर्माच्या आधाराने केलेली मांडणी तर्कदुष्ट आहे व राजकीयदृष्ट्या खुळेपणाची आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या मते, हिंदू संस्कृती आणि मुस्लीम संस्कृती ही मांडणी देखील अवास्तव आणि खुळेपणाची आहे. ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात की, तथाकथित राष्ट्रीय संस्कृतीचा कालखंड लुप्त होत असून, विज्ञानामुळे एका सामाईक जागतिक संस्कृतीचा उदय होऊ पहात आहे. (आत्मचरित्रं पा. ४६९-४७०) आणि तथाकथित मुस्लीम संस्कृती म्हणजे काय, हा प्रश्न आहे. ते पुढे म्हणतात की, मुस्लिमांवर प्रभाव टाकणाऱ्या अरबी आणि पर्शियन या दोन भाषांचा विचार केल्यास, असे दिसून येईल की, पर्शियन ही काही मुस्लिमांची धर्मभाषा नाही आणि पर्शियन

भाषेचा, संस्कृतीचा प्रभाव भारतावर इस्लामपूर्व काळापासूनच पडत आलेला आहे, ते पुढे म्हणतात, ' मुस्लीम संस्कृती म्हणून मुसलमानांच्या वेशभूषा वगैरे गोष्टी सांगितल्या जातात, ही वैशिष्ट्ये कशी तकलादू असून ग्रामीण भारतात सर्व जमातीत सारखेपणा कसा आहे, याचे चित्रण त्यांनी केले आहे.(आत्मचरित्र पा. ४७०-७१) पंडितजींचा जसा इतिहासाचा गाढा अभ्यास होता, त्याचप्रमाणे भारतातील सामाजिक व सांस्कृतिक वास्तवाचे आणि भारताच्या मिश्र संस्कृतीचे त्यांचे आकलन वस्तुनिष्ठ होते, म्हणूनच धर्म हा केवळ वेगळी उपासना पद्धती म्हणून घेऊन, हिंदू संस्कृती आणि मुस्लीम संस्कृती असा केला जाणारा भेद त्यांना मान्य नव्हता ही भूमिकाच त्यांच्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा आधार होता, त्याचा निवडणुकीच्या राजकारणांशी संबंध नव्हता, तर भारतातील जाती-जमातीमधील विविधता आणि स्वायत्तता जोपासून खऱ्या अर्थाने मिश्र संस्कृतीच्या आधारांवर, स्वतंत्र भारत घडविणारे तत्त्व होते.

पंडितजींच्या या सर्व विचारातून त्यांची व्यापक विश्वमानवतावादी प्रणाली स्पष्ट होते. एक गोष्ट खरी की, जीनांच्या व मुस्लीम लीगच्या आक्रमक व प्रक्षोभक राजकारणाचा अशिक्षित आणि अंधश्रद्ध मुस्लीम जनमानसांवर काय परिणाम होतो आहे, याची योग्य कल्पना त्यांना येऊ शकली नाही. धर्माच्या नावाने राजकीय सत्तेचे प्रलोभन समाजापुढे ठेवून सर्वसामान्य जनतेला बहकवण्याचे जे जमातवादाचे तंत्र असते, त्याचीच कल्पना त्यांना किंवा आदर्शाच्या व समन्वयाच्या पातळीवर विचार करणाऱ्या; अन्य कोणाही भारतीय नेत्याला आली नाही. एवढे मोठे फाळणीचे महाभारत झाल्यानंतर देखील पंडितजींचा हा दृष्टीकोन बदलला नाही. हिंदूंच्या अवास्तव भीतीचा बागुलबुवा उभा करूनच लीगने पाकिस्तान घडविले असल्याने, स्वातंत्र्यानंतरच्या काळात देखील पंडितजी, मुस्लिमांच्या मनात बहुसंख्याकांबद्दलची भीती दूर करण्याचाच प्रयत्न करीत राहिले आणि त्या जाणीवेनेच समान नागरी कायद्याची एकतर्फी अंमलबजावणी त्यांना मान्य झाली नाही. किंबहुना घटना समितीत व बाहेरही समान नागरी कायद्याला रा. स्व. संघ, श्रीशंकराचार्य यांचाही फार मोठा विरोध झालेला होता. फाळणीमुळे मुस्लिमांची अस्थिरतेची भावना जास्त गुंतागुंतीची झाली होती, म्हणून प्रबोधनाच्या मार्गाने समान नागरी कायद्याचा प्रश्न हाताळावा, अशी त्यांची भूमिका ही मुस्लिम अनुनयाची नव्हती, तर सर्व जातीजमातींच्या सामंजस्यावर नवभारत घडविण्याचा त्यांचा तो आदर्शवादी प्रयत्न होता. किंबहुना, घटना समितीमध्ये सामाजिक दृष्ट्या स्थितीवादी किंवा परंपरावादी सदस्यांचे वर्चस्व होते. मिनू मसानींसारख्या सभासदांनी " प्रस्थापित समाजव्यवस्था " नाकारली जाते म्हणून सामाजिक व आर्थिक न्यायाच्या विचारांनादेखील विरोध केल्याचे दिसते. (डॉ. आंबेडकर व भारताची राज्यघटना–प्रा. कसबे पा. ७१) घटनेच्या माध्यमातून भारताची अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था बदलण्याची बहुसंख्य सभासदांची तयारी नव्हती, या प्रक्रियेत हिंदू सदस्य आणि त्यांचे पुढारी यांचे वर्चस्व होते.

परंतु पंडितजींना बहुसंख्याकांचा; म्हणजे हिंदूचा जमातवाद जास्त धोकादायक व भयावह वाटत होता. कारण त्यांचे प्रतिपादन असे होते की, हिंदू आणि मुसलमानातील भेदभाव किंवा संघर्ष हा ईस्ट इंडिया कंपनीच्या काळापासून विकास प्रक्रियेत जो असमतोल निर्माण झाला, त्याचा परिपाक आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, ब्रिटिशांच्या धोरणामुळे ज्या वर्गीय घटकांचा फायदा झाला, ते हिंदू बहुसंख्याकांमधीलच होते, म्हणून हिंदूंच्या राष्ट्रीय जागृतीच्या जाणीवांवर हिंदुत्वाचा प्रभाव दिसून येत होता आणि ब्रिटिशांच्या ' फोडा ' आणि ' झोडा ' नीतीमुळे त्यांच्यात धर्मवादाचे राजकारण निर्माण झाल्याचे त्यांनी मानले. प्रगत आणि बहुसंख्याक हिंदूंनी प्रादेशिक राष्ट्रवादाचा

स्वीकार, जमातींना सर्व प्रकारची स्वातंत्र्ये देऊन त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घ्यावे; ही त्यांची भूमिका स्वातंत्र्यपूर्व काळापासून अगदी शेवटपर्यंत कायम राहिली. विशेष म्हणजे हिंदुमधील जमातवाद, त्यांनी हिंदूंमधील वरिष्ठ वर्गीय आणि बूर्झ्वा घटकांच्या राजकारणातून निर्माण झालेली प्रतिक्रिया असेच मानले. अगदी स्वातंत्र्यानंतर देखील हिंदू जमातवादाचा पुरस्कार करणाऱ्या रा. स्व. संघ, हिंदू महासभेसारख्या संघटना फॅसिस्ट आहेत, त्यांना वरिष्ठ वर्गीय हिंदूंचा फॅसिझम आणावयाचा आहे, अशीच भूमिका पंडितजींनी मांडली होती. मुख्यमंत्र्यांना वेळोवेळी लिहिलेल्या पत्रातून, त्यांनी रा. स्व. संघाच्या फॅसिस्ट प्रवृत्तीबद्दल वारंवार सूचना दिल्याच्या दिसून येतात. बहुसंख्याकांच्या जमातवादाला मोकळे सोडल्यास, भारताचा विनाश होईल, असे त्यांनी १९५१ मध्येच लिहून ठेवले होते. त्यांनी या संदर्भात स्पष्टपणे म्हटले होते की, बहुसंख्याकांच्या या जमातवादी संघटनांच्या, राष्ट्रीयत्त्व आणि देशभक्तीच्या घोषणांच्या आड त्यांचा जमातवादी आणि प्रतिगामी संहारक आक्रोश दडलेला आहे. उदारमतवादाच्या प्रभावामुळे पंडितजींनी मानले होते की, इंग्रजी शिक्षणामुळे आणि प्रबोधनाच्या चळवळीमुळे बहुसंख्याक हिंदू समाजातील प्रतिगामी प्रवृत्ती नष्ट झाली असून, केवळ वर्गीय हितसंबंधाचे राजकारण करणाऱ्या अभिजन घटकांपुरतेच मर्यादित आहे. म्हणून ज्या ज्या वेळी दंगली उसळल्या, त्यावेळी पंडितजींनी समजूतदारपणाची जबाबदारी हिंदू बहुसंख्याकांचीच असल्याचे मानले. ही त्यांची भूमिका मुस्लीमधार्जिणी आणि अनुनयवादी, असा सातत्याने नंतरच्या काळात गैरप्रचार करून; रा स्व. संघासारख्या हिंदुत्वाच्या नावाखाली वरिष्ठ वर्गीय वर्णीयांच्या मक्तेदारीचे राजकारण करणाऱ्या संघटना आणि विचारवंतांनी पंडितजींच्या धर्मनिरपेक्षतावाद आणि विज्ञाननिष्ठ मानवतावाद यांना शह देणारा हिंदू जमातवाद प्रसारित केला.

वास्तविक, खिलाफत चळवळीसारख्या धार्मिक चळवळीना पंडितजींनी दिलेला पाठिंबा एक तर गांधीजींच्या प्रभावामुळे होता; दुसरे म्हणजे राजकीयदृष्ट्या खिलाफतीची चळवळ ही ब्रिटिशविरोधी होती, म्हणून होता. परंतु एवढे मात्र खरे की, धार्मिक चळवळीच्या बाबतीत पंडितजींना कधी फारशी आत्मीयता वाटली नाही. स्वातंत्र्य चळवळीत अल्पसंख्याकांना सामावून घेण्यासाठी त्यांना सर्व प्रकारच्या संधी देऊन राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेण्याचा पंडितजींनी सतत प्रयत्न केलेला दिसून येतो. तसेच जमातवादाची प्रवृत्तीही राजकीय हितसंबंधीय गटांनी निर्माण केलेली कृत्रिम भावना आहे, ही भूमिका थोडीशी बदलून पंडितजींनी राष्ट्रवादाच्या आवरणाखाली असणारा हिंदूंचा जमातवाद ही भारतात उदयाला येऊ पाहणारी फॅसिस्ट प्रवृत्ती आहे, हा विचार मांडल्याचे दिसून येते.

पं. नेहरूंनी स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसचे एक प्रमुख नेते म्हणून आणि नंतर पंतप्रधान म्हणून अल्पसंख्याकांचा जो विचार केला आहे; तसा विचार दुसऱ्या कोणी नेत्याने केल्याचे दाखविणे कठीण जाईल. त्याबाबतीत पंडितजी गांधीजींपेक्षाही श्रेष्ठ ठरतात, कारण गांधीजींची मुस्लीम किंवा दलित अल्पसंख्याकांचा केलेला विचार हा धार्मिक-सांस्कृतिक मूल्यांच्या चौकटीतूनच केल्याचे दिसून येते. चातुर्वर्ण्याचे समर्थन करणारे गांधीजी, डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराचा विचार मांडण्यास सुरुवात केल्याबरोबर चातुर्वर्ण्यावर टीका करते झाल्याचे दिसते. गांधीजींच्या अस्पृश्यतेविरूद्धचे मत भूतदयेपोटी आणि राष्ट्रीय चळवळीत सामाजिक ऐक्याला तडा जाऊ नये, या विचारांनी घडविले गेल्याचे दिसते. याउलट, पं. नेहरू हे सर्व जाती-जमातींचा निखळ मानवतेच्या भूमिकेतूनच विचार करीत असल्याने, त्यांची भूमिकाच वेगळी झाली आहे. विशेषतः पंतप्रधान म्हणून नेहरूंनी

जो मुस्लीम अल्पसंख्याकांचा विचार केला ते केवळ शब्दातीत आहे. लालबहाद्दूर शास्त्रींना लिहिलेल्या (१९५७) पत्रातून त्यांचे मनोगत स्पष्ट होते. काँग्रेस पक्ष आणि शासन या दोघांचेही मुस्लिम प्रश्नासंबंधीचे अवधान सुटत चालले आहे, असे त्यांना वाटत होते. इतकेच नव्हे; तर काँग्रेसमधील मौ. आझाद व इतर मुस्लीम नेत्यांचा प्रभाव घटत चालला असून, काँग्रेसकडून निवडणुकीसाठी योग्य प्रकारचे मुस्लिम पुढारी निवडले जात नाहीत, आणि सर्वात गंभीर प्रकार म्हणजे मुस्लीम म्हणजे कोणीतरी परके घटक असून, केवळ निवडणुकांसाठी त्यांच्या मतांची गरज निर्माण झाल्यानंतर त्यांचा अनुनय करण्याची काँग्रेसमध्ये निर्माण झालेली प्रवृत्ती होय, असे नेहरूंनी शास्त्रीजींना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते. यावरून मतासाठी अल्पसंख्याकांचा विचार करण्याची प्रवृत्ती नेहरूंना मान्य नव्हती, असेच दिसून येते. मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रातून त्यांनी स्पष्टपणाने म्हटले होते की, अल्पसंख्याकांच्या गरजा व तक्रारी यांच्याकडे सतत लक्ष देणे आवश्यक असून खरी कसोटी "आम्हाला काय वाटते ही नसून त्यांना काय वाटते." ही आहे. त्यांनी स्पष्टपणे लिहिले होते की, भाषा व नोकऱ्यांच्या बाबतीत त्यांची तक्रार असता कामा नये, पंडितजींनी मुख्यमंत्र्यांना सरासरी नोकरभरतीचे तिमाही अहवाल त्यांच्याकडे पाठवण्याचे आदेश दिले होते. तसेच गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांचे लक्ष राज्यघटनेतून मान्यता दिलेल्या उर्दू भाषेची अवहेलना कशा प्रकारे केली जात आहे, याकडे वेधण्याचा प्रयत्न केला होता. उत्तर प्रदेशाच्या बहुमत असणाऱ्या विभागात उर्दूला प्रादेषिक भाषा म्हणून प्राधान्य दिले जावे, असे त्यांचे मत होते. ए.आय.सी.सी. मध्ये केलेल्या भाषणात त्यांनी म्हटले होते की, थोड्याशा चिथावणीने आमच्यात जमातवादाचा प्रादुर्भाव होत असतो; आणि आम्ही जातीयवाद विसरू शकत नसू आणि अन्य जमातीप्रती सहिष्णुवृत्ती दाखविता येत नसेल, तर जळो ते स्वराज्य! (हेल वुईथ स्वराज्य १२ मे १९५८) नेहरूंचे स्पष्ट मत होते की, उर्दू भाषेची जाणीवपूर्वक उपेक्षा केली जात असल्यास मुस्लिमांना असे वाटू लागले की, आपण केवळ नावालाच नागरिक आहोत." घटनात्मक हक्कांना नागरिक नाही. त्यांच्या मनात वैफल्याची भावना निर्माण होईल आणि अशा प्रकारची वैफल्याची भावना ख्रिश्चनासारख्या बाकीच्या अल्पसंख्य जमातीमध्ये पसरत जाऊन एकात्मतेला धोका निर्माण होईल. भारतापुढील सर्वात मोठी समस्या म्हणजे भारतातील विविध जमाती, समानतेच्या जाणीवेने सहकार्याने व शांततामय पद्धतीने कशा एकत्रित राहतील, ही आहे; असे नेहरूंना वाटत होते. आपल्या राष्ट्रात आपणास शांतता निर्माण करता येत नसेल. तर आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य या बाबतीत आपणास कसे बोलता येईल; असे त्यांना वाटत होते.

भारतात सर्वात मोठी धोकादायक गोष्ट म्हणजे प्रश्नाकडे जमातवादी दृष्टीने पाहण्याची प्रवृत्ती असून जमातवाद व राष्ट्रवाद परस्परविरोधी आहेत आणि जातीय दंगलीमुळे मुस्लिमांच्या मनात जुन्या भीती निर्माण होऊन त्यांच्या भवितव्याचा प्रश्न अनिश्चित होतील, असे पं. नेहरूंचे स्पष्ट म्हणणे होते. नेहरूंच्या मते, जातीय सलोख्याची मुख्य जबाबदारी बहुसंख्याक असलेल्या हिंदूचीच असून मुस्लिम अल्पसंख्याकांची समस्या, ही मुस्लिमांपेक्षा हिंदूंची समस्या होती. मुसलमानांचे आक्रमक वर्तन हे त्यांच्या अनिश्चित भवितव्याच्या अस्थिर भावनेपोटी व न्यूनगंडापोटी निर्माण होत असते, असे त्यांचे मत होते. १९६१ मध्ये मध्य प्रदेशात हिंदू-मुस्लिमांच्या भयानक दंगली झाल्या. त्यासंबंधी काँग्रेस पक्षासमोर बोलताना पं. नेहरूंनी म्हटले होते की, 'आपण भारतीय माणसे आहोत हे विसरून अविचाराने व पाशवी प्रवृत्तीने वागतात, हेच मुळी भयानक आहे.' त्यावेळी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या तारेमधून त्यांनी होळी उत्सवाच्या प्रसंगी शासनाने योग्य काळजी

न घेतल्याने दंगली उसळल्या असे सांगून, शासनाला दंगेखोराविरुद्ध खंबीर कृती करण्याचे आदेश दिले होते. जबलपूरमधील दंगली नियोजित होत्या, असे त्यांचे मत होते. पोलिसांच्या पक्षपाती प्रवृत्तीमुळे मुस्लिम हे भयग्रस्त झालेले असून पोलिसात जमातवाद प्रचंड वाढला असल्याचे आणि ही गोष्ट धार्मिक प्रतिगामी प्रवृत्तीची निदर्शक असल्याचे त्यांचे प्रतिपादन विलक्षण बोलके व प्रत्ययकारी आहे.

पंडितजींचे शीख अल्पसंख्याकांबाबतचे धोरण व विचार देखील मोठ्या प्रमाणात वरील प्रमाणेच होते. स्वातंत्र्यानंतर पंडितजींनी शीखांच्या " पंजाबी सुब्याची " मागणी चुकीची मानून पंजाबी सुब्याऐवजी " प्रादेशिक स्वायत्ततेच्या तत्त्वावर " आधारित राज्य देण्यापर्यंतच सवलती शाखांना दिल्या. पंजाबी बोलणाऱ्यांचे वेगळे राज्य, गुरूमुखी भाषेला अधिकृत राज्याची भाषा म्हणून मान्यता दिली जावी, ही मागणी पंडितजींना " जमातवादी " वाटत होती, म्हणून त्यांनी मान्य न केल्याचे दिसते, कारण धर्म, भाषा, संस्कृती व लिपी यांच्या आधारे राज्य मागणी त्यांच्या दृष्टीने प्रतिगामीपणाचे होते व पाकिस्तानच्या निर्मितीच्या अनुभवानंतर पुन्हा तशा प्रकारच्या मागण्यांना त्यांची मान्यता मिळणे कदापि शक्य नव्हते. मग पंडितजींनी स्वातंत्र्यानंतर देखील उर्दू भाषेबद्दल वर दर्शविल्याप्रमाणे सहानुभूतीची व हिंदुत्ववाद्यांच्या दृष्टीने अनुनयवादी भूमिका का घेतली होती ? याचे उत्तर शोधण्यासाठी त्यांच्या " डिस्कव्हरी " चे वाचन करावे लागते.

त्यांनी इतिहासासंबंधी केलेल्या व आत्मचरित्रातील लिखाणातून आणि त्यांच्या भाषणसंग्रहातून त्याबद्दल त्यांचे विचार उलगडत जातात. पंडितजींनी उर्दू भाषेला केवळ मुसलमानांची धर्मभाषा कधीच मानले नाही, उर्दू ही धर्मभाषा नसून ती उत्तर भारतात बोलली जाणारी प्रादेशिक भाषा आहे, तिच्यावर सर्वच जमातींचा हक्क आहे, असे पंडितजींचे मत होते. ' गुरूमुखी ' ही शीखांची धर्मभाषा असल्याने धर्म आणि धर्मभाषेवर आधारित राज्य देण्याला त्यांचा विरोध दिसून येतो. धर्मावर आधारित पाकिस्तानचे राज्य निर्माण झाल्यानंतर पाकिस्तानात न जाता, भारतात राहिलेल्या मुसलमानांप्रती आपले विशेष कर्तव्य आहे, अशी त्यांची धारणा दिसून येते. पाकिस्तानात न जाता, इथे राहिलेल्या मुसलमानांनी त्यांना कळत नकळत प्रादेशिक राष्ट्रवादाचा स्वीकार केल्याने, त्यांचे धार्मिक व सांस्कृतिक अस्मिता व अस्तित्व टिकविण्यासाठी उर्दूला उत्तेजन देणे किंवा व्यक्तिगत कायद्याची हमी देणे, हे प्रकार पंडितजींनी केले. किंबहुना सर्व अल्पसंख्याकांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेण्यासाठी त्यांची भाषिक, धार्मिक सांस्कृतिक " आयडेंटिटी " टिकवून त्यांना प्रादेशिकतेच्या तत्त्वावर एकजिनसी करण्याचा त्यांचा सिद्धांत होता. शीख तर धर्माच्या आधारे पुन्हा वेगळे राज्य मागत होते, म्हणूनच पंडितजींचे त्यांच्याबद्दलचे धोरण वेगळ्या स्वरूपाचे झाले.

दलित, म्हणजे हरिजन अल्पसंख्याकांबद्दलचे पंडितजींचे धोरण देखील वैशिष्ट्यपूर्ण होते. मुळातच काँग्रेसमध्ये वरिष्ठ आणि मध्यमवर्गीय आणि वर्णीय हितसंबंधीय समूहांचे वर्चस्व होते. या घटकांनी हरिजन आणि आदिवासी हे हिंदू समाजाचा एक भाग मानले होते. किंबहुना गांधीजी आणि त्यांच्या प्रभावाखाली असणाऱ्या काँग्रेसमधील वरिष्ठ नेतृत्त्वाने जातीव्यवस्था नष्ट न करता, अस्पृश्यता हटविण्याचेच सिद्धांत मांडलेले दिसून येतात. किंबहुना काँग्रेसच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांत अस्पृश्यता निर्मूलनासंबंधी विशेष आस्था कधीच आढळून आली नाही. पंडितजींचे वैशिष्ट्ये हे होते की, त्यांनी भारतातील सर्व जमातींचा विचार " धर्मा "च्या कसोटीतून न केल्याने दलितांचा केवळ मागासलेले घटक म्हणूनच विचार केल्याचे दिसते. काँग्रेसमधील सर्वसामान्य कार्यकर्ते गांधीजींप्रमाणे अस्पृश्यता विरोधी आहेत, हे त्यांनी गृहीत धरले, तसे एकदा राजकीय सत्ता हातात आली की, सुधारणा व कायदे करून अस्पृश्यता नष्ट करता येईल, एवढीच त्यांची

भूमिका दिसून येते. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत हक्क यांच्या माध्यमातून दलितांचा विकास साधून, त्यांना हक्क व स्वातंत्र्ये देऊन आणि त्यांच्या कल्याणाच्या योजना आखून त्यांचा मागासलेपणा घालविता येईल; असेच पंडितजींचे धोरण दिसून येते. परंतु पंडितजींनी जातीव्यवस्था धर्मनिरपेक्ष लोकशाहीला मारक आहे, असे म्हटलेले असले तरी, जातीव्यवस्था नेमकी नष्ट कशी करता येईल, यासंबंधी निश्चित विचार किंवा योजना मांडलेल्या नाहीत. अस्पृश्यतेसंबंधी राज्यघटना व कायदेविषयक तरतुदी व विकासाच्या योजना व राखीव जागांचे धोरण या पलीकडे पंडिजींना जाता आले नाही. किंबहुना समाजाचा आर्थिक-भौतिक विकास झाला की, जातीवादाचे, जमातवादाचे आणि अस्पृश्यतेचे प्रश्न सुटतील; हाच त्यांचा विचारांचा केंद्रबिंदू दिसून येतो. समतेसाठी, सामाजिक न्यायासाठी जमीन व संपत्तीचे राष्ट्रीयीकरण करावे लागेल, असे त्यांनी घटना समितीत डॉ. आंबेडकरांसमोर म्हटले तरी, प्रत्यक्षात घटना समितीने त्यांना जमिनीचे राष्ट्रीयीकरण करू दिले नाही. घटना समितीमधील आणि काँग्रेसमधील प्रतिगामी उजव्या गटांच्या वर्चस्वासमोर नेहरूंचे काही चालले नाही, असेच दिसून येते. धर्मनिरपेक्षता, समाजवाद, अस्पृश्यता या सर्व बाबतीत प्रतिगामी घटकांनी नेहरूंवर मात केल्याचे दिसते.

जमातवादी पक्ष, संघटना आणि जातीयवाद हा धर्मामुळे नसून हितसंबंधीय गटांनी राजकीय स्वार्थासाठी निर्माण केलेले कृत्रिम वातावरण आहे, नेहरूंची अशी भूमिका स्वातंत्र्यपूर्वकाळापासूनच तयार झालेली होती. वेगवेगळ्या जमातीकडे पाहण्याच्या आपल्या विशिष्ट भूमिकेमुळेच नेहरूंनी असे म्हटले होते की, जमातवादी आणि जातीयवादी संघटनांचे पाय मातीचे असून एकदा ब्रिटीश गेले की ते विरघळून जातील. अर्थात पंडितजींची जातीयवाद आणि जमातवाद याबद्दलची कल्पना चुकीची ठरली. उलट सवातंत्र्यपूर्व काळापासूनच वेगवेगळ्या जमातींचे संघटन हे धर्माच्या कसोटीतून होत राहिले. धर्माचे राजकीयीकरण फाळणीनंतर न थांबता, वाढतच गेले. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या पंतप्रधानपदाच्या चौदा वर्षांच्या काळात जातीयवाद आणि जमातवाद या विघातक प्रवृत्ती वाढत गेल्याचे पाहण्याचे त्यांच्या नशिबी आले, म्हणून त्यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रातून हिंदू-मुसलमान-शीख यांच्यामधील जमातवादी प्रवृत्ती व संघटना वाढत असल्याबद्दलची त्यांची चिंता व्यक्त होते. ते मुख्यमंत्र्यांना व काँग्रेस कार्यकर्त्यांना हिंदू महासभा, रा. स्व. संघ आणि मुस्लीम लीग याबद्दल सतत सावधगिरीच्या सूचना करताना दिसून येतात. या हिंदू-मुसलमानांच्या संघटनांना त्यांनी " फॅसिस्ट " म्हणूनच संबोधले आहे. १९५२, १९५७ च्या निवडणुकात, निवडणुकांच्या राजकारणासाठी या संघटना जशा जमातवादी प्रवृत्तीचा वापर करीत आहेत, तसेच काँग्रेसमध्ये देखील जमातवाद, जातीयवाद याचा वापर सुरू असल्याबद्दल देखील लिहिले आहे. परंतु अल्पसंख्याकांमधील जातीयवाद आणि जमातवाद यांच्यावर टीका करीत असतानाच नेहरूंनी धार्मिक अल्पसंख्याकांना समजून घेण्याचा, संरक्षण देण्याचा, त्यांच्या मनातील अस्थिरतेची व अविश्वासाची भीती दूर करण्याचाही विचार मांडलेला होता.

त्या पार्श्वभूमीवर पं. नेहरूंच्या मृत्यूनंतर मुस्लीम अल्पसंख्याकांच्या नोकरभरतीबद्दल मुस्लिमांना सैन्यात, पोलिसात महत्त्वाच्या शासकीय खात्यात नोकरी देण्याच्या बाबतीत गृहखात्याने बंदी हुकुम काढलेले होते. मुस्लिमांच्या बाबतीतले शासनाचे हे पक्षपाताचे व अविश्वासाचे धोरण विलक्षण बोलके असून नेहरूनंतरच्या राज्यकर्त्यांची मनोवृत्ती दर्शविणारे आहे, यासंबंधीनंतरच्या काळात स्व. इंदिराजींनी १९७५ नंतर मुसलमानांसंबंधी नोकरभरतीची बंदी असणारे हुकूम काढून घेण्यासंबंधी आदेश दिले होते. त्यासंबंधीची माहिती असगर अली इंजिनिअरनी लिहलेल्या पुस्तकातून वाचायला

मिळते. डॉ. शाकीरांनी देखील आपल्या पुस्तकातून मुंबई महानगरपालिकेने १९७१ च्या युद्धाच्या वेळी, मुस्लीम कर्मचाऱ्यांच्या बदल्या कशा झाल्या, याचे विवेचन केले आहे. युनियनच्या पुढाऱ्यांनी तक्रार केल्यानंतर म्युनिसिपल कमिशनरनी केंद्रीय गृह खात्याचा मुसलमानांना मोक्याच्या ठिकाणाच्या नोकऱ्या देऊ नयेत असा आदेश असल्याचे सांगितले, याचा उल्लेख शाकीरांनी केला आहे. किंबहुना मोरारजीभाई देसाई, गोविंद वल्लभ पंत, इत्यादींनी शासकीय नोकऱ्यांच्या बाबतीत मुस्लिमविरोधी धोरण कसे स्वीकारले होते, याचा अनेकांनी उल्लेख केला आहे.

नेहरूंनी जरी अल्पसंख्याकांना समान वागणूक द्यावी, नोकर-भरतीची पुरेशी संधी द्यावी, अशा मुख्यमंत्र्यांना लेखी सूचना दिलेल्या असताना मुस्लिमांच्या बाबतीत कटाक्षाने जमातवादी दृष्टीकोन स्वीकारून, बहिष्काराचे तंत्र स्वीकारले गेल्याचे दिसते. दलितांच्या राखीव जागेसंबंधी धोरण हे देखील प्रामाणिकपणे कोणी राबवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत नाही. किंबहुना काँग्रेस संघटनेत, प्रशासनात आणि राजकीय पक्षात हिंदू जमातवादाची विलक्षण वाढ झाल्याचे आणि मुसलमानांचा व दलितांचा वापर निवडणुका जिंकण्यासाठी करणे, त्यांच्यामधील जातीयवादी संकुचित पुढाऱ्यांना हाताशी धरून, मुसलमानांतील जमातवादाला खतपाणी घालणे, या प्रवृत्तीची वाढ झाल्याचे दिसते. पंडितजींचे अल्पसंख्याकांबाबतीत व धर्मनिरपेक्ष प्रादेशिक राष्ट्रवादाचे धोरण पूर्णपणे फसल्याचे दिसते.

याला कारणेही तशीच आहेत. सर्व काँग्रेस नेत्यात लोकसमुदायाचा धर्माच्या माध्यमातून विचार न करणारे नेहरू हे एकमेव नेते होते. काँग्रेसमधील बाकीचे नेते व राज्यपातळीवरील पुढारी रा. स्व. संघाप्रमाणे जरी हिंदू राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारे नसले तरी, हिंदुत्ववादीच होते. तशात पाकिस्तानची निर्मिती आणि मुसलमानांच्या कर्मठपणामुळे त्यांचे धोरण मुस्लिमविरोधी झाले. नेहरू सोडून काँग्रेसमधील बाकीच्या पुढाऱ्यांनी, हिंदुत्ववाद म्हणजेच राष्ट्रवाद हे समीकरण स्वीकारले होते, कारण राष्ट्रवादाची मूल्ये म्हणून गेल्या ४० वर्षात मांडली गेलेली मूल्ये, ऐतिहासिक वारसा दर्शविणारी प्रतिके, साहित्य, संस्कृती, कला विषयक कल्पना, उत्सव इत्यादी हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या गोष्टी दिसून येतात. किंबहुना, प्रा. घनःश्याम शहा, मोईन शाकीर, डॉ. भांवरी सारख्या विचारवंतांनी काँग्रेसचे सर्वसामान्य कार्यकर्ते हिंदुत्ववादी, जातीयवादी मुस्लिम आणि दलितविरोधी असल्याचे अनेक प्रकारे दाखवले आहे. काँग्रेसच्या बूर्झ्वा आणि भांडवलशाही स्वरूपाबद्दल रजनीपाम दत्तसारख्या अनेकांनी स्पष्टीकरण केले आहे, म्हणजेच एकट्या पं. नेहरूंचा दृष्टीकोन तेवढा अल्पसंख्याकांच्या बाबतीत उदारमतवादी होता. मुळातच परस्परविरोधी प्रवृत्ती व घटकांचा समन्वय साधण्याचा पंडितजींचा प्रयत्न असफल होणारच होता. एका बाजूला श्रेणीबद्ध जातीयवादी, धर्मवादी सनातन समाजरचना व दुसऱ्या बाजूला संसदीय पद्धतीची मूल्ये यांचा समन्वय होणेच शक्य नव्हते. केवळ राजकीय बदलामुळे सामाजिक परिवर्तन होईल, हा त्यांचा दृष्टीकोन मनोरंजनात्मक होता. तीच समाजरचना कायम ठेऊन लोकशाही धर्मनिरपेक्षता रूजविणे अशक्य होते.

नेहरूंची इतिहासविषयक भूमिका व धर्म आणि जमातवाद यांच्या स्वरूपाबद्दलचा दृष्टीकोन मोठ्या प्रमाणावर मार्क्सवादी होता. त्यांनी भारतातील हिंदू जमातवादाला योग्यरित्या समजून घेतले नाही. त्यांचे बहुसंख्याक हिंदूच्या प्रबोधन चळवळीचे आकलन नीट नव्हते. हिंदूमधील प्रतिगामी प्रवृत्ती नष्ट झाली असून त्यांच्या जमातवाद केवळ वरिष्ठ व मध्यम वर्गापुरताच आहे, हे त्यांचे मत वास्तववादी नव्हते. त्याचप्रमाणे त्यांनी हिंदूमधील वरिष्ठवर्णीय, वर्गीय घटक व त्यांचे पुढारी आणि बूर्झ्वा घटक यांचे डावपेच आणि जमातवाद यांची भेदकता लक्षात घेतली नाही, म्हणूनच

आयुष्याच्या शेवटी ते हताश झाल्याचे दिसून येते. भारतातील भांडवलदार आणि बूर्झ्वा वर्गाने मोठ्या योजनाबद्ध प्रकाराने काँग्रेसमध्ये आणि भारतात धर्मवाद रूजविण्याचे राजकारण केले. राष्ट्रवाद आणि सांस्कृतिक पुनरूज्जीवन यांच्या नावाखाली हिंदुत्ववाद जोपासला. अल्पसंख्याकांतील कर्मठ प्रतिगामी घटकांनी त्यांच्या डावपेचांना खतपाणी घातले. नेहरूंच्या लक्षात आले नाही की, काँग्रेसचा सामाजिक, राजकीय, आर्थिक दृष्टीकोनच मुळी इतका प्रतिगामी होता की, काँग्रेसच्या आणि उच्च वर्णियांची मक्तेदारी असणाऱ्या नोकरशाहीकडून, अल्पसंख्याकांच्या कल्याणाचा विचार नेहरूंच्या प्रतिपादनानुसार केला जाणेच शक्य नव्हते. एका अर्थाने प्रौढ मताधिकाराचा हक्क; हा भारतातील जातीजमाती व सर्वसामान्य घटक यांच्या राजकीय सत्तेचे साधनच होते. त्यामुळेच प्रौढ मताधिकाराचा वापर करून जातीय किंवा धार्मिक मूल्यांच्या आधारे संघटन करून राजकीय सत्ता मिळविण्याचा जो प्रकार संसदीय पद्धतीत सुरू झाला. त्यामध्ये अल्पसंख्याकांना दुय्यम स्थान प्राप्त होणे साहजिकच होते. संसदीय पद्धतीमधील निवडणुकीच्या राजकारणात लोकमत संघटीत करून निवडणुका जिंकण्यासाठी जात व धर्म यांचे राजकारण उदयास येते व त्यात अल्पसंख्याकांची पीछेहाट होते. हे नेहरूंना उमगलेच नाही. भारताच्या राजकीय व्यवस्थेतील मतदारसंघाचे जातीयवादी-जमातवादी करणे करण्याची प्रवृत्ती, सत्ताधाऱ्यांची अल्पसंख्य जाती-जमातींना न्याय देण्याची अनिच्छा, वरिष्ठ वर्ग व वर्ण यांना फायदेशीर करणारी मिश्र अर्थव्यवस्था हे घटकच नेहरूंच्या अल्पसंख्याकांबद्दलच्या धोरणाला सुरूंग लावणारे होते.

या संदर्भात आणखी एका गोष्टीचा विचार व्हायला पाहिजे होता; तो म्हणजे स्वातंत्र्यानंतर भारतातील अल्पसंख्य जाती-जमातींना सार्वजनिक जीवनात सहभागी होत असताना, व्यक्ती म्हणून भाग घ्यावयाचा; का जमात म्हणून भाग घ्यावयाचा? धर्मनिरपेक्षता व एकात्मता यांचा भंग न करता, आपली सामाजिक, सांस्कृतिक आयडेंटिटी कशी टिकवावी ही देखील समस्या होती. या संघर्षातूनच पंडितजींच्या मृत्यूनंतर जमातवाद जोपासला व अल्पसंख्याकांच्या सामाजिक न्यायाचे प्रश्न मागे पडले. आणखी एक महत्त्वाचे म्हणजे, पाकिस्तानच्या निर्मितीमुळे दुखावलेले हिंदुत्ववादी गट, नेहरूंचा अस्त झाल्यावर प्रबळ झाले. गांधी-नेहरूंच्या प्रभावाखाली हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कार करणारे दबले होते. १९७१ नंतर त्यांनी आपल्या वर्चस्वाखाली धर्मवादाच्या राजकारणाला सुरूवात केली. त्याचा संकलित परिणाम म्हणून सध्या सर्वत्र जमातवाद फोफावताना दिसून येत आहे.

□□□



एन ४३९४-१५

# नेहरू आणि राष्ट्रभाषा

□ डॉ. सूर्यनारायण रणसुभे

**श्री.** जवाहरलाल नेहरू हे अगदी सुरुवातीच्या काळापासून काँग्रेस पक्षाशी संबंधित होते, त्यामुळे त्यांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय किंवा भाषिक विचारांचा संबंध काँग्रेसच्या धोरणाशीच निगडित असणे स्वाभाविक आहे. स्वातंत्र्यापूर्वी काँग्रेस पक्षाच्या धोरणावर म. गांधी व इतर मोठ्या नेत्यांच्या विचाराचा पगडा असायचा. पण स्वातंत्र्यानंतरच्या काळात मात्र नेहरूंचे जे विचार असायचे, तेच पुढे काँग्रेसची धोरणे म्हणून जाहीर व्हायची. त्यामुळे नेहरूंच्या राष्ट्रभाषा-विषयक विचारांचे दोन पैलू समोर येतात. स्वातंत्र्यापूर्वीच्या त्यांच्या मनावर इतरांचा कमी अधिक प्रभाव आहे. किंवा इच्छा नसताना देखील पक्षाची धोरणे म्हणून इतरांची मते ते मान्य करीत असत. पण नंतरच्या काळात मात्र त्यांची स्वतःचीच मते त्यांनी पक्षावर लादलेली आहेत.

राष्ट्रभाषेच्या संदर्भात देखील नेमके हेच घडलेले आहे. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात विविध प्रश्नांच्या संदर्भात पक्षाची भूमिका ही खूपच, तात्विक, भाबडी आणि आदर्शवादाच्या जवळपास गेलेली आहे. भाषेच्या संदर्भात त्यावेळी काँग्रेसमध्ये विविध गट जरी सक्रिय असले तरी, सर्वजण या मताशी सहमत होते की स्वतंत्र भारताची राजभाषा ही इंग्रजी असणार नाही. इंग्रजीच्या ऐवजी हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून सर्वांना मान्य होती. पण तिच्या स्वरूपाबद्दल मात्र खूप मतभेद होते. म. गांधीची भूमिका या बाबतीत भाबडी होती. ते " हिंदुस्तानी " चा आग्रह धरत होते. ही हिंदुस्तानी म्हणजे उर्दू व हिंदीचे संयुक्त असे रूप राहील, एवढेच सतत सांगण्यात येई. पण ही हिंदुस्तानी या देशाची राजभाषा होऊ शकेल काय; याचा फारसा व्यावहारिक विचार कोणी केल्याचे दिसत नाही. येथे राष्ट्रभाषा आणि राजभाषा याच्यात अंतर करणे गरजेचे आहे. " राष्ट्रभाषा ' या शब्दाची संकल्पना देखील त्याकाळी स्पष्ट नव्हती. संपूर्ण राष्ट्रात जी भाषा बोलली जाते ती राष्ट्रभाषा असे समजायचे, की राष्ट्रीय कारभार ज्या भाषेतून चालेल तिला राष्ट्रभाषा म्हणायचे, याबद्दल गोंधळ दिसून येतो. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात स्वतंत्र भारताची प्रशासनिक भाषा म्हणूनच राष्ट्रभाषा या शब्दाचा वापर करण्यात आलेला होता. पण त्यामुळे येणाऱ्या व्यावहारिक अडचणीची कल्पना नेहरू किंवा इतराना असल्याचे दिसून येत नाही. हिंदी किंवा हिंदुस्तानी ही जर राष्ट्रभाषा असेल, तर इतर भारतीय भाषा अराष्ट्रीय आहेत काय, असाही प्रश्न त्याकाळी निर्माण झालेला नव्हता. एक ध्वज, एक घटना आणि एक भाषा याच घोषणेतून ही संकल्पना आकार घेत होती. वस्तुस्थिती अशी आहे की, स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात राष्ट्रभाषेसंबंधी खूप तपशीलाने कोणीही विचार केलेला नव्हता. त्याकाळी भाषेचा प्रश्न हा कोणालाच अडचणीचा वाटला नसावा. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हिंदी ही राष्ट्रभाषा असेल हे मात्र वारंवार सांगण्यात येत होते. भाषेच्या संदर्भात चिकित्सक अशी चर्चा घटना समितीत झालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतः हिंदीच्या बाबतीत

स्पष्ट अशी भूमिका घेत होते. भारताच्या उच्च शिक्षणाची माध्यम भाषा हिंदी असावी, प्रशासनाची भाषा देखील हिंदीच असावी असे ठामपणे ते मांडत होते.

या पार्श्वभूमीवर नेहरूंचे धोरण स्पष्ट असे नव्हते. इंग्रजीबद्दल त्यांच्या मनात जबरदस्त असे आकर्षण होते. त्यांचे संपूर्ण शिक्षण हे इंग्रजीतून झालेले. जनसभेसमोरील भाषणे जर सोडली, तर इतरत्र त्यानी क्वचितच या भाषेचा उपयोग केलेला आहे. त्याना स्वतःला असे वाटत होते की, हिंदी ही अपरिपक्व अशी भाषा आहे. राष्ट्रभाषा व राजभाषा म्हणून जरी आपण तिला मान्यता दिलेली असली तरी तिचा व्यावहारिक वापर एकदम करता येणार नाही असे त्याना वाटे. १९६३ पर्यंत ते स्वतः या भाषेला प्रशासनात स्थान मिळवून देण्यासाठी धडपडत होते. श्री. हरिवंशराय बच्चन याना यासाठी त्यानी दिल्लीस बोलावून घेतले होते. परराष्ट्र व्यवहारांत हिंदीचा वापर व्हावा अशी त्यांची मनोमन इच्छा होती. राजभाषाविषयक संसदेच्या समितीत ते स्वतः सक्रिय असत. प्रशासन विषयक शब्द तयार करण्याची जी समिती त्याकाळी काम करीत होती, त्यातही ते जातीने लक्ष घालत. इंग्रजी शब्दाला पर्याय म्हणून संस्कृत शब्द घेणे त्याना फारसे आवडत नसे. एका उदाहरणाने ही गोष्ट स्पष्ट होते. " ऑफिस " साठी " कार्यालय " शब्द घेण्यात यावा असे ठरत असताना ते म्हणाले यासाठी " दफ्तर " शब्द का नको ? तज्ज्ञ मंडळीना ते सांगत की, जनसामान्यात प्रचलित असलेले शब्दच निवडा. पण तज्ज्ञांची वेगळी अडचण होती. ते म्हणाले की " कार्यालय " जर शब्द घेतला तर या शब्दापासून कार्यालयाशी संबंधित अनेक शब्द तयार करता येतात. " दफ्तर " या शब्दापासून असे अनेक शब्द तयार करता येत नाहीत. तज्ज्ञाचे म्हणणे पटत जरी असले, तरी त्याना सतत अशी भीती वाटायची की, प्रशासकीय भाषा ही जनसामान्यापासून दूर जाईल आणि राष्ट्रभाषेविषयीचा मूळ आत्माच आपण गमावून बसू. भाषा तज्ञांच्या अडचणी वेगळ्या होत्या आणि नेहरूंची मागणी ही वेगळी होती.

एखाद्या भाषेला प्रशासकीय व्यवहारासाठी जुंपायचे असेल तर तिच्यावर अनेक संस्कार करावे लागतात, प्रत्येक शब्दाला निश्चित अर्थ द्यावा लागतो, अनेकार्थी शब्दाना नाकारावे लागते आणि नवे शब्द तयार करावे लागतात. नवे शब्द तयार करताना मूळ धातूपर्यंत जावे लागते. भाषा तज्ज्ञांची ही अडचण नेहरूना फारशी पटत नव्हती. त्यामुळे हिंदीच्या स्वरूपाविषयी नेहरूंचे आणि तज्ज्ञांचे सतत खटके उडत.

राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांच्या इंग्रजी भाषणाचा हिंदी अनुवाद करण्याची जबाबदारी त्यानी एकदा हरिवंशराय बच्चन यांच्यावर टाकली. बच्चननी तिचा सुरेख अनुवाद केला, पण नेहरूना तो अनुवाद अजिबात पटला नाही, त्यांचा आग्रह होता की, हा अनुवाद अधिक क्लिष्ट झालेला आहे. तो हिंदुस्तानीत केला जावा. म्हणजे अनुवाद उर्दू मिश्रित हिंदीत असावा. म्हणजे हिंदीच्या स्वरूपाविषयी नेहरूंजीची स्पष्ट अशी भूमिका आहे की, उर्दू मिश्रित असावी. उर्दू मिश्रित हिंदीचे विरोधक हे विचाराने सनातनी असतात, ते हिंदुत्ववादी असतात, अशा प्रकारचा एक विचित्र भ्रम नेहरू बाळगून होते. अशी वस्तुस्थिती त्याकाळी नव्हती आणि आजही नाही. प्रशासकीय भाषांसंबंधी त्यानी हा वाद सतत घातलेला आहे. व्यवहारात जी भाषा बोलली जाते, तीच प्रशासनात यावी असा त्यांचा आग्रह दिसून येतो. वस्तुस्थिती अशी असते की, प्रशासनात जे शब्द सतत वापरले जातात, ते हळूहळू व्यवहारात स्थिर होऊ लागतात. व्यवहारातील शब्दाना अर्थाचे अनेक पदर असतात. अनेक अर्थ देणारे शब्द प्रशासनात उपयोगाचे नसतात, कारण यातून अनेक गंभीर असे कायदे विषयक प्रश्न निर्माण होत असतात.



एन ४३२४-१५अ

हिंदीच्या वापराच्या संबंधात घटनेने १५ वर्षांची मर्यादा घालून दिलेली होती. ती १९६३ मध्ये संपली. केंद्र शासनाच्या सर्व व्यवहारातून इंग्रजीचे उच्चाटन होणे गरजेचे होते. पण त्यावेळी दक्षिणेत आणि कमी अधिक प्रमाणात संपूर्ण हिंदीतर भाषिक प्रदेशात हिंदी विरोधात दंगली पेटल्या. आणि त्यानंतर मात्र नेहरूंच्या दृष्टीकोणात फार मोठा बदल झालेला दिसून येतो. दक्षिणेतील आणि त्यातही तामिळनाडूतील हिंसक आंदोलनामुळे नेहरूंना आपल्या भाषाविषयक धोरणात आमूलाग्र बदल केलेला दिसून येतो. ते स्वतः लोकशाहीचे कट्टर असे पुरस्कर्ते होते. पण हिंदीच्या बाबतीत मात्र त्यांनी अल्पसंख्याकांच्या इच्छेला महत्त्व दिल्याचे दिसून येते. बहुसंख्याकांची भाषा ही हिंदी आहे; त्यामुळे तिलाच राजभाषेचा दर्जा मिळावयास हवा होता. हिंदीतर भाषी प्रदेशापैकी महाराष्ट्र, गुजरात, ओरिसा, पंजाब आणि जम्मू व काश्मीर ही हिंदीच्या समर्थनातील राज्ये होती. तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र, असम, नागालँड व काही प्रमाणात केरळ एवढ्याच राज्यांचा हिंदीला त्याकाळी अधिकृत असा विरोध होता. म्हणजे लोकशाही संकेतानुसार बहुसंख्याक हिंदीच्या समर्थनार्थ व अल्पसंख्याक हिंदीच्या विरोधात होते असे असताना देखील इंग्रजीला घटनात्मक संरक्षण देण्यात नेहरूंनी पुढाकार घेतला. इंग्रजी ही अनिश्चित काळापर्यंत या देशाची प्रशासनातील भाषा असेल व हिंदीतर भाषी प्रदेशांची ज्यावेळी इच्छा होईल, त्यावेळी प्रशासनातून इंग्रजीची हकालपट्टी करण्यात येईल असे आश्वासन नेहरूंनी त्याकाळी दिले व त्यानुसार घटनेत बदल करून घेतला. ही एकच घटना नेहरूंच्या हिंदीविषयक धोरणास स्पष्ट करते. घटनेतील या बदलामुळे स्वतंत्र भारतास स्वतःची अशी एक स्वतंत्र भाषा मिळण्याची जी एक शक्यता होती; ती संपुष्टात आली.

आधी भाषेची समृद्धी आणि नंतर तिचा व्यवहारात किंवा प्रशासनात उपयोग, हे धोरण भाषेच्या प्रकृतीच्या विरुद्धच नव्हे; तर हास्यास्पद देखील आहे. कारण भाषा ही व्यवहारातून समृद्ध होत असते. ती टाकसाळीत समृद्ध होऊन येत नसते. किंवा तज्ञांच्या सभेत तयार झालेली भाषा ताबडतोब जर व्यवहारात आणली गेली तरच तिची क्लिष्टता संपुष्टात येत असते. दोन्ही पातळीवरून प्रयत्न करणे गरजेचे असते. प्रशासनिक हिंदी आज अनेक कोशातून पडून आहे. तिचा सार्वत्रिक असा उपयोग केला जात नाही. शासकीय धोरणानुसार लक्षावधी पुस्तके छापून सुरक्षित ठेवण्यात येत असतात. उपयोगात न आणले जाणारे शब्द, म्हणजे एका अर्थाने प्रेतेच.

ज्या ज्या वेळी केंद्रीय प्रशासनिक हिंदीच्या वापराचा प्रश्न येतो, त्या त्या वेळी दक्षिणेतील हिंदी विरोधक नेहरूजींनी दिलेल्या आश्वासनाची आठवण करून देतात. संसदेत नेहरूजींनी इंग्रजीला जे अभय दिले आहे, ते काढून टाकणे आता फारच अवघड आहे. स्वातंत्र्यापूर्वी राष्ट्रभाषेसंबंधी जी राष्ट्रीयत्त्वाची जाणीव होती, ती आता राहिलेली नाही. हिंदी प्रदेशातील राजकारणाशी, तेथील आक्रमक नेतृत्वाशी, तेथील सनातनी वृत्तीशी आता या भाषेचा संबंध जोडला जातो. त्यामुळे नेहरूंनी दिलेल्या घटनात्मक संरक्षणास बदलणे सोपे राहिलेले नाही. हिंदी भाषी प्रदेश देखील आता या भाषेच्या संबंधात आक्रमक भूमिका घेऊ इच्छित नाहीत. डॉ. लोहियांच्या मृत्यूनंतर भाषेसंबंधी चिकित्सक अशी मांडणी करणारे नेतृत्व देखील राहिलेले नाही. स्वातंत्र्यापूर्वी हिंदीचा संबंध राष्ट्रीय अस्मितेशी होता. तिचा संबंध केवळ संपर्क भाषा म्हणूनच राहिलेला आहे. संपर्क भाषा म्हणून जे स्थान मिळालेले आहे, हे तिच्या लवचिकतेमुळे व बहुसंख्याकांची ही भाषा आहे म्हणून मिळालेले आहे. केंद्र शासनाची अधिकृत व एकमेव अशी राजभाषा म्हणून तिला संधी मिळाली असती; पण नेहरू या बाबतीत कठोर आणि आक्रमक भूमिका घेऊ शकले

नाहीत. त्यांच्या स्वभावातच हे नव्हते. ते समन्वयवादी म्हणूनच सुप्रसिद्ध होते. याही बाबतीत त्यानी समन्वयाची भूमिका घेतली, पण या समन्वयाच्या भूमिकेमुळे एक परकीय भाषा येथे कायमची ठाण मांडून बसलेली आहे, हे विसरता येणे शक्य नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळात या देशातील कोट्यवधी जनतेला भाकरी, निवारा आणि भाषेसंबंधी आपण जी आश्वासने दिलेली आहेत, ती पाळणे आवश्यक आहे याचा विसर काँग्रेस पक्षास पडलेला असावा असा संशय नंतरच्या काळातील या पक्षाच्या धोरणावरून सतत वाटू लागतो. जी भाषा राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक म्हणून वापरली जात होती, तिचा वापर आता फक्त मते मागण्यासाठीच होऊ लागला. स्वातंत्र्यानंतर ते अगदी मृत्यूपर्यंत नेहरू स्वतंत्र भारताचे पंतप्रधान म्हणून जगभर हिंडले पण परदेशात कोठेही ते हिंदीतून बोलत नसत, संसदेतील चर्चा ते इंग्रजीतूनच करीत होते. बुद्धिवाद्यांच्या, शास्त्रज्ञांच्या, कलावंताच्या सभेतून ते इंग्रजीतून बोलत होते. राष्ट्र प्रमुखच या भाषेचा वापर करीत नसेल तर इतर मंडळी तिचा का म्हणून वापर करतील ? स्वातंत्र्यानंतरच्या काळात परदेशात व इतरत्र महत्त्वाच्या सभेतून त्यांनी जर सतत हिंदीचा वापर केला असता, आणि अगदी जाणीवपूर्वक केला असता, तरी त्याचा फार मोठा प्रभाव जाणवला असता. नेहरूंच्या-मुळे अनेक क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळीनी देखील या भाषेचा वापर त्यावेळी केला असता. केवळ जेवणाच्या टेबलावर आणि तेही फक्त घरातल्या जेवणाच्या टेबलावर ते हिंदीचा वापर करीत असत. नंतरच्या काळात त्यांच्या कन्या श्रीमती इंदिरा गांधी या देखील घरी जेवणाच्या टेबलावर या भाषेचा वापर करीत असत. एवढा अपवाद जर सोडला तर इतरत्र ते हिंदीचा वापर क्वचितच करीत. स्वातंत्र्यपूर्व काळचे नेहरू हिंदीबद्दल जितके गंभीर, प्रामाणिक आणि निष्ठा बाळगून होते, तेवढे स्वातंत्र्यानंतरच्या काळात नव्हते, ही वस्तुस्थिती आहे.

कधी काळी भावी राजभाषा म्हणून ज्या भाषेचा ते गौरव करीत होते, आता तेच या भाषेला संपर्क भाषा म्हणून संबोधू लागल्याचे दिसून येते. हे असे का झाले, याचा शोध घेण्याचा जर आपण प्रयत्न केला; तर याच्या मुळात त्यांच्या राजकीय आकांक्षा व तत्कालीन राजकीय परिस्थिती कारणीभूत आहे असे दिसून येईल. आपल्या राजकीय आकांक्षामुळे त्यानी राजभाषेचा प्रश्न किचकट केला असा आरोप करण्याचा उद्देश या लेखाचा नाही. तर भाषेच्या प्रश्नावरून देशाची शकले पडतील अशी भीती त्याना त्यावेळी वाटत होती. ही भीती त्यानाच नव्हे तर त्यावेळच्या अनेक राजकीय नेत्याना व मुत्सद्याना वाटत होती. तामिळनाडूतील काही अतिरेकी मंडळी हिंदीचे निमित्त करून संपूर्ण दक्षिणी राज्यांना किंवा द्राविडकुळातील भाषा बोलणाऱ्या राज्यांना, उत्तर भारताविरुद्ध संघटित करीत आहेत, देशातून फुटून जाण्याची भाषा करीत आहेत, असे स्पष्ट संकेत त्यावेळी मिळत होते. हा वाद केवळ भाषेपुरता मर्यादित नसून तथाकथित आर्यसंस्कृतीच्या (तामिळनाडूतील धूर्त राजकीय नेते हिंदी भाषिकांना आर्य संबोधत होते, आजही संबोधतात) विरुद्ध तामिळींना पेटविण्यात येत आहे, असे त्याकाळी दिसत होते. भाषेच्या प्रश्नावर देशाचे तुकडे पडतील अशी भीती संवेदनक्षम नेहरूंना वाटत होती. दक्षिणेतील फुटीर मंडळींनी अगदी संघटितपणे असा प्रचार सुरू केला की राष्ट्रभाषा हिंदीस स्वीकारणे; याचा अर्थ उत्तर भारताच्या सांस्कृतिक आक्रमणास शरण जाणे आहे. त्यावेळी हिंदीस राष्ट्रभाषा म्हणून लादणे याचा अर्थच तामिळनाडूतील अतिरेकी शक्तींना फोफावण्याचे आमंत्रण देण्यासारखे होते. १९४७ मध्ये देशाची एकदा फाळणी झालेली होती. ते शल्य नेहरूंच्या मनात होते. आता पुन्हा भाषेच्या प्रश्नावरून देशाची फाळणी होईल असे वाटणे साहजिकच होते. पूर्वेत नागालँडचा प्रश्न याच सुमारास किचकट असा झालेला

होता. त्याच काळात भाषेच्या अभिनिवेशातून पंजाब वेगळा झालेला होता. हिंदीच्या आग्रहातून देशात असे काही अघटित व्हावे असे नेहरूनाच काय कोणालाच वाटणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीत नेमकी भूमिका घेणे खूपच अवघड असते. देश एकसंघ राहण्यासाठी इंग्रजी या परकीय भाषेस संरक्षण देण्यावाचून दुसरा पर्याय नेहरूंच्या समोर नव्हता. हिंदीला पूर्णपणे नाकारणे देखील शक्य नव्हते. तसे झाल्यास उत्तर भारतात दंगली पेटणार होत्या. हिंदीच्या निमित्ताने उत्तर-दक्षिण वाद विकोपास जाण्याची शक्यता होती. त्यामुळे देश एकसंघ राहण्यासाठी समन्वयाची भूमिका घेण्यावाचून दुसरा पर्याय नव्हता. नेहरूंच्या राष्ट्रभाषा विषयक भूमिकेत जो मोठा बदल झालेला आहे; त्याच्या मुळात त्यांच्या राजकीय आकांक्षेपेक्षा भाषेच्या निमित्ताने दक्षिणेतील ज्या अतिरेकी शक्ती फोफावणार होत्या, त्याना थोपवून धरण्याचे राजकारण अधिक महत्त्वाचे होते हे समजून घेण्याची गरज आहे. स्वातंत्र्यपूर्वी भाषेच्या प्रश्नाकडे भाबडेपणाने पाहणाऱ्या नेहरूंच्या भूमिकेत जो बदल झालेला आहे तो इंग्रजीच्या मोहातून नव्हे, तर या देशाची पुन्हा शकले पडू नयेत, येथे वांशिक दंगली उसळू नयेत. भाषेच्या द्वेषातून उत्तर-दक्षिण वाद रूढावू नये, आर्य-द्रविड असा संघर्ष पेटू नये ही राष्ट्रीयत्त्वाची भावना कारणीभूत होती; हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

□□□

# साहित्यिक नेहरू

□ रवीन्द्र सदाशिव किंबहुने

A people without history
Is not reedeemed from time, for history is a pattern of timeless moments—

T. S. Eliot.

लोकोत्तर कामगिरी बजावणाऱ्या काही व्यक्तींना त्यांच्या हयातीतच एखाद्या दंतकथेतील नायकाचे व्यक्तिमत्व लाभते. व्यक्तीच्या असाधारण कर्तृत्त्वाबरोबरच त्याच्या भोवतीच्या समाजमानसाचाही विचार करणे वेळी इष्ट ठरते. भारतीयांच्या मनातली पं. जवाहरलाल नेहरू यांची प्रतिमा पाहिली की वरील निरीक्षणाची सत्यता पटू लागते. ऐश्वर्य, रूप, परदेशातले शिक्षण, उत्साह, चिरतारुण्य, त्याग, स्वातंत्र्य चळवळीतले नेतेपण, वैज्ञानिक दृष्टी, आधुनिकीकरणाचा निदिध्यास, अथक परिश्रम, भारताचे स्वत्त्व निर्माण करण्याची जिद्द आणि ' न भूतो न भविष्यति ' लोकप्रियता इत्यादी गोष्टींचा विचार केला की, व्यक्तीच्या उदात्तीकरणासाठी लागणारी सगळी सामग्री नेहरूंच्याजवळ एकवटलेली होती असे पटू लागते. वस्तुनिष्ठ दृष्टिकोन आणि ऐतिहासिक भान यांचा अभाव असलेल्या मानसिकतेने समकालीन भारतीय इतिहासाचे सार्वभौम नायकत्व त्यांना बहाल करावे; यात अस्वाभाविक वाटावे असे काहीच नव्हते. आपल्या समस्या नेमक्या कोणत्या, त्यांचे स्वरूप काय, त्या सोडविण्याचेमार्ग कोणते इत्यादी आर्थिक-सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक जीवनाशी निगडीत असलेल्या तातडीच्या प्रश्नांची जाणीव आणि परकीय सत्ता आणि तदनुषंगिक जबर आर्थिक पिळवणूक; यांच्या परिणामी खचून गेलेली पराभूत मानसिकता याबाबत आपण फारसे आग्रह धरलेले दिसत नाहीत. त्यामुळे गर्दीत बेदरकारपणे घुसणारे नेहरू, आदिवासी पोशाख घालून त्यांच्याबरोबर नाचणारे नेहरू, गळ्यातला हार एखाद्या पोराच्या गळ्यात टाकणारे नेहरू, समारंभाची औपचारिकता विसरून संतापणारे नेहरू, काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या बैठकीत आपल्या सहकाऱ्यांवर कृतक-कोपाने लोड फेकून मारणारे नेहरू या व अशा अनेक प्रतिमा प्रसार-माध्यमांद्वारे प्रसारित होत राहिल्या. जसे काही नेहरू आपल्या अवतारी विभूतिमत्वाच्या किमयेने देशातील सगळ्या गुंतागुंतीच्या समस्या चुटकीसरशी सोडवणारच असा विश्वास दृढ झाला. वास्तविक हे सगळे नेहरू या व्यक्तीवरही अन्याय करणारेच होते.

तरी भारतीय राजकारणातील नेहरूंच्या उदयापासून ते चिनी आक्रमणापर्यंत हा कल्पनेचा सामूहिक खेळ राजरोसपणे चालू होता. १९६२ पर्यंत नेहरू राष्ट्रीय कौतुकाचा अनन्य विषय

होते. एखाद्याचे व्यक्तिमत्व अष्टपैलू आहे, म्हणून त्याचा गवगवा करणे हे आपण समजू शकतो. परंतु यात तारतम्य मुळीच असू नये; यामागे निष्क्रीयतेशिवाय दुसरे स्पष्टीकरण सापडणे कठीण दिसते. लोकशाहीला असली मानसिकता घातक सिद्ध होते. खरेतर परवापरवापर्यंत आपल्याला याची फारशी कल्पनाही नव्हती. दोन-तीन वर्षांच्या कालावधीत ज्या पोरकट उत्साहाने कै. संजय गांधी यांना राजकीय क्षेत्रात स्थान निर्माण करून देण्याचे सहेतुक प्रयत्न झाले ; त्या अनुभवातून आपल्याला या रोगटपणाची ओळख पटली. धूर्त मूठभरांचा स्वार्थ आणि तेव्हढीच आपल्या समाजाची राजकीय उदासीनता; असे चित्र सुस्पष्ट झाले. काहीसे सुलभीकरण करून असे म्हणता येईल की, भारतीय जनता नेहरूंच्या बाबतीतही यापेक्षा वेगळे काही करत नव्हती. कालावधी जास्त आणि माणूसही मोठा, त्यामुळे या उदात्तीकरणाचा संपृक्त प्रत्यय तीव्रतेने जाणवला नाही, इतकेच ! नेहरूंना त्यागाची आणि प्रतिभेची जोड तरी होती. परंतु केवळ कॉमिक्स् वाचणाऱ्या आणि त्याचेच भांडवल प्रसिद्धीसाठी वापरणाऱ्यांची मनोवृत्ती पाहिली म्हणजे, आल्या स्थितीला बैलाप्रमाणे मान्य करणाऱ्या मानसिकतेची अवस्था विकल करणारी आहे, हे पटते.

ब्रिटीशांचा साम्राज्यवाद, त्यांच्या आक्रमक संस्कृतीचा भारतीय मनावरील आघात, आर्थिक पिळवणूक आणि इंग्रजी शिक्षण या सर्वांचे वस्तुनिष्ठ, ऐतिहासिक आणि कठोर विश्लेषण होणे अधिक गरजेचे होते. कुठल्याही कर्तृत्वाचे परीक्षण, त्याच्या काळाच्या संदर्भात होणे हितावह असते. याऐवजी नेहरूंच्या बाबतीत प्रचलित समजुतींचा आधार घेऊन एक दंतकथा सर्वतोमुखी झाली. याला नेहरूंच्या साहित्यिक गुणवत्तेच्या दबदब्याचाही अपवाद नाही. कार्यबाहुल्यामुळे नेहरूंना लेखन करणे शक्य होणार नसेल तर दर्जेदार लेखनासाठी त्यांना कारागृहात पाठवा असे मिस्कील कौतुकाने कोणीतरी म्हटल्याचे स्मरते. एकतर नेहरूंचे लेखन इंग्रजीत आहे. त्याची तत्पर भाषांतरे झालेली असली तरी त्यांचा वाचकवर्ग मर्यादितच म्हणावा लागेल. इंग्रजी लेखनाचा तर मुद्दाच वेगळा. भारतीयांच्या इंग्रजी लेखनाचा भारतीय वाचकवर्ग मर्यादित असून, तो इंग्रजी भाषा जाणणाऱ्या पाश्चात्य देशातील लोकांचा असण्याचीच जास्त शक्यता आहे. स्वातंत्र्यचळवळीतले अग्रणी, मुत्सद्दी आणि स्वतंत्र भारताचे पंतप्रधान या गोष्टींमुळेही त्यांच्या लेखनाचा लोकप्रियतेशी निकटचा संबंध आला हे नाकारता येणार नाही. त्यांचे बहुतेक लेखन स्वातंत्र्यपूर्व काळातील आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या एकूण विस्ताराचाही फायदा त्यामुळे ह्या लेखनाला मिळाला असणार. शिवाय एक भारतीय इंग्रजी लिहू शकतो, याचे उच्चभ्रूंनी उत्तेजनार्थ केलेले कौतुक असा भागही आपल्याला दिसतो. राजकीय जीवनातल्या धकाधकीशी नेहरूंचा संबंध आला नसता तर ते एक थोर कादंबरीकार झाले असते ,ह्या मताला फारसे महत्त्व देऊ नये. इंग्रजी राजवटीविरुद्ध चाललेल्या चळवळीतील कार्यामुळे त्यांना कारावास भोगावा लागला. या काळात त्यांनी लेखन केले. त्यांची संवेदनशीलता, आत्मशोध, इतिहासाच्या आकलनाची भरारी त्यांनी स्वाभाविक सुबोध गद्यात व्यक्त केली. वाचनीय आणि दर्जेदार असे हे लेखन उच्च साहित्यिक कोटीतील आहे असे म्हणणे धाडसाचेच ठरेल.

नेहरूंच्या सगळ्या पत्रलेखनाची गणती केली तर त्यांचे साहित्य विपुलच म्हणावे लागेल. शिवाय त्यांनी वेळोवेळी दिलेल्या भाषणांची संकलनेही प्रसिद्ध झालेली आहेतच. '' ट्रिस्ट विथ डेस्टेनी '' किंवा महात्मा गांधींच्या वधानंतरचे राष्ट्राला उद्देशून केलेले उत्स्फूर्त भाषण किंवा '' विल ॲण्ड टेस्टामेंट '' इत्यादि पाठ्यपुस्तकातून हमखास निवडलेले साहित्यही आहेच. ' चाणक्य ' या टोपण नावाने स्वतःवर हुकूमशहाचा आरोप करून लिहिलेले व्यक्तिचित्रही प्रसिद्ध आहे. परंतु

साधारणपणे १९३४-३५ मध्ये दोन खंडात प्रसिद्ध झालेला इतिहासविषयक पत्रांचा संग्रह " ग्लिम्पसेस ऑफ वर्ल्ड हिस्टरी ", " ॲन आटोबियाग्रफी " (१९३६) आणि " द डिस्कव्हरी ऑफ इंडिया " (१९४६) आणि " अ बंच ऑफ ओल्ड लेटर्स (१९५८). ह्या पुस्तकांमुळे नेहरूंचा, साहित्यिक म्हणून लौकिक झालेला आहे. " ग्लिम्पसेस...." मध्ये २६ ऑक्टोबर १९३० ते ९ ऑगस्ट १९३३ या तीन वर्षात आपल्या मुलीला लिहिलेल्या पत्रांतून त्यांनी जगाचा धावता इतिहास मांडला आहे. स्वतः नेहरूंनी उपशीर्षकात या ग्रंथाचे वर्णन " अ रॅम्बलिंग अकौंट ऑफ हिस्टरी " असे केले आहे. " द डिस्कव्हरी ऑफ इंडिया " हा भारताच्या इतिहासाचा मागोवा घेणारा ग्रंथ असला, तरी त्यातले एकूण प्रतिपादन व्यक्तिगत निरीक्षणे मते आणि श्रद्धा यांना एका सर्वसाधारण तात्विक चौकटीत तपासून पहाणारे आहे. एका अर्थाने या ग्रंथाला आत्मचरित्राची दुसरी बाजू म्हणूनही पाहता येऊ शकते. जगाच्या धावत्या इतिहासात, भारताच्या इतिहासाविषयी प्रदीर्घ विचार करता आला नाही, त्याची उणीवही या ग्रंथात भरून काढल्याचे जाणवते. विवेचनाच्या सोयीसाठी आत्मचरित्र म्हणजे " स्व " चा इतिहास अशी व्याख्या केली, तर नेहरूंच्या या तीन ग्रंथांचा प्रमुख आस्थाविषय ' इतिहास ' असल्याचे स्पष्ट होते. स्व, देश आणि जग अशी तीन समकेन्द्री वर्तुळे त्यांच्या चिंतन-लेखनाचा विषय झालेली दिसतात.

हे लेखन आत्मशोधाची विविधरूपे म्हणूनही पाहता येते. वर्तमान, भारताचा भूतकाळ, अखिल मानवजातीचा भूतकाळ आणि प्रत्यक्ष राजकीय कृतीशीलतेतून व्यक्त होणारे माणसाचे कालोचित कर्तृत्व, हा नेहरूंच्या चिंतनाचा विषय होता. नेहरू इतिहास संशोधक किंवा इतिहासकार नव्हते, तसा त्यांचा स्वतःचा दावाही नव्हता. कारावासातील एकाकीपण आणि मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी, यातून पत्ररूपी इतिहास लिहिण्याची प्रेरणा त्यांना झाली असावी.

आपले चरित्र त्यांनी अत्यंत प्रवाही भाषेत लिहिलेले आहे. जीवनातील खाजगी वैयक्तिक तपशीलांनी यातला फारच मोजका शाब्दिक अवकाश व्यापलेला आहे. सार्वजनिक घडामोडींचा तपशील मात्र पुष्कळच आहे. चळवळीचा इतिहास, त्यातले चढउतार, केंद्रस्थानी असलेल्या व्यक्ती, गांधीप्रणित विचारसरणी याची अधिकृत सविस्तर माहिती आत्मचरित्रात आलेली आहे. परंतु पुष्कळदा काही गोष्टी न आठवल्यामुळे कदाचित वेगवेगळे ठराव, पानपूरके म्हणून घातले असावेत असा संशयही येतो. परंतु बहुतेक आत्मचरित्रातून जो आत्मसमर्थनाचा सूर जाणवतो त्याचा प्रत्यय नेहरूंच्या लेखनात फारसा जाणवत नाही. त्यामुळे विवेचनात मतभेदाची एक वैचारिक पातळी राखल्याची जाणीव होते. व्यक्तिगत अहंभावातून निर्माण झालेल्या संघर्षाविषयी खंत व्यक्त केल्याचे दिसते. परंतु सुभाषबाबूंच्या एकूण राजकारणाबाबत झालेले मतभेद मात्र अपेक्षित मोकळेपणाने चितारलेले आहेत असे वाटत नाही. एरवी नेहरूंनी काही व्यक्तिरेखा चांगल्या रीतीने चित्रीत केल्या आहेत. सौम्य मिस्कीलपणा आणि संयत विनोद यांचा वापर करून निंदा किंवा निर्भर्त्सना त्यांनी टाळली आहे. विद्यार्थी दशेतले कपूरतळ्याच्या महाराजांचे चित्र, बॅ. जीनांशी झालेले मतभेद किंवा भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाल्यामुळे युरोपात विस्थापित झालेल्या क्रांतीकारकांचे जगणे आणि त्यांची करूण अवस्था, त्यांनी नेमकेपणाने रेखाटली आहेत. ह्या पद्धतीच्या चित्रणात मोतीलाल नेहरू आणि गांधीजी यांच्यावरील लेखनात त्यांच्या कौशल्याचा कस लागलेला दिसतो. मोतीलाल नेहरूंच्या अखेरच्या दिवसांचे वर्णन करणारे प्रकरण या दृष्टीने वाचून पहाण्यासारखे आहे. तसेच " डिस्कव्हरी..... " मधील ' कमला नेहरू ' वरील प्रकरणही स्वाभाविकपणे काव्यमय होणाऱ्या निवेदनाचा उत्कृष्ट नमुना म्हणता येईल. सार्वजनिक जीवनाच्या धकाधकीत पतीपत्नीच्या

नात्यातली फारशी भोगता न आलेली आत्मीयता आणि प्रेमभावना, विरह आणि पत्नीचे दीर्घ आजारपण, याचे भावस्पर्शी मनोज्ञ निवेदन चटका लावणारे आहे. उच्चवर्गाची पार्श्वभूमी असलेल्या तरुणाचे गांधीच्या प्रभावामुळे झालेले परिवर्तन, असे जरी नेहरूंच्या शिष्यत्वाचे स्वरूप असले तरी त्यातून गांधींच्या विलक्षण प्रभावाचे प्रातिनिधीक स्वरूपही स्पष्ट होते. स्वातंत्र्यलढ्याच्या केंद्राजवळ असलेल्या नेत्याच्या दृष्टितून १९३६ पर्यंतच्या स्वातंत्र्यचळवळीचा पट आपल्यासमोर आत्मचरित्रातून उलगडत जातो.

नेमकेपणाने व्यक्तिरेखा चित्रीत करण्याची हातोटी नेहरूंच्या '' ग्लिम्पसेस्... '' मध्ये त्यांना फारच उपयुक्त ठरलेली आहे. जगाच्या इतिहासातील प्रसिद्ध आणि दुर्दम्य व्यक्तित्वांची चित्रे त्यामुळेच ते जिवंत करू शकले. ह्या पत्रांच्या लिखाणामागचा संदर्भ लक्षात घेतला की, त्यातली उद्‌बोधकता स्पष्ट होते. सुबोध भाषा, काहीसे गोष्टीवेल्हाळ निवेदन आणि विचार करायला प्रवृत्त करील एव्हढी, प्रचलित मतांना नाकारणारी संयम प्रक्षोभकता; असे या पत्रांचे शिक्षकी थाटाचे स्वरूप आहे. एरवी पत्रलेखनात जाणवणारी अनौपचारिकता आणि सहजता त्यामुळेच या लेखनात अभावानेच दिसते. '' अ बंच ऑफ ओल्ड लेटर्स् '' मधली पत्रे जास्त अनौपचारिक आणि गुणवत्तेच्या दृष्टीने अधिक प्रभावी वाटतात. रूढ मतांवर नेहरूंनी घेतलेले आक्षेप पूर्णपणे पूर्वग्रहदूषित आहेत असे ठामपणे म्हणता येणे कठीण आहे. '' ग्लिम्पसेस्.... '' मधील इतिहासातील काही व्यक्तींचा आणि त्यांच्या कार्याचा विचार त्यांनी '' डिस्कव्हरी..... '' मध्येही केलेला आहे. काही निवडक उताऱ्यांची तुलना करून पाहिली की या दोन्ही लेखनामागच्या प्रेरणा भिन्न असल्याचे चटकन् ध्यानात येते. '' डिस्कव्हरी... '' चे स्वरूप अधिक आत्मशोधपर आणि वैचारिक स्वरूपाचे आहे. स्वतःपुरते का होईना; परंतु स्वातंत्र्यचळवळीसाठी एक वैचारिक अधिष्ठान नेहरूंना भारतीय इतिहासातून शोधून काढायचे होते. समकालीन पिढीची ती तातडीची गरजच होती. इतिहासशास्त्राच्या वस्तुनिष्ठ बैठकीला आणि तज्जन्य इतिहासलेखनाच्या साधनसामग्रीच्या अभावी, भूतकाळाचे गौरवशाली मोहक चित्र रेखाटण्याचा आणि त्यातून अभिमान आणि राष्ट्रीय अस्मिता जोपासण्याचा मार्ग; स्वाभाविकपणे सुचणारा आणि संमोहक ठरतो. नेहरूंनी हा धोका यशस्वीपणे टाळला. जगाच्या इतिहासाचे भान, इंग्लंडमधील शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टी यामुळे त्यांना हा मोह टाळता आला असावा. म्हणून हिंदूधर्म, मार्क्सवाद, युरोपातल्या समकालीन घडामोडी, महायुद्ध, रशियन क्रांती या गोष्टींच्या मतितार्थाचे भान त्यांच्या भारताच्या भूतकाळाच्या चित्रणात सतत जाणवते. परंतु तरी काही प्रतिकांची चित्रणे त्यांना प्रवाही अशा काव्यात्म भाषेतच करणे भाग पडले. आपल्या वांशिक भूतकाळाच्या स्मृतींचाच तो अविभाज्य घटक असल्याचे त्यांनी सुचविलेले आहे. परंतु वेदकालीन संस्कृतीपासून ते आजपर्यंत काहीएक अंतःसूत्र शोधण्याचा आणि या अंतःसूत्राची समकालीन प्रयोजकता जाणण्याचा नेहरूंचा प्रयत्न प्रामाणिकच ठरतो. वसाहतवादाच्या दडपणामुळे घडलेल्या मानसिकतेचे प्रातिनिधीक प्रतिबिंब म्हणूनही त्याकडे पाहिले पाहिजे.

नेहरूंची भाषाशैली सरळ सुबोध असली, तरी ती पूर्णपणे आधुनिक इंग्रजीला समांतर अशी नव्हती. ज्याकाळात त्याचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण इंग्लंडमध्ये झाले, त्या काळातल्या शैलीचे आणि त्यांच्या चौफेर वाचनाचे संस्कार तिच्यावर दिसतात. जागोजागी त्यांनी आपल्या निवेदनाला पुष्टी देणारी उद्धरणे दिलेली आहेत. समकालीन इंग्रजी काव्य आणि काही फ्रेंच भाषेतली उद्धरणे यावरून त्यांच्या वाचनाचा आवाका सहज ध्यानात येतो. विज्ञानाचे शिक्षण किंवा कायद्याची पदवी यांचे संस्कार त्यांच्या लेखनावर फारसे दिसत नाहीत. वस्तुनिष्ठ, तर्काधिष्ठित

आणि तपशील संपृक्त, लयबद्ध गद्य किंवा शाब्दिक जुळणीच्या बारकाव्यातून एखादी बाजू लावून धरण्याची विधिज्ञांना साध्य झालेली संगतवार मांडणी; असे त्यांच्या शैलीचे विशेष नव्हते. उलट निसर्ग, पक्षीजीवन, ऋतुचक्राने नियमित होणारे वनस्पतीजीवन आणि मानवी स्वभावातील भावनिक आंदोलने यांच्या जाणिवेने, त्यांच्या गद्याला काव्याला साजेसा एक पदर लाभलेला दिसतो. त्यामुळे त्यांचे इतिसावरचे लेखन कोरडे किंवा नीरस होत नाही. एच. जी. वेल्स् यांच्या जगाच्या इतिहासावरचे लेखन इतिहास म्हणून उत्कृष्ट असले, तरी त्यांची शैली संथ आणि नीरस वाटते. तुलनेने नेहरूंचे लेखन प्रवाही आणि वाचनीय होते. प्लुटार्कच्या इतिहासाला नायककेन्द्री विश्लेषणाची झाक आहे. नेहरू आपल्या प्रतिपाद्य काळातल्या थोर व्यक्तींची ऐतिहासिक कामगिरी सहजपणे बोलकी करतात. गिबन किंवा टॉयंबी किंवा आपल्याकडील कोसंबी यांच्या इतिहासाच्या लेखनमागची व्यापक तात्विक बैठकही नेहरूंच्या लेखनात दिसत नाही. वर महटल्याप्रमाणे नेहरूंचे इतिहासावरील लेखन पुरेसे व्यापक असले, तरी त्यामागचे प्रयोजन मर्यादित होते. एकतर विशिष्ट वयोगटातील तरुणांना उद्बोधक ठरेल असे भूतकाळाचे दर्शन; किंवा समकालीन परिस्थितीशी प्रयोजक ठरणारी भूतकाळाची आत्मशोधाला पोषक ठरणारी मांडणी, ही त्यांच्या लेखनाची प्रधान उद्दिष्टे होती. वसाहतवादामुळे निर्माण झालेली मानसिकता आणि परकीय सत्तेचे जोखड फेकून देण्याची निकड यातून स्वतःची मानसिकता, इतिहास आणि राष्ट्रीय अस्मिता; तसेच एक लोकसमूह म्हणून असलेली सांस्कृतिक मूल्यव्यवस्था यांनी मुक्त असलेली विचारसरणी असणे, ही काळाची गरज होती. वैज्ञानिक दृष्टीवर आधारलेली आक्रमक पाश्चात्य संस्कृति आणि संथ शांतताप्रिय भारतीय संस्कृति यांच्या अनुस्यूत संघर्षाचे भान हा युगधर्म; नेहरू आणि त्यांच्या समकालीन नेत्यांच्या मानसिकतेचा अविभाज्य घटक होता. स्वतः नेहरूंनी आपली मनोवृत्ती धड पाश्चात्यही नाही आणि धड पौर्वात्यही नाही असे म्हटले आहे. काळाच्या दबावाने, ऐतिहासिक परिस्थितीच्या रेट्याने आणि " स्व " च्या मानसिकतेने घडलेली बेघर जाणीव नेहरूंच्या लेखनाचे अंतःसूत्र म्हणता येईल. नेहरूंच्या स्वातंत्र्योत्तर राजकारणावर टीका करणारे, म्हणूनच त्यांना चेष्टेने शेवटचे व्हाईसरॉय म्हणत असत, ते काही अगदीच निरर्थक विधान ठरवता येणार नाही. या दृष्टीने नेहरूंच्या आत्मचरित्राची तुलना गांधीजींच्या " सत्याचे प्रयोग " शी करणे श्रेयस्कर ठरते. गांधीजींच्या लेखनाचा संपूर्ण रोख हा निखळ आत्मशोधाचा, देशी आध्यात्मिक-आत्मिक उन्नतिचे पारंपरिक बळ शोधण्याचा आणि व्यापक स्वरूपाचे वैयक्तिक-सामाजिक अधिष्ठान शोधण्याचा आहे. त्यांची भाषाही त्यामुळे सोपी, बोलीभाषेला जवळ, अनलंकृत, पारदर्शक आणि मौलिक ठरते. आत्मचरित्र आणि डिस्कव्हरीमध्ये आपले नायकत्व आणि जनमानसातील या नायकत्वाची प्रतिमा; या दोन्हीचा विसर पडून केलेले शुद्ध निवेदन असे प्रांजळ स्वरूप नेहरूंच्या लेखनाला अर्थातच लाभलेले नाही. गांधी आणि नेहरू यांच्या संवेदनशीलतेची तुलना म्हणूनच श्रेयस्कर ठरते. गांधीजींच्या राजकारणातील बराचसा कार्यक्रम, विचारपद्धती आणि त्यांची लोकमानसातील महात्म्याची प्रतिमा यांचा नेहरूंना पुष्कळदा अडसर वाटत असला पाहिजे. परंतु देशातील एकंदर सामाजिक-राजकीय परिस्थिती आणि गांधीजींची लोकप्रियता याचा, त्यांचे वारस म्हणून नेहरूंना राजकीय फायदा निश्चितच झालेला दिसतो. राजकारणातील नैतिकतेचा आणि मूल्यव्यवस्थेचा आग्रह आणि त्यातून जन्मलेली कटिबद्धता; हे गांधींच्या जीवनाचे चटकन लक्षात येणारे सूत्र होते. इहलोकनिष्ठ, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नवीन पाश्चात्य विचारसरणी यातून जन्मलेली राजकीय गतिशीलता असे नेहरूंच्या व्यक्तिमत्वाचे स्वरूप होते. ढोबळ मानाने असे म्हणता येईल की, पाश्चात्य मानसिकतेच्या मुशीत घडविलेल्या नेहरूंच्या मनोवृत्तीला, गांधींच्या रूपाने पौर्वात्य मानसिकतेचा

साक्षात्कार झाला. गांधी आणि प्राचीन भारताचा इतिहास या दोन गोष्टी नसत्या तर नेहरूंचा एकंदर दृष्टिकोन पाश्चात्यच राहिला असता. पूर्व आणि पश्चिम असा संघर्ष त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या आणि लेखनाच्या केन्द्रस्थानी दिसतो. या अर्थाने, त्यांचे लेखन मनःपूर्वक आणि प्रमाणिक म्हटले पाहिजे.

भारतीय लोकांची, इंग्रज भारतात स्थिर झाल्यापासून ते स्वातंत्र्य मिळेपर्यंत आणि स्वातंत्र्यानंतर तात्विक पातळीवरची तातडीची समस्या; खरेतर इतिहासच आहे. कारण इतिहास आणि ऐतिहासिक दृष्टी याचे भारतीयांचे भान तुलनेने अगदी अलिकडचे आहे. म्हणूनच नेहरूंच्या ग्रंथाचे " डिस्कव्हरी ऑफ इंडिया " हे नावही फार बोलके आहे. एका अर्थाने प्रत्येक भारतीयाला ' आपला भारत ' अशा ऐतिहासिक दृष्टीने शोधण्याची गरज आहेच. म्हणूनच नेहरूंना पाश्चात्यांनी आणि विशेषतः इंग्रजी इतिहासकारांनी लिहिलेला भारताचा इतिहास, मान्य होण्यासारखा नव्हता. त्यामागे कळत नकळत साम्राज्य टिकविण्याचे सुप्त तत्त्वज्ञान होते. भारतीय इतिहासाचे हिंदू, मुस्लिम आणि ब्रिटीश असे कालखंड पाश्चात्यांना सोयीचे असले तरी वस्तुस्थितीदर्शक आणि तर्कसंगतही नव्हते. नेहरूंच्या लेखनात या कालखंड विभाजनाची घातकता स्पष्ट जाणवते. त्यामुळे त्यांनी मुसलमान, भारतात त्यांची आक्रमणे सुरू होण्याच्या कितीतरी अगोदर, म्हणजे इ.स. ७१२ मध्ये आले याची आवर्जून नोंद केलेली आहे. खिश्चनाच्या बाबतीत तर हा काळ अजून मागे जातो. तो येशूच्या समकालीन नसला, तरी त्याच्या शिष्यांच्या समकालीन म्हणता येऊ शकतो. इ.स. ५२ मध्येच खिश्चन भारतात आले. भारताच्या इतिहासाचे पुनःर्लेखन अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळेही आपल्या सामाजिक-राजकीय जीवनात गुंतागुंत निर्माण झालेली दिसते. अगदी आजच्या संदर्भात विचार केला तरी नेहरूंच्या इतिहास लेखनाची प्रयोजकता आपल्याला पटू शकते. सध्या आपल्याला छळत असलेल्या अनेक जटिल समस्यांचा इतिहास, आपण त्यांच्या लेखनातून समजावून घेऊ शकतो. या दृष्टीने त्यांचे लेखन आजही महत्त्वाचे ठरणारे आहे. परंतु त्यामुळे ते थोर साहित्यिक कोटीतले आहे अशी धारणा असण्याची वास्तविक गरज नाही.

जगाकडे पाहण्याची स्वच्छंदतावादी दृष्टी आणि राजकारणातला अटळ कठोर वास्तववाद यातला संघर्ष नेहरूंच्या व्यक्तिमत्वात जाणवतो. त्यामुळे जीवनातील, निसर्गातील सौंदर्यबोध घेणारी काव्यवृत्ती आणि वास्तवाचे भान यातला तणाव त्यांच्या लेखनशैलीचा मूलस्त्रोत म्हणता येईल. कुठलाही औपचारिक संदर्भ नसताना लिहिलेली " अ बंच ऑफ ओल्ड लेटर्स " मधील पत्रे जास्त दर्जेदार ठरतात. परंतु भारताची समकालीन परिस्थिती हे एक थोर नाट्य मानले; तर त्यातील एका प्रधान पात्राची स्वगते म्हणून नेहरूंच्या लेखणाकडे पाहता येईल. या नाट्याच्या प्रवाहीपणात दोलायमान झालेल्या, आपल्या आत्म्याचा शोध घेणाऱ्या व्यक्तीचे दर्शन आपल्याला होत राहते. ह्या दृष्टीने त्यांचे लेखन आत्मनिष्ठ आणि प्रामाणिक निश्चितच आहे.

□□□

# राष्ट्रवादावर नेहरू

□ म. स. गोरे

जवाहरलाल नेहरू यांच्या नावाने नव्याने प्रस्थापित झालेल्या स्थायीनिधीनुसार व्याख्यान देण्यासाठी पहिला माणूस म्हणून, मला आमंत्रित करण्याचा सन्मान मला दिल्याबद्दल पाँडिचरी विद्यापीठाचा मी कृतज्ञ आहे. मला प्रारंभी सांगितलेच पाहिजे की, मी नेहरूंवर कोणतेही प्रधान कार्य केलेले नाही आणि या प्रतिष्ठित मालिकेचे उद्घाटन करावयाला निमंत्रित केले जाण्याचा माझा केवळ दावा एवढाच दिसतो की, गेल्या वर्षी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाने आयोजित केलेल्या शतसांवत्सरिक भाषणांचा एक भाग म्हणून नेहरूंच्या विचाराच्या एका पैलूवर मी दिलेले व्याख्यान. नेहरूंचे लक्षपूर्वक वाचन मला लाभदायक आढळले आणि म्हणून, उप-कुलगुरू डॉ. वेंकट सुब्रमणिअन यांनी पाठविलेले आमंत्रण स्वीकारताना मला अधिकच आनंद झाला. या व्याख्यानासाठी मी 'राष्ट्रवाद' हा विषय निवडला आहे आणि माझा प्रयत्न असेल राष्ट्रवादाचा विषयावरील नेहरूंचे विचार एकत्र ठेवणे; आणि विश्लेषण करणे.

नेहरूंचे राष्ट्रवादावरील विचार महत्त्वाचे आहेत, कारण नेहरू, गांधीप्रमाणे जरी भिन्न मार्गाने, राष्ट्रवाद्यापेक्षा अधिक होते. सत्य आणि प्रेम यावरील गांधींच्या आस्थेने एक नैतिक मनुष्यप्राणी म्हणून त्यांची स्वतःची सचोटी, तडजोड न करता सत्तेला तोंड देण्यासाठी मार्ग शोधून काढावयाला त्यांना आव्हान दिले. नेहरूंच्या स्वातंत्र्याच्या शोधाने विशाल विश्व संदर्भात एका बाजूला राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रीयवाद यांच्यामध्ये मेळ घालण्याच्या शृंगापत्तीला तोंड देण्याकडे त्यांना नेले आणि दुसऱ्या बाजूला उप-राष्ट्रीय गटांच्या स्वातंत्र्य आणि स्वायत्तता यांच्यासाठीच्या इच्छेने! या शृंगापत्ती; त्यांच्या जीवनांमध्ये संबद्ध झाल्या, कारण गांधी किंवा नेहरू, त्यांच्या संपूर्ण जीवनामध्ये जरी राजकारणांत गढून गेले होते, तरी केवळ राजकारणी नव्हते, केवळ राष्ट्रवादी सुद्धा नव्हते. ते असे पुरुष होते की, ज्यांना संपूर्ण मानवजातीच्या परिभाषेत विचार करणे अपरिहार्य वाटत होते जरी त्याच्या फक्त एका भागाच्या स्वातंत्र्यासाठी लढणे हे त्यांचे विशिष्ट उद्देश्य होते.

नेहरूंनी आपली शृंगापत्ती कशी हाताळली, याबाबत इथे आपण संबंधित रहाणार असू. असे करताना आपण नेहरूंच्या राष्ट्रवादाच्या संकल्पना, भारतातील राष्ट्रवादाच्या उत्क्रांतीचे त्यांचे चित्रण, दर्प आणि राष्ट्रवादाच्या दुव्याचे त्यांचे अधोरेखन, राष्ट्रीयता आणि मानववंशीयता यांच्या प्रतिदाव्यांची त्यांची जाणीव; आणि आंतरराष्ट्रीय सुव्यवस्थेच्या मागणीशी राष्ट्रवाद सुसंगत करण्याचे त्यांचे प्रयत्न, हे समजून घेण्याचा आपण प्रयत्न करू.

**राष्ट्रवादाची संकल्पना :**

जरी नेहरूंनी आपल्या आत्मचरित्रात, त्याचप्रमाणे ' शोधा 'त सुद्धा भारतातील राष्ट्रवादाच्या प्रारंभ आणि उत्क्रांतीबद्दल विस्तृतपणे लिहिलेले आहे—इतिहासाच्या अगोदरच्या कालखंडात तसेच समकालीन युगामध्ये सुद्धा–तरी त्यांच्या लेखनात त्या संकल्पनेची व्याख्या करण्याचा कोणता प्रयत्न आढळणे कठीण आहे. तथापी ' शोधा 'तील एका मुद्यावर त्यांना त्याचा कोणता अर्थ भावतो हे निवेदन करण्याच्या अगदी जवळ ते येतात. ' राष्ट्रीय विचाराचे महत्त्व ' (पृ. ४३५-४४३) याचा एका विभागात विचार करताना ते म्हणतात, " राष्ट्रवाद ही सारतः भूतपूर्व कामगिरींची, परंपरांची आणि अनुभवांची एक समूहस्मृती आहे आणि राष्ट्रवाद आज पूर्वी कधीही होता असेल त्यापेक्षाही अधिक प्रबळ आहे " (पृ. ४३५) या वाक्याचा पहिला भाग आहे त्याच्याशी इथे आपला संबंध येतो. ह्यानुसार राष्ट्रवाद एक भावना आहे; जी आपपरतेची जाणीव बळकट करते, अस्मितेसाठी, एकत्र आणणाऱ्या बिंदूसाठी, केंद्रस्थानाची तरतूद करते. हे ' राष्ट्र ' काय आहे; ज्याच्याभोवती राष्ट्रीयत्त्वाची भावना स्थिरावते ? ते लोक धारण करतात ते राज्यक्षेत्र आहे ? –ती मानववंशीय अस्मिता आहे ?–तो सर्वसामान्यधर्म आहे ? ती सर्वसामान्य भाषा आहे ? नेहरू हे प्रश्न इथे उपस्थित करीत नाहीत. त्यांचा मुख्य मुद्दा या विभागामध्ये ठामपणे सांगण्याचा हा आहे की, चालू विश्वसंदर्भामध्ये राष्ट्रवाद अजूनही संबद्ध आहे. " पुष्कळ लोकांना वाटले की राष्ट्रवादाचा त्याचा आपला दिवस होता आणि आता त्याने आधुनिक जगाच्या निरंतर वाढत जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रवृत्तींना अपरिहार्यपणे जागा दिलीच पाहिजे." (पृ. ४३५) नेहरू युक्तीवाद करतात की, हे असे नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे राष्ट्रवादी भावनेचा जन्मलोक म्हणून स्वतःच्या अस्मितेच्या आव्हानामध्ये असतो असे दिसते. ते म्हणतात, " ..... जेव्हा जेव्हा अरिष्ट उद्भवले आहे; तेव्हा तेव्हा राष्ट्रवाद पुनः उदयाला आला आहे आणि त्या स्थळावर त्याने वर्चस्व गाजविले आहे; आणि लोकांनी त्यांच्या जुन्या परंपरांमध्ये आराम आणि बळ धुंडाळले आहे. विद्यमान युगाच्या लक्षणीय विकासांपैकी एक विकास आहे भूतकाळाचा आणि राष्ट्राचा पुनर्शोध." (शोध, पृ. ४३६)

**भारतीय इतिहासातील राष्ट्रीय भावना :**

भारतीय इतिहासाच्या अगोदरच्या कालखंडाची चर्चा करताना लोकांमध्ये त्यांच्या राष्ट्रीय अस्मितेची जाणीव जागृत करण्यामध्ये ' विदेशी ' चे महत्त्व नेहरूंनी जोर देऊन सांगितले आहे. परंतु ' विदेशी ' ने स्वतःला स्थानिक समाजाचा भाग केले किंवा नाही यावर बरेच अवलंबून असलेले दिसले. हा मुद्दा ते कुशाणांच्या संदर्भात मांडतात.

" कुशाणांनी स्वतःचे भारतीयीकरण केलेले होते आणि भारतीय संस्कृतीचे ते आश्रयदाते झाले होते. तथापी त्यांच्या राजवटीला राष्ट्रीय प्रतिकाराचा एक अंतःप्रवाह चालू होता आणि नंतर जेव्हा ताज्या दमाच्या जनजाती भारतात घुसल्या,; तेव्हा खिस्तोत्तर चौथ्या शतकाच्या प्रंरभी ह्या राष्ट्रीय आणि विदेशी विरोधी चळवळीला आकार प्राप्त झाला. दुसरा महान शासक, ज्याचे सुद्धा नाव चंद्रगुप्त असलेला, त्याने या नव्या अनधिप्रवेशींना बाहेर हाकलून लावले आणि शक्तीमान आणि विशाल साम्राज्य प्रस्थापित केले...... पुनः पुनः झालेल्या स्वाऱ्यांनी एक प्रबळ विदेशी विरोधी भावना निर्माण केली होती; आणि देशातील जुन्या **ब्राह्मण-क्षत्रिय** घटकावयवाना त्यांच्या मातृभूमिच्या आणि संस्कृतीच्या संरक्षणाच्या परिभाषेत विचार करणे भाग पाडले होते. विदेशी घटकावयव, जे सामावून घेण्यात आले होते, त्यांचा स्वीकार करण्यात आला होता, परंतु सर्व नवागताना कडव्या प्रतिकाराला तोंड द्यावे लागले होते आणि जुन्या ब्राह्मणी आदर्शांवर आधारलेले

एकजिनसी राज्य उभारण्याचा प्रयत्न करण्यात आला होता...... (भारत) इतःपर हे व्यत्यय दुर्लक्षित करू शकत नव्हता; ज्यांनी केवळ त्याची राजकीय संरचना उध्वस्त केली होती असे नव्हे, तर त्याच्या सांस्कृतिक आदर्शांना आणि सामाजिक संरचनेला सुद्धा धोका निर्माण केला, ती प्रतिक्रिया मूलतः राष्ट्रीयतावादी होती, राष्ट्रवादाच्या बळासह त्याचप्रमाणे संकुचितत्त्वासह.'' (शोध पृ. १०५ आणि १०६)

वर उधृत केलेला भाग उदीयमान राष्ट्रवादी भावनेच्या संबंधात अनेक मुद्दे उपस्थित करतो. प्रथम, ' विदेशी ' ची भूमिका. ज्या देशाने नव्या जेत्यांच्या आणि नव्या लोकांच्या लाटा उत्तरोत्तर पाहिल्या होत्या; त्यामध्ये विदेशी कोण होता ? ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकाच्या विशिष्ट संदर्भात नेहरू सुचवितात की ' विदेशी ' कुशाण होते. ते भारतीय समाजाच्या धार्मिक-सांस्कृतिक जाळ्यात साजेसे बसले नाहीत किंवा बसू शकले नाहीत.

हा उतारा एका नव्या अप्रगल्भ अस्मितेच्या भोवती लोकांना बोलके करणे आणि सुसज्ज करणे; यातील–ब्राह्मण आणि क्षत्रिय– या उच्चभ्रूंच्या गंभीर भूमिकेकडे सुद्धा इशारा करतो. हे अस्मितेचे प्रपादन एका बाजूने विदेशी आक्रमकांच्या विरुद्ध होते परंतु ते अंतर्गत, परंतु सामावून न घेतलेले धार्मिक-सांस्कृतिक ' विदेशी ', बुद्ध धर्म, याविरुद्ध सुद्धा होते.

नेहरू असे सुद्धा दाखवून देतात की, राष्ट्रवादाचा संकुचित करणारा, निर्बंधित करणारा परिणाम होतो ; ती मूलतः सीमा घालून देणारी, सीमा निश्चित करणारी भावना आहे. अंतर्समूहाची व्याख्या बहिर्समूहाच्या व्याख्येइतकीच महत्त्वाची आहे. किती संमिश्र बहुपैलूदार, किती अमूर्त आणि तरीही राष्ट्राची कल्पना किती शक्तीमान आहे; हेही उदित होणारी राष्ट्रीय अस्मिता विनिर्दिष्ट करण्याच्या नेहरूंच्या प्रयत्नावरून दिसून येईल.

'' ते धर्म आणि तत्त्वज्ञान, इतिहास आणि परंपरा; रूढी आणि सामाजिक संरचना यांचे मिश्रण, ज्याने आपल्या विशाल आवाक्यामध्ये त्यावेळच्या भारतीय जीवनाच्या बहुतेक प्रत्येक पैलूचा समावेश केला आणि ज्याला ब्राह्मणधर्म म्हणता येईल किंवा (नंतरचा शब्द उपयोजायचा तर) हिंदूधर्म; राष्ट्रवादाचे प्रतीक झाले. त्या सर्व सखोल सहजप्रवृत्तींना, त्याचे आवाहन असलेला तो खरोखर राष्ट्रीय धर्म होता. जो आज सगळीकडे राष्ट्रवादाचा पाया बनवतो..... परंतु बुद्धधर्म हा मूलतः आंतरराष्ट्रीय, एक विश्वधर्म होता आणि जसा तो विकसित होत गेला आणि पसरला, वाढत्या प्रमाणात तो तसा झाला. अशा रीतीने जुन्या ब्राह्मणी श्रद्धेला, पुन्हा पुन्हा, राष्ट्रीय पुनरूज्जीवनांचे प्रतीक बनणे स्वाभाविक होते.'' (शोध, पृ. १०६)

अशा रीतीने गुप्त कालखंडातला राष्ट्रवाद हा एका अर्थाने प्रादेशिकतेने आर्यावर्त किंवा भारतवर्षाला अनुबंधित होता व दुसऱ्या अर्थाने धर्माला. परंतु जरी धार्मिक अनुबंध स्पष्टपणे ओळखता येण्यासारखा होता, तरी प्रादेशिक अनुबंध तात्पुरता आणि दुबळा होता. कारण राजाराजांमधील युद्धांनी आणि साम्राज्यांच्या बदलत्या सरहद्दीनी राजकीय सीमांचा बदलण्याकडे कल होता. तथापी, सुस्पष्ट अस्मितेचा हा धार्मिक आधार, नंतर स्वतःच इस्लामच्या आगमनाने मुस्लीम राजे आणि वर्चस्वपूर्ण मुस्लिम सरदारवर्गाने युक्त राजांच्या; प्रस्थापनेने डळमळीत झाला होता. शतकानुशतके सांस्कृतिक संश्लेषण उत्क्रांत झाले, विशेषतः उत्तर भारतामध्ये तरी मोगल राजे एक शक्तिमान आणि विशाल साम्राज्य प्रस्थापित करण्यात यशस्वी झाले होते. परंतु राष्ट्रीय अस्मितेचा विकास करण्यात त्यांना यश आले नाही. कारणे अनेक होती. नेहरूंचे विश्लेषण सुचविते त्याप्रमाणे,

१४ व्या आणि १६ व्या शतकांमध्ये; आणि १७ व्या आणि १८ व्या शतकांमधील तंत्रविद्याविषयक क्रांतीच्या आरंभी युरोपने पुनरूज्जीवनाचा अनुभव घेतला होता. तरीही भारत मध्यमयुगीन विज्ञान आणि तंत्रविद्येमध्ये कुंठित आणि रूतलेला राहिला. दर्यावर्दीपणा आणि शस्त्रास्त्रांमध्ये भारत मागे पडत गेला. '' अरब लोक; ज्यानी काही मर्यादेपर्यंत व्यावहारिक विज्ञानाचे अगोदरचे आरंभ विकसित केले होते आणि युरोपमधील मध्ययुगाच्या अंधारमय कालखंडामध्ये अनेक मार्गांनी ज्ञानाचे पुनःसरण केले होते, ते बिनमहत्त्वाचे आणि मागास झाले.'' (शोध, पृ. २५४). नेहरूंना वाटते की, अकबरने सामाजिक परिवर्तनाचे पाये घातले असते, परंतु '' आपले साम्राज्य एकत्र बांधण्यात तो कितीतरी गुंतलेला होता आणि मोठी समस्या त्याच्यासमोर येत होती. ती होती इस्लामसारख्या धर्मांतर करीत राहणाऱ्या धर्माचा राष्ट्रीय धर्म आणि लोकांच्या रूढी यांच्याशी मेळ कसा घालायचा आणि अशा रीतीने राष्ट्रीय ऐक्य कसे उभारायचे! त्याने तर्कसंगत तत्त्वाने धर्माची अर्थउकल करण्याचा प्रयत्न केला.... परंतु हा सरळ दृष्टीकोन यशस्वी झाला नाही.....'' (शोध, पृ. २१६)

नेहरू पाहतात की ब्राह्मणी कालखंडामध्ये '' धर्म आणि राष्ट्रवाद यांच्या संयोगाला आणि दोन्ही घटकावयवांकडून संलग्नता प्राप्त झाली. आणि तरीही त्याचा अंतिम दुबळेपणा आणि अपुरेपणा सुद्धा त्या मिश्रणातून प्राप्त झाला होता. कारण तो फकत अनन्य आणि आंशिक राष्ट्रवाद असू शकत होता, भारतातील अनेक घटकावयव; जे त्या धार्मिक क्षेत्राच्या बाहेर राहिले होते, त्यांचा समावेश न करता. हिंदू राष्ट्रवाद ही भारताच्या भूमीपासूनची स्वाभाविक वाढ होती. परंतु अपरिहार्यपणे विशाल राष्ट्रवादाच्या मार्गात ती आडवी येते; जो धर्म किंवा पंथ यांच्या भेदांपलिकडे उदय पावतो. (शोध, पृ. २२३)

वॉरन हेस्टिंग्जला उद्‌धृत करून नेहरू सुचवितात की, भारतात सतराव्या शतकामध्ये बहुधा फक्त मराठे लोक '' राष्ट्रीय संलग्नतेचे तत्त्व '' धारण करीत होते. तरीही राष्ट्रीय भावना मराठी भाषिक क्षेत्रांपुरतीच परिरूद्ध झालेली असेल. ' तरीसुद्धा ' ते पुढे लिहितात '' मराठे लोक त्यांच्या राजकीय आणि सैनिकी यंत्रणेमध्ये, त्याचप्रमाणे त्यांच्या सरावांमध्ये व्यापक होते आणि त्यांच्यामध्ये एक कोणती तरी आंतरिक लोकशाही होती. '' (शोध, २२३)

**राष्ट्रवादाला हितावह घटक :**

ह्या विभिन्न विधानांवरून पाहता असे दिसते की, नेहरूंच्या म्हणण्याप्रमाणे विदेशीवर मात करण्याचे आव्हान, समान सांस्कृतिक बंध, धार्मिक व श्रद्धेच्या भेदांवर उठून उभे राहण्याची समर्थता, अंतर्गत सामाजिक लोकशाही, लोकांच्या बौद्धिक जीवनातील सर्वसाधारणपणे निर्माणक अवस्था हे काही घटक राष्ट्रीय भावनेच्या वाढीला हितावह आहेत.

आपल्या बहुतेक लेखनांमध्ये त्याच्या दीर्घ इतिहासाच्या अनेक कालखंडामधून भारताच्या मूलभूत ऐक्यावर नेहरूंनी जोर दिला आहे. तथापि तितकेच ते स्पष्टपणे पहात होते की, ही ऐक्याची भावना राष्ट्रवादासारखी तीच नव्हती. अमेरिकन श्रोतृवर्गासाठी लिहिलेल्या आणि जानेवारी-१९३८ मधील ' फॉरेन ॲफेअर्स, यू.एस.ए.' मध्ये प्रकाशित झालेल्या आपल्या लेखात (डोरोथी नॉर्मन, पृ. एक–५५४-५६०) ते म्हणाले,—

'' राष्ट्रवादाच्या आगमनापूर्वी इतर देशांप्रमाणे राजकीय ऐक्यासाठी इच्छा प्रायः शासकाची किंवा जेत्याची इच्छा होती आणि संपूर्ण लोकांची अशी नव्हती.''

एकोणिसाव्या शतकापूर्वी भारताचे ऐक्य हे मूलतः **सांस्कृतिक** होते–त्या संज्ञेच्या मर्यादित अर्थाने धार्मिक नव्हते किंवा राजकीय नव्हते. भारतीय संस्कृती " सुरुवात करायची तर अनन्य किंवा असहिष्णु नव्हती ; ती ग्रहणक्षम आणि अनुकूलनक्षम होती आणि अग्रगण्यत्वाच्या दीर्घ युगांनी तिला खोल मुळे आणि ऐक्यभाव दिला; जो वादळे डळमळीत करू शकली नाहीत..... या सांस्कृतिक ऐक्याच्या मागे आणि त्याला बळकटी देत आंतर मनुष्य आणि त्याचे बाह्य पर्यावरण यांच्यामध्ये सुसंवाद शोधण्याचा अविरत प्रयत्न होता."

परंतु त्यानी दाखवून दिले की भारतीय ऐक्यभावाचा भूतपूर्व अभिलेख उपयोगी पडत नव्हता. मध्यंतरीच्या शतकामध्ये पुराणमतवाद आणि साचेबंदपणा आत शिरला होता. या पार्श्वभूमीवर ते मान्य करतात की ब्रिटिशांनी भारताला **राजकीय ऐक्य** दिले. " हे दळणवळण आणि परिवहन यांच्या विकासामुळे आता शक्य झाले होते. ते आधीनतेतील ऐक्य होते. परंतु **त्याने समान राष्ट्रवादाच्या ऐक्याला बढती दिली. संयुक्त आणि स्वतंत्र भारताच्या कल्पनेने लोकांची पकड घेतली.**" (वाक्यावर जोर देण्यात आला आहे. डोरोथी न्नॉर्मन, एक–५५९)

दळणवळण आणि परिवहन यांच्या कार्याच्या महत्त्वावर विशेषतः नेहरूनी त्या व्याख्यानात जोर दिला होता; आणि त्यानी युक्तिवाद केला की, ही पुरःसरणे झाली नसती, तर संयुक्त संस्थाने सुद्धा शक्तिमान संघात विकसित झाली नसती आणि युरोपमध्ये ज्याप्रमाणे आहे, तशी छोट्या राष्ट्रीय घटकामध्ये दुभंगली असती. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्याच्या दीर्घ इतिहासाच्या ओघात भारतात फूट पडली होती. ही वस्तुस्थिती तेव्हा अस्तित्वात असलेल्या स्थितींमध्ये अपरिहार्य होती.

अशा रीतीने " समान अधीनता " आणि विदेशीविरुद्ध ध्वनित संताप, नव्याने लादण्यात आलेले भारताचे राजकीय ऐक्य आणि परिवहन आणि दळणवळणांचे नवे प्रकार हे भारतीय राष्ट्रवादाच्या उद्‌भवाला हितावह ठरले होते.

नेहरूंच्या दृष्टीने गुप्त कालखंडामधील भारताचा अर्धा कच्चा राष्ट्रवाद; पुनरूत्थित धार्मिक ऐक्यावर आधारला गेला होता; तरी मोगल कालखंडामध्ये राजनीतीच्या एकत्रीकरणाचे तत्त्व धर्माकडून अधिक व्यापक सांस्कृतिक आधाराकडे वळले होते आणि ब्रिटिश कालखंडामध्ये समान अस्मितेची जाणीव प्रशासकीय आणि राजकीय एकत्रीकरण, ' समान अधीनता ' आणि परिवहन आणि दळणवळण यांचे नवनवीन प्रकार, यानी जोपासली होती. परंतु नेहरू, एक ठाम राष्ट्रवादी, प्रपादन करतात, " भारतात आज त्याचे राजकीय दृष्टीकोन किंवा धार्मिक मते कोणतीही असोत. कुणीही राष्ट्रीय ऐक्यापेक्षा दुसऱ्या परिभाषेत विचार करीत नाही." १९३८ मध्ये हे लिहिले गेले आणि त्यानंतर थोड्याच वर्षामध्ये मुस्लिम लीगने तिची पाकिस्तानची मागणी उभी केली.

नेहरूंच्या बाबतीतील हा भूवास्तवाच्या जाणीवेचा अभाव समजण्यासाठी एखाद्याने हे ओळखले पाहिजे की, नेहरू हे केवळ एक विश्लेषक नव्हते तर बांधील कार्यकर्ते सुद्धा होते. ते राष्ट्रीय चळवळीची निर्माते होते आणि तिचे एक पुढारी सुद्धा. या राष्ट्रीय प्रेरणेला आकार देण्यात आणि दिशा देण्यात, ते काही थोडेथोडके जबाबदार नव्हते. बहुतेक राजकीय पुढाऱ्यांप्रमाणे त्याना जाणीव होती की, अभियाहाच्या कालखंडात अधिघोषणा नेहमी स्वयंपूर्तता करणाऱ्या भविष्यवाणी होऊ शकतात. भारतीय राष्ट्रवादाला तोंड द्यावे लागले त्या अनेक समस्या, त्याचे अंतर्गत परस्परविरोध आणि त्याचा पाया व्यापक करण्याची गरज; ज्यामुळे त्याचे आवाहन वर्ग, जात, प्रदेश आणि धर्म याच्यापलिकडे पसरेल, याची नेहरूंना जाणीव नव्हती असे नव्हे.



एन ४३९४–१६

## व्यापक आधारित राष्ट्रवाद

भारतीय राष्ट्रीय दलांच्या स्वरूपाची आणि रचनेची नेहरूंची सूक्ष्मभेदग्राहिता त्यांच्या बहुतेक लेखनांमध्ये पहाता येईल. त्यांच्या अगोदरच्या धार्मिक आणि वर्ग अनुबंधांची त्याना जाणीव आहे. ते म्हणतात की, एकोणिसाव्या शतकातील सुद्धा, भारतातील अगोदरच्या राष्ट्रवादाच्या लाटा या धार्मिक आणि हिंदू होत्या. मुस्लीम लोक त्याच्यापासून दूर राहिले. ते इंग्रजी शिक्षणापासून सुद्धा दूर राहिले होते; आणि अशा रीतीने नव्या विचारांची त्याना अल्प बाधा झाली होती. नंतर जेव्हा त्यानी आपल्या कवचातून बाहेर पडायला सुरूवात केली, हिंदूंप्रमाणे, त्यांच्या राष्ट्रवादाने मुस्लीम राष्ट्रवादाचे वळण घेतले. ह्या नव्या संधींना विलंबित प्रतिसाद देण्यामध्ये हिंदू आणि मुस्लीम यांच्यामधील तणावाचे मूळ राहिले होते. शिवाय, ब्रिटिश औद्योगिक धोरणांनी मुस्लीम कारागीर वर्ग नष्ट केला होता आणि मुस्लीम लोकांनी अजूनही विशाल मध्यमवर्ग विकसित केला नव्हता.

वकील, डॉक्टर, दुकानदार, व्यापारी आणि छोटा भारतीय भांडवलदार यांचा मिळून बनलेल्या नव्या इंग्रजीशिक्षित मध्यम वर्गाने विस्तारासाठी वाव शोधला. गरीब अधिक गरीब झाले होते परंतु वासाहतिक शोषणातील भागीदार म्हणून, उच्चभ्रू मध्यमवर्ग (बूर्झ्वा) काही मर्यादेपर्यंत भरभराटीला आला. तो मोठ्या प्रमाणातला हाच गट होता; जो भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (इंडियन नॅशनल काँग्रेस) तयार करावयाला एकत्र आला. ब्रिटिशांशी निष्ठा ठाम ठेवीत, त्यानी किरकोळ सुधारणा मागितल्या. परंतु नेहरू म्हणतात त्याप्रमाणे, काँग्रेस वाढली परंतु काँग्रेसपेक्षा सुद्धा अधिक वेगाने वाढली राष्ट्रीयत्वाची कल्पना; आणि स्वातंत्र्यासाठी इच्छा. दोन घटनांनी चळवळीला गतिमानता दिली असल्याचे दिसले– जपानचा विजय, एक आशियाई राष्ट्र, १९०४ मध्ये रशियावर आणि बंगालची फाळणी करण्याचा कुकल्पित ब्रिटिश पवित्रा. पहिले आशियाई-भारतीय अभिमानाचे अभिवर्धन होते आणि दुसऱ्याने बंगाली भावना दुखवून ब्रिटिश विरोधी संतापाची पातळी उंचावली. **स्वदेश** आणि **स्वदेशाची** आरोळी उठविण्यात आली. सुमारे त्याच सुमारास पश्चिम भारतामध्ये टिळक उदय पावले..... ते " नव्या भारताचे पहिले राजकीय पुढारी होते ; जे जनतेपर्यंत पोहोचले आणि त्यानी त्यांच्याकडून बळ घेतले. परंतु या दृश्यचित्रावर गांधीजी आले. त्यानंतरच फक्त राष्ट्रीय चळवळ दरिद्री जनतेसाठी आणि जनतेच्या बाजूने ठामपणे बोलताना दिसली. नेहरू आपल्या ' शोधा 'त नोंद करतात, " या शेतकरी आणि कामकरी वर्गांच्या पाठीवरून खाली उतरा, त्यानी (गांधीजीनी) आम्हाला सांगितले, तुम्ही सर्वजण; जे त्यांच्या शोषणावर जगतात ; या यंत्रणेतून जी दारिद्र्य आणि हाल निर्माण करते ....... मुक्त व्हा." (डोरोथी नॉर्मन, एक-३६१) १९२० मध्ये जेव्हा गांधीजींचे नेतृत्त्व काँग्रेसमध्ये ठामपणे प्रस्थापित झाले, तेव्हा **राष्ट्रीय चळवळीने** पूर्णपणे एक नवा टप्पा गाठला.

१९२९ मध्ये नेहरू **भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे** (महासभेचे) अध्यक्ष निवडले गेले असतानाही त्याना श्रमिक महासभेचे (ट्रेड युनियन काँग्रेस) अध्यक्षपद घेण्यासाठी सुद्धा निमंत्रित करण्यात आले होते. राष्ट्रीय चळवळीमध्ये कामगारांना आणण्याच्या गरजेची त्याना जाणीव होती. " मी आशा केली होती की, मी त्या दोघांमधील दुवा असेन आणि त्याना एकमेकाच्या अधिक जवळ आणीन........ " ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात (डोरोथी नॉर्मन, एक-१७६). ते पुढे लिहितात, "......मला वाटले की, राष्ट्रीय काँग्रेसचा दृष्टीकोन उच्चभ्रू मध्यमवर्गीय होता तरी, देशातील एकमेव प्रभावी क्रांतिकारी दलाचे तीच प्रतिनिधित्व करीत होती. असे असल्यामुळे कामगारांनी

तिला मदत केली पाहिजे आणि तिच्यावर प्रभाव पाडला पाहिजे. तिच्याशी सहकार्य केले पाहिजे. तरीही, आपली अस्मिता आणि विचारप्रणाली सुस्पष्ट आणि शाबूत ठेवून आणि मी आशा केली की........ (हे)....... अपरिहार्यपणे काँग्रेसला अधिक मूलगामी विचारप्रणालीकडे घेऊन जाईल आणि सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांना सामोरे जायला लावील......'' (डोरोथी नॉर्मन, एक-१७६)

नेहरूनी राष्ट्रवादाकडे मूलभूतपणे ती एक उच्चभ्रू मध्यमवर्गीय विचारप्रणाली म्हणून पाहिले. हे खरे आहे की, ऐतिहासिकदृष्ट्या भारतामध्ये-ज्याप्रमाणे बहुधा बहुतेक देशांमध्ये -राष्ट्रवादाचे प्रचालन करण्यात उच्चभ्रू मध्यमवर्गीयांनी पुढाकार घेतला होता. परंतु राष्ट्रीय चळवळ कामगारांच्या सहयोगाशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. या जगात, राष्ट्रांमध्ये विभागलेल्या किंवा अधिक वाईट शासन करणाऱ्या आणि शासन केल्या गेलेल्या राष्ट्रांमध्ये विभागलेल्या कामगारांचे हितसंबंध ते त्याच्या बाहेर राहिल्याने राखले जाणे शक्य आहे काय ?

नेहरूंची भूमिका होती स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये देशात सर्व लोकांच्या सारख्याच हितसंबंधाना मान्यता देणे, आणि तरीही भिन्न विभागांच्या भिन्न असणाऱ्या हितसंबंधांची जाणीव ठेवणे. '' माझ्या जीवनकालीन भारतामध्ये राष्ट्रवाद अपरिहार्य होता आणि आहे ; ती स्वाभाविक आणि निरोगी वाढ आहे. कोणत्याही परतंत्र देशासाठी राष्ट्रीय स्वातंत्र्य हीच पहिली, आणि वर्चस्वी प्रेरणा असलीच पाहिजे.....'' (शोध, पृ. ४०, डोरोथी नॉर्मन, एक-२१२ मध्ये उधृत केल्याप्रमाणे)

भारतीय राष्ट्रीय आंदोलन, कामगार आंदोलनाशी प्रतारणा करील या साम्यवादी पक्षाने घेतलेल्या भूमिकेची आणि त्यांच्या दृष्टीकोनाची नेहरूंनी कटुतेने टीका केली होती. '' भारतीय राष्ट्रीय आंदोलन हे उघडपणेच कामगार किंवा श्रमिक आंदोलन नाही. तिचे समुद्दिष्ट राहिलेले आहे सामाजिक सुव्यवस्थेचे परिवर्तन नव्हे; तर राजकीय स्वातंत्र्य! फार दूरवर पोचणारे नाही म्हणून ह्या समुद्दिष्टावर टीका करता येईल आणि कालबाह्य म्हणून प्रत्यक्ष राष्ट्रवादाला दूषण देता येईल. परंतु आंदोलनाचा मूलभूत पाया स्वीकारून असे म्हणणे असंगत आहे की, नेते जनतेची प्रतारणा करतात. कारण ते भूयंत्रणा किंवा भांडवलदार यंत्रणा उलथून पाडण्याचा प्रयत्न करीत नाहीत. त्यानी असे करण्याचा कधीही दावा केलेला नव्हता.'' (ओझरती दर्शने, पृ. ४७६-४७७)

तथापि राष्ट्रीय आंदोलनाच्या त्यांच्या नेतृत्वाच्या संपूर्ण कालखंडामध्ये आपली सामाजिक ध्येये तपशीलवार सांगण्यासाठी नेहरू काँग्रेसवर दबाव आणीत होते. त्यानी दाखवून दिले की, भारतीय राष्ट्राच्या आत अनेक भिन्न आणि नेहमी परस्परविरोधी हितसंबंध आहेत- ते म्हणजे राजपुत्रांचे, बड्या जमीनदारांचे, धंदेवाईक वर्गांचे, शेतकऱ्यांचे, उद्योगपतींचे, मध्यम वर्गाचे, बँक व्यवसायींचे, आणि असे आणखी '' राष्ट्रीय उत्तर आहे विदेशी हितसंबंधांऐवजी देशांतर्गत हितसंबंध अधिक पसंत करणे, परंतु त्या पलिकडे ते जात नाही...... ते कल्पिते की, जेव्हा देश स्वतंत्र असेल तेव्हा विभिन्न हितसंबंध कसेही करून जुळवून घेण्यात येतील. मूलभूतपणे मध्यमवर्गीय आंदोलन असल्यामुळे राष्ट्रवाद मुख्यतः त्या वर्गाच्या हितसंबंधात कार्य करतो.... आपण या प्रश्नाचे उत्तर देण्यापासून पळून जाऊ शकत नाही, आज किंवा नंतर, कोणत्या वर्गाच्या स्वातंत्र्यासाठी आपण विशेषत्वाने झटत आहोत...... शासनाचा प्रकार हा काही झाले तरी साध्याला साधन आहे ; स्वातंत्र्य हे सुद्धा साधन आहे, साध्य हे असल्यामुळे, मानवी कल्याण, मानवी अभिवृद्धी, दारिद्र्य आणि रोग आणि यातना संपुष्टात आणणे आणि ' चांगले जीवन ' जगण्यासाठी प्रत्येकाला संधी, शारीरिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्या ...... स्वातंत्र्य त्यासाठी अत्यावश्यक आहे याच्याशी बहुतेक लोक संमत होतील.'' (भारत आणि जग, पृ. ३९-६३, डोरोथी नॉर्मन, एक-३०७-३१५ मध्ये उधृत केल्याप्रमाणे)

आपली सामाजिक ध्येये स्पष्ट करण्यासाठी वर्षानुवर्षे नेहरू काँग्रेसला कसे टोचणी देत होते; हे एखाद्याला पाहता येईल. काँग्रेसला त्यांच्या अध्यक्षीय भाषणामध्ये, त्यांच्या लेखनांमध्ये कार्यकारी समितीसाठी त्याच्या ठरावांच्या प्रारूपामध्ये आणि नंतर, घटनासमिती समोरील समुद्दिष्टांच्या ठरावामध्ये, स्वातंत्र्याच्या सामाजिक संदर्भाच्या त्यांच्या अर्थ उकलाची स्वीकृती प्राप्त करण्यासाठी ते दबाव आणीत होते.

शक्य तो कामकरी वर्गाचा संबंध होता तितपत छोटे शेतकरी, कृषि कामगार तसेच औद्योगिक कामगार सुद्धा; यांच्या समस्यांशी नेहरू पूर्णपणे जागृत होते. औद्योगिक कामगारांच्या बाबतीतील त्यांची गुंतवणूक, स्वातंत्र्यापूर्वी, त्यांनी १९२९ मध्ये श्रमिक संघ महासभेचे (ट्रेड युनियन काँग्रेस) अध्यक्षपद स्वीकारले. त्यापुरती मर्यादित होती. परंतु छोट्या शेतकरीवर्गाच्या समस्यांमधील त्यांची गुतवणूक कितीतरी अधिक होती जरी ती अल्पकाळ टिकली. १९२०-२१ मध्ये अलाहाबाद जिल्ह्यातील आणि कालौघात संपूर्ण उत्तर प्रदेशात शेतकऱ्यांची संघटना करण्यामध्ये त्यांनी सक्रीय भाग घेतला होता. कृषिभूमिविषयक आंदोलन हे बड्या जमीनदारांविरुद्ध होते; आणि अप्रत्यक्षपणे शासनाच्या विरुद्ध सुद्धा. त्यासंबंधी आपल्या आत्मचरित्रात लिहिताना नेहरू म्हणतात, " सगळे काही समाविष्ट करण्यासाठी **स्वराज** हा सर्वसमावेशक शब्द होता. तथापी दोन्ही आंदोलने–असहकार आणि कृषिभूमिविषय–अगदी वेगळी होती; जरी ती आमच्या प्रांतामध्ये परस्परव्याप्त होत होती आणि मोठ्या प्रमाणात एकमेकावर प्रभाव पाडीत होती." [आत्मचरित्र (पेपरबॅक) १९८२, पृ. ५९] १९२१ मधील त्यांचा पहिला कारावास त्यांच्या कृषिभूमिविषयक कार्यांचा काही थोडाथोडका परिणाम नव्हता.

" राष्ट्रवाद आणि भारतातील जनलढा " या शीर्षकाच्या इंग्लंडमधील ' लेबर मंथली ' साठी लिहिलेल्या एका लेखात नेहरू कबूल करतात की, तिच्यामध्ये प्रतिनिधित्व झालेल्या राजकीय तत्त्वज्ञानांच्या सर्व छटा काँग्रेसकडे आहेत–नेमस्त, समाजवादी, साम्यवादी वगैरे.–परंतु काँग्रेसकडे फार मोठा मध्य विभाग आहे, जो साम्राज्यवादी विरोधी, समाजवादी आणि शेतकरी सन्मुख आहे. ते दाखवतात की भारतामध्ये डावा आणि उजवा ही संज्ञा मोघमपणे वापरली जाते परंतु ते, " काँग्रेसमध्ये डावा आणि उजवा ही संज्ञा मोघमपणे वापरली जाते परंतु ते, " काँग्रेसमधील अलिकडच्या समाजवादी मताच्या स्थिरीकरणा "बद्दल बोलतात. हे, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, जनसंपर्कातून आणि तुरुंग जीवनातील अनुभवातून उद्‌भवले होते. शेतकरी चळवळीच्या वाढत्या बळाचा आणि काँग्रेस नेतृत्वाचा पाया कसा तयार झाला आहे आणि त्याला बळकटी दिली आहे याचा निर्देश करतात ' तथापी मोठ्या आणि छोट्या शेतकऱ्यांचा संघर्ष आणि भूवितरणाची समस्या निरूपणाची वाट पहात होती.. (डोरोथी नॉर्मन, एक-५७४-५८०)

### भारत : एक राष्ट्र की दोन ?

राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयाला अर्थशास्त्रीय आशय पुरविणे; जनतेला राष्ट्रवादाची संकल्पना अधिक अर्थपूर्ण करील, असा नेहरूंचा विश्वास होता आणि त्यांच्या समाजवादी कलांनी त्याना एक तत्त्वज्ञान दिले होते ज्याच्या आधारावर ग्रामीण आणि नागरी कामकऱ्यांना त्याचप्रमाणे गरीबांना त्यानी राष्ट्रीय आंदोलनाचे महत्त्व समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. समाजवादी संदेश या संदर्भात संबद्ध दिसत होता.

जातीय विभक्तपणाचा प्रश्न येत असे, तेव्हा नेहरूंकडे कोणता विशेष दृष्टीकोन असल्याचे दिसून येत नव्हते. हिंदू आणि मुस्लीम यांच्यामधील मध्यमवर्गीय विकासाने कोणत्या गतीने पावले

टाकली होती याची अर्थातच त्याना जाणीव होती. मुस्लीम मध्यमवर्गाच्या सापेक्ष उदासीनतेची सुद्धा त्याना जाणीव होती; आणि त्याहीपेक्षा अधिक, मुस्लीम जनतेची राष्ट्रीय आंदोलनाशी १९१६ च्या लखनौ कराराच्या कालखंडामध्ये आणि नंतर खिलाफत आंदोलन खेरीज करून मुस्लीम नेते राष्ट्रीय आंदोलनाबाहेर राहिले होते आणि त्याची त्यांना कशी बाधा होईल याबद्दल काहीसे साशंक होते. तथापी, त्यांच्या जवळच्या मित्रांमध्ये आणि सहकाऱ्यांमध्ये अनेक थोर मुस्लीम नेते होते–डॉ. सय्यद अहमद, रफी अहमद किडवाई, असफ अली, शेख अब्दुल्ला, अब्दुल कलाम आझाद आणि अर्थातच नम्र, तरीही उंच असणारे 'सरहद्द गांधी' खान ब्दुल गफार खान, मुस्लीम जातीय मताच्या प्रतिनिधींप्रती त्यांचा आरंभीचा दृष्टीकोन त्यांच्या आत्मचरित्रामध्ये अत्युत्तम मांडलेला आहे. "लक्षणीय वस्तुस्थिती मला दिसून येते ती दोन्ही बाजूंनी, कसे एका छोट्या वरीष्ठ वर्गाच्या प्रतिगामी गटाचे जातीय नेते प्रतिनिधित्व करतात आणि कसे हे लोक त्यांच्या स्वतःच्या साध्यासाठी जनतेच्या धार्मिक मनोविकारांचा फायदा घेतात." (डोरोथी नॉर्मन, एक-३०३)

मुस्लीम जनतेचा आर्थिक मागासलेपणा, मध्यमवर्गाप्रती अगदी अलिकडील मुस्लिम प्रवेशार्थींची असुरक्षितता आणि नेहरूंच्या प्रभावाखालील तरुण काँग्रेस नेतृत्वाच्या 'समाजवादी' वाक्प्रबंधाची मुस्लीम सरंजामी घटकावयवाने घेतलेली धास्ती ही सर्व मुस्लीम उदासीनतेची सप्रमाण स्पष्टीकरणे होती. तितकेच सप्रमाण होते नेहरूंचे अभिकथन की, मुस्लीम अल्पसंख्याक जाणीवेला उत्तेजन देण्यासाठी ब्रिटिश लोक सर्व काही करीत होते आणि ती राष्ट्रीय मागण्यांना प्रतिटोला म्हणून वापरीत होते. परंतु मुस्लीम भावनेच्या सखोलतेची नेहरूंना जाणीव असल्याचे दिसत नव्हते.

जेव्हा, कालौघात, मुस्लीम राष्ट्राच्या कल्पनेबद्दल बोलू लागले तेव्हा, त्या कल्पनेच्या अव्यवहार्यतेबाबत युक्तीवाद करण्याचा नेहरूंनी प्रयत्न केला. "मुस्लीम राष्ट्र भारतामध्ये–राष्ट्रामध्ये 'राष्ट्र आणि ते सुद्धा आटोपशीर नाही, परंतु मोघम, पसरलेले, अनिश्चित. राजकीय दृष्ट्या ही कल्पना विसंगत आहे, आर्थिक दृष्ट्या ती भरमसाठ आहे ; क्वचितच ती विचार करण्याच्या योग्यतेची आहे. 'मुस्लीम राष्ट्रां' बद्दल बोलणे, म्हणून असा अर्थ असणे की, इथे मुळी राष्ट्रच नाही! फक्त धार्मिक बंधपत्र, त्याचा अर्थ असा होतो की, कोणतेही राष्ट्र आधुनिक अर्थाने वृद्धिंगत व्हायला मुभा द्यायचीच नाही ; त्याचा अर्थ असा होतो की, आधुनिक संस्कृती टाकून दिली पाहिजे आणि आपण मागे गेले पाहिजे ........ मध्ययुगीन मार्गांकडे ; त्याचा अर्थ असा होतो, शेवटी मनाची भावनिक स्थिती आणि वास्तवतांना तोंड न देण्याची जाणीवपूर्वक किंवा जाणीवशून्य इच्छा, विशेषतः आर्थिक वास्तवता. भावनांकडे तर्कशास्त्र विस्कटून टाकण्याचा मार्ग असतो आणि आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे, केवळ या कारणासाठी की, त्या इतक्या असंयुक्तिक दिसतात. परंतु मुस्लीम राष्ट्राची ही कल्पना कल्पनाशक्तीची भरमसाठ भरारी आहे..... वास्तवतेच्या स्पर्शाबरोबर ती लुप्त होईल." (स्वातंत्र्याकडे, पृ. २०९, डोरोथी नॉर्मन, एक-३०३ मध्ये उधृत केल्याप्रमाणे)

हे होते १९३६ मध्ये. राष्ट्र-राज्य यांच्या परिभाषेत विचार करताना मुस्लीम लोक एक राष्ट्र कल्पनेत प्रत्यक्ष शिफारस करण्यासारखे नेहरूंना काहीही आढळत नाही. अशा कल्पनेला मान्यता संयुक्त, सार्वभौम राष्ट्राच्या प्रत्यक्ष मुळावरच घाव घालील. भारतीय मनोव्यापारामध्ये राष्ट्राची संकल्पना अजून पूर्णपणे स्थिरावयाची होती याची त्याना जाणीव होती. मानववंशीय किंवा राजकीय अस्मितांचे कोणतेही प्रपादन (देशी भारतीय संस्थानांच्या बाबतीत जसे) एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून 'भारता'च्या भौगोलिक अस्तित्वाच्या ध्येयाला आव्हान देत होते ; जे काँग्रेस आणि काँग्रेस प्रस्थापित होण्यापूर्वी सुद्धा भारतीय मताच्या अन्य नेत्यांनी काळजीपूर्वक आणि तळमळीने जोपासलेले होते.

नेहरू एक वेगळी 'मुस्लिम संस्कृती' कल्पिण्याला सुद्धा इच्छुक नव्हते. ते विचारतात, "परंतु काय आहे ही 'मुस्लिम संस्कृती' अरब, पर्शियन, तुर्क वगैरे लोकांच्या महानकृत्यांची ती एक प्रकारची वांशिक स्मृती आहे काय ? किंवा भाषांची ? किंवा कलेची ? किंवा संगीताची ? किंवा रूढींची ?....... दोन भाषा ज्यानी भारतात मुस्लिम विचारांवर प्रभाव पाडला; त्या आहेत अरबी आणि पर्शियन. परंतु पर्शियनच्या प्रभावामध्ये त्या संबंधी कोणता धर्माचा घटकावयव नाही........ तो भारतातील आम्हा सर्वांसाठी, समान आणि मौलिक वारसा आहे."

'मुस्लिम राजकीय प्रतिगाम्यांना प्रामुख्य देण्याबद्दल' त्यानी ब्रिटिशाना दोष दिला, 'ज्यानी असहकाराच्या या सर्व वर्षांमध्ये मागची जागा घेतली होती'...... परंतु ताबडतोब ते पुढे म्हणतात, "दुही माजवा आणि शासन करा हा नेहमीच साम्राज्यांचा मार्ग राहिला आहे......" आम्हाला याची तक्रार करता येणार नाही; किंवा काही झाले तरी, त्याबाबत आपण आश्चर्यचकित होता कामा नये. त्याकडे दुर्लक्ष करणे आणि त्याविरुद्ध तरतूद न करणे ही प्रत्यक्ष आपल्या विचारातील एक चूक आहे."

सौदा करून आणि घासाघीस करून आपल्याला त्या विरुद्ध तरतूद करता येणार नाही. कारण तिसरा पक्ष नेहमीच उच्चतर बोली करू शकेल. त्यानी जोर देऊन सांगितले की, समान राष्ट्रीय किंवा सामाजिक दृष्टिकोनाच्या विकासामध्ये त्याचे उत्तर असते, जो उलट स्वातंत्र्याच्या सामाजिक ध्येयांच्या स्पष्ट कथनावर अवलंबून राहील. "स्वातंत्र्यासाठीच्या आमच्या लढ्यात स्पष्ट आदर्श आणि समुद्दिष्टे यांचा अभाव निःसंशयपणे जातीयवादाच्या प्रसाराला सहाय्यभूत झाला. जनता त्यांच्या दैनंदिन यातना आणि स्वराज्यासाठी लढा यामधील स्पष्ट संबंध पाहत नाही."

नेहरूंनी मुस्लिम जातीय पुढाऱ्यांकडे राज्याने पाठिंबा दिलेल्या जुळ्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेमध्ये ज्यांचे प्रस्थापित हितसंबंध होते असे पाहिले. "अशा रीतीने, राजकीय प्रतिगामी जातीय पुढाऱ्यांच्या बहाण्याने राजकीय क्षेत्राकडे पुनः परत आले आणि त्यानी विभिन्न पावले टाकली, त्याचे खरे स्पष्टीकरण, त्यांचा जातीय पूर्वग्रह हे तितकेसे नव्हते. जितकी राजकीय प्रगतीला अडथळा करण्याची त्यांची इच्छा होती." 'स्वराज्याकडे' मधून (अवतरणे–डोरोथी नॉर्मन, पृ. एक- ११२-११६ मध्ये उद्धृत केलेली)

मुस्लिमांचा असो किंवा हिंदूंचा असो; नेहरूंनी जातीयवादाचा निषेध केला. त्यानी पुनः पुनः सांगितले, जातीय मागण्या जनतेच्या गरजा पुऱ्या करीत नाहीत. त्यानी दाखवून दिले की, जातीय संघटना या धार्मिक नाहीत परंतु त्या राजकीय साध्यासाठी फक्त धर्माचा उपयोग करतात.

परंतु राजकीय वास्तववादी म्हणून नेहरूंना ज्ञात झाले की, त्यांना कितीही जातीयवादाचा तिटकारा वाटला तरी दमनाने जातीयवाद लोप पावणार नाही. "म्हणून आपण हा भीतीगंड दूर केला पाहिजे आणि मुस्लिम जनतेला हे ज्ञात करून दिले पाहिजे की, त्याना खरोखर ज्याची इच्छा आहे ते कोणतेही संरक्षण त्याना मिळू शकेल." (डोरोथी नॉर्मन एक-३२९) म्हणून घटना समितीसाठी कॉंग्रेस प्रस्तावात त्यानी सूचित केले होते की, "अल्पसंख्याकांच्या मनातून सर्व संशय दूर करण्यासाठी, ती सुद्धा, जर ती तसे पसंत करील, त्यांचे प्रतिनिधी विभक्त मतदारसंघांनी निवडून घेतील." अशा रीतीने जरी कॉंग्रेस आणि नेहरू यांनी सुसंगतपणे विभक्त मतदारसंघांना विरोध केला होता, तरी नेहरू ते स्वीकारावयाला तयार झाले होते; जर ते फक्त घटना समितीला निवडणुका होण्यासाठी असतील.

नेहरू आग्रही होते– जरी प्रांतीय विधानमंडळांना १९३७ च्या निवडणुकांनंतर ज्यामध्ये मुस्लिम लीगने बहुतेक प्रातांमध्ये प्रचंड प्रमाणात मुस्लीम मत मिळविले की, जातीय प्रश्नाला खरे उत्तर तेव्हाच प्राप्त होईल जेव्हा सर्व धार्मिक गटांना आणि जातीय सीमांना बाधा करणारे आर्थिक प्रश्न प्रामुख्य ग्रहण करतील." जातीय आवाहनाचे प्रामुख्य त्याच्या मूळ स्वरूपात स्वीकारावयाला ते तयार नव्हते. त्याना वाटले की, सर्व इतर राजकीय पक्षांना वगळून निवडणुकातील काँग्रेसच्या यशाने "मुस्लीम तरुण माणसे आणि म्हातारे आणि मुस्लीम वर्तमानपत्रे..... याना पूर्णपणे आत्मविश्लेषण करावयास लावले आहे..... आणि म्हणून ही निवडणूक आणि आमची मोहीम, नियमानुसार जरी त्यांचा परिणाम मुस्लीम जागा गमाविण्यात झाला, मुस्लिमांच्या संदर्भात सुद्धा आमच्यासाठी एक विजय झाला आहे. जातीयवादाचे भूत शमविण्यास्तव काही वाटचाल त्यानी केली आहे." (डोरोथी नॉर्मन, एक-४८०) त्यानी या शक्यतेचा विचार केला नाही की, काँग्रेसच्या या प्रचंड विजयाने मुस्लिम वर्तमानपत्रांना वस्तुतः साशंक केले असेल.

तथापी १९४४ साली जेव्हा 'भारताचा शोध' ची अंतिम प्रकरणे; अहमदनगर किल्ला तुरूंग तळामध्ये बहुधा लिहिली जात होती. नेहरूनी ही शक्यता अनुमान्य करावयाला सुरूवात केली होती की, भारत एक राजकीय घटक रहाणार नसेल. अशा विभागणीच्या अपेक्षित भारांबद्दल त्याना चिंता वाटत होती.

"जर भारताचे दोन किंवा अधिक भागांत तुकडे पडले आणि तो राजकीय आणि आर्थिक घटक म्हणून इतःपर कार्य करू शकणार नाही, तर त्याच्या प्रगतीला गंभीरपणे बाधा होईल....... एक चुकीचे पाऊल दुसरे चुकीचे पाऊल टाकायला लावते ; तसे भूतपूर्व काळात होत राहिले आहे आणि तसेच ते भविष्यकाळातही अस्णार आहे आणि तरीही कधीकधी चुकीची पावले टाकलीच पाहिजेत, नाहीतर कोणतेही फार वाईट संकट आपल्यावर कोसळेल ; तो राजकारणाचा मोठा विरोधाभास आहे..... ऐक्यभंगापेक्षा ऐक्य हे नेहमीच अधिक चांगले आहे. परंतु लादलेले ऐक्य हा एक बहाणा आणि घातक प्रकरण आहे, स्फोटक शक्यतांनी परिपूर्ण..... माझी खात्री पटली आहे की भारतामध्ये ते मूलभूत ऐक्य आहे परंतु इतर शक्तींनी काही मर्यादेपर्यंत ते झाकोळून आणि लपवून ठेवले आहे." (शोध, पृ. ४४५)

बहुमानवंशीय समाजामध्ये समान राष्ट्रीय अस्मिता पुढे नेण्याच्या प्रश्नांबद्दल नेहरूंना जाणीव नव्हती, असे क्वचितच शक्य असेल. परंतु राजकारणातील एक सक्रीय सहभागी म्हणून काळाविरुद्ध लढण्यासाठी आणि सभोवतालची परिस्थिती निर्माण करण्यासाठी ते पराकाष्ठेचे झटले; जिच्यामध्ये अनेक समूह एकत्वाची भावना विकसित करतील. त्यांचा 'शोध' मधील पुनरूच्चारित भारताच्या मूलभूत ऐक्यावरचा जोर हा दोन्ही त्यांच्या स्वतःच्या आत्मनिष्ठ अनुभवाची अभिव्यक्ती होता. त्याचप्रमाणे ही एकमेव भारतीय अस्मितेची भावना इतरांना संसूचित करण्याचा व त्यांच्यामध्ये निर्माण करण्याचासुद्धा एक प्रयत्न होता. कारण, 'राष्ट्रा' ची कल्पना हे कठीण भौगोलिक लक्षण नव्हे, ती प्रवाही आहे आणि सामाजिक गतिमानतेच्या उपायाने तिचे पालनपोषण व्हायला पाहिजे. जिच्यामध्ये विभिन्न समूह समान. खोल हितसंबंध पाहतात. नेहरू याला वक्तृत्वपूर्ण अभिव्यक्ती देतात. "प्रत्येक समूह केवळ तत्त्वतः आणि प्रत्यक्ष स्वतंत्र असताच कामा नये आणि अभिवृद्धीच्या समान संधी त्याच्याकडे असल्या पाहिजेत. परंतु त्याच्याकडे स्वातंत्र्य आणि समानतेची संवेदना असली पाहिजे." (शोध, पृ. ४४८)

या विशिष्ट टप्प्यावर, नेहरू भारताचे स्वातंत्र्य आणि विशाल ऐक्य सुनिश्चित करण्याच्या आपल्या आतुरतेने प्रांतांना अधिकतर स्वायत्तता देण्यापासून तो सोव्हिएट युनियन प्रकाराच्यासुद्धा बहुराष्ट्रीय महासंघापर्यंत; कित्येक पर्यायांचा विचार करावयाला राजी दिसत होते. एका बाजूला हिंदू-मुस्लिम विभाजनाच्या गुंतागुंतीबद्दल ते चिंतातूर आहेत, आणि दुसऱ्या बाजूला काही भारतीय राजपुत्रांच्या दृष्टीकोनाबद्दल–जे विभक्त अग्रगण्य भूप्रदेश प्राप्त करून घेण्याची आकांक्षा बाळगतील..... " जर भारताचे दोन किंवा अधिक भागांमध्ये विभाजन व्हायचे असेल तर प्रमुख भारतीय संस्थानांचे भारतामध्ये एकत्रीकरण अधिक अवघड होते." (शोध पृ. ४४६).

आमच्यापैकी पुष्कळजण अशा मताचे आहेत की भारत हे मूलभूतपणे राष्ट्र आहे ; श्री. जीना यांनी द्विराष्ट्र सिद्धांत पुढे मांडला आहे आणि अलिकडे काही धार्मिक समूह, जे काहीतरी ते असतील. . . त्यांचे वर्णन उपराष्ट्रे म्हणून करून त्याच्यामध्ये आणि वाक्प्रबंधामध्ये भर घातली आहे. परंतु एक राष्ट्र किंवा दोन किंवा अधिक म्हणून भारताचे योग्य रीतीने वर्णन करावयाचे असेल तर त्याचे काही प्रयोजन नाही; कारण राष्ट्रीयत्त्वाची आधुनिक कल्पना राज्यपणाहून जवळ जवळ वेगळी करण्यात आली आहे. राष्ट्रीय राज्य हे आज कितीतरी लहान घटक आहे आणि छोट्या राज्यांना स्वतंत्र अस्तित्व असू शकत नाही. . . . राष्ट्रीय राज्य अशा रीतीने बहुराष्ट्रीय राज्याला जागा देत आहे किंवा विशाल महासंघांना सोव्हिएट युनियन या विकासामध्ये नमुनेदार आहे. अमेरिकेची संयुक्त संस्थाने जरी बळकट राष्ट्रीय बंधांनी बांधलेली असली, तरी ते मूलभूतपूर्ण एक बहुराष्ट्रीय राज्य आहे " (शोध पृ. ४४९).

पाकिस्तानसाठी मागणी आणि सुचविण्यात येईल त्या प्रत्येक पर्यायाला थांबण्याच्या आणि ' नाही ' म्हणण्याच्या जीनांच्या क्षमतेने राष्ट्रवादी नेत्यांना दमविले होते. " भारतातील विद्यमान स्थितींना आमच्यापैकी पुष्कळ जण पूर्णपणे शिणलेले आहेत आणि तळमळीने काही मार्ग शोधण्यासाठी उत्सुक आहेत." या दमछाकीतून राज्यांच्या बळकट महासंघाची कल्पना जन्माला आली होती. जर भारताचे विभाजन शांततेने घडून आले असते तर, असेही असते, त्या विभाजनानंतर सुद्धा नेहरूंच्या महासंघाच्या कल्पनेला स्वीकृती मिळाली असती. परंतु विभाजनाचा जबरदस्त धक्का आणि आपली बळकट, विभक्त अस्मिता प्रस्थापित करण्याची पाकिस्तानची प्रचंड इच्छा नेहरूंनी पूर्वी पाहिली नव्हती. भारताबरोबर सतत तेढ या नव्या अस्मितेला समर्थन पुरविणारे होते.

विभाजनाने निर्माण केलेल्या उष्णतेने सापेक्षतया स्वायत्त राज्यांच्या महासंघासाठी नेहरूंचा स्वतःचा उत्साह सुद्धा बाष्पीभूत झाला होता. नेहरू आणि पटेल याना भारताचे ऐक्य आणि प्रादेशिक सुरक्षितता, याबद्दल अत्यंत चिंता वाटत होती. भारतासाठी नवे संविधान तयार करताना नेहरूंनी बळकट केंद्र उभारण्याच्या बाजूने आपले संपूर्ण वजन टाकले. जरी भारताचे संविधान विनिर्दिष्ट केंद्रीय, राज्य आणि अधिकारितेच्या समवर्ती क्षेत्रांसाठी जरूर तरतूद करते तरी सुरक्षिततेच्या मागण्यांनी त्याना अशा रीतीने कार्य करणे भाग पडले की, त्याने केंद्राला बळकटी दिली. काश्मीर युद्धाने निर्माण केलेली भीती, हैदराबादच्या दर्जाचा अनिर्णित प्रश्न, यामुळे सर्वश्रेष्ठ केंद्रासाठी गरज सर्वसाधारणपणे स्वीकृत करावी लागली. भारतीय संघाचे व्यक्तिगत घटक ज्या रीतीने त्यानी तो पूर्व कल्पिलेला होता जेव्हा भारताच्या महासंघाबद्दल ते बोलले होते–विराम पावण्याची शक्यता विचारात घ्यायला नेहरू इतःपर राजी नव्हते.

**राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद**

नेहरूंनी त्यांच्या प्रबळ राष्ट्रीय भावना आणि त्यांची आंतरराष्ट्रवादाला बांधिलकी, यामध्ये परस्परविरोध पाहिला नाही. आधुनिक जगामध्ये राष्ट्रवाद कालबाह्य झाला आहे, अशी कोणतीही सूचना त्यानी नाकारली. त्यानी, विशेषकरून त्या देशांमध्ये जे स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी लढा देत होते; राष्ट्रवादाची गरज होती असा युक्तिवाद केला. त्यांच्या विचार करण्याच्या रीतीप्रमाणे 'राष्ट्रवाद' या देशासाठी एक आवश्यक टप्पा होता आणि त्यानी दाखवून दिले की, आर्थिक दृष्ट्या प्रगत देशांनी सुद्धा त्यांच्या राष्ट्रीय आकांक्षांपासून स्वतःची सुटका करून घेतली नव्हती. त्या आधारावर की, युद्ध हे लोकयुद्ध होते. दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या कालखंडामध्ये स्वातंत्र्यलढ्यापासून स्वतःला दूर ठेवल्याबद्दल साम्यवाद्यांना त्यानी दूषण दिले.

१९३० मध्ये लिहिताना नेहरू म्हणाले होते, "भारताचा लढा आज एका मोठ्या लढ्याचा भाग आहे जो जुलुमग्रस्तांच्या मुक्तीसाठी जगात सर्वत्र चालू आहे. मूलभूतपणे, हा आर्थिक लढा आहे......... जरी तो राष्ट्रवादी आणि इतर पोषाख घालत असला आणि तरीही स्वातंत्र्याचा अर्थ सर्व साम्राज्यवादी नियंत्रणापासून स्वातंत्र्य याखेरीज अन्य असा असता कामा नये. आम्ही आज ब्रिटनविरुद्ध लढा देतो; कारण ब्रिटन साम्राज्यवादाचे प्रतिनिधित्व करते." (डोरोथी नॉर्मन एक-३१५,३१७).

संकुचित राष्ट्रवादाच्या धोक्यांवर जोर देत आपल्या 'भारताचे ऐक्य' या पुस्तकात नेहरू म्हणाले, "पश्चिमेत राष्ट्रवादाला दुर्गंध येत आहे आणि तो आक्रमकता, असहिष्णुता आणि पाशवी हिंसाचाराचा जनक झाला आहे. सर्व जे प्रतिगामी आहे, ते फासी, साम्राज्यवाद, वंशीय धर्मवेडे याच्या नावाखाली आश्रय धुंडाळते......." परंतु त्यांनी दाखवून दिले की, तो राष्ट्रवाद होता; ज्याने शंभर वर्षे किंवा अधिक काळापूर्वी युरोपची राष्ट्रे उभारली होती आणि तो राष्ट्रवाद आहे; जो आज आशियाच्या देशांमध्ये चालना शक्ती आहे........ तो; त्यांच्याकडे ऐक्य आणि जोम आणि अधीनता भाग पाडते त्या चैतन्याची ओझी उचलणे आणतो. (डोरोथी नॉर्मन, एक–६००, ६०१).

अशा रीतीने, स्वतः एक उत्साही राष्ट्रवादी अशा नेहरूंना सुद्धा आंधळ्या शोषणासक्त राष्ट्रीय चेतनाच्या धोक्याची जाणीव होती. त्यांच्या विकासाच्या एका टप्प्यावर लोकांना संघटित करून कामाला लावण्यासाठी तो अत्यावश्यक म्हणून ते मानत होते; असे दिसते.

नेहरूंनी स्वातंत्र्यापूर्वी राष्ट्रकुलाचा भाग असण्याची प्रत्यक्ष कल्पनाच 'अकल्पनीय' आणि 'ब्रिटिश साम्राज्यवादाच्या मूलभूत बांधणीची स्वीकृती' ध्वनित करणारी, म्हणून फेटाळून लावली होती. परंतु एकदा स्वातंत्र्य जिंकण्यात आले होते, त्यानी हे म्हणण्यास काकू केले नाही.

"कोणत्याही वेळेला जगाच्या या भागात इतर देशांपासून आम्हाला स्वतःला वेगळे करणाच्या परिभाषेत आम्ही कधीही विचार केलेला नाही किंवा त्या देशांशी शत्रूत्व असणं ज्यानी आमच्यावर वर्चस्व गाजविले...... ब्रिटिश लोकांशी आणि राष्ट्रांच्या ब्रिटिश राष्ट्रकुळाशी आम्हाला मित्रत्वाने रहायचे आहे." अर्थातच, राष्ट्रकुलामध्ये राहण्याचा निर्णय घेण्यापूर्वी या मंडळाच्या सभासदांमधील संबंधांचे स्वरूप बदलण्यासाठी त्यानी मदत केली होती.

कट्टर राष्ट्रवादी नेहरू, तरीही १९४५ मध्ये म्हणू शकले, "भारत, इराक, इराण, अफगणिस्तान आणि ब्रह्मदेश यांच्या दक्षिण आशियाई महासंघासाठी मी उभा आहे;" १९४६ इतक्या उशीरासुद्धा त्यानी प्रपादन केले. "मध्यपूर्व भारत आणि आग्नेय आशिया यामधील विविध देशांमध्ये समन्वय

केवळ शक्यच नाही; भविष्यकाळामध्ये अत्यंत संभवनीय आहे याबद्दल माझी खात्री झाली आहे. आशियाई महासंघाचा प्रश्न कदाचित अकालिक आहे. परंतु या देशांमधील कोणते तरी अधिक जवळचे साहचर्य आवश्यक आहे, परावलंबन आणि व्यापार प्रयोजने, या दोन्हीसाठी."

हे फाळणीच्या सर्वनाशापूर्वी होते; आणि बाळसे धरणारे राष्ट्र म्हणून स्वतंत्र भारतातील समस्यांच्या वास्तवांनी त्यांचा काही उत्साह सौम्य केला होता; त्यापूर्वी ! परंतु स्वातंत्र्यानंतर सुद्धा आणि अनेक प्रश्न, ज्यांनी त्याना व्यग्र ठेवलेले असताना नेहरूंची आंतरराष्ट्रीय घटनांसंबंधी आणि बाहेरील जगाशी नवे दुवे प्रस्थापित करण्याची त्यांची प्रेरणा, याना पूर्णपणे कधीच पायबंद पडला नव्हता. आपल्या देशावरील त्यांच्या प्रेमाने जगातील मानवी स्वातंत्र्यांच्या विशालतर प्रश्नांकडे दुर्लक्ष करावयाला त्यांना लावले नाही.

### स्वातंत्र्य आणि नंतर

स्वातंत्र्य १९४७ साली आले, आणि त्याबरोबर दोन स्वतंत्र राष्ट्रे-राज्यांमध्ये देशाचे विभाजन. विभाजनाने जातीयतेचा प्रश्न सोडविला नाही. परंतु लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष राज्यतंत्राने सांविधानिक साचा पुरविला आहे. ज्यामध्ये अल्पसंख्यांक गट त्यांच्या आकांक्षा व गाऱ्हाणी उच्चारू शकतात. कोणत्याही जमातीसाठी तिथे विभक्त मतदारसंघ नाहीत आणि मुस्लिमांना तर जागांचे आरक्षण सुद्धा नाही.

नेहरूंच्या पंतप्रधान म्हणून मुदतीमध्ये त्याना चार समस्यांना तोंड द्यावे लागले. ज्या, भारत एक राष्ट्र म्हणून आणि भारताचे ऐक्य याची त्यांची संकल्पना धोक्यात आणताना दिसत होत्या. त्या होत्या--(१) पूर्वीच्या संस्थानांच्या एकात्मीकरणाची समस्या. (२) भारतीय भूमीवर विदेशी परवृत्त प्रदेशांची समस्या, (३) ईशान्य भागातील जनजाती लोकांच्या एकात्मीकरणाची समस्या, (४) भाषिक प्रादेशिक अस्मितांची समस्या. नेहरूंनी त्याना संकल्पनात्मकरीत्या आणि आधारावर कसे तोंड दिले, हे पाहण्यासाठी आपण त्यांवर थोडक्यात चर्चा करू. इथे उल्लेख केलेल्या चार समस्यांना नेहरूंचा प्रतिसाद चर्चिताना मी 'सर्वपल्ली गोपाळ' यांच्या नेहरूंच्या चरित्रातून पुष्कळ घेतले आहे.

### भारतीय संस्थाने

राष्ट्रीय उंचीच्या थोड्या पुढाऱ्यांमध्ये नेहरू होते, ज्यांनी स्वातंत्र्य येण्यापूर्वी अनेक वर्षे संस्थांनी लोकांच्या आंदोलनांशी संबंध ठेवण्याचे महत्त्व ओळखले होते. भारतीय संस्थानांतील लोकांना भारतातील लोकांबरोबर अस्मिता वाटत आहे आणि अडचणी असताना सुद्धा लोकशाही अधिकारांसाठी ते आंदोलन चालू ठेवतील याची खात्री त्यांनी करून घेतली. परंतु १९३९च्या अधिनियमाच्या आधारावर निर्वाचित विधीमंडळाने भारतासाठी घटना समिती म्हणून कार्य करण्यासाठी स्वतःला सक्षम जाहीर केले. तेव्हा देशी भारतीय संस्थानांचे प्रतिनिधित्व लोकांच्या प्रतिनिधींनी केले नाही. शिवाय, संस्थानिकांपैकी अनेक जण आणि त्यांच्या नामनिर्देशित व्यक्ती दूर राहिल्या. कारण घटना समिती समोर ठेवून कोणती भूमिका घ्यायची हे अजून त्यानी ठरविले नव्हते. आपला समुद्दिष्टांचा ठराव–ज्याने परिणामतः निदेशक तत्त्वांच्या आणि मूलभूत अधिकारांच्या नंतरच्या कलमांसाठी आधाराची तरतूद केली— समितीने स्वीकृत करावा, अशी नेहरूंनी आशा बाळगली होती. परंतु तो निर्णय लांबणीवर टाकावा लागला होता कारण इतर गोष्टींमध्ये, संस्थानिकांचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. नेहरूंनी युक्तिवाद केला की, संस्थानिकांचे नेहमीच

स्वागत होते, परंतु काहीजणांची अनुपस्थिती हे ठरावाच्या अस्वीकृतीचे कारण असेल, तर समितीचे कार्य पूर्णपणे थांबेल. त्यानी हे सुद्धा स्पष्ट केले— जानेवारी २२, १९४७—की जर संस्थानिकांना ' आदर प्राप्त व्हावा किंवा मित्रत्वाच्या कोणत्या प्रमाणात विचारात घेण्यात यावे असे वाटत असेल, तर अशा कोणत्याही कल्पनेचे (राजांचे दैवी अधिकार वगैरे सारखे) सूचनासुद्धा होता कामा नये; मग बोलणे तर सोडाच! यावर कोणतीही तडजोड होणार नाही.' तथापी, या टप्प्यावर सुद्धा, संस्थानासाठी किंवा संस्थानांच्या गटासाठी आंतरिक स्वायत्ततेच्या प्रमाणाचा विचार करावयाला नेहरू राजी होते. जी ' निःसंशयपणे कोणत्या केंद्रीय कार्यांना अधीन राहतील ज्यामध्ये ती केंद्राशी सहकार्य करतील, ज्यामध्ये केंद्रावर त्यांचे प्रतिनिधित्व होईल आणि ज्यामध्ये केंद्राकडे नियंत्रण असेल.' त्यानी युक्तिवाद केला की, समुदिष्ट ठरावाला संस्थानिकांचा आक्षेप लोकांच्या सार्वभौमत्वाच्या सिद्धांताच्या सैद्धांतिक अभिप्रेत अर्थांना आणि व्यावहारिक अभिप्रेत अर्थांना तत्त्वतः आक्षेप होत होता...... तो असा आक्षेप आहे जो क्षणभरसुद्धा टिकू शकत नाही. (डोरोथी नॉर्मन, दोन–२९५-२९६).

या मुद्यावरील त्यांचा संकल्पाचा ठामपणा आणि प्रामाण्य संशयातीत होते. जसे ते घडले, बऱ्याच अंशी भारताच्या पहिल्या उपपंतप्रधानांच्या प्रशासकीय कौशल्यामुळे! आणि त्यांनी तो प्रश्न ठामपणे आणि प्रगल्भतेने हाताळल्यामुळे बहुतेक भारतीय संस्थानिक, भारतीय संघामध्ये सामील व्हायला आणि ' स्वतंत्र ' रहाण्यासाठी आपले राष्ट्रीय स्वातंत्र्य किंवा पाकिस्तानमध्ये सामील होणे सोडून द्यायला संमत झाले. परंतु त्यांना खरोखर पर्याय नव्हता. या संस्थानांच्या लोकांनी एक विभक्त अस्मिता म्हणून स्वतःचा कधीच विचार केला नव्हता. ब्रिटिश जोखडातून स्वातंत्र्यासाठी त्यांनी सहानुभूती दिली होती आणि काहीजण तर लढ्यामध्ये सहभागी झाले होते. त्यासाठी संस्थांनी लोकांच्या आंदोलनामध्ये नेहरूंनी जी आस्था दाखविली होती; आणि तिला क्रांतदर्शित्वाचा व्यापकपणा दिला होता; त्याला इतके अधिक श्रेय दिलेच पाहिजे.

परंतु दोन मोठी संस्थाने अनिर्णित राहिली—हैदराबाद आणि काश्मीर. यांपैकी हैदराबाद —मुस्लिम संस्थानिक असलेले हिंदू बहुसंख्याक संस्थान—याला भूराजकीय संज्ञांप्रमाणे खरोखर निवड नव्हती. स्वतंत्र राहण्याइतके संस्थान पुरेसे मोठे होते. परंतु ते ' स्वतंत्र ' रहाण्यासाठी निजामाला खरोखर लोकांना पोलादी शासनाखाली ठेवावे लागले असते. हे एक उदाहरण होते; जिथे लॉर्ड माऊंटबॅटनमार्फत ब्रिटिश प्रभाव वापरण्यात आला. तो स्पष्टपणे भारताच्या बाजूने होता आणि निझामाला शहाणपणाचा मार्ग दिसावा, म्हणून प्रत्येक प्रयत्न करण्यात आला होता. सरतेशेवटी, भारतीय सेनादलाच्या तथाकथित ' लष्करी कारवाई ' ने हा प्रश्न सोडविला आणि निझामाला हात जोडणे भाग पाडले.

काश्मीरचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होता. काश्मीर संस्थानिकाला सुद्धा ' स्वतंत्र ' रहायला आवडले असते. त्याचे प्राधान्येकरून मुस्लिम संस्थान होते. भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये त्याची पाचर मारली होती. हिंदू संस्थानिकाला पाकिस्तानमध्ये सामील होण्याची इच्छा नव्हती. संघटीत जमातींच्या माणसांना पाठवून जे त्याचा पाकिस्तानमध्ये प्रवेश निश्चित करतील त्याला हात जोडायला भाग पाडण्याची पाकिस्तानने प्रयत्न केला. नंतर जे हैदराबादमध्ये घडले; ते अगोदरच काश्मीरमध्ये घडले जाण्याची आणि पाकिस्तानात काश्मीर समाविष्ट केले जाण्याची एखाद्याने अपेक्षा केली असती. परंतु असे दिसून आले की, नेहरूंची धर्मनिरपेक्षतेवरील श्रद्धा, ज्यांनी शेर-ए-काश्मीर, काश्मीर जनपरिषदेचा नेता, यांचा विश्वास संपादन केला; असा सचोटीचा

लोकशाहीप्रधान नेता म्हणून त्यांचे अधिकारपत्र, यामुळे पारडी उलटी पडली. काश्मीरच्या संस्थानिकाने जेव्हा भारताची मदत मागितली, तेव्हा संस्थानाचा भारतात औपचारिक प्रवेश, लोकप्रतिनिधींची संमती याचा भारताने आग्रह धरला. ती संमती येऊ घातली होती आणि ' भारतीय ' भूप्रदेशाने संरक्षण करण्यासाठी भारताने आपले सैन्यदल पाठविण्याचे मान्य केले. संयुक्त राष्ट्रांच्या हस्तक्षेपाचा परिणाम म्हणून युद्ध कोंडी होऊन संपले. काश्मीरचा एक भाग पाकिस्तानच्या ताब्याखाली राहून आणि मोठा भाग भारतीय संघाचे एक राज्य म्हणून, संविधानानुसार विशेष दर्जा उपभोगित. ती स्थिती स्वातंत्र्यापासून ४३ वर्षांवर तशीच चालू राहिली आहे. काश्मीर एक वादविषय असल्याचे चालू राहिले आहे—त्याच्या मुस्लिम बहुमताच्या आधारावर पाकिस्तान दावा सांगतो आणि आपली स्वतःची धर्मनिरपेक्ष राजनीती आणि लोकांच्या संमतीने संस्थानिकांचा ऐच्छिक प्रवेश याच्या आधारावर भारत दावा सांगत. भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील तीन युद्धांपैकी दोन काश्मीरवर झाली आहेत. स्थिती पुनः तणावपूर्ण आहे आणि काश्मीर ' प्रश्नाला ' दृष्टीसमोर शेवट दिसत नाही.

**विदेशी परवृत्त प्रदेश**

पाँडेचरी आणि गोवा हे लहान भूप्रदेश होते. अनुक्रमे फ्रान्स आणि पोर्तुगाल यांनी धारण केलेले. ते भारताचा भाग होते, याबद्दल नेहरूंना कोणताच संशय वाटत नव्हता आणि त्यानी गृहीत धरल्याचे दिसते की ब्रिटिशांच्या प्रयाणाबरोबर फ्रान्स आणि पोर्तुगाल सुद्धा फारसे स्तोम न माजवता सोडून जातील ! फ्रेंच लोकांच्या बाबतीत त्यांचा विश्वास उचित असल्याचे सिद्ध झाले. ज्यांनी १९५४ मध्ये सतरेशेवटी लांबणीवर लावलेल्या वाटाघाटीनंतर भारतातील त्यांच्या भूप्रदेशातून माघार घ्यावयाला संमती दिली. परंतु पोर्तुगाल हटले होते. नेहरूंनी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न केला; परंतु कोणत्याही यशाशिवाय. पाँडिचरीशी तुलना करता गोवा अधिक मोठा भूप्रदेश होता आणि तिथे एक स्थानिक वर्ग वृद्धिंगत झाला होता; ज्याचे हितसंबंध पोतुगीजांशी बांधलेले होते.

जेव्हा वाटाघाटींमधून काहीच साध्य होत नव्हते तेव्हा नेहरू संतप्त होत होते. परंतु हा प्रश्न सोडविण्यासाठी सैन्यदल वापरावयाचे नाही, याचा शेवटपर्यंत त्यानी ठाम निश्चय केला होता. जेव्हा काही निःशस्त्र भारतीय स्वयंसेवकांनी गोव्यात शिरण्याचा प्रयत्न केला तेव्हा पोर्तुगीजांनी पशुतुल्य सेनादल वापरून त्याना धडा शिकविण्याची धडपड केली. भारताच्या भूमिकेच्या बाजूने आंतरराष्ट्रीय मत संघटित करण्याचा नेहरूंनी प्रयत्न केला. परंतु सैन्यदलाचा वापर करण्याकडे नेहरूंचा कल नाही हे जाणून, नको तो उपदेश देण्याचे पत्करून विदेशी शक्तींनी पोर्तुगालची सदिच्छा गमविण्याचे कोणतेच कारण पाहिले नाही. (पहा ' सर्वपल्ली गोपाळ,' दोन–२१३-२१८). सरतेशेवटी, गोव्याची समस्या १९६५ साली भारतीय सैन्याने गोव्याच्या ' मुक्ती ' ने सोडविली. परंतु त्यानंतर सुद्धा भारत आणि पोर्तुगाल यांच्यामधील संबंध अनेक वर्षे ताणलेले राहिले.

पाँडेचरी आणि गोवा या दोहोंच्या बाबतीत नेहरूंची भूमिका अशी होती की, या दोन्ही क्षेत्रांतील लोकांना त्यांच्या स्थानीय सांस्कृतिक परंपरा चालू ठेवण्याची प्रत्येक संधी पुरविली जाईल. तरीही ते अनुल्लंघनीयपणे भारतीय संघाचे भाग होते. काश्मीर आणि नंतर गोवा या दोहोंच्या बाबतीत नेहरूंना आढळून आले की, त्यांनी स्वतः सर्व व्यक्तिगत प्रतिष्ठा उपभोगिली असली, तरी सुद्धा भारताची बाब तिच्या गुणवत्तेवर विचारात घेण्यासाठी पाश्चात्य लोकशाह्यांच्या सदिच्छेवर भारताला अवलंबून राहता आले नसते. प्रत्येक प्रश्न एक मुद्दा झाला. जिथे मुत्सद्देगिरी आणि राष्ट्रीय हितसंबंध यांच्या प्रत्यक्ष विचारांनी तत्त्वाच्या विचारांवर मात केली. नेहरूंनी संतापाने, सरतेशेवटी गोव्याला भारतीय सेना पाठविण्याच्या निर्णयामध्ये मूक संमती दिली.

### ईशान्य भूप्रदेश

ब्रिटीशांनी आसामची ईशान्य डोंगराळ क्षेत्रे भारताच्या अन्य प्रशासनामध्ये एकात्म करून घेण्याचा प्रयत्न केला नव्हता. एकूण राजकीय नियंत्रण राखून, त्यांच्या स्वतःच्या स्थानीय रूढींनी शासित व्हायला लोकांना; त्यांनी सोडून दिले होते. त्या डोंगरांवर कित्येक जनजातीकडे वसाहत केली होती. ते सांस्कृतिक दृष्ट्या एकमेकापासून वेगळे होते; आणि जे नेहमीच भारत-ब्रह्मदेश सरहद्दीवरून मुक्तपणे वावरत होते. या बऱ्याच क्षेत्रांमध्ये विदेशी धर्मप्रचारक दशकानुदशके सक्रीय होते आणि त्यांचे शुभवर्तमान पसरविण्याचे काम त्यांनी केले होते. त्यामुळे त्यांची विभक्त अस्मिता जोरदारपणे मांडण्याकडे त्यांचा कल झाला होता.

नागा लोक हे विभक्त राष्ट्रीयतेचा झेंडा उभारणारे आणि भारतापासून फुटून निघण्याचे पहाणारे ; पहिले लोक होते. फिझो त्यांचा नेता होता, आणि या पवित्र्यामागे रेव्हरंड स्कॉट त्यांचा सल्लागार होता. अशा कोणत्याच मागणीचा विचार केला जाणार नाही; याबद्दल नेहरू स्पष्ट होते. त्यांचा प्रतिसाद एका बाजूने कोणताही हिंसात्मक विद्रोह उठावाचे कृत्य म्हणून ठामपणे त्याविरूद्ध कार्यवाही करण्याचा होता; त्याचवेळी जबाबदार शासनाने, ज्या जनजाती लोकांच्या सांस्कृतिक स्वायत्ततेचे संरक्षण करील आणि त्यांच्यासाठी नव्या संधी मोकळ्या करून देईल, जनजातींची सदिच्छा प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न करण्याचाही होता. हे भूस्तरावर कोणत्याही पर्यायी राजकीय नेतृत्वाच्या अभावी सोपे नव्हते. परंतु हे मूलतः धोरण होते; ज्याचे नेहरूंनी समर्थन केले व पुढे चालविले. ईशान्य डोंगराळ क्षेत्रांमध्ये प्रशासन दृढ करण्याचा इतिहास निरनिराळ्या गटांशी, निरनिराळ्या प्रशासकीय आकृतीबंधांशी आणि राजकीय सुसज्जतेच्या स्वरूपांशी, काळोखात चाचपडण्याचा; आणि प्रयोग करण्याचा होता. नाग लोकांमधील, मिझो लोकांमधील आणि नंतर मणिपूरच्या जनजातींमधील उठाव मोडून टाकण्यापूर्वीसुद्धा, पुष्कळ वर्षे त्यांनी घेतली. परंतु सरतेशेवटी, राजकीय संवादासाठी एक टप्पा गाठण्यात आला आणि आज सात डोंगरी राज्ये, त्यांचे स्वतःचे निर्वाचित विधानमंडळ आणि प्रशासनांसह; अस्तित्वात आली आहेत. पठारावरील लोकांनी स्थानीय गटांना दडपून टाकण्याच्या कोणत्याही भीतीला प्रतोलन देण्यासाठी बिगर-जनजातींच्या लोकांना जनजाती क्षेत्रांमध्ये मालमत्ता संपादन करावयाला प्रतिबंध करून विशेष वैध तरतुदी करण्यात आल्या आहेत. शैक्षणिक संस्थांमध्ये आणि शासकीय सेवायोजनामध्ये अनुसूचित जमातींसाठी आरक्षणांनी सुद्धा नव्या संधी मोकळ्या केल्या आहेत. परंतु तरीही एखाद्याच्या लक्षात येते की, ईशान्य जनजाती लोकांच्या मनात आपण अल्याड पल्याड असल्याची भावना नेट धरून आहे. या प्रदेशाचा इतिहास लक्षात घेता; हे दुसरं काही असणारच नव्हतं. या क्षेत्रातील जनजाती लोकांमध्ये, देशाच्या अन्य भागाबरोबर अस्मितेची भावना हळूहळू विकसित होत आहे. परंतु तरीही एक दीर्घ मानसशास्त्रीय अंतर पार पाडायचे आहे.

### प्रादेशिक अस्मिता

समस्यांचा चौथा संच, ज्याला नेहरूंना भारतीय राजनीतीचे दृढीकरण करताना आणि तिची राष्ट्रीय अस्मिता बळकट करताना तोंड द्यावे लागले; तो अत्यंत अनपेक्षित अशा क्षेत्रात उद्‌भवला. काश्मीर प्रश्नाइतका तो गंभीर नव्हता, किंवा ईशान्य जनजाती लोकांच्या विभक्तपणाच्या भावनेवर मात करण्यासारखा हटवादी नव्हता. परंतु भाषिक समस्या किंवा काहीशी भाषिक प्रांतांची समस्या

राष्ट्रीय अस्मितेची भावना काही वर्षे दुबळी करीत असल्याचे जरूर भासले. या प्रश्नामुळे खरोखर कोणती समस्या पुढे टाकायला नको होती कारण भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने विनिर्दिष्ट ठरावांमध्ये भाषिक सीमांसह प्रांत संघटित करण्याचे औचित्य स्वीकारले होते. वस्तुतः स्वतः काँग्रेसने तिच्या स्वतःच्या संघटनांसाठी हे तत्त्व अनुसरले होते.

परंतु काळाच्या विशिष्ट बिंदूवर, जिथे पहिल्या अशा राज्याची मागणी पुढे करण्यात आली. नेहरूंना; तिने तिला अग्रहणक्षम केल्याचे दिसले. काश्मीर, हैदराबाद आणि गोवा यांच्या निर्वासितांच्या पुनर्वसनाच्या समस्यांचे भार अंगावर असताना कोणतीही मागणी; जी संकुचित असह्याची भासत होती; आणि भारताच्या ऐक्याला प्रतिकूलतेने विचार करण्याच्या मनस्थितीमध्ये ते असल्याचे दिसत नव्हते. काही झाले तरी त्यांच्या कार्यसूचीवर तिला कोणते प्राथम्य मिळणे शक्य नव्हते. विभक्त आंध्र राज्यासाठी मागणी जेव्हा वर आली, तेव्हा काँग्रेसच्या समितीने, जिचे नेहरूसुद्धा सदस्य होते. सुचविले की, पुढील दहा वर्षांसाठी हा प्रश्न लांबणीवर टाकण्यात यावा. नेहरूंना असे सुद्धा वाटले की, मद्रास राज्याची क्षेत्रे, जी या प्रस्तावित आंध्र राज्यामध्ये पडतील, ती त्याला मागास राज्य करतील. काही झाले तरी निर्णय घेण्यामध्ये पुष्कळ दोलायमान अवस्था होती. श्री. चक्रवर्ती राजगोपालाचारी, तेव्हाचे मद्रासचे मुख्यमंत्री यांनी या पवित्र्यावर अनुग्रह केला नाही. त्याचा परिणाम म्हणून शासनाने जेव्हा आंध्रचा निर्णय सरतेशेवटी स्वीकारला; तेव्हा त्या प्रश्नाने पुष्कळ कडवटपणा निर्माण केला होता. पोट्टी श्रीरामुलु या नेत्याच्या मृत्यूने सुद्धा! ज्याने आंध्रसाठी उपवास केला होता, पुष्कळ वैरभावाला बढती दिली होती.

महाराष्ट्राच्या निर्मितीच्या मागणीला, मुंबई त्याची राजधानी म्हणून, तिच्यासह, पुष्कळ प्रतिकाराला तोंड द्यावे लागले. आणि लोकक्षोभानंतर आणि काही जीवितहानी होऊन सरतेशेवटी अत्यंत नाखुषीने तिला अनुमान्यता देण्यात आली.

या दोन्ही बाबतीत, नेहरू अशी स्थिती निर्माण न करण्याबाबत चिंतातुर दिसले. जिथे स्थानिक, भाषिक निष्ठा, संपूर्ण देशाला असलेल्या निष्ठांवर अग्रक्रम देतील. या मागण्या ' मूर्ख आणि रानटी '' म्हणून मानण्यापर्यंत नेहरू आले होते. ज्यांनी निरोगी राष्ट्रवादाची अभिवृद्धी दुबळी केली होती. वस्तुतः या मागण्यांसाठी, शासनाने नमते घेईपर्यंत, ज्या रीतीने आंदोलन करावे लागले होते त्याचा परिणाम फार मोठ्या टाळता येण्याजोग्या सदिच्छेची हानी होण्यात झाला.

त्याचप्रमाणे शासन हे प्रश्न स्पष्टपणे पहायला आणि सुनिर्णित ठाम भूमिका घ्यायला नेहरू असमर्थ होते. यामुळे प्रादेशिक भावना कमी होण्याऐवजी जोरदार झाल्या.

पंतप्रधान नेहरूंना कार्यवाहीच्या मर्यादा स्वीकाराव्या लागल्या, तडजोडींसाठी वाटाघाटी कराव्या लागल्या. तथापी लोकांचे प्रेम आणि त्यांची अतूट निष्ठा याचा आनंद नेहरू घेत राहिले. त्यांच्या भोवताली चाललेल्या सर्व राजकारणामध्ये हेच त्यांचे चिलखत होते, आणि ज्यामध्ये इच्छा असो वा नसो, त्यांना सहभागी व्हावे लागत होते. त्यांच्या हेतूची पारदर्शक कळकळ, देशावरील आणि त्यांच्या लोकांवरील प्रेम, त्यांचे अनेक त्याग आणि सर्वात मोठे; लोकशाही प्रक्रियांवरील त्यांची अविचलित श्रद्धा, यानी हे निश्चित केले की त्यांच्या अपयशांमध्ये सुद्धा लोकांची सहानुभूती त्यांच्याबरोबरच राहील.

नेहरूंचे नियतकार्य महाकष्टदायक होते आणि भारतीय ऐक्याला मिळालेल्या चार आव्हानांना तोंड देताना त्यांच्याकडे सोपा मार्ग नव्हता. परंतु ते नेहमीच योग्य तो सूर लावावयाला आणि

संकुचित प्रादेशिक प्रयोजनाशी मर्यादित होणाऱ्या चर्चेची पातळी उंचावयाला समर्थ होते. मग ते संविधान बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये असो, किंवा देशाच्या शासनामध्ये असो ! त्यांना आपली भूमिका युक्तिवाद करून सांगावी लागत असे आणि तिला पाठिंबा मिळवावा लागे. जरी बाह्य जगाची अशी समजूत झाली की, नेहरू कार्यवाहीचे अमर्याद स्वातंत्र्य उपभोगीत होते, तरी त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांना त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांनासुद्धा त्यांनी पाठविलेल्या त्यांच्या पत्रांचे लक्षपूर्वक वाचन दाखविते. दैनंदिन शासनाच्या कामात ताशी किती मनधरणी, खुशामत आणि युक्तिवाद गुंतलेला होता. त्यांच्या पहिल्या अर्ध्या वर्षामध्ये पंतप्रधान म्हणून त्यांना पटेल, आझाद, राजगोपालाचारी, राजेन्द्रप्रसाद यांसारख्या खंद्या पुरुषांबरोबर आणि इतरांबरोबर; जे बळाचे उगमस्थान होते, काम करावे लागले होते. तसेच त्यांचा स्वतःचा स्वतंत्र दृष्टीकोन असलेल्या लोकांबरोबर सुद्धा !. नेहरूंनी महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यापूर्वी चर्चेच्या निरोगी परंपरा प्रस्थापित केल्या. घटना समितीचे सदस्य म्हणून राष्ट्रीय ऐक्य आणि व्यक्तीस्वातंत्र्याला संरक्ष ण या प्रश्नांवर ते हार खात नव्हते. तरीसुद्धा मालमत्तेवरील अधिकाराचे मूलभूत अधिकार म्हणून समावेशन करणे. गोहत्त्या प्रतिबंधाचा निदेशक तत्त्वांमध्ये समावेश करणे आणि संस्थानिकांना खासगी तनख्यांच्या स्वरूपात अमाप भरपाईचे प्रदान, अशासारख्या महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांनी हार खाल्ली. (सर्वपल्ली गोपाल– खंड दोन-पृ. ७९-८०).

व्यक्तिगत प्रश्नांवर नेहरू किरकोळ *लढाया हरले असतील. परंतु त्यांचा मोठा विजय होता; भारताच्या शासनासाठी बळकट लोकशाही पाया घालून ठेवणे, हा ! त्यांचा ध्येयवाद, उच्च प्रयोजनाची त्यांची भावना, त्यांची इतिहासाची जाणीव, यांचा आपल्या सहकाऱ्याबद्दलचा आदरभाव, भारतीय संस्कृतीच्या विविधतेवरील त्यांचे विशुद्ध प्रेम, यानी भारताच्या ऐक्याचे त्यांचे स्वप्न त्यांनी आकारबद्ध केले. आणि जाणाऱ्या सत्तांतर राष्ट्राला आणून ठेवले. ऐक्य एकदाच कायमचं साध्य करता येत नाही, हे त्यांना ठाऊक होतं. स्वातंत्र्याप्रमाणे सतत दक्षतेने ते सांभाळले पाहिजे आणि नेहरूंना स्वातंत्र्य आणि ऐक्याची इच्छा, प्रत्यक्ष राष्ट्रवादाचा प्रत्यक्ष गाभा वाटत होता.

□□□

अनुवाद : **प्र. श्री. नेरूरकर**

* या शोधनिबंधातील नेहरूंच्या लेखनातील उद्धृतांचे माझे प्रमुख उगमस्थान नेहरूंच्या लेखनांचे आणि भाषणांचे ' नेहरू–पहिली पन्नास वर्षे, खंड एक व दोन ' यामधील उताऱ्यांचे डोरोथी नॉर्मन यांचे अमोल संकलन, हे आहे. मी सर्वपल्ली गोपाल आणि एम ब्रेशर यांच्या नेहरूंच्या चरित्रांतून सुद्धा घेतले आहे. माझे स्वतःचे नेहरूंचे प्रत्यक्ष वाचन त्यांचे आत्मचरित्र व ' विश्व इतिहासाची ओझरती दर्शने ' आणि ' भारताचा शोध ' यापुरतेच मर्यादित आहेत.

# जवाहरलाल नेहरू आणि भारतीय स्त्रियांचे स्थान

□ डॉ. श्रीमती नवाझ बी मोदी,
प्रपाठक, नागरिकशास्त्र आणि राज्यशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ.

नेहरूंचे राष्ट्राला मुख्य अंशदान, स्वातंत्र्य चळवळीचे एक लक्षणीय पुढारी म्हणून स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून, सामाजिक जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये आधुनिकतेच्या चेतनेचा अंतर्भाव हे होते. तो हा गुण होता, जो कदाचित स्वातंत्र्य लढ्याच्या नेतृत्वातील त्यांच्या बहुसंख्य सहकाऱ्यांपासून त्याना वेगळे करीत होता. भारताच्या पुढाऱ्यांपैकी नेहरू हे पहिले पुढारी होते, ज्यांनी राष्ट्रीय जीवनाच्या प्रत्येक पैलूबाबत आधुनिक दृष्टीकोन स्वीकारला होता–सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक अंधश्रद्धेच्या विरोधात ते विज्ञानाचे उत्कट कैवारी होते, आपल्या वैश्विक दृष्टीकोनात बुद्धीवादी आणि आर्थिक जीवनाच्या औद्योगिकरणाचे आणि आधुनिकीकरणाचे समर्थक, पुरूष आणि स्त्रिया यांच्या समानतेसाठी चाललेल्या चळवळीचे आश्रयदाते, कौटुंबिक आणि सामाजिक यंत्रणेचे सुधारक आणि सामाजिक न्यायाचे कट्टर पाठीराखे !

नेहरू, आधुनिक भारताचे शिल्पकार, हे खरोखर गतिशील क्रांतदर्शित्व, बौद्धिक सचोटी यांचे दर्शन असलेले माणूस होते आणि त्यांच्याजवळ नेतृत्त्वाचे उत्तुंग गुण होते. त्यांच्या अंतर्भूत इतिहासाच्या जाणीवेने त्याना केवळ भूतकाळातच पहायला लावले नव्हते; तर भविष्यकाळात सुद्धा पहायला लावले होते. त्यांनी भारताला जगाच्या आघाडीवरील राष्ट्रांच्या एका प्रवर्गात नेऊन ठेवले. त्यांची भारतासाठी समाजाच्या समाजवादी स्वरूपाची स्वीकृती आणि समर्थन याचा परिणाम आधुनिकीकरण आणि विकसनशील प्रक्रिया यामध्ये देशाने भरभक्कम पुढची पावले टाकण्यात झाला. स्त्रियांचे विमोचन, त्याचप्रमाणे प्रबळ भारताची बांधणी करण्यातील त्यांच्या भूमिकेबाबत नेहरूंचे दृष्टीकोन अत्यंत स्वच्छ आणि ठाम होते. हा शोधनिबंध स्त्रियांची स्थिती, स्वातंत्र्य चळवळीमध्ये स्त्रियांची भूमिका, त्यांचे शिक्षण आणि सामाजिक न्यायाचे प्रश्न जे त्यांच्यासमोर आले, त्याचप्रमाणे न्याय्य आणि समदर्शी सामाजिक यंत्रणेसाठी चाललेला त्यांचा झगडा, यावरील त्यांच्या विचारांवर केंद्रित करतो आणि त्यावर जोर देतो. या शोधनिबंधामध्ये सादर करण्यात आलेले बरेचसे साहित्य त्यांची भाषणे आणि लेखन यावर आधारलेले आहे आणि त्यातून संग्रहित केलेले आहे.

शक्य तो भारतीय स्त्रियांची स्थिती जी होती; तिच्या संबंधात नेहरूंना वाटत होते की, भारतीय स्त्रियांच्या बाबतीत दोन प्रमुख दृष्टीकोन होते एक दृष्टीकोन पारंपरिक भारतीय दृष्टीकोनाचे

प्रतिनिधित्व करीत होता, तो म्हणजे, भारतीय स्त्रिया या शुचिता, विश्वासूपणा, अधिनता आणि तिच्या पतीवरील भक्ती याचे प्रतीक होत्या-ह्याची प्रतीके होती सीता आणि सावित्री : दुसरा दृष्टीकोन, सर्वसाधारणपणे पाश्चिमात्य देशात प्रचलित असलेला होता. तो म्हणजे, भारतीय स्त्रिया या मागासलेल्या आणि दबलेल्या होत्या. त्यांना जंगम मत्तेसारखी वागणूक देण्यात येत होती. परंतु त्यानी हेही दाखवून दिले होते की, स्त्रियांसाठी आदर्श म्हणून भक्तीने आणि आदराने सीता आणि सावित्री यांचा उल्लेख केला जात असतानाच त्याच रीतीने रामचंद्र आणि सत्यवान यांची आठवण मात्र पुरूषांना करून दिली जात नव्हती आणि त्यांच्यासारखे वागण्यासाठी त्यांना प्रेरीत करण्यात येत नव्हते. " फक्त स्त्रियांनीच सीता सावित्रीसारखे वागावयाचे होते. पुरूषांनी त्यांना आवडेल, त्याचप्रमाणे वागावे."[१]

'भारताचा शोध' मध्ये त्यांनी दाखवून दिले होते त्याप्रमाणे—स्त्रियांची वैध स्थिती, मनूच्या म्हणण्याप्रमाणे, निश्चितपणे वाईट होती. त्या नेहमीच कुणावर तरी अवलंबून होत्या—वडील, नवरा किंवा मुलावर)! जवळ जवळ नेहमीच कायद्यामध्ये त्यांना जंगम मत्ता म्हणून वागणूक देण्यात आली होती आणि तथापी, महाकाव्यांतील अनेक गोष्टींवरून, हा कायदा अत्यंत सख्तपणे लागू केलेला नव्हता आणि त्यांना घरात आणि समाजात सन्माननीय स्थान प्राप्त झाले होते. जुना विधिदाता मनू स्वतः म्हणतो, ' यंत्र नार्यस्तु पूज्यन्ते । रमन्ते तत्र देवता ।' नंतरच्या युगामध्येसुद्धा कितीतरी श्रेष्ठ विद्याव्यासंगी स्त्रिया होत्या. प्राचीन भारतामध्ये स्त्रियांची वैध स्थिती वाईट होती; तरी सुद्धा आधुनिक मानकांनी मूल्यांकन करताना, ती प्राचीन ग्रीस, रोम, मध्ययुगीन युरोपचा धर्म नियम कायदा, यापेक्षा कितीतरी अधिक चांगली होती आणि खरोखर तौलनिक दृष्ट्या थेट एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी आधुनिक काळापर्यंत.[२]

तथापी, हे दोन्ही दृष्टीकोन वस्तुस्थितीच्या वास्तव्यापासून फार वेगळे आहेत असे त्यांना वाटले. यावर त्यांनी लिहिले, " भारताच्या स्त्रियांशी मी पक्षपाती आहे, आणि जितका अधिक या महान देशात मी भटकलो आहे; तितका अधिक आमच्या स्त्रीमंडळींबद्दल काहीसा गर्व मला वाटला आहे. भारतीय स्त्रियांनी आमच्या सामाजिक जीवनामध्ये आणि आमच्या इतिहासामध्ये महत्त्वाचा भाग घेतलेला आहे. राष्ट्रीय क्रियाशीलतेच्या प्रत्येक शाखेमध्ये त्यांनी हा भाग घेतलेला आहे, उच्च विद्वत्तेपासून तो रणांगणावरील शौर्यापर्यंत. परंतु त्यांचे परिवारातील, खेड्यातील किंवा विशालतर समाजातील निमूट काम, त्यांने राष्ट्राला आकार दिला आहे."[३]

त्यांना वाटले की, भारतातील सर्वात मोठी क्रांती ती एक असेल; जी त्याच्या स्त्रियांच्या स्थानाला आणि स्थितीला बाधक होईल. ते गांधीजी होते, ज्यांनी नेहरूंच्या म्हणण्याप्रमाणे, भारतीय स्त्रियांमध्ये नाट्यमय बदल घडवून आणला होता, ज्या; त्यांच्या हाकेबरोबर भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांमध्ये भाग घेण्यासाठी आपल्या घरांच्या आश्रयाखालून फार मोठ्या संख्येने बाहेर आल्या. नेहरूंनी एवढेसुद्धा म्हटले की, भारताच्या स्त्रियांचा त्यांना अभिमान वाटत होता, अभिमान त्यांच्या सौंदर्याचा, लालित्याचा, आकर्षकपणाचा, लाजाळूपणाचा, विनयाचा, बुद्धीचा आणि त्यांच्या त्यागमयतेचा.त्यांच्या म्हणण्यापमाणे भारताच्या चेतनेचे जर खरोखर कुणी प्रतिनिधित्व करीत असेल तर त्या स्त्रिया होत्या, पुरुष नव्हेत.[४] प्रचलित स्थिती बदलण्यासाठी त्यांनी स्त्रियांना प्रेरित केले आणि त्यांच्या प्रगतीला अडथळा करीत त्यांच्या मार्गात उभे होते; ते घटक ओळखले. ते म्हणाले, " आमची संस्कृती, आमच्या रूढी, आमचे कायदे, हे सगळे पुरुषाने बनविले आहेत आणि स्वतःला वरीष्ठ स्थानावर ठेवण्याची आणि आपल्या कायद्यासाठी आणि सुखासाठी शोषण

करता यावे यास्तव, एक क्रीडावस्तू म्हणून स्त्रियांना वागणूक देण्याची चांगली काळजी त्याने घेतली आहे.[५] '' या संदर्भात त्यांनी स्त्रियांसाठी परिणामकारक शिक्षणाच्या आवश्यकतेवर, सर्व धंद्यांमध्ये आणि क्षेत्रांमध्ये परिणामकारक भूमिका पार पाडण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करण्यावर, जोर दिला.

स्त्रियांचा दर्जा सुधारण्याबाबत त्यांच्या धारणा फार प्रबळ होत्या. इतक्या फार पूर्वी, १९२९ मध्ये त्यांनी लिहिले की, जोपर्यंत त्या आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होत नाहीत तोपर्यंत स्त्रिया मुक्त होऊ शकत नाहीत. '' हे, ते आर्थिक बंधन आहे, जे भारतीय स्त्रियांच्या त्रासांचे मूळ कारण आहे आणि याच्या निराकरणासाठी आमच्या शक्ती निदेशित केल्याच पाहिजेत.''[६] स्त्रियांच्या हिंदू संयुक्त कुटुंब पद्धती ही सरंजामी युगाचा एक स्मारकावशेष होता, पूर्णपणे आधुनिक स्थितींशी न जुळणारा; आणि तो दूर केलाच पाहिजे. १९२९ मध्ये याचे समर्थन केले जाणे हे या प्रश्नावरील त्यांच्या भावनांची उत्कटता दर्शविते. इतर सामाजिक दुष्कर्मे; ज्यांच्याशी झगडा दिला पाहिजे असे त्यांना वाटले; ती होती पडदा, बालविवाह, अस्पृश्यता आणि स्त्रियांची निरक्षरता.

या संदर्भात १९२३ मध्ये अलाहाबाद नगरपालिका मंडळाचे अध्यक्ष म्हणून आपल्या भाषणाच्या ओघात त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला होता. तो वेश्या व्यवसायाला निर्दिष्ट करीत होता. व्यवहारी असल्यामुळे, त्यानी ओळखलं होतं की, वेश्याव्यवसाय नष्ट करण्याच्या प्रयत्नांना अपयश ठरलेलंच होतं. परंतु त्यांनी दोन घटक; जे त्याल्या कारणीभूत होते; ते आर्थिक आणि मानवी म्हणून ओळखलेले होते. त्यांनी सुचविले की, 'जर आपण स्त्रियांचा दर्जा उंचावू शकलो आणि त्यांना सन्मान्य जीवन देऊ शकलो तर उपविधींच्या कितीही संस्थेपेक्षा हे दुष्कर्म कमी करण्यासाठी आपण अधिक कार्य करू.[७] त्यांनी उपरोधाने भाष्य केले होते की, प्रत्यक्ष शहरात वेश्या आपल्या स्वतःला स्थानापन्न करण्याबाबत प्रत्येकजण जरी अस्वस्थ झाला होता, तरी या वस्तुस्थितीना कुणीही उल्लेख केला नव्हता की, वेश्या त्यांचा प्राचीन व्यवसाय आपण स्वतः होऊन करत नव्हत्या आणि कुणीही जी माणसे स्त्रियांचे शोषण करीत होती; त्यांचा निषेध केला नव्हता.

स्त्रियांसाठी त्यांची आस्था, स्त्रियांच्या एका विभागासाठी फक्त मर्यादित झालेली नव्हती. परंतु तिने सर्व क्षेत्रांतील स्त्रियांचा समावेश केला होता. समाजवादी भारताचे त्यांचे स्वप्न तेव्हाच फक्त साध्य होणार होते; जेव्हा स्त्रिया ज्यांना ते दलित वर्ग म्हणून मानीत होते; मुक्त होणार होत्या आणि त्यांना समान संधी आणि विशेषाधिकार देण्यात येणार होते.

हे स्पष्ट आहे की, नेहरूंना भारतीय स्त्रियांबद्दल फार मोठा आदर होता आणि त्यांचे आधुनिक विचार, स्वातंत्र्य चळवळीतील लढ्याच्या रिंगणात त्यांच्या प्रवेशाचा गुणगौरव करीत होते व त्यांना पाठिंबा देत होते. भारताच्या पुनर्निमाणाच्या बाबतीत १९३० च्या मध्यावर भारतीय स्त्रियांकडून अंशदानांची जी अपेक्षा करणे शक्य होते, त्यावरील त्यांच्या दृष्टीकोनाबाबत जेव्हा प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा नेहरूंचे उत्तर होते की, अंशदान अगोदरच पुष्कळ होते. भारतीय स्त्रियांनी, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, अगोदरच राष्ट्रीय चळवळीमध्ये प्रचंड भाग घेतला होता.

एक उदाहरण म्हणून त्यांनी १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा उल्लेख केला. ज्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते, भारताच्या स्त्रियांनी त्यात पार पाडलेली प्रधान भूमिका! याचे त्यांना आश्चर्य वाटले. स्त्रीमंडळी केवळ बाहेर आली आणि तिने परिस्थितीचा ताबा घेतला. जेव्हा त्यांची बहुतेक पुरुष मंडळी तुरुंगात होती. नेहरूंना जे अधिक आश्चर्यकारक भासले, ते

होते की, त्यांच्याकडे सार्वजनिक कार्यामधील अनुभवाचा अभाव असूनही त्यांनी पुरुषांशिवाय दीर्घकाळ जवळ जवळ संपूर्ण चळवळ सांभाळली, हे त्यांनी दर्शविल्याप्रमाणे डोळयात अंजन घालणारे होते; आणि ते एका भविष्यकाळाचे पूर्वसूचन करीत होते. ज्यात भविष्यकाळातील सार्वजनिक जीवनामध्ये भारतीय स्त्रिया प्रधान भूमिका पार पाडण्याचा संभव होता. वस्तुतः त्यांच्या दृष्टीने राष्ट्रीय चळवळीतील स्त्रियांचा समूह सहभाग हा कुणाही राष्ट्रवाद्याला भविष्यकाळात त्यांचे राजकीय आणि सामाजिक अधिकार नाकारण्याचे कल्पिणेसुद्धा अशक्य करीत होता. काँग्रेसचा मूलभूत अधिकार ठराव ज्याने सर्व निःसमर्थता दूर केल्या आणि स्त्रीपुरूषजातींना अबाधित समानतेची हमी दिली; या वस्तुस्थितीची मान्यता परिवर्तित करतो.[८]

स्वातंत्र्य लढ्यात भारतीय स्त्रियांनी जो भाग घेतला होता त्याचे सर्वश्रेष्ठ महत्त्व नंतर त्यांनी पुनः पुनः कबूल केले होते—ज्यामुळे सगळा फरक झाला होता. त्यांनी मान्य केले की, बाह्यतः भारतीय स्त्रियांना फार थोड्या आडकाठ्या होत्या—मतदान अधिकार असावा या सारख्या, परंतु खऱ्याखुऱ्या आडकाठ्यांना त्या सामोरे जात होत्या; त्या होत्या सामाजिक आडकाठ्या! ज्यांच्याशी पाश्चात्य सित्रयांना झगडावे लागले नव्हते.[९] त्यानुसार, स्वतंत्र भारतामध्ये स्त्रिया पुरुषांसारखे तेच अधिकार उपभोगणार होत्या. वस्तुतः १९२८ साल इतक्या फार पूर्वी जवाहरलाल नेहरूंनी स्वातंत्र्य संघाची आस्थापना केली होती; ज्याचे ध्येय होते सामाजिक लोकशाही राज्य आणि विनिर्देशपणे त्यांनी स्त्रीपुरुष जातींना समान दर्जाची मागणी केली होती.[१०]

खरोखर आपल्या पत्नीच्या वार्तेवरून त्यांनी कितीतरी भरपाई करून घेतली. १९३० साली तुरुंगात असताना कमलाचा स्वतंत्र्यलढ्यात सक्रीय भाग होता. कमलाने नेहरूंच्या मोठ्या बहिणीबरोबर, अलाहाबादच्या आणि सभोवतालच्या खेड्यांतील स्त्रियांना संघटित करण्यामध्ये पुढाकार घेतला होता, विशेषतः दारूची दुकाने आणि परदेशी कापड यावरील बहिष्कारामध्ये. कार्यकारी समितीची बदली सभासद म्हणून तिची नेमणूक करण्यात आली होती आणि हजारो स्त्रियांना चळवळीत आणण्यासाठी तिने मदत केली. नेहरुंनी स्वतः तिच्या आत्मत्यागाचा गुणगौरव केला होता, देहाने नाजूक अशी ती होती.[११] वस्तुतः १ जानेवारी १९३१ रोजी कमलाची धरपकड, त्यांना नव्या वर्षाची एक आल्हाददायक देणगी होती, असे त्यानी आपल्या मुलीला लिहिले होते. सर्व सत्याग्रहींचे ध्येय–तुरुंगवास- कमलाने प्राप्त केले होते, याचा त्यांना आनंद वाटला होता. त्याने, हृदय-विशेषतः राष्ट्रवादी स्त्रियांना कमलाने जो निरोप घेताना संदेश दिला होता–त्याने हेलावले.[११] " माझ्या पतीच्या पावलांवर पाऊल ठेऊन जाताना मीच अपरिमित आनंदी आहे आणि अभिमानी. मला आशा वाटते, लोक झेंडा फडकावीत ठेवतील. "[१२]

जवाहरलालच्या आईने सुद्धा, स्वरूपराणीने परंपरागत चळवळीमध्ये सक्रीय भाग घेतला होता. एप्रिल १९३२ मध्ये, लाठी हल्ल्यात ती जबर जखम झाली होती. स्वरूपराणी धैर्यवान होती आणि एका पत्रात नेहरूंना तिने प्रतिसाद दिला, " मातृभूमीच्या कारणासाठी काठ्यांनी मारलं जावं, याचा मला अभिमान वाटतो. मारलं जात असताना मी तुझा आणि तुझ्या वडिलांचा विचार करीत होते, आणि एक उसासाही मी सोडला नाही. शूर मुलाची आई ही सुद्धा काहीशी त्याच्यासारखी आहे. ती फक्त लाठीच होती—तिथे बंदूक असती तरी मी माझी छाती उघडी केली असती. "[१३] त्यांच्या जडणघडणीच्या वर्षांमध्ये नेहरूंवर स्वरूपराणींचा प्रभाव अगदी पुष्कळ होता. त्यांच्या आईच्या प्रभावामुळे सभोवतालची भारतीय परिस्थिती सुनिश्चित ठसली आणि हिंदू रूढी

आणि लोकसाहित्याच्या वातावरणामध्ये घरातील स्त्रियांकडून त्यांनी विपुल प्रमाणात दंतकथा गोळा केल्या आणि देवालयात जाणे आणि गंगास्नान करणे यात सुद्धा ते रमले.

स्वातंत्र्यलढ्यात कैद करण्यात आलेल्या स्त्रियांना गैरवागणूक दिली जात होती; याची नेहरूंना पूर्ण जाणीव होती. बहुतेक मध्यमवर्गीय स्त्रिया असल्यामुळे, त्यांनी सर्वसाधारणपणे संरक्षित जीवन घालविलेले होते आणि अनेक प्रकारच्या दडपशाहींपासून दुःख भोगले होते. स्वातंत्र्याच्या हाकेचे त्यांच्यासाठी दुहेरी अर्थ होते, आणि ज्या उत्साहाने त्यांनी स्वतःला लढ्यात झुगारून दिले, त्यांचे उगम सुद्धा घरगुती गुलामगिरीतून स्वतःला मुक्त करून घेण्याच्या त्यांच्या इच्छेतच होते. त्यांच्या अनेक तुरूंग मुक्कामांपैकी एका मुक्कामात, नेहरूंनी स्वतः होऊन स्त्री राजकीय कैद्यांना कोणत्या भयंकर स्थितींमध्ये–विशेषतः १९३२ आणि १९३३ मध्ये,–ठेवले होते हे पाहिले.

नेहरूंच्या दृष्टीने, राष्ट्राच्या प्रगतीचे सारे लक्षण त्याच्या स्त्रियांच्या स्थानावर अवलंबून होते. त्यांच्या उच्च स्थानावरून भारताचे पतन, त्यांच्या दृष्टीने अंशतः भारतातील स्त्रियांच्या दर्जाच्या आणि स्थानाच्या अवनतीमुळे होते. स्वातंत्र्यपूर्व काळात पुरूष आणि स्त्री या दोघांचे आद्य कर्तव्य होते, त्यांच्या दृष्टीने, परकीय जोखडाखालून राष्ट्राला मुक्त करणे. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांना अनेक निःसमर्थनांतून मुक्त करणे, वैध आणि सामाजिक, हे काम होते; ज्या त्यांच्याशी संलग्न केलेल्या होत्या म्हणजे राष्ट्र उभारणीमध्ये त्यांच्या पुरूषमंडळीबरोबर त्या समान भाग घेऊ शकल्या असत्या.

नेहरूंनी पूर्णपणे ओळखले होते की भारतातील स्त्रियांची दीर्घकाळ उपेक्षा करण्यात आली होती. त्यांचा विश्वास होता की, भारतात खरी आणि वेगवान प्रगती फक्त तेव्हाच येईल, जेव्हा स्त्रिया हालचाल करू लागतील आणि त्यांना सर्वकाही जे दडपून ठेवते त्यातून मुक्त होतील आणि बंधनातून आपल्याला सोडवतील.(१५)

त्याप्रमाणे अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या स्त्रियांच्या शाखेला नेहरूंनी विशेष जबाबदारी दिली होती. तिने भारतातील स्त्रियांच्या कार्याशी संबंधित सर्व साहित्य गोळा करावयाचे होते आणि स्त्रियांच्या संघटनांशी संबंध ठेवायला हवा होता, आणि विशेषतः पक्षामधून काँग्रेस स्त्रिया जे काम करीत होत्या, त्यांच्याशी स्त्रियांच्या कार्यक्रमांनी काँग्रेसने आखून दिल्याप्रमाणे स्वयंपूर्णतेच्या स्थानिक कार्यक्रमांना स्वतःला वाहून घ्यावयाचे होते. याने त्याना वाटायला लावले असते की, त्या फार मोठ्या सहकारी साहसी उपक्रमाचा एक भाग आहेत. त्या कुणी असहाय मानवी प्राणी आहेत, अशी स्त्रियांना वागणूक देण्याच्या विरूद्ध नेहरू होते, ज्या स्वतःचा संभाळ करू शकत नव्हत्या आणि ज्यानी धोक्याच्या क्षेत्रातून पळ काढायलाच हवा होता. हे त्यांच्या दृष्टीने वाईट धोरण होणार होते. कारण, ते त्या होत्या त्याहूनसुद्धा त्यांना अधिक सहाय्य करील. ही समस्या हाताळण्याचा फक्त मार्ग होता; स्त्रियांना ओळखायला लावणे की, त्यांनी संकटाला तोंड द्यायला हवे होते आणि त्यासाठी स्वतःला सिद्ध करायला हवे होते.(१६)

तथापी, ते ज्यावर विश्वास ठेवीत होते आणि काँग्रेस समित्या आणि संसदीय मंडळे यामध्ये स्त्रियांचा सहभाग यासंबंधी त्यांच्या कृतींमध्ये काहीशी मतभिन्नता असल्याचे दिसून येते. सर्व राजकीय कार्यांमध्ये स्त्रियांनी पूर्णपणे सहभागी होण्याच्या आवश्यकतेबाबत त्यांचे विचार नेहमीच स्वच्छ होते. प्रांतिक काँग्रेस समितीला १९३६ मध्ये वाढलेल्या परिपत्रकात त्यांनी लिहिले की, स्त्री उमेदवारांसाठी कितीतरी अधिक जागांची गरज होती आणि त्यावर तोपर्यंत पुरेसा जोर देण्यात आला नव्हता, याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. स्वातंत्र्याच्या लढ्यात स्त्रीमंडळीनी पार

पाडलेल्या महान भूमिकेची स्तुती करताना त्याना वाटले; त्यांना सार्वजनिक आणि राष्ट्रीय कार्यामध्ये समान हिस्सा देऊन तिला मान्यता दिली पाहिजे.[१७]

त्यापूर्वी त्यानी अम्मू स्वामीनाथनना लिहिले होते की, त्यांच्यासाठी आरक्षित केलेल्याच जागांसाठी स्त्री उमेदवार उभे करण्याचे काँग्रेस केवळ प्रस्तावित करीत नव्हती; तर सर्वसाधारण मतदारसंघामध्ये सुद्धा![१८] या दृष्टीकोनातून पहाता स्त्रियांना कार्यकारी समितीतून वगळण्याचा त्यांचा निर्णय गूढ असल्याचा वाटतो. ही न-अंतर्भूत करण्याची जबाबदारी स्वीकारल्याबद्दल त्यांचे स्पष्टीकरण खात्रीचे वाटत नाही. ते म्हणाले, "एका स्त्री सभासदाला नामनिर्देशित करणे निश्चितपणेच मला शक्य होते, परंतु या आशेने मी ही परंपरा तोडण्याचे ठरविले की, अंतिमतः स्त्रियांनाच स्वतःला ते लाभदायक होते."[१९] त्याना ज्या निकडीना तोंड द्यावे लागत होते त्या लक्षात घेता, हे स्त्रियांना तंतोतंत कसे काय लाभदायक ठरणार होते हे स्पष्ट नाही.

स्त्रियांना मताधिकार वाढवून देण्याबाबत नेहरू पार स्पष्ट होते. आणि त्यांनी पुनः पुनः पुनरूच्चार केला की, काँग्रेस पुरूषांबरोबर स्त्रियांच्या समान नागरिकत्वासाठी आणि दोघांसाठी समान मताधिकारासाठी उभी होती. नेहरूंच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने स्वीकारलेच होते की, स्वतंत्र भारतामध्ये पुरूष आणि स्त्रियांमध्ये संपूर्ण समानता असली पाहिजे आणि इतर गोष्टींबरोबर सेवायोजनाच्या किंवा दुसरे कोणते राजकीय स्थान याच्या बाबतीत, स्त्री किंवा पुरुष या आधारावर भेदभाव करण्यात येऊ नये. नेहरुनी असेसुद्धा नमूद केले की, शैक्षणिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या आणि काही थोडे व्यवसाय खेरीजकरून औद्योगिकदृष्ट्या स्त्रियांना, पुरूषांसारखी त्याच पातळीवर वागणूक मिळाली पाहिजे. अनर्हता काढून टाकणे निर्णायक होते. अशा रीतीने त्यांच्या दृष्टीने स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने शैक्षणिकदृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या आणि औद्योगिकदृष्ट्या सममूल्य वागणूक द्यायला हवी होती.[२०] वस्तुतः अनुच्छेद १५(३) चा संविधानामध्ये अंतर्भाव न-भेदभाव खंड दूर करण्यासाठी स्त्रियांसाठी विशेष तरतूद करावयाला राज्याला समर्थ करणारा, याचे श्रेय संविधान तयार करताना प्रत्यक्षपणे त्यांच्या प्रयत्नांना देण्यात आले आहे. संसदेला स्त्रियांची पर्याप्त संख्या निर्वाचित होण्याबाबत ते फार उत्सुक होते. संसदेला निर्वाचित स्त्री सदस्यांची संख्या; त्याना वाढावयाला हवी होती कारण त्याना वाटले की, या प्रयोजनासाठी सक्षम स्त्रियांची पुरेशी संख्या उपलब्ध होती. संसदेतील स्त्रियांची संख्या त्या लक्ष्यापर्यंत खरोखर केव्हाच पोचली नाही, जे नेहरूनी ठरवून दिले होते. नंतर सुद्धा संसदेतील स्त्रियांचे प्रतिनिधीत्व अपर्याप्त होते.

आपल्या एका भाषणात नेहरूंनी एक फ्रेंच लेखक उदधृत केला आणि म्हटले, "राष्ट्र हे कशासारखे असते हे मी तुम्हाला सांगावे असे तुम्हाला हवे असेल, तर किंवा सामाजिक संघटना कशासारखी असते, तर त्या राष्ट्रातील स्त्रियांचे स्थान मला सांगा. ते समानतेने शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि इतर क्षेत्रांनाही लागू होते."[२१] मुले आणि मुली यांच्या शिक्षणामधील अंतराची त्यांना तीव्र जाणीव होती आणि त्यांना आशा वाटत होती की, थोड्या वर्षातच शिक्षणाचा प्रसार मुले आणि मुली या दोघांचाही समावेश करील. मुलींचे शिक्षण साधारणपणे उघड सामाजिक कारणांसाठी मागे पडले होते. तथापी त्यांना वाटले की, मुलींच्या शिक्षणाबाबतचे आकडे उचित रीतीने उत्तेजक होते, जरी मुलांच्या शिक्षणाशी तुलना करता ते तितकेसे अधिक उत्तेजक नव्हते.[२२] मुलींच्या शिक्षणाचे आकडे खरोखर कधीच समाधानकारक राहिलेले नाहीत आणि आता सुद्धा मुलींचे साक्षरतेचे प्रमाण या देशात मुलांच्यापेक्षा निम्मे आहे.

तथापी नेहरूंनी, मुलींच्या शिक्षणाची मोठी गरज ओळखली होती आणि त्यांना वाटले की जेव्हा जेव्हा भारतामध्ये त्यांच्या शिक्षणाला उत्तेजन देण्यात आले होते, तेव्हा प्रगती झाली होती. प्रगतीतील नेता असल्याबद्दल त्यांनी पंजाबचे उदाहरण दिले. जिथे मुलींच्या शिक्षणाला अन्यत्र कुठेही नव्हते त्याहूनही फार लवकर प्रारंभ झाला होता. हे विशेषतः ग्रामीण क्षेत्रांमध्ये कोणत्या समस्यांना कारणीभूत होईल याची सुद्धा त्यांना जाणीव होती.

प्राथमिक, माध्यमिक आणि विद्यापीठ पातळीवरील स्त्रियांच्या शिक्षणाच्या अभिवृद्धीवरसुद्धा त्यांनी जोर दिला होता. आणि त्यांना वाटले की, त्यांना व्यवसायामध्ये वाढत्या संधी उपलब्ध करून देण्यावर तिचे भवितव्य अवलंबून होते आणि त्यांना आशा वाटत होती की, जर स्त्रियांसाठी सुविधांच्या तरतुदी करण्यात आल्या तर ह्या संधी वाढतील.

स्त्रियांना बहुतेक व्यवसायांपासून दूर ठेवण्यात यावे ही कल्पना त्यांना आवडली नाही. यामुळे त्यांची सुविद्य आधुनिकता निर्देशित झाली. त्यांच्या दृष्टीने भारतात, सरासरी भारतीय स्त्रिया पुरूषांबरोबर शेतात एकत्र काम करीत होत्या. विभेद फक्त मध्यम वर्गाच्या बाबतीत केले जात होते. आर्थिक परिस्थितींच्या कारणामुळे बहुतेक स्त्रिया काम करीत होत्या. त्यांच्या दृष्टीने हे दुर्दैवी होते की, एखाद्याने कमी काम केले की, समाजातील त्याचा दर्जा उच्चतर होता. त्यांच्या दृष्टीने ते युग संपुष्टात आले होते आणि प्रत्येकाने निर्माणक आणि उत्पादक काम करावयाला हवे होते. अशा तऱ्हेने शिक्षणाच्या आंतरिक इष्टतेखेरीज, निव्वळ केवळ स्वरक्षणासाठी लोकांनी शिक्षण घ्यावयाला हवे होते. प्रत्येकाची शिक्षणाची तरतूद करणे हे राज्याचे कर्तव्य असावयास हवे होते. या क्षेत्रामधील नेहरूंच्या उच्च आदर्शांचा संविधानाच्या निदेशक तत्त्वांमध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे. जिथे सर्वांना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्यासाठी राज्य बांधलेले होते.

त्यांनी हे सुद्धा ओळखले होते की, विशेषतः मुस्लीम स्त्रियांमध्ये शिक्षणाचा अभाव होता. त्यांनी अगोदरच मौलाना आझाद यांची शिक्षण मंत्री म्हणून नेमणूक केली होती. बशीर अहमद सारख्या इतर मुस्लीम पुढाऱ्यांनी त्यांना मुस्लीम स्त्रियांच्या शिक्षणाचा हेतू पुढे नेण्यासाठी काहीतरी बोलावयास व करण्यास सांगितले. असे करण्याची इच्छा त्यांनी निर्देशित केली होती.[२२] तथापि ते पंतप्रधान असताना, मुस्लीम स्त्रियांना लाभ झाला नाही. कदाचित त्या निर्णायक विभाजनोत्तर टप्प्यावर त्यांना असे काही करावयाचे नव्हते. ज्यामुळे मुस्लीम जमातीमध्ये ' घबराट ' निर्माण होईल.

त्यांच्या दृष्टीने एखादा, एखाद्या गटाचा किंवा धर्माचा असला तरी शिक्षण हे आवश्यक होते. त्यांच्या दृष्टीने स्त्रियांसाठी शिक्षण स्त्रीसारखे कसे असावे एवढेच केवळ शिकण्यासाठी नव्हते! त्याला दोन पैलू होते, सांस्कृतिक पैलू, जो माणसाला वृद्धींगत करीत होता आणि निर्माणक पैलू, जो माणसाला गोष्टी करावयास लावत होता. त्यांच्या दृष्टीने दोन्ही सारखेच आवश्यक होते. कारण प्रत्येकाने निर्माता आणि चांगला नागरिक असायला हवे होते. अशा रीतीने स्त्रियांच्या शिक्षणासाठी आराखडा आखणे आणि सिद्धता करणे पूर्णतया आवश्यक होते. कारण पुरुषांच्या शिक्षणाची काही मर्यादेपर्यंत तरतूद करण्यात आली होती.

स्त्रियांसाठी शिक्षण, पुरुषांच्या शिक्षणापेक्षा काहीतरी वेगळे असावे आणि त्याने तिला केवळ कौटुंबिक कर्तव्यांसाठी, त्याचप्रमाणे लग्नासाठी प्रशिक्षित करावे; याच्याशी ते सहमत नव्हते. त्यांच्या दृष्टीने स्त्रियांच्या शिक्षणाचा हा मर्यादित दृष्टीकोन होता. मानवी कृतीच्या प्रत्येक शाखेमध्ये

स्त्रियांना सर्वोत्तम शिक्षण देण्याच्या गरजेची आणि सर्व व्यवसायांमध्ये परिणामकारक भाग घेण्यासाठी प्रशिक्षित असण्याची खात्री त्यांना वाटत होती. जर स्त्रीला खरे स्वातंत्र्य हवे असेल तर; विशेषतः विवाहाकडे एक व्यवसाय आणि स्त्रियांसाठी एकमेव आर्थिक आश्रय म्हणून पहाण्याची सवय जायला हवी होती.

अलाहाबादच्या महिला विद्यापीठातील भाषणात नेहरूंनी फ्रेंच ध्येयवादी बोरीअरला उद्‌धृत केले. " एखाद्याला देशाच्या संस्कृतीचे प्रमाण, त्याच्या स्त्रियांच्या सामाजिक आणि राजकीय स्थानावरून मूल्यांकित करता येईल."[२५] भारताचे मूल्यांकन त्याच्या स्त्रियांच्या स्थानावरून करावयाला हवे होते. तेव्हाच्या भारतीय स्त्रियांच्या अवस्थेने त्यांना अत्यंत असमाधान वाटत होते. विद्यमान न्यूनता लपविण्यासाठी आणि प्रामुख्याने भारतीय स्त्रियांच्या अवनतीच्या कारणांवरील हल्ला टाळण्यासाठी त्यांच्या दृष्टीने सीता आणि सावित्री यांची पूजनीय प्रतिमा म्हणजे भूतकाळाचे उठविण्यात आलेले प्रतिध्वनी होते.[२६] पुरुष हा भाकरी कमावणारा होता, म्हणून घरात एकनिष्ठ पत्नी असावी, या स्त्रियांना विशेष शिक्षण देण्याच्या विद्यापीठाच्या कल्पनांवर त्यांनी टीका केली. त्यांच्या दृष्टीने त्याचा अर्थ असा होता की, स्त्रियांना फक्त एकच व्यवसाय होता, तो म्हणजे विवाह आणि ध्येय केवळ या व्यवसायासाठी तिला प्रशिक्षित करणे असावे. तिथे सुद्धा तिच्या नवऱ्याची अनुगामी आणि निष्ठावंत गुलाम असणे हा तिचा व्यवसाय होता.

भारताचे भवितव्य त्यांच्या दृष्टीने अर्धी लोकसंख्या, एक खेळणे किंवा इतरांवर भार असावी यावर बांधणे शक्य नव्हते. सर्व क्षेत्रांमध्ये पडदा पद्धती, बालविवाह आणि स्त्रियांना अधिकारांचा नकार प्रचलित होता. भारतातील स्त्रिया, भारतातील पुरूषांच्या औदार्याने त्यांचे संपूर्ण अधिकार प्राप्त करू शकत नव्हत्या. त्यांना यश प्राप्त होण्यापूर्वी लढावे लागणार होते आणि पुरूष मंडळीवर त्यांची इच्छा लादावयास लागणार होती.

त्यांच्या स्त्रियांवरील विश्वासाचे प्रधान उदाहरण, आणि त्यांच्या निःसमर्थता सुनिश्चितपणे दूर करण्याची बांधिलकी होती. विधीमंत्री डॉ. भी. रा. आंबेडकर यांच्यामार्फत संसदेमध्ये व्यापक हिंदू संहिता विधेयकाची पुनःस्थापना; ज्याने हिंदूंचे व्यक्तिविषयक कायदे संहिताबद्ध करण्याचा आणि सुधारण्याचा प्रयत्न केला. विधीविधानाचा हा खंड संमत करावयाला नेहरू बांधलेले होते. परंतु राजकीय घटक असे की, १९५१ मध्ये नवे राष्ट्राध्यक्ष राजेंद्रप्रसाद यांना समाविष्ट करून, पारंपरिक हिंदूमधील विरोधाची व्याप्ती त्याचप्रमाणे होऊ घातलेल्या निवडणुका, याचा परिणाम निवडणुकांचे निकाल लागेपर्यंत हे विधेयक लांबणीवर टाकण्यात झाला. तथापि **हिंदू संहिता विधेयक** पुढे नेण्याच्या बाबतीत नेहरूंचा अर्धचित्तपणा असल्याचे त्यांना वाटल्यामुळे, आंबेडकर यांनी राजीनामा दिला.[२७] निवडणुकानंतर विधेयकाचे मूळ सर्वसाधारण स्वरूप बदलण्यात आले आणि विभक्त विधेयकांच्या रूपात खंडशः विधिविधान पुरःस्थापित करण्यात आले. त्यामध्ये **विशेष विवाह विधेयकाचा** समावेश होता. इतरांमध्ये घटस्फोट आणि हिंदू उत्तराधिकार विधेयकाला मुभा दिली.

२२ मे १९५२ रोजी लोकसभेमध्ये विशेष विवाह विधेयकावरील विवादामधील आपल्या भाषणामध्ये नेहरूंनी अभीस्वीकृत केले की, विधिविधान संमत करण्यात पुष्कळ उशीर झाला आहे; ज्याला ते बांधलेले होते.[२८] त्यांनी निवेदन केले की, खरी क्रांती ती होती; जी राजकीय, आर्थिक आणि सामाजिक पैलूंचा समावेश करीत होती.

नंतर १६ सप्टेंबर १९५४ रोजी एका भाषणात–जे **विशेष विवाह विधेयकाच्या** घटस्फोट खंडावर त्यांनी केले, नेहरूंनी हिंदू समाज सुधारण्याच्या गरजेवर जोर दिला.[२९] त्यांच्या म्हणण्याप्रमाणे कायदे आणि रूढी यांचे ओझे, विशेषतः वरीष्ठ वर्गाच्या स्त्रियांसाठी, स्त्रियांवर असह्यपणे पडत होते. **विशेष विवाह अधिनियम विधेयक,** असे ते पुनः पुनः दाखवून देत होते, विधी विधानाचा ऐच्छिक सहिष्णु खंड होता जो लोक स्वीकारतील किंवा स्वीकारणार नाहीत. घटस्फोटाकडे तो असा काहीतरी आहे की त्यामुळे विवाहाची रूढी दुबळी होते असे पहावयाचे नव्हते. परंतु जर विवाह, सर्व प्रयत्न करूनही अयशस्वी झाला असेल तर मग परस्पर संमतीने घटस्फोटाच्या खंडाला गृहाने संमती द्यावी अशी त्यांची इच्छा होती. हा त्यांच्या म्हणण्याप्रमाणे अधिक चांगले समायोजन निर्माण करील आणि दोन्ही पक्षाच्या गैरवर्तुणीकाला प्रतिबंध करील.

त्यांच्या दृष्टीने रूढी उदयास आल्या होत्या. कारण पुरुष आणि स्त्रियांना लागू करण्यात आलेल्या नीतीमत्तेच्या भिन्न मानकांच्या स्वीकारामुळे स्त्रिया परिणामतः घटस्फोट घेण्याच्या अधिकारासाठी उभ्या ठाकतील आणि पुरुष त्याबद्दल त्यांना आव्हान देतील. नीतीमत्तेचे दुहेरी मानक चालू राहणे त्यांना उचित वाटत नव्हते.

नंतरच्या एका भाषणात, आपल्या हिंदू कायद्याच्या संकल्पनेवर त्यांनी सांगोपांग विवेचन केले. जो त्यांच्या दृष्टीने ताठर नव्हता, परंतु त्यामध्ये एक गतिशील मूलतत्त्व होते. जे बदलाला प्रभाव्य होते. त्यानी, उत्कट विवाद जो; या विधेयकांनी देशामध्ये निर्माण केला होता, तो अभीस्वीकृत केला. परंतु त्यांना वाटले की, हे आवश्यक होते. कारण तो इतका महत्त्वाचा उपाय होता. दुःसमायोजित मानवी संबंधांचा परिणाम म्हणून स्त्रियांना तोंड द्यावे लागले. त्या अडचणींची त्यांना चांगली जाणीव होती. त्यांनी सौराष्ट्राचे उदाहरण दिले. जिथे स्त्रियांमध्ये दरदिवशी एक आत्महत्या होत होती. गुजरातच्या स्त्रियांमधील आत्महत्येची संख्या अजूनही वाढती चालू राहिली आहे. या आपल्या भाषणामध्ये ते दाखवून देत होते की, हिंदू विवाह हा निःसंशयपणे जरी धार्मिक समारंभ होता, तरी तो लोकांना बांधून ठेवणारा धार्मिक संस्कार नव्हता. जे परस्परांसाठी जीवन नरक करीत होते. जर विवाहामध्ये मिळतेजुळतेपणा नसेल आणि लोकांना जीवन चालू ठेवण्याची सक्ती करण्यात आली; तर ते एकमेकाचा तिरस्कार करावयाला सुरुवात करतील आणि त्यांचं अस्तित्व ते कडूजहर करतील. त्यांनी असे सुद्धा दाखवून दिले की, विधीविधानाने ती रूढी वगळली होती, जिच्यामध्ये हस्तक्षेप करण्यात आला नव्हता.[३०]

त्यांनी असे म्हणून समारोप केला की, त्यांच्या पूर्ण दर्जाला वाढ होण्यासाठी भारतीय स्त्रियांना स्वातंत्र्य असायला हवे अशी त्यांची इच्छा होती. खरोखर जरी विधीविधानाने इतका कितीतरी विवाद आणि वाद निर्माण केला, आणि जरी स्त्रियांचा दर्जा उंचावण्याबाबत त्याचा मूर्त परिणाम हा सुद्धा विवाद्य असला, तरी स्त्रियांबाबत नेहरूंची वृत्ती आणि या अहित झालेल्या समूहाच्या दर्जाचे उन्नयन करण्याचे आणि सुधारण्याचे त्यांचे प्रयत्न स्पष्टपणे प्रकट होतात.

हिंदू स्त्रियांशी संबंधित कायद्यांचे आधुनिकीकरण करण्यात जे अंशदान त्यांनी केले; त्याबद्दल बरेच काही बोलले जात आहे. एकपत्नीत्व आणि घटस्फोट देण्याचा अधिकार, जे हिंदू स्त्रियांना नाकारण्यात आले होते; ते त्यांना देण्यात आले. अन्य क्षेत्रात त्यांनी सुद्धा समान अधिकार मिळविले. परंतु या कायद्यांकडे स्पष्ट लक्ष देणे प्रकट करते की, नेहरू या विषमतापैकी कितीतरी विषमता, ज्या आज सुद्धा स्त्रियांना सतावतात, चालू ठेवण्यामध्ये भागीदार झाले होते.

१९२९ सालापूर्वीच त्यांनी ओळखले होते की, पुराणमतवादी घटक हिंदू कायद्याच्या सुधारणेविरुद्ध होते. तर मग स्वातंत्र्यानंतर सुद्धा या पुराणमतवादी घटकांना ते हार का गेले ? एक सरंजामी स्मारकावशेष म्हणून हिंदू संयुक्त कुटुंब, ज्याला त्यांनी दूषण दिले होते; आजही अस्तित्वात आहे आणि **हिंदू उत्तराधिकार अधिनियम** (कलम ६) मध्ये मुलगे आणि मुली यांच्यामधील वारसाप्राप्त संपत्तीतील विषमता चालू ठेवते.

समजावयाला अधिक कठीण आहेत तरतुदी, बाप किंवा आईच्या संबंधात केलेल्या. मुलींना फक्त निवासाचा अधिकार आहे. भाऊ आपल्या हिश्शाची वाटणी करावयाला संमती देईपर्यंत वाटणीची मागणी करावयाला अधिकार नसलेला. सर्व मुलींनासुद्धा निवासाचा अधिकार नाही. असे हक्कदार असावयाला मुलीने अविवाहित किंवा परित्यक्त किंवा विभक्ता किंवा घटस्फोटिता असायला हवे. अशा रीतीने विवाहित मुलगी, जी क्रौर्याला आणि गांजणुकीअधीन आहे. कुटुंब घरात निवासाची मागणीसुद्धा करू शकत नाही. (कलम २३) नेहरूंनी या मर्यादेपर्यंत कधीतरी तडजोड कशी काय केली असावी; हे त्यांचे पूर्वीचे पवित्रे लक्षात घेता अनाकलनीय वाटते. [१४] **हिंदू अज्ञानवयता आणि पालकत्व अधिनियमात** आईला पसंती देण्याऐवजी बापाला स्वाभाविक पालक करण्याचीसुद्धा तरतूद आहे. कदाचित स्वातंत्र्यानंतर देशाला भेडसावणाऱ्या समस्यांशी त्यांची अन्यमनस्कता लक्षात घेता यासाठी थोडेसे स्पष्टीकरण तिथे आहे.

भारतीय स्त्रियांच्या विभिन्न प्रश्नांवरील हे नेहरूंचे विश्लेषण, त्यांच्याबद्दलच्या त्यांच्या ज्ञानोन्नत विचारांची आपणाला जाणीव करून देते. मतदानाचे अधिकार, दर्जाची समानता आणि संधी प्रदान करण्याच्या रूपात आणि त्यांचा विकास आणि सुधारणा यासाठी मार्गांची तरतूद करताना, राजकीय पद्धती तपशीलवार तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये ह्या विचारांपैकी काही विचार कार्यान्वित करण्यात आले. तथापी या संबंधात ' स्त्रियांना शक्ती प्रदान ' करण्यासाठी आणि राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेत त्यांचा अधिक चांगला उपयोग करून घेण्यासाठी कितीतरी अधिक करता आले असते.

□□□

अनुवाद : **प्र. श्री. नेरूरकर**

संदर्भ :—

(१) जवाहरलाल नेहरूंची भाषणे—खंड ३, मार्च १९५३ ते ऑगस्ट १९५७, नवी दिल्ली, भारत शासन प्रकाशन विभाग १९५८, पृ. ४५१.

(२) जवाहरलाल नेहरू, भारताचा शोध, जवाहरलाल नेहरू स्मारक निधी, नवी दिल्ली, १९८१, पृ. १८.

(३) जवाहरलाल नेहरू, **भारताच्या स्त्रियाना** प्रस्तावना, तारा अली बेग (संक्षिप्त), दिल्ली, माहिती आणि नभोवाणी, मंत्रालय, १९५८.

(४) कित्ता.

(५) सर्वपल्ली गोपाल, **जवाहरलाल नेहरूंचे निवडक लेखन**, खंड ६, नेहरू स्मारक निधी, ऑक्सफोर्ड विद्यापीठ मुद्रणालय, दीक्षान्त समारंभ भाषण, प्रयाग महिला विद्यापीठात, पृ. २१८.

(६) सर्वपल्ली गोपाल (संपादीत), **जवाहरलाल नेहरूंचे निवडक लेखन**, खंड ३, पृ. ३९९.

(७) कित्ता, खंड २, पृ. १४.

(८) ब्राइट जे. एस., **स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतर**, नवी दिल्ली, भारतीय मुद्रणकार्यालय, १९५०, पृ. ३०८–१२.

(९) जवाहरलाल नेहरू—भाषण, **भारतात क्रान्ती**, पूर्व आणि पश्चिम मंडळ, परदेशी धोरण मंडळ, भारतीय संघ, अमेरिकेचा आणि शांततावादी संबंध संस्था, न्यूयॉर्क, ऑक्टोबर १९, १९४९ मध्ये. नॉर्मन, डोरोथी (संपादित) **नेहरू, पहिली साठ वर्षे**, खंड दोन, १९६५ मध्ये, मुंबई-आशिया प्रकाशन गृह, १९६५, पृ. ४९९-५०९.

(१०) ब्रेचर मायकेल, **नेहरू, राजकीय चरित्र**, लंडन, ऑक्सफर्ड विद्यापीठ मुद्रणालय, १९५९, पृ. १३०.

(११) जवाहरलाल नेहरू, **स्वातंत्र्याकडे**, न्यूयॉर्क, जॉन डे कंपनी, १९४१, पृ. १७०.

(१२) बेचर, Op. Cit. P-162.

(१३) सर्वपल्ली गोपाल **जवाहरलाल नेहरू—एक चरित्र**, खंड १, दिल्ली, ऑक्सफर्ड विद्यापीठ मुद्रणालय, १९७५, पृ. १७२-१७३.

(१४) नेहरू, **स्वातंत्र्याकडे**, Op. Cit. पृ. २२७-२७.

(१५) जवाहरलाल नेहरू, प्रस्तावना, **स्त्रियांना आव्हान**, राजकुमारी अमृत.

(१६) मौलाना आझाद यांना पत्र, मार्च ५, १९४२, अग्रवाल एस. पी. आणि अग्रवाल जे. सी. मध्ये **नेहरू सामाजिक प्रश्नांवर**, नवी दिल्ली, कन्सेप्ट पब्लिशिंग कंपनी, १९८९, पृ. १३७-१३८.

(१७) सर्वपल्ली गोपाल, Cp. Cit, खंड ७, पृ. ५५७.

(१८) कित्ता, पृ. ५५८

(१९) कित्ता, पृ. ३१३.

(२०) पत्र राणी लक्ष्मीबाई राजवाडे यांना **अग्रवाल,** Op. Cit, पृ. १३८.

(२१) जवाहरलाल नेहरू, **मातेला प्रशिक्षित करणे,** तेनांपेट येथे स्त्रियांच्या महाविद्यालयाचा पाया लेखशिला घालताना केलेले भाषण, मद्रास, जानेवारी २२, १९५५, **जवाहरलाल नेहरूंची भाषणे** मधून, १९५३-१९५७, खंड तीन, भारत शासन प्रकाशने, नवी दिल्ली, १९५८, पृ. ३९९.

(२२) नवी दिल्ली येथील **मुले आणि मुली यांच्या शिक्षणातील अंतर** या विषयावरील परिसंवाद भाषण, जानेवारी २२, १९५५.

(२३) मातेला प्रशिक्षित करणे, Op. Cit, पृ. ४०१.

(२४) कित्ता, पृ. ४००-४०२.

(२५) प्रयाग महिला विद्यापीठ, अलाहाबादला संदेश, जुलै १२, १९३४.

(२६) महिला विद्यापीठ, अलाहाबाद येथे भाषण, मार्च ३१, १९२८, **जवाहरलाल नेहरू यांची निवडक भाषणे,** खंड ३, १९७२ मधून, ओरिएन्ट लॉंगमन, दिल्ली, पृ. ३६१.

(२७) सर्वपल्ली गोपाल, नेहरू, पृ. ७७ आणि १५९.

(२८) **नेहरूंची भाषणे,** १९५३-५७, Op. Cit, पृ. ४४०-४४२.

(२९) कित्ता, ४४३-४४५.

(३०). कित्ता, ४४६-४५३.

(३१) सरकार लोतिका, '**स्त्रियांना शक्ती प्रदान करणे,**' परिसंवाद, क्रमांक ३६३, नोव्हेंबर, १९८९. पृ. ३८-३९

□□□

# पंडित जवाहरलाल नेहरू आणि हैदराबाद मुक्ति संग्राम

## पंडित नेहरू : देवदुर्लभ व्यक्तिमत्त्व

□ वि. पां. देऊळगांवकर

'पंडित जवाहरलाल नेहरू' आणि 'हैदराबाद मुक्ति संग्राम' हे दोन्ही विषय आज इतिहासजमा झाले आहेत. पण काही व्यक्ती आणि घटना इतिहासालाच कलाटणी देणाऱ्या ठरतात ; म्हणून वर्तमानाच्या संदर्भातही त्या व्यक्तींना व घटनांना एक आगळेच महत्त्व प्राप्त होत असते. त्या दृष्टीने त्या व्यक्तींच्या कार्याच्या मूल्यमापनाचा व त्या घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न हा स्वागतार्हच असतो. ते सिंहावलोकन नव्या पिढीला प्रेरणादायी ठरते.

पं. नेहरू ही अशीच एक व्यक्ती. भारताच्याच आधुनिक इतिहासात नव्हे, तर ते एका अर्थाने आधुनिक जगाच्याच इतिहासात त्यांचे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. पं. नेहरू म्हणताच आपल्या डोळ्यासमोर एक देवदुर्लभ व्यक्तिमत्त्व उभे राहाते अन् न कळत 'तेथे कर माझे जुळती' हा अनुभव आपणास येतो. श्री. गोपीनाथ तळवलकरांनी पं. नेहरूसंबंधी उद्धृत केलेल्या पुढील ओळी मोठ्या अर्थपूर्ण वाटतात—

'हा बहर आपल्या मानव तरुला
जो युगा युगांनी कधी दिसे मोहरला'

महात्मा बुद्ध चरित्रावरील सर एडविल्ड आर्नोल्ड यांच्या The LIGHT of ASIA या काव्यातून घेतलेल्या ओळींचा वरील अनुवाद पं. नेहरूंच्या बाबतीत अगदी अन्वर्थक वाटतो. मानव समाजाला नवी जीवनदृष्टी देऊन प्रगती पथावर नेणारी व्यक्ती कधी तरी जन्माला येते. 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' असा जगाला केवळ शाब्दिक संदेश देण्यातच कृतार्थता न मानता, अशी व्यक्ती मंगलमय नव्या जगाची उभारणी करण्यासाठी आपल्या जीवाचे रान करते. पंडित नेहरू अशा व्यक्तींपैकी एक.

स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या त्रिसूत्रीवर जगाची पुनर्रचना करायला निघालेल्या आधुनिक काळातील थोर विचारवंतांमध्ये पं. नेहरूंच्या क्रम फार वरचा लागतो. इंग्लंडमध्ये शिकत असल्यापासूनच पं. नेहरूंना भारताच्या स्वातंत्र्याचा ध्यास लागला होता. गर्भश्रीमंत घराण्यात जन्मलेल्या या व्यक्तीने आपल्या वैयक्तिक सुखाकडे ऐन तारुण्यातच पाठ फिरवून आपल्या मातृभूमीच्या विमोचनासाठी, अपार त्याग केला, विपरीत कष्ट झाले, अनेक वर्षे कारावास भोगला.

ब्रिटिशांच्या मगरमिठीतून भारताला मुक्त केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नव्हे, तर त्या आधीपासून स्वतंत्र भारताच्या सर्वांगीण विकासाचे आराखडे आखून, भारताला प्रगतीपथावर नेऊन थोड्याच अवधीत साऱ्या राष्ट्रकुलात एक मानाचे स्थान प्राप्त करून दिले.

भारताच्या स्वातंत्र्य युद्धाला तसा आरंभ झाला १८५७ मध्येच. ब्रिटिश सत्तेविरुद्ध केलेला एक उत्स्फूर्त उठाव होता तो! त्यात आलेल्या अपयशाने खचून न जाता सनदशीर मार्गाने स्वातंत्र्यासाठी पद्धतशीर प्रयत्न करणारी एक संघटना अखिल भारतीय काँग्रेस (राष्ट्रीय सभा) च्या रूपात १८८५ मध्ये अस्तित्वात आली. १९१२ मध्ये पंडित नेहरू इंग्लंडमधील आपले शिक्षण संपवून परत आले त्यावेळी काँग्रेस चांगली स्थिर झाली होती. दादभाई नौरोजी, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष यासारख्या देशभक्तांनी काँग्रेस संघटनेला क्रियाशील बनविले होते. ती संघटना आता केवळ अर्ज अन् विनंती करणारी संस्था न राहता तिला लढाऊ स्वरूप प्राप्त होत चालले होते. दरवर्षी त्या संघटनेची नियमितपणे अधिवेशने भरत असत. हिंदुस्थानच्या प्रशासनात भारतीयांना योग्य ते स्थान मिळविण्यासाठी, महत्त्वाचे ठराव त्या अधिवेशनात पास केले जात व त्या ठरावानुसार आपले हक्क पदरात पाडून घेण्यासाठी कार्यवाही करण्यासाठी आरंभ झाला होता. पण त्यामुळे केवळ सनदशीर मार्गावर अवलंबून राहाणारे मवाळ व प्रत्यक्ष लढाऊ कृतीवर भर देणारे जहाल, असे तट काँग्रेसमध्ये पडणे साहजिक होते. पंडित नेहरू हिंदुस्थानात परत आल्यानंतर या सर्व घडामोडींचा मागोवा घेत होते. प्रत्यक्ष काँग्रेसच्या कार्यात सक्रीय भाग घेण्यापूर्वी युवक संघटना, किसान सभा, मजूर संघटना कार्यक्षम करण्यात त्यांना बरेच यश प्राप्त झाले होते ही सारी शक्ती पं. नेहरूंनी काँग्रेसच्या मागे उभी केली.

**काँग्रेस प्रवेश**

ते काँग्रेसच्या अधिवेशनाला जाऊ लागले. आपले विचार तेथे मांडू लागले. लो. टिळक व ॲनी बेझंट यांनी सुरू केलेल्या ' होमरूल लीग ' (लोकराज्य संघ) चळवळीत हिरीरीने ते भाग घेऊ लागले. १९१६ मध्ये लखनौ येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात पं. नेहरूंचा, प्रथम महात्मा गांधींशी परिचय झाला. दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रहाचे तंत्र यशस्वी रीतीने वापरून तेथील भारतीयांत आत्मविश्वास निर्माण करून, महात्मा गांधी नुकतेच हिंदुस्थानात येऊन त्यांनी आपल्या कार्याला आरंभ केला होता. पहिल्याच भेटीत महात्मा गांधींचा पं. नेहरूंवर जो प्रभाव पडला तो शेवटपर्यंत टिकला. तसेच महात्मा गांधीजींनाही पंडित नेहरूंच्या अंगी असलेल्या धडाडीचा, जाज्वल्य देशाभिमानाचा, दूरदृष्टीचा प्रत्यय येण्यास फारसा वेळ लागला नाही. तेव्हापासूनच महात्मा गांधींनी पं. नेहरूंना आपला वारस मानले.

**महात्मा गांधी व नेहरू**

लोकमान्यांच्या मृत्यूनंतर काँग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधींकडे आले. आफ्रिकेत अहिंसात्मक मार्गाने चालविलेल्या लढ्याचा अवलंब त्यांनी येथेही केला. १९२१ पासून सुरू केलेल्या असहकाराच्या चळवळीपासून ते १९४२ च्या ' भारत छोडो ' या शेवटच्या लढ्यापर्यंत महात्माजींनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध अनेक लढे दिले. त्या सर्व लढ्यांत पं. नेहरूंचा सिंहाचा वाटा होता. किंबहुना, काँग्रेस म्हणजे महात्मा गांधी व नेहरू यांची युती असेच समीकरण त्या काळात प्रस्थापित झाले होते. तसे पाहिले तर महात्मा गांधी व पं. नेहरू यांच्या प्रवृत्तीत साम्यापेक्षा विरोधच अधिक जाणवत होता. दोघांच्या ही जीवनाची जडणघडण अगदी भिन्न मार्गांनी झालेली. पण स्वातंत्र्याच्या उद्दिष्टासाठी दोघे हे एक दिलाने लढले; अशीच इतिहास साक्ष देईल.

पं. नेहरूंच्या अंगी असलेल्या नेतृत्वाच्या गुणामुळे अगदी तारुण्यातच काँग्रेसच्या अध्यक्षपदाची माळ त्यांच्या गळ्यात पडली. १९२९ च्या डिसेंबरमध्ये लाहोर येथे भरलेल्या अधिवेशनात पं. नेहरूंनी काँग्रेसच्या ध्येयात महत्त्वपूर्ण बदल केला. आतापर्यंत वसाहती स्वराज्यापर्यंत मागणी केली जात होती. पण याच अधिवेशनात संपूर्ण स्वराज्याची घोषणा करण्यात आली. २६ जानेवारी १९३० हा दिवस ' स्वातंत्र्य दिन ' म्हणून पाळण्यात येऊ लागला. या अधिवेशनातील पंडित नेहरूंचे भाषण अनेक दृष्टींनी महत्त्वाचे होते. जागतिक घडामोडीचा आढावा घेत पंडित नेहरू म्हणाले,

' India today is part of world movement—If we ignore the world, we do at our peric. (जागतिक चळवळीचा भारत एक भाग आहे. आपण जगाकडे दुर्लक्ष करू तर आपल्यावर संकट ओढून घेऊ).

महात्मा गांधी काय किंवा पंडित नेहरू काय; हे मूलभूत मानवी हक्कांसाठीच लढत होते. सर्व परतंत्र राष्ट्रांनी परकीयांच्या मगरमिठीतून आपली सुटका करून घेतली पाहिजे व जगातील साम्राज्यवादाला व हुकुमशाहीला मूठमाती दिली पाहिजे अशा व्यापक भूमिकेवरून ते भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याचे नेतृत्त्व करीत होते.

लाहोरच्या भाषणात पं. नेहरूंनी; ब्रिटिशांनी आपल्या स्थैर्यासाठी भारतात टिकवलेल्या लहानमोठ्या जवळ जवळ सहाशे देशी संस्थानिकांच्या भवितव्याबद्दलही आपले विचार स्पष्ट केले होते. हे संस्थानिक तसेच ठेवून भारताच्या स्वातंत्र्याला काहीच अर्थ उरणार नव्हता. म्हणून त्यांनी आपल्या भाषणात संस्थानिकांना इशारा दिला की, त्यांनी काळाची पावले ओळखावीत. संस्थानाचे भविष्य ठरविण्याचा अधिकार प्रामुख्याने तेथील प्रजेचा आहे. जी काँग्रेस हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करते; ती काँग्रेस संस्थानातील प्रजेलाही स्वयं निर्णयाच्या हक्कापासून वंचित ठेवू इच्छित नाही, असे पंडित नेहरूंनी स्पष्ट केले. रावी नदीच्या काठी ३१ डिसेंबर १९२९ च्या मध्यरात्री नव्या वर्षाचे स्वागत पं. नेहरूंनी तिरंगा ध्वज फडकावून केले व प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात घोषणा केली.

'' यानंतर ब्रिटिश सत्तेविरुद्ध झुकणे हा माणसाविरुद्ध आणि परमेश्वराच्या विरुद्ध गुन्हा आहे '' (It was a man and God to salemet any longer to British rule) ''

हे अधिवेशन अनेक दृष्टींनी महत्त्वाचे ठरले. भारतीय जनतेत नवचैतन्य निर्माण झाले. महात्मा गांधींच्या प्रसिद्ध मिठाच्या सत्याग्रहास महिना झाला. काँग्रेसच्या आंदोलनाबरोबर निरनिराळ्या आघाड्यावर चळवळी सुरू झाल्या. मजुरांचे संप सुरू झाले. याच काळात भगतसिंगासारख्या निधड्या छातीच्या तरुणांनी दहशतवादी चळवळी चालविल्या. त्यांना फासावर लटकविण्यात आले. काहींना जन्मठेपीची शिक्षा झाली. एकूण, स्वातंत्र्यासाठी बलिदान करण्यास, देशातील तरुण पिढी उद्युक्त झाल्याचे दृश्य आपणास दिसते. त्या सर्वांची परिणती १९४२ च्या ' भारत छोडो ' या ऐतिहासिक चळवळीत होऊन १९४७ साली आपला देश स्वतंत्र झाला. पं. नेहरू पहिले पंतप्रधान झाले.

### ब्रिटिशांची कुटील नीती

पण हे स्वातंत्र्य अपूर्ण होते. एकतर ब्रिटिशांच्या ' फूट पाडून राज्य करण्याच्या ' कुटील नीतीने भारताची दोन शकले झाली होती. ही दोन शकले करूनच ब्रिटिशसत्ता थांबली नव्हती. तर देशाचे आणखी लहानमोठे अनेक तुकडे करण्याचा डाव त्यांनी टाकला होता. त्यांनी मोठ्या

साळसूदपणे येथे त्यांनी निर्माण केलेल्या संस्थानिकाना सांगून टाकले की, ' आता आम्ही तर हिंदुस्थानच्या लोकांच्या हातात राज्यकारभार सोपवून परत जात आहोत, तुम्ही भारतीय संघराज्यात विलीन होऊ शकता किंवा पाकिस्तानसुद्धा ! एवढेच नव्हे तर त्यांनी आणखी एक पर्याय सुचविला होता, तो म्हणजे ' तुम्ही स्वतंत्रही राहू शकता ' हा शेवटचा पर्याय भारताच्या एकात्मतेच्या दृष्टीने अतिशय धोकादायक होता. बऱ्याच संस्थानिकांनी आपण स्वतंत्रपणेच आपले राज्य सांभाळू अशी भूमिका घेतली. आपण सार्वभौम होऊन भारतीय संघ राज्याशी समानतेच्या तत्त्वावर संबंध प्रस्थापित करू; अशी घोषणा करणाऱ्यांमध्ये हैदराबाद संस्थानचा निजाम अग्रेसर होता.

या पार्श्वभूमीवर हैदराबाद संस्थानातील प्रजेने चालविलेल्या प्रखर आंदोलनाकडे जेव्हा आपण वळतो, तेव्हा आपणास असे आढळून येते की, भारतीय काँग्रेसने ब्रिटिश सत्तेविरुद्ध सातत्याने जे लढे दिले; त्या लढ्यांइतकेच हैदराबाद स्टेट काँग्रेसने अत्यंत प्रतिकूल वातावरणात धैर्याने जो संघर्ष केला; त्या संघर्षाचे ऐतिहासिक महत्त्व आहे.

**हैदराबादची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

हैदराबाद मुक्ती संग्रामाचे स्वरूप जाणून घ्यायचे झाले तर त्या संस्थानाच्या निर्मितीपासूनचा इतिहास व त्याचा भूगोल जाणून घेणे अत्यावश्यक आहे भारताच्या प्राचीन इतिहासावरून आपल्या आढळून येते की, सांस्कृतिक दृष्ट्या आसेतुहिमाचल हा देश जरी एक होता; तरी राजकीय दृष्टीने तो एका राजवटीखाली कधीच नव्हता. येथे लहान मोठे राजे निरनिराळ्या भूभागावर राज्य करीत होते. त्यांच्यात आपसात आपल्या राज्याचा विस्तार करण्याच्या उद्देशाने तंटे होत, लढाया होत. या परस्परातील वैमनस्यामुळे परकीयांनी या देशावर अनेकदा स्वाऱ्या केल्या. काहींनी हा देश पादाक्रांत केला. मोगलांनी बरीच वर्षे येथे राज्य केले. त्यानंतर न्यायालयाच्या निमित्ताने येथे आलेल्या डच, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज लोकांनी आपल्या वसाहती कायम केल्या. त्यापैकी, शेवट इंग्रजांनी सर्व देश काबीज करून आपली सत्ता प्रस्थापित केली. तो भारताच्या इतिहासातील काळा दिवसच म्हटला पाहिजे. येथे ब्रिटिशांचे राज्य सुरू झाले; त्यावेळी देशभर असलेल्या लहान मोठ्या राजांना आपल्या कृपाछत्राखाली आणून आपापल्या भूभागावर राज्यकारभार करण्याचे अधिकार देऊन ठेवले. काही राज्ये या ना त्या कारणाने खालसा करून, तेथील राजांना वार्षिक वेतन देऊन ठेवून दिले.

ब्रिटिशांनी आपल्या हिताच्या रक्षणार्थ अशा लहानमोठ्या जवळ जवळ सहाशे राजांना आपल्या अंकित करून ठेवले. हे राजे संस्थानिक म्हणून ओळखले जातात. अशा संस्थानिकांत हैदराबाद संस्थान सर्वात मोठे होते. या संस्थानची निर्मिती झाली ती दिल्ली येथील मोगल सम्राटाशी दगलबाजी करून! मोगल सम्राटानी एका सरदाराला दक्षिणेकडील सुभेदार म्हणून नेमला. पुढे त्यानेच हैदराबाद येथे आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. तेच हे हैदराबाद संस्थान! या संस्थानचा मूळ पुरुष कमरूदीन, त्याची कारकीर्द इ.स. १७२४ पासून सुरू होते. या कमरूदीनला मोगल सम्राटाने ' निजामुल मुल्क ' असा किताब दिला होता. निजाम म्हणजे व्यवस्था, बंदोबस्त. देशाचा कारभार पाहाणारा तो निजामुल मुल्क. कमरूद्दिनचे घराणे आसफिया घराणे. १७२३ पासून १९११ पर्यंत हैदराबाद संस्थानवर ६ आसफिया निजामाने राज्य केले. सहाव्या निजामाचे नाव महबूब अली असे होते. तो वारल्यानंतर मीर उस्मानली हा सातवा निजाम म्हणून गादीवर आला.

**निजामची राजवट**

हे निजाम राजे एकापेक्षा एक धर्मांध व इस्लाम पक्षपाती होते. पहिल्या सहाही राजांपेक्षा सातवा निजाम, मीर उस्मानअली खान हा नुसता धर्मांधच नव्हता; तर अत्यंत धूर्त व कावेबाज होता.

तो गादीवर आल्यापासून हैदराबाद संस्थानाचे झपाट्याने मुस्लिमीकरण करण्याचा ध्यास त्याला लागला होता. हैदराबाद संस्थानची लोकसंख्या १९४१ च्या शिरगणतीप्रमाणे १ कोटी ६३ लक्ष ३८ हजार ५३४ होती. त्यात हिंदूंची संख्या १ कोटी ३३ लक्ष ०९६४९, तर मुसलमानांची २०,९७,४७५, खिस्ती २,२०,४६४ व इतर ७,१०,९४६. या संस्थानचे क्षेत्रफळ ८२,३१३ चौरस मैल होते. भाषिक दृष्टीने त्या संस्थानाचे तीन विभाग होते. तेलगु भाषकांचा तेलंगण विभाग. मराठी भाषकांचा कर्नाटक. या संस्थानची भौगोलिक परिस्थितीही ध्यानात घेणे अवश्य आहे. हिंदुस्थानच्या दक्षिणेत मध्यभागी असलेल्या या संस्थानाच्या खाती त्यावेळचा मद्रास प्रांत, पश्चिमेकडे मुंबई इलाखा, वरच्या बाजूला वऱ्हाड व मध्यप्रांत. एकूण चोहोबाजूंनी ब्रिटिश सत्तेखाली असलेले प्रांत. हिंदुस्थानच्या एकात्मतेच्या दृष्टीने या निजाम संस्थानचे भौगोलिक स्थान अत्यंत महत्त्वाचे-मोक्याचे होते.

हा इतिहास व भूगोल समजूत घेतल्यानंतर आपण जेव्हा तेथील राज्य व्यवस्थेकडे वळतो; त्यावेळी आपल्याला असे आढळते की, तेथे मध्ययुगीन सामंतशाहीच होती. सर्व सत्ता निजामाच्या हातीच केंद्रीत झाली होती. निजामाच्या आश्रयाखाली उपसंस्थानिक होते, त्यांना पायेग म्हणत, जहागिरी होत्या, निजामाचा स्वतःच्या मालकीचा काही भूभाग होता. त्याला सरफखास असे म्हणत. सारा हिंदुस्थानच ब्रिटिशांचा गुलाम, त्यात हे संस्थानिक, उपसंस्थानिक. हे सारे पाहिले म्हणजे या उतरंडीला तिजोरीची उपमा दिली, की संस्थानातील काळोखाची सहज कल्पना येऊ शकते. ही संस्थाने म्हणजे तिजोरीतील एकातएक असलेले कप्पे. तिथे लोकांना मुक्तपणे श्वासोच्छवास घेणेही कठीण झाले होते.

**संस्थानातील परिस्थिती**

संस्थानातील बहुसंख्य प्रजा हिंदू पण सर्व क्षेत्रात वर्चस्व मुसलमानांचे. सर्व प्रमुख खात्यांचे अधिकारी मुसलमानच नेमण्याचे धोरण कटाक्षाने पाळले जाई. संस्थानातील हिंदूंचे प्रमाण कमी करून मुसलमानांचे प्रमाण वाढविण्याचे अनेक भलेबुरे मार्ग मीर उस्मान अलीने अवलंबिले होते. बाहेरच्या मुसलमानांना आणून येथे बसवायचे ; त्यांना उद्योगधंदे उपलब्ध करून द्यायचे. एवढेच नव्हे तर पठाण, रोहिले, अरब यांना निरनिराळ्या जागांवर नेमायचे. सरकारी ' उपरमजहबी ' सारखे धार्मिक असे एक स्वतंत्र खाते उघडून त्याच्याकडून परधर्मातील लोकांना बाटवून इस्लामी धर्माची दीक्षा देऊन त्यांना आश्रय द्यायचा उद्योग, मीर उस्मान अलीने अगदी पद्धतशीरपणे चालविला होता. असे धोरण अवलंबित असताना तो नेहमी अशी घोषणा करायचा की " माझा एक डोळा हिंदूच्यासाठी व एक डोळा मुसलमानासाठी." पण प्रत्यक्षात त्याचे प्रत्येक पाऊल हे हैदराबादला एक इस्लामी राष्ट्र करण्याचे होते. त्याच्या सरकार दरबारची भाषा उर्दू होती. शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. आपल्या राज्यात स्वतंत्र उस्मानिया विद्यापीठाची स्थापना करून सर्व स्तरावरील अभ्यासक्रम उर्दू माध्यमातूनच करण्याचा प्रयोग त्याने करून दाखविला. वैद्यकीय, अभियांत्रिकी कायदा–सर्व विभागात उर्दू माध्यम करून टाकले.

हैदराबाद संस्थानाचे स्वतंत्र नाणे होते, टांकसाळ होती, स्वतंत्र टपाल खाते होते. हैदराबादची स्वतःची रेल्वे होती. हे सगळे पाहून संस्थानाबाहेरच्या लोकांना निजामाचे कौतुक वाटायचे. पण संस्थानात राहाणाऱ्या लोकांच्या गुलामगारीच्या जीवनाची त्यांना सहसा कल्पना येत नसे. येथे लोकांना कोणत्याच प्रकारचे नागरी हक्क नव्हते, ना सभास्वातंत्र्य, ना भाषण स्वातंत्र्य, ना संघटना स्वातंत्र्य! खाजगी शाळा काढण्यावर बंदी, धार्मिक उत्सवावर बंदी. एकूण लोकांचा कोंडमारा

होत होता. पण ही कोंडी फोडून जनहिताच्या दृष्टीने काही सामाजिक, शैक्षणिक कार्य करणाऱ्या व्यक्ती पुढे आलेल्या आपण पाहातो. त्यांच्या प्रयत्नातून गुलबर्गा येथे १९०७ मध्ये स्थापन झालेली नूतन विद्यालय संस्था व पुढे हैदराबाद येथे निघालेली विवेकवर्धिनी शिक्षण संस्था. अशा संस्थांचे कार्य स्पृहणीयच म्हटले पाहिजे. यांतून पुढे ग्रंथालय चळवळीला आरंभ झाला. गणेशोत्सवासारखे उत्सवही सुरू झाले. संस्थाना; बाहेरील ब्रिटिश हिंदुस्थानात चाललेल्या विविध चळवळींचे पडसाद हैदराबाद संस्थानात उमटणे साहजिक होते. पण येथील निजामी राजवटीत नागरी हक्क प्राप्त करून घेण्यासाठी सरकारचे दरवाजे ठोठावण्यातच लोकांची शक्ती खर्च होऊ लागली. त्यामानाने ब्रिटिश हिंदुस्थानात ' केसरी ' सारखे जहाल वर्तमानही निघू शकत होते. निरनिराळ्या प्रकारच्या सभासंमेलनातून आपले विचार निर्भयपणे मांडण्यास वाव होता. हैदराबाद संस्थानात लोकांची चोहोकडून मुस्कटदाबी चालली होती. अशा स्थितीतही कुठे गणेशोत्सवाच्या निमित्ताने, कधी वाचनालयाच्या अथवा ग्रंथालयाच्या कार्यक्रमाच्या स्वरूपात लोक एकत्र येऊ लागले, विचारविनिमय करू लागले. लोक जागृतीचा अत्यल्प प्रयत्न होऊ लागला. पण तोही निजाम सरकारला सहन होण्यासारखा नव्हता. त्यांनी १९२१ मध्ये एक सरकारी पत्रक ५२ (गशती निशान ५२) काढून या सगळ्या प्रयत्नामध्ये अडथळे आणले. या परिपत्रकाविरुद्ध रीतसर तक्रार केली गेली. तेव्हा १९२९ मध्ये परिपत्रक ५३ नागरी हक्काची पायमल्ली (गशती निशात ५३) काढून तर कहरच केला.

## नागरी हक्काची पायमल्ली

वरचेवर, अधिक बंधने लोकांच्या उपक्रमशीलतेवर येत चालली, धार्मिक उत्सवाच्या बाबतीत मोहरममध्ये दसरा किंवा तसे सण किंवा उत्सव येत असतील, तर हिंदूनी आपले सण व उत्सव स्थगित करावेत. अशा सारखे संतापजनक निर्बंध लादण्यात येऊ लागले. आर्यसमाज मंदिरात होत असलेल्या होमहवनादी कार्यक्रमावरही बंधने आली. त्या काळात हिंदू व मुसलमान एक होऊन त्यानी सरकारची पूर्वपरवानगी घेतली व या काळ्या परिपत्रकाविरुद्ध एक जाहीरसभा घेण्यात आली. त्यासभेचे अध्यक्षस्थान बॅ. खलीकुलजमा होते. त्यांनी हे निर्बंध रद्द करण्याची मागणी केली. पण त्या मागणीचा उपयोग झाला नाही.

माणूस हा शेवटी विचारवंत प्राणी आहे. निरनिराळ्या विषयावर आपापसात विचार विनिमय करण्याची संधी मिळाली नाही म्हणजे लोक अस्वस्थ होतात. कुठेतरी आपले दुःख बोलून दाखवावे व त्या दुःखावर परिहार शोधून काढावा, असं लोकांना वाटणे साहजिक आहे. राजकीय प्रश्नावर तर उघड उघड बोलताच येत नव्हते. यातून लोकांनी दुसरा एक मार्ग काढला. सामाजिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने काही काम करण्याच्या उद्देशाने न्यायमूर्ती बाल मुकुंद यांच्या पुढाकाराने ' मानवतावादी संघ (ह्युमॅनिटेरियन लीग ') कायम करण्यात आला. तेलंगणातील भाग्यरेड्डी नावाच्या एका हरिजन पुढाऱ्याने या संघाद्वारे दलितोद्धाराचे काम चालविले. १९१५ मध्ये यातूनच सामाजिक सुधारणा परिषदेचे कार्य सुरू झाले. न्यायमूर्ती श्री. केशवराव कोटरकर, श्री. वामनराव नाईक यांच्या प्रेरणेतून सामाजिक परिषद निर्माण झाली. या परिषदेची १९१८ पासून १९२३ पर्यंत चारपाच अधिवेशने झाली.

## हैदराबादेतील सार्वजनिक चळवळीचे स्वरूप

याच सुमारास हैदराबाद एज्युकेशन कॉन्फरन्स (हैदराबाद शिक्षण परिषद) नावाची, एक शैक्षणिक विषयासंबंधी विचार करणारी एक संस्था सरकारच्या आशीर्वादानेच दारुलउलूम नावाच्या शैक्षणिक संस्थेतील शिक्षकांनी सुरू केली. तिचे पहिले अध्यक्ष तर सर अकबर हैदरीच होते.

तिची तीनचार अधिवेशने झाली. पण त्यामुळे हिंदू-मुसलमान एकत्र येत आहेत. एकत्र मागण्या करीत आहेत हे दृश्य समोर येऊ लागले. म्हणून सरकारने त्या परिषदेचे संपूर्ण सरकारीकरण करून कलेक्टरलाच त्या परिषदेचे कायमचे स्वागताध्यक्ष करून टाकले; व सरकार निर्देशित करील तोच अध्यक्ष असा दंडक लादला. याच परिषदेच्या व्यासपीठावरून उर्दू भाषेच्या सक्तीला विरोध होऊ लागला. माध्यमिक शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी, पुढे उर्दूबरोबर इंग्रजी माध्यम असावे ; धार्मिक शिक्षण द्यायचेच असेल तर मुसलमानाप्रमाणे हिंदू विद्यार्थ्यांनाही त्यांच्या धर्माचे शिक्षण द्यावे, असे ठराव पास झाले. पण हे सरकारला कसे सहन होणार ? यातून हिंदू समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती या सरकारप्रणीत परिषदेतून बाहेर पडल्या. न्यायमूर्ती केशवराव कोटरकरांच्या प्रेरणेत जनता शिक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली. त्या परिषदेचे पहिले अधिवेशन हैदराबादीच, पं. हृदयनाथ कुंझरू यांच्या अध्यक्षतेखाली झाले. दुसऱ्या अधिवेशनापासून या परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाचा अध्यक्ष हा संस्थानातीलच रहिवाशी असावा अशी अट लादण्यात आली. सरकारने परिषदेकडून जामीनही मागितला. या सगळ्या अटी मान्य करूनही परिषदेच्या कार्यकर्त्यांनी १९२९ पासून १९४४ पर्यंत पाच अधिवेशने घेण्यात यश मिळविले. सरकारच्या शैक्षणिक धोरणावर टीका करून त्याविरुद्ध काही ठराव पास करण्यात आले. पण हुकुमशाही राजवटीत आपल्याला हवे ते बदल घडून येतील अशी अपेक्षा करणे चुकीचेच असते, हा अनुभव लोकांना येऊ लागला. मग ती राज्यपद्धतीच कशी बदलायची याचा विचार करायला लोकांनी आरंभ केला. पण जाहीर स्वरूपात विचारविनिमय करण्यास तर संस्थानात वावच नव्हता. म्हणून संस्थानातील काही पुढारी संस्थानाबाहेर जाऊन राजकीय स्वरूपाच्या परिषदा घेऊ लागले.

**संस्थानाबाहेरील राजकीय परिषदा**

तसे पाहिले तर अखिल भारतीय काँग्रेसचे सदस्य हैदराबादेत होते. १९१८ मध्ये धर्मवीर वामन नाईक यांच्या पुढाकाराने अखिल भारतीय काँग्रेसची शाखा हैदराबादेत स्थापण्यात आली होती. हैदराबाद संस्थानातील लोक काँग्रेसच्या अधिवेशनात जाऊ लागले होते. बाहेरचे मोकळे वातावरण हैदराबाद संस्थानात पोचू लागले होते. हैदराबादेत १९२० मध्ये लक्ष्मणराव फाटक यांच्या संपादकत्वाखाली ' निजामविजय ' हे मराठी साप्ताहिक सुरू झाले. हैदराबादेतून निघणारे हे पहिलेच मराठी वर्तमानपत्र होते. त्याच सुमारास ' गुलबर्गा समाचार ' हे वृत्तपत्र गुलबर्ग्यातून निघत होते. अनेक बंधने सांभाळून राजकीय स्वरूपाची जागृती करण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य व स्वागतार्हच होता. श्री. वासुदेवराव औरंगाबादकरानी १९२९ मध्ये ' नागरिक ' नावाचे मराठी साप्ताहिक सुरू केले. तसेच उर्दूमधून ' मुशीरे दकन ' हे उर्दू पत्र सुरू केले. या सर्व प्रयत्नांना बळ प्राप्त होण्यास एका राजकीय संघटनेची आवश्यकता होती. त्याची पूर्व तयारी म्हणून, कोकोनाडा येथे १९२३ मध्ये भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाला, ते जोडूनच हैदराबादच्या लोकांनी पहिली राजकीय परिषद भरविली. तिचे अध्यक्ष होते लोकनायक मा. धा. अणे. येथेच प्रथम जबाबदार राज्य पद्धतीचा ठराव आणण्याचे ठरले होते. पण ऐनवेळी तो ठराव मागे घेण्यात आला. यानंतर मुंबई, पुणे, अकोला येथेही अशा स्वरुपाची राजकीय परिषदेची अधिवेशने भरविण्यात आली. अकोला येथे काँग्रेसचे अधिवेशन नसतानासुद्धा मुद्दाम हैदराबादची राजकीय परिषद बोलावण्यात आली होती. त्याचे कारण निजामाने विदर्भप्रांत आपल्या प्रांतास जोडण्याची मागणी सारखी चालविली होती. एवढेच नव्हे तर विदर्भ आपल्या राज्यात आल्यास त्याला जबाबदार राज्यपद्धती देण्यात येईल अशी एक घोषणाही केली होती. त्यामुळे अकोला येथील अधिवेशनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. अध्यक्षस्थानी बॅ. रामचंद्र नाईक होते. येथेच हैदराबादला जबाबदार राज्यपद्धती मागणारा

ठराव पास करण्यात आला होता व त्या प्रश्नाचा व्यापक पाठपुरावा करण्यासाठी एक स्थायी समितीही स्थापन करण्यात आली होती.

संस्थानाबाहेर झालेल्या या अधिवेशनाचा राजकीय प्रश्न हाताळण्याच्या दृष्टीने फारसा उपयोग झाला नाही. तरी पण संस्थानात निरनिराळ्या संघटनांचा उदय होऊन लोक धैर्याने काही मागण्या मांडू लागले. तशा प्रयत्नांपैकी तेलंगणातील ' आंध्रजन संघात ' ही संघटना १९३१ साली निर्माण झाली. १९३२ मध्ये हिंदू स्टेंडिंग कमेटीही स्थापन झाली. त्या संस्थेचे अध्यक्ष धर्मवीर श्री. वामनराव नाईकच होते. पुढे १९३५ मध्ये " निजाम प्रजासंघ **Nizam Subjects Leage** " स्थापन झाली. या संघटनेत बरेच प्रतिष्ठित मुसलमान लोकही सामील झाले. या संघाने उर्दू ऐवजी हिंदी हिंदुस्थानी ही भाषा सरकारने स्वीकारावी अशी एक मागणी करण्यात आली. त्या संघाचे अध्यक्ष नबाब निजामतयार जंग होते. या संघटनेचा भर राज्यातील नोकऱ्यांतून स्थानिक लोकांचाच भरणा असला पाहिजे या मागणीवर होता. तसेच कायद्यासमोर सर्व नागरिक सारखे असतील. अभिव्यक्तीचे, संघटनेचे स्वातंत्र्य असलेले हक्क सर्वांना समान असतील असे घोषित केले. सरकारला हे रूचण्यासारखे नव्हते. त्यांनी या संघटनेतील मुसलमानांना, निरनिराळी आमिषे दाखवून त्या संघटनेतून बाहेर काढले. हा प्रयत्नही शेवटी वांझोटा ठरला.

या प्रयत्नाकडे निजाम सरकारचे विशेष लक्ष होते. त्यांना त्या प्रयत्नापासून थोडेसे परावृत्त करण्याच्या उद्देशाने, हैदराबाद संस्थानात राजकीय सुधारणा अमलात आणण्याच्या दृष्टीने एक ' सुधारणा समिती ' नियुक्त केली. तिचे अध्यक्ष होते सर आरमद् आय्यंगार व दुसरे दोन सदस्य होते; श्री. काशिनाथराव वैद्य व बॅ. अकबर अली. याच सुमारास १२ नोव्हेंबर १९३७ ला हैदराबादेतील प्रतिष्ठित पुढाऱ्यांची एक बैठक पंडितजी रामचारी यांच्या बंगल्यात घेण्यात आली. तेथे ' हैदराबाद पीपल्स कन्व्हेन्शन ' अशी एक व्यापक परिषद घेण्याचे ठरले. ती परिषद जानेवारी १९३८ मध्ये झाली. तिचे अध्यक्ष होते मौलवी अब्दुल हसन सय्यद अली! परिषदेपुढे (१) जबाबदार राज्य पद्धती, (२) हिंदु-मुसलमानांचे स्थान ! त्या परिषदेत हजर असलेल्या सर्व मुसलमानांनी जबाबदार राज्य पद्धतीला तत्त्वतः मान्यता दिली. परंतु हिंदूच्या तुलनेत मुसलमानांची संख्या कमी असली तरी त्यांना अल्पसंख्य न लेखता हिंदूच्या बरोबरीने समसमान म्हणजे पन्नास टक्के प्रतिनिधित्व सर्वत्र द्यावे, असा आग्रह मुसलमान मंडळीनी धरला. त्यामुळे हे कन्व्हेंशनही लोकांच्या आकाक्षांच्या दृष्टीने फोलच ठरले.

यावेळी मुस्लीम समाजातील बहुसंख्य लोकांनी ' इत्तिहादुल मुस्लीम ' ही आपली स्वतंत्र संघटना उभी केली व ती संपूर्णपणे जातीय स्वरूपाची, कट्टर धर्मांध ठरली. हिच्या आहारी जाऊनच पुढे निजामाने आपल्यावर संकट ओढून घेतले. या काळातच महात्मा गांधी व पंडित नेहरूंनी हैदराबादला भेट दिली होती. तेवढ्याने बहुसंख्य जनतेचे प्रश्न सुटण्यास फारसे साह्य झाले नसले तरी लोकांना आपल्या मागे ही मंडळी आहे; एवढा विश्वास मात्र वाटू लागला.

**प्रांतिक परिषदा**

हैदराबाद संस्थानात जबाबदार राज्यपद्धतीचे ध्येय घेऊन एक राजकीय संघटना जरी निर्माण होऊ शकली नाही तरी; वर उल्लेख केलेल्या आंध्रसभा किंवा आंध्रपरिषदेप्रमाणे महाराष्ट्र आणि कर्नाटक परिषदांची अधिवेशनेही निरनिराळ्या ठिकाणी भरू लागली. या परिषदांवर ही अनेक बंधने घातली गेली. या परिषदांनी जबाबदार राज्य पद्धतीची मागणी करण्यास सुरवात केली.

या तीन्ही परिषदांचे कार्यकर्ते एकत्र येऊन ' हैदराबाद स्टेट काँग्रेस ' नावाची संस्था काढण्याचा विचार १९३८ मध्ये निश्चित झाला.

१९३८ हे वर्ष हैदराबाद संस्थानच्या राजकीय चळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरले. त्याचे कारण असे की, या परिषदांच्या कार्यकर्त्यांमधून राजकीय कार्यास वाहून घेणारे, म्हणजे संपूर्ण वेळ देणारे कार्यकर्ते पुढे आले. उदाहरणार्थ मराठवाड्यातून पू. स्वामी रामानंद तीर्थ श्री. रा. गो. ऊर्फ बाबासाहेब परांजपे, श्री. गोविंदभाई श्रॉफ, श्री. आनंदराव वाघमारे, तेलंगणातून श्री. रावी नारायण रेड्डी, जमलापुरम केशवराव, कर्नाटकातून श्री. जनार्दनराव देसाई, श्री. प्रणिशाचार्य, श्री. दिगंबरराव बिंदू, डॉ. मेलकोटे हे हैदराबादेतच राहत असत. या मंडळीनी स्टेट काँग्रेसचे सदस्य नोंदविण्यास आरंभ केला. या सदस्यांची पहिली मीटिंग ९ सप्टेंबर १९३८ ला बोलाविण्यात आली. पण ७ सप्टेंबर १९३८ ला सरकारने हुकुम काढून त्या जन्माला येणाऱ्या संस्थेवर बंदी घातली. एवढेच नव्हे; तर ती संस्था जातीय स्वरूपाची आहे असा आरोपही ठेवला.

### स्टेट काँग्रेसचा सत्याग्रह

हा हुकूम मोडण्याचा निर्णय, काही पुरोगामी मंडळीनी घेतला. हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण होता. कारण जनतेने हैदराबादच्या इतिहासात प्रथमच जुल्मी राजवटीने दिलेले आव्हान स्वीकारले होते. सत्याग्रहींच्या याद्या तयार होऊन १९३८ च्या २४ तारखेला, ऐन दिवाळीत श्री. गोविंदराव नानल यांच्या अध्यक्षतेखाली एका तुकडीने हैदराबाद येथे सत्याग्रहाला तोंड फोडले. त्या तुकडीत श्री. नानल यांच्याबरोबर कर्नाटकाचे श्री. जनार्दनराव देसाई, मराठवाड्याचे श्री. श्रीनिवासराव बोरीकर, आंध्रचे रावी नारायण रेड्डी, हैदराबादचे श्री. रामकिशनधूत ही मंडळी होती. त्याच सुमारास श्री. आनंदराव वाघमारे यांनी ' मराठवाडा ' हे साप्ताहिक सुरू केले. चळवळीच्या काळात त्यावर बंदी घातली गेली. पण निरनिराळ्या नावाने ते निघू लागले.

### हिंदू सभा व आर्य समाजाचे सत्याग्रह

१९३८ च्या ऑक्टोबर महिन्यात अभूतपूर्व अशा राजकीय जनजागृतीचे दृश्य दिसू लागले. स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहाबरोबर हिंदू सभेचे पुढारी श्री. यशवंतराव जोशी यांनीही ' सिव्हिल लिबर्टीज युनियन'च्या वतीने २१ ऑक्टोबरलाच सत्याग्रह आरंभ केला होता. याच्या पाठोपाठ आर्य समाजाने तर फारच मोठ्या प्रमाणावर सत्याग्रहाला आरंभ केला होता. हिंदू सभेच्या व आर्य समाजाच्या सत्याग्रहात; संस्थानातील व बाहेरून सत्याग्रहींच्या मोठमोठ्या तुकड्या संस्थानात ठिकठिकाणी येऊन सत्याग्रह करू लागल्या. आर्यसमाजाचे अखिल भारतीय स्तरावरील पू. नारायणस्वामी, श्री. खुशालचंद सारडा, यांच्या नेतृत्वाखाली शेकडो सत्याग्रही रेल्वे गाड्यांनी संस्थानात उतरले व त्यांनी सत्याग्रह केला. याचवेळी उस्मानिया विद्यापीठातील हिंदू विद्यार्थ्यांवर ' वंदे मातरम् ' हे राष्ट्रगीत गाण्यावर बंदी घालून फार मोठा अन्याय केला होता. त्या अन्यायाचा प्रतिकार करण्याकरिता विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजावर बहिष्कार घालून ते बाहेर पडले. त्यांचे नेतृत्वही स्टेट काँग्रेसच्या नेत्यांनी केले. यातूनच बरेचसे कार्यकर्ते स्टेट काँग्रेसला मिळाले. स्टेट काँग्रेसतर्फे सत्याग्रहाच्या दुसऱ्या तुकडीचे नेतृत्व पू. स्वामी रामानंदतीर्थ यांनीच केले. पहिल्या तुकडीला अटक करून त्यांना एक महिन्याचीच शिक्षा देण्यात आली. पण पुढे येणाऱ्या तुकड्यांस सत्याग्रहींना मात्र सक्तमजुरीची दीर्घ मुदतीची शिक्षा ठोठावण्यात आली. विशेषतः पू. स्वामीजींना जेलमध्ये अंधारकोठडीचीही शिक्षा देण्यात आली होती.

एकूण हैदराबाद संस्थानात एका नव्या पर्वाला आरंभ झाला. स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहाचे मार्गदर्शन महात्मा गांधीच करत होते. आपल्या 'हरिजन' पत्रातून ते हैदराबाद संस्थानच्या राजकीय परिस्थितीसंबंधी कडक शब्दात लिहित असत. पण या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, अ. भा. कॉंग्रेस समितीनेच नव्हे तर खुद्द महात्मा गांधींनीसुद्धा संस्थानातील जनता आंदोलनात कॉंग्रेसने अ. भा. कॉंग्रेसचा सदस्य किंवा प्रतिनिधी म्हणून भाग घेऊ नये अशीच भूमिका घेतली होती. पण १९३६ मध्ये पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात संस्थानासंबंधी एक महत्त्वाचा ठराव पास करण्यात आला होता. तो असा होता—

"The people of the states should have the same right of self determination as those of the rest of India and that the congress stands for the same political and democratic, liberties for every part of India.

त्याच ठरावाचे पुढचे वाक्य असे होते :

"The congress, however desires to present out that the struggle for liberty within the states, has in the very nature of things, to be carried on by the people of the states themselves.

" पुन्हा हरिपुरा येथे श्री सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अधिवेशनात संस्थानी प्रजा आणि अ. भा. कॉंग्रेस यांचे संबंध अधिक स्पष्ट झाले. या अधिवेशनापासून संस्थांनी प्रजेनी ती सुरू केलेल्या संघटनांमध्ये व अ. भा. कॉंग्रेसमध्ये घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाले यासंबंधी डॉ. महाभिमरामय्या आपल्या कॉंग्रेसच्या इतिहास ग्रंथात लिहितात,

'Indeed the two trains running on different lines (Railway) met and formed a combined tram under the common drive given by Gandhiji. He was the one consultant on all States' matters. It was to Gandhiji that all eyes turned.

अशा रीतीने महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार हैदराबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठविण्यासाठी चाललेला सत्याग्रह स्थगित करण्यात आला. श्री. काशिनाथराव वैद्य यांनी १८ वे सर्वाधिकारी म्हणून सत्याग्रह करून सत्याग्रह स्थगित केल्याची घोषणा केली. श्री. वैद्य यांच्या सत्याग्रह स्थगितीसंबंधी निवेदनाने, संस्थानचे त्यावेळचे पंतप्रधान सर अकबर हैदरी हे बरेच अस्वस्थ झाले. त्यानंतर श्री. हैदरी आणि महात्मा गांधी यांच्यामध्ये बराच पत्रव्यवहार झाला. १० एप्रिल १९३९ ला कॉंग्रेस सत्याग्रहींची मुक्तता केली पण स्टेट कॉंग्रेसवरची बंदी उठली नाही. तरी या सत्याग्रहींची एक बैठक मनमाडमध्ये झाली. त्यात एका कॉंग्रेस समितीची स्थापना झाली. त्यात श्री. गोविंदराव नानल यांची अध्यक्षपदी व पू. स्वामी रामानंदतीर्थ यांची चिटणीसपदी निवड झाली. ७५ सदस्यांची एक स्थायी समितीचीही निवड झाली. कॉंग्रेस समितीने विधायक कार्य करीत राहावे असे ठरले. त्याप्रमाणे ठिकठिकाणी शाखा सुरू झाल्या.

पण वर सांगितलेल्या या परिषदांची अधिवेशने भरली जाऊ लागली. त्या अधिवेशनात संस्थानातील किसान, मजूर, शिक्षक इत्यादी बाबीविषयी विचारविनिमय होऊन त्यासंबंधी ठरावही पास होऊ लागले. याबरोबरच जबाबदार राज्य पद्धतीवर भर देण्यात येऊ लागला. या तिन्ही परिषदांच्या स्थायी समितीच्या सदस्यांची एक संयुक्त समितीही कार्यरत झाली. थोडक्यात; 'स्टेट कॉंग्रेस' या नावाला बंदी असली तरी त्या उद्देशाने चळवळ चालली. केवळ पू. स्वामीजी हे मात्र शेवटपर्यंत स्टेट कॉंग्रेसचे म्हणूनच कार्य करीत आले.



(शा म मु) एन ४३९४-९९ (१९८०-५-२००२)

या काळात बाहेर राजकीय परिस्थितीत झपाट्याने बदल होत चालला. १९३५ च्या कायद्याप्रमाणे प्रांतातून लोकनियुक्त सरकार अस्तित्वात आले. आठ प्रांतात काँग्रेसची सरकारे आली. म्हैसूर, त्रावणकोर, इत्यादी संस्थानाची प्रजामंडळे स्थापन होऊन, राजकीय हक्कासाठी लढा देत होती. या संस्थांनी प्रजामंडळाच्या प्रतिनिधींची एक संस्था निर्माण झाली. त्या संस्थेचे नाव 'ऑल इंडिया स्टेट पीपल्स कॉन्फरन्स.' (अखिल भारतीय संस्थानी प्रजा परिषद) या परिषदेची अधिवेशने निरनिराळ्या ठिकाणी झाली. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी अ. भा. काँग्रेसचेच नेते असत. १९३६ मध्ये कराची येथे श्रीपट्टाभिरामय्या अध्यक्ष होते. येथेच काँग्रेसचा व अ. भा. प्रजा परिषदेचा प्रत्यक्ष संबंध आला. संस्थानांतून संपूर्ण जबाबदार राज्यपद्धतीच्या ध्येयप्राप्तीसाठी चळवळीच्या स्वरूपात मान्यता देण्यात आली. अ. भा. प्रजा परिषदेच्या स्थायी समितीवर श्री. वामनराव नाईक, राघवेंद्रराव शर्मा, काशिनाथराव वैद्य यांना घेण्यात आले.

## अ. भा. संस्थानी (१९३९) प्रजा परिषदेच्या पं. नेहरूंचे नेतृत्त्व

लुधियाना येथे पं. नेहरूच अ. भा. प्रजा परिषदेचे अध्यक्ष झाले. तसेच पुन्हा १९४५ मध्ये उदयपूरलाही पं. नेहरूच अध्यक्ष होते. लुधियानाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात हैदराबादेतील परिस्थितीचा पं. नेहरूंनी कडक शब्दात निषेध केला. हैदराबाद संबंधीचा ठरावही पास करण्यात आला. निजामाने १९३८ मध्ये जाहीर केलेल्या सुधारणांवर बहिष्कार घालण्याचाही ठराव करण्यात आला. अशा रीतीने पं. नेहरूंची हैदराबादच्या राजकारणात प्रत्यक्ष हात घालायला सुरुवात केली.

१९३९ च्या सप्टेंबरमध्ये दुसऱ्या जागतिक महायुद्धाला आरंभ झाला. भारतीय जनतेला विश्वासात न घेता, भारत हे युद्धमान राष्ट्र असल्याची घोषणा ब्रिटिश सरकारने केली. महात्मा गांधींनी त्याविरुद्ध १९४० पासून वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. त्यावेळी हैदराबाद संस्थानातसुद्धा पू. स्वामी रामानंदतीर्थ व काही निवडक लोकांनी सत्याग्रह केला. त्यांना शिक्षा झाली.

## इत्तिहादुल मुस्लिमचा उदय

याच दरम्यान हैदराबादच्या संस्थानात ' इत्तिहादुल मुस्लिम ' नावाच्या एका जातीय संस्थेचा उदय झाला. आरंभी या संस्थेचे उद्देश धार्मिक व मुस्लिम समाज सुधारणेपुरते मर्यादित होते. आरंभीच्या काळातील तिचे नेतृत्त्व सौम्य प्रवृत्तीच्या व्यक्तींच्या हाती होते. पण तिचे स्वरूप पालटून ती पूर्णपणे एक धर्मांध व जहाल अशी मुस्लिम संघटना झाली. विशेषतः बहादुरयार जंगाने जेव्हा या संघटनेची सूत्रे हाती घेतली, तेव्हापासून हैदराबाद संस्थान हे स्वतंत्र इस्लामी राज्य करण्याच्या दृष्टीनेच त्यांनी त्या संघटनेला लढावू स्वरूप दिले. बहादुरयार जंग हा निजामालाच डोईजड झाला होता. त्याचा परस्परच काटा काढण्यात आला, असे समजते. त्याच्या आकस्मिक निधनानंतर कासीम रझवी नावाच्या एका अत्यंत कडव्या व्यक्तीने इत्तिहादची सूत्रे हाती घेतली. त्याला निजामाने सर्वाधिकार दिल्यासारखे तो वागू लागला. रझवीने समांतर शासनच सुरू केले. एक सशस्त्र खाजगी स्वयंसेवक संघटना उभी केली. तीच ' रझाकार ' म्हणून ओळखली जाते. जबाबदार राज्य पद्धतीला या संघटनेचा तीव्र विरोध. त्या मागणीच्या विरोधात या रझाकारांनी संस्थानभर धुमाकूळ माजविला.

१९४२ च्या भारतव्यापी ' चलेजाव ' चळवळीतून भारताचे राजकीय भवितव्य ठरविण्याचे प्रयत्न चालले होते. हैदराबाद संस्थानात ती चळवळ प्रतिकात्मच झाली. पू. स्वामीरामानंद तीर्थ काही लोकांना अटक करून तुरुंगातून डांबण्यात आले. एकूण परिस्थिती स्फोटक होत चालली. १९४४

मध्ये महात्मा गांधींची व पुढे १९४५ मध्ये पं. नेहरू इत्यादी काँग्रेसजनांची सुटका होऊन भारताच्या स्वातंत्र्याचे स्वरूप ठरविण्यासाठी वाटाघाटी सुरु झाल्या. त्या वाटाघाटीत ब्रिटिश सरकारचा कल संस्थानिकांना स्वातंत्र्य देण्याचाच होता. त्याला पं. नेहरू प्रभृतींनी विरोध केला. ब्रिटिशांच्या योजनेत हिंदुस्थानची फाळणी हे मुख्य सूत्र होते. त्याला तर महात्माजींनी अगदी कडक शब्दात विरोध केला. पण शेवटी परिस्थितीच्या दडपणाखाली फाळणीचे विष प्राशन करण्याची पाळी काँग्रेसवर आली. या विषाबरोबर संस्थानिकांना स्वतंत्र बाण्याचा दर्जा देण्याचे जालीम विषाचा प्यालाही पुढे आला होता. ही सहाशे संस्थाने स्वतंत्र राहाण्याचा धोका निर्माण झाला होता.

हैदराबाद संस्थानाचा अधिपती निजाम तर या संधीचा लाभ घेण्यास टपलेला होता. जबाबदार राज्य पद्धतीची मागणी तर त्यांनी लाथाडलीच होती. स्टेट काँग्रेसवरील बंदीही त्याने उठविली नव्हती नि आमचे पंतप्रधान म्हणून नबाब छत्तारीची नेमणूक केली होती. पण इत्तिहादुल मुस्लिमचा या नेमणुकीस विरोधच होता. त्यामुळे मिर्झा इस्माईल यांना पंतप्रधान करण्यात आले. त्यांना अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेचे अध्यक्ष या नात्याने, पं. नेहरूंनी मिर्झा इस्माईल यांना एक पत्र लिहिले. त्यामध्ये स्टेट काँग्रेसवरील बंदी उठविण्याची निकड व्यक्त केली होती. त्यातील पुढील वाक्ये फार महत्त्वाची आहेत.

### हैदराबादच्या परिस्थितीचे विश्लेषण

" Hyderabad has gained uneviable Notoriety in regard to suppression of civil liberties and in the present circumstances when people are talking of independence and responsible Govt. everywhere it is more urgent to remove the loan on the State congress. I am sure that you would not like Hyderabad to remain a symbol of reaction."

या पत्राचा परिणाम किंवा परिस्थितीचा दबाव यामुळे हैदराबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी उठविण्यात आली. ३ जुलै १९४६ ला नबाब ऑफ छत्तारीनी पं. नेहरूंना पत्र लिहून तसे कळविले. याचे हैदराबादेतील जनतेने सहर्ष स्वागत केले. लगेच तिन्ही परिषदांचे स्टेट काँग्रेसमध्ये विलीनीकरण होऊन हैदराबाद स्टेट काँग्रेसने उजळ माथ्याने कार्य करण्यास आरंभ केला. बंदी उठवताच मवाळ पुढाऱ्यांनी काँग्रेस आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्यांना यश आले नाही. पू. स्वामी रामानंदतीर्थ हेच स्टेट काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. श्री. गोविंदभाई श्रॉफ, श्री. वैशंपायन, श्री. बाबासाहेब परांजपे, श्री आनंदराव वाघमारे यांच्यासारख्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण मराठवाडा पू. स्वामीजींच्या मागे उभा राहिला. तसेच तेलंगणातील जमलापुरम केशवराव, एम. रामचंद्रराव, कोदाटी नारायणराव यांच्यासारख्या पुरोगामी कार्यकर्त्यांनी पू. स्वामीजींचे नेतृत्त्व स्वीकारले. तसेच श्री. प्राणेशाचार्य, श्री. मुरलीधरराव कामतीकर, श्री. जगन्नाथराव चंद्रप्पा, श्री. वि. पां. देऊळगावकर ही कर्नाटकातील मंडळी पू. स्वामीजींबरोबर काम करू लागली. इकडे भारताचे स्वातंत्र्य दृष्टिपथात येत चालले. तर निजाम आपले सार्वभौमत्व टिकविण्याच्या प्रयत्नात होता. एकीकडे भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा तर तिकडे आपण स्वतंत्र झाल्याची घोषणा निजामाने करूनही टाकली.

### हैदराबाद स्टेट काँग्रेसचे पहिले अधिवेशन

पू. स्वामी रामानंदतीर्थ यांच्या अध्यक्षतेखाली १९४७ मध्ये १६, १७ व १८ जूनला हैदराबाद स्टेट काँग्रेसचे पहिले अधिवेशन मोठ्या उत्साहाने भरविण्यात आले. निरनिराळ्या संस्थानांतील पुढारी

तसेच अ. भा. काँग्रेसचे बरेचसे पुढारी या अधिवेशनात सहभागी झाले होते. पू. स्वामीजींचे भाषण, निजामाला बरीच समज देणारे होते. त्या अधिवेशनात दोन ठराव महत्त्वाचे होते. (१) हैदराबादने ताबडतोब हिंदी संघराज्यात सामिल व्हावे व (२) संस्थानाला जबाबदार राज्यपद्धतीचा आरंभ करावा. पू. स्वामीजींचे समारोपाचे भाषणही अत्यंत कडक होते. जनतेला त्यांनी उद्दिष्टप्राप्तीसाठी त्यागाचे आवाहन केले होते. या भाषणानंतरच कुठे पू. स्वामीजींना अटक होण्याची शक्यता निर्माण झाली होती. अधिवेशन होताच सोलापूर येथे कार्यकारिणीची बैठक होऊन आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली.

श्री. दिगंबरराव बिंदू यांच्या अध्यक्षतेखाली एक कृती समिती नियुक्त करण्यात आली. तिचे इतर सदस्य होते श्री. गोविंदभाई श्रॉफ, श्री. जमलापुरम केशवराव, डॉ. जी. एस. मेलकोटे व श्री. जी. के. प्राणेशाचार्य हे करण्यापूर्वी पू. स्वामीजी दिल्लीला जाऊन पं. नेहरू, श्री. वल्लभभाई, श्री. जयप्रकाश यांना भेटून आले होते.

**सत्याग्रहाचा कार्यक्रम**

हैदराबादेत जुलैच्या शेवटी पुन्हा कार्यकारिणीची बैठक घेऊन पुढील कार्यक्रम ठरला—

(१) ७ ऑगस्ट १९४७ हा दिन हिंदी संघराज्यात समिती होण्याचा दिन म्हणून पाळायचा. येथूनच सत्याग्रहाला आरंभ होणार हे निश्चित.

(२) सरकारशी संपूर्ण असहकार.

(३) धान्य वसुलीच्या बाबतीत असहकार, इत्यादी.

१५ ऑगस्ट १९४७ हा भारताच्या स्वातंत्र्योदयाचा दिवस. त्याच दिवशी मध्यरात्री पं. नेहरू भारताचे पंतप्रधान बनले. त्यांनी भारताचा ध्वज डौलात फडकविला. तर इकडे गुलबर्गा स्टेशनावर मुंबई, मद्रास एक्स्प्रेसवर लावलेले भारताचे ध्वज पाहून स्टेशनवर आलेल्या मुसलमानांचे पित्त खवळले. त्यांनी डब्यांवर हल्ला करून ते ध्वज फाडून टाकले. त्याच दिवसापासून निजामाने आपण स्वतंत्र झाल्याचे घोषित करून, बरोबरीच्या नात्याने नवजात भारत सरकारबरोबर पुढील संबंधाबाबत बोलणी करण्याचे ठरविले. संस्थानात ' झेंडा सत्याग्रहाला ' त्याच दिवशी आरंभ झाला. पू. स्वामीजी व इतर ठिकाणच्या नेत्यांना अटक झाली. सत्याग्रहाने उग्र स्वरूप धारण करू नये या उद्देशाने, २७ ऑगस्ट १९४७ ला अनेक लहानमोठ्या काँग्रेसवादी लोकांना अटक करण्यात आली.

**१९४७ ची चळवळ**

१९४२ चे ' चले जाव ' आंदोलन हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील अंतिम पर्व ठरले. तसेच १९४८ ऑगस्टपासून सुरू झालेली हैदराबाद संस्थानांतील चळवळ ही ' करू या मरू ' या जिद्दीने सुरू झाली होती. भारतीय संग्रामापेक्षा या संग्रामाचे स्वरूप अगदी भिन्न होते. ते अगदी भयानक होते. एकीकडे सत्याग्रहाची स्टेट काँग्रेसची चळवळ तर दुसरीकडे ती चळवळ दडपून टाकण्यासाठी निजाम सरकार व इत्तिहादुल मुस्लीमने अवलंबिलेले दहशतवादी मार्ग! यामुळे अनेक कार्यकर्त्यांना हौतात्म्य पत्करावे लागले. काँग्रेस संघटनेला दोन आघाड्यांवर लढा द्यावा लागला. एक शांतता मार्गाने कायदेभंग व दुसरा रझाकारांच्या गुंडगिरीचा प्रतिकार करण्यासाठी सीमेवरील गावात ठिकठिकाणी सशस्त्र कार्यकर्त्यांची शिबिरे चालवायला लागली.

### निजामाची संयुक्त राष्ट्र संघटनेकडे धाव

इकडे हा लढा चालला असताना निजामाने भारत सरकारशी वाटाघाटी सुरू केल्या. आपले एक शिष्टमंडळ दिल्लीला पाठविले. एवढेच नव्हे; तर त्यांनी आपली बाजू आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी एक शिष्टमंडळ संयुक्त राष्ट्रसंघटनेकडेही पाठविले. निजामाचा घटनाविषयक सल्लागार म्हणून सर वॉल्टर मॉक्टन यांची नेमणूक केली. तो निजामची प्रामाणिकपणे वकिली करायचा. या वाटाघाटीस आरंभ झाला ; व तिकडे संस्थानात हिंदुस्थानातील लक्षावधी मुसलमानांना निर्वासित म्हणून हैदराबाद संस्थानात निजामाने आश्रय दिला. उद्देश एवढाच की, हैदराबाद संस्थानातील मुस्लिमांची संख्या वाढावी. याकडे काँग्रेसच्या कृती समितीने भारत सरकारचे वरचेवर लक्ष वेधले. त्यावेळी पंडित नेहरू पंतप्रधान होते. सरदार पटेल गृहमंत्री व उपपंतप्रधान, तर लॉर्ड माऊंट बॅटन गव्हर्नर जनरल होते. हैदराबादची डोकेदुखी या तिघानाच प्रामुख्याने जाणवत होती. खरं तर जी संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन होतील, अशा संस्थानिकाच्याबरोबर पुढील संबंधाविषयी तात्पुरता ' जैसे थे ' करार करण्यास या तिघांचीही तयार होती. पण निजाम तर सामिलनाम्यावर सही करणारच नव्हता. तरी पण ' जैसे थे ' करार करण्यात आला हे त्यावेळी पुष्कळांना खटकले. यात एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे माऊंटबॅटनच्या मध्यस्थीने सामोपचाराने प्रशन सुटत असेल तर निजामाला दुखवू नये, की दुखवावे? असा विचार पं. नेहरू व सरदारांनीही केला असावा. सरदार व पंडित नेहरू यांचे माउंट बॅटनशी संबंध समान नव्हते. सरदारापेक्षा पंडित नेहरू माउंट बॅटनच्या अधिक जवळ होते. माउंट बॅटनना सरदार वाटाघाटीत साथ देत होते. हे जरी खरे, तरी ते वेळोवेळी आपला विरोध तो दाबतच राहिले. सामीलनाम्याचा प्रश्न सरदारांनी आपल्या पद्धतीने किती यशस्वी रीतीने हाताळला, याचे वर्णन त्यांचे चिटणीस व्ही. पी. मेनन यांनी, लिहिलेल्या **Intigration of Scales** या पुस्तकात सविस्तरपणे केले आहे. ५१० संस्थांनाकडून सामिलनाम्यावर सह्या मिळविण्यात ते यशस्वी झालेले होते. आता हैदराबाद व जुनागड व एकदोन छोटी संस्थाने एवढीच राहिली होती.

### ' जैसे थे ' करार

निजाम अतिशय धूर्त. इकडे भारत सरकारला वाटाघाटीत गुंगत ठेवून तिकडे संयुक्त राष्ट्रांकडून आपल्या सार्वभौमत्वावर शिक्कामोर्तब करून घेण्याचे प्रयत्न अत्यंत चिकाटीने चालले होते. तात्पुरता ' जैसे थे ' करार करून घेण्यात तो यशस्वी झाला. २९ नोव्हेंबरला ' जैसे थे ' करार झाला. हैदराबादेत लायक अलीला पंतप्रधान करून एक नवे मंत्रीमंडळ बनविण्यात त्यात काँग्रेसच्या श्री. जी. रामाचारी यांचाही समावेश होता. लिंगायतांचे प्रतिनिधी म्हणून उस्मानाबादचे श्री. मल्लिकार्जुन तोडकरी, उद्योगपतींचे प्रतिनिधी म्हणून जालन्याचे जी. व्ही. जोशी यांनाही घेण्यात आले.

या अवधीत निजाम सरकारने करार भंग करायला सुरवात केली. पाकिस्तानला २० कोटी रुपये कर्ज म्हणून दिले. या करारानुसार ५ जानेवारी १९४८ श्री. कन्हैय्यालाल मुनशींची भारत सरकारचे एजंट जनरल म्हणून नियुक्ती झाली. त्यांना हैदराबादेत ब्रिटिश रेसिडेंट ज्या मध्यवर्ती भागात राहत असे, ती जागा श्री. मुनशींना देण्यास निजामाने नकार दिला. शेवटी भारत सरकारच्या मालकीच्या एका इमारतीत त्यांचे निवासस्थान थाटण्यात आले.

## संस्थानातील अत्याचार

येथून परिस्थिती अधिकच चिघळत गेली. संस्थानात रझाकारांचे अत्याचार वाढतच गेले. जाळपोळ, लुटालूट, खून, बायकांवर बलात्कार हे सर्व प्रकार सर्रास चालले. दहशतीचे वातावरण निर्माण झाले. हिंदूंना, कॉंग्रेसजनांना नष्ट करण्यासाठी रझवीने बत्तीस कलमी योजना आखली होती. त्या योजनेनुसार हे सर्व प्रकार चालले होते. रझवीच्या रझाकारांनी ' उमरोज ' या उर्दू दैनिकाचे राष्ट्रीय बाण्याचे संपादक शोबेला यांचा खून केला. अशा वेळी कॉंग्रेसमधलेच श्रीरामाचारी यांच्यासारखे मवाळ पुढारी निजाम सरकारशी तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न करीत होते. त्यात तडजोडीचा प्रमुख भाग हा असा होता की, जबाबदार राज्य पद्धतीचे तत्त्व सरकारने मान्य करावे. प्रतिनिधीत्वात शेकडा ५० हिंदू व शेकडा ५० मुसलमान हे तत्त्व कॉंग्रेसने मान्य करावे. सरकारतर्फे निरनिराळ्या स्तरावर कॉंग्रेसजनांशी संपर्क साधून हे तत्त्व त्यांच्या गळी उतरविण्याचे खूप प्रयत्न केले गेले.

## पू. स्वामीजींचा दृढ निर्धार

स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्ष पू. स्वामी रामानंदतीर्थ यांचेही मन वळविण्यासाठी सरकारचे प्रतिनिधी तुरुंगात गेले. पण पू. स्वामीजी यत्किंचितही आपल्या भूमिकेपासून ढळले नाहीत. वर्किंग कमिटीशी विचार विनिमय करण्यासाठी वर्किंग कमिटीच्या सदस्यांना व पू. स्वामीजीनाही सोडण्यात आले. पू. स्वामीजी सुटून बाहेर मुंबई, मद्रास येथे गेले. तेथील सहकाऱ्यांशी विचारविनिमय केला. दिल्लीला जाऊन पं. नेहरूंची त्यांनी भेट घेतली. मुंबईला सरदारजींची भेट घेतली. मुंबईत कार्यकर्त्यांची भेट घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. सर्वांनी पू. स्वामीजींना पूर्णपणे पाठिंबा दिला.

ते परत हैदराबादेस येताच त्यांना अटक करण्यात आली. पुन्हा तुरुंगवास. ते गुलबर्ग्याच्या तुरुंगात असताना तुरुंगावर रझाकाराचा हल्ला झाला. त्यात भीमसेनराव देसाई नावाचे सत्याग्रही मारले गेले. असाच हल्ला निजामाबाद तुरुंगावरही झाला. हे सगळे पूर्व नियोजित होते. कृतिसमिती या सर्व घटनांचे रिपोर्ट पं. नेहरू व वल्लभभाईंना देत होती. शेवटी महात्मा गांधी, पंडित नेहरू व सरदार वल्लभभाईंची भेट घेऊन हैदराबादेतील स्फोटक परिस्थितीची कल्पना श्री. दिगंबरराव बिंदूनी त्यांना दिली. माऊंट बॅटन परत इंग्लंडला जाण्याआधी निजामाचे धोरण असेच अडेलतट्टूपणाचे राहिले; तर भारत सरकारने फौजा पाठवून संस्थानचा राज्यकारभार आपल्या हाती घ्यावा; असा ठराव करून ठेवला होता.

## भारत सरकारची पोलीस कार्यवाही

माउंट बॅटननंतर श्री. राजगोपालाचारी गव्हर्नर झाले. महात्मा गांधींनीही भारत सरकारला हैदराबाद व काश्मीरवर फौजा पाठविण्याचा सल्ला दिला होता असे कळते. पण फौजा पाठविण्याची कार्यवाही या ना त्या कारणाने पुढे पडत होती. त्याचे कारण गव्हर्नर जनरल श्री. राजगोपालाचारी व पं. नेहरू, निजामाला आणखी वेळ देऊ इच्छित होते. निजामाने श्री. गोपालाचारींना पत्र लिहिले होते. त्या पत्राच्या उत्तराचा मसुदा करून सरदार वल्लभभाईकडे पाठविला. पण त्या आधीच त्यावेळचे गृहमंत्री सरदार बलवंतसिंग व सरदार पटेल या दोघांनीच फौजा पाठवून निजामाला वठणीवर आणावयाचे ठरविले होते. या परस्पर निर्णयामुळे राजाजी व नेहरू हे संतापले असे त्यावेळचा एक प्रसिद्ध पत्रकार दुर्गादास लिहितो. हा; कुणाच्या रागालोभापेक्षा हैदराबादच्या जनतेच्या सुरक्षितेचा, भारताचे स्वातंत्र्य पूर्ण करण्याचा प्रश्न होता. १३ सप्टेंबरला हिंदी फौजानी हैदराबादकडे पाच बाजूकडून कूच केले. अन् १७ सप्टेंबरला निजाम शरण आला. पू. स्वामीजींच्या

कणखर नेतृत्वामुळेच हे हैदराबादचे विमोचन झाले, अशीच इतिहास साक्ष देईल ! या पाच दिवसांत प्रत्येक घडीला हैदराबाद येथे निजामाच्या राजवाड्यात, प्रधानमंत्री लायक अलीचे कार्यालय व हैदराबाद सैन्याचा प्रमुख जनरल अलइद्रस यांची जी खलबते चालची होती, त्यांची जी घालमेल झाली होती; याचे वर्णन उमरखलीद यांनी संपादित केलेल्या Hyderabad after the face या लेखसंग्रहातील पंतप्रधान लायक अली याच्या The five day war या लेखात वाचायला मिळते. त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, यात लष्करी कार्यवाहीस एखादा दिवस जरी उशीर झाला असता तरी संयुक्त राष्ट्रसंघटनेत निजामाला अभयदान मिळण्याची शक्यता निर्माण झाली असती. पण भारताची पुण्याई प्रबलच म्हटली पाहिजे की, सरदारजींना व सरदार बलवंतसिंगाना योग्यवेळी पोलीस कार्यवाही करण्याची बुद्धी झाली. भारताच्या पोटातील व्रण (अल्सर) असेच सर्वजण त्या संस्थानचे वर्णन करीत. पण त्यावर शस्त्रक्रिया करण्यास विलंब होत गेला. भारताची सलगता, एकात्मता टिकवण्याचे श्रेय जितके भारतीय सेनेला द्यायचे; तितकेच किंबहुना थोडेसे अधिक श्रेय पू. स्वामी रामानंदाना द्यायला हवे. मवाळांच्या जाळ्यात त्यांनी स्टेट काँग्रेसला अडकू दिले नाही.

पंडित नेहरूंनी अ. भा. काँग्रेसचे नेतृत्व केले; तसेच अ. भा. संस्थानी प्रजा परिषदेच्या अध्यपदावरून हैदराबादच्या स्वातंत्र्य लढ्यास प्रोत्साहन दिले. यात वाद नाही. पण हैदराबादविरुद्ध पोलीस कार्यवाहीच्या वेळी मात्र नरम धोरण स्वीकारल्याची टीका त्यांना सहन करावी लागली. ही गोष्ट त्यांनी स्वतःच ७ सप्टेंबर १९४८ ला पार्लमेंटमध्ये केलेल्या भाषणात कबूल केली आहे.

### हैदराबादचा इतिहास व भूगोल बदलला

हैदराबाद संस्थानाविषयी भारत सरकारने काढलेली श्वेतपत्रिका तशी परिस्थितीवर विदारक प्रकाश टाकणारी आहे. तरी पं. नेहरूंनी सबुरीचे धोरण का बाळगले; हे कोडे आजही न उलगडलेले आहे. तसेच हैदराबाद संस्थानच्या विभाजनाबद्दल ही पं. नेहरूंची शेवटपर्यंत संमती नव्हती. पण पू. स्वामी रामानंदतीर्थांनी हैदराबाद येथे भरलेल्या अ. भा. काँग्रेसच्या अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात विभाजनावर भर दिला होता. पं. नेहरूंना ती सूचना मान्य नव्हती. ते थोडेसे नाराजच झाले होते. पण पं. नेहरूंच्या लहरी स्वभावाबद्दल काही जरी बोलले गेले, तरी ते हाडाचे लोकशाहीवादी होते. त्यांनी पू. स्वामीजींच्या विभाजनाच्या सूचनेचा स्वीकार केला. शेवटी हैदराबादचे तीन विभाग, शेजारच्या आंध्र, महाराष्ट्र व कर्नाटकात विलीन झाले. हैदराबादचा इतिहास व भूगोल दोन्ही बदलण्याचे श्रेय पू. स्वामी रामानंदतीर्थांनाच द्यावे लागेल.

□□□

# लेखकांचा अल्पपरिचय

नाव : डॉ. प्रा. चंद्रकांत देऊळगावकर

लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयातील मराठी पदव्युत्तर विभागाचे प्रमुख म्हणून कार्य.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे विद्यमान सदस्य.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या सल्लागार समितीचे सदस्य आहेत.

साधना, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, प्रतिष्ठान इत्यादी नियतकालिकातून लेखन प्रकाशित.

---

नाव : श्री. रा. ना. चव्हाण

जन्म : १९ ऑक्टोबर १९१३, वाई, जि. सातारा.

सत्यशोधक चळवळीचे चिकित्सक अभ्यासक आणि संशोधक.

महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारांचा प्रभाव आणि त्यांच्यासोबत कार्य.

राष्ट्रवीर, सुबोध पत्रिका, नवभारत, युगकर्ता, अस्मितादर्श इत्यादी नियतकालिकांतून साताऱ्याचे वैचारिक लेखन.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या गौरववृत्तीने सन्मानित. विविध ग्रंथाचे लेखक

---

नाव : मोहन धारिया

जन्म : १४ फेब्रुवारी १९२५.

स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय सहभाग. युवक लढ्यांचे नेतृत्व.

माजी खासदार आणि केंद्रीय मंत्री.

संसदेत तरुण तुर्क आघाडीचे क्रियाशील नेते. सामाजिक आणि आर्थिक न्यायाचे खंदे पुरस्कर्ते.

भारतीय हरित क्रांती लोकचळवळीचे संस्थापक, अध्यक्ष. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईचे अध्यक्ष म्हणून कार्यरत. भारतीय शिक्षण संस्था, पुणे या संस्थेचे विश्वस्त. इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र पुरस्काराने सन्मानित. मानवतावादी तत्त्वज्ञानाचे विचारवंत म्हणून कार्यरत.

---

नाव : स. मा. गर्गे

संपादक : भारतीय समाजविज्ञान कोश व मराठी रियासत.

पत्रकार, ग्रंथकार, इतिहास संशोधक, कोश संपादक.

प्रमुख मराठी वृत्तपत्रात २५ वर्षे विविध संपादकीय कामे, मराठवाडा विद्यापीठात वृत्तपत्र विभागाचे संचालक, महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाचे चिटणीस.

राज्यशास्त्र आणि इतिहास या विषयांचे सुमारे २० ग्रंथ. त्यातील ' राज्यशास्त्राचा विकास ', ' स्वप्न आणि सत्य ', ' करवीर रियासत ', ' हिंदुराव घोरपडे ', या ग्रंथांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार, त्या शिवाय राज्यशास्त्र, राज्यशासन, समाजवादी समाजरचना, भारतीय राज्यघटनेचा इतिहास, भारताचे लोकमत, भारताचा स्वातंत्र्य संग्राम, शांतिपर्वातील राजधर्म, गोपाळ गणेश आगरकर हे ग्रंथ प्रकाशित.

---

नाव : प्र. श्री. नेरूरकर

जन्म : १४ फेब्रुवारी १९२२.

शालेय जीवनापासून लेखनास सुरुवात. प्रवासिनी, बेट नावाचे माणूस, रोम्बाट हे कथासंग्रह ; शिरिस्ताव, कॉकटेल, कोण्या एका देशात कोणे काळी, धागेदोरे, इंद्रायणी अजून वाहतच आहे, इत्यादी कादंबऱ्या, बालसाहित्य, प्रवासवर्णन, बालगीतसंग्रह, ' हसरी बालगीते. '

अनेक मौलिक ग्रंथांचे अनुवाद प्रकाशित.

मराठी, इंग्रजीतील अनेक दर्जेदार नियतकालिकांतून शेकडो लेख प्रकाशित.

पुरोगामी साहित्य चळवळीत अग्रभागी, विशेषतः मॉरिशस येथील जीवन, संस्कृतीवर माहितीपूर्ण विपुल लेखन.

दलित साहित्य चळवळीत महत्वाचा सहभाग व दलित साहित्य भाष्यकार. ' मॉरिशस डायरी ' ग्रंथाला महाराष्ट्र राज्य व अनंत काणेकर साहित्य पुरस्कार.

---

नाव : श्री. शांताराम गरूड

जन्म : १५ फेब्रुवारी १९२७ रोजी सातारा जिल्ह्यातील मसूर गावी. विद्यार्थीदशेपासून राजकीय आंदोलनांत क्रियाशील.

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात सहभाग. पुढे राष्ट्रसेवादलात कार्य. वेगवेगळ्या आंदोलनांत एकूण पाच वर्षांचा कारावास.

अनेक वृत्तपत्रांचे संपादन व त्यातून अभ्यासपूर्ण लेखन. ज्ञानपीठ समाजवादी प्रबोधिनी या संस्थेची स्थापना करून त्याद्वारे चर्चा शिबिरे, परिसंवाद, कार्यशाळा इत्यादीचे आयोजन.

भाई माधवराव बागल यांच्या लोकविद्यापीठाने ' आचार्य ' ही पदवी जाहीरपणे प्रदान.

राजकीय, सामाजिक विषयांवर अनेक अभ्यासपूर्ण पुस्तके प्रकाशित.

---

नाव : पन्नालाल सुराणा

शिक्षण : बी.ए. एलएल.बी.,

मुक्काम : बार्शी, जि. सोलापूर.

राष्ट्र सेवादल, शेतकरी व कामगार संघटना, समाजवादी व जनता पक्ष या क्षेत्रात काम केले. आपला महाराष्ट्र, लोकशाही समाजवाद, ग्रामीण औद्योगिकरण, प्रजासत्ताकला आव्हान, इत्यादी पुस्तके प्रकाशित. मराठी, हिंदी व इंग्रजी नियतकालिकात लेखन, मराठी विश्वकोशातही लेखन.

---

**नाव : डॉ. सदा कऱ्हाडे**

**जन्म :** ९ मार्च १९३१ बुलढाणा (विदर्भ) येथे.

**शिक्षण :** एम. ए. पीएच. डी. मराठी विषयात मुंबई विद्यापीठातून ' न. चि. केळकर सुवर्णपदक '.

**व्यवसाय :** १९९१ पर्यंत मराठीचे प्राध्यापक. नंतर सेवानिवृत्त.

अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांशी संबंध.

' लोकवाङ्मय ' आणि ' सोविएत मित्र ' मासिकांचे बरीच वर्षे संपादक.

अनेक दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिकातून वैचारिक, ललित व समीक्षात्मक लेखन. पंचवीसच्या वर पुस्तके प्रकाशित.

' सुरवंट ' आणि ' गांवकुसाबाहेरची वस्ती ' या कादंबऱ्यांना राज्य पुरस्कार.

---

**नाव : पुरुषोत्तम विनायक अराणके**

साहित्यक्षेत्रात सातत्त्याने पंधरा वर्षे विविध विषयांवर लेखन.

' दक्षता ' आणि ' मनोहर ' मासिकात विविध विषयांवर लेख प्रकाशित.

भारतीय शास्त्रीय नृत्यकला या विषयावर विशेष संशोधन.

' नेहरू, केनेडी, जागतिक शांतता ' या विषयावरील लेखनास मराठी भाषेच्या प्रथम पारितोषिकाने सन्मानीत.

---

**नाव : डॉ. वसंत गोवारीकर**

१९३३ साली पुणे येथे जन्म. भारतीय अंतराळ तंत्रविज्ञानाचे गाढे अभ्यासक.

एक थोर वैज्ञानिक.

बर्मिंगहॅम विद्यापीठाच्या डॉक्टरेटने सन्मानित.

थुम्बा येथील अंतराळ केंद्रात विशेष कार्य. भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रातील आघाडीचे शास्त्रज्ञ म्हणून सुपरिचित.

---

**नाव : डॉ. ज. रा. शिंदे**

' महात्मा फुल्यांचे सामाजिक व राजकीय विचार ' या विषयावर पीएच.डी.

१९७७ पासून मराठवाडा विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात सध्या प्रोफेसर आणि विभाग प्रमुख.

आतापर्यंत एकूण बारा पुस्तके प्रकाशित.

भारताच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांपासून आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत विविध विषयांवर अनेक लेख नियतकालिकांमधून प्रकाशित.

भारताचे राजकीय अर्थकारण या विषयाकडे सध्या विशेष आकर्षित.

निरनिराळ्या पुरोगामी चळवळीशी संबंध.

१९९२ मध्ये १३ व्या महाराष्ट्र राज्य शास्त्र परिषदेच्या अध्यक्षपदी एकमताने निवड.

---

**नाव : प्रा. सुधीर वामनराव गव्हाणे**

**जन्म :** १६ एप्रिल १९५५-बार्शी.

मराठवाडा विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागात गत दहा वर्षांपासून अध्यापन. ' अमूट ' या प्राध्यापक संघटनेचे (मराठवाडा विद्यापीठ) सचिव.

आकाशवाणी औरंगाबाद केंद्रावर तीन वर्षे सहसंपादक (संहिता) पदावर कार्य. नभोनाट्य, श्रुतिका, रुपके, भाषणे, कथा आदि सुमारे १५० रेडिओ संहिता लिहिल्या. काही शृंखला नभोनाट्ये लिहिली.

मराठी पत्रकारितेतील १२ वर्षांचा अनुभव. महाराष्ट्र टाइम्स, सा. मनोहर, सा. दिनांक, मराठी ब्लिट्झ, मराठवाडा, लोकमत, अजिंठा, संचार, किर्लोस्कर अशा प्रमुख दैनिके-साप्ताहिके व मासिके यामध्ये जवळपास एक हजार लेख, वार्तापत्रे, स्फुटे, स्पेशल रिपोर्टस् प्रकाशित.

---

**नाव : प्राचार्य डॉ. सत्यरंजन पुरुषोत्तम साठे**

**जन्म :** २७ मार्च १९३१, बी.ए. एलएल. एम्.जे.डी. (अमेरिका)
डॉक्टर ऑफ ज्युडिशिअल सायन्स

गेली ३० वर्षे कायद्याचे प्राध्यापक.

बनारस हिंदु विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ पदव्युत्तर वर्गांना अध्यापन. १९७६ पासून पुण्याच्या इंडियन लॉ सोसायटीच्या विधी महाविद्यालयात प्राध्यापक व प्राचार्य.

सध्या निवृत्तीनंतर फोर्ड फाउंडेशनच्यातर्फे भारतातील ट्रॅब्युनल पद्धती या विषयावर संशोधन करत आहेत.

दोन संशोधन अहवाल, विविध देशी परदेशी नियतकालिकातून ६० च्या वर लेख प्रकाशित. (१) प्रशासकीय विधी, (२) घटना दुरुस्ती : कायदा व राजकारण, (३) माहितीचा अधिकार ह्या इंग्रजी पुस्तकांचे व कलम ३७० अपरिहार्य का? ह्या मराठी पुस्तकाचे लेखक.

---

**नाव : श्री. गोविंद तळवलकर**

१९५० ते १९६७ पर्यंत ' लोकसत्ता ' व ' महाराष्ट्र टाइम्स ' या दैनिकांमध्ये सहसंपादक.

१९६८ पासून महाराष्ट्र टाइम्स या दैनिकाचे संपादक.

१९६३ साली थॉम्सन फौंडेशनची शिष्यवृत्ती घेऊन वेल्समधील ' कार्डीफ ' येथे वृत्तपत्रीय शिक्षण!

' टिळकदर्शन ', ' नवरोजी ते नेहरू ', ' बाळ गंगाधर टिळक ', ' सत्तांतर ', ' वाचता-वाचता ', ' बदलता युरोप ' इत्यादी ग्रंथ प्रकाशित.

न्या. रामशास्त्री प्रभुणे सामाजिक पुरस्कार, रायकर पुरस्कार, राज्य पुरस्कार याशिवाय पत्रकारितेच्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

---

**नाव : डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे**

**जन्म :** ३० सप्टेंबर १९४२.

जळगाव जिल्ह्यातील वरणगाव येथे शिक्षण : एम.ए. पीएच.डी. व्यवसाय : राज्यशास्त्राचे प्राध्यापक

**लेखन :** भारताचे शासन आणि राजकारण, आधुनिक भारतीय राजकीय विचार, दुसरे स्वातंत्र्य, महात्मा फुले : वारसा आणि वसा, यशवंतराव चव्हाण इत्यादीसह पंधरा ग्रंथ प्रकाशित.

प्रतिष्ठित नियतकालिकांतून सामाजिक, राजकीय, वाङ्मयीन विषयांवर विपुल लेखन. वाङ्मयीन आणि सामाजिक चळवळीशी संबंध.

---

**नाव : डॉ. निर्मलकुमार फडकुले**

साहित्य समीक्षक, ललित लेखक आणि विचारवंत वक्ते, प्रकाशित ग्रंथ—

(१) लोकहितवादी : काल आणि कर्तृत्त्व.

(२) साहित्यवेध.

(३) संतकवी तुकाराम : अनेक चिंतन.

(४) काही रंग काही रेषा.

(५) हिरव्या वाटा.

(६) आनंदाची डहाळी.

(७) जगायचं कशासाठी ?

(८) रंग एकेकाचे–इत्यादी.

एकोणीसाव्या शतकातील सामाजिक प्रबोधनाचे अभ्यासक. महाराष्ट्रातल्या संतांच्या वाङ्मयाचे व चळवळीचे एक चिकित्सक.

---

**नाव : गणेश प्रभाकर प्रधान**

**जन्म :** २६ ऑगस्ट १९२२

**शिक्षण :** फर्ग्युसन कॉलेज

बी.ए. (इंग्रजी व आनर्स) १९४२

एम.ए. (इंग्रजी व मराठी) १९४५

**अध्यापन :** १९४५ ते १९६६ फर्ग्युसन कॉलेज, १० वर्षे पदव्युत्तर, पुणे विद्यापीठ.

**लेखन : इंग्रजी :** लो. टिळक चरित्र,

म. गांधी-मुलांसाठी चरित्र (प्रा. अ. के. भागवत यांच्या समवेत.)

राम गणेश गडकरी, इंडियाज फ्रीडम स्ट्रगल

**लेखन : मराठी :** लो. टिळक : व्यक्ती व कार्य

हाजीपीर, कांजरकोट, सोनार बंगला (युद्ध भूमीवरील प्रवास वर्णने), भाकरी आणि स्वातंत्र्य, साता उत्तराची कहाणी, स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत, लो. टिळक (नॅशनल बुक ट्रस्ट), राजकीय बखर.

**संपादन :** आगरकर लेखसंग्रह (साहित्य अकादमी), पं. नेहरू, विविध दर्शन.

'साधना' समाज प्रबोधन पत्रिका व अन्य वृत्तपत्रातून.

राष्ट्र सेवादल, १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात ११ महिने कारावास, समाजवादी पक्षाचे कार्य, नंतर जनता पक्षात कार्य.

१९७५ आणीबाणीत १६ महिने कारावास.

विधान परिषदेवर पदवीधर मतदार संघातून (१९६६, १९७२ व १९७८ आधी तीन वेळा निवड, एकूण अठरा वर्षे आमदार.

१९८० ते १९८२ विधानपरिषद विरोधी पक्षनेता.

---

**नाव : यदुनाथ दत्तात्रय थत्ते**

**जन्म :** ५ ऑक्टोबर १९२२

**शिक्षण :** बीएस्सी, १९४२ च्या चलेजाव चळवळीत कारावास. स्वातंत्र्य सैनिक.

**कार्य :** साधना साप्ताहिकाच्या संपादक मंडळात बत्तीस वर्षे काम. बहुतेक सर्व मराठी नियतकालिकात प्रसंगोपात्त लेखन. अनेक मराठी व हिंदी पुस्तकांचे लेखन. केंद्र व राज्य सरकारचे साहित्य पुरस्कार.

अनेक शैक्षणिक व रचनात्मक संस्थांशी संबंध.

**अध्यक्ष :** मार्ग (मल्टीपल ॲक्शन व रिसर्च ग्रुप).

**उपाध्क्ष :** महाराष्ट्र आरोग्य मंडळ.

**भूतपूर्व सदस्य :** प्रेस कौन्सिल इंडिया; चिल्ड्रन्स फिल्म सोसायटी.

**पुरस्कार :** आगरकर पुरस्कार, नागसेन पुरस्कार, समतानंद गद्रे पुरस्कार.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ गौरवश्री.

---

**नाव : प्रा. फकरूदीन हजरत बेन्नूर**

**शिक्षण :** एम.ए., राज्यशास्त्र,
एम.ए., इतिहास

सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केले.

१९६५ पासून राज्यशास्त्राचे प्राध्यापक, १९६६ पासून राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून सोलापूरच्या संगमेश्वर महाविद्यालयात नियुक्ती. १९७० पासून मुस्लीम समाजाच्या प्रबोधनाच्या चळवळीत सक्रीय सहभाग, दलित चळवळ, विषमता निर्मूलन चळवळीचे खंदे समर्थक, पुरोगामी विचारवंत.

१९९२ साली संपन्न झालेल्या राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन परिषदेचे अध्यक्ष.

---

**नाव :** सूर्यनारायण माणिकराव रणसुभे.

**जन्म :** ७ ऑगस्ट १९४२.

**शिक्षण :** एम.ए. (हिंदी), पीएच.डी. (हिंदी).

' आधुनिक मराठी साहित्य का प्रकृतिमूलक इतिहास '

कहानीकार कमलेश्वर : संदर्भ और प्रकृति, देश-विभाजन और हिंदी कथा-साहित्य, डॉ बाबासाहेब आंबेडकर : साहित्य प्रकाशित, आठवणीचे पक्षी : प्र. ई. सोनकांबळे ' यारों के पंछी ', अक्कर माशी : शरणकुमार लिंबाळे ' अक्कर माशी ', उचल्या : लक्ष्मण गायकवाड, उठाईगीर, साक्षीपूरम : रामनाथ चव्हाण, साक्षीपूरम् या पुस्तकांचा अनुवाद.

दलित कहानियाँ, स्पंदन (ललित लेखांचा संग्रह), संपादन, ' समाजप्रबोधन पत्रिका ', ' मराठवाडा ', ' किर्लोस्कर '. सध्या दयानंद कला महाविद्यालय.

लातूर येथे हिंदी विभागात प्राध्यापक.

---

**नाव :** रविचंद्र स. किंबहुने

**जन्म :** १५ सप्टेंबर १९४६ सोलापूर येथे.

**शिक्षण :** बी.एस्‌सी. एम.ए. (इंग्रजी).

**व्यवसाय :** अध्यापन. ७ वर्षे पीपल्स कॉलेज, नांदेड येथे. १९७७ ते आजपर्यंत मराठवाडा विद्यापीठाच्या इंग्रजी विभागात प्रपाठक. मराठी साहित्य, इंग्रजी साहित्य आणि तौलनिक साहित्याभ्यास ह्या विषयात विशेष रूची. जवळ जवळ १०० स्फुट लेख वाङमयीन विषयावर.

---

**नाव :** श्री. वि. पां. ऊर्फ भाऊसाहेब देऊळगावकर

स्वातंत्र्य लढ्यातील सक्रीय कार्यकर्ते आणि स्वातंत्र्य सैनिक.

हैद्राबाद मुक्तीसंग्रामात आघाडीचा सहभाग. हैद्राबाद स्टेट कर्नाटक प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस म्हणून कार्य. विविध महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक म्हणून शैक्षणिक सेवा. दै. मराठवाडा, किर्लोस्कर, प्रतिष्ठान, साधना, केसरीमध्ये विविध विषयांवर लेखन.

' आंतरभारती ' चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते.

डॉ. शिवराम कारंथ यांच्या ' यक्षगाव ' ग्रंथाचा अनुवाद.

गुलबर्गा येथे मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्य.

अनेक सामाजिक आणि सार्वजनिक संस्थाशी निकटचा संबंध.

साहित्य अकादमीच्या मराठी विभागाच्या सल्लागार समितीचे सदस्य.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई